म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
स्थन ७९०६

REFBK-0000097

आ०प. नं. ८२८

# श्रीरंगनाथस्वामीकृत पदसंग्रह-

लाजविलेंचि निजयशें दुग्धाब्धि तरंग रंगनाथानें ॥
भक्तिज्ञानें ज्याची मति पोषित जेंवि अंगना थानें ॥ १ ॥

( मोरोपंत )

REFBK-0000097

हा सुप्रसिद्ध व प्रासादिक पदसंग्रह

हरिभक्तिपरायण राजश्री गोविंद अप्पाजी बोवा व दत्तात्रय
मनोहर ऊर्फ धोंडीबोवा गोसावी ( निगडीकर )

व

## अनंत गणेश निगडीकर

यांनीं

पुणें येथें श्री शिवाजी छा. छापून प्रसिद्ध केला.

शके १८२४ मार्गशीर्ष वद्य १०.

सन १९०२ डिसेंबर तारीख २५.

किंमत १ रुपाया.

९७.

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकावरील सर्व प्रकारचा हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्याकडे ठेविला आहे.

# प्रस्तावना.

श्रीरंगनाथस्वामी यांची प्रासादिक कविता आज चार पांच वर्षांपूर्वीच छापून प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु होता; परंतु कांहीं अनिवार्य प्रसंगामुळें तसा योग घडून आला नाहीं; परंतु त्याची सिद्धता आज व्हावी असाच यावरून श्रीचा हेतु दिसतो.

सदर्हू ग्रंथांत श्रीरंगनाथस्वामी व त्यांचे पुतणे श्री काशिराज या उभयतांचे कवित्वाचा समावेश करून क्वचित् प्रसंगीं श्रीविठ्ठलराव आत्यास्वामी [ रंगनाथाचे कनिष्ठ बंधु ] यांचेंही कवित्व दिलें आहे. फक्त रंगनाथस्वामींचेंच कवित्व न देतां त्यांचे बंधु व पुतणे यांचें कवित्व देण्याचें कारण असें आहे कीं, त्यांणीं श्रीची कवित्वसरणी कशी अगदीं हुबेहुब उचलली हें वाचकांचे दृष्टोत्पत्तीस यावें. जेथें प्रासंगिक पद्यें आलेलीं आहेत तेथें त्यांचे खालीं टीप देऊन तो तो प्रसंग दर्शित केला आहे. दुर्बोध शब्दांचा अर्थकोश व वर्णानुक्रमवार पद्यांची सूची हीं पुस्तकाचे शेवटीं जोडलीं आहेत. शिवाय या भगवद्भक्ताचें सच्चरित्र ग्रंथविस्तार होईल या भयास्तव फारच थोडक्यांत ग्रंथारंभीं दिलें आहे. या ग्रंथाचा प्रसार झपाट्यानें झाला तर लागलीच श्रीस्वामींचें साद्यंत चरित्र छापून प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे, व त्याप्रमाणें आमचे हातून सेवा घेणें हें वाचकांवर अवलंबून आहे.

सदर्हू ग्रंथाची हस्तलिखित प्रत तयार करण्याचे कामीं रा. रा. भगवंत बाळकृष्ण पै मु. होडवडें यांनीं फारच श्रम घेतले व चि. रा. अनंत गणेश गोसावी यांणीं श्रीस्वामींचें अल्प चरित्र, अर्थकोश व टिपा या फार मेहनत घेऊन दिल्या, सबब या उभयतांचे आम्ही फार आभारी आहोंत. आतां शेवटीं श्री शिवाजी छापखान्याचे मालक रा. रा कृष्णराव बापूजी गांडे यांनीं सदर्हू ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं अविश्रांत श्रम घेतले याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानून हा अल्प प्रस्तावनालेख पुरा करतों.

श्रीरंगनाथस्वामींचें

# चरित्र.

---

श्री क्षेत्र पंढरपुरापासून नैऋत्य दिशेस सांगोलें तालुक्यांत माण नदीचे कांठीं नाझरें ह्मणून एक लहानसें गांव आहे. तेथें मोंगलाईतून चौसाळें महालांतील खडकी गांवचे राघोपंत खडके नांवाचे गृहस्थ पंधरावे शतकांत रहाण्यास आले. त्यांस अश्वपरीक्षा फार चांगली असल्यामुळें विजापुरचे बादशहानें त्यांचें खडके हें उपनांव बदलून "घोडके" असें ठेविलें. त्यांणीं नाझरें येथें देशपांडेपणाची व ज्योतिष कुळकर्णाची वृत्ति विजापुरचे दरबारांतून मिळविली. त्यांचेपासून रंगनाथांचे वडील हे चवथे पुरूष होत. त्यांचें नांव बोपाजी रंगनाथ. बोपाजीपंत जात्या शूर असल्यामुळें आपली कुळकर्ण व देशपांडेपणाची वृत्ति संभाळूनही विजापुर सरकारचे दरबारीं जात येत असत. त्यांचें त्या दरबारीं मोठें वजन होतें, व बादशहाचीही मर्जी त्यांचेवर मोठी प्यार होती.

बोपाजी रंगनाथ हे मोठे भाविक व संभावित गृहस्थ होते. ते आपला प्रपंचभार मोठ्या औत्सुक्यानें वहात असतां त्यांचेवर सद्गुरुकृपा होण्याचा सुसमय घडून आला तो असा :---

कलबुर्ग्याजवळील कल्याणमठचे श्री सहजानंद स्वामींचे पट्ट शिष्य श्री पूर्णानंद यति हे गुर्वाज्ञेवरून तीर्थयात्रा करीत करीत श्रीक्षेत्र पंढरपुरास येत असतां त्यांचा मुक्काम सहजीं नाझऱ्यास पडला. त्यांचें सुंदर व तेजस्वी शरीर, मुखावरील दिव्य कांति व शांत मुद्रा पाहून बोपाजीपंत फारच आनंदित व चकित झाले. त्यांना तर वाटलें कीं, या परम हंसाचे दर्शनानेंच अनेक संसारत्रस्त अज्ञानी जीव उद्धरले असतील. मग त्यांनीं स्वामींस साष्टांग प्रणिपात घालून विज्ञप्ति केली कीं, आजि पूर्वपुण्य उदयासि आलें ॥ कीं सकल तीर्थांसी स्नान घडलें ॥ कीं मम दैव उदेलें ॥ देखिलीं पाउलें संतांचीं ॥ १ ॥ असें म्हणून स्वामींचे पाय आपल्या वास्तुपुरुषास लागावे या हेतूनें त्यांस आपले गृहीं नेलें.

बोपाजीपंतांनीं नित्य नियमानें स्वामींची अर्घ्यपाद्यादि पूजा करून त्यांचे मुखींचा प्रेमळ व सत्य परिपूर्ण असा उपदेश ऐकावा. त्यांचे पूजेस लागणारें सर्व साहित्य पुरवून अक्षय्य सेवेंत दक्ष असावें. असा क्रम चालला असतां श्री पूर्णानंद स्वामीनीं पंढरपुरास जाण्याची आपली इच्छा प्रगट केली; तेव्हां बोपाजीपंतास फारच अवघड वाटलें; कारण जसे स्वामी त्यांचे घरीं रहाण्यास आले तसे त्यांनीं इतर सर्व प्रपंचादिक व्यवहार पाहण्याचें काम बंधूवर सोंपवून आपण नेहमीं स्वामींचे सान्निध बसून त्यांचा सद्बोध एकाग्र चित्तानें ऐकावा. स्वामींनीं येथून प्रयाण केल्यावर आपण त्यांचे नीत्यूपदेश व सेवासुख यांस अंतरणार हें मनांत येऊन त्यांनीं स्वामीस वास्तव्य करण्याविषयीं बहुत आग्रह केला; परंतु स्वामी राहीनात. मग बोपाजीपंतांनीं श्रीस्वामींस विज्ञाप्ति केली कीं, ॥ चित्तीं धरूनियां प्रेमा ॥ ह्मणे हा संतांचा प्रसाद महिमा ॥ तुह्मीं सद्गुरु जोडले-ते आह्मां ॥ सोडवा भवभ्रमापासोनी ॥ १ ॥ आणखी ॥ आतां कृपा करोनी आह्मांवर ॥ अनुग्रह द्यावा जी साचार ॥ तेणेंचि सफल हा संसार ॥ होईल उद्धार जीवाचा ॥ १ ॥

असें ह्मणून श्रीचरणीं लोटांगण घातलें. मग श्रीनीं त्यांस उपदेश करून त्यांचें शांतवन केलें. स्वामी मोहजाल परित्याग करून वैराग्य धारण करून होते तरी त्यांचें अंतःकरण द्रवून डोळ्यांस पाणी आलें; कारण, बोपाजीपंतासारख्या निस्सीम भक्ताला आज सोडून जावें लागतें; तरी मायाजालांत न पडतां स्वामी तीर्थयात्रेस निघाले; कारण त्यांस गुर्वाज्ञा अशी होती कीं, तीर्थयात्रा करितां करितां अज्ञ जनास बोध करून सन्मार्गास लावावें, एके ठिकाणीं वास्तव्य करूं नये. जर आपण येथें राहिलों तर गुर्वाज्ञा भंग होईल हें एक व इतर पुण्यस्थलें व विभूतिदर्शन अंतरेल हें दुसरें. असा विचार करून ते प्रातःकालीं नाझऱ्याहून पंढरपुरास जाण्यास निघाले. बोपाजीपंतादि सर्व ग्रामस्थ मंडळी स्वामींस चार कोसपर्यंत घालवीत जाऊन श्रीस शेवटचा साष्टांग नमस्कार करून परत फिरली. बोपाजीपंतांचें अंतःकरण तर अगदीं दाटून आलें! पहा, साधूंचें सान्निध्य हें फारच दुर्लभ असून किती उपकारिक आहे तें, ज्यांना दैवयोगानें असल्या पुण्यमूर्तींचें सान्निध्य घडलें तेच पुरूष आज श्रेष्ठांत गणले जातात; कारण त्यांचें सान्निध्य हें मुमुक्षूंना कित्तारूपच

होतें. या किऱ्याबरहुकूम जे वर्तन ठेवितात, तेच योग्यतेस चढतात यांत नवल तें काय? स्वामींचे उपदेशानें बोपाजीपंतांची अशी स्थिति झाली कीं, त्यांस प्रपंचांत पूर्ण वैराग्य उत्पन्न होऊन तो मृगजलवत् मिथ्या भासूं लागला. स्वामी गेल्यापासून ते विरक्त वृत्तीनें व सत्काल-क्षेप करून राहूं लागले. ज्या पुरुषाला लढाईवर जाऊन मर्दुमकी गाज-वावी असें वाटत होतें त्यालाच आतां सूक्ष्म जीवजंतूंचा सुद्धां चुकून सं-हार झाला तर आपण आज महत्पाप केलें असें वाटूं लागलें.

प्रपंचशकट बऱ्या वाईट तऱ्हेनें ढकलीत असतां एके दिवशीं बोपाजीपं-तांची सुशील पत्नी बयाबाई व तिची जाऊ या दोघींमध्यें भांडण झालें, तेव्हां तिनें बयाबाईस तूं अनपत्य आहेस, तुला काय दुसऱ्याच्या लेंकरा-ची माया येणार आहे अशा प्रकारचें छद्मी भाषण बोलून दुखविलें; तेव्हां तिला फार वाईट वाटलें. स्त्रियांस अनपत्य असणें फार शोकास्पद होतें त्यांना पुत्राशिवाय जिणें व्यर्थ वाटतें, व जर अपत्यसुख नसेल तर त्या संसारांत मुळींच लक्ष देत नाहींत. या नियमाला अनुसरून बयाबाईनें सर्व प्रपंचव्यवस्था पहाण्याचें सोडून दिलें, व घडलेली हकीकत यजमा-नाचे कानावर घातली व गोष्ट काढली कीं, सद्गुरुप्रसादानें आपणांस ए-खादें पुत्ररत्न झाल्यास पहावें. पुत्राशिवाय सद्गति नाहीं असें शास्त्रांत सांगितलें आहे. आजपर्यंत जावेचे मुलगे तेच आपले ह्मणून मानीत आलें व पुढेंही तसेंच मानून चालण्याचा माझा कृतसंकल्प आहे; परंतु बायकांची समजूत वेडी ह्मणून ह्मणते कीं, गुरुमहाराजांजवळ अपत्यमा-गणी करावी. तें बोलणें बोपाजीपंतास रुचून त्यांनीं बयाबाईस गुरुपादु-कांची, श्रीतुलसीची व गाईची शुचिर्भूत होऊन नित्य नियमानें पूजा कर-ण्यास सांगितलें. तें सर्व ऐकून घेऊन मोठ्या श्रद्धेनें बयाबाई तशी वर्तूं लागली. गाईस धान्य चारून शेणांतील धान्यकण धुवून त्यांजवर तिनें निर्वाह करावा, व रात्रौ तुलशीसन्निध निजावें.

ह्याप्रमाणें क्रम सुरू असतां एके दिवशीं बयाबाई निद्रिस्त असतां श्री पूर्णानंद स्वामी स्वप्नांत येऊन त्यांनीं तिचे ओटींत तीन श्रीफलें घातलीं. त्यांपैकीं सहज हातीं आलेलें मधलें ह्मणजे दुसरें श्रीफल सद्गुरूंचें दर्शन रिक्त हस्तें घेऊं नये ह्मणून स्वप्नदर्शनांतच बयाबाईनें श्रीस पदवंदन करून अर्पण केलें. तें पाहून स्वामी अंतरीं सद्गदित होऊन परम संतोषानें

बोलले कीं, " हें श्रीफल तुजजवळच असूंदे. मुली, तुझे इच्छेप्रमाणें पुढें हा प्रसाद आमचा आह्मांस मिळेल. असें ह्मणून तें श्रीफल परत बयाबाईचे ओटींत घालून, आशिर्वचन बोलून स्वामी अदृश्य झाले.

जागृत झाल्यावर बयाबाईनें खरोखरीच आपले ओटींत तीन श्रीफलें पाहून आनंद मानिला, व तो प्रसाद सर्वत्रांस दाखवून यजमानांचे परवानगीनें सुमुहूर्तानें त्यांतील एक श्रीफल भक्षण केलें. बयाबाईस गर्भधारणा होऊन जडत्व येत चाललेलें पाहून सर्वत्रांस मोठा संतोष झाला. व तिच्या जावा नणंदा ह्मणूं लागल्या कीं, सद्गुरुप्रसादानें बोपाजीपंतास इतक्या उतरत्या वयांत अपत्यसुख प्राप्त होणार हें कोणाच्या स्वप्नीं सुद्धां नव्हतें; परंतु त्यांची भक्ति मोठी ह्मणून हें न घडणारें घडत आहे.

असो, शके १५३१ त यादव श. १५३४ परिधाविसंवत्सर मार्गशीर्ष शुद्ध १० रविवार रोजीं रंगनाथ व श. १५३८ त विठ्ठल याप्रमाणें सात वर्षांचे मुदतींत बोपाजीपंत, बयाबाई या उभयतांस सद्गुरुप्रसाद-भक्षणानें तीन अपत्यें झालीं. अगोदरच घरची श्रीमंती त्यांतून हीं ह्मातारपणीं झालेलीं मुलें मग काय त्यांचें कोड पुरविण्यास कोण मागें पुढें पहातो. सर्वांनीं या तिन्ही बालकांचे मोठ्या उत्कंठेनें कोड पुरवावेत. यादवराव, प्रथम पुत्र घोड्यावर बसून तिरंजाजी, दांडपट्टा, कुस्त्या, वगैरे मर्दुमकीचे खेळ खेळूं लागलेलें पाहून त्यांचे दोन्हीही भावंडांनीं तोच कित्ता वळविला. यादवरावाला १५ वर्षांचे वयांतच शूरपणाचीं कृत्यें करून वहावा मिळवावी असें वाटूं लागलें. त्याला युद्धकलेचा नाद असे. रंगनाथ यास गलूल, निशाण मारणें, दांडपट्टा, घोड्यावर बसणें वगैरेची जरी आवड होती तरी त्याचे वृत्तीचा ओघ निराळेच दिशेनें वळला. त्यानें वडिलांबरोबर स्नान करुन गीतापाठ ऐकावा, पूजेचें साहित्य जमवून द्यावें व वडिलांसांगातीं पुराणश्रवणासही बसावें. याप्रमाणें जरी अंगांत शौर्य होतें तरी त्याच व्यासंगांत तल्लीन न रहातां त्याचें मन भक्तिमार्गाकडे वळलें. तो अल्प वयांतच गीता मुखोद्गत ह्मणूं लागला. शिक्षकाकडून व वडिलांकडून ते जें वाचतील त्याचें अर्थज्ञान त्यानें करून घ्यावें.

असा क्रम चालला असतां आतां रंगनाथास बारा तेरावें वर्ष लागलें. त्याचा विवाह करावा ह्मणून बोपाजीपंतांचे मनांत आलें, व त्याप्रमाणें ते

त्या उद्योगासही लागले. आपलें लग्न करण्याचा वडिलांचा निश्चय झाला हें पाहून रंगनाथानें प्रथमतः आपले मातोश्रीजवळ आपलें लग्न करूं नये ह्मणून बरीच गळ घेतली, व बळजबरीनें माझें लग्न करण्याचें मनांत आणाल तर मी पळून जाईन असें त्यानें स्पष्ट सांगितलें; परंतु बयाबाईनें त्यास पोटाशीं धरून तोंडावरून हात फिरवून त्यानें लग्न करावें ह्मणून त्यास पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, व शेवटीं बोलली कीं,- 'बाळा तूं विचार कर कीं, जर तुझे वडिलांनीं आपलें लग्न मुळींच करावयाचें नाहीं असा हट्ट धरिला असता, तर आज तुह्मां मुलांचें जें कौतुक आह्मी पहात आहोंत तें दृष्टीस पडण्याचा संभव तरी येता काय ?' इतकें बोलून तिचा कंठ दाटून आला म्हणून ती स्तब्ध राहिली. रंगनाथानें यावर एकच उत्तर दिलें कीं, आई, तूं सर्व जाणत असून अशा वेड्यासारखी मला लग्न कर ह्मणून गळ घालतेस हें बरोबर नाहीं. तूंच ना श्रीपूर्णानंद स्वामींस द्वितीय श्रीफल अर्पण केलेंस ? त्याप्रमाणें मी त्यांचे प्रसादाचा असून तूं मला उगीच मोहपाशांत कां गुंतवितेस ? तेव्हां बयाबाई चपापली व तिनें तो विषय सोडिला. रात्रौ बोपाजीपंतास तिनें सर्व वृत्त सांगितलें; परंतु त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें, व लग्नसमारंभाची सर्व तयारी चालविली.

रंगनाथानें हे सर्व आतां आपणास योगसाधनाचे आड येतात हें पाहून दुसरे दिवशीं रात्रौ जिकडे तिकडे सामसूम असतां एकट्यानेंच पोबारा केला. तो थेट अजनूर गांवाहून निरानरसिंहपुरास गेला. तेथें श्रीजवळ योग सिद्ध व्हावा ह्मणून प्रार्थना केली., व श्रीनींही या बालभक्ताचे दृष्टांत देऊन मनोरथ परिपूर्ण केले. त्यास बद्रिकाश्रमीं योगाराधनेकरितां जावें म्हणून दृष्टांत झाला व त्याप्रमाणें त्यानें लागलीच बद्रिकाश्रमाची वाट धरिली. पहा, मनुष्यस्वभाव कसा आहे तो, त्याचे मनानें जें एकदां करावयाचें म्हणून घेतलें तें सिद्ध करण्यास तो प्रवृत्त झाला असतां कितीही दुःखें व कसलेही बिकट प्रसंग जरी त्याजवर गुदरले तरी त्यांस न जुमानतां मोठ्या धैर्यानें व दृढ निश्चयानें तो इष्ट हेतु साधण्यास तयार असतो. इतर व्यवसाय सोडून कर्तव्याशीं गांठ घालितो. त्याप्रमाणेंच रंगनाथानें केलें. त्याचे मनांतून परमेश्वराधना व योगसाधन कावयाचें होतें म्हणून त्यानें पूज्य अशा वृद्ध मातापितरांचें

वचन अमान्य करून आपले कार्यास पूर्ण विघातक जें प्रपंचादि सर्व विनाशी गृहवैभव त्यांस न जुमानतां आपले कार्यसिद्धीशीं गांठ घातली.

इकडे ॥ गोड न लागेचि अन्नपाणी ॥ वर्षाएवढी वांटे यामिनी ॥ बालकाचे गुण आठवोनि मनीं ॥ अन्य विषय ध्यानीं न नेणती ॥ १ ॥ याप्रमाणें बोपाजीपंताच्या सर्व कुटुंबाच्या मंडळीची स्थिति झाली. आ-मच्या दुराग्रहाचें प्रायश्चित्त आह्मांस मिळालें! बाळा, आतां आमचा अंत न पहातां त्वरित येऊन आम्हांस दृढ प्रेमालिंगन दे असें म्हणून बयाबा-ईनें शोक करावा. जात्या स्त्रियांचें अंतःकरण फार कोमळ असल्यामुळें कोणतीही गत बालकाची प्रिय वस्तु त्यांचे दृष्टीस पडली म्हणजे त्यांचें अंतःकरण विव्हल होतें. नुसत्या बालकांचे प्रिय वस्तूनें जर त्या इत-क्या दुःखी होतात तर ज्यास रात्रंदिवस लळा लावून काळजीनें थंडीवा-ऱ्यादिकांपासून प्रेमातिशयानें रक्षण केलेंलें असतें तें बालक दृष्टिआड झा-ल्यावर त्यांची काय स्थिति होते याचा विचार वाचकांनींच करावा.

अगोदरच या उभयतां स्त्रीपुरुषांस प्रपंचांत नैराश्य उत्पन्न झालें होतें, यांत या रंगनाथाचे विरहदुःखानें भर घातली. त्यांनीं दर महिन्यास श्रीपांडुरंगाचे वारीस जाण्याचा क्रम ठेविला. एके दिवशीं बयाबाईचे विनवणीवरून बोपाजीपंतअप्पा यांनीं, आपणास निर्दय मृत्यूच्या तडा-ख्यांत सांपडण्यापूर्वीं रंगनाथ भेटेल कीं नाहीं म्हणून श्री सद्गुरु पूर्णानंद महाराज यांस विचारिलें असतां श्रीनीं " तो महा तपोनिष्ठ दिव्य देह-धारी असा तुह्मांस तुह्मीं क्षेम असतांनाच भेटेल " ह्मणून दृष्टांतरूपानेंच सांगितलें. त्या गुरुवचनावर पूर्ण भरंवसा ठेवून ते उभयतां आपले शेष राहिलेले आयुष्याचे दिवस काढीत होते.

## उत्तरार्ध.

बदर्याश्रमे द्वादशाब्दे गतो यः ॥ नियतेंद्रियाणां पुरश्चार कारी ॥
रुधित्वाहि वायुं गतो ब्रह्मरंध्रे ॥ चिदानंदरूपं भजे रंगनाथम् ॥ १ ॥

पूर्वार्धांत रंगनाथस्वामींची पूर्व पीठिका सांगून आतां त्यांचें योगाराध-ईशकृपा व चमत्कार यांचें थोडक्यांत वर्णन द्यावयाचें आहे.

रंगनाथस्वामी बद्रिकाश्रमीं जाऊन तेथें इंद्रियदमन व मनःशुद्धीकरितां योगाराधन करूं लागले. त्यांनीं हठयोगाचा अवलंब न करितां राजयोग

स्वीकारला. राजयोगाच्या अष्ट पायऱ्या किंवा मार्ग ( यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि ) यांमध्यें पूर्ण सिद्धि मिळवून रंगनाथस्वामी ब्रह्मानंदपदीं विराजित होऊन डोलूं लागले. त्यांनीं प्राणायाम विधींत अकरा गायत्रीपुरश्चरणें सांग केलीं. परंतु बद्रिकाश्रमीं हवा अतिशय थंड असल्यामुळें त्यांना मस्तकशूलाची व्यथा जडली. तरी त्यांनीं त्याची कांहींच पर्वा न करितां त्या महा योगाचे आनंदांत तल्लिन होऊन समाधिस्त बसावें.

पिंड ब्रह्मांड एक जाहलें ॥ तत्वीं तत्वतां विभागलें ॥
जिव शिव मावळले ॥ स्वरूप उदेलें तात्काळ ॥ १ ॥
उदय पावला आत्मगभस्ती ॥ दृश्य चांदणें सरली राती ॥
आत्मास्थिती ॥ परिपूर्ण ॥ २ ॥

अशी आपले सद्भक्ताची स्थिति झालेली पाहून श्रीनारायणांनीं भयंकर अक्राळ विक्राळ अशा व्याघ्राचें रूप धारण करून रंगनाथाजवळ येऊन त्यास एकाच ग्रासानें गट्ट करितात कीं काय असा आवेश दर्शविला परंतु रंगनाथस्वामींनीं श्रीनारायणाची अद्भुत लीला ओळखून त्यांचे चरण घट्ट धरिले. श्रीनीं भक्ताचे ठिकाणीं पूर्ण अद्वैत बाणलेलें पाहून व्याघ्ररूपानेंच त्याचे मस्तकावर वनौषधीचा स्वहस्तें लेप केला व परत जाऊं लागले तेव्हां

सोंग दावूनियां दीनास ॥ जातसां कोठें जगन्निवास ॥
जन्मोजन्मीं हा आपुला दास ॥ न सोडी पायास सर्वथा ॥ १ ॥
भक्त‌ांकित तये वेळां ॥ चतुर्भुज जाहला सांवळा ॥
दर्शन दिधलें रंभमूर्तीला ॥ वर्णितां सुखाला अनुपम्य ॥ २ ॥

याप्रमाणें श्रीनारायणानें साक्षात् दर्शन देऊन रंगनाथस्वामींस योगाराधन पुरें करण्यास सांगितलें व आज्ञा केली कीं, तुम्हीं आतां लौकरच आपले वृद्ध मातापितरांस भेट द्यावी, अज्ञ जनांस अनुभवपंथास लावावें व जातांना जें कांहीं कोणी अर्पण करील त्याचा स्वीकार करावा. श्रीचे चरण सोडून परत जाणें रंगनाथस्वामींचे जिवावर आलें; परंतु आज्ञेप्रमाणें ते परत माघारे फिरले. वाटेनें टेहरी येथील पहाडी राजा अनन्यभावें शरण येऊन त्यानें नीलवर्ण घोडा, पंच हत्यारें, झगा, मंदील

अलंकार वगैरे स्वामींस अर्पण केलें, त्यांचा त्यांनीं स्वीकार करून त्या राजास कृतार्थ केलें. राजानें या वस्तु अर्पण केल्यापासून रंगनाथस्वामींनीं आपलें काषायवस्त्र, कौपीन, दर्भासन यांचा त्याग केला व ते राजैश्वर्य थाटानें राहूं लागले. वाटेनें येतांना त्यांचें ज्या स्थलीं रहाणें पडे त्या स्थलीं त्यांनीं आत्मानात्म विचार करण्यांत समाधि लावून बसावें, व अज्ञ जनांस उपदेश करावा कीं, या मायिक पसान्यांत तथ्यांश नसून जर आपण बाल्यावस्थेमध्येंच कांहीं ईश्वराराधना केली नाहीं तर जी मध्यें पूर्ण दुर्गति आहे ती दुरत्यय जरावस्था प्राप्त होऊन आपण मानवी जन्माचें मातेरें करूं. जर कांहीं जन्मास आल्याचें सार्थक व्हावें असा तुमचा हेतु असेल तर बाल्यावस्थेंतच दीर्घोद्योग करा. हा उपदेश कित्येकांनीं ऐकावा व कित्येकांनीं ऐकूं नये; परंतु बरेच लोक त्यांची साधुवृत्ति पाहून त्यांचे शिष्य बनले व त्या शिष्यांसहवर्तमान ते श्री क्षेत्र पंढरपुरीं आले. तेथें श्री पांडुरंगापुढें कीर्तन करीत असतां श्रोते मंडळींत बोपाजीपंत व बयाबाई हे उभयतांही बसले होते. त्यांनीं वयमानपरत्वें रंगनाथस्वामींचें जरी स्वरूपांतर झालें होतें तरी त्यांस तत्काळ ओळखिलें. बयाबाईचें तर अंतःकरण आनंदोर्मीनें उचंबळूं लागलें. मग त्या उभयतांनीं कीर्तनसमाप्तीनंतर पोटाशीं धरून रंगनाथस्वामींस गाढ प्रेमालिंगन दिलें. त्यांची अलाई बलाई घेतली. रंगनाथस्वामींनीं त्या उभयतांस साष्टांग प्रणिपात घातला व आपण त्यांना विरहदुःख दिलें याबद्दल त्यांस फार वाईट वाटलें; नंतर रंगनाथस्वामींस समवेत घेऊन ते उभयतां नाझऱ्यास गेले व तेथें पूर्ववत् आनंदानें राहूं लागले. याच सुमारास रंगनाथस्वामींस मातृवियोग झाला.

रंगनाथस्वामींचा पूर्णत्वास पावलेला व प्रगल्भ असा उपदेश बोपाजीपंत आप्पा यांनीं नित्यशः ऐकून त्याचें मनन करावें असें चाललें असतां सहज एके दिवशीं त्यांचे मनांत चतुर्थाश्रमदीक्षा घेण्याचें येऊन त्यांनीं ती गोष्ट रंगनाथस्वामीजवळ काढिली. स्वामींनीं त्यास अनुमोदन देऊन कल्याणार्थ श्री पूर्णानंद यतिवर्यांकडे नेलें व तेथें त्यांचे इच्छेप्रमाणें त्यांस दीक्षा दिली. दीक्षाग्रहणानंतर आतां बोपाजीपंत न ह्मणतां निजानंदस्वामी ॥ अहंममतेनें त्यागुनी ॥ सोहं ध्यानीं बैसले ॥ अशी त्यांची स्थिति झाली

दीक्षा दिल्यानंतर पूर्णानंदस्वामींनीं बोपाजीपंताचें ' निजानंदस्वामी ' असें नांव ठेविलें. रंगनाथस्वामींनीं अद्याप आपण कोरे आहोंत असें जाणून निजानंदस्वामींस आपणावर अनुग्रह करण्यास विनविलें. त्यांचे म्हणण्याप्रमाणें त्या वेळीं रंगनाथस्वामींस व मागाहून यादवराव व विठ्ठलराव यांस निजानंदस्वामींनीं अनुग्रह देऊन कृतार्थ केलें. आपले हातून चारीही आश्रम पूर्ण व्हावे असा ईश्वरी संकेत दिसतो. असें दीक्षाग्रहणानंतर निजानंदस्वामींस वाटून अत्यानंद झाला.

पुढें तीर्थयात्रा करीत करीत निजानंदस्वामी व रंगनाथस्वामी हे कऱ्हाड क्षेत्रास आले. तेथें श्री कृष्णा व कुकुमती ( कोयना ) यांचा प्रीतीसंगम पाहून त्यांनीं जित जलसमाधि घेण्याविषयीं रंगनाथस्वामींस विचारिलें व बोलले कीं, ' तूंच विचार करून पहा कीं आम्हीं आतां समाधि घ्यावी हेंच योग्य नव्हे काय? आणखी कांहीं दिवस तुझे सांगातीं राहून वेदांतचर्चा श्रवण करावी असा मनोदय होता; परंतु परमेश्वरपदसान्निध्यवास घडावा अशी फार उत्कंठा आहे; तर बा आतां आज्ञा घेण्यास योग्य अशी कायती या जगांत तुझीच मूर्ति आहे. बापा, आतां अविनाश पदप्राप्ति व्हावी या हेतूनें मी मार्गक्रमणास प्रारंभ करणार तेव्हां एकदां नारायण नामाचा गजर करून व शेवटचा नारायण स्वरूपवर्णनपर अमृततुल्य उपदेश करून या जीवाला समाधि घेण्यास अनुमोदन दे. रंगनाथस्वामींनीं तें निर्वाणीचे शब्द ऐकून अंतःकरणीं सद्गदित होऊन स्वामींचे चरणावर मस्तक ठेविलें व उठून स्वामींची मूर्ति नेत्रभर अवलोकन केली. त्यांचे इच्छेप्रमाणें नारायणस्वरूपाचें साकार व निराकार असें वर्णन करून बोलले कीं, हा जीव सद्गुरूंस समाधि घेण्याविषयीं अनुमोदन देण्यास मोह पावतो. हे रंगनाथस्वामींच्या तोंडचे शब्द ऐकून स्वामी बोलले कीं, ' बा असा मोह पावूं नकोस. ' मग निजानंद स्वामींनीं मार्कंडेय तीर्थाजवळ शके १५६४ मार्गशीर्ष वद्य ३० स श्रीकृष्णेंत जित जलसमाधि घेतली.

रंगनाथस्वामींस मातापितरांचें देहावसान झाल्यानंतर सर्वत्र उदासीनता भासूं लागली. त्यांनी नेहमीं निजानंदस्वामींची शांत व आनंदी मूर्ति ध्यानांत आणून ध्यानावस्थेंतच तिजसीं संवाद करावा. या वेळेपासूनच रंगनाथस्वामींनीं पुढें जें जें कवित्व केलें त्यांत शेवटीं ' निज,

निजानंद, निजाचा ' या शब्दांनीं आपलें पितृप्रेम व्यक्त केलें आहे. या पूर्वीचें जें त्यांनीं समयोचित कवित्व केलें आहे. त्यांत [illegible] आपले परम गुरु श्री पूर्णानंद यांचेबद्दल ' पूर्ण ' व परात्पर गुरु, सहजानंद यांचेबद्दल ' सहज ' हे शब्द घातले आहेत. यावरून वाचकांचे सहज लक्षांत येईल कीं, रंगनाथस्वामींचे कावित्वांत तीन प्रकारचे भेद आहेत. बऱ्याच पद्यांत त्यांनीं ' सहज पूर्ण निज रंग ' हे शब्द योजून गुरु, परम गुरु, परात्पर गुरु व स्वनाम दर्शित केलें आहे. हे शब्द त्यांनीं इतके नैपुण्यानें योजिले आहेत कीं, कोणाही वाचकास ही आंतील गुरुपरंपरेची नामगालिका ठाऊक असल्याशिवाय यांतील गौप्य कळणार नाहीं.

याउप्पर रंगनाथस्वामींनीं नाशऱ्यास रहाण्याचें सोडून दिलें व तीर्थयात्रा करण्याचें आरंभिलें. मार्गांत त्यांनीं श्री समर्थ रामदासस्वामी यांची सत्कीर्ति ऐकल्यावरून ते त्यांचे दर्शन घ्यावें या हेतूनें कृष्णातटाकास यावयास निघाले. तों सातारा जिल्ह्यांत कोरेगांव तालुक्यांत वाटेनें त्यांस निर्गुडीचें वन लागलें. त्या बनांतच ओढ्याचे कांठीं चार दोन मराठे लोकांचीं घरें होतीं तेथें स्वामींचा घोडा दगडांत खूर रुतला म्हणून अडला. घोडा पुढें पाऊल उचलीना हें पाहून ते खालीं उतरले व घोड्याचा पाय उचलून पहातात तों दगडांत खूर जशाचा तसाच उमटलेला आहे.† मग त्यांनीं श्री व्यासाज्ञेप्रमाणें‡ तेथेंच रहाण्याचा निश्चय केला व तेथील पाटील ढांगरे यास रहाण्याकरितां जागा मागितली. त्यानें स्वामींची साधुवृत्ति पाहून मठ बांधून दिला. सर्व प्रकारें स्वामींची योग्य तरतूद ठेविली. त्या पाटलाचा पूर्ण विश्वास बसावा ह्मणून स्वामींनीं या ठिकाणीं दोन चमत्कार केले. एक त्या पाटलाचे वांझ गाईचें दोहन व दुसरें त्यास पुत्रसंतान नव्हतें ह्मणून तो दुःखी होता, त्यास पुत्रसंतान होईल ह्मणून आशिर्वाद दिला व त्याला त्याच वर्षीं पुत्रसंतान झालें.

---

* याच वेळेस निजानंद ग्रंथ व स्वामींवर पंचकें, अष्टकें, पदें, श्लोक, आरत्या वगैरे बरेंच कवित्व रंगनाथस्वामींनीं केलें आहे. त्यांतील कांहीं पुढें पदसंग्रहांत देण्यांत आलें आहे.

† हा खूर उमटलेला दगड अद्याप निगडी येथें आहे.

‡ पाण्याचे आश्रयानें जेथें तुमचे घोड्याचा खूर रुतेल तेथें ती पूज्य भूमि जाणून तुम्हीं वास्तव्य करावें अशी व्यासाज्ञा होती.

या ठिकाणास स्वामी राहूं लागल्यापासून निर्गुणपुर* असें ह्मणूं लागले. नंतर रामदासस्वामींस भेटण्याकरितां रंगनाथस्वामी आपलें शिष्यमंडळ बरोबर घेऊन निघाले. त्यांची व समर्थांची प्रथम भेट माहुली मुक्कामीं होऊन एकमेकांची एकमेकांस पूर्ण ओळख पटली. येथूनच रंगनाथ स्वामींचे अवतारकृत्यास प्रारंभ झाला.

श्री निजानंद स्वामी समाधिस्त झाले तेव्हांपासून रंगनाथस्वामींचे मनांत औदासिन्य उत्पन्न झालें ह्मणून मागें सांगितलेंच आहे. मग त्यांनीं शिष्यमंडळ व इतर साधुसंत यांसह महायात्रेस प्रयाण केलें. वाटेनं देहू क्षेत्रास येऊन तुकारामबावांस सांगातीं चलावें म्हणून आग्रह करूं लागले; परंतु त्यांनीं

रंगराया सत्संग तुमचा ॥ घडावा हाचि हेतु चित्ताचा ॥
परि उपाय न चाले साचा ॥ प्रकार शरिराचा वार्धक्य हें ॥ १ ॥
तरी स्वामिया श्री रंगमूर्ती ॥ पत्रिका लिहितों मातेप्रती ॥
नेऊनियां स्वहस्तीं ॥ निजभक्ती समर्पावी ॥ २ ॥

असें म्हणून श्री भागीरथीस अर्पण करण्याकरितां अभंगरूपी पत्रिका लेहून दिली. ते अभंग——

चारी वर्ग झाले जेथुनि निर्माण ॥ तो हा नारायण बाप माझा ॥१॥
मुखीं ते ब्राह्मण बाहूसी राजन्य ॥ जानुजन्म जाण वैश्यवर्ण ॥ २ ॥
चरणिचा वास आहे त्या शूद्रासी ॥ जेथें जलराशी भागीरथी ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसें पहावें पुराणीं ॥ साक्षा हे वाणी व्यासाची ॥ ४ ॥

परिस तूं माते माझी विनवणी ॥ तुझिये चरणीं चित्त माझें ॥ १ ॥
जिता मुक्ति मेल्या मोक्ष तुझे तीरीं ॥ ऐके हो परत्रीं सुखरूप ॥ २ ॥
तुका विष्णुदास संतांचें पोसणें ॥ वाग्पुष्प तेणें पाठवीलें ॥ ३ ॥

ही अभंगरूप पत्रिका श्री रंगनाथस्वामींनीं भागीरथीस अर्पण केली व तिचें प्रत्युत्तर तुकारामबावांस देण्याकरितां मागितलें, तें श्री भागीरथीनें अभंगात्मकच दिलें तो अभंग——

---

* या निर्गुणपुराला सांप्रत निगडी ह्मणतात. ह्या गांवापैकीं स्वामींचे वंशजांना श्रीस्वामींचे समाधीचे खर्चाकरितां सालिना जवळ जवळ दीड हजार रुपयांचें उत्पन्न आहे.

आजिचा दिवस धन्य मज झाला ॥ सद्गुरु भेटला पत्रास्तव ॥ १ ॥
मजमाजीं प्राणी पवित्र जे होती ॥ ते दोष लागती माझे अंगीं ॥ २ ॥
माझे अंगींचा मळ काढील कवण ॥ एका तुह्मांवांचून विष्णुदासा ॥ ३ ॥
ऐका रंगमूर्ती सांगावें निरोपा ॥ नमस्कार बापा तुकोबासी ॥ ४ ॥

जान्हवीनें याप्रमाणें अंतरीं सद्गदित होऊन रंगनाथस्वामींस नमस्कार केला व प्रत्युत्तरपत्रिका त्यांचे स्वाधीन केली. ती स्वामींनीं तुकोबारा परत येतांना दिली.

२ पंढरपुरीं पौर्णिमेचा काला करण्याचा रंगनाथस्वामींचा संप्रदाय असे. सांप्रदायानुरूप पंढरपुरीं जाऊन त्यांनीं काला केला व तेथेंच राहिले. भक्तमंडळींचे आग्रहावरून त्यांनीं दररोज श्रीपांडुरंगापुढें कीर्तन करावें. एके दिवशीं सायंसंध्येस उशीर लागल्यामुळें श्रोतेमंडळींनीं परत न जावें म्हणून त्यांस आपण लवकरच येतों असा निरोप सांगण्यास आपले पुतणे खंडोबा यांस त्यांनीं सांगितलें. खंडोबांनीं श्रोतेमंडळीस तो निरोप सांगितला तेव्हां समर्थ रामदासस्वामी बोलले कीं,—

रंगोबा येई तंवपर्यंत ॥ उभे रहावें तुम्हीं खंडोपंत ॥
करवा कांहीं श्रवणार्थ ॥ भागवतार्थ लिहिलाहो ॥ १ ॥

हें ऐकतांच त्या अक्षरशून्य खंडोबास मरणप्राय दुःख झालें. तो तसाच तडक स्वामींकडे येऊन झालेलें वर्तमान त्यांस निवेदन करून रडूं लागला.

अक्षरहीन मी मंदमती ॥ कीर्तन करावें अवघे वदती ॥
एकही अभंग मजप्रती ॥ न ये युक्ती काय ह्मणू ॥ १ ॥

ही त्याची स्थिति पाहून स्वामींनीं त्याचे जिव्हेवर "श्री" अक्षर काढून वरदहस्त मस्तकीं ठेविला व त्यास ज्ञानी केलें. मग खंडोबांनीं

मध्यरात्र गेली टळोन ॥ तरी पुरें न होय श्रवण ॥
विरोनि गेलें देहभान ॥ श्रोतेजन समाधिस्थ ॥ १ ॥

अशी श्रोत्यांची तल्लीनता कीर्तनानें केली. मग सर्वांनीं त्याचें खंडोबा नांव बदलून श्रीधर असें ठेविलें. याच श्रीधरानें पुढें 'रामविजय,' 'हरीविजय,' 'पांडवप्रताप' वगैरे ग्रंथरचना करून आपलें नांव अमर केलें. हें सर्व फल सद्गुरुप्रसादाचें होय.

३ एकदां समर्थ श्री रामदास स्वामी रंगनाथ स्वामींसह साताऱ्याहून निगडीस येत होते तों वाटेंत कृष्णानदीस अपार पाणी आलेलें पाहून

अंग न भिजतां पैलतीरीं ॥ जाते जाहले रामदास निर्भीरीं ॥
रंगमूर्तीसि त्या अवसरीं ॥ ह्मणती वैखरी या आतां ॥ १ ॥ तेव्हां
तये काळीं श्री रंगनाथ ॥ हृदयीं स्मरले सद्गुरुनाथ ॥
जळावरुनी अश्वासहित ॥ आले त्वरित सहजगती ॥ २ ॥

या व अशाच प्रकारच्या चमत्कार* परिपूर्ण गोष्टी श्री रंगनाथस्वामींनीं अनेक केल्या. त्यांचीं बुद्धिमत्ता विशेष असून वक्तृत्वशैली तर अवर्णनीय असे. कितीही अवघड व गहन विषय असला तरी सुगम करून श्रोत्यांचे मनावर पूर्णपणें त्याचा ठसा उमटविण्यांत तर त्यांचा हातखंडाच असे.

स्वमन्ववंतं पदं रंगनाथं ॥ प्रसंगें कथायाः प्रबोद्धा जनानां ॥ रुचिं भक्तिज्ञाने करोद्यो जडानां ॥ चिदानंदरूपं भजे रंगनाथम् ॥ १ ॥ याप्रमाणें वक्तृत्वाविषयीं त्यांची ख्याति होती. साधारण श्रोत्यांना तर आनंद

---

* खालीं लिहिलेले चमत्कार रा. चौबळकृत रामदास चरित्रांत भाविक वाचकांनीं पहावेत—

१ रेडा मारून सजीव केला. [ रा. च. पृ. १४३—५० पर्यंत ] २ माघ शुद्ध पौर्णिमेस वडगांवास श्री कृष्णाप्पाचे पुण्यतिथीकरितां भागानगराहून घोड्यावरून वडगांवीं चार प्रहरांत आले. वाटेनें कुकुडवाडचे खिंडींत रामोशी यांनीं गांटलें असतां त्यांचा गर्वपरिहार केला. [ पृ. १९९ ते २०४ ] ३ आकाशस्थ घार गलूलीनें मारून फिरून तिजला सजीव केली. [ पृ. २५२ ते ५३ ] ४ बोहे गांवीं पारडू श्वापदांनीं मारिलें ह्मणून ह्मैस दूध देईना, तिजला पारडाशिवाय दूध देण्यास लाविलें. ५ भागानगरीं या रामदास पंचायतनांनीं आनंदीबाईचे येथें भोजन करून तिजला कृतार्थ केलें. [ पृ. २६५ ते ७२ ] ६ प्रयत्नापेक्षां प्रारब्ध बलवत्तर कसें याची रंगनाथस्वामींचे राजैश्वर्य थाटावरून कल्याणास समर्थांनीं प्रतीति आणून दिली. [पृ. २९८ ते ३०१] ७ जयरामस्वामी व रंगनाथस्वामी यांनीं बादशहास राजनीतीचा बोध केला. [ रा. गोळेकृत जयरामचरित्र पृ. ६६ ते ६८ ]

याशिवाय ह. भ. प. रा. राजारामबावा इसलामपुरकर यांनीं श्रीचें साग्र चरित्र ‘ भक्तमंजरी ’ ग्रंथांत वर्णिलेलें पंचाध्यायात्मक आहे तें वाचकांनीं पहावें.

होईलच; परंतु समर्थ रामदासस्वामी, जयरामस्वामी वगैरेस सुद्धां यांचें प्रेमळ कीर्तन फार आवडत असे. समर्थांनीं आपणास औदासिन्य आलें म्हणजे शिवाजीसह निगडीस यावें व रंगनाथस्वामींसीं प्रश्नोत्तर संवाद करून आनंदित होऊन परत जावें. अशा प्रसंगाचें एक पद्य देतों.

सखया रंगा रंगवि माझें मन ॥ संशय तोडुनि जोडावें समाधान ॥ध्रु०॥ कोठें आहे तद्धाम? मायापूरीं ॥ मायापूर कोठें? ते आत्मनगरीं ॥ कैसा वर्ते सिद्ध तो? नटापरी ॥ पुनर्जन्म आहे कीं ना संसारीं ॥ १ ॥ भक्त कोण? जो भूतदया वाहे ॥ ज्ञानी कोण? जो जग मिथ्या पाहे॥ कर्म कोण? निर्हेतुक होत आहे ॥ कोण विद्वान? आपआपणा पाहे ॥ २ ॥ शूर कोण? कामादि संहारीले ॥ मित्र कोण? धर्मासि वोढियेलें ॥ थोर कोण? कीर्तितें जोडियेलें ॥ नीच कोण? आपआपणा बूडवीलें ॥३॥ सुख कोण? शांती, दुःख? भ्रांती ॥ हानि कोण? आपणा आपण विस्मृती॥ लाभ कोण? आपणा आपण प्राप्ती ॥ रामदास निजरंगा आलिंगिती ॥ ४ ॥ देवस्वरूप कोणतें? आहेपण ॥ मायास्वरूप कोणतें? नाहींपण ॥ संतस्वरूप कोणतें? संतपण ॥ निजानंदें रंगला रंगीं पूर्ण ॥ ५ ॥

ही समर्थांची स्थिती झाली. जयरामस्वामी वडगांवकर हेही रंगनाथस्वामींचें रसभरित भाषण व कीर्तन ऐकावें ह्मणून शिष्यासमवेत पत्र देऊन स्वामीस वडगांवीं बोलावून नेत. त्या पत्रांपैकीं एक येथें सादर करितों.

ॐ नमोजी चिदानंदघना ॥ ॐ नमोजी नित्य नूतना ॥ ॐ नमोजी मनमोहना ॥ दीनोद्धरणा दयानिधे ॥ १ ॥ दयानिधे पुण्यश्लोका ॥ सर्वदां प्रसन्न भाविकां ॥ सिद्ध स्वानंद सुखदायका ॥ सिद्धिविनायका श्रीरंगा ॥ २ ॥ श्री जे सेविति सुखसिद्धी ॥ चरणीं रंगली निरावधी ॥ तेंचि भक्ति समाधी ॥ कृपानिधीं तूं दातारा ॥ ३ ॥ दाता वचनामृतें वृष्टी ॥ करूनि भरिसी सकल सृष्टी ॥ सभाग्यावरी करोनि दृष्टी ॥ स्वानंदपुष्टी सभाग्यातें ॥ ४ ॥ सभाग्य जे करिती श्रवण ॥ श्रवणें झाले आनंदघन ॥ कृपादृष्टी भाविक जन ॥ सुखी संपूर्ण पैं केले ॥ ५ ॥ त्यांत मी एक जयराम ॥ माझे हृदयीं तुझें प्रेम ॥ निष्काम परिपूर्ण काम ॥ विश्रामधाम नाम तुझें ॥ ६ ॥ नाम तुझें श्री रंगनाथ ॥ माझा अर्थ स्वार्थ परमार्थ ॥ सत्य माहेर तूं समर्थ ॥ हेंचि यथार्थ जाण पां ॥ ७ ॥ परंतु तुझ्या दर्श-

नाची आस ॥ अखंड वाहे माझें मानस ॥ ह्मणे जयराम कृष्णदास ॥ भाणसि प्रेमास अंतरिंच्या ॥ ८ ॥

आता केशवस्वामी हैद्राबादकर हे रंगनाथस्वामींचे दर्शनाविषयीं व वाक्पीयूषप्राशनाविषयीं किती उत्कंठित असत याजविषयीं एक उतारा देतों.

पद ॥ रंगा येई वो रंगाबाई ॥ माझें मन रंगलें तुझे पायीं ॥ ध्रु० ॥ रंगातीते वो रंगनाथे वो ॥ सदोदीते वो भगवंते ॥ १ ॥ तुजविण वो अर्ध क्षण वो ॥ न गमे जाण वो तुझी आण ॥ २ ॥ अविकारे वो तत्व सारे वो ॥ पावे केशवीं संपूर्ण दीनोद्धारे ॥ ३ ॥

रंगनाथस्वामींनीं प्रति वर्षी रामदास, जयराम, आनंदमूर्ती व केशवस्वामी यांचे मठीं उत्सवात कीर्तनास आपला पट्टशिष्य जनार्दन यासह जावें, व या चतुर्विध मूर्तींना श्री निजानंदस्वामींचे पुण्यतिथीस कऱ्हाडास घेऊन यावें असा त्यांचा क्रम असे.

स्वामींचा ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, भागवत वगैरे ग्रंथ वाचण्याचा परिपाठ असे. यांनीं पद्यें, स्फुट आख्यानें, गुरुगीता, निजानंद ग्रंथ स्फुट श्लोक आरत्या, पंचकें व कांहीं ओवीबद्ध असें बरेंच कवित्व केलें आहे. हे रामोपासक असून यांचें परंपरागत अधिदैवत श्री दत्त आहे. शाक्त बालादेवी, मुद्रा खेचरी, सिद्धासन व सांप्रदाय आनंदनामा आहे. यांची गुरुपरंपरा पद्य ५५ यांत वर्णन केलेली आहे.

याप्रमाणें या भगवद्भक्तानें अद्भुत लीला करून शके १६०६ रक्ताक्षि संवत्सर मार्गशीर्ष वद्य १० रविवार रोजी प्रातःकाळीं निजानंद नामाचा उच्चार करीत करीत निर्गुण धामीं प्रयाण केलें.

संपूर्ण.

# श्री रंगनाथकृत पदें.

## पद १—राग यमनकल्याण.

पूर्वी गणाधिशा स्मरावें ॥ भजनें दुरित हारावें ॥ ध्रु० ॥ सुरवर नर किन्नर ॥ विद्याधर पन्नग गण गंधर्वी ॥ १ ॥ दुस्तर भवसागर तरणें ॥ तरि करणें हें सर्वी ॥ २ ॥ निःसंगें निजरंगें आत्म ॥ स्थिति साधावी बरवी ॥ ३ ॥

## पद २.

रामंनिजमूर्ति षडक्षरी मंत्रराज रे ॥ जपतां अनुदिन वाचे सिद्धी पावतें निज काज रे ॥ ध्रु० ॥ रामायण शतकोटी वदला वाल्मिक ऋषी जाणूनि रे ॥ राहुनि बद्धांजुळी सुरवर तिष्ठती कर जोडूनि रे ॥ राक्षसगण नेतीळ तरतिल अवघें ह्मणउनि रे ॥ रात्रदिन शिव स्तवितां हर मृड संतोषे शूळपाणी रे ॥ १ ॥ महादेवें समभागें विभाग करुनि तिहीं ठायीं रे ॥ मनुष्य देव पन्नग संबोखिले ते लवलाहीं रे ॥ मग उरलीं अक्षरें दोनी तीं शिव मागे पाहीं रे ॥ मन हें उन्मन झालें रामस्मरणें शीतळ देहीं रे ॥ २ ॥ निर्गुण परात्पर ब्रह्मादिक सुरवर नर ध्याती रे ॥ नित्य निरामय चिन्मय तन्मय होउनियां श्रुति गाती रे ॥ निगमागमिंचें सार पार नकळे कवणा-प्रति रे ॥ निर्मळ निश्चळ निष्फळ अज अव्यय आदि अंतीं रे ॥ ३ ॥ जयासि पाहातां कांहीं पाहातेपणही उरलें नाहीं रे ॥ जन्मजरामरण यांच्या न पडे जें प्रवाहीं रे ॥ जळीं स्थळीं काष्ठीं लोष्टीं देहीं आणि गेहीं रे ॥ जग नग चित्सुवर्णी कार्य कारणातित पाहीं रे ॥ ४ ॥ मुख पाहातां दर्पणीं दृश्य द्रष्टा दर्शन तिन्हीं रे ॥ मूर्तिमंत पुढें उभीं राहाति तीं तत्क्षणीं रे ॥ मुरडुनि सद्गुरुकृपें अवलोकितां आत्मज्ञानीं रे ॥ मुमुक्षु मुक्त झाले एकीं एकपणाहि नुरवुनि रे ॥ ५ ॥ तिमिरांधविध्वंसक

---

१. हा रंगनाथस्वामींचा कुळमंत्र. या पदांत या मंत्राचे प्रत्येक अक्षरावर एक एक याप्रमाणें सहाही चरण साधले आहेत, व चरणाच्या प्रत्येक कडव्याचें पहिलें अक्षर तेंच साधलें आहे.

सच्चित् सुखमय रवि उगवला रे ॥ तिळ तुल्य दृष्टांत नाहीं बोलावया बोला रे ॥ तीक्ष्ण हें महा शस्त्र स्मरणें निवटित कळिकाळा रे ॥ तिहीं भुवनीं पाहातां, रामनिजमूर्ति रंगला रे ॥ ६ ॥

## पद ३.

**गुरु** हे दोनिच वर्ण पूर्ण चित्सुवर्ण जाणा ॥ जग नग कार्याकारण हा कृत निश्चय कां नेणा ॥ ध्रु० ॥ **गुरु**वर गरिमा अनुदिन वर्णिति सुरगुरु आणि भृ**गु** ॥ **गुण**त्रयातीत ब्रह्म सदोदित अनुपम पद मा**गुं** ॥ **गु**प्त प्रकट ना न चोजवे तें अक्षय सुख भो**गुं** ॥ **गुं**तुनि न पडों या भवजाळीं गुरुस्मरणीं ला**गुं** ॥ १ ॥ **रुद्र** जगद्गुरु तोही वंदित रघुविर कल्पत**रू** ॥ **रु**ळति चतुर्विध मुक्ती पदिं तो भवजलनिधि उत**रुं** ॥ **रुं**जी करुनियां गुरुपदपद्मीं परिमळ तो स्वीका**रुं** ॥ **रु**चिकर गुरुनामामृत सेवुनि हा निजरंग भ**रुं** ॥ २ ॥

## पद ४.

**निजानंद** महाराज माझा परम गुरु स्वामी। जाईन लोटांगणीं पाहिन सर्वांतर्यामीं ॥ न वर्णवे ते समाधि कृष्णा कुकुमती-संगमीं ॥ **द**यासिंधू पहूडला परात्पर निजधामीं ॥ध्रु०॥ **नि**र्गुण परब्रह्म ध्यानीं मनी दिनरज**नीं** ॥ **नि**रहंकृति निष्काम आत्माराम चिद्भुव**नीं** ॥ **नि**त्य निरामय विचरे विदेहत्वें जनीं व**नीं** ॥ **निः**शब्द शब्दें विश्रामलें सत्य वचन वद**नीं** ॥ १ ॥ **जा**गृति स्वप्न सुषुप्ति अवस्था त्रय निरसुनि वो**जा** ॥ **जा**णिव नाणिव ग्रासुनि आला स्वभक्त निजका**जा** ॥ **जा**ळित रज तम वृत्ती ब्रह्मपुरिचा तो रा**जा** ॥ **जा**न्हविजळ मन निर्मळ तैसें जाणुनि नित्य भ**जा** ॥ २ ॥ **न**लिनीपत्र अलिप्त उदकीं होउनि उत्प**न्न** ॥ **न**रतनु पावुनी लीलाविग्रहि चित्सुख संप**न्न** ॥ **न**वविध भक्ती हृदयीं त्याच्या करिती कीर्त**न** ॥ **न**कळे महिमा शतपथ वदति तज्ज्ञ त**न्न** ॥ ३ ॥ **द**शशत वदनें वदतां सद्गुरुगरिमा निःश**ब्द** ॥ **द**र्शनमात्रें विषयि मुमुक्षु भोगि-

---

१, हें पदही वरील पदाप्रमाणेंच असून त्यांत गुरु चरणाचें आणि प्रत्येक कडव्याचें अनुक्रमें पहिलें आणि शेवटचें अक्षर एकत्र साधलें आहे.

२. हें पद रंगनाथाचे पुत्रणे [ विठ्ठलरावअप्पा यांचे ज्येष्ठपुत्र ] काशीराज यांचें आहे. त्यांत त्यांणीं आपले परम गुरु श्रीनिजानंद स्वामी यांचें वर्णन केलें आहे.

ति स्वानंद ॥ दंडुनि मनबुध्यादिक हरिले त्रिविध छेद भेद ॥ दंडप्राय प्रणमुनि पूर्ण रंगें अभेद ॥ ४ ॥

## पद ५.

रंगीं रंग रंग ह्मणतां दोनिच हे वर्ण[1] ॥ अघटित घटना माया पट दुरि करिति संपूर्ण ॥ जग नग कार्या कारण निर्गुण निजात्म सूवर्ण ॥ पदोपदीं आद्यंतीं संतीं जाणावी खूण ॥ ध्रु० ॥ रंगविला निजरंगें केला सार संसार ॥ रंका राज्य दिधलें सच्चित्सुखमय परात्पर ॥ रंजवुनी बुध विबुधां स्वयें निज निर्विकार ॥ रम्य सुगम्य सुसेव्य निरंतर वाचे उच्चार ॥ १ ॥ गंगा सागर मिळणीं सागर झालें सर्वांग ॥ गळीत झाल्या वृत्ती सर्व संगीं निःसंग ॥ गता यातातीत सदोदित अभंग ॥ गर्जुनि वेदश्रुति ह्मणती तो सहज पूर्ण रंग ॥ २ ॥

## पद ६.

विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ऐसें बोलों या वदनीं ॥ निजानंदें रंगुनि विचरों सच्चित्सुखसदनीं ॥ ध्रु० ॥ विश्रांतीचें स्थान मान तें जाणति स्वानुभवी ॥ विज्ञानाचें निज बिज हें श्रुति संकेतें दावी ॥ विगलित वृत्ती होति तयातें स्मरतां सद्भावीं ॥ विपरित भावनेतें निरसुनि देतो निज पदवी ॥ १ ॥ ठसा पडिला याचा करितां नाम हें पाठ ॥ ठकवित बहु भाविकां उभलों नेदीतां ओंठ ॥ ठसकेनें बहु राहतो याची पंढरी पेठ ॥ ठकार ठाणें माणें पाहा तो हा कंबुकंठ ॥ २ ॥ लहरी तरंग आम्ही हा चित्सागर सखोल ॥ लव पळ निमिष्य याविण आह्मांसी कैंची वो बोल ॥ लवण विरालें जळीं याचें कवण करिल मोल ॥ लक्षुनि समपद रंगू सांडुनि इतर बोल फोल ॥

## पद ७.

ॐ नमोजी शांता सद्गुरु जयराम स्वामी[2] ॥ व्याप्य व्यापक तूंचि अवघा सर्वांतर्यामीं ॥ ध्रु० ॥ जयराम हें नाम निगमागमिचें निजबीज ॥ जपतां अनुदिन वाचे सिद्धि पावे निजकाज ॥ जड जीव चिद्घन केले

---

१. हें पद रंगनाथांचे बंधु विठ्ठलरावआत्या यांनीं रंगनाथावर केलें आहे. यांत रंग या दोन अक्षरांवर दोन कडवीं असून रचना वरील पदाप्रमाणें आहे.

२. हें पद जयरामस्वामी वडगावकर (रामदासपंचायतनापैकीं एक साधु) यांजवर आहे.

स्मरणें ऐसा माहाराज ॥ जन्ममरण निरसुनियां शोभसि तूं सहजीं सहज ॥ १ ॥ यका नामें पतीत पावन झाले सुनिश्चय ॥ यशस्वी करुणाकर परात्परतर गुरुराय ॥ येउनि मानव लोका प्रबोधिलें जगत्रय ॥ यमलोकींची राहाटि मोडिली दावुनि निजसोय ॥ २ ॥ राहुनियां वटग्रामीं तूं या निज निर्विकारा ॥ राजस तामस सात्विक नाशुनि त्रिविध अहंकारा ॥ रामनामस्मरणें जन उद्धरिले परात्परा ॥ राग द्वेष हरुनिय दिधलें निजसुख दातारा ॥ ३ ॥ मनुष्यरूपें परब्रह्म तूं निर्गुण निष्काम ॥ मनबुद्ध्यादिक करणें केवळ सच्चित्सुखधाम ॥ मंगळदायक पूर्ण रंग तूं मुनिमनविश्राम ॥ महाराज गुरुवर तूं कृष्णदास जयराम ॥ ४ ॥

## पद ८.

रामदासीं[1] चतुरक्षरि मंत्र जप वारंवार ॥ दुस्तरतर भवसागरतारक सच्चित्सुख सार ॥ ध्रु० ॥ रामदास द्वय अभिन्न नामें गोडी शर्करा ॥ राहाटे परिमळ भुवनीं हातीं घेतां कर्पूरा ॥ राजति वर्तुळशा त्यापार तें जीवन कीं गारा ॥ राजाधिराज अवतरला हा या जगदोद्धारा ॥ १ ॥ मनुष्यरूपें विलसे परि हा परिपूर्ण काम ॥ मकराकृति कुंडलें पाहातां स्वतःसिद्ध हेम ॥ मंडण संतसभेचें साधक जनासि विश्राम ॥ मस्तकमणि हा शतकोटींचें निजबीज श्रीराम ॥ २ ॥ दास तो उदास सेवुनि परमामृतकंदा ॥ दाता स्वात्मसुखाचा निरसुनि करणाचा धंदा ॥ दानवकुळ षड्वैरी मर्दुनि तारित मतिमंदा ॥ दारा द्रव्य त्यजुनियां सत्वर सद्भावें वंदा ॥ ३ ॥ सद्गुरुराज विराजत करुनी सज्जन गिरीवास ॥ सर्वस्वेंशीं शरण रिघालें धरुनियां कास ॥ सत्य सनातन श्रीगुरु समर्थ मुनिमानसहंस ॥ सहज पूर्ण निजरंग रंगला तारक विश्वास ॥ ४ ॥

## पद ९.

येकनाथ[3] हें नाम पूर्णकाम वद वाचें ॥ श्रवणें स्मरणें दुर्घट तुटतिल पाश भवाचे ॥ध्रु०॥ यमुना पुलिन विहारी हरि निजभक्तांची माय ॥येउ-

---

१. हें पद सज्जनगडकर रामदास स्वामी यांवर असून रचना वरील पदाप्रमाणेंच आहे.

२. पाठ दुसरा [ विषयाचा ].

३. यकनाथ हा मंत्र साधण्याकरितां कवीनें "एकात्मजा" या बद्दल 'येकात्मजा" असे लिहीले आहे.

नि प्रतिष्ठाजा स्वयें सेवक तो होय ॥ येरयेरां अभिन्नपण तें जाणति विद्वद्वर्य ॥ येकात्मता बोलिंत बोलीली नवजाय ॥१॥ करण सदुच्चय भगवद्भजनें झाला सुश्लोक ॥ करुनियां निजबोधें आत्मानात्मविवेक ॥ कर्म तेंचि ब्रह्मकर्म हें निजनिष्टंक ॥ ० कल्पनातित होउनि पाहे अनेकीं एक ॥ २ ॥ नामरुपातित अवलोकित या जनीं जनार्दना ॥ नासुनिया उभयतां विपरित असंभावना ॥ नादबिंदू कला ज्योती विरहित सनातना ॥ नारायण नररूपें जो या सेवित विज्ञाना ॥ ३ ॥ थरकत पतितोद्धार कराया हा याचा पंथ ॥ थडक साहावी प्रथम तरिच हा प्रसन्न गुरुनाथ ॥ थडिये पावविले करुनी भागवत ग्रंथ ॥ थकित केलें निजरंगें या मनिचे मनोरथ ॥ ४ ॥

## पद १०.

दत्तात्रय दत्तात्रय ऐसें वदतां हे रसना ॥ पावन होइल सहसा प्राप्त नोव्हे दुर्व्यसना ॥ध्रु०॥ दशेंद्रियातीत सद्गुरु निजानंदकंद ॥ दयाळ साधक जना अवतरला हा स्वच्छंद०॥ दंभादिक दोषांचा बोधें करुनी उच्छेद ॥ दत्तात्रय हें नाम विराजित नित्य निर्द्वंद्व ॥ १ ॥ तारक भवसागरीं हे खूण बाणली चित्ता ॥ तार्किक ज्ञानें पाहातां याची सर्वही सत्ता ॥ तापत्रय दुरिकर्ता रिपु संहर्ता सुखदाता ॥ ताडित अंधतमासि मुखावरि देशिक चित्साविता ॥ २ ॥ त्रय भेदातित ब्रह्मसंदोदित चतुरक्षरी मंत्र ॥ त्रयारक्षक अनाथबंधु शाश्वत स्वतंत्र ॥ त्रयोदश भुवनीं हा व्याप्य व्यापक चिन्मात्र ॥ त्रय देवात्मक मूर्ति होउनी घडली एकत्र ॥ ३ ॥ येकीं अनेक अनेकीं एक हा दृढ निश्चय ॥ येण जाणें नाहीं तो हा जगद्गुरुराय ॥ येवं अनिर्वचनीय तेथें वर्णूं मी काय ॥ यथोक्त हा निजरंग रंगला हाचि अभिप्राय ॥ ४ ॥

## पद ११.

देशिकराज दयानिधि लीलाविग्रह जगदोद्धारी ॥ नित्य निरंजन सज्जन रंजन साधु विजन विहारी ॥ध्रु०॥ निजसुखदायक सिद्धि विनायक मूर्तिमंत सज्ञानी ॥ निर्विकार चित्सागर नागर अवतरला ये अवनीं ॥ निष्कळंक हे देवि सत्पात्ति भोगितसे दिनरजनीं ॥ निजानंद घन ब्रह्म सनातन विचरे सच्चिद्भुवनीं ॥ १ ॥ रज तम निरसुनि शुद्ध सत्वपद तत्व विभागीं चतुर ॥ रत सत्कर्मीं सतत स्वधर्मीं आत्मानात्मविचार ॥ रजतशुक्तिके

वरि तैसा हा देखे जगदाकार ॥ रंका निजपद देउनि करिशी ब्रह्मरूप संसार ॥ २ ॥ जग नग चित्सुवर्णीं पाहे अभेदबुद्धि सहज ॥ जळ-गारेच्या न्यायें लक्षी नाम रुपात्मक काज ॥ जन्ममरण म्हणणें हें अवघें कल्पनेचें चोज ॥ जड अजड हे वार्ता स्वप्नीं नेणें तो गुरुराज ॥ ३ ॥ नगतनयात्मज लंबोदर सुरवर वरदें सज्ञान ॥ नवविध भक्ति विरक्ति-सह निजकर्मानुष्ठान ॥ नभीं निळिमा भासे तैसें प्रपंचाचें भान ॥ नमिन निरंजन स्वामी तो मी निजरंगें रंगोन ॥ ४ ॥

## पद १२.

मेघःशाम हें नाम मुनिजनमानसविश्राम ॥ मंत्रराज चतुरक्षरी गुरुवर परिपूर्णकाम ॥ध्रु०॥ मेघ सर्वत्र उदार परि सत्क्षेत्रीं संभ्रमें ॥ मेदिनी संपन्न साधन युक्त निज नेमें ॥ मेरूसम गिरी निज धान्याचे पिकति अनुक्रमें ॥ मेघादिक करणें सुख सेविति अखंड गुरुनामें ॥ १ ॥ घन गर्जुनि वर्षतां वाहाति सच्छिष्य ओघ ॥ घंटाघोषें तेहि गर्जती स्वानुभवें सैंघ ॥ घटिका पळ न विसंबिति स्वस्वरूप अमोघ ॥ घट मठ महादादिकीं जैसें एकचि नभ अनघ ॥ २ ॥ शांति क्षमादिक दैवी संपदा शोभे सच्छिष्या ॥ शाखा कल्पतरूच्या कलित देती अशेषा ॥ शाश्वत सुखमय होउनि भो-गिति निज निर्विशेषा ॥ शास्त्रें कुंठित झालीं महिमा न वर्णवे शेषा ॥ ३ ॥ मत्स्यादिक अवतार धरूनि केले पराक्रम ॥ मर्दुनि दानवकुळ निज भक्तां दिधलें पद परम ॥ मथन करुनि निजरंगें मेघःशाम हें नाम ॥ मशूण यदुवीर सेवी अखंड होउनि सप्रेम ॥ ४ ॥

## पद १३.

ॐ नमः शिवाय सकळही मंत्रांचा राजा ॥ षडाक्षरी षड्रस हा बो-गरुं घे अविचारा जा ॥ नामामृत रसनेचा चारा रसने चारा जा ॥ निरुप-म याची गोडी शिवभक्तांसि विचारा जा ॥ ध्रु० ॥ ॐमित्येकाक्षरं मंत्र देवाधी देवो ॥ आतप्रोत भरला अवघा शाश्वत स्वयंमेवो ॥ वोळ-ला अनुकंपें काय सांगों नवलावो ॥ वोडंबर निरासिलें ईक्षणमात्रें पा-हावो ॥ १ ॥ नमन करुनि सद्भावें याचें आरंभितां स्तवन ॥ नष्ट दुष्ट मन संकल्पात्मक मावळलें भान ॥ न गत लव पळ घटिका झाले ज्ञानसं-पन्न ॥ नद नदि वापी कूप अवघें स्वानंद जीवन ॥ २ ॥ मंत्र पडतां श्रव-णीं झाला परिपूर्ण काम ॥ मदन दहन मनमोहन परात्पर मुनि-

मनविश्राम ॥ मंगळकारक तारक मंत्र सच्चित्सुख धाम ॥ मस्तकमणी-जप नित्यानिरंतर षडाक्षरी नाम ॥ ३ ॥ सिद्ध साधक बोधक विषयी मुमुक्षु मुक्तासी ॥ शिघ्रगतीनें निजसुखदायक स्वयं प्रकाशी ॥ शिवी आदि-करुनि भक्त केले सुखराशी ॥ शिष्ट इष्ट पुरवितसे कैलासवाशी ॥ ४ ॥ वाचे उच्चारितां शमला तापत्रय वणवा ॥ वार्ता ऐकुनि धांवे श्रवणीं करु-णार्णव कणवा ॥ वाक्य सुधारस बोधूं बोला षडाक्षरी प्रणवा ॥ वारंवार सकळां वदनीं हाचि मंत्र म्हणवा ॥ ५॥ यशस्वि त्रिभुवनीं जो या मंत्रातें गाय ॥ यम धर्मादिक सुरवर किन्नर वंदिति पाय ॥ यक्ष राक्षस झाले नेणुनि नामाची सोय ॥ यदंनिमित्य पूर्ण रंग हा काय तयातें होय ॥ ६ ॥

## पद १४.

शिवेति मंगल नाम ॥ ध्रु० ॥ दुस्तरतर भवसागर तारक ॥ सच्चि-त्सुखैक धाम ॥ १ ॥ निजानंद घन ब्रह्म सनातन ॥ मुनिजनमनवि-श्राम ॥ २ ॥ पूर्ण रंग निःसंग निरामय ॥ अव्यय अवाप्त काम ॥ ३ ॥

## पद १५.

तो गोविंदु दयासिंधू ॥ झाला प्रसन्न तुह्मांसी आनंदकंदु ॥ ध्रु० ॥ सुदाम देवाची पत्नी शोभली दिव्य कनक रत्नीं ॥ म्हणे आजी स्वामी कृष्णदर्शनासी तुम्हीं गेलां होतां जी महा प्रयत्नीं ॥ १ ॥ सुवर्णाची नगरी करुनियां सर्वहि संपदा भरुनियां ॥ नारायणें दीधली तेणें दीनानाथें रमारमणें ॥ भवदुःख दारिद्र हें निवारुनियां ॥ २ ॥ सहज पूर्ण निजानं-द रंगला जन्म मरण शोक मोह भंगला ॥ आतां हेंचि करूंजी कृष्णध्यान धरूंजी ॥ सोनियाचा दिवस आजि उगवला चांगला ॥ ३ ॥

## पद १६ कामदाछंदावर.

पूर्ण ब्रह्म तूं इंदिरावरा ॥ श्रीकृष्णजी शामसुंदरा ॥ धन्य ते तझें ध्यान वर्णिती ॥ नित्य मुक्त जे ते अकर्णिती ॥१॥ तव पदांबुजीं भेद भंगला ॥ अरुणसंध्याराग रंगला ॥ अर्धचंद्र ते नखीं शोभले ॥ चरणपंकजीं लाभ लाभले ॥ २ ॥ उभय गुल्फ ते इंद्रनिळ मणी ॥ अनुहात ता नाद पैंज-णी ॥ आंदु नूपुरें मौन वर्जिती ॥ नेति नेति हा शब्द गर्जती ॥ ३ ॥ स्तंभ मकर तीं जानु पोटरी ॥ पितांबराचें तेज त्यावरी ॥ रत्नजडित तें कटीसूत्र रे ॥ क्षुद्रघंटिका जपति मंत्र रे ॥४॥ नाभिकमळ तें समसमान रे ॥ विरांचिचें जन्मस्थान रे ॥ त्रिगुण त्रिवळिचा उदरिं संभव ॥ न वदवे मखें

तें वैभव ॥ ५ ॥ विश्वहृदय तूं तेथ म्यां तुझें ॥ हृदय वर्णिजे नवल हें बुझे ॥ आवाडि वेडिही धांव घेतसे ॥ आदि अंत हा न पाहतां असे ॥६॥ समुद्रास्तृप्यतां म्हणउनी ॥ जळ समुद्रिंचें अंजुळींतुनीं ॥ अर्पितां तया काय होतसे ॥ भक्तिप्रीय हे हरि तुला असे ॥ ७ ॥ असो हें आतां स्फूर्ति सावरूं ॥ ध्यान प्रोत हा पावता करूं ॥ अमृतसिंधुचा ग्रास कोणता ॥ मधुर कटु म्हणे तोचि नेणता ॥ ८ ॥ सदय हृदय श्रीवत्सलांछनें ॥ वळखिलें बरें भक्त मुनिजनें ॥ पदक कौस्तुभासह विराजतें ॥ निरखितां रवींतेज लाजतें ॥९॥ कंबुकंठिंही तव एकावळी ॥ दिव्य हार ते सुमुक्तावळी ॥ वैजयंती बकुल सेवती ॥ मोगरे जुई जाई मालती ॥१०॥ सरळ शुंडा दंड ते जसे ॥ श्रीहरी तुझे हस्त पैं तसे ॥ करांगुळींच्या मुद्रिका जशा ॥ दिव्य तेजें उजळती दिशा ॥ ११ ॥ हस्तकंकणें बाहुभूषणें ॥ दिनमणीसही आणिलें उणें ॥ कोटि मदन श्रीवदन-पंकजा ॥ न पवतीं सरी तुज अधोक्षजा ॥ १२ ॥ किरिट कुंडलीं फांकली प्रभा ॥ सुरतरुतळीं देहुडा उभा ॥ अधरिं धरुनियां वेणुवादनें ॥ मोहिलीं तुवां व्रजवधूमनें ॥ १३ ॥ या परी तुझें ध्यान श्रीहरी ॥ वर्णितां तुझी मूर्ती अंतरीं ॥ रंगली निजानंद वैभवें ॥ न सोडी कदां तनुमनु जिवें ॥ १४ ॥

## पद १७ काशीराजकृत.

पुराणपुरुषा जगदीशा विठ्ठरायारे ॥ तुझें स्वरुप लक्षितां निरसे मायारे ॥ ध्रु० ॥ अगणित पौर्णिमेच्या चंद्रकलारे ॥ विश्रांतीसी आलिया श्रीमुखकमळारे ॥ १ ॥ रत्नजाडित मुकुटीं मयोरपत्रें वेढीरे ॥ त्रिपुंड्र कस्तुरीचा रेंखिला ललाटीं रे ॥ २ ॥ आकर्णनयन श्रवणीं कुंडलें तळपती रे ॥ नाशीक सरळ सुहास्य दंतपंक्ती रे ॥ ३ ॥ आपाद कंबुकंठीं वनमाळा शोभती रे ॥ आजानबाहु शुंडादंडाच्या आकृती रे ॥ ४ ॥ महिमा वर्णितां कुंठित झाली स्फूर्ति रे ॥ कटीं कर ठेवनियां तूं उभा निजमूर्ति रे ॥ ५ ॥ बाहीं बाहुवटे मणगटीं वीरकंकणें रे ॥ दशांगुळीं मीरवे मुद्रिकाचें लेणें रे ॥ ६ ॥ हृदयीं श्रीवत्सनव नवरत्नाचे हार रे ॥ पदकें एकावळी सुमनाचे संभार रे ॥ ७ ॥ उदरीं अनंत ब्रह्मांडें निर्विकार रे ॥ नाभि कमळीं चतुरानना नकळे पार रे ॥ ८ ॥ कटीतटीं कडदोरा कासिला पितांबर कासे रे ॥ नभीं सौदामिनिचें तेज जसें विलसे रे ॥ ९ ॥ क्षुद्र घंटिका रुणझुणिते निःशब्द शब्दें रे ॥ नेति वादें गर्जाति परमानंदें रे ॥१०॥

जानु जघन जैसे सरळ रंभास्तंभ रे ॥ विराजमान त्या पोटरिया स्वयंभ रे ॥ ११ ॥ भक्ति विटेवरी शोभती समपद सुंदर रे ॥ ध्यानें प्रसन्न झाला रखुमाईवर परतर रे ॥ १२ ॥ घोंटी इंद्रनीळमणी चरणकमळ दळ सोज्वळ रे ॥ श्रीरंगानुज आत्मज झाला तेथें अलिकुळ रे ॥ १३ ॥

## पद १८.

पूर्ण ब्रह्म निर्गुण निर्विकार वो ॥ झाला सगुण धरिला अवतार वो॥१॥ कटीं कर ठेवुनि निरंतरी वो ॥ सहज उभा विज्ञान भीमातीरीं वो ॥ २ ॥ चरणीं तोडर नूपुरें वांकी साजे वो ॥ पतीतपावन त्यावरी ब्रीद गाजे वो ॥ ३ ॥ पीतांबर कासिला सोनेंसळावो ॥ नभीं सौदामिनीचा जैसा मेळा वो ॥४॥ न वर्णवे नाभिंचें महिमान वो ॥ जेथुनि जन्म पावला चतुरानन वो ॥ ५ ॥ श्रीवत्सल भूषण हृदयावरी वो ॥ तुळसीमाळा आपाद रुळे वरी वो ॥ ६ ॥ वदन इंदु महिमा वर्णुं किती वो ॥ ज्ञानी चकोर संतृप्त जेथें होती वो ॥ ७ ॥ केशर तिलक रेखिला ललाटीं वो ॥ कुरळ केश मुकुटीं रत्न दाटी वो ॥ ८ ॥ वामभागीं शोभत भीमकबाळी वो ॥ करकमळें चामरें नित्य ढाळी वो ॥९॥ भाव लक्षुनी भक्तांचा धरी संगवो ॥ सहज पूर्ण निजानंद रंगवो ॥ १० ॥

## पद १९.

भगवत्कृपेचा बडिवार काय सांगों वारंवार ॥ ब्रह्मादिकां नकळे पार विचार विचारीं शमला ॥ १ ॥ पूर्वी जिवदशे आंत तिघे शत्रु करिती घात ॥ तेचि मित्रत्वें होउनि दूत दास्य करिती सर्वस्वें ॥ २ ॥ काम क्रोध लोभ तिन्ही माहा पातकी अज्ञानी ॥ ते उपरमतां आत्मज्ञानीं झाले जिवलग सख ते ॥३॥ सादर करितां त्याचें विवरण चुके जन्म जरा मरण ॥ अंतर्बाह्य रमारमण वोतप्रोत समसाम्यें ॥ ४ ॥ देव दिनबंधु वो देव दयासिंधु वो ॥ध्रु०॥ काम झाला आत्माराम पूर्ण स्वरुपीं विश्राम ॥ झाले अक्षयी निजधाम मेघःशाम स्वरूपीं ॥ ५ ॥ क्रोध शांत निजानंदीं दृश्य दृष्टी दिसों नेदी ॥ ऊर्मी निमाल्या निर्द्वंद्वीं निजसुख छंदीं विलसतसे ॥६॥ लोभ जडला आत्मस्मरणीं हरिगुरुचरणीं अंतःकरणी ॥ ब्रह्मानंदें भरली भरणी हे नभ धरणी हरपली ॥ ७ ॥ लोहकार्याचें रुप नाम केलें परिसें अवघें हेम ॥ पूर्णरंगीं तसे काम क्रोध लोभ शोभती ॥ ८ ॥

### पद २०.

या लक्षणें जो युक्त तो भक्त माझा ॥ ऐसें बोलतसे द्वारकेचा राजा ॥ त्याहुनि पढियंता मजलागीं नाहीं दुजा ॥ निश्चयेंसि बोलतों कपिध्वजा ॥ध्रु०॥ वर्णाश्रमें वेदोक्त कर्म करितां ॥ अहंकर्तृत्वाचा लेश नुपजे चित्ता ॥ काम्य निषेधाची निमाली दुर्वार्ता ॥ क्रिया मात्र ज्याची ब्रह्मार्पण तत्वता ॥ १ ॥ आत्मलाभें संतृप्त सर्वदांही ॥ भगवद्भजनीं शोभलीं करणें दाही ॥ देहीं विदेहता बाणली पूर्ण पाहीं ॥ लीलाविग्रही तो ह्मणती चारी साही ॥ २ ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान हे सरली बोली ॥ ध्येय ध्याता ध्यान हे सहजी ठेलो ॥ निजानंदीं रंगतां वृत्ति निमाली ॥ स्वयें तोचि मी हे काय बोलों बोली ॥ ३ ॥

### पद २१.

फट फट तूं चुकलासी लंडी ॥ ध्रु० ॥ टाकुनि श्रीहरी विषयीं सुखावसि लाविल यम दोर दंडीं ॥ १ ॥ पावन मानिसी जन धन संगें पडिलासी व्यामोह कुंडीं ॥२ ॥ आतां तरी शरण तूं जाईं निजरंगा ॥ लक्ष चौऱ्याशीं फेरे खंडीं ॥ ३ ॥

### पद २२.

जिव्हे स्मर गे हरि हर गे ॥ ध्रु ॥ सार या लोकीं आणिक नाहीं । मृगजळ क्षण भंगुर गे ॥ १ ॥ संत सनक दिक तरले या नामें ॥ हेंचि ब्रह्म परात्पर गे ॥ २ ॥ हरले दोष निजानंदरंगें । स्मरतां वाचे श्रीशंकर गे ॥ ३ ॥

### पद २३. अभंग.

माझे कुळिंचा स्वतंत्र । राम निजमूर्ति षडाक्षरी मंत्र ॥ ध्रु० ॥ सर्व साधनाचें सार । रामनिजमूर्ति हा उच्चार ॥ १ ॥ योग याग तपें तपती ॥ आह्मां येणेंचि कैवल्य प्राप्ती ॥ २ ॥ वंशीं न करी जो जतन ॥ त्यासि घडलें जाणा पतन ॥ ३ ॥ धरितां स्मरणाचा छंद ॥ रंगीं रंगला निजानंद ॥ ४ ॥

### पद २४.

हें तों खोटें रे हें तों खोटें ॥ ध्रु० ॥ स्वकीर्ति ऐकतां श्लाघ्यता वाटते ॥ परदोष दिसती नेटें ॥ १ ॥ बोलण्यामाजीं कांहीं चालणें घडेना ॥ विटंबिलीं सर्व पोटें ॥ २ ॥ स्वहित मानिलें नांदतां हृदयीं ॥

काम क्रोध लोभ पोटीं झटे ॥ ३ ॥ संकल्प विकल्प करितां राहिना ॥ बुडविलें मन मर्कटें ॥ ४ ॥ निजानंद रंग निःसंग ॥ त्या शरण मी जाउनियां न भेटे ॥ ५ ॥

पद २५.

पिटोनि डांगोरा बोले वेद वाणी ॥ हित नेणें कोण्ही बहिर्मुख प्राणी ॥ १ ॥ व्यापिलें षड्वर्गीं लोभ मोह अंगीं ॥ दावावया जगीं वर्तती कुयोगी ॥ २ ॥ चंदनाचीं काष्ठें रासभाचे पृष्ठीं ॥ व्यर्थ तैसा कष्टी विश्व पाहे दृष्टीं ॥ ३ ॥ त्यागावे दुर्गुण संमत वेदांचें ॥ आणि साधुवृंदाचें अंतरसाक्ष साचें ॥ ४ ॥ संतसंगें रंगे सच्छास्त्र प्रसंगें ॥ गुरुकृपा अंगें पावे तो निजांगें ॥ ५ ॥

पद २६.

धन्य तें कीर्तन करितां भक्त जन पावन होताती नामें ॥ नाना चरित्रें श्रीहरिची ख्याती वर्णिता डुलती प्रेमें ॥ध्रु०॥ टाळ घोळ वाद्यें नाना गद्यें पद्यें आनंदें नाचती रंगीं ॥ जगदीशाची क्रीडा गाती पवाडा देहभावा विसरोनि अंगीं । बाळदशेमाजीं पूतना शोषण कंसचाणुरादि भंगी । हाव भाव कटाक्ष दावुनियां दक्ष अलक्ष लक्षिती योगी ॥ १ ॥ बाळपणीं लोणी चोरितां गौळणी निज ध्यासें लाविल्या ध्यानीं ॥ ज्या त्या घरामाजी असोनि त्यांसी न सांपडे चक्रपाणी ॥ सांपडल्या गळां पदर घालुनियां घेउनि येती गान्हाणीं ॥ बांधिती उखळीं वर्णितां जयासी कुंठल्या वेदवाणी ॥ २ ॥ पांवा मोहरी काठी माथां वोनवटी चालतां गाईच्या पाठीं । हमामा हुबरी यमुना पाबळीं चेंडुफळी वाळवंटीं । वडज्या वांकुडा पेंध्या सुदामा पार्थिकर जगजेठी । स्वर्गींचे सुरवर उच्छीष्टा इच्छिती सनकादिक वैकुंठीं ॥ ३ ॥ मांडुनियां ठाण त्र्यंबक भजन दैत्यनिर्दाळण केलें । कुब्जा उद्धारण मल्लाचें मर्दन दावावें कीर्तनवेळे । दावाग्नीप्राशन अथवा गोवर्धन उचलिला करांगुळें । कालिया मर्दुनी गोकुळीं प्रवेशे गाई गोपाळांच्या मेळें ॥ ४ ॥ गद्यें पद्यें नाना छंद प्रबंध प्रयातादि विविध स्तुती । अष्टभाव अंगीं उमटोनियां चिन्हें आनंदें नाचत गाती । ऐसें कीर्तन ह्मणती विद्वज्जन येणेंचि कैवल्यप्राप्ती । रंगीं रंगुनियां हेंचि पैं मागणें देईं देईं निजस्फूर्ति ॥ ५ ॥

पद २७ ( सासुरवास. )

ऐसा सासुरवास घेऊं नेदी उमस करितो कासावीस नानापरी । भेटों

देना सखिवेंसी सांगों कवणापाशीं पिसी झालें घरिचे घरीं ॥ ध्रु० ॥ अहंकार सासरा ममता हे सासू या भेणें सोरसु न दिसे दृष्टी । काम क्रोध दंभ मद मत्सर हे भावे दीर हाणिति मुष्टी । आशा तृष्णा नणदा बोलती अपशब्दा प्रतिवचनीं कारितानी कष्टी । दशेंद्रियें पोरें अनावरें चोरें विषयीं व्याली सृष्टी ॥ १ ॥ झाडिलें झाडितां फोडिलें फेडितां वरिचे वरी केर होय । जर्जर तनु घर निर्मळ नव्हे कदां तींहीं तोंडें अग्नीचें भय । पांचाच्या मेळीं राहणें सर्वकाळीं कैंची आपणा आपली सोय । लक्ष चौऱ्यायशीं गर्भवासीं पडती जन्म मृत्युचे घाय ॥ २ ॥ त्रिविध छेद भेद पिशुणासि समंधसंशयें जाचिति पाहीं । माहेरींचें कोणी न देखें मीं स्वप्नीं विश्रांतिचा लेश नाहीं । तापलें अनुतापें रुक्मिणी मायबापें विठले करिजे कृपा कांहीं ॥ तरीच भव भंगे निजानंद रंगे नेतीं वदती ज्यासि साही ॥ ३ ॥

## पद २८ ( माहेर. )

माहेरींचें सुख काय सांगों मुख माय बापाचें पाहतां ॥ निजानंदें खेळे गदारोळें सखि साजणिच्या मेळें आतां ॥ध्रु०॥ विदेह पंढरी आत्मा पांडुरंग पिता मुक्ति माता रखुमाई ॥ लडिवाळ मी बाळ सर्वकाळ त्यांच्या वोसंगा रिघालें बाई ॥ ज्येष्ठबंधु भाव पुंडलीकराव कारितां तळहात साई ॥ गणगोत महंत संत भाग्यवंत माझें नमन त्यांचे पायीं ॥ १ ॥ नवविध भगिनी लोभें करुनि त्यांनीं झेलुनि वरिचेवरि मजला ॥ मायबापापुढें नेउनि घालितां अविनाश संतोष झाला ॥ दोहीपक्षीं लक्ष लावितां अलक्ष मी ऐसा भाव समजला ॥ हे खुण जाणती अनुभवी इतरां कानडा होउनी ठेला ॥२॥ आषाढी कार्तिकी यात्रेसि येती हरिदास गर्जती गजरीं ॥ दिंड्या पताका टाळ मृदंग गरुड टक्के गरुडपारी ॥ ठेवुनि कर कटी उभा जगजेठी समचरण विटेवरी ॥ देव भक्तां भेटी होतां वाळवंटीं तो निजरंग भरला ॥३॥

## पद २९.

म्हणउनि उमज पडेना । म्हणउनि उमज पडेना ॥ध्रु०॥ भवरोग लागला त्रिविधताप ज्वरें सर्वदां संतत देहीं । संकल्प संनिपातें बरळे भलतें भलतें मी कोण ही शुद्धि नाहीं ॥ अह अह शब्दें अहकार हुंबतो आपपर नोळखे कांहीं ॥ ऐसा व्यथाभूत होउनी पाडला बुडता जन्ममरणाचे डोहीं ॥१॥ काम्य निषेध हे वावडे वर्जीना स्नेह सांडिना प्राणी ॥ श्रवण अस्-

तो बधीर शिकविलें नायके निगमाचार्य वचन कानीं ॥ विहिता-चरण हरि-स्मरण हें पथ्य राहाटेना दिवसरजनीं ॥ विषयपंकीं लोळे मळ मूत्र खोळे जन्मतां त्रासही न मानी ॥२॥ विद्या वयसा कांता कांचन जन सत्ता कळा कौशल्यता आला ॥ अभिमानें चढला झाला पांचावला तेणें हे व्यथा शतगुणी झाला ॥ सद्गुरु सद्वैद्य पूर्ण मात्रा देतां त्याची उपेक्षा केली ॥ सहज निजरंगें सर्वांगें आरोग्य व्हावें हे खुंटली बोली ॥ ३ ॥

## पद ३०.

जानकीजीवना रामा ॥ झडकरी मज पावे मज पावे ॥ ध्रु० ॥ मुनिजनमनविश्रामा ॥ सच्चित्सुखैकधामा ॥ अव्यय अवाप्त कामा ॥ १ ॥ नव सरसिजदलनेत्रा ॥ मकरध्वजारिमित्रा ॥ जलधर सादृश्य गात्रा ॥ मुनिहृदयांबुज मित्रा ॥ २ ॥ त्रिभुवनजन जीवसूत्रा ॥ दशरथ नृपवरपुत्रा ॥ परमामृत रस पात्रा निजरंगा चिन्मात्रा ॥ ३ ॥

## पद ३१.

ऐसी हे हरिची लीला जे अगम्य निगम पुराणा ॥ध्रु०॥ संतसभे दोघे जग॥ वादक संवादती पूर्ण ॥ परिसा श्रोते विद्वज्जन ॥ ऐक्य भावें सर्वही ॥१॥ दिनकरवंशीं बाळपणीं ॥ सुबाहु ताटिका निजबाणीं ॥ वधुनि ऋषीयज्ञ निर्वाणीं ॥ संरक्षिला श्रीरामें ॥ २ ॥ ऐसा माझा राम निजमूर्ती ॥ध्रु०॥ यादववंशीं बाळपणीं ॥ पूतना शोषिली विंदानीं ॥ उपटुनि यमलार्जुन दोन्ही ॥ गोकुळ रक्षी श्रीरंग ॥३॥ ऐसा माझा पूर्णब्रह्म श्रीनिजरंग ॥ध्रु०॥ चरणरजस्पर्शे ॥ शिळा उद्धरिली ते अवलीळा ॥ भंगुनि चाप जनकबाळा ॥ पर्णियली चिच्छक्ती ॥ ४ ॥ संदर्शनें कुब्जा नारी ॥ दिव्यरूप करुनि हरी ॥ वधुनि भौमासुर निर्धारी ॥ सोळा सहस्र पर्णिल्या ॥ ५ ॥ मेळवुनि वानरदळा ॥ सेतूबंधन करुनी सकळा ॥ संहारुनी राक्षसकुळा ॥ रावण वधिला रघुनाथें ॥ ६ ॥ संगें घेऊनियां गोपाळ ॥ कृष्ण काळाचा महाकाळ ॥ मल्लां मर्दुनि कंसखळ ॥ वधिला कृष्णें क्षणमात्रें ॥ ७ ॥ लंका बिभीषणा दिधली ॥ लोकत्रयीं ख्याती केली ॥ नामें गणिका उद्धरिली ॥ माझ्या रामें कौतुकें ॥ ८ ॥ उग्रसेन मथुरापती ॥ केला कीर्ती ते त्रिजगतीं ॥ अजामिळा तो सद्गती ॥ कृष्णें स्मरणें दीधलीं ॥९॥ रामनामें महा दोषी ॥ वंद्य झाला वाल्मिकी ऋषी ॥ रामायण शतकोटीसी ॥ वदली वाचा भविष्य ॥१०॥ शूकमुखें भागवत ॥ श्रवणें परिक्षिती अद्भुत ॥ ब्रह्महत्येपासुनि

मुक्त ॥ झाला पूर्ण निर्धारें ॥ ११ ॥ निरखुनि दोघांचा विचार ॥ सेंतीं निवाडिला व्यवहार ॥ राम कृष्ण निर्विकार ॥ परब्रह्म ऐक्यत्वें ॥ १२ ॥ पाहतां एकीं एकपण हरपलें ॥ध्रु०॥ सहज पूर्ण आत्माराम ॥ योगी मुनिजन विश्राम ॥ निजानंद तो निष्काम ॥ सर्वरंगीं रंगला ॥ १३ ॥

## पद ३२.

राम कृष्ण विष्णु नामें ॥ गाऊं स्वानंदें सप्रेमें ॥ ध्रु० ॥ अनन्य भावें हरि गुरु भजनें ॥ काया वाचा आणि मनें ॥१॥ निरहंकृती निष्कामता ॥ ब्रह्मीं ब्रम्हार्पण तत्वता ॥ २ ॥ रंगीं रंगुनि निजानंदें ॥ नाचों कीर्तनीं स्वच्छंदें ॥ ३ ॥

## पद ३३.

धन्य धन्य धन्य आम्ही परम मान्य आम्हां सारिखें अन्य कोण असे ॥ पाहतां लोकत्रयीं कोठें उणें कहीं परिपूर्ण तें आमुचे ठायीं दिसे ॥ ध्रु० ॥ विद्या वयसा कुळ स्वयंपाकीं सुशीळ सर्वज्ञ शास्त्रज्ञ ज्ञानी ॥ वर्णाश्रम कर्में विधियुक्त आचरों स्वमताचे अभिमानीं ॥ न्याय-नीती-वंत श्रीमंत सर्वदां दरिद्र न देखों स्वप्नीं ॥ ऐसें माया मोहें बरळती जे एक गुंतुनी विषयाचे ध्यानीं ॥ १ ॥ एक ह्मणती आम्ही कृतकृत्य झालों मिरविलों लौकिकांत ॥ शचिपती सम भोग भोगिले ये लोकीं विश्व हें केलें अंकित ॥ ऐसे गर्वराशी वळवोनि आकाशीं दाविती शब्दसंकेत ॥ तेही काळें करुनि नेले नरकालया उरले ते ह्मणती शाश्वत ॥ २ ॥ मळीण अंतःकरणें अविधि आचरणें या देहीं तादात्म्य धरुनी ॥ कल्पांतींही त्यांस सुखप्राप्तीचा लेश नाहीं नाहीं त्रिभुवनीं ॥ संकल्पाच्या सन्निपातें बरळती मी देह माझें ह्मणोनि ॥ निःसंग निजरंग नेणोनी फिरतील लक्ष चौऱ्याऐंशी योनी ॥ ३ ॥

## पद ३४.

कृष्णा धांवें पावें कृष्णा धांवे पावे ॥ कृष्णा धांवे पावे ऐसे समयीं यावें दिनानाथा दीनबंधू ॥ कौरव षड्वैरी पीडिती नानापरी सोडवी करुणासिंधू ॥ध्रु०॥ सुमती द्रौपदी शुद्धसत्वपदीं धर्मपत्नी पतिव्रता ॥ दुष्ट दुर्योधन हातीं सांपडली दावुनि कोप तिव्रता ॥ सभेमाजी नग्न करा ह्मणतां दुःशासनें ते धरुनि तत्वता ॥ घालितां निरियें हात जाणुनि कल्पांत बोभायिलें रमाकांता ॥१॥ भक्तांचा साहाकारी तूं नाना अवतारी गर्जती

शास्त्रें पुराणें ॥ संकट पडतां भारी रक्षितो श्रीहरी धांवा करितां जिवें प्राणें ॥ साधुसंत मुनी बाह्या उभारूनी साक्ष देती याप्रमाणें ॥ मिथ्या वाद त्यांसीं येऊं नेदी हृषीकेशी हेंचि आजि तुझें देणें ॥ २ ॥ सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा सर्वसाक्षि ओतप्रोत ॥ विश्वपटीं एकचि तंतू श्रीकृष्ण परब्रह्म अच्युतानंत ॥ ऐकोनियां श्रवणीं द्रौपदीची वाणी भक्तवत्सल दयावंत ॥ घालोनियां उडी आला लवडसवडी दाविती संत संकेत ॥ ३ ॥ अनुभवाची खूण अनुभवीं संपूर्ण जाणती दर्शनी ज्ञानी ॥ उभा पाठिराखा पाठिसि तो देखा राहिला भक्ताभिमानी ॥ दिव्य सोनेंसळा नेसवितां बाळा संतोषली याज्ञसेनी ॥ भक्तकामकल्पतरु निजरंगें देखती झाली निदानीं ॥ ४ ॥

## पद ३५.

आतां काय उपाय करुं मी कोणाचे पाय धरुं ॥ ऐसा कोण बळी ज्याच्या बळें भव तक्षक विष उतरूं ॥ ध्रु० ॥ कैंचा देवधर्म कैंचें क्रियाकर्म रक्षिल मज ये विषयीं ॥ साधू संत कोण्ही पूजिले नाहीं सद्भावें लागुनि पायीं ॥ धनसुतदारपरिग्रह हे तों पाडिती सर्व अपायीं ॥ दाही दिशा माझे पाठिसी लागती तापलों मी तापत्रयीं ॥ १ ॥ कैंचा मित्र सखा पाठिराखा बंधू हरिविण एका निदानीं ॥ तो तंव जन्मांतरीं अर्चिला नाहींच कळों आलें या वरुनी ॥ पतीत पावन हरि धन्वंतरी एक ऐकिलें शास्त्र पुराणीं ॥ पाहतां नवही खंडीं ब्रह्मांडीं हरिविण सोडवितां नाहीं कोण्ही ॥ २ ॥ तक्षक विषानळीं संतप्त ये काळीं गारुडी जरी हरि येता ॥ निर्विष करुनी कृपें सद्गुरु स्वरुपें संरक्षक पूर्ण होता ॥ विश्व भक्षक हा तक्षक मारुनी शाश्वत निज सुख देता ॥ तरीच निजानंदें रंगुनि मनिंचा संकल्प सिद्धी जाता ॥ ३ ॥

## पद ३६.

तो मज आवडतो ॥ध्रु०॥ वर्णाश्रमविधि पाळी ॥ काम्यनिषेधही गाळी ॥ अहं ममतेतें जाळी ॥ आसुरी गुण निर्दाळी ॥१॥ जनीं जनार्दन पाहे ॥ विकल्प लेश न साहे ॥ देहाभिमान न वाहे ॥ स्वरूपीं निश्चळ राहे ॥२॥ आत्मानात्मविवेकीं ॥ न पडे या भवशोकीं ॥ विषवत् विषय विलोकी ॥ विदेह विचरे लोकीं ॥३॥ निजानंदपद भोगी ॥ तारित जीव भवरोगीं ॥ निर्विकार निःसंगीं ॥ रंगला निजरंगीं ॥ ४ ॥

### पद ३७.

योगीदर्शन दुर्लभ रे योगीदर्शन दुर्लभ रे ॥ध्रु०॥ धातुमूर्ति लक्ष प्रति
पूजन करितां पूजिला एक शालिग्राम ॥ कोटि शालिग्राम पूजितां ए
अग्नि अर्चनीं नित्य नेम ॥ लक्ष अग्नि पूजितां सूर्यपूजन एक त्याहुनि अधि
द्विजोत्तम ॥ त्रि-कोटी विप्र अन्नें संतृप्त तैं योगीदर्शन पूर्ण काम ॥१
शिवालयें सिद्ध एकक्षोणी संख्या निर्मितां सद्भावें करुनी ॥ अनर्घ्य र
सप्तही सागर देतां ब्राह्मणासी भरोनी ॥ जांबुनद कनक मेरुभार एक व
केलें तुळा धरुनी ॥ तेंही दान देतां सत्पात्र पाहुनी तऱ्ही सरी न प
कोणी ॥२॥ परब्रह्मीं विश्राम झाला ह्मणुनि नाम योगी हें बोलिजे त्यास
ब्रह्मविद ते ब्रह्मश्रुतिवाक्य निःसीम प्रतिपाद्येसी ॥ संदर्शनें महा प
कांच्या राशी नाशतील निश्चयेंसी ॥ सहज पूर्ण निजानंदिं रंगले ते
निर्गुणपूर निवासी ॥ ३ ॥

### पद ३८.

हरि गुरु चरण स्मरणीं अंतःकरणीं सुख झालें ॥ परा पारुषली तें मज्त
बोलवे सुख बोले ॥ध्रु०॥ मुकें साखर सेवुनि गोडी सांगो जातां वाचें
निःशब्द शब्दें गर्जे कांहीं हांसे कांहीं नाचे ॥१॥ अंतरिंचें सुख अंतर्मु
तें जाणति चिन्हावरुनी ॥ शाब्दिक ज्ञानें तार्किक बोलती परोक्षदृष्टी ज्ञ
॥२॥ जाणिव नेणिव सरली केवळ जाणणें मात्रचि उरलें ॥ उरलें पु
हेंही जेथें ह्मणते ह्मणणें सरलें ॥ ३ ॥ तन्न तन्न हा शब्द निमाला स
पूर्ण निजरंगीं ॥ कल्पांतीं जळ नभमय झालें प्रमाणरहित तरंगीं ॥ ४

### पद ३९.

विवेकपूर्ण प्रबोधी रे ॥ अनुकंपें मन बुद्धि रे ॥ निगमाचार्य स्वमतें
वरुनि निरसी सर्व उपाधी रे ॥ध्रु०॥ प्रथम नमुनि गुरु गणपतीतें ॥ वंदि
सत्य सरस्वतितें ॥ प्रसन्न होउनि निजपद देउनि हरितिल दुर्जय दुर्गति
॥१॥ वर्णाश्रमविधि पाळीं रे ॥ काम्य निषेध ही गाळीं रे ॥ निरहंकृति
हेंतुक कर्में ब्रह्मार्पण करि समुळीं रे ॥२॥ भोगुनि आसुरि संपत्तीतें ॥
म्मत्त होती तीं पतितें ॥ व्यभिचारिण परपुरुष विलोकुनि जैसी त्यागि
निज पतितें ॥३॥ हरि गुरु चरण स्मरणें रे ॥ दुस्तरतर भव तरणें रे ॥ नि
नित्य विवेक शुद्धसत्व अंतःकरणें रे ॥४॥ अनित्य सर्व पसारा रे ॥ भुलों न
संसारा रे ॥ विषवत् विषय पियुषवत् मानुनी सेविसि कां अविचारा रे ॥

हो[illegible] उनियां मतिमंद रे ॥ करिसी नाना छंद रे ॥ भाग्यहीना तुज होईल कैं भ[illegible] प्राप्त परमानंद रे ॥६॥ धनसुतदारा परिग्रह रे ॥ हा सर्वहि वैभव सं[illegible] ग्रह रे ॥ देहीं देहाभिमान लागला मनचंद्रातें हा ग्रह रे ॥ ७ ॥ प्र[illegible] च सुखरूप जो मानी ॥ पामर नर खर अज्ञानी ॥ व्याघ्रसंगें धे[illegible] सुखरुप तरि हा होतां सुखदानीं ॥ ८ ॥ आस्थिमांसमळमूत्रें रे भ[illegible] ली ननु अपवित्रें रें ॥ ते मी माझी ह्मणती जाणत जाणत ते कुपात्र रे ॥[illegible]॥ असद्विकारी जड काया ॥ चित्र तरुची हे छाया ॥ भगवद्वचन प्रम[illegible]ण यदर्थी दुष्ट दुरत्यय मम माया ॥ १०॥ विषयेंद्रिय संयोगीं रे ॥ अ[illegible] मृतोपम सुख भोगीं रे ॥ परिणामीं विष काय बापुडें मारक दुर्भवरोगी रे ॥१[illegible]१॥ पढतमूर्ख तूं बहिर्मुखा ॥ हरिविण दुसरा कोण सखा ॥ जाणत जाण[illegible]त वेडें होसी कां भुलसी या विषयसुखा ॥१२॥ परदोष दर्शनीं दक्ष रे [illegible]॥ प्रत्यक्ष जैसा यक्ष रे ॥ स्वदोष दर्शन पाहासी कां सर्वदा साकांक्ष रे ॥१[illegible]३॥ सद्गुरु भजनेवीण रे ॥ ह्मणविसि आपण प्रवीण रे ॥ शिखिपक्षी बहु[illegible]लोचन परि त्या चक्षुवांचुनि शीण रे ॥१४॥ हो झालें तें झालें रे ॥ सां[illegible]गेन एका बोलें रे ॥ अनुतापेंविण सर्व निरर्थक ॥ जें जें कांहीं केलें रे ॥१[illegible]५॥ निरभिमान सद्भावें रे ॥ गुरुतें शरण रिघावें रे ॥ देव-द्विज हरि-भक्त[illegible]दयार्णव ॥ सदैव त्यांसि भजावें रे ॥१६॥ सर्वभूतीं भगवंत रे ॥ निः-संश[illegible]य निभ्रांत रे ॥ भूतदया हृदयीं निशिदिनिं ते अक्षयी श्रीमंत रे ॥१७॥ स्वध[illegible]र्म मुख्य सनातन रे ॥ सदाचारसंपन्न रे ॥ श्रोत्रीं ब्रह्मपरायण ते ना-राय[illegible]ण धन्य धन्य रे ॥१८॥ तरोनि तारक व्हावें रे ॥ तरीच जन्मा यावें रे॥ हा[illegible]वि परम पुरुषार्थ करावा ॥ नरदेहीं सद्भावें रे ॥१९॥ भक्ति विरक्ति-ज्ञानें [illegible] रे ॥ परमामृतरसपानें रे ॥ निजानंदपदभुवनिं राहावें सच्चित् सुखरुप मनें [illegible] रे ॥२०॥ एकविसा श्लोकीं रे ॥ अभंग रंग विलोकीं रे ॥ श्री रंगानुज तनुज[illegible] मनीं संपूर्ण पूर्णश्लोकी रे ॥२१॥

## पद ४०.

[illegible] कैसा बाजार केलावो ॥ संसारातें येउनि भांडवलाचा मातेरा झाला ॥[illegible]ध्रु०॥ काय केलें हे जीवाजी नायको मुद्दल गमाविलें कैसें ॥ बहुतां ज[illegible]मींचें मेळविलें होतें करुनी नाना सायासें ॥ आपुली ह नी एक जगा-चि[illegible] मर मर लौकिकांत होय हंसें ॥ हें ना तैसें होउनि याल जाल किती भ्र[illegible]नरूप पिसें जैसें ॥१॥ पांचा पंचकाच्या मेळ्यामध्यें चोहटा लागेल व्य-

वहार करणें ॥ खोटें होतां दूत येतिल धावुनि चावडीस लागे जाणें गीं
काळ कोतवाल न्यायनिष्ठुर तो घडविल भोग भोगणें ॥ ममतेची बे
घालुनि पुसतां कवडी चाही हिशोब देणें ॥२॥ साधु संत शेटे महाज
महा नाडा आधीं शरण जावें होतें ॥ निष्काम निरहंकृतिनें दिवाणा
रुजू व्हावें त्यांच्या मतें ॥ कर्म तेंचि ब्रह्म जाणुनियां वर्म आचरावें स्व
चित्तें ॥ लाभालाभीं सम करावा होता उदीम विवेकाच्या हातें ॥ वें
लक्ष चौऱ्यायशी कारागृहवासीं ॥ आहेतीं मळमूत्रें भरलीं ॥ घाली फे
करितां जाजावलें जीव तरि आहे तीच उरलीं ॥ काम क्रोध लोभ
मत्सर दंभ यांची नाहीं हांव पुरली ॥ हाचि उपाय अपाय निवारक ता
क जरी वृत्ती फिरली ॥४॥ आतां एक करा सार तें विचारा असार
रसुनि वेगें ॥ अहंकर्ता याची न करुनियां वार्ता राहुनियां साधुसं
या मार्गीं विषयी ते मुमुक्षु होउनि मुक्तहि झाले प्रसंगें ॥ आत्मलाभ ल
मुद्रा ते लाधले सहज पूर्ण निजरंगें ॥५॥

## पद ४१.

स्वरूपीं संत झाले वो स्वरूपीं संत झाले ॥ संत झाले ह्मणुनि
ह्मणावे या लक्षणें जे युक्त ॥ जगदोद्धारी पतीतपावन मूर्तिमंत सगुण
जीवन्मुक्त ॥ ध्रु० ॥ अतिशयेंसि मन चंचळ पळभरी स्थीर न राहे हें
ठायीं ॥ नाना कल्पना संकल्प विकल्प करुनियां पाडी अपायीं ॥ ऐसें
निंवार दुर्जय दुस्तर तें मन सद्गुरुपायीं ॥ ठेवोनियां निजानंदघन
याचि डोळां याचि देहीं ॥१॥ अनित्य भाग आसुरि संपत्ति इंधन
लें ज्ञानाग्नीआंत ॥ सोहमस्मि बोधाग्नि धडाडिला तेणें झालें सर्व हुता
अग्नि शांत होउनि विझोनि जाय उरलें भस्म ते संत ॥ विभूतीचें चा
पुण्यपावन सर्वांगें शीतळ होत ॥२॥ मानापमानी लाभालाभीं त्यांचा ह
मर्ष तोचि विक्षेप ॥ ऐशा आहुतीचीं अवदानें होमितां नुपजेचि तेथें संत
रक्षा झाली हेही भावना निमाली उरला प्रारब्धाचा जल ॥ सहज पू
निजरंगीं रंगले संत माझे मायबाप ॥३॥

## पद ४२.

माझें कोंपट काय झालें ॥ ऐसा कोण कैंचा आला होता वायू तो
उडवुनियां नेलें ॥ ध्रु० ॥ पांच तुळवट पंचवीस वांसे त्रिगुण गुणाचे
मेडी ॥ चित्त चतुष्टय चारी भिंती त्या केल्या होत्या कडोविकडी

चित क्रियमाण भूमिका समान प्रारब्धाची घडमोडी ॥ ऐसें होतें माझें तृण ...पडें त्याची उरली नाहीं एक काडी ॥१॥ सुवर्णाचें सर्व अक्षयीं अपूर्व रत्नखचित जेथें तेथें ॥ दिव्य दामोदर सायुज्यमंदिर सुंदर कैंचें येथें ॥ एका- ...नि एक वाटतें आगाळिक चोज केलें कृष्णनाथें ॥ विस्मित होउनि भी- ...रीं प्रवेशला सुदामा महाद्वारपंथें ॥२॥ चहूंकडे चाऱ्ही पुरुषार्थ मंडप ...जितेजें झळकती पूर्ण ॥ कैवल्य डोल्हारा सद्वृत्ति सुंदरा शोभली सुवर्ण ...र्ण ॥ अवलोकितां पती उजळोनि आरती धांवुनि धरियले चरण ॥ वो- ...ळितां निजानंद रंगला हरलें जन्म जरा मरण ॥ ३ ॥

### पद ४३. चाल—उद्धवा शांतवन कर जा. ( वैद्य )

सद्गुरु सद्वैद्याची घे पूर्ण मात्रा वेगीं ॥ ध्रु० ॥ कां रे तुज- ...ही गोष्टि सुचेना; अणुमात्र कांहीं रसने; नामामृत तेंहि रुचेना ॥ भव- ...गें तापत्रय ज्वर पाहीं ; संतप्त सर्वदां हो; नैराश्य पथ्य पचेना ॥ १ ॥ ...लें अहंममता कुपथ्य हृदयीं; तूं उपाय पुससी तरि हा; अनुताप ढाळ ...ई ॥ आसुरी गुण मळ हे झडतिल तेणें; शुद्ध सत्व अंतःकरणें; नित्या- ...त्य विचारीं ॥२॥ वर्णाश्रमधर्मीं विहिताचरणें; अनुपान याचें सत्संगयोगें; ...स्त्रश्रवणें ॥ ज्ञानाभिमान तोचि हा रे; पाचाव होइल पाहा रे एकांत से- ...नि राही ॥३॥ संकल्प-सन्निपातें भलतें बरळसी मिथ्या मी मी ह्मणतो- ...ी या देहातें ॥ नयनीं गुरुकृपा अंजन लेईं; आरोग्य सत्वर होईं; मी ...ज्ञावबोध कषायीं ॥४॥ आतां सहसा तूं काम्यनिषेधें वावडें वर्जित स्नेह ...डुनि देईं विविध ॥ अभंगरंगें सहजिं सहज; अखंडनिजीं नीज; घेउनि- ... नवविध चूर्ण ॥ ५ ॥

### पद ४४. ( गारुडी )

श्रीगुरु गारुडिया तूं येईं रे दीनदयाळा ॥ ध्रु० ॥ भवसर्पें दर्पें दंशुनि ...ाही भुलविलें मजला विषय विषलहरी येती देहीं ॥ मी कोण ...ाय करितों ऐसें स्मरणही गेलें कैसें प्रज्वाळिल्या अग्निज्वाळा ॥१॥ पर- ...ामृत विषवत् लागे मजला सेवितां रसनें संसार कटुतर मधुरस गमला ॥ सत्संग शीतळ उष्ण वाटे तृष्णा झेंडू दाटे सर्वदां कंठनाळीं ॥ २ ॥ तरि तूं सत्वजळें सत्वर मातें निर्विष करिं आतां निज तेजें अंधतमातें ॥ प्र- कृतिचा पलवाहि न लागावा श्रीहरि जागर गावा ममता स्नेह हरुनी ॥ ३ ॥ सर्वांगीं भरलें हें विष उतरीं आब्रह्मस्तंभ निःसंशय समुळीं

निवारीं ॥ निःसंगा निजरंगा श्रुतिसारा निर्गुणा निर्विकारा करुणाकर ब्रीद नुपेक्षीं ॥ ४ ॥

पद ४५. ( पंचाक्षरी )

देशिकराणा आणा पंचाक्षरी ॥ परब्रह्ममूर्ति माझा कैवारी ॥ध्रु०॥ महा पंचभुतांच्या सांपडलों मेळीं ॥ पांचांची पंचविस झालीं ते काळीं ॥ अहं कार येथें वेताळ महा बळी ॥ येणें मजला पाडिलें भवजाळीं ॥१॥ कल्पना मुख्य मूळमाया जननी ॥ आशा तृष्णा या दोघी यक्षिणी ॥ यांची मज ला होतां वो झडपणी ॥ विसरलें आप आपणालागुनी ॥२॥ कामादि साही झोटिंग दारुण ॥ यांनीं मजला छळियलें संपूर्ण ॥ मोह महिषासुर येउनी आपण ॥ मनबुद्धिसहित मोहिलें अंतःकरण ॥३॥ रागद्वेष मुंजे हे दुर्धर ॥ अश्वत्थवृक्षीं वसती निरंतर ॥ लागले माझे पाठीसीं निष्ठुर ॥ यांनीं एवढा वाढविला संसार ॥४॥ श्रीगुरुनें करुणावचन ऐकुनी ॥ अभय हस्त मस्त कीं ठेवुनी ॥ महावाक्य मंत्र श्रवणीं सांगुनी ॥ स्वरूपीं सावध केलें वो र जणी ॥५॥ सहज पूर्ण निजरंग रंगला ॥ तेव्हां भवभ्रम हा भंगला ॥६॥

पद ४६. ( ज्योतिषी )

कार्यसिद्धि झाली परिपूर्ण एक लक्ष सुवर्ण ॥ मुद्रा हे लाधली अखंड चैतन्यघन ॥ध्रु०॥ सद्गुरु ज्योतिषी श्रीरंग सोडुनि पंचांग ॥ मुहूर्त दिधला अक्षयी नित्य अभंग ॥१॥ वारुनि दुर्विषय विषयोग जन्ममृत्युयोग ॥ दूरते काळ राहु डावलिला क्रोध वार भोग ॥२॥ अहंममता वैधृती व्यतिपात यांचा करुनि निःपात ॥ कल्पना कल्याणी ढाळिली तोचि शुद्ध मुहूर्त ॥३॥ राग द्वेष आडळ भ्रमण चुकवुनि जाण ॥ आशा तृष्णा वासना यांनी पाठीं घातल्या पूर्ण ॥४॥ प्रबोधचंद्र हा सम्मुख घेतला देख ॥ घटिका जोडलें तेणें मी पावलें सुख ॥५॥ अमृतसिद्धियोग स्वयंभ अलभ्य लाभ ॥ अनहत दुंदुभीच्या नादें कोंदलें नभ ॥६॥ पावुनि निज निर्गुण पाटण तें आनंदें पूर्ण ॥ रंगुनि देशिकरायाचे वंदिले चरण ॥७॥

पद ४७. ( कर्णधार )

धांवें पावें कर्णधारा रे निर्विकारा रे ॥ देवा देशिकराया ॥ भवपुरीं बुडत मी ये काळीं मायाजळीं येई पार कराया ॥ध्रु०॥ दुस्तरतर अतिचंचळ या तुंबळ कांहां केल्या तुटेना ॥ मगरी आशा तृष्णा कल्पना दुर्वासना कोमिठी सुटेना ॥ यांनीं मज पाताळीं बुडवितां कोण्ही सोडविता तुज॥

दि॰ सेना ॥ लक्ष चौऱ्यायशीं आवर्ती मिथ्या विवर्तमाजीं जळचरें नाना ॥१॥ रज तम हे दोन्ही दुर्गुण महा दारुण नक्र वक्र सदांही ॥ काम क्रोधादिक सर्प रे यांचा दर्प रे सोसवेना कदांही ॥ परस्परें मद मीन मिसळती लाटा उसळती स्वर्गपर्यंत पाहीं ॥ जन्म जरा आणि मरण संसरण पंक लागला देहीं ॥२॥ अनुकंपा ही नौका घेउनि वेगीं येऊनी मज काढुनि नेईं ॥ मायापा नदी मृगजळवत् करुनि त्वरीत सुख शाश्वत देईं ॥ नावाडीया गुरुनायका सुखदायका यश निर्दोष घेईं ॥ सहज पूर्ण निजरंगा रे निःसंगा रे करुणाकर तूं होईं ॥३॥

## पद ४८. ( महावीर )

आलेरे आलेरे महावीर संत पूर्णब्रह्म मूर्तिमंत ॥ जगदोद्धारी पतीतपावन विजनविहारी पायीं तोडर गर्जत ॥ ध्रु०॥ शुद्धसत्व सुंदर शामकर्ण वारु पालाणिला साधनयुक्त ॥ दृढनिश्चयें त्यावरी शोभाति राजयोगी शुद्ध बुद्ध नित्यमुक्त ॥ अष्टहि भावें प्रेम सिले ल्याले आंगीं मुकुट मस्तकीं अव्यक्त ॥ ज्ञानखड्ग विवेक वोडण झडके हातीं परम शूर भगवद्भक्त ॥१॥ समरंगणीं संनद्ध बद्ध वितरागें ते उभे पूर्ण निज निर्धारें ॥ हमी नारायण नाम ळीं करिती सिंहनाद अखंड साराविचारें ॥ ईक्षणमात्रें अनित्य परदळ निवटुनि वेगीं विजयी झाले नवविध भारें ॥ बोध अनुभव हस्ती मस्त झुलतात ी शृंगारिले साळंकारें ॥२॥ देहादिक भुवनत्रय विषय तृणप्राय ज्यांचे दृष्टि सी भासत ॥ पुढील पाउल मागें सहसा न ठेविती झाले जीवशिवातीत ॥ सर्वस्वें रक्षिती शरण आले त्यांसी भक्तवत्सल दयावंत ॥ निजरंगें रंग ले या रणभूमि-आंत विदेहत्वें विचरत ॥ ३ ॥

## पद ४९.

हे मज कोणें सांगितलें हें मज कोणें सांगितलें ॥ नकळत कळतां घडलें पूर्वी हो झालें तें झालें ॥ध्रु०॥ विषवत् विषय पियुषवत् मानुनी सेवुंका दिन रजनीं ॥ अहंममता संगें कां होऊं मोह-मदिरा-पानीं ॥ दुष्कर्माचरणीं रत होउनि ह्मणवूं कां अज्ञानी ॥ जन्ममरणदुःखाच्या कोटी भोगूं नाना योनी ॥ १ ॥ जननीजठरीं गर्भवासीं मळमूत्रीं नव मास ॥ नाकीं तोंडीं जंतु किडे कोंडे श्वासोश्वास ॥ मेद-मांस-रक्ताच्या आधणीं उकडे रात्रंदिवस ॥ प्र सूतिकाळिंची व्यथा सोसवेना उपजे त्रास ॥२॥ क्षणभंगुर जड दृश्य विकारीं आदि मध्यंतीं ॥ पंचभुतात्मक स्थिर चर विवर्त मिथ्या अवघी

भ्रांती ॥ देहबुद्धिनें जीव यातें नेणुनि पडले गुंतीं ॥ मोहमदांधपणें फिरतीं जन्ममरण-आवर्तीं ॥३॥ आतां विहिताचरणें वरणें सद्गुरुचरण स्मरणें ॥ साधन चतुष्टयें शुद्ध सत्व अंतःकरणें ॥ नवविध भजनें करुनी दुर्जय षड्रिपु संहरणें ॥ पावुनि दुर्लभ मानवि तनु हा भवसागर नच तरणें ॥ ४ ॥ हाहि परम पुरुषार्थ करिन मी निःसंशय निज हृदयीं ॥ निजानंदं रंगें रंगुनि राहीन सद्गुरुपायीं ॥ स्वात्म सुखामृतसिंधु सनातन सेविन याच उपायीं ॥ जाणत जाणत घेती आत्मघाती हें विष विषयीं ॥ ५ ॥

## पद ५०.

अझुनी जागी न होसी कंठ शोषला वो माय ॥ कां केला अव्हेर किं ॥ झालें तुजला काय ॥ध्रु०॥ श्रीरंगें माझे माते तान्हें बाळ मी एकुलतें ॥ पुर्यष्टक पाळण्यांत मज घातलें कां हातें ॥ सहज समाधी शेजे निजलें स्वस्थ चित्तें ॥ उठीं देईं स्तनपान क्षुधा लागली वो मातें ॥ १ ॥ देह अहंकार हा वैरी आसुरी गुणमयी याची जाया ॥ यापासुनि झाले रजतम त्यांनीं विसंचिली मम काया ॥ पाळण्यांतुनि काढुनि नेईं सत्वर मज निज ठायां जागी हो जननिये विलंब न करीं पुरविं थाया ॥२॥ धांवा ऐकुनि श्रवणीं जागी होउनि श्रीगुरुमाता ॥ निजानंदें रंगुनि मनिंची हरिली ममता चिंता वोसंगा घेउनियां परमामृतपय-पानें आतां ॥ नित्य तृप्त मज केलें तेणें झाली सर्वहि समता ॥ ३ ॥

## पद ५१. आरती सप्रेम० या चालीवर.

शरण रिघा गुरुवर्या आत्मानात्मविवेक करा ॥ दुस्तर भवनिधितारक नावाड्याचे पाय धरा ॥ध्रु०॥ कांहि तरि निज स्वहिताचा विचार न करावे कां जी ॥ त्यागुनि परमामृत मज गमतें सेवितसां कांजी ॥ दुर्लभ नरतनु हे क्षणभंगुर लावा निज काजीं ॥ शाश्वत निजसुख त्यागुनि व्यर्थचि जातां नरकीं कां जी ॥ १ ॥ देखत अंध बधीर श्रवणीं ऐकत असतांही ॥ जाणत जाणत वेडे होतां कांहीं ना बाही ॥ मी माझें जें ह्मणतां तें तंव मृगजळवत पाहीं ॥ जन्ममरण संसरणपुरीं या पडिलां प्रवाहीं ॥२॥ पंच भुतात्मक दृश्य विकारी जड मूढ आद्यंतीं ॥ जन्म निरर्थक होईल ऐसें जाणुनियां संतीं ॥ निगमाचार्य स्वमतें समुळीं सांडुनि भवभ्रांती ॥ निजरंगें रंगले पूर्ण अच्युतानंतीं ॥३॥

### पद ५२. बोलणें पोल झालें या चा०

त्याला मानव लोकीं ॥ हरि ह्मणे मी मानवलों कीं ॥ध्रु०॥ परात्पर महंस सुविचार ॥ निवडुनि क्षीर नीर सारा-सार ॥ सेवीति मुक्ताफळ र ॥ ब्रह्मानंद मानसीं ॥१॥ निष्कामना निरहंकृती ॥ भगवद्भाव सर्वा- ॥ पूर्ण दया क्षमा शांती ॥ दैवी संपत्तिचे भोक्ते ॥२॥ संचित क्रिय- प्रारब्ध ॥ ब्रह्माग्नीनें झालीं दग्ध ॥ नित्यमुक्त शुद्धबुद्ध ॥ हरिगुरु न परायण जे ॥३॥ हरिजन हरिसम निःसंशय ॥ निगमागमिचा कृत- ाय ॥ नामरुपातित निर्गुण अद्वय ॥ पूर्ण प्रत्यय हा ज्यांचा ॥४॥ पूर्ण ामृतें तृप्त ॥ सच्चित्सुखघन जीवन्मुक्त ॥ जगदोद्धारी भगवद्भक्त ॥ ानंदें रंगले ॥५॥

### पद ५३.

कायापुर पाटणीं राजा मन ॥ राज्य करितां जाहला उन्मन ॥ ऐका हो ची कथा सावधान ॥ मुमुक्षु मुक्त भक्त विरक्त जन ॥ध्रु०॥ राजपत्न्या र दोघी जणी ॥ निवृत्ति प्रवृत्ति पतिव्रता साजणी ॥ धाकुटी प्रीति- झाली राणी ॥ सर्वदा ती बोलाची शिराणी ॥१॥ तिनें जें केलें ते ी न मोडे ॥ प्राणाहुनि अंतरीं आवडे ॥ नाचवी तैसें नाचे हो तीपुढें ॥ रुप स्मरणीं झालें केवळ वेडें ॥२॥ पुरुष वश्य झालासे ह्मणवुनी ॥ ह्मस्तंभ व्यापिलें कामिनी ॥ पाहूंही नेदी निवृत्तीसी नयनीं ॥ आपण अवघी अशनीं शयनीं ॥३॥ ज्येष्ठ वनिता निवृत्ति नावडती ॥ तीयेतें ही न पुसे कल्पांतीं ॥ वंध्यादोषें न देखे विश्रांती ॥ गर्जती श्रुती ना लोकोस्ति ॥४॥ वर्जिली दुरी दिगंतीं जे होती ॥ पुण्यें मनें ते ए- ीं ॥ अनुभवितां सुख शेज निवृत्ति ॥ संभवला उदरीं गर्भ तो निश्चिती ॥ प्रबोधचंद्र जन्मला सुपुत्र ॥ सुलक्षणी पावन पवित्र ॥ ऐकोनि हा त विचित्र ॥ प्रवृत्ति ह्मणे बुडविलें कुळगोत्र ॥६॥ आतां बाई कायवो वें ॥ध्रु०॥ माझी माता ममता मोह पिता ॥ कामादि साही बंधु हे ता ॥ आशा तृष्णा कल्पना दुहिता ॥ पाहातां यांसी ठाव कैंचा वो ां ॥७॥ पडिलें आतां संसारासी पाणी ॥ खुंटली माया माहेर येणीं णीं ॥ भ्रतार हिरोनि नेलागे साजणी ॥ परतोनि सहसा न पाहे तो ी ॥८॥ शुद्धसत्व सत्य सद्भाव विश्वास ॥ भूतदया नित्य सद्बुद्धि सं- ॥ धारणा धैर्य निर्लोभ अविनाश ॥ पर्वकाळ यांचा तेणें विशेष ॥९॥

स्वानुभव विवेक वैराग्य ॥ शांति क्षमा उपरति त्या योग्य ॥ मिळाली दै संपदा सभाग्य ॥ भेदाभेद गेले झालें आरोग्य ॥१०॥ प्रवृत्ति निवृत्ति हीसी निरसुनी ॥ पूर्ण ब्रह्म मन झालें उन्मनी ॥ अनुहात ध्वनी न सम गगनीं ॥ निजानंद रंगला जनीं वनीं ॥११॥

## पद ५४. (दशावतारवर्णन.)

ऐसे अवतार दशविध हे दशविध हे ॥ दशविध अवतार झाले हा -चार साचार श्रवणीं ऐका ॥ ही कथा जड जीवां दुस्तर भवसिंधु तरी जैसी नौका ॥ ध्रु० ॥ मत्स्यापासुनि चारी नरहरीपर्यंत अवतार कृतीं झाले ॥ त्रेतीं वामन परशुराम श्रीराम सगुणत्वा आले ॥ द्वापारीं कृष्ण आ॥ तो मनीं आठवितां दोष गेले ॥ बौद्ध अवतार हा कलयुगीं जाणिजे पुढें कल्की व्यास बोले ॥१॥ मधुमासीं शुद्ध प्रतिपदा रेवती विष्कंभो इंदुवासरीं ॥ द्वा-घटिका दिवसा कृतयुगीं मत्स्यरूपी झाला तो श्रीहरी ॥ शंखासुरा व -वेद सोडविलें प्रतापतेजें निर्धारी ॥ प्रथम अवतारीं हें चरित्र केलें स॥ परिसावें चतुरीं ॥२॥ ज्येष्ठ शुद्ध द्वितिया कृतयुगीं प्रभवीं रोहिणी बुध दिवशीं ॥ धृतियोग घटिका चारी होतां प्रकटोनीयां कूर्मशी ॥ सिंधुमंड मंदराद्रि बुडतां हें जाणोनियां हृषीकेशी ॥ धरुनि पृष्ठीवरी कार्यसिद्धि केली देवां दानवांची कैसी ॥ ३ ॥ माघमास वद्य सप्तमी अवतार रवि शुभ दिनीं झाला ॥ आठ घटिका दिवसा साध्य योगीं तो हिरण्याक्ष त वधिला ॥ दंष्ट्राग्रीं हे मही उचलुनि धरिली थोर पवाडा हा केला ॥ ॥ युगीं वराहरूपें श्रीहरी अरुप रूपासि आला ॥४॥ माधवमासीं शुक्ल -दशी शनिवार नक्षत्र स्वाती ॥ स्तंभोद्भवें तेव्हां अवतार केला घटिका द्विविंशति ॥ कृत अंगिरा संवत्सरामाजीं धरुनियां नरसिंहाकृति ॥ हिरण्य कश्यपु विदारुनी तो दैत्य लाविला सायुज्यपंथा ॥५॥ धाता संवत्सरीं त्रे वामन अवतार देवें धरुनी ॥ भाद्रपद शुद्ध द्वादशी नक्षत्र श्रवण अर्वा तनुज दिनीं ॥ पक्ष घटिका दिवसा दान मागितलें त्रिपदमात्र मेदिनी बळिचे द्वारीं द्वारपाळ तो झाला पाताळीं त्यासि घालुनी ॥६॥ त्रेतीं प्र थीं वैशाखमासीं शनि रोहिणी शुक्लपक्षीं ॥ तृतीया निशिमाजी एकाद घटिका परशुराम सर्वसाक्षी ॥ कार्तवीर्या वधुनि निःक्षत्री महि करुनी भ जनासि संरक्षी ॥ देउनीयां दान ब्राह्मणाचा मान विद्यमानी होय पक्षी ॥ तारण संवत्सरीं चैत्र शुद्ध नवमी पुनर्वसु सुविशेष ॥ दशरथनंदन कौ

तिचे उदरीं श्रीराम अयोध्याधीश ॥ शुक्लयोग शशीवासर
रविवंश ॥ अवतरला भक्तकामकल्पद्रुम पूर्णब्रह्म निर्विशे
दिनं नंदनंदन आला वसुदेव-देवकि-उदरा ॥ द्वापारीं बु
संवत्सरीं श्रावणमास अवधारा ॥ कृष्ण अष्टमी निशा मध्यक
परात्परा ॥ रोहिणी नक्षत्रीं कृष्ण अवतार काय वर्णूं निर्विकार
द्वापारीं हा बौद्ध अवतार घेतला रासभ संवत्सरा आंत ॥ आषाढ शु
भानुवासर विशाखा नक्षत्र प्राप्त ॥ सहा घटिका दिवसा शुक्ल योग
जन्म झाला परि हा गुप्त ॥ वेदविधि वर्णाश्रम धर्म लोपती सर्वासि
हे क्लृप्त ॥१०॥ दुर्मुख संवत्सरीं कलयुगाचे अंतीं मार्गशीर्ष शुद्ध बीज॥
नक्षत्रीं मंदवासरीं तिनी घटिका झालिया तो सहज ॥ कल्कि अव-
होईल तो पुढें मारिल म्लेच्छ दुर्बीज ॥ शास्त्रिंचें प्रमेय हें जाणुनि न
संशय ते महाराज ॥ ११ ॥ यापरी परब्रह्म साकारलें हें जळगार-
पूर्ण ॥ तंतूवरि पट मृत्तिकेसि घट जग नगीं चित्सुवर्ण ॥ नामरूपा-
तें सत्य सदोदित नित्य निजानंदघन ॥ सहज पूर्ण रंगीं रंगोनि ठेलें
साकार निर्गुण ॥१२॥

## पद ९९. काशीराजकृत दिंडिगा.

जयो बा सद्गुरु राया ॥ परंपरा आनद सांप्रदाया ॥ देई चित्स्फू-

१. हें पद रंगनाथांचे पुतणे [ विठ्ठलराव आत्यांचे ज्येष्ट पुत्र ] काशिराज
केलें आहे. यांत आपल्या कुळाची एकंदर गुरुपरंपरा दाखवून शेवटीं तींत
यांचे वडील बंधु यादवरावअप्पा यांचें व आप या वडिलांचेंही नांव
दर्शित केलें आहे. [ ती गुरुपरंपरा याप्रमाणें आहे. प्रथम जगदीश,
शिष्य दत्तात्रय, दत्तात्रयाचा शिष्य सदानंद, त्यांचा रामानंद, त्याचा अम-
, त्याचा गंभीरानंद, त्याचा ब्रह्मानंद, त्याचा सहजानंद, त्याचा पूर्णानंद,
निजानंद ( रंगनाथांचे वडील ), त्याचा श्रीरंगनाथ. ]
[ रंगनाथांचे बंधु विठ्ठलराव आत्या यांणीं स्वतः केलेलें गुरुपरंपरा-वर्णन. ]
श्रीदत्तात्रयाचें जन्मस्थान क्षीरसागरीं ॥ स्नान शिवपुरीं ॥ भिक्षा मा-
हीं करवीरीं ॥ मातापुरीं सुखशयन ॥१॥ श्रीसदानंद कृष्णातीरीं
निंब ॥ रामानंद काशीपुरीं ॥ अमलानंद प्रेमपुरीं ॥ गंभीरानंद रामेश्वरीं ॥
नंद श्रीपंढरीचंद्रभागेसन्निध ॥ आनंदमठ जो कल्याण ॥ सहजानं-
तें स्थान ॥ पूर्णानंदाचें स्थान गोडवण ॥ निजानंदाचें स्थान नाझरें ॥
रंगनाथस्वामींचें स्थान निर्गुणपुर ( निगडी ) वैराटदेशीं ॥

र्ति गुण तुझे गाया जी जी जी जी ॥ ओ दिंडिगाण प्रार्थना कराया ॥
आदि पुरुष तो वैकुंठराणा ॥ जगद्गुरु निर्विकल्पतरू जाणा ॥ स्मरण
वारितो जन्ममरणांरे ॥ नमन माझें त्या स्वामिचरणा ॥१॥ ब्रह्मा
रुद्र एकरूप झाले ॥ अरूप रूपें अनाम नाम पावले ॥ शरण सर्ति-
बहुत जया गेले जी ॥ दत्तात्रयाचीं वंदिन पाउलें ॥२॥ सदानंदा यति
निर्विकारा ॥ तुवां अचेतना चेतविलें स्थावरा ॥ झाल्या चौऱ्यायशीं स-
ल्या सैरारे ॥ विद्वद्वर्या चित्सूर्या दिनोद्धारा ॥३॥ भक्ति विरक्ति प्र
कंद ॥ देहिं विदेह नित्य निर्द्वंद्व ॥ सोह ब्रह्म हाही मावळला स्फुंद
रामीं आराम तोचि रामानंद ॥४॥ नित्य निष्कळंक शुद्ध बुद्ध मुक्त ॥
व्य तेजोमय स्वप्रकाशयुक्त ॥ पूर्ण ज्ञानियां अभेद भक्त ॥ अमलानंद
अव्यक्त ॥५॥ आधिष्ठान अचळ सर्वत्रव्यापी ॥ या प्रत्ययें द्वैतभाव लोपी
स्वप्नींही नायके कदापी ॥ स्वामी गंभिरानंद तो प्रतापी ॥६॥ अहं ब्र-
स्फुरण जेथें नाहीं ॥ निर्विकल्प निर्विशेष दशा पाहीं ॥ जेथें चित्सौख्य ॥
जें कांहीं ॥ ब्रह्मानंद तो बोलती चौरी सोही ॥७॥ सहजानंद तो कल्
वाशी ॥ कृपादृष्टिनें त्रिविध भेद नाशी ॥ शरण सद्भावें रिघावें तया
.....॥८॥ परिपूर्ण मी अव्यय अविनाश ॥ या स्वानुभवें सर्वदां संत
अखंड दंडायमान निर्विशेष ॥ पूर्णानंद तो नित्य निर्दोष ॥९॥ आ
संतृप्त सर्वदांही ॥ भगवद्भजनें हीं शोभलीं दाही ॥ सत्यसंकल्प क
तीत पाहीं ॥ निजानंद तो बोलती संत सवही ॥ १० ॥ लक्षणो ॥
शूर संग्रामीं ॥ विदेहत्वें नातळे गुणग्रामीं ॥ दैवी संपदा राहिली
धामीं ॥ यादवराव तो माहाराज स्वामी ॥ ११ ॥ वेद वेदांत प्रतिपाद्य
ब्रह्म निरूपणें साधु संत धाले ॥ ज्यांचे कीर्तनीं जीव शिव ऐक्य झाले
रंगमूर्ति तो निजानंदें डोले ॥ १२॥ श्रुतिसंमत ते उद्गार अनुभवाचे ॥
दक बहुधा जे बाण या भवाचे ॥ गुण वर्णितां कुंठित शब्द वाचे ॥
राय या माहाराज याचे ॥१३॥ श्री रंगानुज तनुजें दिंडिगाणें ॥ गुरुप
धरुनि जिवें प्राणें ॥ संतसभेमाजी भलें केलें गाणें ॥ निज धन अ
पसाव दान देणें ॥१४॥

पद ५६. काशीराजकृत. (बोलणें फोल झालें या चा० )

ब्राह्मणें अंत्यज-मंदिरीं मागावी ज्ञानभिक्षा ॥ विद्वज्जन जाणति त्या

१. चार वेद. २. सहा शास्त्रें. ३. दहा इंद्रियें.

क्षा ॥ध्रु०॥ अपरोक्ष अध्यात्म-ज्ञान ॥ गंगा भागिरथी समान ॥ पदो-
घडाति त्या मुनि मुमुक्षा ॥ १ ॥ हातीं घेउनि मन खर्पर ॥ भिक्षेसि
हो तत्पर ॥ न धरुनि तिळतुल्य कांहीं अपेक्षा ॥२॥ निजरंगा सम्मुख
॥ श्रीरंगानुज तनुजें भावें ॥ त्रिभुवन विभवाची करुनि उपेक्षा ॥३॥

## पद ५७.

ज्ञानविवेक उद्धव मथुरेहुनी ॥ कृष्णें पाठविला ज्ञानी ॥ तेणें गोकुळिंच्या
नगी ॥ बोधें बोधियल्या कैशा ॥ कृष्ण वियोगें त्या मनीं ॥ सगुण
अनुसंधानीं ॥ आसनीं शयनीं गमनागमनीं ॥ कृष्णध्यान चिंतिती ॥
मण चतुर्भुज हरी ॥ शंख-चक्र-पीतांबरधारी ॥ नंदनंदन तो कंसारी ॥
सारीं दुर्लभ ॥ ऐशा वेधल्या ते समयीं ॥ उद्धव पातला लवलाहीं ॥
ने घेउनि मग त्यां पाहीं ॥ ह्मणती एकट आलासिकां ॥ १ ॥ उद्धवा
काय झालें ॥ ध्रु० ॥ ध्वज वज्रांकुश पाहीं ॥ सामुद्रिकें ठाईं ठाईं ॥
इंद्रनीळ मणी पाहीं ॥ कृष्णदेहीं शोभती ॥ पोटरिया जानुजघनु ॥
भ उपमा सानु ॥ दिव्य सौदामिनी कीं भानु ॥ तैसा पीतांबर कासे ॥
ब्रह्मांडें हीं उदरीं ॥ त्रिगुण त्रिवळी त्या माझारी ॥ हृदयीं श्रीवत्सा
ीं ॥ कंठीं कौस्तुभ विराजे ॥ सुंदर वदनेंदु सोज्वळ ॥ दंतपंक्तिचा झ-
॥ राजीवनयन नाशिक सरळ ॥ विशाळ भाळ चांगल ॥२॥ श्रवणीं
तळपती ॥ गगनीं न समाय ते दिप्ती ॥ सुरासुर गुरु लोपति ॥ बृह-
आणि शुक्र ॥ बाहू सरळ शुंडादंड ॥ पराक्रमें अति प्रचंड ॥ अभय
ते अखंड ॥ उदारपणें उभारले ॥ मनगटीं वीरकंकणें ॥ मिरवे मुद्रि-
लेणें ॥ तळहात ते सुंदरपणें ॥ वोप देती अरुणातें ॥ अनर्घ्य चि-
गोमटीं ॥ तो शोभतो मस्तक मुकुटीं ॥ मयोरपत्रें त्या तळवटीं ॥ वीर
सु-बद्ध ॥३॥ उद्धवा तें रूप काय झालें ॥ ध्रु० ॥ उद्धव ह्मणे तुह्मी
॥ इंद्रिय वृत्ति विषयविहारी ॥ अखंड नाम रूपावरी ॥ दृश्य दृष्टी
ना ॥ नामरूपाचा प्रसंग ॥ मिथ्या कल्पनेचें अंग ॥ जीव नीर हरी
णि तरंग ॥ वाचा-रंभण मात्र ते ॥ ब्रह्म निःसंग परिपूर्ण ॥ जेथें नाहीं
ावगुण ॥ कल्पनेची बोळवण ॥ कृष्ण कचा ते ठायीं ॥ शुद्ध बुद्ध नित्य
॥ छेद भेद रहित युक्त ॥ घनानंद व्यक्ताव्यक्त ॥ हाही शब्द खुटला
४ ॥ गौळणी पूर्णबोधें बोधल्या ॥ ध्रु० ॥ कर्पूरदीपकाच्या मेळीं ॥ धूम्र
जल ना काजळी ॥ निवडुं जातां ते निराळी ॥ कोठें उरली सांग पां ॥

सत् चित् आणि आनंद ॥ हा अद्वैत वृत्तीचा भेद ॥ जाणो जातां वेद ॥ मौनपणें राहिले ॥ सहज पूर्ण निजानंद ॥ हाही खुंटला वाद ॥ महाकल्पांतीं निर्द्वंद्व ॥ जैसें जळमय नभ झालें ॥ रंगीं रंग सद्वृत्ति ॥ सद्गुरुकृपें पूर्ण प्राप्ती ॥ अवघा कृष्ण आदिं अंतीं ॥ आप हित संचला ॥५॥

## पद ५८.

विठलराया पंचाक्षरिया येईं रे ॥ भ्रमिस्त झालों भवभ्रांति नेईं रे ॥ध्रु०॥ विराटपुरुषा विश्वेशा तूं गोसावी ॥ विषय भुतें झडपिलें जीव भावीं ॥ विशेष पांचाचीं पंचवीस जाणावीं ॥ विशाळ रूपें या तनु-गांवीं ॥ १ ॥ ठसा पाडिला म्हणती हे भूवैकुंठ ॥ ठकडा पंचाक्षरी कंचुकंठ ॥ ठकार ठाणे पाहातां तूं मुळ-कंठ ॥ ठसकेनें हे विठ्ठी पंढरी पेंठ ॥२॥ लक्ष्मीकांता हा तुझा मंत्र सखोल ॥ करुणासिंधू वचनें बोल ॥ लटिकीं भूतें मृगजळा कैंची वोल ॥ लक्षूं अनुभवें अवघें फोल ॥३॥ राजीवनयना दिनबंधु जगदोद्धारा ॥ राधा निर्गुणा निर्विकारा ॥ राम-रक्षा करुनि हा भूत-पसारा ॥ राहे ऐसें तूं परमोदारा ॥४॥ यांच्या करणें तुजला हे विठ्ठलराया ॥ यावरी आवरीं हे आपुलि माया ॥ यातना हे भोगितां श्रमली काया ॥ यावें श्रीरंगा तरणोपाया ॥ ५ ॥

## पद ५९.

अनुभव सुख सांगातिणी ॥ म्हणे एक माय-बाहिणी ॥ तुझ्या रांची काहणी ॥ मजला चोजवली वो ॥ तुटलें सासुरें माहे समुळीं खुंटली येरझार ॥ पाडिला कपाळीं भ्रतार ॥ नामरुपातीत वे कूळ कर्म पाप पुण्य ॥आश्रम वर्ण व्यक्ति शून्य॥ स्तवनीं स्तवितां नये धरूनि राहावें सये ॥ ऐशियाशीं पाडिली गांठी ॥ जिवित्वाची झाली सा तुह्मी मांडिली आटाटी ॥ बोलीं बोलवेना ॥१॥ तुझें गेलें माणुसपण ॥ नामरुपा बोळवण ॥सांडी मांडी हे वण वण ॥ कवण करिल वावुगी ॥ रसुनियां छेद भेद ॥ निज मंदिरीं निर्द्वंद्व ॥ राहें सांडुनियां छंद ॥ चि झालेपणाचा ॥ जातां वाजोनियां वारें ॥ तरू पूर्व संस्कारें ॥ हाले तैसी विचरें ॥ हेहीं प्रारब्धयोगें ॥ परि तें तृणाचें बुझवणें ॥ माणुस म्हण त्या कवणें ॥ दिसे गार गारपणें ॥ परि तें केवळ नीर कीं ॥२॥ तरि

ां ऐसें करीं ॥ निर्भय होउनिया अंतरीं ॥ निरतीशय सुख शेजेवरी ॥
ड निजीं नीजवो ॥ कर्पूर दीपकाच्या मेळीं ॥ रक्षा मैस ना काजळी ॥
सोहं दोन्ही जाळीं ॥ समुळीं ब्रह्माग्नीमाजीं ॥ कैंची प्रकृती कैंचा
॥ तेथें कैंचें हर्षामर्ष ॥ निष्कळंक निर्विशेष ॥ तुझीं तूंचि निश्चयें ॥
ा संतोष ना खेद ॥ मावळले भेदाभेद ॥ सहज पूर्ण निजानंद ॥ सर्व
रंगला ॥३॥

## पद ६०.

हर हर प्रभु महादेव देवाधिदेवा ॥ पतीतपावना सदाशिवा ॥१॥ भ्रमें
नाीं केली सेवा ॥ क्षमा करीं जिवाचेया जिवा ॥२॥ अनुपमा सर्वो-
शिवा ॥ तारि तारि वारी देहभावा ॥३॥ स्वभक्तविश्रामा पूर्णकामा ॥
ावें दयासिंधुनामा ॥४॥ भवानीशा ईशा महारुद्रा ॥ भालचंद्रा मृडहर
ाद्रा ॥५॥ निजानंदा निर्द्वंद्वा निजरंगा ॥ दावीं वेगीं पद-पद्माच्या संगा॥६॥

## पद ६१.

जळों तें ज्ञान अज्ञान खरें ॥ध्रु०॥ अहं ममता-स्पद सकळ कळा या ॥
रेतीं मदनशरें॥१॥आत्म कळेविण देहीं देहबुद्धी॥ भ्रमते भ्रांतिभरें॥२॥
जाणें नेणें आपणातें निज ॥-स्वरुपाच्या विसरें ॥३॥ भेद अभेदी न-
देखे ॥अद्वैतीं दुसरें ॥४॥ पूर्णानंद पदीं निज रंगें ॥ रंगेना अपुरें ॥५॥

## पद ६२. भूपाळी.

प्रातःस्नान प्रातःकाळीं ॥ शिवस्मरण गंगाजळीं ॥ करितां झालें भूमं-
ीं ॥ पुण्य-पावन महादोषी ॥१॥ द्वादश जोतिर्लिंगें वाचे ॥ अगणित
-गण सदाशिवाचे ॥ स्मरतां तुटती पाश भवाचे ॥ हें निःसंशय कां
ीं ॥ध्रु०॥ वाराणशी विश्वनाथ ॥ भागीरथी महा तीर्थ ॥ मोक्षपुरी ते
र्थ ॥ त्रिशुळावरी रचियली ॥२॥ सोमनाथ तो सोरटी ॥ स्मरणें ना-
त पापें कोटी॥ सांब सदाशिव धूर्जटी ॥ भवसंकटीं स्मरावा ॥३॥ उत्तर-
ीं जगदोद्धार ॥ करावया श्रीशंकर ॥ लीलाविग्रही अवतार ॥ बद्री-
ार जाहला ॥४॥ साठि वर्षें वाट पाहत ॥ मल्लिकार्जुन तो विख्यात ॥
ैल्य पर्वत ॥ आधिष्ठान जयाचें ॥५॥ अवंतिका नामें नगरी ॥ मुक्ति-
ाक जे अवधारी ॥ महंकाळ तो त्रिपुरारी ॥ तेथें आहे पाहुं चला
॥ परियली नामें क्षेत्र ॥ तीर्थ मार्कंडेय हरिहर ॥ वैजनाथ कर्पूरगौर॥
रतां भवसागर तारी ॥७॥ ब्रम्हगिरी शिखरीं पाहें ॥ गंगा जटा-मुकुटीं

वाहे ॥ त्र्यंबकराज नाम हें ॥ जपतां हरती महापापें ॥८॥ भीमाशं
भीमा-उगमीं ॥ स्तवनीं स्तविजे निगमागमीं ॥ स्नानें पानें ते संगमीं ॥
रितां हरती महापापें ॥९॥ आवंढ्यानागनाथीं पूजन ॥ घडतां वि
तीर्थीं स्नान ॥ झाले पतीत बहु पावन ॥ सज्जन जन वन-चंदन तो ॥
पाहोनि नर्मदेचें तीर ॥ तेथें मांधाता नृपवर ॥ ओंकार ममलेश्वर ॥
जतां पावन तो झाला ॥११॥ वेळापुरीं अधिष्ठान ॥ वेरुळ ह्मणती ज
जन ॥ तेथें घृष्णेश्वर त्रिनयन ॥ दीन दयाघन शोभतसे ॥१२॥ स
तीरीं करुनि स्नान ॥ रामें केलें लिंगार्चन ॥ रामेश्वर तो ह्मणती ज
जो निजभजनें उद्धरितो ॥१३॥ ऐसीं जपतां प्रातःकाळीं ॥ द्वादश
नामावळी ॥ भुक्ति-मुक्ति-दायक सकळीं ॥ चंद्रमौळी संतोषे ॥
निजानंदें हे भूपाळी ॥ रंगीं रंगतां कपाळीं ॥ करुणाकर हर हा
पाळी ॥ अनन्य शरणागत त्यातें ॥१५॥

## पद ६३.

भय मीपण-संगें जडलें ॥ ध्रु० ॥ मी मी ह्मणतां कापिती मान ॥
म्हणतां तूं तिचा मान ॥१॥ देह गेह सुत कांचन कांता ॥ माझें म्हण
उपजे चिंता ॥२॥ मुळिंचा मी निजरंग त्यजुनी ॥ माझें म्हणतां भय
त्पन्न ॥३॥

## पद ६४.

पहा वय व्यर्थचि गेलें रे ॥ ध्रु० ॥ या नरदेहीं श्रीगुरु-भजनें ॥ व
स्वहित न झालें रे ॥१॥ विषय-विलासीं गुंतुनि गेलें ॥ काय बरें हें के
॥ २ ॥ मृगमद नाभिसिं असतां नेणुनि ॥ भ्रमतां भ्रमतां मेले
॥ ३ ॥ निज रंगें रंगेना तैं हे ॥ जीतांचि मेले रे ॥४॥

## पद ६५.

कारण श्रीगुरु राज दया ॥ध्रु०॥ भव-तम-नाशक-चिद्भानू हा ॥ य
यास दया ॥ १ ॥ शांति क्षमादिक दैवी-संपत्ती ॥ यावया हृदया ॥
पूर्णानंदें रंगुनि जड जिव ॥ पावति निजपद या ॥ ३ ॥

## पद ६६.

हरि करुणा-निलया ॥ विलया ने दुस्तर माया ॥ निरसुनि हृत्तम श
मन त्वत्पद-जलरुह-युगुल नमाया ॥ ध्रु० ॥ क्रुरतर भवपुरविषय आवर्तीं

---

१. जीताच मेले रे ॥४॥ याबद्दल अन्य पाठ—भवोदधींत बुडाले रे ।

॥ सतत श्रमाया ॥ जन्म मरण संसरण भोगिता झालों पात्र श्रमाया ॥ विषयासक्त मी शक्त नव्हें हा इन्द्रियसमुह दमाया ॥ त्यजुनि रमावर ल कवण नर जप-तप-यम-नियमा या ॥२॥ दीनदयालय मां परिपा- नासुनि अंधतमा या ॥ निजानंदें रंग रंगवीं सच्चित्स्वरूपिं रमाया ॥३॥

## पद ६७.

सेवूं राम रसायन या ॥ध्रु०॥ भवज्वरनाशक पोषक नवविध ॥ औषध या ॥१॥ अनन्यभावें मागति त्यांसहि ॥ मात्रा देऊं या ॥२॥ नित्य मय निजसुख रंगीं ॥॥ मानस ठेवूं या ॥४॥

## पद ६८.

पाहुं चला पंढरपूरपती ॥ध्रु०॥ विधु-भागातट निकट निकेतन ॥ निर्जर- जपती ॥१॥ कामादिक ज्याचें नामचि घेतां ॥ विल्पती लपती ॥२॥ सनकादिक निज रंगें ज्याच्या ॥ दर्शना टपती ॥ ३ ॥

## पद ६९.

बुडालों ब्रह्मानंदजळीं ॥ध्रु०॥ याति-कुळासह वर्णाश्रम गुण ॥ नाम-रुपें ळीं ॥ १ ॥ एकसरें तळ घेउनि आलों ॥ निमसुख कल्लोळीं ॥ २ ॥ रंगें रंगुनियां ठेलों ॥ मी अहळीं बहळीं ॥ ३ ॥

## पद ७०. राग झंपा.

आतां राम पायीं मना लाग वेगें ॥ सोसिले बहुत अन्याय मागें ॥ध्रु०॥ न्मांतरीं मास नव दाथरीं निरय शेजेवरी जठरकूहरीं ॥ घातलें अ- शिणविलें यापरी काय सांगों तरी दुःखलहरीं ॥१॥ न निघतां बा- जोवें ओढे सरी जन्मद्वारीं करी अटक भारी ॥ जन्मलीया वरी मूढ धरी रडत कोहं स्वरीं देहधारी ॥२॥ श्वान सूकर खरा मार्जरा वा- कृमिकिटकांतरा पाप योनी ॥ जन्मलों त्यांचिये उदरिं मी जेथवां अभक्ष्य क्षीयलें न समजोनी ॥३॥ बाळपणं न कळतां वेंचलें वय वृथा तरुण- योषिता संग नाडी ॥ वृद्धपण आलिया गलिततनु झा या स्मरण- लिया काळ ताडी ॥ ४ ॥ पूर्वपुण्यें आतां जाहलों जन्मतां मानवी ॥ देह धरुनी ॥ येथ नाना पिडा तापत्रय रोकडा नीघ तूं झडझडां त करुनी ॥५॥ पुनरपी सांगणें हेंचि तुज मागणें दिनानिशीं जागणें

---

१. अन्य पाठ – बाळपण खेळतां, तरुणपण उन्मादता, विषयलोलुपता होतें ॥ वृद्धपण आलिया, गलित तनु झालिया ॥ स्मरणपद गेलिया, रहातें ॥ ४ ॥

रामभजनीं ॥ निगम आगमें बरें दाविती जें खरें तेंचि तूं आचरें वि-र
त्यजुनी ॥६॥ दोषे-दर्शन न पाहा सतत भजनीं राहा लावुनि देह
रामकाजीं ॥ जंगसी निजपदीं मोहमाया नदी आटली जाण घे भाक
॥७॥ पूर्ण निजरंग निःसंग टाकुनि मना सर्वदां विचरसी कामधामीं कु
आतां तरि तुतें सांगतों स्वहित तें ऐकसि तरि मूढा रंग रामीं ॥ ८ ॥

### पद ७१. ( बोलणें फोल झालें या चा. )

दुर्लभतर हो दर्शन या महा-पुरुषांचें देवांसही ॥ध्रु०॥ प्रपंचि-
सदां सुप्त ॥ निजानंदें नित्य तृप्त ॥ न कळे अगणित पुण्य गुप्त ॥ ज्दर्श
पद-रज-स्पर्शाचें ॥१॥ दैवी संपत्तिचें निजधाम॥ अखंड स्वरुपीं पूर्ण-का
स्वप्नीं नायकती दुर्नाम ॥ सहसा अनृत अस्पर्शाचें ॥२॥ नसतां आदि
अवसान ॥ अधिष्ठानीं जगद्भान ॥ पाहाती विवर्त उपादान ॥ कीं प्रति
आदर्शाचें ॥३॥ सहजीं सहज पूर्ण निजरंग ॥ अज अविनाशी अव्यय-
भंग ॥ सेविति परमामृत निजरंग ॥ जें महाकारण हर्षाचें ॥ ४ ॥

### पद ७२.

काय त्यांचें झालें जन्मोनि व्यर्थ मेले ॥ पावोनि नरदेह व्यर्थ उ
तैसे गेले ॥ ध्रु०॥ भक्तिविना ज्ञान व्यर्थ ज्ञानविना कर्म ॥ निरहंकृति
व्यर्थ वर्णाश्रम-धर्म ॥ १ ॥ भूतदयेविण सकळ कळा शून्य
शांतिक्षमेविण व्यर्थ दान पुण्य रे ॥ २ ॥ संत-समागमेविण व्यर्थ
ग रे ॥ निजानंदेविण व्यर्थ बाह्य रंग रे ॥ ३ ॥

### पद ७३.

त्याची तनु काशी तनु काशी ॥ मुक्त क्षेत्ररहिवासी ॥ ध्रु०॥ गुरु
मन उन्मन ज्याचें ॥ नवल मी सांगों काय तयाचें ॥१॥ भागीरथी
क्षेत्र ॥ सद्गुरु-चरणीं परम पवित्र ॥ २ ॥ विश्वेश्वर तो सद्गुरु अ
सहजीं सहज पूर्ण निज-रंग ॥ ३ ॥

### पद ७४.

हो कां उत्तम ते उत्तम ते ॥न तुकतो गुरु-पद-सम ते ॥ध्रु०॥
तपें तपती ॥ नाना मंत्र-बिजें जप जपती ॥१ ॥ विद्या कला
नाना ॥ केलें गायन सुरस तनाना ॥२॥ निज-सुख-रंगें न रंगती ॥
ब्रह्मादिक सुरपती ॥ ३ ॥

---

१. साधुदर्शन पाहा असाही पाठ आहे.

पद ७५. (दत्तात्रय दत्तात्रय ऐसें या चा.)

सर परता गोपाळा करुनी ह्मणविसि अकर्ता ॥ तुझें तुजाचि साजे
ी तुझीच हे सत्ता ॥ ध्रु० ॥ आत्मानात्म-विवेकें विवरुनि पाहातां
ना ॥ एकमेवा ह्मणतां मान देसी श्रुति-वचना ॥ जड जिव आम्हासि
ा दुःखे भोगविसी नाना ॥ तरि हें कवणें केलें याची कैसी विवंचना ॥१॥
श राईचा त्याहीमध्यें व्यापक तूं ॥ ओतप्रोत जग-पटीं अवघा एक-
तू ॥ मनबुद्धीचा चाळक अवघा तूंचि परंतु ॥ आह्मांसी भवबं-
ा आम्हीं दिनरजनीं चिंतूं ॥२॥ कांहिंच नसतां मुळीं बद्धमोक्षाची
॥ व्यर्थचि संशयीं न पडों आह्मी नहों ते आतां ॥ नभीं निळिमा
तैसी स्वरुपिं अहं-ममता ॥ निजरंगें अनुभविलें तुज म्यां अच्यूता-
॥ ३ ॥

पद ७६. आरती सप्रेम या चालीवर.

ा जा रे भ्रांत हो भ्रांत केला हा कैसा ॥ कोश-कीटक-न्यायें दाटुनि
ली जीवदशा ॥ध्रु०॥ प्रकृतिपर परमात्मा आनंदघन मी अविनाशी ॥
खमय गुणी गुणातित अव्यय सुखराशी ॥ अचळ अमळ पर पूरित
अद्वय पदवासी ॥ त्या माझ्या विस्मरणें तुम्हीं झालां माहादोषी
। रजत शुक्तिका रज्जू सर्प स्थाणूवरि चोर ॥ विवर्त उपादानीं
मायिक व्यवहार ॥ स्वर्ग नरक चित्स्वरूपीं कैंचा लटिका संसार॥
ष्टी पीतवर्ण भासे सकळ चराचर ॥२॥ हेमीं नग तंतुवारि पट घट
मृद्भांड ॥ कारण उपादानीं तैसें पिंड ब्रह्मांड ॥ स्मरणीं अंतर
हें उद्भवे पाषांड ॥ अहं ममतेच्या संगें जड जिव पावति यमदंड
हो झालें तें झालें आतां एकचि तुम्ही करा ॥ भवसागरीं सद्गुरू
त्याचे पाय धरा॥सज्जनसंगम निगमसमागम करुनीयां विवरा॥ कोहं
दं जातं ऐसें विचारा ॥ ४ ॥ वेदविहित सत्कर्माचरणें हरि-गुरु-
स्मरणें॥ निरहंकृति निष्काम नवविध भजनें भव हरणें ॥ ब्रह्मीं ब्रह्मार्पण
जनन मरण हरणें ॥ निजानंदें निर्द्वंद्वें हा पूर्णरंग भरणें ॥ ५ ॥

पद ७७. (वारी संकट हरि दामाजीचें या चा.)

ाला क्षिरसागरवासी आला वो गिरिधारी ॥ध्रु०॥ करुणाकर रुक्मि-
दीनबंधू ॥ भयकृद्भय हारी ॥ शरणागत वत्सल मायासिंधू ॥ पर
तारी ॥ धरुनी अवतार सगुण निजांगें ॥ पावला लाग वेगें ॥ रवि-

तनया पुलिन विहारी ॥ १ ॥ एका अंबरिषासाठीं जेणें ॥ द विध र धरणें ॥ धर्मसंरक्षण समुळीं करणें ॥ म्हणउनि अवतरणें ॥ पाहातां नुभवें परतर ब्रह्म ॥ अज अव्यय निज निष्काम ॥ जो म्हणवितसे कंस ॥२॥ नानासंकटीं जो संरक्षी ॥ सहसा नुपक्षी ॥ आमुचा सर्वस्वें कें पक्षी ॥ सर्वांतर साक्षी ॥ निजरंगें रंगुनि रंगातीत ॥ होउनियां मूर्तिम गोकुळीं गाई चारी ॥ ३ ॥

## पद ७८.

त्रिगुणात्मक जन रे ल्याले अज्ञानांजने रे ॥ ध्रु० ॥ एकीं अनेक लोकित दृष्टी ॥ दृश्य मृषामय वेष्टि समेष्टी ॥१॥ दर्पणिचें धन डोळां ॥ भासत स्थिर-चर जन-पायाळा ॥२॥ रज-तम-मिश्रित रंग वि जीवनिं निरखित विश्वतरंग ॥ ३ ॥

## पद ७९.

आह्मीं नायकों या कर्णीं ॥ जगनग चित्सुवर्णीं ॥ ध्रु० ॥ स्व प्रपंच झाला होता ॥ सगळी लटकिच हे दुर्वार्ता ॥ १ ॥ सुवर्ण सुव उणें ॥ काय झालें होतां लेणें ॥ २ ॥ पूर्ण रंगीं नानारंग ॥ सुवर्णाचे भुजंग ॥ ३ ॥

## पद ८०.

तो हरि आणावो ॥ यादवराणा वो ॥ ध्रु० ॥ करुणाकर हरि वरधारी ॥ रुक्मिणिरमण मुरारी ॥ देवकिनंदन कंस-निकंदन स्वभक्त वारी ॥१॥ सज्जन-रंजन भव-भंजन रिपुगजन विजन विहारी ॥ गरुड मनमोहन चतुर्भुज चक्र-गदांबुजधारी ॥२॥ सच्चिद्धन श्रुतिसार परा अज अव्यय अविकारी ॥ निगमागम शम-दम-यम-नियमें प्राप्त कर शौरी ॥३॥ सनकसनंदन नारद मुनिजन वंदिती पदरज भाळीं ॥ मोचन राजिवलोचन मधसूदन वनमाळी ॥४॥ जग नग कनक जनक विधिचा निर्विकल्प निःसंग ॥ गोकुळपाळक त्रिभुवनचाळक सह निजरंग ॥ ५ ॥

## पद ८१.

करविरपुरवासिनि ये वो ये मातुर्जननी ॥ दीनदयाळे भक्तवत्सले वर वरदायिनी ॥ ध्रु० ॥ भव-कोल्हासुरदमनी नगनंदिनी त्रितापशम महालक्ष्मि स्थूलसूक्ष्मि व्यापुनि असती आदिभवानी ॥ १ ॥ अनन्य

र प्रतिपाळक दिनरजनिं निजभजनीं ॥ लावुनि सुखमय करिसी षड्रिपु कुळ-भंजनी ॥ २ ॥ अशनीं शयनीं गमनागमनीं जनीं विजनीं स्व- नीं ॥ सहज पूर्ण निजरंग रंगवीं ध्यानीं मनीं हृद्भुवनीं ॥ ३ ॥

## पद ८२.

करविरपुरवासिनी वेदां न बोलवे वाचा ॥ ब्रह्मादिकसुरवर नर गोंधळ घालती गाती जियेचा ॥१॥ आदिशक्ति महंमाया माझी महालक्ष्मी ॥ कोटी ब्रह्मांडें भरलीं स्थूल सूक्ष्मीं ॥२॥ कुळिचीं कुळदेवता नि- रंगली ॥ पुनरपि जन्ममरण हे दुर्वार्ता भंगली ॥३॥

## पद ८३.

राजा राम पूर्णकाम सोयरा सखा ॥ ध्रु० ॥ वर्ण-व्यक्तिशून्य ॥ चिद्घन ॥ न वर्णवे सहस्रमुखा ॥१॥ सच्चिदानंदाद्वय ॥ चिद्रुप चिन्मय ॥ जो शत-मखा ॥२॥ सहज पूर्ण रंग ॥ निजानंद निःसंग ॥ कारण ॥ ॥३॥

## पद ८४.

वट बहु करिसि किति शिकोनि ऐकुनि गोष्टी ॥ कष्टी झाला तोहि र्ता परमेष्ठी ॥ १ ॥ पार कळेना अहंकार गळेना ॥ आत्म-फळें मृतवृक्ष फळेना ॥ध्रु०॥ योग याग सकळ कळा जप तप व्रत विद्या ॥ दान धर्म कर्म कारण मोहमद्या ॥ २ ॥ निजरंगें चित्समुद्र अक्षय ॥ आदि अंत रहित स्वहित आब्रह्मस्तंभ ॥ ३ ॥

## पद ८५. ( बोलगें फोल झालें या चा. )

रि ह्मणे ब्राह्मण माझे ब्रह्मरूप मज प्रियकर जे ॥ ध्रु०॥ करावया उद्धार ॥ ब्राह्मणरूपें म्या अवतार ॥ पूर्ण धरिलासे साचार ॥ ह्मण- नाम धराभर जे ॥१॥ ब्राह्मण वेदोनारायण ॥ परब्रह्म परायण ॥ महा याग यज्ञें सुरगण ॥ आपण तृप्त निरंतर जे ॥२॥ दर्भाग्रीं हे ध- सृष्टी ॥ सूर्यस्थानीं तपें छाटी ॥ तपसामर्थ्यें महा हट्टी ॥ शापानु- क्रूरतर जे ॥३॥ सृष्टिवरि हे सृष्टी केली ॥ एकी सागर भरिला ॥ ऋषीगण वांचविले दुष्काळीं ॥ पेरुनि सात्री सत्वर जे ॥४॥ गा- त्र्या मंत्रें जाण ॥ करिता शुद्राचा ब्राह्मण ॥ तिहीं वर्णांचे गुरु आ- निर्गुण पूर्ण परात्पर जे ॥५॥ ज्यांच्या चरणतीर्थें दोष ॥ समुळीं निःशेष ॥ विजय लक्ष्मी पुण्य विशेष ॥ पावन करिती पामर जे

॥६॥ ज्यांचा पदरुह म्यां निजांगें ॥ हृदयीं साहिला निजरंगें ॥ मिरवीं कृपापांगें ॥ भजनीं होउनि तत्पर जें ॥७॥

## पद ८६.

ज्ञानी क्वचित क्वचित महाराज ॥ध्रु०॥ सर्व भूतिं सर्व कर्मी स्थिती ॥ भोगिति सुमतीभाज ॥१॥ सर्वी सर्वातीत नित्य सदोदि साधिति जे निजकाज ॥ २ ॥ निज रंगें रंगुनियां त्यागीति ॥ भय आणि लाज ॥३॥

## पद ८७.

रामीं आराम जया ॥ भवभय कैचें काय तया ॥ कर्पूर दी अंगें जाय समुळ विलया ॥ ध्रु०॥ वण सुगंध तुका तुकितां भ्रम तितुका ॥ दशशतवदनें गुणगण स्तवितां ॥ झाला शेष मुका ॥१॥ ना वन्ही तेथें हारपली दोन्हीं ॥ अहं ब्रह्म हें-ही स्फुरण निमालें अधिष्ठानीं ॥ २ ॥ पूर्ण निजानंदीं रंगुनि न पडति भवबंदीं ॥ सह दृढ निश्चळ राहुनि क्रीडती स्वच्छंदीं ॥३॥

## पद ८८.

हरिरंगें रंगले त्यांला भवभय हें नाहीं ॥ देहबुद्धीं विचरतां जड पडिले प्रवाहीं ॥ ध्रु०॥ काय एक न घडे हरिसंकल्पें कल्पांतीं ॥ जिवाचि हानी करिती चींता कां चित्तीं ॥ सद्गुरुभजन करावें स सांडुनि भवभ्रांती ॥ क्षीर नीर आत्मानात्म-विवेक निवडे हंसगती पृथ्वीहुनि सिंधूजळ दशगुण एकार्णव-समयीं ॥ कवण निवारिल कैचें स्थिरचर ते ठायीं ॥ द्वादश रवि तपती वरि भूतळ रक्षा महाप्र योजिल काय कळेना उपाय पडतां अपायीं ॥२॥ ब्रह्मादिक चिरंज तेही कल्पांतीं जाती ॥ क्षण भंगुर हा भास मिथ्या न दिसे आयं गंधर्वनगरींच्या कवणे निवडाव्या याती ॥ नसतां दिसतें मृगजळ जग नेणें मंदमती ॥३॥ मायार्णविंचें दुस्तर जळ वरि तरंगवत् सर्व ॥ ब्र हे बुद्बुद जड जिव करिती कां गर्व ॥ निमिष्यमात्रें उठती फुटती गण गंधर्व ॥ कवण पाड इतरांचा काय मानूं अपूर्व ॥४॥ भयकृद्भयन सद्भावें भजतां श्रीहरी तो ॥ दुर्जय भवभय ईक्षणमात्रें करुणाकर हा सहज पूर्ण निज रंगें मर्दित भव-वारण हरि तो ॥ दीनदयाघन पत वन मानस-मोहरि तो ॥५॥

## पद ८९. ( श्रीशिवध्यान )

ऐसा शंभू देखिला आजी नयनीं हो ॥ ध्यान हृदयीं न विसंबों अ- शयनीं हो ॥ ध्रु०॥ हर मृड सांब सदाशिव शंकर कर्पूरगौर हो ॥ झूलित मस्तकीं जटाभार हो ॥१॥ दिव्य गंगा विलसतसे विराजमा- ा ॥ शोभे सर्वांगीं गजचर्मांबरपरिधान हो ॥२ ॥ अर्ध शशांक धरि- विशाळ भाळीं हो ॥ त्या अभिधानें श्रुति वदती चंद्रमौळी हो ॥३॥ नयनींहुनि निघताती अग्निज्वाळा हो ॥ भयभीत कंठीं लवथवीत ळा हो ॥४॥ कंठीं हळाहळ रु ांगीं फिरती व्याळ हो ॥ स्मशान- करकमळीं नरकपाल हो ॥४॥ दशभुज पंचवदन सुखसदन परात्पर- हो ॥ पाहा वृषभवहन मनमोहन दयाघन अंतर हो ॥६॥ चिता- र्चुनियां भूतनाथ हो ॥ शोभे व्याघ्राजिन आसनीं उमाकांत हो त्रिशूळ डमरू विराजत आयूधें करीं हो ॥ निजभक्तांतें संरक्षित री हो ॥८॥ गणपति-षडाननादिक शिवगण घंटाघोष हो ॥ हर हर गर्जति अति संतोषें हो ॥९॥ षोडशोपचारें शिवभक्त करिती पूज- ॥ एक ध्याती चित्तीं निर्गुण नित्य निरंजन हो ॥१०॥ एक सहज निजानंद रंगें हो ॥ शिव शिव स्मरतां शिव झाले सानुरागें हो ॥११॥

## पद ९०.

मज हें योग्य नव्हे पाहतां ॥ या देहबुद्धीनें राहातां ॥ दुस्तरतर पूरप्रवाहीं बहुतर श्रम वाहतां ॥ ध्रु०॥ नरदेह परम सखा अ- अनुकूल स्वात्मसुखा ॥ विषयविलासीं गुंतुनि पात्र मीं व्हावें भव- ॥१॥ कामादिक आसुरी दुर्गुण हिंसक षड्वैरी ॥ विष पियूषवत् ने मजला मारिति मदन शरीं ॥२॥ त्यागुनि निज रंगा सेवूं कुत्सित ंगा ॥ कंटकवनिं भ्रमतां बहु होतो खेद मनोभृंगा ॥३॥

## पद ९१.

रि तुझें पतीतपावन नाम ॥ध्रु०॥ गणिका व्याध अजामिळ वाल्मिक॥ ते निजधाम ॥१॥ वर्तमानीं भूत भावीं तरती ॥ होउनि निज निष्काम पूर्ण रंग निःसंग निरामय ॥ तारक तूं निजराम ॥३ ॥

## पद ९२.

गवद्भक्त भजन करिती ॥ पावोनि दुर्लभ जनक रिती ॥ ध्रु० ॥ क- स्वधर्मकर्म ॥ कर्मिच ब्रह्म ॥ जाणुनि दुर्भव-भ्रम हरिती ॥१॥ नाम

रुपात्मक ॥ विश्वनगीं एक ॥ जनक कनक रघुवर वरिती ॥२॥ सहज
निजरंगें दिक्षाग्रहणें दीन जन उद्धरती ॥ ३॥

### पद ९३.

झालें धन्य मी आजि सये ॥ या श्रीसद्गुरुराजदयें ॥ सच्चित्सुख
ब्रह्म सनातन स्वानुभवासिच ये ॥ ध्रु० ॥ निःसशय सरली चिंता ॥
सरली ममता ॥ देशिक राजकृपेनें झाली सम साम्यं समता ॥१॥ परम
पानीं सबाह्य अतर भिज्ञानीं ॥ नित्य तृप्त होउनियां विचरें स्वसुखें
वनीं ॥२॥ सार्थकहि परंतु गुरुपद अनुदिनिं मनीं चिंतूं ॥ सहज
निज रंगें रंगला जगत्पटिं चित्तंतु ॥३॥

### पद ९४.

हर हर सांब सदाशिव स्मरावा ॥ मिथ्या मानुनियां देह परा-
नित्य नूतन भजनीं भाव धरावा ॥ आतां कृतनिश्चय हाचि करावा ॥ध्रु
सारासार हें विचारुनि मनीं ॥ शिवस्मरणीं हें चित्त नेमुनी ॥ परम
आरूढ जाहले मुनी ॥ चंचळ वृत्ति शम दमें दमुनि ॥१॥ भक्तवत्सल
सिंधु तारितो ॥ पंचवदन मदन-सदन जाळितो ॥ कामक्रोधादि अरि
रितो ॥ भोळा शंकर अनिष्ट वारितो ॥ २ ॥ संशय अविश्वास स
त्यजावा ॥ सर्व भावें महादेव भजावा ॥ नवविध भक्तिनें नित्य भजाव
पूर्ण रंगें पुजिलाचि पुजावा ॥३॥

### पद ९५.

करिसी कां चिंता करिसी कां चिंता ॥ विसरुनि हृदयीं अनंता ॥ध्रु
विश्वकुटुंबी राम ॥ असतां स्वतःसिद्ध विश्राम ॥१॥ स्थिरचर सुर संरक्ष
राम सर्वस्वें कै पक्षी ॥२॥ निजानंद रंग संगें॥ रामीं आराम होई आंगें॥

### पद ९६.

आह्मी जन्म अनंताच्या ॥ दासी झालों संतांच्या ॥ संतपदीं निज
विचरों मोक्ष श्रीमंताच्या ॥ध्रु०॥ अवाप्त कामगुणें ॥ उसंत नाहीं पूर्णप
मुक्ताफळ चिद्रत्नें मिरवु निजांगीं लेणं ॥ १ ॥ सच्चित्सुखभुवनीं ॥ उ
भरुं या जगजिवनीं ॥ दृश्य भान मळ निरसुनि निर्मळ ॥ नित्य उ
ध्यानीं ॥ २ ॥ नामितां संतपदा ॥ भय कवणाचें काय तदां ॥ अहं-र
मारुं सेना सह त्रिविध छेद-भेदा ॥ ३॥ सम साम्यें सेवा ॥ अभेद

देवा ॥ संतचरणरज वंदुं पूर्वजन्मांतर ठेवा ॥ ४॥ कामीं निष्काम ॥ विश्रामधाम ॥ सतकृपापांगें पूर्ण रंगें गितीं गाऊं गुरुनाम ॥५॥

## पद ९७.

मातीरविहारी हा क्षिरसागरवासी ॥ ब्रह्म सनातन सच्चिद्घन मन- अज अविनाशी ॥ध्रु०॥ ज्ञानहीनें अतिदीनें मुढें तामसविषयविलासी॥ त्रें जड जिव तारिती भवसागर हृषिकेशी ॥ १ ॥ भव-तमनाशक निज तेजें विश्व प्रकाशी ॥ मुनिजनमानस जलरुह विकसित कर्ता शीं ॥ २ ॥ भक्तामरतरु श्री विठ्ठल गुरुराज मंत्र उपदेशी ॥ ं चित्तंतु ह्मणे मीं पूर्ण रंग यदुवशीं ॥३॥

## पद ९८.

जें झालें तें झालें तें ॥ फळलें तप केलें तें ॥ध्रु०॥ हरिशीं सर्वस्वें लें ॥ माणुसपणांतुनि मी गेलें ॥ १ ॥ जन वन हरिमय सबाह्य देखें ॥ मृगजळवत सुखदुःखें ॥ २ ॥ काय केलें होतें कर्म ॥ समुळीं ले धर्माधर्म ॥ ३ ॥ नेणों कायं होता भोग ॥ कैसा येउनि घडला ॥४॥ रंगीं रंगोनि निजानंदें ॥ विचरें चिद्भुवनीं स्वच्छंदें ॥५॥

## पद ९९.

ी मज मानेना तो मज मानेना ॥ ध्रु०॥ चित्त सतत रत अविहित भजनीं विमुख सदाही ॥ परपीडक परदोषदर्शनीं तत्पर ब्राह्मणद्रोही ॥ निर्दयहृदय पदोपदीं संशय वचनीं निश्चय नाहीं ॥ स्वदोष लोपी संतापी पडिला विषयप्रवाहीं ॥२॥ सारासारविचार विहिन जो आत्म- की प्राणी ॥ निज रंगें रंगेना त्याचें मुख न विलोकिति कोण्ही ॥३॥

## पद १००.

तो मज बहु माने तो मज बहु माने ॥ध्रु०॥ मनबुध्यादिक करणसमुच्चय हरिभजनीं रत झाला ॥ विहिताचरणें सद्गुरुस्मरणें प्रियतम होय अजाला ॥१॥ सर्व भूतिं भगवंत विलोकुनि भूतदयार्णव अंगें ॥ सबाह्यांतर चिद्रत्ना- कर झाला विद्वत्संगें ॥ २ ॥ अंबरमणि दिनरजनी नेणों स्वप्रकाश घन- तेजें ॥ ज्ञानाज्ञानविहिन निज रंगें विचरें सहजीं सहजें ॥३॥

## पद १०१. (श्रीहरिहरस्तोत्र.)

विष्णु सदाशिव श्रीधर शंकर अच्युत त्र्यंबकराज नमो ॥ कृष्ण शशी- धर माधव पार्वतिकांत जनार्दन ईश नमो ॥ १ ॥ हे गरळाशन केशव हे

भव राम उमापति शंभु नमो ॥ हे पुरुषोत्तम हे हर वामन हे मदंतक देव नमो ॥ २ ॥ सांब त्रिविक्रम पन्नगभूषण वामन भर्ग नृसिंह नमो ॥ नारायण निलकंठ गिरीधर भालचंद्र गोविंद नमो ॥३॥ हे रूपाक्ष रमावर हे मृड वासुदेव शुळपाणि नमो ॥ श्रीहरि रुद्र उपेंद्र त्रिलोचन हे मधु-सूदन देव नमो ॥ ४ ॥ पशुपति संकर्षण गंगाधर पद्मनाभि हादेव नमो ॥ स्तोत्र हरी हर नाम निरंतर पूर्ण रंगवर नित्य नमो ॥५॥

## पद १०२.

नवविधा भक्ती करुनी हरिजन हरिभजनें तरले ॥ध्रु०॥ भगवद्भक्त श्रवणें नृपती ॥ पावन झाला परिक्षिती ॥ श्रीशुकमुखें श्रीभागवतीं ॥ बहुजन्माचे श्रम हरले ॥ १ ॥ ब्रह्मानंद संकीर्तनीं ॥ ब्रह्मस्वरूप नारदमुनी ॥ विचरे स्वच्छंदें चिद्भुवनीं ॥ मनिंचे मनोरथ पुरले ॥२॥ भगवद्भक्तशिखामणी ॥ प्रल्हाद तो नरहरिस्मरणीं ॥ उदया आला चित्सुखतरणी ॥ अघटित करणि किरण भरले ॥ ३ ॥ पद संवाहन करितां रमा ॥ पूर्ण पावलि नियां उपरमा ॥ स्तवितां परात्परतर परमा ॥ निगमा गरिमा न बोलवे ॥ ४ ॥ पृथुराज तो राजनिधी ॥ भगवत्पूजन यथा विधी ॥ करुनि गंगा जैसी उदधी ॥ तैसा तन्मय भगवंतीं ॥५॥ भगद्भाव सर्वांभूतीं ॥ सर्वहि श्री-विष्णुच्या विभुती ॥ जाणुनियां हे वंदन भक्ती ॥ पूर्ण केली अक्रुरें ॥ ६ ॥ वाचा मन काया त्रिकरणें ॥ अनन्य भावें दास्य करणें ॥ ज्याच्या दीक्षा-ग्रहणें तरणें ॥ भव-निधि स्मरणें मारुतिच्या ॥७॥ हरिजन हरितनु एकरूप ॥ तो नर नारायण चित्स्वरूप ॥ सख्य अर्जुनाचें तद्रूप ॥ दिपें दीप लावियला ॥८॥ नाहं देह न मे देहो ॥ स्वात्मनिवेदन निज निर्वाहो ॥ बळिचे द्वारीं रमानाहो ॥ निजानंदें रंगला ॥९॥

## पद १०३. ( चाल न्हाणी न्हाणी त्या. )

आमुचि चिंता भगवंत कमळाकांता ॥ असतां करणें दुःश्चित मनानंदें हो आतां ॥ ध्रु० ॥ माता जनिता सुत वनिता दुहिता भ्राता ॥ लाणें ॥ ममता वाढविती विपुल अहंता ॥ विषयीं रमतां जड भ्रांता कैंची समतीवन श्री हरि दाता दापयिता कळलें पाहातां ॥१॥ भावें भजतां अच्युतानधि-भक्तां ॥ चिंता ह्मणतां विषमता वाटे चित्ता ॥ हातां येतां स्वप्रकाशघवण चित्सविता ॥ श्रवणीं स्वप्नींही न पडे भव तमवार्ता ॥२॥ भवभयत्राताजनें

सर्वात्मक सर्वनियंता ॥ परेहुनि परता तत्वता वेद-विधाता ॥ प्रमाण नेणें प्रमेयाचा कवण प्रमाता ॥ निजानंदीं रंगली एक सत्ता॥ ३ ॥

## पद १०४.

तो नर हरितनु अवलोकी ॥ या मानवलोकीं ॥ ध्रु० ॥ चिन्मय चंद्र सुशीतळ सोज्वळ न लिंपे रजतमपंकीं ॥शुक्लकृष्ण द्वयपक्षरहित जो निर्विकार अकलंकी ॥१॥ लक्षघटीं परिपूर्ण बिंबला व्यापक एक अनेकीं ॥ नाम-रूप-गुण-वर्ण-व्यक्तिविण शुष्क न जो जळ शोकीं ॥२॥ पार अपार कळेना गुणगण पूर्ण न गणवे अंकीं ॥ निजरंगें रंगोनी स्वच्छंदें विचरे उत्तमश्लोकीं ॥३॥

## पद १०५.

ऐसा हा अगणित महिमा न बोलवे हरिभक्तांचा ॥ ध्रु० ॥ पशुमुखें ज्ञानेश्वरें ॥ वेद बोलविला निर्धारें ॥ मृत्यु पावलीं तीं पितरें ॥ श्राद्धिं आणिली द्विजाचीं ॥१॥ असद्गुण अरोपण वैरें ॥ दुर्विष देतां मातापितरें ॥ स्वीकारिलें तें गिरिधरें ॥ मिराबाई सुखरूप ॥२॥ पुराणपुरुषें अवाप्तकामें ॥ मुद्रा देउनि रघूत्तमें॥ दीप संरक्षिला नेमें॥ महा मुद्गल स्वामीचा ॥३॥ वैकुंठींचें ब्रह्म सगुण ॥ येउनि सेवा करी आपण ॥ ह्मणवी श्रीखंडचा ब्राह्मण ॥ एकनाथ निजगेहीं ॥४॥ राम रायें देतां सुशुळीं ॥ तरु अंकुरला पुष्पीं फळीं ॥ भानुदास तये काळीं ॥ निजानंदें रंगला॥५॥

## पद १०६ कामदाछंदावर.

प्रथम मस्तकीं मोरया धरूं ॥ मग समस्तही देवता वरुं ॥ विधिसुता तथा साधु सज्जना ॥ नमुनि आदरूं प्रार्थना मना ॥१॥ अजित निर्जरा पन्नगा नरा ॥ वर निशाचरा यक्ष किन्नरा ॥ हरि वदे मुखें इंद्रियांत मी ॥ तव पराक्रमा कोण आक्रमी ॥२॥ सदय पाहासी प्राणियांकडे ॥ मग तयां पडे कोण सांकडें ॥ न घडतें घडे काळ आतुडे॥ अमृतसागरीं सर्वदां क्रिडे ॥३॥ भवतरू कलीमाजि उन्मळी ॥ तुजविना बळी कोण भूतळीं ॥ तरि मतें करी साह्यता बरी ॥ परम मित्र तूं ये अवसरीं ॥४॥ विविध अंबरीं अंडजें खगें ॥ जळचरें जळीं काननीं मृगें ॥ उरग कीटकी गर्भयातना ॥ मरण जन्म हीं सोसवेति ना ॥५॥ परिसतांचि ते ग्लानि राघवें ॥ मन विबोधुनी पूर्ण लाघवें ॥ करि दया लिलारूपविग्रही ॥ उपनिषेदिंचें सार संग्रहीं ॥६॥ निकट संकटीं द्रौपदी

गजा ॥ उपजली कृपा त्या अधोक्षजा ॥ मज दया करी यापरि हरी ॥ त्वरित रक्षिलें दुःखसागरीं ॥७॥ हरि गुरू दयासागराप्रती ॥ वरद इच्छिला हाचि निश्चितीं ॥ तव पदांबुजीं पूर्ण दे रती ॥ विसर तो पडे देहसंस्मृती ॥८॥ विगत शोक हो मोह मावळो ॥ कृपण कल्पना इषणा टळो ॥ पदपदर्थिंचा स्नेहही जळो ॥ सच्चिदान्वयी देहही गळो ॥९॥ भजन भाग्यही अंतरीं वसो ॥ स्व पर सारखे सर्वदा दिसो ॥ निशि दिवा चिदानंदसागरीं ॥ अणुपरी दुजी न स्मरों परी ॥१०॥ सहज सत्क्रिया मीपणें विना ॥ फळरहीत निर्हेतु भावना ॥ सुकृत पातकें पूर्वसंचितें ॥ विफळती जशीं स्वप्निंचीं कृतें ॥११॥ लव निमिष्यही देहभावना ॥ नुपजवी कदां अल्पही मना ॥ इहपरत्रिंची भाग्य संपदा ॥ मृगजळा परी मानवी सदा ॥१२॥ रिपुसमूह तैं काय तो करी ॥ विसरतां पडे अष्टही पुरीं ॥ विदुष बोलती लिंगभंग तो ॥ निज अभंग तो रंग रंगतो ॥१३॥

## पद १०७.

श्रीगुरुराजदयेनें अद्भुत केलें वो ॥ ध्रु० ॥ दोहीं नेत्रीं एकचि आपण ऐसें झालें वो ॥१॥ देखते ऐकते एकचि होउनि प्रत्यया आले वो ॥२॥ भवभ्रम भंगे निजसुख रंगे बोलणें ठेलें वो ॥३॥

## पद १०८.

करुणा आली रे आली रे ॥ दयाळ गुरु माउलि रे ॥ ध्रु० ॥ नमितां सद्गुरुचरणा ॥ भवभयहरणा जगदुद्धरणा ॥ १ ॥ श्रवणीं प्रबोधुनी महा वाक्य ॥ स्वरुपीं जीव शिव केलें ऐक्य ॥२॥ निजानंदें पूर्ण रंग ॥ रंगीं रंगविला अभंग ॥३॥

## पद १०९.

लाहो घ्या हरिभजनाचा ॥ संग करुनियां सुजनाचा ॥ ध्रु० ॥ दुर्लभतर मानवि काया ॥ कां लावावि विषय विकाया ॥१॥ बुद्ध्यादिक सर्वहि करणें ॥ हरिभक्तिपरायण करणें ॥२॥ मन उन्मन करुनी स्मरणीं ॥ हरीकीर्तन ऐका श्रवणीं ॥३॥ दवडुनियां आळस निद्रा ॥ लागोंद्या चिन्मयमुद्रा ॥ ४ ॥ निजानंदें रंगुनि पूर्ण ॥ करा हरिनारायण स्मरण ॥५॥

## पद ११०.

एकनिष्ठ सद्भाविक विश्वासु तो गडी आमुचा ॥ याच्या दासी आह्मी होऊं काया मनें वाचा ॥ ध्रु० ॥ अभाविक निंदक जो त्याचें मुखहि न

अवलोकूं ॥ सज्जनचरणीं न लवे सहसा त्याची गडी फूंकूं ॥१॥ हरि-गुरुभजनीं विमुख जो त्याच्या देशीं न राहूं ॥ दोषी दुर्जन त्याचें स्वप्नीं मुखहि न पाहूं ॥२॥ सर्वस्वेंसी शरणागत जो साधूसंतांसीं ॥ निज रंगें रंगुनियां त्याच्या घरिंच्या होउं दासी ॥३॥

## पद १११.

मन हें कारण बंधन मोक्षाचें ॥ पाहातां दोहीं पक्षाचें ॥ ध्रु०॥ स्वरुपोन्मुख मन उन्मन होतां पूर्णानंदीं लक्षाचें ॥ विषयविलासीं गुंतुनि पडतां केवळ बीज भववृक्षाचें ॥१॥ याचिलागीं करणें सह मन शम दम युक्त मुमुक्षाचें ॥ स्वात्म-सुखामृत सेवुनि तृप्त केवळ साधु सुदक्षाचे ॥२॥ स्वर्ग नर्क या द्विविध कल्पना करणें हें मन यक्षाचें ॥ निज रंगें रंगतां होतें स्वरुप पूर्ण अलक्षाचें ॥ ३ ॥

## पद ११२.

साधु समागम दे मज देवा ॥ सद्भावें त्यांची करिन मी सेवा ॥ध्रु०॥ भाविक हरि प्रिय हरिरुप केवळ ॥ नको गा निंदक वादक ते खळ ॥१॥ दधि मधु पय घृत टाकुनियां मिन ॥ निशिदिन सेवित जीवनीं जीवन ॥२॥ तक्षक वृश्चिक ते निज रंग ॥ दुरुनिच नामिले न करुनियां संग ॥ ३ ॥

## पद ११३.

श्रीहरिचरण-सरोजीं भ्रमरा राहें निश्चळ रे ॥ विषयपंचक कंटकवन हें सांडुनि कुश्चळ रे ॥ ध्रु० ॥ सनक सनंदन नारद मुनिजन हरिप्रिय आळिकुळ रे ॥ नित्य निरामय परमामृत-रस सेविति परिमळ रे ॥ १ ॥ नित्य नूतन ब्रह्मसनातन चरणकमळदळ रे ॥ भक्तकामकल्पद्रुम त्याचें विमळ युगुळ मूळ रे ॥ २ ॥ निज रंगें रंगले सुरंग कोमल पदतळ रे ॥ परात्परतर निगम अगोचर निर्मळ सोज्वळ रे ॥ ३ ॥

## पद ११४.

आणुनि दावा वो शेषशायी ॥ ध्रु० ॥ विरहें सद्बुद्धि बाळा आठवुनि गोकुळपाळा ॥ बोले सखियासीं ते वेल्हाळा साजणी बाई ॥ १ ॥ भक्ति विरक्ति शांति ॥ क्षमा दया उपरति ॥ दावा वो दावा वो मज निजमूर्ति साजणी बाई ॥२॥ न रुचे हा उपभोग ॥ विषवत विषयत्याग ॥ अंतरीं भरला पूर्ण विराग साजणी बाई ॥ ३ ॥ परे उपरी निज मंदिरीं ॥ सुमनाचे अरुवारीं ॥ अनुभविन मीं अंतरीं श्रीहरी साजणी बाई ॥ ४ ॥

सहजें मी पूर्णानंदें ॥ निज रंगें निर्द्वंद्वें ॥ विचरें चिद्भुवनीं स्वच्छंदें साजणी बाई ॥ ९ ॥

### पद ११५.

भक्त देवासी भजतां भावें झाले देवचि सहज स्वभावें ॥ घटभंगें रविबिंब अनुस्युत नलगे त्या यावें जावें ॥ ध्रु० ॥ उदयास्तु दिन-रजनीं स्वप्नीं वार्ताही नेणिजे देवें ॥ चिद्रविकिरणावरि जगजळ कांहींच नाहीं ठावें ठावें ॥१॥ जनन मरण बद्ध मोक्ष अविद्या माया जिव शिव नांवें ॥ स्वस्वरूपीं जग भगण-समुच्चय नाहिंच केला सदेवें सदेवें ॥ २ ॥ दीपासि लावितां दीप तोहि तद्रुप प्रमेय वेदांतीं जाणावें ॥ निज रंगें जें रंगुनि हरिमय मानव यां न ह्मणावें न ह्मणावें ॥ ३ ॥

### पद ११६. ( चाल—आतां राम पायीं )

सये पुंडरीक-वरद हा रुक्मिणीरमण हरि समपदीं कां उभा गे ॥ समनयन समकटीं ठेवुनि करतटीं राहिला कां तुझ्या चंद्रभागे ॥ ध्रु० ॥ चंद्रभागा म्हणे सिद्ध प्रश्नें तुझे प्रश्न मीं सांगतें ऐक बाई ॥ प्रवृत्ती निवृत्ति उभय पक्ष हे जन म्हणे अनुभवें समपदीं विषम कायी ॥ अद्वितिय ब्रह्म हें वर्म सुजनाप्रती सुचविलें या मिषें जाण पायीं ॥ स्थिरचरीं हरि एक समनयनीं देखणें आपणासि आपणें सर्व ठायीं ॥ १ ॥ ठेविलें समतटीं कर सतत म्हणसि कां तरि परिस तूं अभिप्राय याचा ॥ निरतीशय निश्चयें ब्रह्मफळ मी स्वयें देतसें दान मज मी त्रिवाचा ॥ उभय कर लाउनि आत्मफळ देउनि भ्रम हरिन मी ह्मणें या भवाचा ॥ दानपात्रें भक्त अविमुक्त सहज ते सेवितां स्वाद मम वैभवाचा ॥२॥ तव तिरीं श्रीहरी कां उभा म्हणासि तरि भाव धरी श्रवण करी बुद्धी माये ॥ ज्ञानहीनें दिनें भजनविहिनें हरीदर्शनें त्रिविध भवताप जाय ॥ ह्मणउनि अचळ भूवैकुंठ पंढरी वैखरी वर्णितां गम्य काय ॥ पूर्ण निज रंग हा पांडुरंग स्वयें अंडकोटिंतहि जो न माये ॥ ३ ॥ कसी बोधली बुद्धि स्वानंद-बोधें ॥ वेधली पुंडरीकवरद-वेधें ॥ ध्रु० ॥

### पद ११७.

श्रीहरीसम ऐसी माउली कैंची ॥ महिमा लव नेणें स्तवितांही विरंची ॥ ध्रु० ॥ जळबिंदुचें करुनियां निर्माण संरक्षी गर्भीं सर्वस्वें आपण ॥ प्रसुतीची व्यथा हरुनियां दारुण ॥ जन्मवी मार्ग देउनियां नारायण ॥१॥

अस्थि मांस रक्त मळ मूत्र त्यांतून ॥ दुग्ध हें कवणें केलें वो उत्पन्न ॥ वाढविलें बाळा देउनि स्तनपान ॥ क्षिरसागरवासी पाळितो विश्वजिवन ॥२॥ अन्नोदक वसनें देउनियां नित्य ॥ प्रतिपाळित सकळां माता ते हें सत्य ॥ सद्गुरु निज स्वरुपें वारुनि अनित्य ॥ सहज पूर्ण रंगें हरिले जन्म मृत्य ॥३॥

## पद ११८.

हरिस न भजतां कां उपजों उपजों ॥ मरतो ॥ पामर तो ॥ ध्रु० ॥ किती सांगावें सविस्तर ॥ प्राणी जड मुढ केवळ प्रस्तर ॥ मोठा क्रूर भवार्णव दुस्तर ॥ कैसा भजनेंविण तरतो ॥१॥ कैं तो मानिल विषवत् विषय ॥ कैं त्या होईल मनोजय ॥ कैं त्या वासनेचा क्षय ॥ होउनि दुस्तर निस्तरतो ॥२॥ श्रीहरिभजनपरायण होतां ॥ तरि तो निज रंगें रंगतां ॥ सहजें दुःसंग भंगतां ॥ मागें मागें कां सरतो ॥३॥

## पद ११९.

हरिहरि हरि भवकरिस नामस्मरणमात्रें॥विभांडुनि कुंभस्थळें विदारिलीं गात्रें ॥ ध्रु० ॥ कैंचा भवनाग मिथ्या मृगजळवत् नामीं ॥ मुनिमन विश्रामधामीं पूर्ण अवाप्त कामीं ॥१॥ हरिसम हरिभक्त नित्यमुक्त हरीस्मरणें ॥ मिथ्या बंध मोक्ष मिथ्या जन्म आणि मरणें ॥२॥ नामीं अनाम ब्रह्मप्राप्ती भक्ति-भावें ॥ सर्व रंगीं निजानंद सहज स्वभावें ॥३॥

## पद १२०.

तेचि महा पुरुष हर्षयुक्त निजानंदें ॥ आत्मलोभें नित्य तृप्त क्रिडती स्वच्छंदें ॥ ध्रु० ॥ देहादिक भुवनत्रय विषय वमनप्राय ॥ सद्गुरुभजन भाग्यें भाग्यवंत सांगों काय ॥१॥ निरभिमान निर्विकल्प निष्कळंक पाही ॥ देही देहातीत सदोदीत सर्वदांही ॥२॥ सहज पूर्ण रंग निःसंग निर्वि-कारी ॥ दृश्य दृष्टी ना कळती नव्हती वेषधारी ॥३॥

## पद १२१.

वर्म कळेना देहबुद्धि वळेना ॥ सत्संग मिळेना संकल्प जळेना ॥ ध्रु० ॥ शुद्ध बुद्ध नित्य मुक्त पूर्ण परब्रह्म ॥ बंध मोक्ष कैंचा तेथें कैंचें क्रियाकर्म ॥ १ ॥ संशय अविश्वास मिथ्या भेदाभेद दावी ॥ अंतःकरण का-ल्पनीक वेधता हे लावी ॥२॥ उदयास्तुवीण सूर्य स्वयंप्रकाश ॥ सहज पूर्ण रंगला हा अव्यय अविनाश ॥३॥

पद १२२. ( चाल—भज भज भवजलाधि. )

हरि हरि हरि भजन करीं भाव धरीं भजनीं ॥ शम दमादि साधन-पर होउनि दिनरजनीं ॥ ध्रु० ॥ छेदभेदरहित वेदविहित चित्तशुद्धी ॥ निरभिमान निर्हेतुक ब्रह्मार्पण बुद्धि ॥१॥ सत्समागम निगमागम सुगम सेवीं ॥ निर्विषयी करुनि नित्य गुरुपदिं मन ठेवीं ॥२॥ चित्समुद्र नित्य निर्विकार निस्तरंग ॥ नाम रुपातीत नाम सहज पूर्ण रंग ॥३॥

पद १२३.

माझी बलाय न करी ऐसे वो ॥ करिते हे जन तैसें वो ॥ हरिविग नाना साधन संपत्ति गिरीवर उकरित जैसे वो ॥ ध्रु० ॥ योगयाग जप तीर्थाटण कामिक मंत्रें यंत्रे वो ॥ हरिविण सकळें विफळें हो कां पावन परम पवित्रें वो ॥ १ ॥ हरिस्मरणामृत कुंभ वोलांडुनि विषय विषोदक स्विकारूं वो ॥ इहपरभोगीं ठेवुनियां मन जन्मुनि सार्थक न करुं वो ॥ २ ॥ भगवत्स्मरणीं पूर्ण रंग निःसंग अभंग उपेक्षूं वो ॥ क्षणभंगुर जड दग्ध विकारी विषय अमंगळ भक्षूं वो ॥ ३ ॥

पद १२४.

तूं हरि नारायण स्मर जा ॥ ध्रु० ॥ पावुनि दुर्लभ नरतनु हे ॥ नेणासि कां अरजा ॥१॥ हरिस्मरण संसरणहरण हें ॥ न घडे तरी मर जा ॥ २ ॥ सहज पूर्ण निज रंगें रंगुनी ॥ होसी परात्पर जा ॥ ३ ॥

पद १२५.

नारायण तूं गा होसी ब्रह्मपरायण गा ॥ ध्रु० ॥ पतित अजामिळ पावन झाला ॥ ठावुक सर्व जगा ॥ १ ॥ भक्तिपुरस्कर स्मरतां प्राप्त ॥ काय नव्हे तुज गा ॥२॥ कीटकि भृकुटि-भयें तद्रुप झाली ॥ तूं भावें भज गा ॥३॥ निजरंगीं हा प्रत्यय झाला ॥ कांहिंसा मज गा ॥ ४ ॥

पद १२६.

व्याप्य व्यापक सर्वां भूतीं ॥ स्थिरचर श्रीहरिच्या विभूती ॥ ध्रु० ॥ जग नग कनक जनक हरि चिन्मय ॥ जाणुनि स्वरुपीं मुनी मन तन्मय ॥१॥ ऊर्णनाभी उगळित तंतू ॥ अद्वितिय दिसतांहि परंतु ॥ २ ॥ नाना रंग तरंग विकारी ॥ निजानंद जळ-निधि अविकारी ॥ ३ ॥

पद १२७.

बाई माझें दैवत श्रीगुरुराय ॥ ध्रु० ॥ चारी मुक्ती दासी होती ॥ न-

मितां श्रीगुरुचे पाय ॥ १ ॥ ब्रह्मादिक जे ध्यानीं ध्याती मानुनि हाचि उपाय ॥२॥ पूर्ण रंग गुरुराजविना अन नाहीं तरणोपाय ॥३॥

## पद १२८.

ऐसा दृढ निश्चय हा केला ॥ध्रु०॥ रज्जु सर्प मुळिं नाहिंच त्याला ॥ मारुनि कोण आला ॥ १ ॥ बद्ध नाहीं तेथें मोक्ष तो कायी ॥ संसृति आंचवला ॥२॥ सहज पूर्ण निज रंगें ज्ञानीं ॥ निःसंशय झाला ॥३॥

## पद १२९.

आम्ही हरिदासांच्या दासी ॥ झालों अखंड वैकुंठवासी ॥ ध्रु० ॥ देहीं असतांचि वैकुंठ पाहीं ॥ येणें जाणें नलगे कांहीं ॥१॥ पाय क्षाळुनि पद-तोय घेऊं ॥ शेष उच्छिष्ट त्यांचें सेवुं ॥ २ ॥ पदोपदीं श्वासोच्छवासीं ॥ गाऊं गीतीं ग्रासे ग्रासीं ॥३॥ एक सत्ता त्रिभुवनीं ज्याची ॥ कीर्ती वर्णुं त्रैलोक्यीं त्याची ॥ ४ ॥ हेंचि काम आतां करूं ॥ संतपाउलें हृदयीं धरुं ॥५॥ कामाभेणें उसंत नाहीं ॥ मागों देवासि हे सर्वदांही ॥६॥ दास्य दासाचें देव करी ॥ निजानंदें रंग भरी ॥७॥

## पद १३०.

तुजहुनि तुझ्या नामाचा प्रताप ॥ पाहातां अमूप कोटी गुणें ॥ ध्रु० ॥ अयोध्या एकली वैकुंठा त्वां नेली ॥ नामें उद्धरिलीं त्रिभुवनें ॥ १ ॥ वाल्मिकादी महापापाचिया राशी ॥ केले देव ऋषी नामें तुझ्या ॥२॥ नामें निजानंदीं रंगउनि पूर्ण ॥ जन नगीं सुवर्ण होउनि ठेले ॥३॥

## पद १३१.

चावट वट वट कां करिते ॥ ध्रु० ॥ ब्रह्मादिकां जो ध्येय त्या आकळिन म्हणे हरितें ॥१॥ वेदश्रुती नेती म्हणती तेथें गर्व कां धरिते॥२॥ मशक मेरु गिळी ऐसा कैंचा बळी ॥ गिळवेना करितें ॥ ३ ॥ इंद्रवारुणी फळ कटुतर सोज्वळ ॥ भासे वरी वरी तें ॥४॥ क्षुद्र आनंदीं पडोनियां छंदीं ॥ नाना रंग भरिते ॥ ५ ॥

## पद १३२.

देवाची वेडी स्मरण हरीचें सोडी ॥ ध्रु० ॥ विरक्तिवसन फेडुनियां ॥ विषयीं नाचे होउनि उघडी ॥ १ ॥ नित्यानित्य विचार न जाणत ॥ नीरतीशय घट फोडी ॥ २ ॥पूर्ण रंग उपेक्षुनि विचरे॥ कामीं मानुनि गोडी ॥ ३ ॥

## पद १३३.

कां हे भुलली वेडदुली ॥ ध्रु० ॥ लटिकेंचि मीपण धरुनी आंगीं ॥ उगलिच कां फुगली ॥ १ ॥ शाश्वत सुखमय चिन्मय त्यागुनी ॥ निज स्वहिता मुकली ॥२॥ निज रंगें रंगुनि राहावें तें ॥ वर्म कां चुकली ॥३॥

## पद १३४.

तो विरळा या लोकीं मी अवलोकिन ह्मणतां नयनीं ॥ अनंत जन्माच्या पुण्यें भेटे ऐसा ज्ञानी ॥ ध्रु० ॥ परमहंस सु-विवेकी क्षिर निर सारासार-विभागी ॥ स्वात्मसुखामृत चिद्रस सेवुनि सच्चित्सुखमय योगी ॥ नामरुपात्मक दृश्य भाग जग स्थिर चर असार त्यागी ॥ सोज्वळ मानस-सरोवरीं या मुक्ताफळ जो भोगी ॥ १ ॥ शरणागत-प्रति-पाळक भूतदयार्णव निरभिमानी ॥ सबाह्य अंतर नवनीत मृदुतर भेदाभेद न मानी ॥ दग्ध विटप पक्षीकुळ त्यजिती तैसा गुण विष मानी ॥ त्यजिला जो या चिद्गगनीं मग खेळे अचळ विमानीं ॥ २ ॥ स्वरुपसुखाचा दिनकर लीलाविग्रह जगदुद्धारी ॥ उदयास्ताविण स्वप्रकाश घनतेजें भव-तिमिरारी ॥ दर्शन-मात्रें जड जिव तारी भक्तकाजकैवारी ॥ सहज पूर्ण निज रंग सनातन सज्जन-विजन-विहारी ॥ ३ ॥

## पद १३५.

दीनानाथा श्रीरंगा ये रे ये रे ॥ द्वैताद्वैत निरसुनि भेटी दे रे ॥ध्रु०॥ शेषशायी इंदिरावरा रामा ॥ पूर्णकामा अच्युता मेघशामा ॥१॥ भक्त-काज-कैवारी कृष्ण मुरारी ॥ चतुर्भुज चक्रांबुज-गदा-धारी ॥ २ ॥ अनंत ब्रह्मांडनायका पुरुषोत्तमा ॥ त्रिविधच्छेदभेदराहित त्रिविक्रमा ॥३॥ विश्वजनका श्रीहरी हृषीकेशा ॥ सच्चित् स्वरुपा चिद्घना अविनाशा ॥४॥ निजानंदकंदा सहज पूर्णरंगा ॥ गुणी गुणातिता निर्गुणा निःसंगा ॥५॥

## पद १३६. ( भक्तासि भगवद्भजनें )

दुःखरूप-संसृति अबला सुख-रुप ते साधु पाहाती ॥ वेधली दिठी कवळें त्या पीतवर्ण सर्वही होती ॥ प्रांजळ हे दृष्टि तयातें शुभ्र तें शुभ्रचि अंगीं ॥ ज्वरिता क्षिर विषवत् इतरां पुष्टता शरिरीं प्राप्ति ॥ ध्रु० ॥ वर्णाश्रमाश्रित कर्मे निपजती ते ते पाळी ॥ विधिनिषेध शोधुनि शुभ तें आचरुनियां इतरां गाळी ॥ कर्मींच ब्रह्मप्रतीति कर्तृत्वबीज तें जाळी ॥ यास्तव ते सुखरुप योगी वर्ततां विषयसमेळीं ॥ १ ॥ अहं-ममता-भ्रांति-

वशें जे विषयांध होउनि रमती ॥ सुत वैभव कांचन कांता सारांश मानुनि भ्रमती ॥ क्षिरनिरवत् नित्य अनित्या स्वप्नींही नेणति कुमती ॥ यास्तव ते दुःखी प्राणी कर्मानुसारें भ्रमती ॥ २ ॥ जाणती जग नश्व हेमीं हेमींच प्रतिति जयांतें ॥ नामरूप त्यजुनी दोन्ही उरलें त्या स्वस्वरूपातें ॥ हानि लाभ सहसा नाहीं सुख दुःख कैंचें तेथें ॥ यास्तव ते सुखरुप योगी चालतां अनुभव-पंथें ॥३॥ नसतेंचि मृगजळ दिसतें तैसें हें दृश्य विलासे ॥ मानिती साच यया तें नर मृग हो ते पहा कैसे ॥ असतांचि न दिसे राहू सविता हें तेविं न भासे ॥ यास्तव हे जडजीव प्राणी दुःखरूप ते अनायासें ॥ ४ ॥ स्वरुपावबोधें ज्ञानी मातले पूर्ण आनंदें ॥ डुल्लती अनुदिन दुसरें नावडे निज-सुख-छंदें ॥ रंगले सहज निज रंगें विचरती पूर्ण अभेदें ॥ ते तेंचि झाले ज्यातें ह्मणितलें नेती वेदें ॥ ५ ॥

## पद १३७.

कांरे सावधपणें वर्तणूक नाहीं केली ॥ ध्रु० ॥ नवविध भजनें विहिताचरणें ॥ कराल म्हणउनि नारायणें ॥ मानवि तनु हे दिधली तेणें ॥ रमारमणें गोपाळें ॥ १ ॥ सारासार विचार वर्म ॥ स्थूळ सूक्ष्म धर्माधर्म ॥ शुभाशुभ कर्माकर्म ॥ मनुष्य-देहीं जाणावें ॥२॥ साधु-संगें शास्त्र-श्रवणें ॥ शुद्ध सत्व अंतःकरणें ॥ हरिगुरुभजनीं लावुनि करणें ॥ हरिस्मरणें सर्वदां ॥ ३ ॥ सर्वहि सांडुनि हा विचार ॥ डोळे झांकुनि अंधःकार ॥ केला मानला संसार ॥ गोड पियूषाहुनि परम ॥ ४ ॥ असत्कर्मी परमादरें ॥ आसक्त होउनियां अविचारें ॥ केलीं दुश्चरणें व्याभिचारें ॥ कोण सूख पावले ॥ ५ ॥ हरिहरब्रह्मादिकांप्रती ॥ केलीं कर्में तीं न सुटती ॥ तुह्मां जड जीवां कल्पांतीं ॥ कर्म भोगणें घडे ॥ ६ ॥ आतां तरी सानुरागें ॥ अनन्य भावें विद्वत्संगें ॥ पूर्ण निजानंद रंगें ॥ सर्व रंगीं रंगावें ॥७॥

## पद १३८.

पावला सद्गुरुराज ॥ पंचाक्षरी तेजःपुंज ॥ झडपिलें होतें मज ॥ पंचभूतीं ॥ ध्रु० ॥ अवलोकितां कृपादृष्टी ॥ आनंदें भरली सृष्टी ॥ तत्त्वमसी कानीं गोष्टी ॥ सांगितली ॥ १ ॥ श्रवणीं पडतां वाक्य ॥ स्वरुपीं जाहलों ऐक्य ॥ पाहों जातां त्रैलोक्य ॥ मीच मी स्वयें ॥ २ ॥ निरसतां देहद्वय ॥ कोण ह्मणे अद्वय ॥ कैंचीं भुतें कैंचें काय ॥ कवणें ठाईं ॥ ३ ॥

सहज पूर्ण निजरंग ॥ रंगला हा अभंग ॥ सर्व रंगीं निःसंग ॥ होउनि ठेला ॥ ४ ॥

### पद १३९.

जैसें बोले तैसें चाले ॥ आह्मीं वंदुं त्याचीं पाउलें ॥ ध्रु० ॥ जैसा उपदेश इतरां सांगे ॥ तैसा अंतरिं अनुभव जागे ॥ १ ॥ जैसा वरि वरि निर्मळ भासे ॥ तैसा अंतरीं रज तम नाशे ॥२॥ जैसें बाहेरी भगवें दावी ॥ तैसें अंतर निजरंगें रावी ॥ ३ ॥

### पद १४०.

स्मरतां नित्य हरी ॥ मग ती माया काय करी ॥ ध्रु० ॥ नामरुपात्मक सकळहि नाशक ॥ निश्चय हा विवरी ॥१॥ शांति दया पर श्रवणीं सादर ॥ भ्रांति भ्रमा न वरी ॥२॥ सहज पूर्ण निजरंगें रंगुनी ॥ सद्गुरुपाय धरी ॥ ३ ॥

### पद १४१.

आह्मी सद्गुरुकृपें सुखरुप ॥ ध्रु० ॥ स्वात्मसुखामृतसिंधु निजांगें ॥ झालों अव्यय अमूप ॥ १ ॥ दृश्य भाग जग नामरुपात्मक ॥ कांसविचें जैसें तूप ॥२॥ निजानंदें रंगुनि ठेलों ॥ चिन्मय-पदिंचे भूप ॥ ३ ॥

### पद १४२.

ऐसें यमधर्मापाशीं यमदूत निवेदन करिती ॥ ह्मणती परिसा प्रभुवर्या नामें जड जिव उद्धरती ॥ नवविध भजन करित हरिचे हरिजन भूमंडळीं फिरती ॥ स्मरणें श्रवणें महा पापें पर्वत हो कां संहरती ॥ ध्रु० ॥ आमुचा प्रवेश ते ठायीं होतां महा संकट पडतें ॥ नरहरिस्मरण श्रवण घडतां मन हें हरिस्वरुपीं जडतें ॥ तेव्हां तुमचे सेवेचें कार्य समुळीं ते समयीं बुडतें ॥ १ ॥ ठायीं ठायीं हरिभक्त नवविध भक्तीच्या भजनीं ॥ मृदंग टाळाच्या छंदें गाती नाचती कीर्तनीं ॥ दिंड्या पताका पाहातां आनंद कोंदे त्रिभुवनीं ॥ सुरवर येती पाहावया तेथें बैसुनि विमानीं ॥ २ ॥ हरिनामाची विवंचना ऐसी करितां यमदूत ॥ किटकी–भृकुटिच्या न्यायें हरिरूप होउनिया त्वरीत ॥ बैसोनि गेले विमानीं चोज मानुनि अद्भुत ॥ निजानंदें रंगुनियां सुरगण शरण तयां जात ॥ ३ ॥ ह्मणती परिसा हरिजन हो आह्मासि टाकुनि तुह्मी जातां ॥ आमुचि गती केव्हां सांगा येरू ह्मणती हरि भजतां ॥ ध्रु० ॥

९७

## पद १४३.

लागुनि शिवभजनीं शिवभजनीं ॥ नासिन मी शिव दिनरजनीं ॥ ध्रु० ॥ हा दुर्विषय वमनवत भावुं ॥ ध्वज हा शिवभजनाचा लावुं ॥१॥ सांब सदाशिव भजन समेळीं ॥ आसुरी संपत्ती बुडाविन समुळीं॥ २॥ स्थावर जंगम शिवमय पाहूं ॥ निजानंदें रंगुनि राहूं ॥३॥

## पद १४४.

जगन्माता तुझी कांता ॥ रामा जनकनंदिनी सीता पतिव्रता ॥ ध्रु० ॥ आदि महमाया चिच्छक्ती ॥ जीच्या चरणीं रुळती चाऱ्हि मुक्ती ॥ दश-कंठधरें ते नेली ॥ हे तो मायिक बोली ॥ हरिहरां वंद्य निंद्य कैसी ते चित्सत्ता ॥१॥ जिच्या कोपाची भृकुटी ॥ रणा आणी सकळही सृष्टी ॥ अगम्य स्थान मान न कळेचि महिमान ॥ इत्यंभूत रूप जिचें नकळे त-त्वता ॥२॥ रावणाची काय तेथें मात ॥ दशवदनें वीस हात ॥ खंड विखंड गात्रें ॥ करिती इच्छामात्रें ॥ परि हें अवतारचरित्र दर्शविलें पाहातां ॥३॥ अनंत ब्रह्मांडें घडी मोडी ॥ जेथें अवताराच्या होती जाती कोडी ॥ ब्रह्म तेचि माया ऐके रामराया ॥ माया तेंचि ब्रह्म रज्जु सर्प भासे भ्रांता ॥४॥ जगदंबा हे निजरंगें ॥ पुण्यपापातीत नि-जांगें ॥ ऐसीं भरताचीं वचनें ॥ रामें राजिवनयनें ॥ ऐकोनी म्हणे बापा परिसं हे दुर्वार्ता ॥५॥ मिही जाणें याप्रमाणें ॥ परि हे त्रिगुणात्मक जन याचि गुणें ॥ ध्रु० ॥

## पद १४५.

मानसपूजन याचि रिती धन्य सच्छिष्य करिती ॥ सद्गुरु श्रीरंग निज-मूर्ति ज्याची अगाध कीर्ति ॥ ध्रु० ॥ प्रथम श्री सद्गुरुचें ध्यान आवाहन अधिष्ठान ॥ चित्त चतुष्टय आसन अर्घ्य पाद्य जाण ॥१॥ दिव्य सुगंध स्नेहें मज्जन सत्वजीवनें स्नान ॥ दिव्य वस्त्रें करुनी परिधान दिव्य भूषणें पूर्ण ॥२॥ भव्य दिव्य सुगंध चंदन दिव्य अक्षता सुमन ॥ अहं सोहं धूप जाळोनि ब्रह्मीं ब्रह्मार्पण ॥ ३ ॥ एकारती दिव्य तेजें उजळुनि दिव्य सुरस पक्वान्न ॥ नैवेद्य परिपूर्ण अर्पूनि स्वात्मनिवेदन ॥४॥ पावतां शेष प्रसाद सच्छिष्य भेदीं अभेद दास्य ॥ तांबूल सुरंग सविशेष तोचि स्वयंप्रकाश ॥५॥ दिव्य छत्रें चामरें दर्पण शिखिपत्र व्यजन ॥ प्रदक्षणा साष्टांगें

नमन-पुजन संपूर्ण ॥ ६ ॥ ऐसें हें मानस पूजन करितां संतसज्जन ॥ पूर्ण निजानंदें रंगोनि ब्रह्मसंपन्न ॥ ७ ॥

### पद १४६.

बोलें वेगीं दीनदयाळा भक्तवत्सला दोहीं गोष्टींत एक ॥ अंतरसाक्षि तूं परिक्षक संरक्षक तूंचि व्याप्य व्यापक ॥ ध्रु० ॥ सूर्यवंशीं राजाराम तूं पूर्ण काम तूं दानशूर धर्ममूर्ति ॥ अनंत ब्रह्मांड नायक सुखदायक ऐशी ऐकुनि कीर्ति ॥ बहुरूपी आलों मी धावोनि सोंगें घेउनि कृमि कीटकादि जाति ॥ चौऱ्याऐशीं लक्ष योनीं भ्रमलों बहु श्रमलों आतां झाली हे स्फूर्ति ॥ १ ॥ सोंग हें पाहुनि विशेष तुज संतोष झाला असेल मनीं ॥ तरी तूं लक्ष मुद्रा देऊनि स्वपदीं ठेवुनी लावीं नवविध भजनीं ॥ चित्ता आलें नसतां जरी कांहीं तरी तूं वद हेंही स्पष्ट आजिपासुनि ॥ सोंग आणूं नको सर्वथा बोलें रघुनाथा स्वस्थ राहिन स्व-स्थानीं ॥२॥ शेवटिंचें सोंग हें नरकाया चुकवीं नरका या तुझ्या भजनेंकरुनी ॥ तूं होउनि रघुविर प्रसन्न देशी निज धन ह्मणुनि आलों मीं धरुनीं ॥ पुढती नाना सोंगें घेईना जन्मा येईना दुःख दारिद्र हरुनी ॥ सहजीं सहज पूर्ण आनंदीं नित्य निर्द्वंद्वीं दावीं निजरंग भरुनी ॥ ३ ॥

### पद १४७.

ऐसा परमार्थ काय कोण पुसे याशीं ॥ हिऱ्या ऐशी गार मोलें विकेना ते जैशी ॥ ध्रु० ॥ प्रपंचाचें शेत जतन करावयालागीं ॥ परमार्थाचा कुंप लावुनी ह्मणविताति योगी ॥ १ ॥ काम क्रोध लोभ मनीं अंत्यज मातंग ॥ स्नानसंध्या वारे वरि विद्या कळा दिसे सांग ॥ २ ॥ सहजीं सहज पूर्ण निजानंद रंगेना ॥ अहंममता जीवीं त्याचा संग भंगेना ॥ ३ ॥

### पद १४८.

आपलीच क्रिया आपणा तारक निज मारक सहजें ॥ ध्रु० ॥ हिरण्य-कश्यपु करितां द्वेष ॥ उदर विदारी हृषीकेश ॥ भक्ता प्रल्हादावरी विशेष ॥ प्रेमा बोलीं न बोलवे ॥ १ ॥ रावें रावण सहपरिवारी ॥ वधिला सक्रोधें निजशरीं ॥ बिभीषणातें सुवर्णनवरी ॥ देउनि राज्यीं स्थापविलें ॥ २ ॥ कृष्ण पांडवांचा सखा ॥ सर्वस्वेशीं पाठीराखा ॥ कौरव महा काळाच्या मुखा ॥ माजीं कवणें घातलें ॥ ३ ॥ करी तैसें पावे प्राणी ॥ कर्में जडे जीव अज्ञानीं ॥ श्रीहरी फळदाता निर्वाणीं ॥ लक्षीं साक्षी कर्मांचा ॥ ४ ॥

यास्तव निज भजनें श्रीहरी ॥ निजानंदें रंगभरी ॥ उच्छिष्ट काढी धर्मघरीं ॥ उभा द्वारीं बळीच्या ॥ ५ ॥

## पद १४९.

काय सांगो सये माझ्या संचिताची कथा वो ॥ बोलों जातां चवघी सखिया डोलविती माथावो ॥ ध्रु० ॥ भाव भक्ती माझीं पिता माता केवळ भोळीं वो ॥ निरहंकृति निष्कामें त्यांनीं दिधलें मज ये स्थळीं वो ॥ विद्याविहीन पडिला गोवळ टोणपा कपाळीं वो ॥ वृत्ति भूमि नाहीं कोठें पाहातां भूमंडळीं वो ॥ १ ॥ नाम रूपातीत बाई काळा ना सांवळा वो ॥ अखंड उघडा अगुणी याची कवणा न कळे लिला वो ॥ मागें पुढें कोणिच नाहीं एकट हा गोवळा हो ॥ पाहों जातां दृष्टीं न दिसे कळा विकळा सकळा वो ॥ २ ॥ कैसें लिहिलें होतें नेणों माझिये अदृष्टीं वो ॥ परात्पर तर हा कोठें निर्मित होता तो परमेष्ठी वो ॥ नाभीं सरोरुह नाळीं परवां देखिला म्या दृष्टीं वो ॥ जन्मला मग करुं लागला अलिकडे हे सृष्टी वो ॥ ३ ॥ कामधामीं न वसे अखंड परनारी संभोगी वो ॥ वर्णाश्रम धर्माहुनि ह्मणे मी वेगळा महायोगी वो ॥ लेण लक्षण कांहींच नलगे पाहातां याचे आंगीं वो ॥ वृत्तिशून्य सर्वदां माझ्या जिण्यास लागो आगी वो ॥ ४ ॥ वावुगी वटवट न करूं धरुं दृढ निश्चय हा मनीं वो ॥ हो झालें तें झालें पडिला कपाळीं हा अवगुणी वो ॥ सहज पूर्ण निजरंग सनातन भोगुं अशनीं शयनीं वो ॥ विदेहत्वें विचरों होउनि तन्मय-चिन्मय-भुवनीं वो ॥ ५ ॥

## पद १५०.

ऐसी कैसी चाल तुमचे घरिंची वो ॥ अंतःकरणीं वस्ती नाहीं हरिची वो ॥ ध्रु० ॥ घरामध्यें अंधःकार ॥ दीपेविरहित न कळे द्वार ॥ अप्रतिष्ठा होते परोपरिची वो ॥ १ ॥ बोलतां जैसें तैसें कांहीं ॥ चालतां तिळ तुल्य नाहीं ॥ फोल बोली अवघी वैखरीची वो ॥ २ ॥ दिवसाची कां रात्री करितां ॥ कुसंगाचा संग धरितां ॥ परम प्रीति दिसते अष्ट पुरीची वो ॥३॥ विषयांचें सुख मानुनि उडतां ॥ पदोपदीं पडतां रडतां ॥ खुण हे नेणोनि कांहीं अंतरींची वो ॥४॥ त्वरा करा परत्या सरा ॥ निजानंदीं रंग भरा ॥ जगद्भान केवळत्वें जळ मरीची वो ॥ ५ ॥

## पद १९१.

हरीभक्त, संरक्षी त्याचा कैपक्षी निजांगें ॥ गर्भवासा येणें याचि कारणें श्रीरंगें ॥ ध्रु० ५॥ निर्गुण ब्रह्म अनाम परात्पर अद्वय अज अविकारी ॥ प्रऱ्हादाकारणें होउनि सगुणरूपें अवतारी ॥ सर्वही अपाय तृणवत केले ॥ मर्दुनि दानव वैरी ॥ अन्यय शरणा-गत प्रतिपालक भक्त-काज-कैवारी ॥ १ ॥ सगुण निर्गुणीं निर्गुण सगुणीं वटबीजीं वटवृक्ष ॥ अवतारी व्हावयाकारणें राक्षित भक्त परोक्ष ॥ न जळे न बुडे न तुटे न मरे पूर्ण ब्रह्म अपरोक्ष ॥ अनु-भवें अनुविती त्यांचे स्वपदीं रुळती निजमोक्ष ॥ २ ॥ हरि हरि नामस्मरण पंचानन दुर्धर भवगज मारी ॥ स्वप्नींही तम नेणें परि जन ह्मणती रविस तमारी ॥ भीष्मक कन्या मुग्धा अबला प्रौढा तरुण कुमारी ॥ निजरंगें रंगले त्याला भय कैंचें संसारीं ॥ ३ ॥

## पद १९२.

फुकट फाकट ब्रह्मज्ञान नव्हे ॥ ध्रु० ॥ परदळ भंग करी विरळा वीर ॥ त्याचें त्यांसिंचें अनुभवे ॥ १ ॥ बोळवीत सती बहु जन येती ॥ परतोनि जाती ते अवघे ॥ २ ॥ सर्व रंगीं रंगातीत ब्रह्म सदोदीत ॥ गुरुपदीं रत त्विन तरिच फावे ॥ ३ ॥

## पद १९३.

वोळला मजवरि निजमूर्ति राम मेघःशाम ॥ ब्रह्मानंदें वर्षला पूर्ण काम- ॥ ध्रु० ॥ नाभि नाभि शब्दें चिदंबरीं गर्जत ॥ कोटि विद्युल्लता स्वरुपीं होत जात ॥ हरिश्चंद्र बारा श्रवण द्वारां येत जात अनंत पुण्यें पावला लक्ष्मिकांत ॥ १ ॥ शुद्ध सत्व वसुमतीं मी सुमती सहज ॥ श्रवण चाडे लक्षितां आत्मकाज ॥ साधनयुक्त सुभूमी शुद्ध बीज ॥ ब्रह्मस्वरूपें पिकला अधो-क्षज ॥ २ ॥ घुमरी अल्प सच्चिदानंदघन ॥ सफलित पुष्पीं फळीं स्वात्म-सुखामृत पान ॥ गुंजारवती आळिकुळ हे मुनि सज्ञान ॥ अभेद भावें कोंदला विश्वजीवन ॥ ३ ॥ अखंड धार अज अव्यय निर्विकार ॥ पिकलें पीक अलक्ष अपरपार ॥ सभाग्य सोहळे भोगिति निरंतर ॥ सुकाळ झाला घननीळ परम उदार ॥ ४ ॥ सहज पूर्ण निजानंदें केली वृष्टी ॥ दुःख दारिद्र संताप न पडे दृष्टी ॥ ब्रह्मरुपें पाहतां सर्व सृष्टीं ॥ अभंग रंग वेष्टी समेष्टीं ॥ ५ ॥

## पद १९४.

त्यासी जाणे तोही तोचि रे सांगतों एका बोलें परस्परें ॥ अनुभव जाणती

मृग मृगाचींच पाउलें ॥ ध्रु० ॥ ज्याची अभेद बुद्धी तो निर्द्वंद्व तोचि ब्रह्मानंद ॥ कृपाकटाक्षें छेदितो समूळ संसार कंद ॥ ऐसा मी निर्मुक्त स्वच्छंद तेथे कैंचा हा स्फुंद ॥ मानव देही त्यातें मानिती अज्ञानी गतिमंद ॥ १ ॥ पूर्वींच स्वजाति प्रवाह विजाती तिरस्कार ॥ विहिताचरण सहज स्वभावें आत्मनात्म विचार ॥ निष्काम निरहंकृति योगें ब्रह्मार्पण तेचि सागर ॥ बहुतां जन्माचें फळ पावला योगी निज निर्विकार ॥ २ ॥ जगदुद्धारी लीलाविग्रही देह विदेहातीत ॥ अंतार्बाह्य दृष्टीं पाहातां श्रुतिशास्त्र संमत ॥ प्रारब्धें परिग्रही भासतां अलिप्त जीवन्मुक्त ॥ पूर्ण निजानंदें रंगला तोचि अच्युतानंत ॥ ३ ॥

## पद १५९.

आमुच्या वडिलांची ठेवणी ॥ विष्णुसहस्रनामें नाणीं ॥ लक्षापती झाले वाणी ॥ या भांडवलें ॥ ध्रु० ॥ तुका वाणी कबीर साळी ॥ नामा शिंपी सांवता माळी ॥ भाग्यवंत भूमंडळीं ॥ झाले नामें ॥ चोखामेळा पाडेवार ॥ धागा रोहिदास चांभार ॥ येथें नलगे लहान थोर ॥ नामस्मरणीं ॥ अजामिळ तो पापराशी ॥ गणिका कुंटिण महा दोषीं ॥ नामें तरला वाल्मिकऋषी ॥ तारक झाला ॥ सहस्रनामांचें भांडार ॥ नाणें अनंत अपार ॥ ब्रह्मादिकां न कळे पार ॥ हरिनामाचा ॥१॥ नृपती-अग्नी-चोर-भय ॥ नाहीं कल्पांतीं निश्चय ॥ अखंड परिपूर्ण अव्यय ॥ नाम नाणें ॥ पर्वकाळ सर्वकाळीं ॥ नलगे सोवळीं वोवळीं ॥ रामनामें चंद्रमौळी ॥ शीतळ झाला ॥ रामें अयोध्या एकली ॥ नगरी वैकुंठासि नेली ॥ नामें सृष्टी पावन केली ॥ स्मरतां वाचे ॥ नामें वंद्य त्रिभुवनीं ॥ ब्रह्मस्वरूप नारदमुनी ॥ नाचे नामसंकीर्तनीं ॥ अभेदभावें ॥२॥ सुरनर किन्नर विद्याधर ॥ कीटक पशु पक्षी जळचर ॥ नामें तरले भवसागर ॥ दुस्तरतर हा ॥ नाम निजानंद घन ॥ नाम ब्रह्म सनातन ॥ नाम पतीतपावन ॥ या तिहीं लोकीं ॥ नामापरतें नाहीं सार ॥ ऐसें जाणे जो साचार ॥ त्याचा ब्रह्मरूपसंसार ॥ निःसंदेह ॥ रामनाम संकीर्तन ॥ भगवद्भक्तांचें निजधन ॥ अक्षय चित्सुखसंपन्न ॥ सर्व रंगीं ॥ ३ ॥

## पद १९६.

भ्रमरा भ्रमसी कां भ्रमसी कां ॥ कंटकवनीं भ्रमसी कां ॥ ध्रु० ॥ श्रीहरिपद मकरंदीं ॥ निश्चळ राहावें सकल मिलिंदीं ॥ १ ॥ चिद्रस नाना

सेवीं ।। तेथें शोभे संपात्त दैवी ।। २ ।। रंगोनि पूर्णानंदें ।। विचरे हरिपदिं निजसुख छंदें ।।३।।

## पद १५७.

अक्षयी ब्रह्मानंद पूर्ण तेव्हां झाला ।। मस्तकीं वंदितां संतांच्या चरण-रजाला ।।ध्रु०।। साधु सज्जन जे समयीं आले घरा ।। तेचि दिवसीं कोटि दिवाळी दसरा ।।१।। क्षेमालिंगनीं असिपदिं ऐक्य झालें ।। परात्परतर सुख तें न बोलवे मज बोले ।। २ ।। दयाघन ते विद्वज्जन कृपादृष्टी ।। करिती दीन जनावरि स्वात्मसुखामृत-वृष्टी ।।३।। चरण प्रक्षाळुनियां तीर्थ घेतां तेथें ।। पुनीत व्हावया पातलीं सकळहि तीर्थें ।। ४ ।। षोडशोपचार सद्भावें पूजन सांग ।। सहजीं सहज पूर्ण निजानंदीं रंग ।।५।।

## पद १५८.

पुनरपि जन्मा येईन मी ।। शंकरकिंकर होईन मी ।।ध्रु०।। जन्मुनि सांब सदाशिव हृदयीं।। नित्य निरंतर ध्याईन मी ।।१।। शिव स्मरतां जिव शिवमय होती ।। दिव्य यदर्थीं देईन मी ।।२।। सहज पूर्ण निजरंगें रंगुनि ।। अक्षयीं शिवपद घेईन मी ।।३।।

## पद १५९.

जिवलग बंधू तो बंधू तो ।। करुणामृत सिंधू तो ।।ध्रु०।। हरि गुरुभजनीं लावी ।। विहिताचरणीं मानस गोवी ।।१।। सदय हृदय निष्कपटी ।। दावी चित्तंतु विश्वपटीं ।।२।। रंगवुनि निजरंगें ।। विभाग देतो लक्ष निजांगें ।।३।।

## पद १६०.

धिग् धिग् बंधु तो बंधु तो ।। प्रकट कपटसिंधु तो ।।ध्रु०।। अविहित कर्माचरणीं ।। आवडी लावित अंतःकरणीं ।।१।। विमुख हरिगुरुभजनीं ।। विकल्प वाढवितो दिनरजनीं ।।२।। रंगेना निजरंगें ।। शाश्वत सुख मानित तनुसंगें ।। ३ ।।

## पद १६१.

कांहीं भय नाहीं ।। भय नाहीं ।। स्वस्वरूप निर्वाही ।।ध्रु०।। जग नग घडे मोडे ।। हेमी हेमचि नुसतें जोडे ।।१।। नामरुपाचा हा आळ ।। मिथ्या संकल्पाचा खेळ ।।२।। सहज पूर्ण निजानंद ।। रंगीं रंगला निर्द्वंद्व ।।३।।

### पद १६२.

आलेल्यानों संसारा ॥ पुरुषार्थ करा बरा ॥ सारासार विचारा ॥ मानवदेहीं ॥ध्रु०॥ साराचेंही सार ॥ हरिनाम-उच्चार ॥ सबाह्य साचार ॥ भाव भक्ती ॥ १ ॥ नवविधा भगवद्भक्ती ॥ विवेक विरक्ती ॥ दया क्षमा शांति ॥ सर्वकाळ ॥ २ ॥ वेदांतश्रवण ॥ सत्संगीं परिपूर्ण ॥ विधियुक्त क्रियमाण ॥ निरहंकृति ॥३॥ निष्काम तें जाण ॥ ब्रह्मीं ब्रह्मार्पण ॥ सायुज्य निर्वाण ॥ पदोपदीं ॥४॥ तो जीवन्मुक्त ज्ञानी ॥ वर्तोनियां जनीं ॥ अक्षयी अधिष्ठांनीं ॥ सर्वकाळीं ॥ ५ ॥ जरी ऐसी लागे सोय ॥ तरीच सार्थक होय ॥ अन्यथा मृगतोय ॥ भास मात्र ॥६॥ निर्गुण निःसंग ॥ निजानंद अभंग ॥ सहज पूर्ण रंग ॥ सर्व रंगीं ॥७॥

### पद १६३. ( काशिराजकृत. )

देहीं विदेहत्वें विचरतो तो पूर्ण ज्ञानी ॥ध्रु०॥ पूर्वसंस्कारें सर्व ॥ घडतीं सत्कर्मे अपूर्व ॥ त्याची फलाशा आणि गर्व ॥ कांहीं नाहीं निजांगीं ॥१॥ अवघीं स्वप्नींचीं दुश्चरणें ॥ जागृतावस्थेनें संहरणें ॥ तैशीं पूर्वसंचित भरणें ॥ झालीं प्रबोधीं मिथ्या ॥२॥ प्राक्तन देहातें संरक्षी ॥ ज्ञानी साक्षी होउनी लक्षी ॥ कांहीं अपेक्षी न उपेक्षी ॥ भोग मोक्षीं वितरागी ॥३॥ उचित वर्णाश्रम विध्युक्त ॥ करी जैसा फलासक्त ॥ सर्व विषयीं तो विरक्त ॥ जीवन्मुक्त म्हणउनियां ॥ ४ ॥ लीलाविग्रही भगवंत ॥ तैसेचि हे साधु संत ॥ ब्रह्मविद तो मूर्तिमंत ॥ ब्रह्मरूप जाणिजे ॥५॥ सहज पूर्ण निजानंदें ॥ विचरे स्वच्छंदें निर्द्वंद्वें ॥ त्यातें नोळखति मतिमंदें ॥ दृश्य दृष्टी म्हणउनियां ॥ ६ ॥ वेदश्रुतीचें निज गुज ॥ जगदुद्धारी तो महाराज ॥ भावें श्रीरंगानुज-आत्मज ॥ शरणागत चरणा त्याच्या ॥ ७ ॥

### पद १६४.

मन उन्मन तुझिये पायीं ॥ आतां कोण पडेल अपायीं ॥ध्रु०॥ नमितां देशिकराया ॥ येती मुक्ती दास्य कराया ॥ १ ॥ ऐसे जाणत जाणत कामी ॥ पडों गुंतुनि विषयकामीं ॥२॥ हा मायिक विश्वतरंग ॥ सच्चित्सागर निजरंग ॥३॥

### पद १६५.

अखंड टोणपा यापरी आहे श्रीहरी ॥ हात मात कळा कुसरी मजहुनि दुरी ॥ध्रु०॥ चौदा विद्या चौसष्टी कळा याहुनि निराळा ॥ निजानंदें

सुख सोहळा भोगी स्व लिळा ॥ १ ॥ विद्या अविद्या या दोन्ही सख्या सांगातिणी ॥ जोडफळें जैसीं तुंबिणी ते एकपणीं ॥२॥ जावळीं हें ज्ञान अज्ञान तेथं मानापमान ॥ टोणप्यासी समसमान चैतन्यघन ॥ ३ ॥ ऐसा मी टोणपा प्रसिद्ध स्वयें शुद्ध बुद्ध ॥ संचित क्रियमाण प्रारब्ध जाहलीं दग्ध ॥४॥ दृश्य हें दृष्टिसी दिसेना कोण्ही पुसेना ॥ निजानंदीं रंग असे-ना तर्क करितां नाना ॥ ५ ॥

## पद १६६.

सर्वा गोष्टींचें सार ॥ किती सांगों वारंवार ॥ भाव तेथें देव हा नि-र्धार ॥ सिद्धांतमतें ॥१॥ सर्वीं सर्वत्र देव ॥ ऐसा ज्याचा स्वानुभव ॥ श्रुति ज्यातें म्हणती एक-मेव ॥ सिद्धांतमतें ॥२॥ अभाव म्हणिजे नाहीं ॥ भाव ह्मणिजे सर्वां ठायीं ॥ काष्ठीं लोष्टीं देहीं आणि गेहीं ॥ सिद्धांतमतें ॥३॥ अनन्यभावें भक्त ॥ होउनि विरक्त ॥ निजानंदें झाले जीवन्मुक्त सर्व रंगीं॥४॥

## पद १६७.

तुला अझुनि तरी विकृति कां येईना ॥ध्रु०॥ विषय मन सेवुनि गोड मानिसि मनीं ॥ तिळभरी हें सौख्य तें देईना ॥१॥ गर्भवास पुय पंकीं जंतु कृमि मुखीं नाकीं ॥ चित्त पिसें त्रास कसें घेइना ॥ अस्थि मांस रक्त मुत्र दुर्गंधीचें परम पात्र ॥ निर्मळ हें कल्पवरी होईना ॥३॥ आदि अंत नाशिवंत ॥ दुष्कृतिचें मूर्तिमंत ॥ नन्म मरण कपाळिचे जाईना ॥४॥ सांडुनियां देहसंग निजानंदें पूर्ण रंग तरि हें निजसुख नभीं माईना ॥५॥

त्रिगुणात्मक जन रे ॥ ल्याले अज्ञानांजन रे ॥ध्रु०॥ लक्षुनि दांभिक दृश्य पसारा ॥ मूर्ख बहिर्मुख धांवत सैरा ॥१॥ देह बुद्धिचे तादात्मिक नर ॥ सहजचितें विषयांचे किंकर ॥ २ ॥ टाकुनि हा शाश्वत निज रंग ॥ धांवत उखरीं जेविं कुरंग ॥ ३ ॥

## पद १६८.

भयकृद्भयनाशन अच्युतानंत वो ॥ध्रु०॥ अमृता समान मान ॥ नव-ज्वरिता दुग्धपान ॥ विषतुल्य दुर्जना देहांत वो ॥१॥ श्रीहरिच्चरणां शरण ॥ जन्म मरण संसरण ॥ मृगजळवत् करित रमाकांत वो ॥२॥ निजानंदें एकमेव जैसा भाव तैसा देव ॥ पूर्ण रंगें चित्सागर शांत वो ॥ ३ ॥

## पद १६९.

आपुल्या आपण तो वैरी ॥ जों हे विषयीं वय वैरी ॥ध्रु०॥ पावुनि

दुर्लभ नरकाया ॥ भोगित संशय नरका या ॥ वांछित पतींत रमाया ॥ नेणुनि दुस्तर माया ॥ १ ॥ आत्मानात्म-विचाराचा ॥ कीं सत्कर्म आचाराचा ॥ लेश न देखे स्वप्नीं ही घडिला केवळ चारांचा ॥ २ ॥ उत्तम रज तम मानीतो ॥ सत्व गुणा अपमानीतो ॥ बैसेना नर कल्पांतिं सहसा मोक्षविमानीं तो ॥ ३ ॥ न पाहे जो निगमागम रे ॥ न करी साधुसमागमरे ॥ हरिचें नाम नये वाचे जें भवतारक सुगम रे ॥ ४ ॥ निजानंदें रंगेना ॥ शोक मोह भंगेना ॥ विषयीं झालें मन मोठें तें सत्‌श्रवणें खंगेना ॥ ५ ॥

## पद १७०.

आपुला आपण सखा तो ॥ स्वानंदामृतरस खातो ॥ ध्रु० ॥ नवविध भजनीं दिनरजनीं ॥ जनपद त्यागुनियां विजनीं ॥ राहे शम दम साधुनी, मन हें उन्मन निरंजनीं ॥ १ ॥ उचित वर्णाश्रम धर्मे ॥ करितो सकळहि सत्कर्मे ॥ निर्हेतुक निरहंकारें निषिद्ध जाणुनि हीं वर्मे ॥ २ ॥ दैवी संपत्तिचा स्वामी ॥ शोभे अखंड निजधामीं ॥ अंतर्मुख दृष्टी विचरे स्वसुखें निर्गुण-पुर-ग्रामीं ॥ ३ ॥ संसारार्णवतारक तो ॥ केवळ षड्रिपु मारक तो ॥ सच्छिष्यां सुखकारक तो ॥ पाहातां जगदुद्धारक तो ॥ ४ ॥ विद्वज्जन तो सज्ञानी ॥ अभिन्न हरि जन हरि मानी ॥ निजानंदें रंगला वेद जयाचे गुण वानी ॥ ५ ॥

## पद १७१.

मी काय बोलों बोलीं दर्शनें कुंठित झालीं ॥ कर्णें विसरलीं कार्यें आपुलीं ॥ ध्रु० ॥ श्रीहरिच्या नामस्मरणें ॥ वाचा पांगुळली तेणें ॥ समुळीं खुंटलें येणें जाणें ॥ १ ॥ श्रीहरिचें पाहातां रूप ॥ नेत्रीं दृश्याचा लोप ॥ होऊनि कोंदला आपे आप ॥ २ ॥ बुद्धी बोधली बोधें ॥ रंगुनि मन निजानंदें ॥ विचरें स्वच्छंदें निर्द्वंद्वें ॥ ३ ॥

## पद १७२.

तोचि संत सज्जन गुरुभक्त ॥ तेचि विरक्त ॥ तरोनि तारक विध्युक्त ॥ तोचि जीवन्मुक्त ॥ ध्रु० ॥ श्रीहरी सद्गुरु परब्रह्म ॥ तिन्ही नामें निष्काम ॥ जाणति गुह्य याचें सुवर्म ॥ तेचि पुरुषोत्तम ॥ १ ॥ एका मारी एकासि तारी ॥ होउनि अवतारी ॥ धरुनि सम विषम अंतरीं ॥ ह्मणवी मी मुरारी ॥ २ ॥ परब्रह्म पूर्ण परात्पर ॥ वेदां न कळे पार ॥ गुप्त ते अप्राप्त निर्धार ॥ कैसा होय उद्धार ॥ ३ ॥ गुरुकृपा होय ते क्षणीं ॥ काष्टीं पाषाणीं ॥

ब्रह्मानंद शास्त्रीं पुराणीं ॥ बोले वेदवाणी ॥ ४ ॥ शर्करा हरि पर्वत परिपूर्ण ॥ गोडी ते ब्रह्म जाण ॥ सद्गुरु निजानंद आपण ॥ रंगातीत निर्गुण ।५।

पद १७३.

पिंड ब्रह्मांड राचियलें येणें ॥ रमारमणें नारायणें ॥ ध्रु० ॥ कैसीं निर्मिलीं पंचभूतें ॥ निज मायेचिनि हातें ॥१॥ खेळ खेळोनियां निराळा ॥ त्याची अतर्क्य न कळे लीळा ॥ २ ॥ मृगें भुललीं मृगजळासी ॥ सूर्य अलिप्त आकाशीं ॥ ३ ॥ भासे विवर्त हा उपादानीं ॥ जन विजन हें जनार्दनीं ॥४॥ जळीं म्हणताती ओघ तरंग ॥ पूर्ण निजानंदीं रंग ॥५ ॥

पद १७४. ( चाल—कळों मावरे भाक्तिपाशिं. )

मिथ्या नामरूप रे ॥ कांसाविचें तूप रे ॥ कार्य कारण मिथ्या नाम ॥ अवघें चित्स्वरूप रे ॥ ध्रु० ॥ हेमीं नाना नगरे ॥ कामीं नाना जग रे॥ जग नग विचारितां रज्जु न भुजंग रे ॥ १ ॥ सोनें सोनेपणें रे ॥ कैंचें तेथें लेणें रे ॥ जगीं जगन्नाथ जाणे धन्य त्याचें जिणें रे ॥ २ ॥ पाहातां अंतरंग रे ॥ तो चित्सुरंग रे ॥ द्वैताद्वैतातीत पूर्ण निजानंदीं रंग रे ॥३॥

पद १७५.

श्रवण हो हरिगुण श्रवण करा ॥ ध्रु० ॥ श्रवण मनन निजध्यास ॥ साक्षात्कार होय ऐसें विवरा ॥ १ ॥ ग्राम्य गीत कळा सकळा विकळा ॥ भुलविती विषयी नरा ॥२॥ हरिलीलाचरितें सुख-भरितें ॥ निजरंगीं मोहरा ॥ ३ ॥

पद १७६.

हरिनाम-सुधारस पान करीं ॥ ध्रु० ॥ अमरां न चुकति पुनरावृत्ति ॥ स्मरणें तूं निजमुक्ति वरीं ॥ १ ॥ कीटक भृकुटि भयें तद्रुप झाली ॥ भावें तूं हरि हृदयीं धरीं ॥ २ ॥ हरि स्मरतां हरिरूप निजांगें ॥ टाळी वाहुनि रंग भरीं ॥ ३ ॥

पद १७७.

दयासिंधु हरि दीनबंधु येई येई रे ॥ध्रु० ॥ पतितपावना हरि मजवरि करुणा करीं ॥ झडकरि चहुं करीं क्षेम देई रे ॥ १ ॥ गुरुढारुढ होउं नको हळु हळु चालूं नको ॥ मन पवन त्यजुनिया धांव घेई रे ॥ २ ॥ स्वच्छंदा निर्द्वंद्वा निजानंदकंदा ॥ रंगुनियां पूर्ण पदा नेई रे ॥ ३ ॥

पद १७८.

रुक्मिणीरमण हरी ॥ दुर्जय भवभय समुळ हरी ॥ ध्रु० ॥ होउनियां दशविध अवतारी ॥ मर्दुनि दानव सज्जन तारी ॥ १ ॥ त्रिभुवनीं स्थिर-चर चालक पाळक ॥ म्हणवित मी नंदाचा बाळक ॥ २ ॥ सच्चित्सुख-घन ब्रह्मसनातन ॥ पूर्णरंग मुनि मानसमोहन ॥ ३ ॥

पद १७९.

कांहीं सर्व काळ पर्वकाळ येत नाहीं ॥ ध्रु० ॥ पर्वकाळ अर्धोदय पूर्वपुण्यें प्राप्त होय ॥ दुर्लभतर जन्म या मनुजदेहीं ॥ १ ॥ चिद्गंगे करुनि स्नान विधीयुक्त गोदान ॥ ब्रह्मीं ब्रह्मार्पण सहज पाहीं ॥ २ ॥ सहज पूर्ण निजानंदें रंगोनियां स्वच्छंदें ॥ शुद्ध बुद्ध नित्य मुक्त होउनियां राहीं ॥ ३ ॥

पद १८०. ( चाल—अभंगाची )

सन्मार्गें चालति पाय तरि चुकतिल सर्व अपाय ॥ ध्रु० ॥ वृक व्याघ्र वृश्चिक सर्प ॥ या असुरांचा महादर्प ॥ १ ॥ मोठे कंटक रुपती वाटे ॥ तेणें क्लेश मनीं बहु वाटे ॥ २ ॥ सत्संगतीं पूर्ण आनंद ॥ आडमार्गें मारक मैंद ॥ ३ ॥ शुद्ध सत्व अंत करणें ॥ हरिस्मरणें विहिताचरणें ॥ ४ ॥ मूळ सोडूं नये सत्संग ॥ तरी सहज पूर्ण निज रंग ॥ ५ ॥

पद १८१.

परम पुरुषार्थी महाराज संत रे ॥ ब्रह्मादिकां न कळे ज्यांचा अंत रे ॥ ध्रु० ॥ समुळीं मन बुद्धी चित्त अहंकार रे ॥ यांच्या वृत्ति केल्या ब्रह्माकार रे ॥ १ ॥ काम समुळीं आत्माराम केला रे ॥ अधिष्ठानीं अलभ्य लाभ झाला रे ॥२॥ एक सत्ता हातासी गुणग्रामीं रे ॥ आली ऐसे बळि-वंत पराक्रमी रे ॥ ३ ॥ तुच्छ दृष्टी ब्रह्मांड विषय ज्यांच्या रे ॥ चारी मुक्ती लागती पायां त्यांच्या रे ॥ ४ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न भू-देव रे ॥ सगुण ब्रह्म हे संत महानुभाव रे ॥५॥ मोक्ष श्रीमंत संत अ-क्षयीं रे ॥ सच्चित् सुख भोगिती सर्वान्वयीं रे ॥६॥ त्यांचा महिमा अपार वर्णूं काय रे ॥ रंगीं रंगले निजानंद राय रे ॥७॥

पद १८२.

नारायण करुणासिंधु कळलें मज बाई वो ॥ ध्रु० ॥ धर्म संस्थापने-स्तव अवतार धरणें वो ॥ दुष्टांचा निग्रह शिष्ट प्रतिपाळण करणें वो ॥

गीतेंत हृषिकेश ॥ स्वमुखें बोलिला ऐसें ॥ ठायिंच्या ठायीं वो ॥१॥ पूर्वी संकटें हरिलीं बहुतांचीं येणें वो ॥ बहुतांच्या मुखें ऐकत होतें श्रवणें वो ॥ हो का ते महा दोषी ॥ स्मरतां भवभय नाशी ॥ हा शेषशायी वो ॥२॥ पींडीं प्रत्यय पाहावा शब्दें विश्वास वो ॥ आला आला हा कृष्ण मुनि-मानसहंस वो ॥ निजरंगें रंगला पूर्ण ॥ जग-नग पाहातां चित्सुवर्ण बोलों तें काई वो ॥३॥

## पद १८३.

तुज म्यां नामरुपा आणिलें ॥ ध्रु० ॥ नामरूपें पांचामाजिं चोहटा ॥ आणुनि बैसविलें ॥१॥ कर्म क्रिया गुण वर्ण व्यक्तिपण ॥ हें माझें केलें ॥२॥ ये-हविं कोण तुज जाणत होतें ॥ तूं जित ना मेलें ॥३॥ अक्षत मात्र तुझी मज वरि पडिली ॥ तेंचि निमित्त झालें रे ॥४॥ आज तूं नि-लज्ज ह्मणासि मज ॥ निजरंगें नांदविलें रे ॥५॥

## पद १८४.

सर सर परतीं तोंडाळे भांडखोरे ॥ वटवट करिसी अलगटे तूं अनि-वारे गे ॥ मज करितां तुज म्हणती सर्वधारे गे ॥ म्हणउनि फुगों नको वेडे तूं अनिवारे गे ॥ ध्रु० ॥ मी बीजकाणिका तूं कोंडा जगदाकारे गे ॥ माझे सत्तेवरि व्यापकपण तुझें सारें गे ॥ शोभे काजळ कुंकु एका अहवदोरें गे ॥ पतिसुख तेथें मंगळें सर्वही सारें गे ॥ १॥ तूं जग मृग-जळ मी चिद्भानू चिदाकाशीं गे ॥ नर-मृग अज्ञानी जळ म्हणती तु-जला कैसें गे ॥ तूं महामाया आंगींची छाया जैसी गे ॥ मी तो निःसंग मधुसूदन अज अविनाशी गे ॥२॥ अभ्रपटलें लोपला म्हणती सूर्य गे ॥ तुझा माझा संबंध जाणती विद्वद्वर्य गे ॥ सहज निजरगी हें पूर्ण वीर्य शौर्य गे ॥ ३ ॥

## पद १८५.

ज्ञान-धनें ज्ञानी ॥ सुखमय नित्य धनाढ्य मनीं ॥ ध्रु० ॥ अक्षयी लक्ष अलक्ष अगोचर ॥ विश्वीं विश्वंभर नित्य निरंतर ॥ १ ॥ अव्यय निर्भय पूर्ण सनातन ॥ नामरूपातीत सच्चित्सुखघन ॥ २ ॥ सुगम समीप सुखावह शाश्वत ॥ निजरंगें परमामृत सेवित ॥ ३ ॥

## पद १८६.

साधुसंत हे महा मैंद जाती रे ॥ ब्रह्मारण्यीं नेउनि जीव घेती ॥ध्रु०॥

भोळीं भाविकें देखुनि हळुच कानीं ॥ गोष्टी सांगुनि बैसविती अधिष्ठानीं ॥ १ ॥ जीव घेउनि सोडिती लागें ॥ पाठिराखे उदंड यांचे सांगे ॥ ॥२॥ यांचें निःसंतान नव्हे कदां काळीं ॥ करिति संसाराची राखरांगोळी ॥ ३ ॥ दृष्टीबंधन करिताति खाणोरी ॥ मोठे भोंदु मानववेषधारी ॥ ४ ॥ फांसेपारधी दिसती वरि वरि भोळे ॥ जो तो यांच्या पायांवरी कां लोळे ॥ ५ ॥ वोस पडेना कधींच पाहा यांचें ॥ निजहस्तें छेदिती शिर जिवाचें ॥ ६ ॥ निजानंदें रंगले सर्व रंगीं ॥ मेले पाठीं लागले युगायुगीं ॥ ७ ॥

## पद १८७.

आत्मया रामा ये रे ये रे पूर्णकामा ॥ मुनिजनमानस-विश्रामा ॥ धांवें पावें निजसुखधामा रे ॥ ध्रु० ॥ देवा तुझिया मज विस्मरणें ॥ नाना योनी जन्ममरणें ॥ लागलें जीवपण हें धरणें रे ॥ १ ॥ मी तों अपराधी अन्यायी ॥ किति म्हणउनि सांगों कायी ॥ तूंचि बाप तूंचि आई रे ॥ २॥ दटावितां बापें बाळ ॥ माता समजावि स्नेहाळ ॥ माता मारिता बाप कृपाळ रे ॥ ३ ॥ माता पिता दोन्ही पक्षिं ॥ तूंचि एक अंतरसाक्षी ॥ तरि तुजविण मज कोण रक्षी रे ॥ ४ ॥ दीनदयाळ पतितपावन ॥ वेद गर्जुनि करिती स्तवन ॥ तरि त्वां कां धरिलें मौन रे ॥५॥ निजरंगा दीनोद्धरणा ॥ करिं करुणा भवभय-हरणा ॥ वारीं दुस्तर जन्म-मरणा रे ॥ ६ ॥

## पद १८८.

यांत कोणाचें काय गेलें ॥ आपुलें केलें तें पावले ॥ ध्रु० ॥ येथें ऐसें तेथें तैसें ॥ पुढें होईल न कळे कैसें ॥ १ ॥ डोळे झांकुनि अंधार करिते ॥ मार्ग सांडुनि आडमार्ग धरिते ॥ २ ॥ विष सेवुनि पीयूष म्हणे ॥ मरण न चुके हें न जाणे ॥ ३ ॥ जेसें जन्मुनियां नग्न ॥ हिंडे दारोंदारीं श्वान ॥ ४ ॥ रंगीं रंगेना अद्यापी ॥ किती नरक भोगिल पापी ॥ ५ ॥

## पद १८९.

गोविंदाची कथा गोड फार रे ॥ ध्रु० ॥ अनन्य भावें ऐकतां श्रवणीं ॥ होय जगदुद्धार रे ॥ १ ॥ शुकमुखें श्रवण करितां परिक्षिती ॥ पावला पैल पार रे ॥ २ ॥ दशम एकादशीं तन्मय झाला ॥ साराचेंही सार रे ॥ ३॥ श्रवणमनननिदिध्यासें होय ॥ साक्षात्कार रे ॥ ४ ॥ निजानंदें रंगले ज्ञानी ॥ गर्जति वारंवार रे ॥ ५ ॥

### पद १९०.

जनीं जनार्दन तो जनार्दन तो ॥ ब्रह्मनिष्ठ मुनिजन तो ॥ ध्रु० ॥ घटमठ-भंगीं महदाकाश ॥ अभंग अद्वितिय अविनाश ॥ १ ॥ सुगंध सुमनीं होय ॥ गुणीं गुंफितां तो नये ॥ २ ॥ देहीं देहातीत ॥ पूर्ण रंगीं सदोदित ॥ ३ ॥

### पद १९१.

बंध मोक्षाची मोक्षाची ॥ अनुभव खुण लक्षाची ॥ ध्रु० ॥ स्वप्नीं बंधन प्राप्त ॥ जागृत होतां म्हणती मुक्त ॥ १ ॥ घट मठ भंगी महदाकाश ॥ छेदभेदरहित अविनाश ॥ २ ॥ उदयास्तुविण निजरंग ॥ सहजें चिद्घनु निःसंग ॥ ३ ॥

### पद १९२.

हरिगुरु भजन करा भजन करा ॥ तरोनियां जन तारा ॥ ध्रु० ॥ सारासार विचारें ॥ शम-दम-योगें विहिताचारें ॥१॥ निरहंकृति निष्कामें ॥ करुनि ब्रह्मार्पण सत्कर्में ॥२॥ सहज पूर्ण निजरंगें ॥ भेदाभेद गिळुनि सर्वांगें ।३।

### पद १९३.

प्रपंच परमार्थी परमार्थी ॥ अंतर इतुकेंचि पार्थी ॥ ध्रु० ॥ माती घट पट तंतू ॥ कनकीं कङ्कण तसे जिवजंतू ॥ १ ॥ स्थाणु पुरुष अहि दोर ॥ शुक्तिकेवरि रजत-विकार ॥ २ ॥ निजानंदीं नाना रंग ॥ उदकीं लहरी-ओघ तरंग ॥ ३ ॥

### पद १९४.

भ्रमरा भ्रमसी कां भ्रमसी कां ॥ विषय वनीं श्रमासि कां ॥ ध्रु० ॥ कंटक वन अति दारुण ॥ तेथें सहसा न करीं रुणझुण ॥ १ ॥ गुंतुनि न पडे पंचकोशीं ॥ मुक्त होईं चिदाकाशीं ॥ २ ॥ हरिपद-पद्मपरागीं ॥ तन्मय होउनि चिन्मय भोगीं ॥ ३ ॥ परमामृत-रसपानें ॥ विचरें अनुदिन हरिगुण गाणें ॥ ४ ॥ रंगोनि निजानंदीं ॥ विचरें हरिगुरुपद-मकरंदीं ॥५॥

### पद १९५.

हरिजन हरिसम रे हरिसम रे ॥ गर्जति निगमागम रे ॥ ध्रु० ॥ संत सगुण परब्रह्म ॥ विरळा जाणे याचें वर्म ॥ १ ॥ निराकार आकारलें ॥ तूप विखरलें तें थिजलें ॥ २ ॥ रंगले ते निजानंदें ॥ जाणति नेणति हें मतिमंदें ॥ ३ ॥

## पद १९६.

अच्युत तरू गुरुवर यातें प्राकृत जन ह्मणती आंबा ॥ सवदां सफळ गुरु भक्तांकुर ज्ञानकळा जगदंबा ॥ ध्रु० ॥ निजस्वरुप-स्मरण सुबिजें अंकुरला तरु सत्क्षेत्रीं ॥ नवविधा जीवनें करुनी विरूढला कोमळपत्रीं ॥ सत्कर्माचरणें प्रबळें विधियुक्त वेदशास्त्रीं ॥ सद्विवेक संरक्षक हा लक्षुनियां दिव्य सुनेत्रीं ॥ १ ॥ सद्भाव सदृढ मुळ योगें ब्रह्मांड व्यापुनि भरला ॥ वैराग्य वसंतकाळीं ब्रह्मस्तंभ मोहरला ॥ स्वानुभवें पूर्ण प्रबोधें पक्वदशे येउं सरला ॥ ज्ञानरसें गोडिसि येतां निज शेजे सहज मुराला ॥२॥ सेविति फळ शुकादिक पक्षी विद्वज्जन चिद्रसभोक्ते ॥ कुंजति निःशब्द शब्दें व्यासादिक कोकिळ वक्ते ॥ ध्रु० ॥ अच्युत तरु सफळ सदांहि सच्चिदानंदाद्वय हो ॥ विषयी नर वायस यातें मुखरोग आला पाहा हो ॥ निर्विकल्प कल्पतरु हा पिक लक्षुनि फोडिति टाहो ॥ श्रीमंत संत भोक्ते सेवितां तृप्त सदां हो ॥३॥ रंगले सहज निज रंगें ते पूर्णानंद विलासी ॥ परमामृत-फळ-रस-पानें संतृप्त ग्रासोग्रासीं ॥ ध्रु० ॥

## पद १९७.

पाहतां समरीं शूर कळे ॥ योद्धा मारी भ्याड पळे ॥ भक्त शिखामणी संकट पडतां हरिभजनीं न टळे ॥ ध्रु० ॥ सम्मुख घाय रणीं ॥ सोशी परि सहसा न गणी ॥ पुढिल पाय न ठेवी मागें ॥ धीर उदार गुणीं ॥१॥ तनु मन जीवित रे ॥ कामीं काजीं तृणवत रे ॥ आसुरी परवीर मर्दुनि विजयी हरिचरणीं रत रे ॥२॥ निश्चल......निष्कामी ॥ निर्भय असतां सगुण ग्रामीं ॥ सहज पूर्ण निजरंगें ॥ रंगोनि विचरे रणभूमीं ॥ ३ ॥

## पद १९८.

पाहातां काय खरें ॥ शाश्वत मानिति तेचि खरे ॥ ध्रु० ॥ तुंबळ उदकें भरलीं दिसतीं ॥ मृगजळींचिं उखरें ॥१॥ दृश्य दृष्टीं गंधर्वपुरीचीं ॥ भासति गिरिशिखरें ॥२॥ नाना रंगें लिहिलीं जैसीं गंगाजाळिं मखरें ॥३॥

## पद १९९. ( चाल—अभंग )

आत्मज्ञानें विना ॥ मोक्ष कैंचा मना ॥ देहीं देहभावना ॥ दृढ झाली ॥१॥ नित्य गंगा-स्नान ॥ केलीं तीर्थं नाना ॥ अहंकार वासना ॥ गेली नाहीं ॥२॥ होम हवनें दानें ॥ करितां अध्ययनें ॥ योग याग आत्मज्ञानें- ॥ वीण व्यर्थ ॥३॥ अग्निस्पर्शें तृणें ॥ वरि वरि जळती तेणें ॥

अज्ञानवृत्ती कवणें ॥ करणें दग्ध ॥४॥ ब्रह्मार्पण सत्कर्में ॥ करितां अनंत जन्में ॥ निरहंकृति निष्कामें ॥ सद्गुरु भेटे ॥५॥ गुरुकृपें सुखोल्हास ॥ निजज्ञानीं सौरस ॥ निजरंगें विश्वास ॥ धरितां होय ॥६॥

## पद २००.

उमगला मजला हरि भक्तांपासीं ॥धु०॥ कोठें द्वारपाळ आंगें ॥ कोठें भाजीपान मागे ॥ क्षिरसागरवासी ॥१॥ कोठें उच्छिष्टें काढी ॥ कोठें धूतसे घोडीं ॥ भुलला त्या भक्तिसी ॥२॥ उच्छिष्टें गौळ्यांचीं खाय ॥ यशोदेसि म्हणे माय ॥ दुर्लभ देवांसी ॥३॥ चंदन सुमनें घेउनि आली ॥ देवें भावें मान्य केलीं ॥ ते कुब्जा दासी ॥ ४ ॥ देव भक्त ऐक्य-बोधें ॥ सहज पूर्ण निजानंदें ॥ रंगले स्वयं प्रकाशीं ॥५॥

## पद २०१.

मन पाहिलें विषयी मुमुक्षु किंवा मुक्त ॥धु०॥ तनु धन सुत दारा सत्य ॥ मानुनि जें करितें नृत्य ॥ होउनि अत्यंत विषयासक्त ॥१॥ पश्चात्तापा आलें ॥ वांतीचे परि झालें ॥ इहामुत्र फळ भोगीं विरक्त ॥२॥ पूर्ण रंगें बोलतें ॥ निजानंदें डोलतें ॥ निरसुनियां दोन्हीं व्यक्ताव्यक्त ॥३॥

## पद २०२.

मुख पाहुं नये त्या शवाचें ॥ वाचे नाम न ये केशवाचें ॥धु०॥ श्रीहरि-गुरु-भजन घडेना ॥ भ्रमद्वार कदां उघडेना ॥१॥ काया वाचा आणिक मन तो ॥ नित्य विषयीं समर्पण करितो ॥२॥ पूर्ण निजरंगें रंगेना ॥ अहं-ममता तंव भंगेना ॥३॥

## पद २०३.

अद्यापी त्रास मनीं येईना ॥धु०॥ विषय वमनवत् सेवीलें सेविता ॥ परमामृत घेईना ॥१॥ नाना योनी दुःखें अनेक भोगितां ॥ पश्चात्ताप होईना ॥१॥ सहज पूर्ण रंग निजानंद निःसंग ॥ शरण तया जाईना ॥३॥

## पद २०४.

रामनामामृतपान भूलोकीं ॥ करि तो धरामर नयनीं विलोकीं ॥ १ ॥ तोचि जीवन्मुक्त भक्त भला रे ॥ रामस्मरणीं राम तो लाभला रे ॥२॥ देव भक्त कोणही भिन्न ह्मणे दोन्ही ॥ पाहों जातां दीपचि तो वन्ही ॥ ३ ॥ रामस्मरण करी नित्य निरंतरीं ॥ राम रमावर सबाह्य अंतरीं ॥ ४ ॥ राम निजानंदीं रंग सागरीं तरंग ॥ ओतप्रोत रामीं राम निःसंग ॥ ५ ॥

## पद २०५.

संत व्हावें तेव्हां कळतील संत ॥ ओतप्रोत आपेंआप कोंदाटले पाहु जातां लवण सिंधुच्या आंत ॥ ध्रु० ॥ मेला त्याला ज्याला पाहुन ये ह्मणता तेणें आधिं येथें जेव्हां मरावें ॥ सांगावया कवण फिरोनि आला गंगोदकें सागरांत भरावें ॥ १ ॥ देहीं देहातीत त्याग भोगरहित आलें गेलें नभ हें जाणावें ॥ घट मठ भंगतां नभीं नभ संचलें सगुण निर्गुण त्यांसी कवणें म्हणावें ॥ २ ॥ हंसाची हे गति हंसाचि जाणती मुक्त मुक्ताफळ सेवित जाती ॥ तो निजरंग न जाणति वायस पाक्षि खेर परि हे अन जाती ॥ ३ ॥

## पद २०६.

संतनाममाळा शोभे कंठीं ॥ तो नर इहलोकीं परि वैकुंठीं ॥ ध्रु० ॥ मृत्युलोकीं साधुसंतसमागम इच्छिती सुरवर राहुनि स्वर्गीं ॥ दुर्लभतर नरहरिजनदर्शन करुनि लागों म्हणती मोक्षमार्गीं ॥ १ ॥ सगुण ब्रह्म साधुसंत मूर्तिमंत आदि न अंत न मध्य जयासी ॥ गाररूपें जळ निर्मळ केवळ दीनदयाळ ते वैकुंठवासी ॥ २ ॥ ज्यासि हरिप्रिय ते हरिचे प्रिय अद्वय अक्रिय स्वानुभवी ते ॥ तो निजरंग न जाणाति मानव-दानव-रूप सदैव भवीं ते ॥ ३ ॥

## पद २०७.

आम्हीं दासिंच्या पडदासी विद्वद्वर्यांचे घरिंच्या ॥ दृष्टिसि सृष्टिच नाहीं कांहीं आहों या परिच्या ॥ध्रु०॥ सज्जनसेवा-बळें दृष्टिसि नाणूं कवणाला ॥ भेवूंना सर्वथा त्या लंकेच्या रावणाला ॥ १ ॥ नव्हों साबण सुडक्या बुडक्या मृगजळिं मारायाच्या ॥ सज्जनसेवाबळें भवनिधि तरोनि तारायाच्या ॥ २ ॥ अक्षयी प्रशस्त निर्मळ निराकार निजधाम ॥ बुद्ध्यादिकांसि उसंत नाहीं परि पूर्णकाम ॥ ३ ॥ तत्पद-पद्मपरागीं भ्रमरी होउनि दिनरजनीं ॥ परमामृतरसपानें तन्मय चिन्मय निजभजनीं ॥ ४ ॥ पिता माता भ्राता सुत पति कुळदैवत संत ॥ निःशब्द शब्दें गीतीं गाऊं होउनि निभ्रांत ॥ ५ ॥ निजानंद रंगें रंगुनि चित्सुखभुवनीं ॥ सहज पूर्ण समसाम्यें जैसा जीवन-बिंदू जिवनीं ॥ ६ ॥

## पद २०८ ( चाल—अभंग )

व्हावें पायाळा अंजन ॥ तेव्हां दृष्टिसी दिसे धन ॥ ध्रु० ॥ साधु-

संतांचीं लक्षणें ॥ काय जाणावीं विचक्षणें ॥ १ ॥ बहिर्मुख दृश्य दृष्टीं ॥ पाहातां व्यर्थांचि होती कष्टी ॥ २ ॥ कृपण ठेवणें निक्षेपी ॥ तैसा साधु चिन्हें लोपी ॥३॥ मृगजळाचा तरंग ॥ तैसा दिसे बाह्य रंग ॥४॥ सहजिं सहज ते निजांगें ॥ रंगीं रंगले पूर्ण रंगें ॥५॥

## पद २०९.

मी आत्माराम पूर्णब्रह्म पूर्णकाम ॥ध्रु०॥ विश्वपटीं ओतप्रोत चित्तंतु मी अनुस्यूत ॥ नाहीं यातिकूळ ना रूपनाम ॥ १ ॥ अनंत ब्रह्मांडें पोटीं त्याची वार्ता ना गोष्टी ॥ तेथें कैंचा हा गुणग्राम ॥२॥ सहज पूर्ण रंग निजानंद निःसंग ॥ मुनिजन-विश्राम निजधाम ॥३॥

## पद २१०.

वय वायां गेलें कांहिंच स्वहित न केलें ॥ध्रु०॥ घाणा वाळु गाळुनि व्यर्थंचि मंथन ॥ जळीं मज झालें ॥१॥ हरिविण विषयविलासीं गुंतुनि ॥ स्मरणचि अवघें नेलें ॥ २ ॥ श्रमतरुचें फळ श्रमची केवळ ॥ दुःख विभागा आलें ॥३॥ मृग मद नाभिसीं असतां नेणुनि ॥ भ्रमतां भ्रमतां मेले ॥४॥ निजरंगें रंगेना कां हें ॥ भवोदधींत बुडालें ॥५॥

## पद २११.

ये रे आत्मया रामा ॥ कृष्णा मेघःशामा ॥ पुराण पुरुषोत्तमा ॥ इंदिरावरा ॥ ध्रु० ॥ अच्युता हरी ॥ माधवा मुरारी ॥ भक्तकाज-कैवारी दीनबंधु ॥१॥ गोपाळा गोविंदा ॥ नरसिंहा मुकुंदा ॥ पूर्ण परमानंदा ॥ पद्मनाभा ॥२॥ केशवा वामना ॥ विष्णु जनार्दना ॥ मधुसूदना प्रद्युम्ना ॥ त्रिविक्रमा ॥ ३ ॥ गोवर्धनोद्धरणा ॥ अधोक्षजा संकर्षणा ॥ अनिरुद्धा नारायणा ॥ करुणासिंधु ॥४॥ उपेंद्रा दामोदरा ॥ हृषिकेशा श्रीधरा ॥ वासुदेवा विश्वंभरा ॥ विश्वरूपा ॥५॥ ऐसीं अनंत नामें ॥ स्मरतां सप्रेमें ॥ भक्तकाम-कल्पद्रुमें ॥ तारिले दोषी ॥६॥ तुझिया नामस्मरणीं ॥ रंगावी हे वाणी ॥ निजरंगें निर्वाणीं ॥ रक्षिता तूंचि रे ॥७॥

## पद २१२.

हरि नारायण नाम वदाजी ॥ ध्रु० ॥ तथ्य पथ्यतर तत्व हें तत्वता ॥ नाम पाववितें पूर्णपदा जी ॥ जनन-मरण-संसरण-निवारण ॥ स्मरण हें जाणोनि दाजी ॥ १ ॥ नित्य निरंतर सबाह्य अंतर ॥ नाम परात्पर हें सर्वदा जी ॥ ब्रह्म सनातन सच्चित्सुखघन ॥ गर्जत जा हरुनी मोहमदा जी

॥ २ ॥ संशय अविश्वास घातकी विश्वास ॥ श्वासोच्छ्वास घेऊं नेदी कदां जी ॥ नुपजे पश्चात्ताप हेंचि महत्पाप ॥ यास्तव ते भोगिति आपदा जी ॥३॥ व्याध अजामिळ चांडाळ तरले ॥ शास्त्रज्ञ भरले वेद-वादा जी ॥ अर्थवाद म्हणुनी संशयिं पडले ॥ सांपडले त्रिविध छेदभेदा जी ॥ ४॥ जनक सनकादिक व्यास वाल्मिक॥ शुक नारदाची मुख्य हे संपदा जी ॥सहज पूर्ण हरिनामें रंगले ॥ सेवुनियां निजानंदकंदा जी ॥ ५ ॥

## पद २१३.

सबाह्याभ्यंतरिं रामीं रामदास यापरी रे ॥ अन्वय व्यतिरेकातित होउनि शोभति सचराचरीं रे ॥ध्रु०॥ रामीं रंगले ते रामदास नयनीं पाहुं ॥ चरणसरोजीं त्यांच्या तन्मय होउनि राहूं ॥ पायसान्नामाजीं समरस घृत शर्करा गहूं ॥ निवडुं जातां रामचि झाला निरसुनि अहं सोहूं ॥१॥ मेघःशाम निजराम वर्षत जळ गारा ते दास ॥ भिन्न भिन्न दिसतांही सबाह्याभ्यंतरीं पाणी त्यांस ॥ महा कल्पांत जळमय तेथें कैंचा भिन्न भास ॥ सगुणीं निर्गुण निर्गुणीं सगुण जनीं जगदाधीश ॥२॥ सच्चित्सुखमय चिन्मय स्वरूपीं तन्मय संत महंत ॥ ब्रह्मविद ते ब्रह्म जळगारा मूर्तिमंत ॥ ओतप्रोत परिपूर्ण संचले आदिमध्य न अंत ॥ रंग तरंग निजसुख जळनिधिमाजिं अभंग निवांत ॥ ३ ॥

## पद २१४.

जळो त्याचें शाहाणपण ॥ मनुष्य म्हणवितो आपण ॥ध्रु०॥ मयुराचे सर्वांगीं डोळे ॥ आत्मदर्शनीं आंधळे ॥१॥ विद्या-कळा-गुणसंपन्न ॥ नाहीं स्वरुपाचें ज्ञान ॥२॥ नाचे देहबुद्धिच्या छंदें ॥ रंगेना निजानंदें ॥३॥

## पद २१५.

तरि मग गडबड कां गडबड कां ॥ वावुगी बडबड कां ॥ ध्रु० ॥ चित्र तरुची छाया ॥ तैसी स्वरुपीं मिथ्या माया ॥ १ ॥ स्वात्मसुखामृतोदधी ॥ स्वयें मीचि यथार्थ बुद्धी ॥२॥ निरुपम अज निःसंग ॥ रंगीं रंगला निज रंग ॥ ३ ॥

## पद २१६. ( चाल—बोलणें फोल झालें. )

राया हरिची माया दुस्तरतर सुर नर बुडवी ॥ ध्रु० ॥ शुक म्हणे

---

१. रामदासस्वामींचे प्रथम भेटीअंतीं त्यांची पूर्ण स्थिति पाहून केलेलें वर्णन या पद्यांत वर्णिलें आहे.

परिक्षिती ॥ हरिपदीं मुनि मन संरक्षिती ॥ जग हें मृगजळवत् लक्षिती ॥ त्याला देखुनि मुख दडवी ॥१॥ सुर नर पन्नग भुवनत्रयीं ॥ भुलवुनि पाडित दुर्घट विषयीं ॥ हर्षामर्षें ठायीं ठायीं ॥ घडि घडि हांसवि रडवी ॥२॥ भुतां वैर परस्परें ॥ असतां ऐक्य निर्मत्सरें ॥ करुनी सूक्ष्म स्थूळ शरिरें ॥ कर्में शुभाशुभें घडवी ॥३॥ मेरुतुल्य अनुष्ठान ॥ करितां देखुनि तपोधन ॥ त्यासि कामक्रोध लावुन ॥ पुण्य क्षणमात्रें उडवी ॥४॥ हरिजन हरिभजनें हरिमाया ॥ जाणती चित्रतरूचि छाया ॥ हरिपदीं न रंगती जे तयां ॥ पदोपदीं मग अडवी ॥ ५ ॥

## पद २१७.

तरी तृप्ति न बाणे सहसा वारिजनाभ जनाची ॥ अनन्य भावें प्रीति निरंतर हृदयीं हरिभजनाची ॥ध्रु०॥ गुण गण स्तवनीं स्तवितां अनंत लीला अनंताच्या ॥ दशशत वदनीं झाल्या दुखंड जिव्हा अनंताच्या ॥ १ ॥ नेति नेति या अर्थे वेदश्रुति गर्जत ह्योत्या ॥ त्याही विस्मित झाल्या अनंत स्वरूपीं पूर्ण आहुत्या ॥ २ ॥ हरिपद-पद्मपरागीं नारद शुक सनकादिक भृंग ॥ रुंझि करुनियां सदैव सेविति सहज पूर्ण निजरंग ॥ ३ ॥

## पद २१८.

यापरि इहपर-लोकीं मान्य ते धन्य वनिता ॥ध्रु०॥ स्वरुप सुंदर सगुण शांत ॥ अंतर्बाह्य शुचिष्मत ॥ अनन्य भावें आद्यंत ॥ सेवी कांत तत्वता ॥१॥ नित्य स्वधर्मानुकूळ ॥ मृदुतर-वचनी क्षमाशीळ ॥ दयावंत चित्तीं निर्मळ ॥ धीर उदार गंभिरता ॥२ ॥ अतीत अभ्यागत महंत ॥ देव ब्राह्मण साधु संत ॥ अन्नपूर्णा मूर्तिमंत ॥ नेणें द्वैताची वार्ता ॥३॥ सर्वांभूतीं भूतदया ॥ अभेदबुद्धी रंका राया ॥ जैसी मनें वाचा काया ॥ ते अनसूया पतिव्रता ॥४॥ ऐशा लक्षणें लक्षणोक्त ॥ विषयीं विरक्त हरिगुरुभक्त ॥ पूर्ण रंगीं नित्य मुक्त ॥ एक ब्रह्मांडीं सत्ता ॥ ५ ॥

## पद २१९.

क्षिर-निधिजाकांता सत्वरतर आणा गोकुळासी ॥ त्यास्तव आम्ही त्यागिलें यातिकुळासी ॥ ध्रु० ॥ गोपि म्हणती उद्धवा माधवा दावीं ॥ त्याचीं चरितें सुखभरितें कवणें वदावीं ॥ जेणें बांधोनि घेतलीं माजीं दावीं ॥ वाटे मौळीं त्याचीं पदपद्में वंदावीं ॥ १ ॥ सांब सदाशिव ह्मणे नमो नमो हरि तो ॥ दुर्धर दुस्तरतर दुर्निवार मनमोहरि तो ॥ मोहित

अबला बाळा वाजवोनि मोहरि तो ॥ ज्याचे स्वरुपीं ब्रह्मांडें सम मोहरि तो ॥ २ ॥ नयनीं विलोकुं मधुसूदन यमुनापुलिनविहारी ॥ दीनबंधु तो भक्तकाजकैवारी ॥ ध्रु० ॥ सगुण सुंदर रूप मनोहर मेघःशाम ॥ अंतरसाक्षी पुरुषोत्तम आत्माराम ॥ अनन्य भावें अनुभवितां पूर्णकाम ॥ जनीं जनार्दन तो मुनिजनमन-विश्राम ॥ ३ ॥ वृंदावनभुवनीं वेणु वाजवितां ऐकुनि श्रवणीं ॥ तन्मय आम्ही गोपिका अंतःकरणीं ॥ ध्रु० ॥ अगाई गाई वत्सें पुच्छें वावुनि येती ॥ कृष्ण मोहरीं मोहरल्या त्यांच्या वृत्ति ॥ संगें गोपाळ संवगडे नाचत जाती ॥ श्रीमुख नयनीं देखतां आनंद चित्तीं ॥ ४ ॥ ब्रह्मानंदें आम्ही गोपिका पाहूं जाऊं ॥ सासुरवासिनी निर्लज्जा होउनि गाऊं ॥ ध्रु० ॥ ऐशा वियोगें दुश्चित चित्तें करुनी ॥ उद्धवातें प्रार्थिती चरण धरुनी ॥ स्फुंदों स्फुंदों बोलती ममता हरुनी ॥ ह्मणती वोंवाळुं जाऊं गा तुजवरुनी ॥ ५ ॥ भेटावें आतां अच्युतानंता गोकुळपाळा ॥ निज निःसंगा श्रीरंगा दीनदयाळा ॥ ध्रु० ॥

## पद २२०.

गुरुदेवदत्ता अनंत ब्रह्मांडीं तुझी सत्ता ॥ ध्रु० ॥ विश्वव्यापका विश्वंभरिता ॥ विश्वाधीशा विश्वातीता ॥ प्रमेय प्रमाता प्रमाणरहिता ॥ जगद्गुरू अवधूता ॥ १ ॥ नित्य निरंतर अगमागोचर ॥ परात्परतर सुखदाता ॥ दीनदयाकर दत्त दिगंबर ॥ सत्य ज्ञानानंता ॥ २ ॥ निःसंगा निजरंगा सत्वर ॥ धांवें पावें आतां ॥ निजात्मदर्शन देउनि निरसीं ॥ दुर्जय ममता चिंता ॥ ३ ॥

## पद २२१.

दुर्लभतर नरदेह पावुनि काय केलें ॥ ध्रु० ॥ हरिभजनेंविण विषयविलासीं ॥ गुंतुनि वायां वय गेलें ॥ १ ॥ चिंतामणि टाकुनि कांचवटी ॥ घेती तैसें तुज झालें ॥ २ ॥ ज्ञानचक्षुवरि भवभ्रांतीचें ॥ मायापडळ हें कां आलें ॥ ३ ॥ अंजुळिचें जळ तेविं पळें पळ ॥ आयुष्य काळिकाळें नेलें ॥ ४ ॥ निजरंगें हरिभजनीं रमसी ॥ मग तुज कांहीं न मी बोलें ॥ ५ ॥

## पद २२२.

हरिनामामृतपान करिती सुरवर ते ॥ ध्रु० ॥ नित्य मुक्त इहलोकीं नामें ॥

---

१. श्री दत्तात्रयाचें साक्षात् दर्शन झाल्यानंतर रंगनाथस्वामींनीं श्रीची प्रार्थना करून वारंवार दर्शन द्यावें म्हणून मागणें मागितलें आहे.

भगवज्जन अजरामर ते ॥ १ ॥ हरिभजनें निजानिश्चळ स्वरुपीं ॥ नेणाति गुज हें पामर ते ॥ २ ॥ निजरंगें रंगुनियां ठेले ॥ हरिजन पूर्ण परात्पर ते ॥ ३ ॥

### पद २२३.

केवळ नरहरि तो नरहरि तो ॥ भजतां भवभय हरितो ॥ ध्रु० ॥ वाचा हरि-गुरुस्मरणीं-स्वरुपीं ॥ सावध अंतःकरणीं ॥ १ ॥ गुळ गुळाची गोडी ॥ मुळिंच्या ऐक्यत्वासि न सोडी ॥ २ ॥ निजरंगें रंगला ॥ सहजें दुष्टसंग भंगला ॥ ३ ॥

### पद २२४.

ज्ञानदेव ज्ञानदेव ह्मणतां ज्ञान देव देतो ॥ वासुदेवाचि होतो अखंड वदनिं वदे तो ॥ ध्रु० ॥ ज्ञानदेव चतुरक्षरी जप हा करितां सर्वज्ञा ॥ ज्ञानाज्ञानविरहित ब्रह्मप्राप्तीची संज्ञा ॥ ज्ञाता ज्ञेय निजांगें होय हे ज्याची प्रज्ञा ॥ ज्ञानाग्नीनें पापें जळती हे याची आज्ञा ॥ १ ॥ नररूपें श्रीविष्णू अवतरला श्री हा भगवान ॥ नद नादि वापी कूप पाहातां उदक नव्हे भिन्न ॥ नवल हेंचि पशु ह्मैसा परि तो करि वेदाध्ययन ॥ नमन करुनि सद्भावें जपतां होय विज्ञान ॥ २ ॥ देवादि देव तो हा भगवद्भ-क्तांप्रति वर दे ॥ देतां वर ब्रह्मांडीं ब्रह्मानंदाचि हा कोंदे ॥ देशिकराज दयानिधि आलंकापुरीं जो नांदे ॥ देशभाषां ज्ञानदेवी गीता ग्रंथ वदे ॥ ३ ॥ वक्ते श्रोते पठणें श्रवणें पावति सम भाव ॥ वर्णूं जातां अगणित महिमा होती जिव शीव ॥ वंदुनि अनन्य भावें गाऊं गीतीं ज्ञानदेव ॥ वर्षति निज रंगें ते पूर्ण जाणति स्वानुभव ॥ ४ ॥

### पद २२५.

हरि नारायण बोल ॥ वाचे ॥ ध्रु० ॥ हरिस्मरणेंविण वावुगा शीण ॥ जाणुनि सर्वहि फोल ॥ १ ॥ वाळुवेचा घाणा व्यर्थचि करकरी ॥ बड-बडि तैसे ढोल ॥ २ ॥ हरिस्मरणें पूर्ण रंगें रंगुनी ॥ निजानंदें डोल ॥ ३ ॥

### पद २२६.

डोळा उघडेना उघडेना ॥ पश्चात्ताप घडेना ॥ ध्रु० ॥ अहं-ममतेचें करणें ॥ नाना योनीं जन्मुनि मरणें ॥ १ ॥ चिदचिद्ग्रंथि सुटेना ॥ क्षणभरि विषयीं चित्त विटेना ॥ २ ॥ निज रंगें रंगेना ॥ दुर्जय दुर्भव भय भंगेना ॥ ३ ॥

---

रंगनाथस्वामी तीर्थयात्रा करीत असतां आळंदीस येऊन त्यांनीं श्री ज्ञानदेवा-वर तत्गुणवर्णनपर हें पद्य केलें आहे.

## पद २२७.

तेव्हां गुज कळलें गुज कळलें ॥ स्वरुपीं मन मावळलें, ॥ ध्रु० ॥ पडतां गुरुहस्त मस्तकीं ॥ अवघा मीच मी समस्त कीं ॥ १ ॥ सबाह्य अंतर्यामीं ॥ व्याप्य व्यापक स्थिर जंगमीं ॥ २ ॥ सहजीं सहज मी पूर्ण अभंग ॥ रंगीं रंगला निज रंग ॥ ३ ॥

## पद २२८.

जनीं जनार्दन पाहा तुह्मी नेत्र हो ॥ दृश्य दृष्टी होतां श्रमासि पात्र हो ॥ ध्रु० ॥ अलंकार पाहातां सेखीं ॥ सुवर्ण पाहे पारखी ॥ तैसा विश्वीं विश्वंभर चिन्मात्र हो ॥ १ ॥ विश्वपटीं चित्तंतू पाहाती ॥ तेचि धन्य या त्रिजगतीं ॥ नाम रूप वाच,रंभण मात्र वो ॥ २ ॥ निजानंदीं एक रंग ॥ पाहावा निरसुनि अनित्य संग ॥ तरिच तुह्मी माझे परम मित्र हो ॥ ३ ॥

## पद २२९.

अंतरिंचें पुरविल अर्त श्रीहरी ॥ ध्रु० ॥ मान गुमान हे तुझे तुज वैरी ॥ निरभिमान होईं अंतरीं ॥ १ ॥ हृदयग्रंथी सोडुनि देईं तूंचि हरी ॥ सन्मुख होईं सुमनशेजे निजमंदिरीं ॥ २ ॥ करुनि द्वैत-संग भंग निजानंदीं पूर्ण रंग ॥ लहरी हे विरे जैसी सागरीं ॥ ३ ॥

## पद २३०.

जाऊं या परते भोगूं या यातना ॥ अविधिमार्गें जातसे पतना ॥ ध्रु० ॥ अहंममता देहीं देहबुद्धिच्या संगें ॥ कामादिक आसुरी गुण दोषी सर्वांगें ॥ आब्रह्मस्तंभ व्यापिलें भवरोगें ॥ मोहमदांध झालें कर्माच्या फळभोगें ॥ १ ॥ स्वदोष-दर्शन न देखे नयनीं ॥ परदोषदर्शन पहाते दिनरजनीं ॥ कल्पांतीं सम्मुख नव्हे श्रीहरिभजनीं ॥ न जाणें व्याप्यव्यापक जनीं विजनीं ॥ २ ॥ दुर्विषय-विलासी अभिलाषी धन दारा ॥ या मानवतनुचा केला हो मातेरा ॥ ह्रिया ऐशा मानीतो वनगारा ॥ वरि रूपमदाचा सर्वांगीं फुगारा ॥ ३ ॥ मूर्तिमंत वेदवेदांत प्रतिपाद्य ॥ विद्वद्वर्य परब्रह्म ज्यां वेद्य ॥ ऐसे जे ज्ञानी ब्रह्मादिकां वंद्य ॥ सामान्य त्यांतें मानिति ते अति निंद्य ॥ ४ ॥ तिळ-तुल्य चित्तीं अनुताप धरीना ॥ सच्छास्त्रश्रवण सत्संगीं करिना ॥ मी कोण ऐसा कांहीं विवरीना ॥ पूर्णानंद निजरंगें भरिना ॥ ५ ॥

## पद २३१.

भली भली वोगरती पूर्वपुण्यें तूं सरती पुरती ॥ ध्रु० ॥ ब्रह्मसंपन्न सद्वृत्ति लक्षणोक्त ॥ प्रवृत्ति निवृत्ति निरसूनि जिवन्मुक्त ॥ तीतें प्रज्ञा पुसे होउनियां विरक्त ॥ म्हणे एकचि कैसें मानिसी अव्यक्त ॥ १ ॥ दुस्तर-तर हा दुर्निवार प्रपंच पाहीं ॥ क्षण एकासारिखें एक नाहीं ॥ परि तुज प्रपंचीं परमार्थ सर्वदांही ॥ अभेदबुद्धि नेणवे मज हे कांहीं ॥ २ ॥ सांग वो सखिये यांचे कैसें वर्म कर्म ॥ कैसें एक रूप जाणसी धर्माधर्म ॥ ध्रु० ॥ अभेदबुद्धि बाळा प्रत्युत्तर अनुवादे ॥ सर्वा भूतिं परमात्मा एकचि नांदे ॥ जग नग कार्या चित्सुवर्ण कारण वो दे ॥ आदिमध्यांतीं परमार्थ पूर्ण कोंदे ॥ ३ ॥ सर सर वो अरजे अद्वैतीं द्वैत कैंचें काय ॥ भासे जग हें परि मिथ्या मृगजळ-न्याय ॥ ध्रु० ॥ स्थाणु पुरुष रज्जूवरि भुजंगभान ॥ रजतशुक्तिके विवर्त उपादान ॥ तैसा प्रपंच स्वरुपीं जाणति सज्ञान ॥ दिसे भासे तें सच्चिदानंदघन ॥ ४ ॥ शर्करा गो[illegible] निवडितां झाली प्रज्ञा वेडी ॥ हो कां भासे प्रपंच कडोविकडीं ॥ ध्रु० ॥ कटु आम्ल मधुर इंद्रावन लींबें केळें ॥ शर्करा पय सर्पी निमुनियां प्रज्ञा कुशळें ॥ सेवूं जातां मधुरता एके काळें ॥ तैसा प्रपंचीं परमार्थ अहळें बहळे ॥ ५ ॥ अनुभवें अनुभव जाणाति विद्वज्जन विजन-विहारी ॥ तरोनि तारक दिक्षा-ग्रहणें जगदुद्धारी ॥ ध्रु० ॥ निःसंदेह प्रश्नोत्तरश्रवणें सहज ॥ पूर्ण सिद्धी पावले हे निजकाज ॥ ऐक्य झालें हें म्हणतां वाटे चोज ॥ मुळींच द्वैताद्वैत नेणती ते गुरुराज ॥ ६ ॥ सहज पूर्ण निजानंदें रंगले साधुसंत ॥ ज्यांचा ब्रह्मादिक नेणती आदि-अंत ॥ ध्रु० ॥

## पद २३२.

रामीं रंगली वृत्ती कामीं न फिरे रे ॥ प्रवाहे सिंधुगामी न वाहे पुनरागामी ब्रह्मगिरी रे ॥ ध्रु० ॥ आत्मा अखंड जो स्वतःसिद्ध ॥ उपा-धियोगें शुक-नलिका प्रतिबद्ध ॥ नाहीं द्वैतासि ठाव ॥ झाली कल्पना वाव ॥ सोहं निर्धारें रे ॥ १ ॥ वृक्षापासुनि सुटलें फळ ॥ तें काय शोधी जाउनि आपुलें पूर्व मूळ ॥ चित् चैतन्य रूप ॥ तद्रुप आपें आप ॥ झालें न फिरे रे ॥ २ ॥ अहं सोहं हें भेदभान ॥ गिळुनियां झाला अवघा निजानंदघन ॥ श्रीरंग शुद्ध बुद्ध ॥ श्रुति विवाद स्तब्ध ॥ म्हणती नेती नेती ॥ ३ ॥

## पद २३३.

आम्ही धन्य धन्य धन्य ॥ झालों बाई वो ॥ ध्रु० ॥ ठेवुनि मस्तकीं हस्त ॥ देउनियां निज वस्त ॥ येणें जाणें वेळों वेळां नाहीं वो ॥ १ ॥ तंतुवरी जैसा पट ॥ मृत्तिकेचा तैसा घट ॥ आह्मांवरी दृश्य तदन्याय वो ॥ २ ॥ निजानंदीं खेळों खेळ ॥ रंगीं रंगों सर्व काळ ॥ वर्णिती जयासि चारि साहि वो ॥ ३ ॥

## पद २३४. ( अभंग )

माझिया कपाळें केलें शक्तीहीन ॥ ऐसें तों दिसोन आलें देवा ॥ ध्रु० ॥ ऐकत होतों तुझ्या पायांचा प्रताप ॥ तो आतां आटोप कळों आला ॥ १ ॥ लोहाचे मांदुसेमाजीं परिस वसे ॥ कर्पूर कोळसेपणीं राहे ॥ २ ॥ तैसें तुझे दास म्हणवितों तोंडें ॥ तरी येवढें थोडें म्हणुं नये ॥ ३ ॥ अनंता जन्मींचा बैसलासे मळ ॥ क्षणार्धें निर्मळ होय कैसा ॥ ४ ॥ तव्याचा दर्पण होताहे सोज्वळ ॥ जैं क्लेश प्रांजळ होती तेव्हां ॥ ५ ॥ काया वाचा मनें दास म्हणवणें ॥ हें तुझें करणें तुझ्या हातीं ॥ ६ ॥ तुझें म्हणोनियां राहिलों निराळा ॥ हे लज्जा गोपाळा धरीं मनीं ॥ ७ ॥ दीनाचा साहाकारी सत्य होईल बोल ॥ योग सिद्धी न्याल माझा जेव्हां ॥ ८ ॥ सर्व रंगीं एक निजानंद झाला ॥ ऐसें हें विठला करीं वेगीं ॥ ९ ॥

## पद २३५.

श्रीगुरुवर्या रे निज चित्सूर्या ॥ अचळ अढळ तव कीर्ति अनुपम नेणति शतपथ चर्या ॥ ध्रु०॥ द्वैततमारी रे जड जीव तारीं ॥ मस्तकीं हस्त ठेउनियां भवनिधि-जळीं तूंचि उतारी ॥ १ ॥ अखिल अमुपा रे चिन्मय-रूपा ॥ शरणागत दीनतारण वारण जनन मरण भव-खेपा ॥२॥ प्रभु निःसंगा रे अनंग अंगा ॥ सहज पूर्ण निजमूर्ति निरामय आक्रिय अभंग रंगा ॥ ३ ॥

## पद २३६.

रविकुळभूपा रे तूं अविनाशा ॥ शरयूतीरनिवासा छेदक भक्तांच्या भवपाशा ॥ध्रु०॥ मुनिजन-ध्येया रे निज सुख गेया ॥ दीनजनतारण दशमुखमारण कारण जग-नग-कार्या ॥१॥ हृदय-शेजे रे तूं निजें ॥ कमलोद्भव-

कुळबाळा शिळा तारिसि चरणरजें ॥२॥ निज सुखदानीं रे तूं निदानीं ॥ शाश्वत रंग अभंग कराया आदि मध्य अवसानीं ॥ ३ ॥

## पद २३७.

निज भक्तांलागीं देखा ॥ ब्रह्म भुललें सुखा ॥ ध्रु० ॥ भीमरेतिरीं ॥ क्षेत्र पंढरी ॥ जे विटेवरी ॥ कर कटीं धरी ॥ कमलनयन सम चरण विराजित ॥१॥ जें परात्पर शास्त्र गव्हर ॥ श्रुति अगोचर ॥ ध्याति मुनिवर॥ निर्गुण नित्य निरामय वस्तु ॥ २ ॥ शाश्वत सम पद ॥ विषद विद्वद ॥ ध्यात नारद ॥ रंगातीत पद ॥ सहज पूर्ण अज अव्यय तूं तूं ॥ ३ ॥

## पद २३८.

हरिचरणीं रम रम रम रम ॥ ध्रु० ॥ व्याध जसा गुणिं लावुनियां शर ॥ तेविं जपें तुज यम यम यम यम ॥ १ ॥ तात भ्रात सुत नैश्वर मानुनि ॥ मोहवनीं न भ्रम भ्रम भ्रम भ्रम ॥ २॥ पूर्ण रंग निज रामपदीं मग ॥ काय तेव्हां तुज श्रम श्रम श्रम श्रम ॥ ३ ॥

## पद २३९. ( अभंग )

पाहावें एक चांचपुनी सीत ॥ अवघाचि भात कळों येतो ॥ ध्रु० ॥ पुरे हा संसार दुःखाचा सागर ॥ पोहतां हात फार भागले हे ॥ १ ॥ न करवे आतां वावुगी कट कट ॥ न भरे तरि पोट बला गेली ॥ २ ॥ मुष्टिभरी अन्न देईल भगवान ॥ नेसाया कौपिन एक पुरे ॥ ३ ॥ हेंही नेदूं तरी नेदुं पंढरीराज ॥ परी आपुलें काज सिद्धि नेऊं ॥ ४ ॥ तुझ्या पायांवरि ठेवुनियां हात ॥ वाहातों शपथ पांडुरंगा ॥ ५ ॥ न मागें तुज कांहीं संपत्तिवैभव ॥ तुझे चरणीं ठाव देईं आतां ॥ ६ ॥ निजानंदें रंगें हृदयावकाशीं ॥ विठला तुजपाशीं हेंचि मागों ॥ ७ ॥

## पद २४०. (अभंग)

दों दिवसांचा संसार तोही आहाचवणा ॥ कां रे पंढरिराणा भजसी ना ॥ १ ॥ झांकुनियां डोळे घेसि विषय सोहळे ॥ भिकेचे डोहळे आठवती ॥२॥ विचारुनि पाहें खरें काय आहे ॥ शुक-नालिके-न्यायें गुंतलासि ॥ ३ ॥ कोश-कीटकापरी आपला आपण वैरी ॥ तैसी तुझी परी झाली मना ॥ ४ ॥ ह्मणसि काय करूं पडली माझे गळां ॥ तूंचि अमंगळा न सोडिसी ॥ ५ ॥ जीवांचा जीवन जनीं जनार्दन ॥ हात पाय कान दिधले जेणें ॥ ६ ॥ ब्रह्मादि पिपिलिका पर्यंत ज्या चिंता ॥ लागली अनंता

मुळींहुनी ॥७॥ तेथें तूं बापुडें देहधारि किडें ॥ मेळवितों मी वेडें होऊनि म्हणसी ॥ ८ ॥ घालीं उडी आतां धरीं विठलचरण ॥ निजानंदें पूर्ण रंगोनियां ॥ ९ ॥

## पद २४१.

पुंडरिकें ऐसा कैसा आकळिला वाघ रे ॥ ब्रह्मादिक देवांच्या हातीं नातुडे श्रीरंग रे ॥ध्रु०॥ जप-तप-ध्यानें योगीं श्रमतां लाग नलगे ज्याचा रे ॥ भक्तिवागुरें सांपडला हा अतीत जो चहुं वाचां रे ॥ १ ॥ जुनाट परि हा येथें म्हणवी अठ्ठावीस युगांचा रे ॥ धरूनियां वागविती मोठा भाव दरवेशाचा रे ॥ २ ॥ दृष्टि पडतां सोडित नाहीं जीव घेणा सकळांचा रे ॥ असुर बकी बक कंस चाणुर अंतक शिशुपालाचा रे ॥३॥ जीव घेईल न चुके धरा पाड कायसा याचा रे ॥ निजानंद परि विठल म्हणवी संग धरुनि रंगाचा रे ॥ ४ ॥

## पद २४२. ( अभंग )

दिनानाथा कृष्णराया ॥ भक्तवत्सल करुणालया ॥ ध्रु० ॥ गोवर्धनाहुनि आलासी ॥ येथं निवांत राहिलासी ॥१॥ कर कां कटीवरि ठेविले ॥ गाई गोवळ काय केले ॥ २ ॥ ठाण देहुडें अधरिं मोहरी ॥ आतां समपद विटेवरी ॥ ३ ॥ तूं निष्कर्म अलिप्त कर्में ॥ नेणो गोपी वदल्या वर्में ॥ ४ ॥ भक्ता पुंडरिकासाठीं ॥ वास केला भीमातटीं ॥ ५ ॥ सहज पूर्ण तूं निजरंग ॥ आतां नाम पांडुरंग ॥ ६ ॥

## पद २४३. ( अभंग )

बोलें शरयूतीरानिवासा ॥ मुनिमानस-राजहंसा ॥ ध्रु० ॥ चंद्रभागा सरोवरीं ॥ कर ठेविले कटीवरी ॥ १ ॥ कां टाकिले धनुष्यबाण ॥ क्षात्रधर्माचें कारण ॥ २ ॥ नाना अवतारीं पावुनि श्रम ॥ येथें पावलां विश्राम ॥३॥ वधुनि रावण राक्षसराणा ॥ लंका दिधली बिभीषणा ॥४॥ नळ नीळ जांबुवंत ॥ कोठें आहे अंजनिसुत ॥ ५ ॥ धरुनियां भक्तलोभा ॥ कां रे गोवळ-वेषें उभा ॥ ६ ॥ देवां बंदीमोचन करुनी ॥ रामराज्य त्रिभूवनीं ॥७॥ निजरंगा आत्मारामा ॥ मुनिमानस निजसुखधामा ॥८॥

## पद २४४.

मना निजहित काय रे विचारिलें ॥ध्रु०॥ मी माझें हा पदार्थ ॥ मानुनियां निश्चितार्थ ॥ विषय विष इंद्रियांसी चारिलें ॥ १ ॥ कोण सोडवील

तेव्हां ॥ अंतकाळीं त्वरें जेव्हां ॥ यमधर्मं तुज पाचारिलें ॥ २ ॥ मुनिजनविश्रामधाम ॥ रंग निजमूर्ति राम ॥ अनुतापें नाम नुच्चारिलें ॥ ३ ॥

## पद २४५.

पांडुरंगे तूं येगे येगे ॥ ध्रु० ॥ भीमातटवासिनी ॥ भक्ताचिये जननी ॥ येईं वेगें धांवुनि ॥ प्रेम-पान्हा मज देगे ॥ १ ॥ श्रुति स्मृति सारे ॥ अज अविका रे ॥ जगदुद्धारे ॥ निर्गुण नित्य नि संगे ॥ २ ॥ सत्य-ज्ञानानंते ॥ अखिल अवाप्ते ॥ निजानंद मूर्ते ॥ रंगुनि पूर्ण अभंगे ॥ ३ ॥

## पद २४६.

अरे तूं तेंचि आहेसि स्वयें ॥ भ्रमला होतासि मोहें ॥ आत्मानात्मविवेकें कोण मी स्वानुभवें पाहें ॥ ध्रु०॥ ब्रह्म सनातन तूं ॥ केवळ सच्चित्सुखघन तूं ॥ पिंड ब्रह्मांड हा मायिक धंदा ॥ जाणुनि तूं राहें ॥ १ ॥ राजा रंकपणें ॥ स्वप्नीं नेलें तें कवणें ॥ भ्रांतिचा गुण याच रितीचा ॥ म्हणतो मी जिव आहें ॥ २ ॥ जीव-शिवातित तूं ॥ निर्गुण ब्रह्म सदोदित तूं ॥ छेदभेदरहित पूर्ण रंग ॥ तूंचि दिव्य मी देईन हें ॥ ३ ॥

## पद २४७.

मना ऐसा महाराज कोण आहे रे ॥ नाममात्रेंचि जन्म जरा जाय रे ॥ ध्रु० ॥ मत्स्य कच्छ पशूसूकर झाला रे ॥ नारसिंह अवतार धरियेला रे ॥ अंबरीष परम सुखी केला रे ॥ अर्जुनाचा सारथी स्वयें झाला रे ॥ १ ॥ दीनवत्सलता काय किती वानूं रे ॥ पार्थालागीं लपविला दिवसा भानू रे ॥ वृंदावनीं वाजवी रम्य वेणू रे ॥ तेणें नादें मोहिल्या गोपि धेनू रे ॥ २ ॥ धरी भक्तांचे उरीं शिरीं पाय रे ॥ पुरी नेली वैकुंठपदा पाहे रे ॥ भिल्लिणीचीं उच्छिष्ट फळें खाय रे ॥ रिसां वानरां एकांत करिताहे रे ॥ ३ ॥ अनंत कोटी ब्रह्मांडें ज्याचे पोटीं रे ॥ तो हा धांवे गोवळ्या-धेनूपाठीं रे ॥ खांदा कांबळा घेउनि हातीं काठी रे ॥ निजानंदें रंगला पाठीं पोटीं रे ॥ ४ ॥

## पद २४८.

होय ऋणी जगदीश ॥ त्याचा ॥ ध्रु० ॥ देवद्विज गुरुदास्य करुनियां ॥ भूतदया गंभीर ॥ १ ॥ सारासार विचार करुनियां ब्रह्मपदीं मन स्थीर ॥ २ ॥ निजरंगें रंगुनियां राहे ॥ सत्संगी जो धीर ॥ ३ ॥

### पद २४९.

विनायकावांचुनी देव नाहीं ॥ विनायकावांचुनी देव नाहीं ॥ ध्रु० ॥ जगन्निवास मोरया ॥ तुम्हीं त्यासमोर या ॥ संशय न धरुनि कांहीं ॥१॥ अनंत ब्रह्मांडें उदरीं ॥ तो हा लंबोदर पाहीं ॥२॥ अभय हस्त शिरीं धरी ॥ स्मरतां निर्विघ्न करी ॥ निज रंगीं सर्वदांही ॥३॥

### पद २५०.

दैवत श्रीगुरुराज बाई माझें दैवत श्रीगुरुराज ॥ ध्रु० ॥ ब्रह्मादिक जे ध्यानीं ध्याती मानुनि हाचि उपाय ॥१॥ चारी मुक्ती दासी होती नमितां गुरुचे पाय ॥ २ ॥ सहज पूर्ण निज रंग विना मज नाहीं तरणोपाय ॥ ३ ॥

### पद २५१.

स्मरतां नित्य हरी ॥ मग ती माया काय करी ॥ ध्रु०॥ नामरुपात्मक सकलहि नाशक ॥ निश्चय हा विवरी ॥१॥ शांति दया पर श्रवणीं सादर ॥ भ्रांति भ्रमा न वरी ॥ २ ॥ सहज पूर्ण निज रंगीं रंगुनि ॥ सद्गुरु पाय धरी ॥ ३ ॥

### पद २५२.

चित्-उदधी निज रंग ॥ भासे जगदाकार तरंग ॥ ध्रु० ॥ माया मृगजळ शाश्वत नसतां ॥ धांवति जेविं कुरंग ॥ भासे ॥१॥ दृग् भ्रम योगें रज्जु न जाणें ॥ वाटे तीव्र भुजंग ॥ भासे ॥ २ ॥ पुत्र कलत्र गणगोत्र मित्र धन ॥ गज रथ धेनु तुरंग ॥ भासे ॥ ३ ॥ सहज पूर्ण निज रंगीं रंगुनि ॥ होय सहज भवभंग ॥ ४ ॥

### पद २५३.

अवघें सुख पाहीं सुख पाहीं ॥ दुःखचि किमपी नाहीं ॥ ध्रु०॥ शुकनलिका-न्यायें तूं ॥ करिसी संकल्पाचा हेतू ॥१॥ जें जें भासत सृष्टीं ॥ देखें परमात्मा तो दृष्टीं ॥ २ ॥ सुखही नेणिव जेथें भरला ॥ पूर्ण रंग निज तेथें ॥ ३ ॥

### पद २५४.

विरळा सज्जन तो सज्जन तो ॥ मुनिजनमनरंजन तो ॥ ध्रु० ॥ निरहंकृति निष्कामें ॥ ब्रह्मीं ब्रह्मार्पण सत्कर्में ॥ १ ॥ शिव होउनि शिवभजनीं ॥

अखंड तन्मय चिन्मय-भुवनीं ॥ २ ॥ तरोनि तारक झाला ॥ पूर्ण निजानंदें रंगला ॥ ३ ॥

**पद २५५.** [ चाल धातुमूर्ति लक्ष. ]

ब्रह्मीं चिद्वृत्ती जडली तेव्हां पुण्यें हीं घडलीं ॥ ध्रु० ॥ त्रिभुवनिचीं दैवतें पुजिलीं लक्ष कन्यादानें केलीं ॥ योग याग क्रिया व्रतें तपें तीर्थें गोदानें द्विजां दिधलीं ॥ जांबुनद कनक मेरुभार एक प्रयुत दानें झालीं ॥ दहा सहस्र वर्षें वाराणशीवास करुनियां तीर्थें आलीं ॥ १ ॥ समुद्रवलयांकित पृथ्विचीं तीर्थें यथायोग्य घडलीं स्नानें ॥ सत्पात्रें पाहुनि ब्राह्मणांसि दिधलीं सदक्षणा भूमिदानें ॥ यज्ञादिक क्रिया यथाविधि सांग करुनि श्रीहरिपुजनें ॥ संसारसागरापासोनि पितरां उद्धरिलें आत्मज्ञानें ॥ २ ॥ नित्यानित्य विचार विलोकुनि मुमुक्षु-दशे आला ॥ साधुसमागम सच्छास्त्रसंगमीं सुस्नात होउनि ठेला ॥ अनंत ब्रह्मांड हरिहरब्रह्मादिक पुजेसि अर्ह झाला ॥ सहज पूर्ण निजरंगीं रंगुनियां आला न तो गेला ॥ ३ ॥

**पद २५६.** [ चाल सदर. ]

सद्रुप तूंचि चिद्रुप तूंचि स्वयें आनंदस्वरुप ॥ ध्रु० ॥ सद्गुरु बाप माय वेगीं धरीं पाय तेणेंचि आनंद होय. ॥ लटिकेंचि माथां घेतोसि काय मिथ्या नामरूप जाय ॥ मातेचें शोणित पितयाचें रेत दोन्हीं मिश्रित पिंड होय ॥ बारावे दिवशीं नाम ठेविलें तें साचचि मानिसि काय ॥ १ ॥ तुझें स्थूळ देह पंचभूतिक त्याचा विचार ऐक ॥ धावन प्रसरण बोलणें आकुंचन निरोधन वायुचें देख ॥ काम क्रोध शोक लोभ भय हेंचि आकाश ऐक ॥ क्षुधा तृषा आलस्य निद्रा संग हे तेजाचे जाण नेमक ॥ २ ॥ लाळ मूत्र शोणित लज्जा आणि रेत हे तंव आप निर्धार ॥ अस्थि मांस त्वचा नाडी रोम वाचा पृथ्विचा होय साचार ॥ हें स्थूळ शरीर लिंग-देह बिऱ्हाड ऐक त्याचा विचार ॥ पंचभूतेंविण लिंगदेह नाहीं ऐसा सांगेन प्रकार ॥ ३ ॥ त्यांत व्यान उदान समान अपान प्राण वायु साचार ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण यांचा ज्ञानेंद्रियें तेज आकार ॥ वाचा पाणी पाद शिस्न गुद कर्मेंद्रियें आप-विस्तार ॥ अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार आकाश पंच प्रकार ॥ ४ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध जाण पृथ्वीविषय पंचक ॥ हें ऐसें जाण वासनामय लिंग-देह पुर्यष्टक ॥ याचें मूळ जाण अज्ञान कारण सांगेन तुज ऐक ॥ स्वरुपीं अति गूढ प्रपंचीं सदृढ तेंचि होय अवि-

थक ॥ ५ ॥ स्वरुपीं विस्मरण प्रापंचिक ज्ञान तोचि देह कारण ॥ जो जो देह प्राप्त तोचि चिदात्मक त्याचें नांव जीव जाण ॥ ऐसे जीव अनंत होती माये आंत सोडवी तयांसि कवण ॥ गुरुकृपा जाण होय तुर्या जाणें निरसी सर्वही भान ॥ ६ ॥ तुर्या ती कैसी सावध परियेसीं जिचेनि सर्व देखसी ॥ तत्त्वमसि वाक्य जिचेनि ऐकसी तीच तुर्या अहर्निशीं ॥ स्वानंदस्फुरण अखंड स्मरण उन्मनि हे ज्ञानराशी ॥ स्वामी दीनानाथ निजरंगीं समर्थ निरसिलें मी-तूं-पणासी ॥ ७ ॥

**पद २५७. राग जोगी ताल बिलंदी. ( चा. सदर. )**

मी तो सहज रिकामा नये एकाहि कामा रे ॥ध्रु०॥ करिं धरुनि संतीं दिधली विश्रांति लाडिवाळ तयाचें बाळ ॥ बैसवुनि अंकीं शांतिपालवे झांकी माउली परम कृपाळ ॥ ज्ञानामृत गुप्त तेणें केलें तृप्त तोडरिं बांधीला काळ ॥ निर्भय झालों आतां कार्यकर्तव्यता राहिले सर्व पाल्हाळ ॥१॥ जें जें दिसे तें तें सत्ताविलसें दुजें नाढळेचि मज रे ॥ एकला एकट दुजियाचा विट ब्रह्मारण्यिं केली शेज ॥ लौकिकाचें काज नाहीं ठेली लाज अखंडता निर्जीं नीज ॥ स्व-स्वरुपीं दृष्टी स्वानंदें संतुष्टी माझें मज वाटे चोज ॥२॥ वर्णाश्रमधर्म याति कुळकर्म विजाति न साहे संगा ॥ माझा मीं सहज आत्मत्वाचे वोजें मी माझे पावलों भंगा ॥ बद्ध-मोक्षभाव दोन्ही झाले वाव निःसंगता आली रंगा ॥ निजानंदें बुद्धी बोधली हो जैसी सागरीं मिनली गंगा ॥३॥

**पद २५८. ( कवण तुम्ही कवणाचे या चा. )**

प्राणी भुलला रे ॥ ध्रु० ॥ वेदपरायण शास्त्र सुभाषित उत्तम पंडित झाला ॥ योग-लीला सकला अनुलक्षिति वायु समग्रहि प्याला ॥ भूत भविष्य गमे समयीं यम नियम वश्य तयाला ॥ आत्मकळा न कळे भ्रमला नर व्यर्थ पराक्रम गेला ॥ १ ॥ आचरला तप सर्वहि उत्तर दक्षिण मानस केलें ॥ योग क्रिया विधि तो विधीपूर्वक मंत्राराधन झालें ॥ आगम साधुनि शक्ति उपासिली वैदिक सिद्धीसि नेलें ॥ आत्मकळा नकळे भ्रमला नर ॥ सर्वहि व्यर्थचि गेलें ॥ २ ॥ आसन घालुनि अंतरिक्ष रविमंडळ भेदुनि जाय ॥ बोधक शक्ति बृहस्पतिसादृश विक्रम शक्र न साहे ॥ साधक बाधक सर्व सुचे पुरुषार्थहि त्रिविध वाहे ॥ आत्म-कळा नकळे भ्रमला नर ॥ सर्व निरर्थक पाहे ॥ ३ ॥ क्रूर तपें अति

आचरला कळि-काळहि दृष्टिस नाणी ॥ शूरपणें अमरावति जिंकुनि सत्वर अमृत आणी ॥ वाक्य वृथा न वदे सहसा विधिसाम्य अनुस्यूत वाणी ॥ आत्म-कळा न कळे भ्रमला नर ॥ होय न चुकत हाणी ॥४॥ नित्यानित्य विचार विलोकुनि शुद्ध विराग धरावा ॥ भावबळें निज-रामपदांबुजिं आश्रय पूर्ण करावा ॥ रंग अभंग निजिं निज निःश्चयें मीपण हेत हरावा ॥ नेति मुखें श्रुति येथुनि तन्मय शब्द निःशब्द वरावा ॥५॥ जाणिव सांडोनि, जाणे चिन्मय, त्यासिच बाणे ॥ ध्रु० ॥

## पद २५९. ( चाल सदर )

रामा सोडविं रे सखया सोडवीं रे ॥ ध्रु० ॥ सद्बुद्धि जानकी बोलताहे निकी अवस्था दाटली पोटीं ॥ जिविंचिया जिवा आत्मया राघवा काय मी सांगों हे गोष्टी ॥ देह अहंकार रावण साचार प्रकृति याची खोटी ॥ नेतो मज दुष्ट नष्ट हा पापिष्ट करुनियां त्वरा मोठी ॥ १ ॥ देह पर्णकुटी-माजीं मी असतां स्वप्रकाशा तुज नेणें ॥ मायिक मरीची नेणोनियां त्याची कंचुकि दे तुज म्हणें ॥ अभिलाष-बोलें तुज दुराविलें मी काय बापुडी जाणें ॥ केलें कर्म कुडें न चालेचि पुढें लंकेसि जाहलें येणें ॥ २ ॥ उपाधिं भुललें सांडुनियां लक्ष लक्ष्मणा दिला त्रास ॥ तयासि अंतर पडतां सत्वर निजहिता झाला नाश ॥ अशोकवनीं ठेवियलें परी शोकें केलें कासावीस ॥ सुखविसाविया निज सोयरिया घेई तूं आपुलें यश ॥ ३ ॥ अंतरिंचा सखा जाणें सुखदुःखा करुणा तयासि आली ॥ विचार मारुति पाठवुनियां साचार शुद्धि केली ॥ बोध-सेना संगें घेउनियां लिंगदेह-लंका वेढियली ॥ मारितां अहंरिपु देह देहबुद्धी तेचि झाली सोहं सिद्धी ॥ ४ ॥ बुद्धि बोधा योग होतांचि वियोग तुटला जीव-शिवाचा ॥ दोघां एकपण हेंही बोले कोण परतल्या चारी वाचा ॥ ऐक्यपदीं पाहों सत्व-संपत्तिचा आनंद मातला साचा ॥ निजानंद पाहीं दुजा रंग नाहीं सिद्धांत सार श्रुतीचा ॥ ५ ॥ रामा बोधिलें रे भवदुःख छेदिलें रे ॥ ध्रु० ॥

## पद २६०. ( चाल—कवण तुम्ही कवणाचे० )

मना सावध रे सखया सावध रे ॥ ध्रु० ॥ विसरुनि निजसुख प्रपंचिं तूं देख भुललासि केविं वायां ॥ सारासार दोन्हीं विचार टाकुनि साचचि मानिलि काया ॥ ब्रह्मादिकां जे दुर्जय ते तुज आकळेल केवीं माया ॥ सर्वहि नश्वर जाणुनि सत्वर भज भज श्रीगुरुराया ॥ १ ॥ लोक लोकपाळ

पृथ्वीचे भूपाळ सार्वभौम तेही गेले ॥ इंद्र चंद्र सुर ब्रह्मा हरिहर काळाचे वदनीं ठेले ॥ तेथें तूं बापुडें असावध वेडें कां रे डोळे झांकियलें ॥ न भरतां पळ पडसी विकळ नचलेचि कांहीं केलें ॥ २ ॥ शैवि कां वैष्णवी दिक्षा नित्य नवी निजहिता लागीं धरीं ॥ नवविध भक्ति करुनियां आसक्ति विषयांचि तोडीं बरी ॥ साधन चतुष्टय साधुनियां वृत्ति हे सत्वस्थ करीं॥ निजानंद संगें ब्रह्मसुखीं रंगें मुक्ति सायुज्यता वरीं ॥ ३ ॥

### पद २६१. चाल— ( भक्तांसि भगवद्भ० )

साजणी गे लिहिलें भाळीं अक्षर तें कोण टाळी॥ वदती विधि हरि हर वाहुनि टाळी ॥ ध्रु० ॥ हाचि हा केला केला निश्चय वो न टळे माये ॥ पातकी गे गेला गेला संशय हा पुढती ॥ नये निरतीशय जाहला जाहला निज लाभ सांगों काय ॥ माझें दैवत श्रीगुरुचे पाय ॥ १ ॥ साजणी गे आतां घन वो वर्षला पीयूषाचा ॥ साजणि गे आतां दिन वो सार्थक या आयुष्याचा ॥ साजणि गे ज्ञानसोहाळा डोळां देखिला भविष्याचा ॥ महिमा न वदवे या हर्षाचा ॥ २ ॥ साजणी वो सत्कर्मे ब्रह्मार्पण केलीं असती ॥ साजणी वो क्रम-योगें साधनें झालीं दिसती ॥ साजणि वो मानवि भावें पूजिले साधू नसती ॥ तरीच गुरुचरणीं घडली वसती ॥३॥ साजणि गे करणें उरलें नाहीं वो सरलें सरलें ॥ साजणि गे चित्सौख्याचें अक्षयी तारुं भरलें ॥ साजणि गे जाणिव सरली जाणणें मात्रचि उरलें ॥ श्रुतिंहिं उन्मन वो मौन धरिलें ॥ ४ ॥ साजणी गे आतां विचरों गिरिशिखरीं कीं गृहद्वारीं ॥ साजणि गे गेली भय लज्जा ममता चिंता दूरी ॥ साजणी गे निजानंदें रंगला सचराचरीं ॥ उरली बोलाया नाहीं उरी ॥ ५ ॥

### पद २६२. ( चाल— सदर )

राघवारे धावें पावें सत्वरा दीनबंधु ॥ मज तो न तरवे भवसिंधु ॥ध्रु० ॥ राघवारे ममतायोगें चंचळ मी निजहित न कळे ॥ राघवारे विषयवियोगें व्याकुळ मन इंद्रियें विकळें ॥ राघवारे क्षयरोगें पारखी जाहलिं सकळें ॥ दुर्धट संसृति हे न टळे न टळे ॥ १ ॥ राघवारे रजतमसंगें भ्रमतां दिन-रजनी गेली ॥ राघवारे साधुसेवा जाणपणें नाहीं केली ॥ राघवारे विद्या-वय-साधन मोहानें पडली भूली ॥ मति हे परदोषीं संयुक्त जहाली ॥२॥ राघवारे भाग्य विशेषें हिंसकहि उपमे नसरे ॥ राघवारे जपतप लेशें फळ

आशा अहंमति पसरे ॥ राघवारे तनु-उद्देशें मन विधि शासनही विसरें ॥ स्वहिताचें पडलें मन उध्वस रे ॥ ३ ॥ राघवारे धन सुत दारा संसारा विटलों नाहीं ॥ राघवारे जगदुद्धारा मन वारा झालें पाहीं ॥ राघवारे व्यर्थ पसारा विश्रांती न दिसे कांहीं ॥ निकरें जाचिति हे वैरी साहीहि ॥ ४ ॥ राघवारे त्रिभुवनपाळा सहसा मम दोष न लक्षीं ॥ राघवारे दुर्जय काळा निर्दाळुनि मज संरक्षीं ॥ राघवारे दीनदयाळा करुणाकर ब्रीद नुपेक्षीं ॥ चरणीं रंगवी तूं अंतरसाक्षी ॥५॥

## पद २६३. [ गोविंदा तूं राहि उ० ]

चिद्भुवनीं योगिराज विराजतो ॥ ध्रु० ॥ चिन्मय छत्र विचित्र सुशोभित दैवी संपत्ति सेनाहो ॥ ईक्षणमात्रें शत्रुपराजय तदुपरि द्वैत दिसेनाहो ॥१॥ सारासारविचारपरा वितरागविरां सम्मानितो ॥ नित्यानंदपदीं मन उन्मन निगम पराक्रम वानितो ॥२॥ भक्त चकोर तया निज जीवन चिन्मयचंद्र अनुपम तो ॥ त्रिविध भेद विवर्जित तत्पदीं रंग अभंग सखें रमतो ॥३॥

## पद २६४. [ चा. सदर. ]

तारी श्रीराम सोयरा भवसागरीं ॥ ध्रु० ॥ वैभव तो परिवार सुखावह दावी भाव सदैव नरा ॥ अंतकाळिं यमकिंकर जाचिति सोडविता न दिसे दुसरा ॥१॥ दर्पणिचें धन कीं मृगजीवन इंद्रजालवत् मानि बरा॥ करुनि पान मोह-मदिरा अति उन्मत्त कां अविचार परा ॥२॥ सावध सावध पाहे बरा क्षणभंगुर किं तव देह खरा ॥ तारक एक गुरू निज रामपदांबुजीं रंग करूनि त्वरा ॥३॥

## पद २६५.

करीं दया मजवरी श्रीगुरुराया ॥ ध्रु० ॥ गुणमयी वैष्णवी दुर्जय माया ॥ न तरवे मज करूं काय उपाया ॥१॥ थोर तापत्रयीं तापावलि काया ॥ कृपाकरें निववीं शीतळ छाया ॥२॥ भवभयत्राता निजसुखदाता ॥ चरणीं रंगवीं शरण आलों तव पाया ॥३॥

## पद २६६.

जळो जिणें हरिविण सर्व त्यजावें ॥ ध्रु० ॥ मंदिर सुंदर पुत्र कलत्रही ॥ सोडुनि शेवट एकट जावें ॥ १ ॥ राहाट माळेपरी समजावें ॥

कोण मी काय गुरुकृपें उमजावें ॥२॥ सर्व विरंग कुरंगजळापरी ॥ जाणुनियां पुनरपि नुपजावें ॥३॥

### पद २६७.

स्मर हरी कलिकल्मषहारी ॥ध्रु०॥ ध्रुव प्रऱ्हाद गजेंद्राहि तारी ॥ द्रौपदिच्या धांवण्या पावे मुरारी ॥ १ ॥ अंबरिषाचा हरि साहाकारी ॥ परिक्षितिचें गर्भी संकट वारी ॥ २ ॥ व्याध अजामिळ गणिका नारी ॥ हरिरंगीं रंगली श्रीहरि सहचारी ॥३॥

### पद २६८.

धिग् धिग् विरस जिणें रे लारिजवाणें ॥ ध्रु० ॥ लाज नये रघुरायपदाहुनि विषय सुखावह काय रे ॥ हारविला नरदेह निरर्थक व्यर्थ श्रमविली माय रे ॥१॥ रसना रसाभिलाषीं लोचन ॥ तन्मय रूपविलासीं रे ॥ गजस्पर्श पदबंधन पावे भ्रमर जेवीं कमलासिं रे ॥ २ ॥ नेणसि हित वृथागत जीवित ॥ नादें जेविं कुरंग रे ॥ सावध रे निजरामपदांबुजि शरणागत होउनि रंग रे ॥ ३ ॥

### पद २६९. [ राग व चाल सदर. ]

शरण त्या गोपाळा जावें तन्मय व्हावें भावें रे ॥ ध्रु० ॥ रंजवुनि भवभंजन तो हरिपद निरंजन ध्यावें रे ॥ ध्रु० ॥ सोडवि कोण तुतें भवपाशीं ॥ तूं विषयांचि दासी रे ॥ तव हृत्कोशीं जो हृषिकेशी ॥ आविदित काय तयासि रे ॥ १ ॥ कर्म जिवा पितृवत् प्रतिपाळी ॥ शत्रुहि होउनि जाळी रे ॥ कोण बलिष्ठ असा वसुधातळीं ॥ स्वकृत कर्महि टाळी रे ॥ २ ॥ कर्मकिंकर जीव निरंतर ॥ बोलति श्रुति स्मृतिकारक रे ॥ तें कर्म निरहंकृति फळत्यागें होय जिवा भवतारक रे ॥ ३ ॥ विबुध दानव पन्नग मानव ॥ कर्मप्रयोगें झाले रे ॥ तें कर्म ब्रह्मार्पण करितां सुखें श्री भगवानही डोले रे ॥ ४ ॥ भगवद्भजनें प्रिय साधूजन ॥ सारविवेक वैराग्यें रे ॥ निष्कर्मता जिव होय सदाशिव ॥ परमानंदा योग्य रे ॥५॥ जनक सनकादिक शुक नारद वामदेव मुनिवृंद रे ॥ रंगुनि निजानंद पदीं ते डोलति निजसुखछंदें रे ॥ ६ ॥

### पद २७०. ( चाल व. राग. सदर )

भगवद्भक्त ययापरि जाणति जाणिव सांडुनि सर्व रे ॥ स्थिरचरि हरि दुंदुभि वाजति न धरति रतिही गर्व रे ॥ ध्रु० ॥ तंतुपटीं घटीं मृन्मयता

जळींच तरंगीं विराजे रे ॥ अस्ति भाति प्रिय नाम रुपात्मक राघव रुपडें साजे रे ॥ १ ॥ काम्य निषेध निषेधुनि विधिचा दाविती सादर भाव रे ॥ कर्म किं करते न कदापिहि डोलति पूर्वप्रवाहें रे ॥ २ ॥ अहं निवारुनि सोहंहि वारुनि डोलति निजसुख रंगें रे ॥ निरतीशय निज निर्विकार सुख नेणति जन; देहसंगे रे ॥ ३ ॥

**पद २७१. ( एक चाल—९पदें. राग कल्याण. )**

देवचि मानव तो नमनीं केवळ दानव तो ॥ ध्रु० ॥ वर्णाश्रमविधि पाळुनि बरवी ॥ निस्पृह चित्त अहंकृति नुरवी ॥ १ ॥ शांति जयासि सुखासन साजे ॥ भूतदयाघन दुंदुभि गाजे ॥ २ ॥ निर्विकार मानस दिन-रजनीं ॥ इंद्रियवृंद विलासत भजनीं ॥ ३ ॥ मारुनि मन्मथ सहपरिवारें ॥ निर्भय वीर विवेकविचारें ॥ ४ ॥ मर्दुनि दशमुख राघव जैसा ॥ सहज पूर्ण निजरंगाह्नि तैसा ॥ ५ ॥

**पद २७२. ( चाल सदर. )**

जगदुद्धारी हो साधु विजनविहारी हो ॥ ध्रु० ॥ लीलाविग्रह मानव-देहीं ॥ भक्तानुग्रह दिसत विदेही ॥ १ ॥ तापत्रय भय निर्मुळकारी ॥ विविध पाप भवताप निवारी ॥ २ ॥ चित्सुख रंगें द्वैतविनाशी ॥ निजानंद-पद देव निवासी ॥ ३ ॥

**पद २७३. ( चाल—सदर. )**

भज भज श्रीहरि हरि तो ॥ भजतां भवभय संहरितो ॥ ध्रु०॥ सर्व हरी अवलोकुनि नेत्रीं ॥ सादर परिसा हरिगुण श्रोत्रीं ॥ १ ॥ नर्तन चरणीं कीर्तन वाचे ॥ करुनि दहन करी पाश भवाचे ॥ २ ॥ सत्संगें निजरंग वरावा ॥ हाचि परम पुरुषार्थ करावा ॥ ३ ॥

**पद २७४. [ चाल—सदर )**

रम रे रामपदीं हे मानस ॥ ध्रु० ॥ सत्य ज्ञानानंत सुखाचें ॥ वंद्य त्रिदश मुनिगणप्रमुखाचें ॥ १ ॥ वर्णिति व्यास पराशर नारद ॥ परमामृत श्रुति-शास्त्र विशारद ॥ २ ॥ छेदभेद विरहीत असंग ॥ निजानंद अज शाश्वत रंग ॥ ३ ॥

**पद ७२५. चाल सदर.**

भज रे हरी सर्व हें मानस ॥ ध्रु० ॥ जो शशी सूर्य प्रभंजन फिरवी ॥ जो जड करुनि अचेतन मिरवी ॥ १ ॥ जो विधि-शंकर-माधव-रूपें ॥

उत्पात्ति स्थिति लय करुनि अमूपें ॥ २ ॥ [illegible] असंग ॥ नेति वदति श्रुति तो निजरंग ॥ ३ ॥

### पद २७६. चाल—सदर

स्मर रे रघुवीर हे मानस ॥ ध्रु० ॥ देह अशाश्वत जाईल हा रे ॥ अतिसत्वर निजहित पाहा रे ॥ १ ॥ ब्रह्मार्पण सत्कर्मे आचरें ॥ भक्ति विरक्ति विवेक विचारें ॥ २ ॥ झांकुनि नेत्र दिवानिशि फिरसी ॥ हरिपदीं रंग भवार्णव तरसी ॥ ३ ॥

### पद २७७. [ चा. सदर ]

गुरु गारुडिया रे नेई ॥ अनिष्ट विलयारे नेई ॥ ध्रु० ॥ भव भयानक दुर्जय सर्पे ॥ भूलविलें मज दंशुनि दर्पे ॥ १ ॥ वीष पियूष पीयूष हलाहल ॥ शीत गमे वडवानल केवळ ॥ २ ॥ सत्वजळें निर्विष करिं मातें ॥ वारुनि स्नेह निवारीं तमातें ॥ ३ ॥ प्रकृतिचा पल्लव न लागावा ॥ जागरणीं हरि जागर गावा ॥ ४ ॥ निस्तरंग निर्मंदर सिंधु ॥ तोचि रंग रंगवी दिनबंधु ॥ ५ ॥

### पद २७८. [ चा. सदर ]

शेजे कैं निज येईल गे ॥ ध्रु० ॥ नामरूप गुण मीपणसंगें ॥ विविध न होईल गे ॥ १ ॥ स्वगत सजाति-विजातिय-भेदें ॥ मेळुनि नेईल गे ॥ २ ॥ देश काल आणि वस्तु विचारि ॥ एकचि होईल गे ॥ ३ ॥ सोहंभाव त्रिपुटिविवर्जित ॥ प्रत्यय येईल गे ॥ ४ ॥ नाना रंग विचित्र विनादीं ॥ निजसुख देईल गे ॥ ५ ॥ निजरंगीं या रंग विचित्रें,......॥ ६ ॥

### पद २७९. [ चा. सदर ]

मी माझें विसरें सहजें ॥ अद्वय एक सरें ॥ ध्रु० ॥ दुःखित जीव भ्रमें भ्रमतां ॥ कारण यासि अहंममता ॥ १ ॥ देहबुद्धि केवळ विषव्याळी ॥ विषलहरें भुवनत्रय जाळी ॥ २ ॥ याचि लागीं श्रुतिस्मृति संग्रहणें ॥ सह करणें मानस निग्रहणें ॥ ३ ॥ हाचि मंत्र सनकादिक गाती ॥ भाविक हृत्कमळिं हरि ध्याती ॥ ४ ॥ विद्वज्जन हृद्गत हा भाव ॥ सहज पूर्ण निजरंग स्वभाव ॥ ५ ॥

### पद २८०.

सखया रे काय जाहालें ॥ तुज तम कां आलें ॥ ध्रु० ॥ भूलले जन नावरे मन आठवि धन स्वजन यौवन ॥ जाणे तो एकाकिं न चुके

॥१॥ स्वहिताचि मात कायसी ॥ गति गमली कैसी ॥ जीव सर्वहि नर नरेंद्रहि ॥ ऋषी मुनिंद्र इंद्र चंद्रहि ॥ काळानळ जाळिल हें न चुके ॥२॥ निजसुरा काय जागें ॥ हरि भजनीं लागें ॥ व्यर्थ श्रम रे कां विषम रे ॥ सांडिं भ्रम रे स्वहितीं रम रे ॥ रंगें निजानंदचरणीं ॥३॥

पद २८१. [ चाल यारे सज्जनहो यारे. ]

परिसारे संसार सार कसा रे ॥ मायिक सर्व पसारे निजसुरे कां रे सारे ॥ रगडिल काळ घसा रे ॥ यातना भव वळसा रे ॥ लुब्ध कां विषयरसां रे ॥ षड्वैरि प्रध्वंसा रे ॥ साधुसि वृत्ति पुसा रे ॥ ध्रु० ॥ अरे जागा सच्छास्त्र-प्रमेय विभागा ॥ इह परत्र भोगां त्यागा ॥ साधुनि शम दम योगा ॥ अनुरागें गुरुपदिं लागा ॥ अक्षय अभय वर मागा ॥ निस्तरुनियां भव-रोगा ॥ साम्राज्य पदवी भोगा ॥ निर्द्वंद्व सदनीं वागा ॥१॥ अरे या या या पथेचि सर्व तराया ॥ वैराग्ययोगें काया ॥ श्रमविली स्वहित कराया ॥ ब्रह्मैक्य भावें माया ॥ ग्रासिली स्वपद वराया ॥ निजरंग पदीं रमले या ॥ विसरे आप-परा या ॥ निजरुप आपुलें घ्याया ॥२॥

पद २८२. [चाल अभाग्याचा घरीं० ]

आपुलीच क्रिया आपणा तारक मारक ॥ ध्रु० ॥ आपण श्रीगुरुसी भजतां ब्रह्म सायोज्यता ॥ न भजतां जाणें अधःपाता ॥१॥ आपणें हरि हृदयीं धरणें सुख स्वरुप होणें ॥ विषयासक्तीं नरक भोगणें ॥२॥ आपणें मानितां भेद ॥ विश्व अवघेंचि बद्ध ॥ अभेदीं रंग निजानंद ॥३॥

पद २८३. राग सुलतानी.

कां भार वाहुं उगा संसारिंचा ॥ध्रु०॥ मृगजळाच्या लोटें वाहवला ॥ कोण कोठें निश्चय हा गुरुद्वारिंचा ॥१॥ प्राचिन कर्ममेळें तनु हे सर्वत्र खेळे ॥ साक्षी निश्चित मी सर्वांचा ॥२॥ तापत्रयें तापला न वचें मीं व्यापला ॥ निजानंद रंगीं रंगला साचा ॥३॥

पद २८४. [ राग सारंग ]

गुरु देवदेवा करुणासागरा निजमूर्ती ॥ ध्रु० ॥ रति धरिली अंतःकरणें ॥ विषयीं वेधलीं करणें ॥ भव तरणें कैसें करणें रे ॥ १ ॥ ममता नावरे पापी ॥ तृष्णा त्रैलोक्यव्यापीं ॥ नाहिं तृप्ति हे अद्यापि ॥२॥ आकळिले पंचकोशी ॥ छळिले तापत्रय दोषीं ॥ गिळिलें निर्दळिलें राग द्वेषीं ॥३॥ विवेक दीपक हा लावीं ॥ हारपलों मज मीं दावीं ॥ देउनि निज-

शांती भ्रांती न्यावी ॥ ४ ॥ विविधें भेदत्रयछंदें ॥ वारुनि प्रतिबंधें द्वंद्वें ॥ निज भजनीं रंगविं निजानंदें ॥ ५ ॥

## पद २८५.

निजमूर्ति रामा येरे येरे येरे ॥ ध्रु० ॥ विश्वप्रकाशदीपा ॥ अनंता चित्स्वरूपा ॥ जीवा जीवन तूं अरूपरूपा ॥ १ ॥ निःशब्द सांग गोष्टी ॥ शून्य संकल्प पोटीं ॥ अनंग अंगें देई भेटी ॥ २ ॥ योग वियोग भंग ॥ करिं निःसंग संग ॥ निजीं रंगविं आत्मरंग ॥ ३ ॥

## पद २८६. ( चाल सदर.

श्रीराम अवघा तूंचि तूं मीं नाहीं ॥ ध्रु० ॥ सांडुनियां ममता ॥ तव दास्यीं रमतां ॥ कैंचि मज विषमता रे ॥ १ ॥ लहरीं तरंग उदधी ॥ तैसी हे जीवोपाधी ॥ सहजें मी अद्वय निरवधी ॥ २ ॥ आत्मत्वें पाहतां देवा ॥ श्रुति वदति एकमेवा ॥ निजरूपीं रंग कैंचा दावा ॥ ३ ॥

## पद २८७.

जिविंच्या जीवना माझिया गुरुराजया ॥ध्रु०॥ नवविधा भजनें देव ॥ तोषला दावी ठाव ॥ निजमोक्षा हाचि उपाव ॥ गुरुचरणीं भाव ॥१॥ श्रुति हा निर्वाह वदति ॥ ज्ञानेंचि कैवल्यप्राप्ति ॥ गुरुकृपें ज्ञानप्रतिति ॥ सिद्ध विश्रांति ॥२॥ शुक सनकादिकहि गाति ॥ जनकादिक ब्रह्मादिक ध्याति ॥ स्तविति रंगोनि तव कीर्ति ॥ जय जय निजमूर्ति ॥३॥

## पद २८८. [ कामाचे मजूर ]

तो योगिराज सहजें मीपण मावळलें नो बोलवे बोले ॥ध्रु०॥ कृष्णरूपीं जडली प्रीती ॥ कृष्णमय जाहली वृत्ती ॥ पालटली पूर्वस्थिति रे ॥ १ ॥ सहज स्वभावें बोले ॥ सहज स्थितिनें चाले ॥ सहज स्थितिनें हाले डोले रे ॥ २ ॥ अहेतुकें खेळे खेळा ॥ रंगली अतर्क्य लीळा ॥ निजसुखें भोगी सोहाळा ॥ ३ ॥

## पद २८९. [ चा. सदर ]

तूं पाहें रे हाचि उपाय थोर आहे ॥ ध्रु०॥ देह गेह दारा पुत्रीं ॥ जैसी वाढलि मैत्री ॥ तैसी सर्वत्र भूतमात्रीं ॥१॥ जैसें स्वप्नींचें दुरित ॥ कैंचें वो त्या प्रायश्चित्त ॥ तैसें प्रबोधीं विश्व-मुक्त ॥२॥ प्रारब्धें वर्ते देहीं ॥ देहातीत तूं पाहीं ॥ सत्य स्वानंदें सौख्यें राहीं ॥३॥ देहींचें कर्माचरण ॥

तितुकें ब्रह्मार्पण ॥ करिं कां सांडुनि मी-तूंपण ॥४॥ निजानंद चित्सागरी ॥ रंगे होउनि लहरी ॥ उरली अद्वैतासि नाहीं उरी ॥५॥

पद २९०. [ राग—धनाश्री, चा. न्हाणी न्हाणी या निर्मळा ]

सिद्ध स्वानंद कीर्तनीं गाय नाचे ॥ जेथें वाद ठेले श्रुतिगायनाचे ॥ कोण वर्णी त्या विलासवैभवाचे ॥ ऐसें भागवतीं भगवान बोले वाचें ॥ध्रु०॥ वेदवाक्यें सत्कर्मपंथें चाले ॥ भेदवादी षड्वैरी विलया नेले ॥ खेदकारी नाकळे दुरी केले ॥ सद्गुरु बोधें स्वानंदसौख्यें डोले रे ॥१॥ शांति शोभली विश्रांति आली खेळा ॥ दृश्य द्रष्टत्वें चिन्मात्र झाला डोळा ॥ निजानंदें बाणली अतर्क्य लीला ॥ रंगीं रंगला हो अनिर्वाच्य सोहळा ॥ २ ॥

पद २९१. [ चा. रा. स. ]

सद्गुरुकृपें कल्याण ऐसें झालें ॥ द्वैताद्वैत निरसूनि ह्मण ते नेले ॥ध्रु०॥ अनुभवपंथें निरखितां देहभाव ॥ देह नाहीं विदेह ह्मणणें वाव ॥ लटिकें नसतां साचपणा कैंचा ठाव ॥ गेले गेले समूळ भावाभाव ॥१॥ गेला भाव अभाव कैंचा आतां ॥ देव म्हणणें हा ठाव नाहीं भक्तां ॥ समरस कां तो हेतु नाहीं हेता ॥ शून्यीं भरला निःशून्य रामदाता ॥ २ ॥ ऐशी खूण दावीतो सद्गुरुराव ॥ नुरेचि जेथें तात्काळ सोहंभाव ॥ सुखदुःखाचें तें गेलें भेदक नांव ॥ रंगेवीण रंगला एकमेव ॥ ३ ॥

पद. २९२ [ चा रा. स.

खेळे गोकुळीं मोकळी शोभे राधा ॥ न दिसे वेगळी कायसी विषयबाधा ॥ ध्रु० ॥ कृष्णीं राधिका रातली भक्ति गोपी ॥ सौख्यें मातली ते देहभावा लोपी ॥ भेद भावना ओपिली चित्स्वरूपीं ॥ निगमा नाकळेसि झाली सर्व व्यापी ॥ १ ॥ दळितां कांडितां न स्मेर रूप नांव ॥ सरलें मीं माझें संकल्प झाला वाव ॥ पांवा वाजवी तों पांवा दावी भाव ॥ सहजें हाले डोले हेतु नाहीं ठाव ॥ २ ॥ लागे ताप तो विक्षेप न लावी अंगीं ॥ सत्ता बाणली नैराश्य भोगीं त्यागीं ॥ देहीं विदेहता निःसंग सर्व संगीं ॥ निजानंदें रंगली कृष्ण रंगीं ॥ ३ ॥

पद २९३. [ चा. रा. स. ]

भोळी बापुडि मी काय ऐसें जाणें ॥ यासि ओळखे ऐसे वो कैंचे शहाणे ॥ बाई मज घेतलें हो येणें जिवें प्राणें ॥ सखीं लोकीं कीं खुंटलें येणें जाणें ॥ ध्रु० ॥ मी भाळली ये गोड याच्या बोला ॥ येणें सर्वस्वेंशीं

घात माझा केला ॥ सर्व प्रपंच हा शून्य होउनि ठेला ॥ मी वो तुटली या संसाराच्या मोला ॥ १ ॥ गेलें मी माझें समूळ करूं काय ॥ तुटले सासुरें माहेर पाहा माय ॥ येणें मोडिले विचाराचे पाय ॥ नाद जेंगटाचा जेंगटीं समाय ॥ २ ॥ यांच्या शब्दा नाहीं एक तोही बंद ॥ येणें मोडिला संसाराचा कंद ॥ दिननिशीं लागला याचा छंद ॥ रंगीं रंगला स्वामी निजानंद ॥ ३ ॥

### पद २९४. [ चा. रा. स. ]

नाहीं नाहीं सद्विवेक भक्ति विरक्ति ॥ लोभ मोहें अत्यंत विषयासक्ती ॥ ध्रु० ॥ निगमागमिचा सारांश नेणे सहसा ॥ साधु वदती भावार्थ न धरीं तैसा ॥ गुरुच्या बोधें सागरीं मेघ जैसा ॥ रजतमसंगें मातलों सादृश ह्मैसा रे ॥१॥ आशा देहीं रसना रस विषयीं लोळे ॥ मन धन मानीं रत कामविलासीं खेळें ॥ नाना युक्ति चालविले लोक भोळे ॥ केलीं रजनि दिवसाचि झांकुनी डोळे ॥ २ ॥ शिकविं इतरांतें नाहीं माझे अंगीं ॥ शासन न मनीं विधी लंघुनि प्रमत्त भोगीं ॥ पतितोद्धारी तूं पावें मजला वेगीं ॥ निज सखया रे प्रकटें तूं अंतरंगीं ॥ ३ ॥ ब्रीदें आपुलीं सांभाळी अनाथबंधु ॥ मीं अन्यायी रे तूं तव निजानंद करुणा सिंधु ॥ ४ ॥

### पद २९५ [ चा. रा. स. ]

असत्यादि वशें कां सखिये पडिला घाला ॥ मीपण वैरी कोठुनियां आजि निघाला ॥ ध्रु०॥ शेजे असतां कामीपण झालें जागें ॥ तें मीं माझें म्हणउनियां सैरा वागे ॥ अरि षड्वर्गें आक्रमिलीं शरीरदुर्गें ॥ कोण निवारी कवण वो कवण्या खर्गें ॥ १ ॥ माझें ह्मणतां झगटली चिंता व्याळीं ॥ त्या विषलहरें सर्वांगें जाळी काळीं ॥ तृष्णा झेंडु दाटला कंठ-नाळीं ॥ उतरुनि विष हें कवण वो मजला पाळी ॥ २ ॥ जीववा प्राणा तो प्रताप दिनकर आणा ॥ निर्विषकर्ता रिपुसंहर्ता गुरुराणा ॥ दुःसह-चिंता अहंममता छेदक जाणा ॥ त्या निजरंगें रंगतां संकट कोणा ॥ ३ ॥ विजयी विजयी निर्द्वंद्व निजानंदें ॥ घाव निशाणिं घातला निज सुख-छंदें ॥ ४ ॥

### पद २९६. [ अष्टपदी. चा. प्रिये चारुशीले ]

सये कैं मनोरथ जगन्नाथ पुरवी ॥ देऊनि अभय भवसिंधु तरवी ॥ध्रु०॥ लेश विश्रांतिचा प्राप्त नाहीं भवभ्रांति दिग्मंडळीं व्यर्थ फिरवी ॥ क्षीण

बहु वाटतो आटवींता पुनर्जननमरणावळी कोण सखी ॥१॥ साधुसंगें अभिप्राय सच्छास्त्रिंचें शोधितां साधली युक्ति बरवी ॥ भक्तिविरक्ति भगवत्प्रबोधामृतीं मातली बुद्धि संकल्प नुरवी ॥२॥ ब्रह्मसाम्राज्य स्वानंदयोगें असंभावना शांति निर्द्वंद्व करवी ॥ रंगला पूर्ण निजानंद जनिं वनीं सायुज्य संपदा छत्र धरवी ॥ ३ ॥

### पद २९७. [ चा. सदर. राग भूप ]

जगीं साधु विरळा जगीं साधु विरळा ॥ क्वचित् डोळस इतर लोक तिरळा ॥ हंस कोकिळ शुका काक उलुका बका सारि काय माणिका आणि हरळा ॥ ध्रु०॥ नाचरे वेदोक्त मूढ विषयासक्त यातना दुःख दुर्वार भोगी ॥ सुजन सद्भक्त साधन चतुष्टय युक्त गुरुमुखें उपनिषत्सार भोगी ॥१॥ ज्ञानानळें अहंमम पाश जाळिले वाळिले षड्वर्ग श्वपच जैसे ॥ वारणाचा प्राणहरण तो केसरी संहरी छेदभेदादि तैसे ॥ २ ॥ निज सुखें विराजतो संपूर्ण सहज तो ब्रह्मबोधेंचि गंभीर जाहला ॥ रामरूपें सदानंद चिद्धन तनू श्रीगुरुदत्त संप्राप्त त्याला ॥ ३ ॥ असा ईश तो रंगला सर्व रंगीं ॥ जसा शोभताहे क्षिराब्धीतरंगीं ॥ ध्रु० ॥

### पद २९८. [ चा. सदर ]

हरी तंतु जगदंबरीं एकला हो ॥ घेति हा सज्ञान लोक लाहो ॥ध्रु०॥ लक्षिजे पटुवरीं तंतु शेवटवरी धन्य सारांश ज्या फावला हो ॥१॥ नामरूपा नाश वस्तुते अविनाश येथ किंचित् दोष पातला हो ॥ उर्ण नाभीपरी व्याप्य व्यापक हरी विदुष सद्भावने रातला हो ॥२॥ हेम नग जळ ओघ मृद्भांड हा मोघ घोष जगदूदरीं मातला हो ॥ चित्सदानंद निजरूप अभंग का मुद्रिके रंग हा घातला हो ॥ ३ ॥

### पद २९९. [ चा. सदर ]

हरे धांव रामा हरे पाव रामा ॥ तव पदीं मन रमो विषयांसि उपरमो जनकजाजि^वन कल्याणधामा ॥ ध्रु०॥ वारितां दुरित करें चित्त विषयीं भरे नावरे वावरे दुःख सदनीं ॥ याचि लागुनि वदें पतितपावन-ब्रिदें अट्टहासें तुतें वदत वदनीं ॥१॥ षड्रिपू ये कळीमाजि पैं आकळीसा नसे रे बळी तुज हि परता ॥ धांव पावें जिवें ग्रासिलों या भवें त्वरित घे तुजमाजि करुनि सरता ॥२॥ अखिल निज शांति दे, भ्रांति नासुनि पुरी, वातिच्या परि मतें विषय गमवीं ॥ अंत्यजाचें परी वृत्ति सारुनि दुरी श्रुति नेति व-

दती मन तेथ रमवीं ॥ ३ ॥ शेष प्रारब्ध निःशेष नाशे जंव तंव जिवन्मुक्त सुख देईं मजला ॥ स्वामी निजानंद चरणकमळीं चित्त रंगवीं इतर न मागोंचि तुजला ॥ ४ ॥

## पद ३००. [ चा. संत दयाळ ]

हरिजन हरिसम रे भावुनी पद भजनीं रम रे ॥ भवसागर मृगतोय विभासे ॥ मग कैचा श्रम रे ॥ ध्रु० ॥ धरितां भावार्थां येणें साधिसि परमार्था ॥ सर्व अनर्थां चुकवुनि आपुल्या जोडिसि निजस्वार्था ॥१॥ वरितां हे चाली माया ममता मृत झाली ॥ वानिति वेद पराक्रम हरुषें पूर्ण दशा आली ॥२॥ जन्म अनंताचा झालों अंकित संतांचा ॥ निज रंगें नाचतसे गर्जत पावन त्रिवाचा ॥ ३ ॥

## पद ३०१. [ कळों आली माव रे या चालीवर ]

भक्तांचा विश्राम रे अंकिला श्रीराम रे ॥ कैवल्याचें धाम भक्तां करी पूर्ण काम रे ॥ध्रु०॥ अंबरिषासाठीं रे दुर्वासाच्या पाठीं रे ॥ लाविलें स्वचक्र कृपा सद्भक्तांचि मोठी रे ॥ १ ॥ घेतां आळी बाळकें त्यासि विश्वपाळकें ॥ ॥ क्षीरसिंधु दिला मुनिमानसमराळकें ॥२॥ होता ऋषीशाप रे जाहलि शीळारूप रे ॥ चरणरजस्पर्शें झाली अहल्या निष्पाप रे ॥३॥ हाणोनियां चक्र रे विदारिला नक्र रे ॥ गजा गौरविलें तैसें न पवेचि शक्र रे ॥४॥ द्रौपदीची लाज रे रक्षी महाराज रे ॥ पांडवांचे घरीं करी सर्वस्वेंशीं काज रे ॥५॥ प्रल्हादाच्या बोलें रे अत्यद्भुत केलें रे ॥ अव्यक्त रूपडें भक्तालागीं व्यक्त जाहलें रे ॥६॥ रामीं रत चित्त रे तेचि भक्त युक्त रे ॥ निजानंदें रंगुनियां जाहले जीवन्मुक्त रे ॥७॥

## पद ३०२.

मनुजा जागरे स्वरुपीं जागरे ॥ ध्रु० ॥ कायसा भ्रम कां अहंममतावनीं भ्रमसी वृथा ॥ भज भज सत्पथा, वद भगवत्कथा ॥ १ ॥ जाग जाग असार भाग त्याग त्यजुनि वाग स्वमंदिरीं ॥ भ्रम टाकीं दुरी, भज भज श्रीहरी ॥२॥ काय सार्थक इंद्रियार्थ अनर्थकारक सर्वदा रति न धरी कदां ॥ भज भगवत्पदा ॥३॥ पंचकोश षडोर्मि षड्रिपु राग द्वेष त्रिताप रे ॥ अति संताप रे ॥ धरि अनुताप रे ॥४॥ सत्समागम शास्त्रसंगम, सुगम हाचि उपाय रे ॥ चुकवि अपाय रे ॥

धरि गुरुपाय रे ॥५॥ श्रीगुरुपदपंकजीं मन रंगतां निज पावसी ॥ परम सुखावसी ॥ स्वपदीं स्थिरावसी जागे रे ॥६॥

पद ३०३. [ कवण तुम्ही कवणाचे या चा. ]

मनुजा सावध सावध रे ॥ सावध सावध काळ-व्याळ तुज गिळीतसे सगळें ॥ देव दयानिधि श्रीगुरु गारुडी पालवी भावबळें ॥ ध्रु० ॥ हित अहित मना न विचारिसी झांकुनि नेत्र सदां ॥ कामकर्दमीं लोळसि निशिदिनिं मानुनि सौख्यप्रदा ॥ वीज लवोनि सरे सुख तेविं सवेग घडे आपदा ॥ इंद्रियग्राम विराम पडे मग बोलसि राम कदां रे ॥१॥ सिंह जळीं प्रतिबिंब विलोकुनि घालित तेथ उडी ॥ हंस गगनिंचा तारा उदकीं निरखुनि देत बुडी ॥ मूढ कमा मृग नाभि उपेक्षुनि हिंडत बुद्धि कुडी ॥ तेविं सखा हरि सांडुनियां दुरी फिरसी देशधडी ॥२॥ इंद्रजाळ मृगतोय जसें जगडंबर हा विलसे ॥ स्वप्नदशे गज मत्त तुरंगम संभ्रम तेविं दिसे ॥ क्रूर भवार्णवकर्णधार गुरु आन उपाय नसे ॥ पूर्ण रंग निज रामपदीं मग दुर्गम काय असे ॥३॥

पद ३०४. [ झेलारे भाईनो झेलारे ]

नमन सर्वगता स्वामी श्रीगुरुसमर्था रे ॥ स्थूल सूक्ष्मीं लक्षितां सर्वहि तुझाचि तूं तत्वता रे ॥ नाना वाद्यध्वनी परि ते नादीं एकात्मता रे ॥ तैसी द्वैतवार्ता नाहीं तुजमाजिं सर्वथा रे ॥ ध्रु० ॥ अनेक दिसती व्यक्ती वसुधा शोभे त्या त्या रितीं रे ॥ नद नदि वापी कूप उदकीं नाहीं भिन्न जाती रे ॥ घट मठ महदादिकीं नभ हें निर्विकार स्थिती रे ॥ उत्पत्ति स्थिति कल्पांतीं निश्चळ अविनाश निजमूर्ती रे ॥ १ ॥ सर्वभूतीं जगदीश गुज हें सांगे वेदवाणी रे ॥ हाचि निज निर्वाह केला शास्त्रीं आणि पुराणीं रे ॥ सज्जन चिन्मय खाणी हे सुख सांगति तें निर्वाणीं रे ॥ दयाळ साधक जना बोधिति माथां ठेउनि पाणी रे ॥ २ ॥ अस्तिभावें पाहातां विश्वचि न पडे ठावें रे ॥ अन्वयव्यतिरेकेंविण उरलें नित्य शुद्ध स्वभावें रे ॥ सहज पूर्ण तें निजानंद पद कवण्या रंगें घ्यावें रे ॥ तन्मय होउनि गर्जति श्रुति अज अनिर्वाच्य नांवें रे ॥ ३ ॥

पद ३०५.

[ ठाडे वीटपर नीट कटीपर या चा. कबीरधाटी अभाग्याच्या घरीं ]

कैसी घेतलिसे पाठी जाहली जीवत्वाची साठी वो ॥ मुळिंचें वैर

साधिलें न बोलवे आटाआटी वो ॥ ध्रु० ॥ अवचित याची दिठी पडतांचि नाहीं नाहीं केलें रे ॥ अहंपणाहि लागुनि नुरवी बोले तितुकें ठेले वो ॥१॥ अघटित घटना मायापट हा माझा नेउनि जाळी वो ॥ करूनि उघडी घालवि फुगडी दुर्धट हें कपाळीं वो ॥२॥ हा नाहीं म्हणवुनि जाय तेथें प्रकट याचे पाय हो ॥ सर सर परता म्हणतां न ये निकट ये अपाय वो ॥३॥ नाडियलें बहु येणें याच्या ऐकत होतें गोष्टी वो ॥ नामरूपहि नुरवी मी पडियलें त्या संकटिं वो ॥४॥ अनाथ मी मज न दिसे कोण्ही पडिलें मौनाचि पाहीं वो ॥ दावि तैं निर्वैर निजानंदीं रंग नाहीं वो ॥५॥

## पद २०६. [ चा. सदर ]

आतां चोज सांगों काय कैसा हरविला डाय रे ॥ बुडविली नौका पालवीं नावाडा गुरुराय रे ॥ ध्रु० ॥ लटिकें लटिकें होय तयाचा शोक तुज कां लागे रे ॥ साचपणें तुजमाजीं विलासे तेथ मन न जागे रे ॥१॥ शुक नळिकेसी पडला त्यातें काय किजे कोणें रे ॥ फिरतसे दश दिशा मृग नाभींचा सुवास नेणें रे ॥२॥ या खुणा जाण सुजाणा तये लक्षण उमाणु रे ॥ निजानंद तो मुळिंचा रंग दुजा कोठुनि आणूं रे ॥ ३ ॥

## पद २०७. [ चा. सदर ]

बोलि फळ ते काय खोली विचार करूनि पाहीं रे ॥ अमृत म्हणतां अमर होइजे स्वप्नींहि न साहे रे ॥ ध्रु० ॥ लटिकें म्हणती परि लटिकें त्याला ठाउक जाहलें नाहीं रे ॥ लटिकींयाचा शोक विराला त्यासिच कळलें पाहीं रे ॥१॥ स्वप्नींचा प्रतिभास लटिका जागृतिसी होय रे ॥ तैशी दृश्य पदार्थीं मिथ्या प्रतिती तरि निज सोय रे ॥ २ ॥ आत्मविलासीं राहे महिमा वर्णी कोण वाचे रे ॥ संगविना निज रंग तयाशींच निजानंद सुख साजे रे ॥ ३ ॥

## पद २०८. [ चा. सदर ]

सादर परिसा माय वो सुंदर गुरुचे पाय वो ॥ निववीलें सर्वांगें मीं उतराई होऊं काय हो ॥ ध्रु० ॥ घेतां याचें नाम वो निःशेष गेला शीण वो ॥ न बोलवे मज बोलें अनुभवियें जाणाति खूण वो ॥ १ ॥ सिद्धि गेलें काज माझें सरलि लोकलाज वो ॥ सहजसमाधीयोगें सखिये हातां आलें नीज वो ॥ २ ॥ बोधिं भेद निमाला सरला भावाभावसंग वो ॥ निजानंदभुवनीं जाहल्या मतिविण वृत्तिक रंग वो ॥ ३ ॥

### पद ३०९ [ चा. सदर. ]

अैट हात ह्मणवितसें तो मी ब्रह्मांडीं न माय वो ॥ केलें या गुरुरायें विपरित विपरित सांगों काय वो ॥ ध्रु० ॥ अस्ति भाति प्रिय रुप या बोधें जग हें दृष्टिसि नाणी वो ॥ वारंवार तनु हे वागे तव मी गुरु नाम वाखाणी वो ॥ १ ॥ नेति नेति या दृश्य विभागीं अधिष्ठाना आलें वो ॥ मुळिंचें सुखरूप माझें या निज निर्वाहींच ठेलें वो ॥ २ ॥ शोधनक्रम श्रुतिसार सिद्धिपद अनिर्वाच्य साजे वो ॥ रंगलिं ये मीं निजानंद-पद साम्राज्य वीराजें वो ॥ ३ ॥

### पद ३१० [ बाळा जु जु जू० या चा. ]

विचित्र लाघवि हा गुरुराणा ॥ अगम्य वेदपुराणा ॥ ध्रु० ॥ पल्लव सारियला मस्तकींचा ॥ रमणीय हा हस्तकींचा ॥ १ ॥ निर्णय कर्णपुटीं मज बोले ॥ तें गुज वर्णित शिव डोले ॥ २ ॥ लाऊनि पदभजनीं निज गोडी ॥ हृदयग्रंथी सोडी ॥ ३ ॥ अलक्ष लक्षें नाम जपकर्णी ॥ कोटि लोपले तरणी ॥ ४ ॥ कैसा रंगला गुरु राम ॥ जो निजानंद निष्काम ।५।

### पद ३११. [ चा. सदर ]

जाणति गुरुपदिंचे अभिलाषी ॥ चिन्मयभुवन-विलासी ॥ ध्रु० ॥ बोल सतेजपणें वदनाचे ॥ जे शर भवकंदनाचे ॥ १ ॥ आवाडें नाम तयाचें गातां ॥ अनामय पद ये हाता ॥ २ ॥ संगें भवसंगाप्रति हरिलें ॥ देह विदेह सरलें ॥ ३ ॥ मानस ठेवियलें समचरणीं ॥ तव हरपली नभ-धरणी ॥ ४ ॥ निजसुख सत्य ज्ञानानंत ॥ जेथ रंगले संत ॥ ५ ॥

### पद ३१२. [ राग कलंगडा ]

याचि पंथें जातां भय नाहीं रे ॥ निश्चय बोलती चारी साही रे ॥ ध्रु० ॥ सत्कर्म जागरीं देह जागवा रे ॥ देवद्विज-गुरुदास्य वागवा रे ॥ १ ॥ रामकृष्ण शिव बोला वाचे रे ॥ निंदा अपशब्द त्याग यांचा रे ॥ २ ॥ मानसीं असार सार शोधा रे ॥ निजानंदें रंगुनि तत्त्व बोधा रे ॥ ३ ॥

### पद ३१३.

तरोनियां तारक तोचि जाहला ॥ कोण मानी मानवी देह त्याला ॥ ध्रु० ॥ पियूषाची न पुरे धनी जैसी ॥ गुरुदास्यीं आवाडि जयां तैसी ॥ १ ॥ विश्रांतिसी आलिया क्षमा शांति ॥ ऐक्य-बोधें सारिली दृश्य भ्रांति

॥ २ ॥ स्वसत्तेनें चिद्रुप विश्व पाहे ॥ नित्य पूर्ण एकलेपणें राहे ॥ ३ ॥ त्रिविध भेद त्रिविध परिछेद ॥ निजांगें हा नातळे जया खेद ॥ ४ ॥ निजानंदें रंगला सर्व काळीं ॥ मोक्ष पायांचि धुळी धरी भाळीं ॥ ५ ॥

पद ३१४. [ चा. सदर ]

तें मज दिधलें सभाग्य गुरुरायें ॥ त्याचे उतराई होऊं आतां काय ॥ ध्रु० ॥ ब्रह्मा विष्णु महेश तिन्ही देव ॥ ते जें देऊं न शकति स्वयमेव ॥ १ ॥ ब्रह्मचारी गृहस्थ वानप्रस्थ ॥ संन्याशाचा न पवे जेथें हस्त ॥२॥ तीर्थाटणें करितां धूम्रपान ॥ नाना साधनें न टके पैं जें स्थान ॥ ३ ॥ वेद श्रुति राहिल्या मौन जेथें ॥ निजानंदीं मीनला रंग तेथें ॥ ४ ॥

पद ३१५. [ चा. सदर ]

माझे प्राचीन तोडीं देवराया ॥ वेळोंवेळां लागेन तुझिया पायां रे ॥ध्रु०॥ तुझे पायीं आवडी माझी मोठी ॥ तोंडभरी सांगेन तुजशीं गोष्टी ॥ १ ॥ माझें प्राचीन अनावर पाही ॥ तुला तोडितां वेळ नलगे कांहीं ॥ २ ॥ देवराया कांसया रुसलासी ॥ मी तव अनन्य शरण तुझी दासी ॥ ३ ॥ मायबापा वियोग सहावेना ॥ तुजवीणें क्षणभरहि राहावेना ॥ ४ ॥ तुझे पायीं रंगलों कृपा करीं ॥ निजानंद तूं जनक जननी बरी ॥ ५ ॥

पद ३१६. ( चाल—कामाचे मजुर. )

रामरंगें रंगली ये बाई वो ॥ ध्रु० ॥ पंचभूत सर्व सृष्टि ॥ कर्ता कार्य दृश्य दृष्टि ॥ अंतरंग भासे ठायीं ठायीं वो ॥१ ॥ देहादि इंद्रियें प्राण ॥ चित्तचतुष्टय जाण ॥ रामरूपीं वाव सांगों कायी वो ॥२॥ सहज पूर्ण निजानंद ॥ हाही जेथें बोल मंद ॥ अनिर्वाच्य रंगुनियां पायीं वो ॥ ३ ॥

पद ३१७. [ राग कलंगडा. ]

निर्लज्जा साधिलें काज काय रे ॥ गर्भभारें श्रमविली माय रे ॥ ध्रु० ॥ अमृताचे ताटीं जाण ॥ कांजी वोगरुनी प्राण ॥ रक्षणासि सेविसी रसोय रे ॥ १ ॥ इंद्रियां देउनी लळे ॥ कांसया झांकिले डोळे ॥ काळ वेळ टाळिला नव जाय रे ॥ २ ॥ कामाची आंदण दासी ॥ क्षोभाची केवळ रासी ॥ मोहें नाडलासी हाय हाय रे ॥ ३ ॥ मानवी देहाचें भाग्य ॥ कैवल्यपदासी योग्य ॥ धिःकारिलें केवीं तृणप्राय रे ॥ ४ ॥ सार हा उपाय रे ॥ निजानंदें राहें रे ॥ प्रेमरंगें शिरीं धरीं पाय रे ॥ ५ ॥

### पद ३१८. ( राग व चाल—सदर)

मना नाचविसी काय बाह्य सोंग रे ॥ जाहला नाहीं अंतरंग रे ॥ ध्रु० ॥ वरदळ वेष रे नाहीं सुखलेश रे ॥ यश केविं पावसी निर्दोष रे ॥ १ ॥ वोडंबरीं भाव रे जळीं बक ठेवि पाव रे ॥ वायस बोलतो काव काव रे ॥२॥ सर्व अंतवंत रे साक्षि भगवंत रे ॥ सर्वज्ञ बोलति साधु-संत रे ॥ ३ ॥ साधुसंगें सार रे ॥ श्रुतिचें जिव्हार रे ॥ नेणसी तैसाच भूमिभार रे ॥ ४ ॥ श्रुतिवाद मंद रे तरिच निजानंद रे ॥ रंगुनियां सांडीं नाना छंद रे ॥ ५ ॥

### पद ३१९.

राहें राहें रे भुललासि मना ॥ दुःखदायका सांडि कामना रे ॥ध्रु०॥ जन रंजवुनि करिसि चारा ॥ जाहलें हित काय येणें अविचारा रे ॥ १ ॥ वेष साजीरा सैरणी दावी ॥ सती उत्तम काय ते वदावी रे ॥ २ ॥ रसीं वावरे दर्वी वरवंटा ॥ तैशा चाळिसी युक्ति बरवंटा ॥ ३ ॥ अहंममतेच्या चुकविं पापा ॥ निजीं रंगुनि धरीं अनुतापा रे ॥ ध्रु० ॥

### पद ३२०.

वाटे चोज तुज मज भिन्न भेद काय ॥ चाल संतांपाशीं लावितील सोय ॥ ध्रु० ॥ जैसा जळाचा सुत कल्लोळ ॥ जैसा ज्वाळाचा स्फुलिंग बाळ ॥ वंश युगाचें निमिष्य पळ ॥ तैसा जीव मीं आत्मया तुझा खेळ रे ॥ १ ॥ घटा प्रसवली सांग काय धरा ॥ हेम व्यालें केविं अलंकारा ॥ तंतु पटिंची कायसी परंपरा ॥ तैसा नामरूप पावलों मी बरा ॥२॥ गोष्टी गोड गोड प्रमेय उत्तम ॥ तेणें तोषें तोषला आत्माराम ॥ कार्य कारण मिथ्या परिणाम ॥ निजानंद रंगला पूर्ण काम ॥ ३ ॥ नाहिं नाहिं अभेदीं देखिला भेद ॥ ब्रह्म अद्वितीय कायसा वाद ॥ध्रु०॥

### पद[1] ३२१. [ चाल—सखया रामा विश्रांति तुझे० ]

सजणा अंतर निववीं सांगे गोष्टी ॥ थोर भाग्यें जाहली तुझी भेटी

---

१. काशी येथील परमहंस श्री सच्चिदानंद स्वामी श्री विश्वेश्वराजवळ निजानंदसुख प्राप्त व्हावें म्हणून अनुष्ठान करीत होते. त्यांस निगडी येथें श्री रंग-नाथस्वामींकडे जावें म्हणजे तुमचे हेतु पूर्ण होतील म्हणून दृष्टांत झाला. त्याप्रमाणें ते निगडीस येऊन त्यांनीं रंगनाथाशीं संवाद करून निजानंदसुख अनुभविलें. त्या प्रसगाचें हें पद्य आहे.

॥ ध्रु० ॥ भला भेटलासि जिवलग गडी ॥ माझे जिविंची एक आवडी ॥ कांहिं बोलों स्वसुखा परवडी ॥ जेणें नाशती संशयकोडी रे ॥ १ ॥ राम विश्वीं कीं विश्व हें रामीं ॥ जाहल्या प्रतीति वर्तणें केविं कर्मी ॥ प्राचिन क्रियमाण केविं तया नेमी ॥ जीव शिव एकते कायसे दोनी नामीं ॥ २ ॥ बोलीं तोषला बोलत संवगडा ॥ तूं तरी सुजाण पुससी लोकचाडा ॥ राहें सावध पावसी पद झाडा ॥ थोर भाग्यें जोडला साधुजोडा ॥ ३ ॥ सखया अनुभवीं मुळींचिया खुणा ॥ जाण समूळ सांडुनि जाणपणा ॥ ध्रु० ॥ घटीं मृत्तिका मृत्तिकेंत घट नाहीं ॥ पट वर्ततां तंतुचि सर्वदाही ॥ हेमीं अळंकार तेथ बुद्धिभेद पाहीं ॥ तैसा राम विश्वीं नामरूप पाहीं ॥ ४ ॥ कर्मी वर्ततां सहज संस्कारें ॥ कदां न शिणे कर्तव्य-भोगभारें ॥ ब्रह्मीं हुत झाले ब्रह्मार्पणद्वारें ॥ कर्ता कार्य क्रिया ब्रह्म एकसरें ॥ ५ ॥ ज्ञानकाळीं संचित दग्ध झालें ॥ अहंत्यागेंचि क्रियमाण गेलें ॥ वर्ते प्रारब्ध निश्चया जना आलें ॥ अंगिं नातळे त्रिविध बोधबळें ॥ ६ ॥ दिसे लघुत्वें आकाश घटाकाशीं ॥ मठीं अनेक प्रकारें पाहे त्यासि ॥ माया अविद्या वाउगी निःसंगासी ॥ जीव ईश्वरीं मिथ्याचि नाम त्यासी ॥ ७ ॥ सुखसंवादें दोहिंचे पुरे कोड ॥ प्रीति नागरे बोलतो गोड गोड ॥ ब्रह्मनिष्ठ तो ब्रह्मचि नाहीं भीड ॥ नाहिं दीपा अन्य दिपकाचि चाड ॥८॥ ऐसें अंतरा अंतर एक झालें ॥ तेथें सांगते ऐकते मौन ठेले ॥ दोघां दोनीपण नाहिं ऐसें जाहलें ॥ निजानंदीं रंगलेपण गेलें ॥ ९ ॥ सजणा सच्चिदानंद एकरसीं ॥ उरी तुटली उपमा नाहीं त्यासी ॥ ध्रु० ॥

## पद ३२२. [चाल—अजि अक्रूर हा०]

जरी त्या विसरें विसरें त्याहुनि मरण बरें ॥ ध्रु० ॥ राम निजमूर्ति निजमूर्ति बाप हा निजाचा ॥ सुख विसावा विसावा जीवन या जिवाचा ॥ त्याविण आणिक आणिक मी नेणें त्रिवाचा ॥ फेरा चुकविला चुकविला जन्म आणि मरणाचा ॥१॥ भव हा अजगर अजगर विषय वीष विखार ॥ विषें अहळती अहळती त्रैलोक्यें अपार ॥ ते वेळे गुरुराये त्याचे मुखीं मी मुखीं मी सांपडलों साकार ॥ ते वेळे गुरुरायें गुरुरायें दिधला अभय कर ॥२॥ पाठिसि घातलें घातलें कृपाकरें निवविलें ॥ मग त्या भवसर्पा भवसर्पा क्षणमात्रें निर्दळिलें ॥ अपुले निजपदीं निजपदीं मजला बैसविलें ॥ निजानंदें वो आनंदें रंगवुनि सुखी केलें ॥ ३ ॥

## पद ३२३. [ चाल—अभाग्याच्या घरीं बाबा काम० ]

बाप कृपाळू निजराम हरिला भवभ्रम ॥ पद्महस्तें वो निववीलें तुटला अवघा श्रम ॥ ध्रु० ॥ भवसागरीं बुडतां श्रमलों मी तत्वता ॥ बापें नाभी नाभी म्हणवुनि कर ठेविला माथां ॥ भावार्थ सांगडी लावुनी हरिली माझी चिंता ॥ १ ॥ माझें मीपण वो वैरी हा तेणें इतुकें केलें ॥ वैर साधुनी तयानें भवपुरीं लोटीलें ॥ ते वेळे दयाळुत्वें निजरामें मीपण मारीलें॥ अनंत सुख देवांनी निजपदीं स्थापिलें ॥ २ ॥ लहरि ये लहरी वो आलिंगितां दुजेपण न दिसे ॥ तैसें झालें वो सखिये काय सांगों कैसें ॥ अवघा जनीं वनीं पाहतां निजानंद दिसे ॥ अनुभवें पाहतां अंतरीं निजानंद दुजा रंग न दिसे ॥ ३ ॥

## पद[1] ३२४. [ राग सारंग ]

येई येई वो श्रीरंगे माझे अंतरंगे ॥ करुणा कल्लोळे निजसखये निष्ठुर झालिस् कांगे ॥ ध्रु० ॥ रविशशिविण जैसी दिनरजनी शोभा न पवे माय ॥ वांचुनि घनबिंदु क्षिरसिंधू टाकुनि चातक जाय ॥ मीना जळ नाहीं तरि पाही दधि मधु सेविल काय ॥ तैसें तुजविण वो निजसखिये उपाय ते अपाय ॥ १ ॥ कंठीं कृष्णमणी न विराजे कुंकुम न वसे भाळीं॥ त्याविण वधु सर्वही शृंगारा लेवुनि काय जाळी ॥ मंगळदायक तें अति हरुषें मिरवे जैसी बाळी ॥ तैसें तुजविण हो या विधिनें लिहिलेंसे कपाळीं ॥ २ ॥ करुणा परिसोनी चिद्गगनीं बोले मंजुळ शब्द ॥ सखया सावध रे सावध रे कां करिसी हा खेद ॥ सत्ता एक जगीं विलसतसे तुज मज कैंचा भेद ॥ वियोग भंगला रंगला अवघा निजानंद ॥ विचरें सहज सुखें चिद्भुवनीं जीवन जैसें जिवनीं ॥ विचरें सहज सुखें ॥ ३ ॥

---

१. मार्गशीर्ष वद्य १० शके १६०६ रक्ताक्षि नाम संवत्सर या दिवशीं श्री रंगनाथस्वामी निगडी येथें समाधिस्थ झाले. हें वर्तमान त्यांचे कनिष्ठ बंधु विठ्ठलराव आत्या यांस कळतांच ते सरकार नौकरीहून तिसरे दिवशीं निगडीस आले. त्यांनीं श्रीचे चितेसमीप जाऊन आपले विरहदुःखोद्गार या पद्याचे दोन कडव्यानीं प्रकट केलें तेव्हां चितेंतून त्यांचे शोकनिरसनार्थ तिसरे कडव्याप्रमाणें ध्वनि झाला. हें पद्य प्रतिवर्षी मार्गशीर्ष वद्य १० चे दिवशीं महोत्सवांत श्रीचे समीप म्हणण्याचा निगडीमठांत परिपाठ आहे.

## पद ३२५.

येई येई वो माउलीये निजमूर्ति ॥ ध्रु० ॥ जगदाधारे विगतविकारे सहजे अव्ययसारे वो ॥ निर्गुण नित्ये निष्कळ सत्ते सत्यज्ञानानंते ॥ १ ॥ अद्वयरूपे सच्चित्स्वरूपे स्वप्रकाशरूपें अनामे वो ॥ अनाप्तकामे निजसुखधामे मुनिजनमनविश्रामे वो ॥२॥ भेदाभेदविवर्जित शुद्धे बुद्धे सिद्धे असंगे वो ॥ निजानंद परिपूर्ण निरामय अक्रिय क्रिय अभंग रंगे वो ॥३॥

## पद ३२६. [ चा. साकी ]

ह्मणवुनि सावध रे ॥ दुर्धर हे रिपु साही ॥ ध्रु० ॥ ज्ञानी पंडित लुंचित मुंडित साधक भोगी त्यागी ॥ निगमपरायण जोतिषी वैदिक दिक्षित कर्मठ योगी ॥ संन्यासी दिगंबर शिष्ट तपोनिधी मौनि आणि वीतरागी ॥ सर्वां वनिता मूळ अनर्थां पाहातां प्रत्यक्ष आगी ॥१॥ नलगत पळ ही चित्त विमोही ईक्षणमात्रें नाडी ॥ दारुण बाणीं वेधी प्राणी तदुपरि कामें ताडी ॥ अर्थें प्राणें बुडवुं जाणें वशीक कर्में गाढी ॥ व्याध वनांतरीं सावध जैसा तैसा नरमृग पाडी ॥२॥ ह्मणवुनि काळें जनिली पैं हीं मूर्तिमंत भवव्याधी ॥ हे राहो विपरीत पाहाहो सावध होउनि आधीं ॥ हरिभक्त सदां नर त्यासि दिवाकरनंदन-भृत्य न बाधी ॥ निजराम पदांबुजीं रंगत त्यातें सत्य कदापि न बाधी ॥३॥

## पद ३२७.

रविकुळदीपक दशरथनंदना ॥ दास-तारण अघ-निवारण विमळ वारिजनयना ॥ ध्रु० ॥ विबुध-बंध-विमोचना खर ताटिका तनु छेदना ॥ दानवारिप्रभंजनात्मज ईश सौख्यनिधाना ॥१॥ जनकनंदिनी-मन-सरोवर-राजहंस उदारा ॥ निजसुखालय अखिल रंग असंग जगदाधारा ॥ २ ॥

## पद ३२८.

विपरीत चरित गुरुचरणांबुजीं ॥ दुरित कानन त्यजुनि मुनिजन भ्रमर करिति रुंझि ॥ ध्रु० ॥ जगति तळ आणि विबुधमंडळ विरस भाविति भोग ॥ अचळ अखिळ सुखिं निरंतर रहित योग वियोग ॥ १ ॥ कनक कामिनी गृह सुता सुत विगुतले जन जेथ ॥ इंद्रजाल समूळ मानुनि सुजन न रमति तेथ ॥ २ ॥ सहज पूर्ण सुखीं निजीं निज नित्य निष्क्रिय रंग॥ निर्विचार दशा अहेतुक ब्रह्मरूप अभंग ॥ ३ ॥

### पद ३२९. [ कळों आलि माव रे या चालीवर ]

घडि घडी जीवित सरतें रे ॥ मरण कोण यापरतें रे ॥ नित्य प्रबळ हा नेणुनि फिरसी ॥ करुनियां मुख वरतें रे ॥ ध्रु० ॥ विवेक सांगे गोष्टी रे ॥ काळ लागला पाठीं रे ॥ साधुभक्त सत्श्रवणें रे ॥ चुकवी कोण आटाआटी रे ॥ १॥ दिनकर असतां काय दिवा ॥ साक्षी असतां काय रेंवा ॥ अवतारादिक तेही गेले काय असावध जीवा रे ॥ २ ॥ पाहें हित तें आधीं रे ॥ दुरी करीं भवव्याधी रे ॥ नित्य निरामय अभंग रंगुनि निजानंदसुख साधीं रे ॥ ३ ॥

### पद ३३०. [ चाल सदर. ]

दुर्जय भव हा चुकवा रे ॥ शाश्वत निजसुख पिकवा रे ॥ ध्रु० ॥ क्षण-भंगुर हा देह पाहीं ॥ येईल पुढति श्रुत नाहीं ॥ कीटक जळचर पशुपक्षी यांच्या पडणे प्रवाहीं ॥ १ ॥ प्राचिन संचित क्रियमाणी ॥ कर्मत्रय हे त्रिवेणी ॥ सुकृतदुष्कृत वरी याची अपार भरता हे भरणी ॥ २ ॥ पामर [१]भुलले कीं जन हे ॥ अनुपरि नावरीच मन हें ॥ मूढ रंगेना निजसदनीं ॥ वसवि विषयांचें वन हें ॥ ३ ॥

### पद ३३१.

भुलले मंदमती वर्णव्यक्ती रूप लाविती परब्रह्मासी ॥ अंतरिंचि खुण नेणती तयांसि ब्रह्मप्राप्ति होय कैशी ॥ ध्रु० ॥ कलयुगीं नवलाव नाना मतें धरुनि ज्ञाते झाले घरोघरीं ॥ शब्दज्ञान कथिति चातुर्यपणें खुण न कळे अंतरीं ॥ परमार्थ विचार नेणती अणुमात्र पाखांड घेती नानापरी ॥ गोचिड क्षीरा जवळि असोनि प्राप्ति नाहीं तैसी तयांचि परी ॥ १ ॥ एक अंतःकरण ब्रह्म मानुनि म्हणती हाची मुख्य स्वानुभव ॥ मनापरतें कांहीं नाहीं ह्मणती एक मनचि ब्रह्म स्वयमेव ॥ बौद्धमते एक बुद्धी म्हणती ब्रह्म हाचि मुख्य अनुभव ॥ अंतःकरणीं स्मरणबुद्धिचा निश्चयकर्ता कवण न कळे भाव ॥ २ ॥ एक ते नादिं अनुहत ध्वनी ब्रह्म ह्मणुनि राहिले ॥ एक नेत्रीं बोटें रोवुनि पाहाती ब्रह्म म्हणती जोतिर्मय लक्षिलें ॥ एक शंखचक्र युक्त म्हणती ब्रह्म प्रत्यक्ष आम्हीं पाहिलें ॥ निर्गुण निराकार म्हणती आणि तें चक्षुनें कैसें देखिलें ॥३॥ एक ते शुभ्र वर्ण ब्रह्म आहे म्हणती पाहिल्या-

---

१ दिव्य. शपथेसाठीं तैल तप्त कढईत पंचरसी रवा घालून तो शपथ करणारानें कढईत हात घालून काढावयाची पूर्वी चाल होती.

वांचुनि न दिसे ॥ रहित वर्ण व्यक्ति म्हणुनि बोलती श्रुति तरी तें शुभ्र केवीं असे ॥ वेदां लटिके करूनि आपमतें स्थापिती तयां ब्रह्म न प्रकाशे ॥ शुभ्रचि ब्रह्म तरी तांबडें पिवळें काळें हे काय चोरचि असे ॥४॥ अचिंत्य अव्यक्त अरूप म्हणवुनि बोलती श्रुति शास्त्र वेद ॥ नादबिंदु कळा ज्योति शुभ्र वर्ण यातें जाणे ब्रह्म शुद्ध ॥ अज अव्यय निष्कळ निराभास निष्प्रपंच निजानंद ॥ सच्चिदानंद पद हेंही न साहे तेथें रंगत्वाचा कैंचा भेद ॥ ५ ॥

**पद ३३२. [ आम्ही नमुं त्याला या चा. ]**

तो निज कळेना ॥ दुरितसमूह टळेना ॥ ध्रु० ॥ चिद्ग्रंथि गळेना ॥ शोक मोह वितुळेना ॥ १ ॥ इंद्रियवर्ग समग्रही ॥ विषयसुखा आतळेना ॥ २ ॥ संचित सर्व जळेना ॥ निजरंग सुखें उजळेना ॥ ३ ॥

**पद ३३३. [ चा. सदर ]**

धरावा भाव श्रीरामीं ॥ मुनिजनमनविश्रामीं ॥ ध्रु० ॥ सज्जन संग करावा ॥ षड्रिपु-समुह हरावा ॥१॥ भक्ति विरक्ति विवेकें ॥ मोक्षमार्ग विवरावा ॥२॥ मानुनि देह परावा ॥ अभंग रंग करावा ॥३॥

**पद ३३४. [ चा. सदर ]**

तो नर पशु जाणा ॥ धरिला संसृति-घाणा ॥ ध्रु० ॥ उपेक्षुनि निजस्वरुपा ॥ झाला पात्र स्वयें विक्षेपा ॥ १ ॥ लोकीं मीपण रुढवी ॥ परि मीपण तें त्यातें दडवी ॥२॥ सांडुनि चिन्मय-रंगा ॥ भुलला शड्विकार तनु संगा ॥३॥

**पद ३३५. [चा. सदर ]**

कैसा मीपणें भुललासी ॥ विषयमदें उललासी ॥ ध्रु०॥ राम सुखाची राशी ॥ सांडुनि समूळ मूळ मिरासी ॥१॥ त्यजुनी कमलदलासी ॥ दर्दुर पंकविलासीं ॥२॥ निजरंगीं मन लावीं ॥ मग तुं रामरसायन सेवीं ॥३॥

**पद ३३६. [ चा. सदर ]**

तुजविण राघवा सुख नाहीं ॥ ध्रु० ॥ दृश्य मृषा दिसतांही॥ न बुडें मृगजळ-डोहीं ॥१॥......॥ तुजविण आणिक न गमे कांहीं ॥२॥ निजात्म रंगें दाहाहीं ॥ लावीं भजनप्रवाहीं ॥ ३ ॥

**पद ३३७. [ गुरु देव देवा या चा. ]**

रघुवीरा देवराया ॥ दुस्तर संसारासिंधु तराया ॥ ध्रु० ॥ सच्छास्त्रीं

आवडि लागो ॥ स्वहितीं मानस हें जागो ॥ सज्जन सेविति जें तें सुख मागों ॥१॥ आवडी लावुनियां नामीं ॥ विरक्तिच्या वसवीं ग्रामीं ॥ यश दे षड्रिपुंच्या संग्रामीं ॥२॥ वारुनि संसृतीचा धोका ॥ मारुनि कळिकाळ बोका ॥ निजरंगें रंगुनि तरवीं लोका ॥३॥

### पद ३३८. [ चा. सदर ]

हरिचि मी दासी अंकिलि ॥ प्रज्ञा प्रतिज्ञा बोलें बोली ॥ध्रु०॥ नीति न सांडिं तेणें ॥ राहिलें सकळ भेणें ॥ कीजे आमुचें काय कोणें ॥१॥ नवाविधा चतुर्विधा ॥ बोधें बोधली मेधा ॥ आलें साम्राज्य आत्म-बोधा ॥२॥ यद्यपि जन निंदी वंदी ॥ न पडे त्यांचिये छंदीं ॥ अंतर रंगलें निजानंदीं ॥ ३ ॥

### पद ३३९. [चाल—अभाग्याचे घरीं बाबा०]

एक राम त्यासि काम येर सर्व वाव ॥ निर्भय त्रिभुवनीं सौरी गुरुपदीं भाव ॥ ध्रु० ॥ भाव दावुं काय कौतुक वाटे बाई ॥ चारी साहा विशद हेचि वाजविति घाई ॥१॥ दोनि तिनीचि चारी पांच सारोनियां अंगें ॥ एकी एकपण टाकुनि मीच पुढें मागें ॥२॥ तुटला बंद लागला छंद एक निजानंद ॥ नाना रंग सहजचि नाहीं राहिलें आतां द्वंद्व ॥३॥

### पद ३४०. ( चाल—अभंगाची )

देउनियां चित्त आदरींजे व्रत ॥ हित कीं आहित झालें माझें ॥१॥ परिसावो साजणी संसाराची काहाणी ॥ काय लाजिरवाणी बोलों आतां ॥२॥ नाहीं नाम रूप पडिला तो कपाळीं ॥ कर्म धर्मा टाळी पिटि-यली ॥३॥ आजन्माचें माझ्या झालें हेंचि फळ ॥ याती गेली कूळ शून्य झालें ॥४॥ कांहीं नाहीं तें करावें तें काय ॥ सर्वापरी माय ऐसें झालें ॥५॥ सासुरें माहेर दोन्ही निराकार ॥ कोठें येरझार करूं आतां ॥६॥ आतां हा निर्धार माझी मीच थार ॥ अवघा व्यवहार पूर्ण झाला ॥७॥ एक रंग बाई नाहीं माझे ठायीं ॥ निजानदें काई केलें नेणें ॥ ८ ॥

### पद ३४१. ( अभंग )

काय करावें हो रुपाचें सौंदर्य ॥ निजसुख ऐश्वर्य जेथें नाहीं ॥१॥ काय करावीं हो सुवर्ण-लेणीं नाणीं ॥ नाहीं रामवाणी उच्चाराची ॥२॥ काय करावि हो शास्त्राचि व्युत्पत्ती ॥ अंतरीं विश्रांति जंव नाहीं ॥३॥ काय क-रावें हो पुत्र बंधू जन ॥ न लागतां क्षण पालटती ॥४॥ काय करावें हो

नाना उपभोग ॥ पोटीं क्षयरोग लागलासे ॥५॥ काय करावें हो संगिता-चें गीत ॥ नाहीं हिताहित-विवंचना ॥ ६ ॥ काय करावें हो नाना छंद बंद ॥ नाहीं निजानंद सर्व रंगीं ॥ ७ ॥

### पद ३४२. [ अभंग ]

लौकिकाचें काज नाहीं ठेली लाज॥ गुरुकृपें निज सांपडलें ॥१॥ सर्व भावें त्याची आवडली सेवा ॥ जिवाचीया जीवा न विसंबें ॥२॥ काय सांगों गोष्टी चोज वाटे पोटीं ॥ धन्य हातवटी हाता आली ॥३॥ मी माझा अर्थ जोडिला यथार्थ ॥ जगीं जगन्नाथ दुजे नाहीं ॥४॥ हाही हा निर्धार झाला-से साचार ॥ विचारीं विचार मावळला ॥५॥ सुखाचा सोहळा चोजवेना मला ॥ अधिष्ठानीं डोळा शेजे आला ॥६॥ ब्रह्म सहज पूर्ण एक निजानंद ॥ रंगला निःशब्द श्रुतिवाक्यें ॥ ७ ॥

### पद ३४३. [ अभंग ]

राम निजमूर्ति हाचि पैं उच्चार ॥ मंत्र षडक्षर आमुचे कुळीं ॥१॥ याहुनि उपाय थोर मानूं जेव्हां ॥ झडेल पैं जिव्हा तत्क्षणीं ॥२॥ ब्रह्मा येऊनि सांगे याहुनि उपाय थोर ॥ चळेल साचार ऐसें जाणो ॥३॥ हाचि जिव्हे जप लिखिति मुद्रा हेची ॥ तिघांहि बंधूंची प्रतिज्ञा हे ॥४॥ स्वामी निजानंद पूर्ण आमुचा धनी ॥ रंगुनि त्याचे चरणीं निर्भय असों ॥ ५ ॥

### पद ३४४. [ कलयुगीं घरोघरीं संत झाले फार या चालीवर ]

निजमुळा जावें गे हेंचि पडो ठावें ॥ मागिल चाळे सांडिं बाळे सावध होउनि भावें ॥ ध्रु० ॥ ऊर्ध्वपंथें चाल बाई ब्रह्मगिरी पाहूं ॥ देहभावा विलय जेथें तोचि होउनि राहूं ॥ १ ॥ नीटें वाटे चाल बाई चोर बहु-साळ ॥ जाइल टका उडेल फका लोक लावितिल बोल ॥२॥ कल्पनेच्या सैरवाटे श्वापदांच्या हारी ॥ कंटकाची पिडा मोठी शिणवितील भारी ॥३॥ दुर्जनाची रांड होका काय धोका त्याचा ॥ अपुल्या हिता सावध होतां काया मनें वाचा ॥४॥ सज्जनाचे धरी पाय तरिच लागे सोय ॥ स-हज पूर्ण निजानंद एक रंग होय ॥ ५ ॥

### पद ३४५. [ चा. यांत कांहीं नाहीं ]

जखाडि घालि निकी पडों नेदि चुकी ॥ न मोडितां माज होसि जगा-चिये लेकी ॥ध्रु०॥ वडिल बाई लावि सोयी याचि खेळें खेळा ॥ अहं-मती नाचसि किति कोणे देशिचा मोळा ॥१॥ सभेकडे पाहासि काय

माय तुज व्याली ॥ अवयवीं निरवावी दृष्टि घालि खोलीं ॥२॥ देहुडें पाउल हेंचि उगें हांसति पीसूणें ॥ ऐक्य परत्र गेलें धिग् जिणें लाजिरवाणें ॥३॥ मनगटाचि कळा मोठि दाहाहि बोटिं फांके ॥ डोळा लवतां ठायिंचे ठायिं लिला कैसी झांके ॥४॥ सख्या वेश्या नाचति कशा तेचि परि पाहीं ॥ जाणिव नेणिव सांडिं तुळा मुखरणिची दाही ॥५॥ नलगे त्याग भोग अंग अनंगाचे गांवीं ॥ आपुले दाटी सर्व अटी शून्य रूप नांवीं॥६॥ मृदंगाच्या रंग संगें अंतरंगें डोले ॥ सहज सुखें विजयि मुखें निजानंदें डोले ॥ ७ ॥

पद ३४६. [ लक्षमन बाला क्यों नहि या चालीवर ]

कैसा स्वयंपाक केला सांग मनुबाई ॥ सावधान होउनि चित्त ठेवुनियां ठायीं ॥ध्रु०॥ क्वचित् पक्क अर्ध पक्क एक जैसे तैसें ॥ करपलें एक लवणहीन जळो जिणे ऐसें ॥१॥ एक खारट एक तुरट एक कडू आंबट भारी ॥ समजोन ये घरिंचे घरिं चेरा होतो पारी ॥ २ ॥ अपणा न ये सांगसि लोकां हे तो दुष्ट खोडी ॥ चांग भांग बोलसि शेजा करिती डोई बोडी ॥३॥ मागें झाल्या होती पुढें सांप्रतही थोड्या ॥ चतुर बाया मिरवताति फजित होति वेड्या ॥४॥ पांच दिवस ज्याचे बाई धन्य म्हणवुनि घ्यावें॥ रंगल्या ज्या निजानंदें त्यांसि वर्म ठावें ॥ ५ ॥

पद ३४७. [ कल्युगीं घरोघरीं संत झाले फार या चा. ]

पडों त्याच्या पायां जो न विसंबे ठाया ॥ राहतां दुश्चितपणें सौरस्य गेलें वायां ॥ध्रु०॥ जेवणार तेहि भले पूर्ण तृप्त होती ॥ कल्पनेचा स्पर्श होतां सदां मुखिं माती ॥१॥ चतुर्विध अन्न त्याचा अनुक्रम जाणें ॥ अधिकारें ग्रास घेती तृप्ति त्यांचि बाणे ॥२॥ प्राणांचा प्राण स्मरण धर्म जीविं वाहे ॥ रामकृष्ण निरुक्तिचा अर्थ होउनि राहे ॥ ३ ॥ पूर्वापर नित्य तृप्त कळा त्याचि पाहें ॥ जीवनाच्या तोषें उद्धार देत आहे ॥४॥ ब्रह्मबोधें सहज छंदें पूर्ण सुखी झाला ॥ निजानंद रंग संगें संसारा आंचवला ॥५॥

पद ३४८. [ जोगिण ]

ऐसी मी जोगिणी जाहलें ॥ प्रीति अलक्ष राउळा रातलें ॥१॥ अलक्ष म्हणुनि उभा राहिला ॥ जीव देखोनि तयासि भूलला ॥२॥ चहूं पालवीं झालें मोकळी ॥ तेचि हातीं पैं निरंतर झोळी ॥३॥ श्रवणीं श्रवणमुद्रा घातली ॥ तेणें अत्यंत शोभा मज आली ॥४॥ त्रिगुणांचा गोंवर

घातला ज्ञान अग्नि लाउनियां जाळीला ॥५॥ शांति विभूति अंगीं चर्चिली ॥ शुद्ध सत्व शूभ्रता पातली ॥६॥ अनुहात शिंगी वाजवी ॥ अवघा तूं तूं म्हणवुनि सादवी ॥७॥ रामरस सेवुनि जाहलें उन्मत्त ॥ सहज पूर्ण निजानंदें डुल्लत ॥८॥ आवडिं याचे पायिं रंगलें ॥ स्वयें निजानंद होउनि ठेलें ॥ ९ ॥

### पद ३४९. [ अभाग्याच्या० या चा.]

रंगीं रंगावें वेधकें दशरथ कुळदीपके ॥ध्रु०॥ रंगीं रंगा न येशी रामा फुटली हृदय डांक ॥ नरदेहाची घडी तुजविण वायां जाते देख ॥ अनुसंधान सुमनमाळा कोमेली नि.शेख ॥ सत्वाचा घट भरिला वेगीं येउनि देईं सूख ॥१॥ रंगा न येसिं तरि हें रंग नाम कां ठेविलें ॥ नुपेक्षावें ब्रीद आतां सुख देईं आपुलें ॥ भक्तवत्सल ब्रीद रामा बाई काय झालें ॥ दुर्घट भूतवासना इनें मन माझें घेरिलें ॥२॥ ज्ञानदीप पाजळला स्नेह सरलें रामाबाई ॥ हर्षाच्या गोंधळिं येउनि भक्तां सुख देईं ॥ निजानंदें पूर्ण माझें प्रगटावें हृदयीं ॥ रंगलें मन रंगें रंगमूर्ति ठायीं ॥३॥

### पद ३५०. [ डफगाणें. चा. बोलणें फोल झालें. ]

तो राम झुलतो झुलतो मज देखुनि आनंद होतो ॥ माझा स्वामि तो स्वामि तो तो मज भवसागरिं तारितो ॥ माझा जनक तो जननी तो मनाचें मोहन तो ॥ध्रु०॥ आजि दिवस सोनियाचा समुदाय मिळाला संतांचा ॥ गाति प्रताप रघुरायाचा नानापरी ॥१॥ राम दशरथनंदन सूर्यवंशाचें भूषण ॥ झालें पतित जन पावन हो ज्याच्या नामें ॥ २॥ अहं-रावण मारिला काम कुंभकर्ण वधिला ॥ भाव बिभीषण स्थापिला चिरंजीव जेणें ॥ ३ ॥ नामें गणिका तारिली चरणीं शिळा उद्धरिली ॥ वानरें वनचरें तारिलीं रामचंद्रें ॥४॥ राम राज्याचि[1] नवलपरी सारी खेळतां म्हणती मारी ॥ बंधन पुष्पा दंड छत्रिचा निर्धारी ॥५॥ तो राम निजानंदघन माझ्या जिवाचें जीवन ॥ रंगातीत परिपूर्ण राम निजमूर्ति ॥ ६ ॥

### पद ३५१. [ अभंग ]

मृत्तिकेचा घट पाहीं ॥ मृत्तिकेसी ठावा नाहीं ॥१॥ तैसें जाणा विश्व

---

१. रामराज्यामध्यें मार हा शब्द फक्त सारिपाट खेळतांना होता इतरत्र नव्हता असा भाव; तसेंच बंधन काय तें पुष्पांस व दंड काय तो छत्रीस असें निर्वैर होतें असा भाव.

झालें ॥ बोलीं काय आन आलें ॥२॥ चित्रपटाचें कौतुक ॥ तंतु अद्वय अक्रिय एक ॥३॥ हेमीं झाले अळंकार ॥ हा तो वाउगा विचार ॥ ४ ॥ देश काळ परिच्छेद ॥ हा तो कल्पनेचा भेद ॥ ५॥ सिंधू लहरी तरंग ॥ तैसा निजानंद रंग ॥ ६ ॥

### पद ३५२. [ अभंग ]

स्नानें पानें दोष जाय ॥ गंगा श्लाघ्य मानी काय ॥ १ ॥ तैसें करवीं बा कीर्तन ॥ वारुनि अविधीचें वर्तन ॥ २ ॥ अंधारेसी रात्री जावी ॥ दिनकर चोज काय भावी ॥ ३ ॥ माझे छाये निवती जीव ॥ तरु मानीना वैभव ॥ ४ ॥ अथवा संत संगें कैसा ॥ पूर्णिमेचा सिंधु जैसा ॥ ५ ॥ ना तरि आर्त पाहुनि डोळां ॥ दावी मायेहुनि कळवळा ॥ ६ ॥ न जडे जाणिवेचा लेश ॥ मिथ्या मानी बाह्य वेष ॥ ७ ॥ इच्छा द्वेष मारुनि द्वंद्वें ॥ नाचे रंगीं निजानंदें ॥ ८ ॥

### पद ३५३. [ अभंग ]

शास्त्र व्युत्पत्तीचा भाव ॥ हाचि काय तरणोपाय ॥ १ ॥ व्हावी अंतरीं विश्रांति ॥ जावी मोह ममता भ्रांति ॥ माझीं गद्य-पद्यें ग्रंथ ॥ हा तों केवळ मायिक पंथ ॥ ३ ॥ नित्य पूर्ण तो अभंग ॥ निजानंदें भरला रंग ॥ ४ ॥

### पद ३५४. [ अभंग ]

आम्हां दुर्बळांच्या डोळां ॥ कैंचा अद्वैत सोहळा ॥ १ ॥ दिधलें गुरुराजें दयाळें ॥ नाहीं व्युत्पत्तीच्या बळें ॥२॥ हेचि जाणा पराकष्ठा ॥ धरा सद्गुरुपायीं निष्ठा ॥ ३ ॥ रंगीं निजानंद सेवा ॥ सायुज्यांही वरील ठेवा ॥ ४ ॥

### पद ३५५. [ अभंग ]

दैवें आलों तुझिया पोटा ॥ झालों ब्रह्मांडाहुनि मोठा ॥ १ ॥ तुझा उपकार काय वानूं ॥ माझा डोळस तूं चिद्भानू ॥ २ ॥ माया मोहाचें कारागृह ॥ केलें तोडुनि चिद्रुप देह ॥ ३ ॥ निजानंद नित्य निःसंग ॥ कृपें केला अभंग रंग ॥ ४ ॥

### पद ३५६. [ बोलणें फोल झालें डोलणें वायां गेलें या चा. ]

विचित्र झालें बोल बोलतां नये बोलें ॥ ध्रु० ॥ लोह कार्याचा पसारा ॥ वरी परीसाचा पडिला चिरा ॥ आलें दिव्य तेजाकारा ॥ परंपरा टाकु-

नि ॥१॥ तैसा तापत्रयीं संतप्त ॥ त्यावरि श्रीगुरुदया प्राप्त ॥ ठेवा सांपडला हो गुप्त ॥ झाला तृप्त स्वानंदें ॥ २ ॥ स्वरूपाची प्राप्ती झाली ॥ ममता गेली समता आली ॥ षड्वर्गांची बोहरी केली ॥ आशा तृष्णा सहीत ॥ ३ ॥ आत्माराम झाला काम ॥ सिद्ध स्वरूपीं विश्राम ॥ सरला लोभाचा संभ्रम ॥ मोह भ्रम नाढळे ॥ ४ ॥ दया वाढली अपार ॥ निंदा द्वेषा झाला मार ॥ विवेक वैराग्य विचार ॥ हे साचार बळावले ॥ ५ ॥ सदां संतोषाशीं खेळ ॥ नवविधांशीं गदारोळ ॥ निरावकाश सुख कल्लोळ ॥ काळ वेळ नाठवे ॥ ६ ॥ चित्त चैतन्यीं मुरालें ॥ मन कल्पनातीत झालें ॥ बुद्धिसि सम साम्राज्य आलें ॥ तें सुख बोलें न बोलवे ॥ ७ ॥ भेद झाला पाठिमोरा ॥ गुणदोषांचा नलगे वारा ॥ विश्वीं देखें विश्वंभरा ॥ नाहीं थारा भ्रांतीसी ॥ ८ ॥ भोग मोक्षीं वीतरागी ॥ शांति बाणली सर्वांगीं ॥ निजानंदें रंग संगीं ॥ सच्चिद्भुवनीं विराजतो ॥ ९ ॥ उरला प्रारब्धाचा जल्प ॥ तोही वावुगा संकल्प ॥ निजानंदीं रंग अल्प ॥ नाहीं तरंगजळ-न्यायें ॥ १० ॥

### पद ३५७.

श्रीगुरुरायें सांगों मी काय चोज केलें ॥ ध्रु० ॥ मन उन्मन जन विजन जनार्दन ॥ वावुगें जगद्भाव नेले ॥ १ ॥ दावुनि विचित्र भाव सारिले लौकिक भाव ॥ मीं माझें समूळ वाव झालें ॥ २ ॥ देहीं विदेहीं निजानंद रंगला पाहीं ॥ सुख तें बोलतां नये बोलें ॥ ३ ॥

### पद ३५८. [ राग बिलावल ]

रामीं रंगले डोलती मुनी ॥ सजनीं विजनीं वो ॥ध्रु० ॥ ममता पसाराऽसारा, लक्षिति चिद्रुप सारा ॥ जिवनीं शोभती गारा, तद्वत् निर्धारीं ॥ १ ॥ क्रियमाणा संचितातें, बिंदलें घातलें होतें ॥ प्रारब्ध भोगी देहातें, न पवति मोहातें ॥ २ ॥ सारुनि ध्येय ध्याता ध्यान, स्वरुपीं समाधान ॥ सहज चैतन्य-घन, वनवृत्ति विहीन ॥ ३ ॥ भोगितां उन्मनी ज्यांसी, न स्मरे दिवस निशी ॥ स्वानंदसोहळा सत्ता चिन्मय विलासीं ॥ ४ ॥ निजानंदें जे निःसंग, रंगले भंगला संग ॥ निर्विचार दशास्पद, नित्य अभंग ॥५॥

### पद ३५९.

कर्म किंकरूं योगीयां नाहीं ॥ ध्रु० ॥ देव ऋषि पितरांचें ऋण त्यां नाहीं वो साचें ॥ निजानंदीं मग्न झालें चित्त जयांचें ॥ १ ॥ देही पूर्ण

संस्कारें जेविं वातें तरुवर ॥ राहियला अधिष्ठानीं न चळे स्थीर ॥ २ ॥ आपपर नाहीं दोन्ही सम मानीं अपमानीं ॥ निजानंदें विराजतो अनुपम विज्ञानी ॥ ३ ॥

## पद ३६०.

माझें मानस मोहिलें येणें माधवें वो ॥ ध्रु० ॥ साजिरें सुंदर ठाण मंजुळ वाजवी वेणू ॥ आवडी घेतली जाण या जिवें वो ॥ १ ॥ रुळति वनमाळा गळां सवें गोपाळांचा पाळा ॥ लाविलें गोकुळ चाळा लाघवें वो ॥ २ ॥ आकळे नकळे लीळा निजरूपें सोहळा ॥ रंगलें ययाच्या कळा वैभवें वो ॥ ३ ॥

## पद ३६१.

आणा मंदिरा इंदिरावरा ॥ ध्रु० ॥ वैराग्य वसंतमासीं ॥ सोज्वळ मानसशशी ॥ विरहिणी बुद्धि बोले होईन मी दासी ॥ १ ॥ साजणी ग्रासिलें पापें ॥ त्रासिलें त्रिविध तापें ॥ हरिवियोग संतापें अनुतापें तापे ॥ २ ॥ आणा गोविंद लागला छंद ॥ ध्रु० ॥ नावडे वावुगी मात ॥ उपचार वाटे घात ॥ विषयीं विरक्त चित्त गोपाळीं हेत ॥ ३ ॥ आणा गोपाळा गोकुळपाळा ॥ ध्रु० ॥ हरिचा विरह जाचीं ॥ जाणुनि सखी निजाची ॥ श्रवणीं सादरें सांगे खुण निजगुजाची ॥ ४ ॥ पाहें कृष्ण तूं सावध राहे ॥ ध्रु० ॥ अंतर बोधलें कैसें ॥ सागरीं सैंधव जैसें ॥ निजानंद जनीं वनीं कोंदला असे ॥ ५ ॥ सैर समाधी सहजच नीज ॥ ध्रु० ॥

## पद ३६२.

श्रीराम राम वदा हो जय जय ॥ ध्रु० ॥ श्रीराम राम वदा ॥ सुख स्वानंद सदा ॥ चुकती भव आपदा ॥ १ ॥ श्रीराम सत्य ज्ञान ॥ अनंत सुखघन ॥ गर्जति श्रुति सर्वदां ॥ २ ॥ श्रीराम निजमूर्ति ॥ रंगीं रंगली स्फूर्ति ॥ पावली पूर्णपदा ॥ ३ ॥

## पद ३६३.

रामा रामा रामा मेघश्यामा ॥ तुझा वेध लागो माझ्या रामा ॥ध्रु०॥ सखा सोयरा तूंचि बाप माय ॥ रामा माझें अंतर जाणसी सांगों काय ॥१॥ वाट पाहतां शिणले माझे डोळे ॥ रामा न लावीं उशिर येईं तूं एक वेळे ॥२॥ गोड न लागे आणिक कांहीं धंदा ॥ रामा वृत्ति चरणीं रंगवीं निजानंदा ॥ ३ ॥

## पद ३६४.

प्रेमभरें[1] भुललासी वायां रे सावध ॥ मानवि मागुती न ये काया रे सावध ॥ध्रु०॥ धन सुत देह गेह जाया रे सावध ॥ जायाची ही सांडीं यांची माया रे सावध ॥१॥ शिकविती निज गुज श्रुती रे सावध ॥ विषयीं विरक्ती मोक्षदाती रे सावध ॥ २॥ करूं तुज विनंती हे किती रे सावध ॥ आयुष्याचि काय केलि माती रे सावध ॥३ ॥ धरीं धरीं सत्संगीं आवडि रे सावध ॥ सच्छास्त्रश्रवणीं लागो गोडी रे सावध ॥ ४ ॥ हरि-गुरु-भजन न सोडीं रे सावध ॥ तेणें रंगें निजानंद जोडीं रे सावध ॥ ५ ॥

## पद ३६५.

मी कोण ऐसें पाहें विचारुनि रे ॥ ध्रु० ॥ देह मी म्हणतें सुखदुःखा जाणतें ॥ जाणुनियां नेणते कां रे ॥१॥ इंद्रियां चाळक बुद्धिप्रकाशक ॥ सत्तामात्र तोचि एक रे ॥ २ ॥ निजानंद अभंग सर्वही त्याचाचि रंग ॥ रंगीं रंगुनि निःसंग रे ॥ ३ ॥

## पद ३६६.

त्राहि त्राहि रामा मुनिजनमनविश्रामा ॥ असंगाविभु निष्कामा अपरिमित गुणग्रामा ॥ अचळ अढळ परिपूरित निर्मळ सकळ मंगळधामा ॥ ध्रु० ॥ वंदुनियां पदकमळा रे कमळोद्भव कुळबाळा ॥ करयुग लावुनि भाळा विनवी त्रिभुवनपाळा ॥ कोटिशितें अपराध मातेपरि तारक तूंचि दयाळा ॥१॥ सच्चिद्धन श्रुति सारा रे सुखमय सहज अपारा ॥ विधि हर नेणति पारा रे अव्यय अज अ-विकारा ॥ शेष रमा महिमा न जाणति अनुपम जगदाधारा ॥२॥ नेति वदति साहा चारी अकळ कळा नटधारी ॥ सगुण लीलावतारी चिन्मय रूप मज तारीं ॥ करुणाकर शिरीं ठेवित रघुविर तन्मय ब्रह्मकुमारी ॥३॥ अंतर पूर्ण निवालें न बोलवे सुख बोलें ॥ ध्रु० ॥ पूर्ण जळीं जळबिंदू तेथें मिळणीं भेद पळाला ॥ विधितनया रघुराया रे अंतरीं हेतु गळाला ॥ रंग तरंग निजानंद जलधिमाजीं अभंग मिळाला ॥४॥ निर्विचार पदबोधीं सहजिं सहजसमाधी ॥ ध्रु०॥

## पद ३६७.

येईं येईं प्राणसखया गोपाळराया ॥ध्रु०॥ सुमती द्रौपदी बाळा कौरव षड्वैरी काळा॥ हातीं सांपडली वेल्हाळा ॥ वाहे गोपाळा ॥१॥ विषय वैराग्य

---

१. अन्य पाठ; —भवभ्रमें भ्रमसि कां वाया रे सावध ॥

स्वरूपें ॥ तापली तापत्रयें तापें ॥ बोले मंजुळ अनुतापें ॥ दीनार्तिरूपें ॥२॥ येईं येईं कृष्णे जननीये कां पणे वो काय ॥ध्रु ॥ जीवनें भरले डोळे ॥ धरिले तन्मय लोळें ॥ बोलें व्यापक घननीळे ॥ पाहें ये वेळे ॥ ३ ॥ येईं येईं कृष्णराजया जीवना माझिया ॥ ध्रु० ॥ सरली वो सरली काया ॥ हरली जीविताची माया ॥ वेधली श्रीकृष्णपायां ॥ पांडवनाया ॥ ४ ॥ मन हें उन्मन आनंदीं गोपाळछंदीं ॥ ध्रु ॥ कृष्णरूपीं करितां धावा ॥ विसरली देहभावा ॥ आठविला सौख्य विसावा ॥ मुनिमानस-ठेवा ॥ ५ ॥ मन हें उन्मन आनंदीं गोपाळछंदें ॥ ध्रु० ॥ सहज समाधी हरिखें हरपलीं द्वंद्वदुःखें ॥ रंगीं रंगली निजसौख्यें ॥ श्रीकृष्ण देखे ॥ ६ ॥ अनुभविये जागती ते गोडी स्वानंदजोडी ॥ ध्रु० ॥

## पद ३६८.

सखया यादवराया मज जाचिति कौरव वायां ॥ व्याकुळ चित्तें बाहे पांडवजाया ॥ ध्रु० ॥ हांसती सकळ जगीं मग करणें देवा काय ॥ द्रौपदि ह्मणे कृष्णा बारे वंदिन तुझे पाय ॥ लज्जा जाय करूं मी काय ये ये हाचि उपाय ॥ १ ॥ कैं दवडादवडीं येसी चरण झाडिन केशीं ॥ ॥ ध्रु० ॥ जनक जननी बधु सजण निजसांगाती ॥ तुजविण दिशा दाही या उद्वस मज वाटती ॥ काकुळती कवणाप्रति शरणागता तूंचि गती ॥ २ ॥ उदास करिसी बारे तरी मारुनि मजला जारे ॥ ध्रु० ॥ व्यापक अंतर्बाह्य तो अंतर जाणुनि आला ॥ क्लेश निवारुनि सर्वहि निजानंदाचि केला ॥ शोक मोहो समूळ ठेला सर्वरंगीं कृष्णचि झाला ॥ ३ ॥ आकळ सुख तें पाहें तेथें बोलही न साहे ॥ ध्रु० ॥

## पद ३६९.

बोले विवेक निजगुज ऐक वो बुद्धिबाळे ॥ जीव तुझ्या संगें नानाविध सोंगें खेळ खेळे ॥ अधम ते प्रतिपादिसि उत्तम कोण चाळे ॥ हो झालें तें आतां शरण गुरुसि ये एक वेळे ॥ १ ॥ अहंकार ह्मणे प्रज्ञ सुलक्षणे सांगों कायी ॥ विवेक हा चोर नको यासमोर जाऊं बाई ॥ पुर्यष्टकीं गुप्त त्या करीं संतप्त याची घाई ॥ तुझें माझें मूळ जगोसि निर्मूळ याचे पायीं ॥ २ ॥ साधू विवेक हितावह बोलत बुद्धि माय ॥ देहेंद्रिय प्राण विषयसमुह जाण साच काय ॥ याचें भोक्तेपण तुज जीवा शीण होतें जाय ॥ व्यर्थ औडंबर हा जगडंबर स्वप्नप्राय ॥ ३ ॥ विवेकाचे

बोल परिसुनियां बुद्धि सावध झाली ॥ सर्व दयाळु साधु तयांप्रति शरण गेली ॥ ह्मणे तापत्रयीं श्रमलें गुरुवर्या धांव घालीं ॥ साधनयुक्त अनन्य विलोकुनि कृपा केली ॥ ४ ॥ बुद्धी परावृत्तियोगें जीव सुखें डोलताहे ॥ स्वपद पावुनियां धन्य कृतार्थ मी बोलत आहें ॥ मातला पूर्ण निजानंद वारिधी खेळताहे ॥ ५ ॥

## पद २७०.

जागें जागें रे प्राणियां जागें आपुल्या हिता ॥ प्रबोध पाहिले जाहले नका राहुं दुःश्चिता ॥ ध्रु० ॥ पावन किं नरदेह हा नये नये मागुता ॥ पाहें विचारुनि अंतरीं होईं सावध आतां ॥ १ ॥ करीं स्वधर्मसंस्थापना धरीं आवरीं मना ॥ मारुनिया आसुरी सेना छेदीं भवबंधना ॥ २ ॥ निजानंद-पद साधुनि नित्य अभंग रंगें ॥ याविण तो शीण सर्वथा दुःख मीपणसंगें ॥ ३ ॥

## पद २७१. ( सखया रामा विश्रांति या चा. )

पती कळला नाहीं जीवघेणा ॥ ध्रु० ॥ अरुप अगुणाचा माता ना पिता ॥ काय करुं माझे कपाळीं होता ॥ १ ॥ कर्मधर्म यासी कांहींच नाहीं ॥ माझें मीपण चालों नेदीच कांहीं ॥ २ ॥ नित्यानित्य मारी उरों नेदी ऊरी ॥ संसारासि सुरी घातली बाई ॥ ३ ॥ हां ह्मणुं नये हूं ह्मणो नये ॥ ऐसियासी मज दिधलें बाई ॥ ४ ॥ निजानंदघन ब्रह्म सनातन ॥ तयासीं शरण गेलें वो बाई ॥ ५ ॥

## पद २७२.

माझें जिवींचें जीवन राम निजानंद मना अखंड त्याचा छंद ॥ जनीं वनीं अवघा त्याचा तोचि दिसे मावळले भेदाभेद ॥ ध्रु० ॥ राजीवलोचन राम निजमूर्ति ब्रह्मादिकां न कळे स्थिति ॥ नेती नेती ह्मणती श्रुति नेणती पार बाप सुखानंदमूर्ति ॥ वर्णितां शिणला शेष सहस्रमुखें तरी न वर्णवे कीर्ति ॥ परा पारुषली मन हें उन्मन होतां सहजें कुंठित झाली स्फुर्ति ॥ १ ॥ ध्वज वज्रऊर्ध्वरेखा शोभताति पायीं पद्में झळकती ॥ रातोत्पलाहुनी सुंदर सुकुमार चरणीं शीळा उद्धरती ॥ योगियां लागलें ज्याचें निजध्यान पूर्ण भक्तांची विश्रांती ॥ वोळंगती चारी मुक्ती पायांपाशीं सकळही तीर्थं पावन होती ॥ २ ॥ पाउलें गोजिरीं नखचंद्रीं शोभा घोंटीं इंद्रनीळप्रभा ॥ पोटरियां साजिऱ्या वर्तुळ माणिमय स्तंभ जानु सरळ कर्दळीगाभा ॥ विद्यु-

ल्लता पीतांबर कटीसुत्रीं ठाण मांडुनियां उभा ॥ तेजाचें निजतेज मूर्तिमंत राम चोज वाटे पद्मनाभा ॥ ३ ॥ उदरीं त्रिवळी सुंदर अंगीं झळकती रोम हृदयीं मुनिमना विश्राम ॥ आजानुबाहु सरळ अभयदाना उदीत उपमे न पुरे कल्पद्रुम ॥ पद्महस्तें सुखी केलें शरणागत निरसुनियां भवभ्रम ॥ नित्य निरंजन सज्जनरंजन महाराज सहजीं सहज पूर्णकाम ॥ ४ ॥ दिव्यसुगंध चंदन अंगीं चर्चियला कंठीं सुमनाचे हार ॥ श्रवणीं कुंडलें सूर्या वोप देती नाशिक सरळ मनोहर ॥ मदनपुतळा कैसा शोभे माय कमळनयन कमळाकर ॥ बाह्यीं बाह्यवटें मणगटीं वीरकंकणें तळवे तळहात सुंदर ॥ ५ ॥ सुनिळ नभाच्या काळिका तैशा अंगुलियांवरि मुद्रिका झळकत ॥ अरिमर्दनीं धनुष्य बाण उभय करीं भुजा यशस्वी जयवंत ॥ काम कुंभकर्ण अहंरावण वधियला भवसागरीं बांधुनि सेत ॥ भाव बिभीषण राज्यीं स्थापियला भक्ति सीतेसी आलंगीत ॥ ६ ॥ जडित मणिमय मुकुट मस्तकीं शोभताहे बाप सुकुमार विलासी ॥ शिवाचें निजगुज ध्यातां नये ध्याना तो गुज बोले वान्नरेंसीं ॥ सनक सनंदन नारद मुनिजन चिंतिताति तो फळ मागें भिल्लणीसी ॥ बाप निजानंद रंगातीत पूर्ण मीपण अर्पियलें तयासी ।७।

## पद ३७३.

अंतर तुजसीं म्हणवुनि श्रम झाला विश्वंभरा निजमूर्ति ॥ त्राहि त्राहि शरण आलों मायबाप दीनानाथ तुझी कीर्ति ॥ ध्रु० ॥ वाळुवेचा घाणा कैसा धरियला व्यर्थ पडोनि प्रवाहीं ॥ आयुष्य वेंचलें तैसें विषयांमाजीं सुखलेश प्राप्त नाहीं ॥ कवण मी करितों काय कवणें हेतु नसे शोधियलें पाहीं ॥ विचरतो मृग जैसा वनामाजी तैसा फिरे दिशा दाही ॥१ ॥ भ्रमभरें मोहवशें भुली ठेली समाधान नाहीं चित्तीं ॥ तापत्रयें पोळलें मन संतप्त झालें बाहिर्मुख झाली वृत्ती ॥ दिनबंधु दयासिंधु येईं वेगीं तुझा धांवा करुं किती ॥ चरणीं रंगवीं सुखसागरा रे बापा निजानंदमूर्ति। २ ।

## पद ३७४.

निरालंब गांवीं एक संन्यासि देखिला तेणें नवलचि केलें रे ॥ आपणाकडे पाहुनि एक बायको केली तिणें एवढें वाढविलें रे ॥ कल्पना धरुनि तिनें पोरि उभि केली तिनें खेळों आरंभिलें रे ॥ १ ॥ भ्रताराविणें पोरि तिचें पोरें व्याली तिघें तीं परिचीं ॥ एक रागीट एक सात्वीक भलें एक स्वयोंचि कामधाम रची ॥ तिघांपासुनि पांच बाळकें झालीं नाचती वेगळा-

लींचि रे ॥२॥ पांचा मुलांचा एकवट होतां तेथें कुंभचि निर्माण झाला रे ॥ तया कुंभामाजीं दोन मीन आले तेथें धीवरीं गळ टाकिला रे ॥ एक सांपडला एक मोकळा होउनि पाताळभुवनीं गेला रे ॥ धरुं जातां तो न सांपडे तेथें विश्वास गुरुच्या बोला रे ॥ रंगपण टाकुनी स्वानुभवें पाहतां अवघा निजानंद झाला रे ॥ ३ ॥

### पद ३७५.

या सज्जन जाणतीं गोष्टी रे ॥ ज्यांचीं स्वानंदघन झाली दिठी रे ॥ ध्रु० ॥ कल्पनेचा आरसा आणुनि सरिसा आपणासीं सम्मुख पाहे रे ॥ एकाचि दुसरें लक्षुनि नयनीं विस्मय मानुनि राहे रे॥ आरसा गेलिया मुखीं मुख संचलें जैसें आहे तैसें आहे रे ॥ वायांचि नाथिला संसार आथिला भावना साच भाविताहे रे ॥ १ ॥ वावुगा भ्रम रें देतसे श्रम रें विवेक हृदयीं आणा रे ॥ वेदीं निवेदिलें श्रुतिनीं कथिलें अनुभवी जाणाति खुणा रे ॥ स्वप्नींचीं कटकें तैसें विश्व लटिकें साच वहातसे कोटी आणा रे ॥ स्वरुपीं द्वैत हें नाहीं नाहीं रंगला निजानंदराणा रे ॥ २ ॥

### पद ३७६.

तुझेंचि सुख तूं पाहीं रे ॥ आणिक सुख तों नाहीं रे ॥ ध्रु० ॥ आपुलेंचि सुख कैसें आपणचि भोगुनि प्रपंच सुखरुप मानी रे ॥ द्वैतपणें भोगितां विनाश अढळें तळमळ होय निदानीं रे ॥ १ ॥ मूळचि सांडुनि वरदळ पाहतां दुःख होय अविवेक-संगें रे ॥ त्रिपुटिचा भावाभाव करुनि निजानंद सुखीं रंगें रे ॥ २ ॥

### पद ३७७.

साधुसंगें विचारीं वारिं छंदा ॥ वंदी गोविंदपदारविंदा ॥ भवसागर पर-पारदुरत्यय कां भुललासी भाग्यमदा मंदा रे ॥ ध्रु० ॥ श्रीहरिची श्री आपुलि मानुनी करिसीं नाना छंदा ॥ हरी विमुख तया श्रीही परांमुख साधिलें काय मतिमंदा रे ॥ १ ॥ संपत्ति तों सकळहि सहवासी निधनीं करिती निंदा ॥ नयेचि त्रास रे स्वहितीं उदारें विसरोनि आनंदकंदा कदां रे ॥ २ ॥ देहीं तापत्रय काळहि निर्दय आला निकट करुं द्वंद्वा ॥ मायिक रंग विरंग निदानीं जाय शरण निजानंदा आनंदकंदा रे ॥ ३ ॥

### पद ३७८.

मन भुलोनि भरलें रानीं ॥ झालें मोहमदिरापानीं ॥ करुणानिधि श्रीराम

उपेक्षुनि विषय पियुषवत् मानी मानी रे ॥ ध्रु० ॥ आयुष्य गिळिलें काळें आलें सान्निध मरण न मानी ॥ संभ्रम वैभव सुत कामिनिचा शेवट एक निदानिं निदानीं ॥ १ ॥ दुस्तर संसारार्णव जाणुनी झाले सावध ज्ञानी ॥ निजानंदें रंगले डोलती खेळति अचळ विमानीं ॥ २ ॥

## पद ३७९.

न पडेचि अज्ञुनी ठावें ॥ कांहीं हिताहित स्वभावें ॥ विवरुनी पाहतां भावें ॥ रे त्यजुनी सकळाहि जावें ॥१॥ गृह सुत वैभव जाया ॥ हे सकळिक कृत्रिम माया ॥ व्याकुळ पडतां काया ॥ समूळ हा भ्रम वाया॥२॥ नलगत पळ तनु जाय ॥ मग तूं करिसी काय ॥ भज भज श्रीगुरुपाय ॥ तेणें चुकतिल सर्व अपाय ॥३॥ अकळ तयाची करणी ॥ चित्सुख विलसे करणी ॥ तमनाशक चिन्मय तरणी ॥ सायुज्य येउनि पर्णी ॥४॥ निजानंद जरि व्हावा ॥ तरि समूळ देहभ्रम जावा ॥ विश्वीं रंग पाहावा ॥ तरि स्वयेंचि सुखविसावा ॥५॥

## पद ३८०.

मना हरी हरी बोल ॥ध्रु० ॥ आयुष्य सांगातीं जातें हातोहातीं ॥ नये वेचितां कांहीं मोल ॥ १ ॥ दिवि भुवि पाताळ समूळ दृश्य जाळ ॥ हरीविण केवळ फोल ॥ २ ॥ सांडुनि देह डोल विचारिं पहा सखोल ॥ निजानंदरंग-संगें डोल ॥ ३ ॥

## पद ३८१.

सये हरी लाघवि वो ॥ध्रु०॥ वाउनि मोहरी मानस मोहरी वो ॥ झाली नेणवे कैसि परि वो ॥ १ ॥ पालवुनि मज सांगे निजगुज वो ॥ गेली समूळ लोकलाज वो ॥२॥ निरखितां दिठी वो पडियली मिठी वो ॥ याति कुळा झाली तुटी वो ॥३ ॥ वेधीयलें येणें बोलावुनी साजणें वो ॥ आतां राहिलें येणें जाणें वो ॥४॥ सये याचा संग वो करीतो निःसंग वो ॥ शोभे निजानंद रंग वो ॥ ५ ॥

## पद ३८२. [ हिंदुस्थानी ]

हुं तो वारि वारि जाऊं रे ॥ तुमबिन नहीं दुजी छाउ रे ॥ध्रु०॥ विषय न भावुं रे गुन तेरे गाऊं रे ॥ नयनमो सुरत सुव्हाउ रे ॥१॥ सोहि तेरें काज रे भुलि कुल लाज रे ॥ बावरी भई महाराज रे ॥२॥ तेरि रंग भूलि रे वोही खुसी हालि रे ॥ निजानंदमो मतवाली रे ॥ ३ ॥

## पद ३८३. [ चा० बोलणें फोल झालें ] .

त्यासि भांवा गे ॥ सांवळा सुंदर वाहे पांवां गे ॥ ध्रु० ॥ नाम दोषाचें खंडन ॥ रूप त्रैलोक्यमंडन ॥ कळीं काळाचें दंडन ॥ ऐसें बोलती श्रुती ॥ १ ॥ जें योगीयांचें निज ॥ जें कां नीजाचें निजगुज ॥ वेदगर्भीचें सहज ॥ सुख व्यापक सये ॥ २ ॥ जें कां मनासी नाकळे ॥ मना अंतर्बाह्य खेळे ॥ जेथें मनचि मावळे ॥ जन्म शून्य निश्चयें ॥ ३ ॥ भोग भोगुनियां भारी ॥ ज्यासि ह्मणती ब्रह्मचारी ॥ जेथें नाहीं नर नारी ॥ जन्म शून्य निश्चयें ॥ ४ ॥ सर्वीं वसे सर्वातीत ॥ नव्हे मूर्त ना अमूर्त ॥ निजानंद सदोदित ॥ सर्व रंगीं रंगला ॥ ५ ॥

## पद ३८४.

दुःख शोकही सरला समूळ श्रमही हरला ॥ ध्रु० ॥ श्रीराम हृदयीं भरला तरि भवजलनिधी अंतरला ॥ करीं धनुष्य बाण साजे सुंदर ठाण ब्रह्मादिकां विंदाण न कळे कदां ॥ मानववेषधारी भक्तकाजकैवारी इंद्र चंद्र त्रिपुरारी चिंतिती सदां ॥ १ ॥ सत्य संकल्प ज्याचा न बोले असत्य वाचा ॥ नामें जडजीवांचा मोह भंगला ॥ योगियांचें जें कां ध्येय निजभक्तांचें हृदय पूर्णानंदें जो अद्वय ॥ निजानंद रंगला ॥ २ ॥

## पद ३८५.

मुरली मनोहर खेळे ज्यासि पाहतां निवती डोळे ॥ ध्रु० ॥ वांकीं तोडर वाजे देहुडें ठाण साजे गोपवेषें विराजे नाटकी सये ॥ रूपची अरूप कैसें नव्हे म्हणिजे तैसें चित्त चिंतीतां पिसें होवुनि ठाय ॥ १ ॥ नादें भूलल्या गायी नाचताति ठायीं ठायीं आनंदें घनघाई अतर्क्य कला ॥ नाठवेचि हेतू मात दृश्य नाहीं दृश्यातित पूर्णब्रह्म सदोदित अकळ लीला ॥ २ ॥ सांडुनि सकळ काज पातिपुत्रांचि लाज नाठवेचि गोपी निजदेह विसरे ॥ निजानंद–सुखीं माय वृत्ति ही रंगुनि जाय बोलणें बोलिजे काय हेतुही नुरे ॥ ३ ॥

## पद ३८६. (सखया रामा० या चा.)

साजणी माझ्या रामा आणुनि कोणी द्या हो ॥ ध्रु० ॥ क्षमा दया उपरती भक्ती भावना शांती ॥ सखिया साजणी वेगीं या वो ॥ १ ॥ राघवेविण कांहीं नावडे वो बाई ॥ विरस वाटतो देहभावो ॥ २ ॥ निजरूपीं मानस सरे रंगलें मागुति न फिरे ॥ जिव जाईल तरि जावो ॥ ३ ॥

**पद ३८७. [ चाल सदर. ]**

साजणी बाई तें सुख बोलतां न ये ॥ ध्रु० ॥ सुख तें बोलतां न ये केविं मी सांगों सये ॥ प्राण पांगुळा ठाये ॥१॥ सद्गुरु कृपादृष्टी बुद्धि बोधासि भेटी ॥ आनंदमय झाली सृष्टी ॥२॥ ममता पालटली ठायीं चोज तें सांगों कायी ॥ तन्मय हा बोल उरला नाहीं ॥ ३ ॥ संकल्प भंगला भव हा वो रंगला ॥ अवघा निजानंद रंगला ॥४॥

**पद ३८८.**

रामराया रे छेदीं दुस्तर माया रे ॥ ध्रु० ॥ बाळपणीं रति खेळाणियावरि वारि नसे अति भूलि भरे ॥ यौवन नित्य मदोन्मत्त डुल्लत व्याकुळ चित्त सकामशरें ॥१॥ शेष दशा जसि अंध निशा गति नासुनियां मतिभ्रंश पुरा ॥ शेवटिले दिनिं देह हुताशनीं सर्वहि घालुनि येती घरा ॥२॥ तात मात सुत भ्रात सकामित अंतर हेंचि निरंतरही ॥ संगविना निजरंग तुझा गुज जाणसि तूं बहिरंतरही ॥ ३ ॥

**पद ३८९.**

क्षणभंगुर पाहीं हो जीवित ॥ ध्रु० ॥ स्वधर्मीं रत हो भजनीं निरत हो शोकविगत हो ॥ विषय वमनवत् हो ॥ १ ॥ अनृत त्यजावें हरिसि भजावें निज उमजावें ॥ पुनरपि नुपजावें ॥२॥ सज्जनवृंदें भज निर्द्वंद्वें निजसुखछंदें ॥ रंग निजानंदें ॥ ३ ॥

**पद ३९०. [ बोलणें फोल झालें या चा. ]**

कांहीं बोल रे बोल कान्हा कांहीं बोल रे नीज न ये ॥ ध्रु० ॥ बोल उद्भवला कोठून ॥ बोला बोलवितें कोण ॥ मूळ पाहातां शोधून ॥ भवबंधन मिथ्या ॥१॥ दृष्टीविण पाहे ॥ चरणेविण चालताहे ॥ रूप नसोनियां आहे ॥ होय तें एक ॥२॥ कृष्ण म्हणे गे आई ॥ निज शोधुनियां पाहीं ॥ निज पाडितांचि ठाईं ॥ जन्ममरण कैंचें ॥३॥ नीज निजानंद रूप ॥ निजगुरूचें स्वरूप ॥ चरणीं रंगतां तद्रूप ॥ आपेंआप होइजे ॥ ४ ॥

**पद ३९१. [ कवण तुम्ही कवणाचे या चा. ]**

निजहिता मी चोर तुजवरि कां रामा रुसावें ॥ निजमंदिरीं अग्नि लावुनि उदकावरि कोपावें ॥ ध्रु० ॥ बहुत बडबड केली परि हें मन ठायीं बैसेना ॥ बहुत वरि वरि माळा परि हे कामक्रोध आवरेना ॥ बहुत आयुष्य गेलें परी साधन कांहीं घडेना ॥ बहुत वरि वरि वेष दाउनि मैंद

मोडी माना ॥ १ ॥ माझें हित मी न करी झालों आपला आपण वैरी ॥ तुजवरि काय बोल आळशी मीच सर्वांपरी ॥ निजानंद सुख सोडुनि विषय चिंती मन भिकारी ॥ अपराधी मी रामा आतां उचित तें तूं करी रे ॥ २ ॥

## पद ३९२.

तें रे तें रे तें रे ॥ध्रु०॥ तुम्हां सांगतों मी एक बेक ॥ ज्याचे स्वरूपिं नाहीं अनेक ॥ तें आपुलेंचि आपण एक ॥ ऐसे म्हणतेही जेथ नाहीं देख ॥१॥ एकमेकापासुनि सकळिक ॥ झाले म्हणती ते परम मूर्ख ॥ नाहीं पट तंतुसी ठाउक ॥ जेथें जाणतें नेणतें भोंक रे ॥२॥ एकबेकासि लाविति खोडी ॥ तेथुनि माया जाहली म्हणती वेडी ॥ कापसाचि नाति पासोडी ॥ तैसें झालें जग जाणे तोचि गडी रे ॥ ३ ॥ एकबेक तो सागर एक ॥ ज्याच्या लहऱ्या तरंग लेकी लेक ॥ तैसें जाणा हें जग सकळिक ॥ तेथिल जन्म मरण मिथ्या देख रे ॥४॥ एक बेक तो निजानंद ॥ जेथें नाहीं सुखदुःखबाध ॥ तेथें रंगुनियां अभेद ॥ एकबेकचि झाला शुद्ध रे ॥५॥

## पद ३९३. ( अभंग )

आमुचे वंशीं कैंचा राम एके पिढियेचें काम ॥१॥ राम रंगीं हो रंगला अवघा निजानंद झाला ॥२॥ बापें जोडिलें निज धन ॥ चवघां वांटिलें समान ॥३॥ एक बंधु रूसला ॥ आपला वांटा घेउनि गेला ॥४॥ संतीं वांटा केला समान ॥ ज्येष्ठा ठायीं आह्मां भजन ॥५॥ उरलें त्याचें त्यासि पाहीं ॥ अर्थाअर्थीं संबंध नाहीं ॥६॥ आपुल्या बळें करूं जोडी ॥ संतसंगें लावूं वाढी ॥७॥ तिघे निजानंदें धाले ॥ रंग टाकुनि एक झाले ॥८॥

## पदं ३९४. [ चाल—अक्रुर हा नेतो श्रीहरी. ]

कृष्णाबाई वो बाई वो अक्षय सुखदायी ॥ अभिष्ट पुरवीं वो पुरवीं वो लागेन मी तव पायीं ॥ ध्रु० ॥ कृष्णे माते वो माते वो अनघ निजसुखसरिते ॥ तव गुण वदताती वदताती उत्पत्ति स्थिति संहर्ते ॥ तव तीरनिवासी निवासी निजानंद सुखदाते ॥ तव पदिं मी शरण मी शरण अंतिं स्थळ

१. श्री निजानंदस्वामी [ रंगनाथाचे वडील ] यांणीं कऱ्हाडक्षेत्रीं कृष्णा व कुकुमती [ कोयना ] संगमावर, रंगनाथ संन्निध असतां जित जलसमाधि घेतली. त्या वेळेस रंगनाथानें विरक्ततेनें श्री कृष्णाबाईची वडिलांप्रमाणें आपणासही स्वोदरांत घेण्याविषयीं प्रार्थना केली. त्या प्रसगाचें हें पद्य आहे.

दे माते ॥१॥ कुकुमति संगमीं संगमीं पुण्यरूप चिद्भूमी ॥ सकळ देवेंशीं देवेंशीं निजानंद तव धामीं ॥ मार्कंड तीर्थ वो तीर्थ वो अति उत्तम निष्कामी ॥ क्षेत्र संन्यास संन्यास तेथें दे मागत मी ॥२॥ दोहीं निज करीं निज करीं लक्ष्मी क्षेत्रें धरी ॥ करविर करहाटक करहाटक विलसत नामें बरीं ॥ महिमा न बोलवे न बोलवे निगमातें अणुभरी ॥ निजानंद आनंद रंगला तव तीरीं ॥ ३ ॥

## पद ३९५.

येसि केधवां मानसमोहना माधवा ॥ भक्तवत्सला दयासिंधु बांधवा ॥ ध्रु० ॥ करितांहि रक्षण न राहे मानस क्षण ॥ करुनि काय तें श्रवण ॥ न स्मरे मनन निजध्यास धरी कवण ॥ साक्षात्कारीं आली हारी हे संपूर्ण ॥१॥ मन हें कीर्तनीं दक्ष हाव भाव कटाक्ष ॥ लावुनि धन मानीं लक्ष ॥ भेटतां साधु पावन होतका मुमुक्ष ॥ छळण-वादीं जैसा यक्षचि प्रत्यक्ष ॥ २ ॥ न येसि जरी तूं देवा कायसा माझा केवा ॥ हारी आली तुझि-या नांवा ॥ पतीतपावन घोष राहिला आधवा ॥ निजानंदीं मानस रंगवीं राघवा ॥ ३ ॥

## पद ३९६.

राजस रामाबाई शिवादि सुरनर लागति पायीं वो ॥ महिमा वर्णिल कवण शिळा उद्धरली लवलाहीं वो ॥ ध्रु० ॥ जानकीजीवन मनमोहन माते हृदयनिवासिनी वो ॥ जाळें भवदुःखाचें तोडुनी केलें सुख संजीवनी वो ॥ जाणेल जडभारी माझें कोण तुजवांचुनी वो ॥ जाणसि मनिच्या खुणा जिवासी जीवन तूं संजीवनी वो ॥ १ ॥ न करीची अवज्ञा पितृवचनासी पाळिलें वो ॥ न धरीच अभिमान राज्य सांडुनि वना चाले वो ॥ न ह्मणे सानें थोर दैत्य दानवां उद्धरिलें वो ॥ नगर सोनियाचें शरणागतासि दिधलें वो ॥ २ ॥ किति उपकार बोलों केलें भवबंधनमोचन वो ॥ किति जन्माचें दुःख त्याचें केलें त्वां दहन वो ॥ किन्नर विद्याधर तुज ध्याती ब्रह्मादिक मुनिजन वो ॥ कीटक मर्कट पक्षी नामें झाले परि पावन वो ॥३॥ नाहीं दैवत ऐसें नामें त्रैलोक्यां उद्धारी वो ॥ नाम जीवन शिवाचें शमलें हळाहळ साचार वो ॥ नाम निजबीज म्हणुनि बोधीं पार्वतीसि निर्धार वो ॥ नामें नारद तन्मय नामापरतें नाहीं सार वो ॥४॥ थक्कित देव किन्नर ह्मणती आश्चर्य रूप रामाचें वो ॥ थरथरली

भूबाळा नखीं तेज कंदर्पाचें वो ॥ थक्कित गण गंधर्व रूप रंगलें निजानंदाचें वो ॥ स्थळ अणु नाहीं रितें जनीं वनिं रामरूप साचें वो ॥५॥[1]

## पद ३९७.

वेधक रामा बाई मज विश्रांति तुझ्या पायीं वो ॥ तनु मन धन अर्पण करितां नव्हे मी उतराई वो ॥ ध्रु० ॥ निष्काम निजधाम निराभास निजमूर्ति ॥ निःशब्द निर्गुण निष्कळ पार ब्रह्मादिक नेणती ॥ निवविलें सर्वांगें निजानंदें केले तृप्ती ॥ निजगुज माझे जिविचें तूं जाणासि आर्तगती वो॥१॥ जागृति स्वप्न सुषुप्ति ध्यानीं मनीं तूं चिंतनीं वो ॥ झालों तुझेनि सुखी तूंचि जनक आणि जननी वो ॥ जाळित रज-तम-वृत्ती माझी कोण तुजवांचुनी वो ॥ जाणिव छेदुनि माझी स्वयें भाससि जनीं वनीं वो ॥ २ ॥ नकळे पार तुझा शेष शिणला करितां स्तुती वो ॥ न बोलवे प्रकट वेद श्रुति ह्मणती नेती वो ॥ न कळसि सुरवरां अकळ ब्रह्मादिक नेणती वो ॥ न धरत धीर मना देखुनि धांवसि निजभक्तिं वो ॥ ३ ॥ दशेंद्रियातीते द्वंद्वदुःखसमूळ हर्ते वो ॥ दशादिशाव्यापके जनिं वनीं भुवनें साक्षभूते वो ॥ दवडुनि अभिमानातें निजानंदें भजविसि सत्ते वो ॥ दंभ मद मत्सर रंग अर्पियला चरणातें वो ॥४॥

## पद ३९८.

इतुकें देई देवा तुझी आवडी लागो जींवा ॥ यापर साधन नलगे न मनीं मुक्तीचाही टेवा ॥ ध्रु० ॥ वृत्ती माझी शून्य रामा होऊं नेदावी ॥ मन भ्रमलें तरी रामा आठवण द्यावी ॥ बुद्धि माझी निश्चयें शिबिरीं बैसवावी॥ शरण रिघोनि तुज हेंचि मागें जिवेंभावीं ॥१॥ तुझी गोडी मनासि रामा लागलीयावीण ॥ अपार अगणित भेद मनाचे आवरी हे कवण ॥ इंद्रियांत मन मीं म्हणवीशी तें कवणा निवारण ॥ तुझिया भजनेंविण ज्ञान चावटी हें जाण ॥२॥ तुझी कृपा पूर्णत्वें परिपूर्ण मनासि होय ॥ तैं सकळ अवयवांसहित मन निश्चळ राहे ॥ समूळ रंग टाकुनि मन हें निजानंदं धाय ॥ भवबंधाची मात तया स्वप्नींही न साहे ॥३॥

## पद ३९९.

निज रामा ये रे ॥ ध्रु० ॥ काम क्रोध दैत्य ॥ मारिले समस्त ॥ शी-

---

1 टीप :—या पांच कडव्यांचे पद्यांत प्रत्येक कडव्याचे प्रथमाक्षरानें "जानकीनाथ" हा मंत्र साधिला आहे.

पळासी बहुत ॥१॥ वासना ताटिका ॥ छेदिली निमीष्यें एका ॥ भक्तजन सुखा ॥२॥ जनीं व्यापकपण ॥ होतां जाहला शीण ॥ छेदाया रंगपण॥३॥

पद ४००.

गडी आमुचा रे ॥ध्रु०॥ प्रपंचीं उदास पाहीं ॥ कल्पना समूळ नाहीं ॥१॥ सर्वेही आपण जाणे ॥ जाणीव समूळ नेणे ॥२॥ निजानंद रंगें धाला ॥ द्वैताद्वैत आंचवला ॥३॥

पद ४०१. [ चाल—अब तुम कब सुमरो गे राम ]

हरिविण कोण करिल कैवाड ॥ गर्भीं परिक्षिती दुर्घट जाणोनि घाली सुदर्शन आड ॥ध्रु०॥ विचित्र तांडव करुनी पांडव रक्षीले पाळिला लाड॥ अंबरीष प्रल्हाद सोडविले देखुनि संकट जाड ॥ १ ॥ देहसंबंधी पुत्र मित्र गोत्रज लाविति लाघव वाड ॥ लक्षुनि निर्धन सर्व उपेक्षिति या परिची ते द्वाड ॥२॥ होउनि निःसंग निजानंदें रंग सोडुनि सर्वेही चाड ॥ हाचि उपाय करी शुक नारद कोण तुझा पडिपाड ॥ ३ ॥

पद ४०२.

श्री रघुवीरा धीरा यावें निजमंदिरा ॥ सुकुमारा ॥ध्रु०॥ रामा तुजविणें अर्ध क्षण निमिष न कंठे ॥ उदारा ॥१॥ निःसंगा निजरंगा अभंगा ॥ अविकारा ॥२॥

पद ४०३.

वाघानें अखंड घरीं थारा केला निरंतरीं ॥ सावध व्हा रे झडकरी समूळ खाईल ॥१॥ दाहा पिलीं जया मागें झेंपावती लागवेगें ॥ देखत खाताति सर्वांगें या प्राणियासी ॥२॥ थोर थोरां न ये आया न दिसे जयाचें तया ॥ आयुष्य घालुनि चारा या पोसितां कां रे ॥३॥ न हालतां जवळुन ब्रह्मांड येतो फिरोन॥ खातसे जवळ बैसोन न दिसे कोणा ॥४॥ ऐसियाची धाडी मोठी बांधले कोट्यानकोटी ॥ म्हणुनि रिघाले पाठीं या श्री गुरुच्या ॥५॥ बा नारंग करी भेद पाश-धारी निजानंद ॥ न मारितां करी विनोदें लाविला सेवे ॥ ६ ॥

पद ४०४.

मी वासुदेव येथें आलों ॥ सखा सर्वांचा यालागीं झालों ॥ध्रु०॥ मी डोळियांचा निज डोळा ॥ डोळे देखति हे माझी कळा ॥ मी जीवाचा निज जिव्हाळा ॥ गुरुकृपें ऐसा सोहळा गा ॥१॥ मी चरणाचे निज च-

रण ॥ चरण चालती माझेनि जाण ॥ वाचे वाचा मी आपण ॥ गुरुकृपें बाणली खुण गा ॥२॥ गुरुरायासि रिघे शरण ॥ जेणें पावसि हे निर्वाण खुण ॥ तेणें चुकेल जन्ममरण ॥ निजानंदें तूं रंगसी जाण ॥ ३ ॥

पद ४०५. [ राग देस ]

देवाधिदेवा भजन मीं कैसें करूं ॥ ध्रु० ॥ अनंत अपरांपरु श्रुतिसि न कळे पारु ॥ निर्धार कैसा धरूं ॥ १ ॥ जरी मी म्हणवितों भक्त तरी मी ओट हात ॥ तुझिया स्वरुपासि नाहीं अंत ॥ २ ॥ जरी मी ऐक्य तुजसीं कैंचा ठाव भेदासी ॥ अखंड खंडणा करितां दोषी ॥३॥ निरुपमा उपमा देणें अनामा नाम घेणें ॥ लिंग भेद हा वेद ह्मणें ॥ ४ ॥ हरि म्हणें परिसें मात लहरी चाले सागरांत ॥ दिसताहे द्वैत परी अद्वैत ॥ ५ ॥ भजन ऐसें किजे अभेदभावें ॥ ध्रु० ॥ शिव होउनि शिवा यजा श्रुति या बोलती गुजा ॥ अभेद भक्ती हे भक्तराजा ॥ ६ ॥ मींपण सांडुनियां ठायीं आप-आपपणा निरखुनि पाहीं ॥ श्रीहरी भरलासे दिशा दाही ॥७॥ उदकीं तरंग क्रीडती हेमीं नग जैसा म्हणती ॥ देव भक्त ही येचि स्थिति ॥८॥ देवभक्तां नाहीं भेद भजन हें अभेद ॥ अभेदें रंगे निजानंद ॥ ९ ॥

पद ४०६.

ये रंगा यावें दीनदयाळा देवकिबाळा रे ॥ध्रु०॥ भक्तवत्सला देवा ॥ गोकुळपाळा ॥ १ ॥ वारुनी सकळ धंदा ॥ आनंदकंदा ॥ २ ॥ विषम त्रासलों द्वंद्वा ॥ निजानंदा ये ॥ ३ ॥

पद. ४०७. [ काळों आलीं माव रे या चा. ]

भक्ती तैं विरक्ती रे विरक्ति तैं मुक्ती रे ॥ बंधाची निर्मुक्ती जीवा लाभे जैं सद्भक्ती रे ॥ध्रु०॥ आत्महिताकारणें विवेकें विचारणें ॥ सिंधुसी सैंधव तैसी भक्ती अंगिकारणें ॥ १ ॥ शुद्ध सांप्रदाय रे मुख्य हा उपा-य रे ॥ हरी गुरुरूपें वारी सर्वहि अपाय रे ॥ २ ॥ धैर्य मुख्य पाहिजे भक्तियोगें राहीजे ॥ निजानंद रंगीं अहंममत्वासी वाहिजे ॥ ३ ॥

पद ४०८. [ चाल—मातःस्वामिनी सीता. राग कलंगडा. ]

जीवा स्मरण करिसी ना कां नित्य शिवाचें ॥ ध्रु० ॥ मस्तकीं गंगा सुधाकर भाळीं ॥ भूतसमूह कृपें परिपाळी ॥ १ ॥ नंदि वहन नृकपाल कराग्रीं ॥ भूषित सर्प विभूति शरीरीं ॥२॥ पंचवक्त्र विराजित सह अंबा ॥ सदय विलोकित भक्त कदंबा ॥३॥ स्थान स्मशान निरंजन ज्यातें ॥ इच्छित

किंचित नास्ति तयातें ॥४॥ निर्गुण रूप सगुण जयाचें ॥ रंगी रंगलें शिवस्वरूप शिवाचें ॥५॥

## पद ४०९.

तारी गुरुविना कोण भवाब्धि दुस्तर भारी रे ॥ध्रु०॥ शिव विरंचि रमापति हाचि ॥ दीन दयाकर मूर्ति सुखाची ॥१॥ शंभु शिवेसि गुरुगुज सांगे ॥ राम करी गुरुसेवन अंगें ॥ २ ॥ व्यास ऋषी मुनि नारद धाता ॥ पावन परम गुरुपद ध्यातां ॥३॥ नाश तयासि लघुत्वाचि साजे ॥ शाश्वत तेथें गुरुत्व विराजे ॥४॥ दुःख लघुत्व अहं-मम-संगें ॥ सौख्य विलास गुरुपद रंगें ॥५॥

## पद ४१०.

देवा गुज उमजेचिना कां दीनदयाळा ॥ध्रु०॥ तूं हृदयस्थ निरंतर जेथें ॥ मोहसमूह यथास्थित तेथें ॥१॥ एक मठीं तम दीपक राहे ॥ हें अवटित मतें गमताहें ॥२॥ वेदमुखें हरि बोलत गोष्टी ॥ नांदत जेविं हुताशन काष्ठीं ॥३॥ पाहे मथन करुनि विवेकें तन्मय राहें रे ॥ ध्रु०॥ तोय रवीकिरणावरि जैसें ॥ तेविं विवर्तरूपें जग भासे ॥ ४ ॥ शास्त्र गुरूसह प्रत्यय संगें ॥ वारीं अनित्य क्रीडे निजरंगें ॥ ५ ॥

## पद ४११. [ चाल—न्हाणि न्हाणि त्या निर्मळातें ]

देईं इतुलें अंतरिंचें गुज सांगितलें ॥ निगमागमिंचें हृद्गत तें तुज मागितलें ॥ध्रु०॥ कृपावंता विज्ञप्ति परिस अनंता ॥ छेदि अहंता दुर्निवार ममता चिंता ॥ निरवीं संता भगवंता कमलाकांता ॥ भुवनत्रयींचें साम्राज्य न मागें आतां ॥ १ ॥ संकट भारी मानुनियां नेदिसि चारी ॥ तरि एकच देईं विद्वज्जनसंग मुरारी ॥ दीनवत्सल ते तूं भक्तकाजकैवारी ॥ त्याचेनि विजयी मी षड्वर्गाच्या समरीं ॥२॥ जगदुद्धारीं तव भक्त सुपावन कारी ॥ होसी मत्स्य कूर्म वामन तूं त्यांचे द्वारीं ॥ध्रु०॥ चित्त जयाचें निर्मत्सर निर्भय साचें ॥ सदय सदांचे विगताशय अंतर ज्यांचें ॥ पियूष वाचें बोलति त्या सदन शिवाचें ॥ निजरंगें त्या बहिरंतर चित्सुख नाचे ॥३॥ हो जे झाले मी दास तयांचा बोलें ॥ न धरीं पदरीं तुज अंतरसाक्षी केलें ॥ ध्रु० ॥

## पद ४१२. [ चाल—सदर ]

पाहा पाहा श्रीराम नयनीं पाहा ॥ न दिसे ऐसा शोधितां दिशा दाहा ॥

निज हृत्कोशीं अनुभवोनि तन्मय राहा ॥ नेणति चारी अष्टादश आणि साहा ॥ध्रु०॥ सूर्यवंशीं अज अव्यय जो निष्काम ॥ दशरथ कौसल्योद्भव मुनिमनविश्राम ॥ लीलाविग्रही अवाप्त पूर्णकाम ॥ वशिष्ठ बोले सच्चिदानंद नाम ॥१॥ विधि मुळ आपुलें शोधितां सहस्र वर्षें ॥ मग गजबजिला पातला वरि उत्कर्षें ॥ म्हणे मग पावें तंव वर दिधला हर्षें ॥ तप तप शब्दें तो पावन केला स्पर्शें ॥२॥ मायायोगें जो विवर्तरूपें भासे ॥ तटस्थ स्वरुपें लक्षणें द्वय लक्षांशें ॥ विद्वत्ज्ञानी अनुभविती स्वात्मतोषें ॥ एवंविध तो गुरु शास्त्र आत्मविलासें ॥ ३ ॥ अलंकारीं सुवर्ण शोभा दावी ॥ तेवि निजात्मा अवतरला मनुष्यभावीं ॥ महिमा ज्याची कवणासि नाहीं ठावी ॥ शिव हृत्कोशीं निजस्वरूप ज्याचें भावी ॥४॥ गमलें विबुधां भवबंदी मोचन झालें ॥ दिनकर भावी वंशासि दैव आलें ॥ वसुधा हर्षें हो मस्तकिंचें जड गेलें ॥ या निजरंगें त्रैलोक्य सुखी केलें ॥ ५ ॥

## पद ४१३. [ चाल—सदर ]

तंव आकाशीं गर्जति भेरी काहाळा ॥ वर्षती सुमनें सुर जयजयकार झाला ॥ध्रु०॥ प्रसूतकाळीं कौसल्या एकांतीं ॥ सम्मुख देखे तव दिव्य चतुर्भुज मूर्ति ॥ मंडित आयुधें बालार्कसादृश्य दीप्ति ॥ बोले तनयो मीं आलों तुझिये भक्ति ॥ १ ॥ हर्षें खेळे अंकावरि बाळकवेषें ॥ वशिष्ठ पाहें अंतरिच्या ज्ञानप्रकाशें ॥ जगदुद्धारा हा अवतरला संतोषें ॥ चिंत्तिं स्मरला वाल्मीकिभाष्य विशेषें ॥२॥ त्रिभुवन विजयी हा होईल बाळक प्रभुचा ॥ चाळक जगतीतळ पाळक ऋषिमंडळिचा ॥ ध्रु० ॥ तारिल अहल्या ताटिका मारिल बाणें ॥ कौशिकयज्ञातें रक्षिल क्षात्रत्राणें ॥ त्र्यंबकभंगें सत्कीर्ति होईल तेणें ॥ वरील सीता संतोष जीवप्राणें ॥३॥ पितृवचनातें पाळुनियां जो वनवासी ॥ वानरसेना करुनी जो मित्रत्वेंशीं ॥ शिळा सेतू संपादिल साहाय्यासी ॥ उतरिल कपिसेना चर्या अद्भुत ऐसी ॥४॥ दशमुख वधुनी बिभिषणासि लंका ओपी ॥ आणुनि सीता स्वस्थानीं सुरवर स्थापी ॥ रामराज्यीं निर्द्वंद्व न दिसे पापी ॥ निजसुखरंगें श्रीराम पूर्ण प्रतापी ॥ ५॥

## पद ४१४.

नंद यशोदेचा बाळक तो श्रीहरि वो ॥ पांवा मंजुळ वाजवी तो मोहरि वो ॥ गोपी-गोपाळांचीं मानसें मोहरी वो ॥ तोय तुंबलें कालिंदी-

किंचित नास्ति तयातें ॥४॥ निर्गुण रूप सगुण जयाचें ॥ रंगी रंगलें शिवस्वरूप शिवाचें ॥५॥

### पद ४०९.

तारी गुरुविना कोण भवाब्धि दुस्तर भारी रे ॥ध्रु०॥ शिव विरंचि रमापति हाचि ॥ दीन दयाकर मूर्ति सुखाची ॥१॥ शंभु शिवेसि गुरुगुज सांगे ॥ राम करी गुरुसेवन अंगें ॥ २ ॥ व्यास ऋषी मुनि नारद धाता ॥ पावन परम गुरुपद ध्यातां ॥३॥ नाश तयासि लघुत्वाचि साजे ॥ शाश्वत तेथें गुरुत्व विराजे ॥४॥ दुःख लघुत्व अहं-मम-संगें ॥ सौख्य विलास गुरुपद रंगें ॥५॥

### पद ४१०.

देवा गुज उमजेचिना कां दीनदयाळा ॥ध्रु०॥ तूं हृदयस्थ निरंतर जेथें ॥ मोहसमूह यथास्थित तेथें ॥१॥ एक मठीं तम दीपक राहे ॥ हें अघटित मतें गमताहें ॥२॥ वेदमुखें हरि बोलत गोष्टी ॥ नांदत जेविं हुताशन काष्टीं ॥३॥ पाहे मथन करुनि विवेकें तन्मय राहें रे ॥ ध्रु०॥ तोय रवीकिरणावरि जैसें ॥ तेविं विवर्तरूपें जग भासे ॥ ४ ॥ शास्त्र गुरूसह प्रत्यय संगें ॥ वारीं अनित्य क्रीडे निजरंगें ॥ ५ ॥

### पद ४११. [ चाल—न्हाणि न्हाणि त्या निर्मळातें ]

देई इतुलें अंतरिंचें गुज सांगितलें ॥ निगमागमिंचें हृद्गत तें तुज मागितलें ॥ध्रु०॥ कृपावंता विज्ञप्ति परिस अनंता ॥ छेदि अहंता दुर्निवार ममता चिंता ॥ निरवीं संता भगवंता कमलाकांता ॥ भुवनत्रयींचें साम्राज्य न मागें आतां ॥ १ ॥ संकट भारी मानुनियां नेदिसि चारी ॥ तरि एकच देईं विद्वज्जनसंग मुरारी ॥ दीनवत्सल ते तूं भक्तकाजकैवारी ॥ त्याचेनि विजयी मी षड्वर्गाच्या समरीं ॥२॥ जगदुद्धारीं तव भक्त सुपावनकारी ॥ होसी मत्स्य कूर्म वामन तूं त्यांचे द्वारीं ॥ध्रु०॥ चित्त जयाचें निर्मत्सर निर्भय साचें ॥ सदय सदांचे विगताशय अंतर ज्यांचें ॥ पियूष वाचें बोलति त्या सदन शिवाचें ॥ निजरंगें त्या बहिरंतर चित्सुख नाचे ॥३॥ हो जे झाले मी दास तयांचा बोलें ॥ न धरीं पदरीं तुज अंतरसाक्षी केलें ॥ ध्रु० ॥

### पद ४१२. [ चाल—सदर ]

पाहा पाहा श्रीराम नयनीं पाहा ॥ न दिसे ऐसा शोधितां दिशा दाहा ॥

निज हृत्कोशीं अनुभवोनि तन्मय राहा ॥ नेणति चारी अष्टादश आणि साहा ॥ध्रु०॥ सूर्यवंशीं अज अव्यय जो निष्काम ॥ दशरथ कौसल्योद्भव मुनिमनविश्राम ॥ लीलाविग्रही अवाप्त पूर्णकाम ॥ वशिष्ठ बोले सच्चिदानंद नाम ॥१॥ विधि मुळ आपुलें शोधितां सहस्र वर्षें ॥ मग गजबजिला पातला वरि उत्कर्षें ॥ म्हणे मग पावें तंव वर दिधला हर्षें ॥ तप तप शब्दें तो पावन केला स्पर्शें ॥२॥ मायायोगें जो विवर्तरूपें भासे ॥ तटस्थ स्वरुपें लक्षणें द्वय लक्षांशें ॥ विद्वत्ज्ञानी अनुभविती स्वात्मतोषें ॥ एवंविध तो गुरु शास्त्र आत्मविलासें ॥ ३ ॥ अलंकारीं सुवर्ण शोभा दावी ॥ तेवि निजात्मा अवतरला मनुष्यभावीं ॥ महिमा ज्याची कवणासि नाहीं ठावी ॥ शिव हृत्कोशीं निजस्वरूप ज्याचें भावी ॥४॥ गमलें विबुधां भवबंदी मोचन झालें ॥ दिनकर भावी वंशासि दैव आलें ॥ वसुधा हर्षे हो मस्तकिंचें जड गेलें ॥ या निजरंगें त्रैलोक्य सुखी केलें ॥ ५ ॥

## पद ४१३. [ चाल—सदर ]

तंव आकाशीं गर्जति भेरी काहाळा ॥ वर्षती सुमनें सुर जयजयकार झाला ॥ध्रु०॥ प्रसूतकाळीं कौसल्या एकांतीं ॥ सम्मुख देखे तव दिव्य चतुर्भुज मूर्ति ॥ मंडित आयुधें बालार्कसादृश्य दीप्ति ॥ बोले तनयो मीं आलों तुझिये भक्ति ॥ १ ॥ हर्षें खेळे अंकावरि बाळकवेषें ॥ वशिष्ठ पाहे अंतरिच्या ज्ञानप्रकाशें ॥ जगदुद्धारा हा अवतरला संतोषें ॥ चित्तिं स्मरला वाल्मीकिभाष्य विशेषें ॥२॥ त्रिभुवन विजयी हा होईल बाळक प्रभुचा ॥ चाळक जगतीतळ पाळक ऋषिमंडळिचा ॥ ध्रु० ॥ तारिल अहल्या ताटिका मारिल बाणें ॥ कौशिकयज्ञातें रक्षिल क्षात्रत्राणें ॥ त्र्यंबकभंगें सत्कीर्ति होईल तेणें ॥ वरील सीता संतोष जीवप्राणें ॥३॥ पितृवचनातें पाळुनियां जो वनवासी ॥ वानरसेना करुनी जो मित्रत्वेंशीं ॥ शिळा सेतू संपादिल साहाय्यासी ॥ उतरिल कपिसेना चर्या अद्भुत ऐसी ॥४॥ दशमुख वधुनी बिभिषणासि लंका ओपी ॥ आणुनि सीता स्वस्थानीं सुरवर स्थापी ॥ रामराज्यीं निर्द्वंद्व न दिसे पापी ॥ निजसुखरंगें श्रीराम पूर्ण प्रतापी ॥ ५॥

## पद ४१४.

नंद यशोदेचा बाळक तो श्रीहरि वो ॥ पांवा मंजुळ वाजवी तो मोहरि वो ॥ गोपी-गोपाळांचीं मानसें मोहरी वो ॥ तोय तुंबलें कालिंदी-

च्या उदरीं वो ॥ ध्रु०॥ देहभाव झाला वाव सरली लाज वो ॥ वृत्ति वें-धली भुलली गृहकाजा वो ॥ प्राणाचाहि प्राण भाविती यदुराज वो ॥ झालें नाहीं कालत्रयीं ऐसें चोज वो ॥१॥ प्रेमभावें जाती जेथें तो श्रीपति वो ॥ वस्त्रें भूषणें पालटूनि लेती वो ॥ पयपानातें बाळकें न करिती वो॥ वेणु-गानश्रवणें विचित्र झाली स्थिति वो ॥२॥ व्याळ नकुळेंशीं स्वच्छंदें खेळताहे वो ॥ धेनु व्याघ्रेंशिं केसरी गजीं राहे वो ॥ शुकसारिकास-माजीं श्येनु पाहीं वो ॥ कैंचा वैरभाव कृष्णीं तन्मयता वो ॥३॥ इंदु मंद-ला तो वेग वायो टाकी वो ॥ शेष डोले कूर्म आंगीं पाय ओढी वो ॥ भानु थोकला आश्चर्य त्रैलोकीं वो ॥ गोवळ नाचे छंदें गर्जे तोडर वांकी वो ॥४॥ बोले शेषहि नेणवे याचा पार वो ॥ लीलाविग्रही घेतला अव-तार वो ॥ जाणती साधु सज्जन नेणती भूमीभार वो ॥ निजानंद रंगला श्रुतीसार वो ॥ ५ ॥

**पद ४१५.** [ चाल—बोलणें फोल झालें डोलणें० ]

देहीं मी माझे वैरी यांतें शीघ्र मारीं ॥ध्रु०॥ दुर्जय संपदा आसुरी शोक मोह दंती भारी ॥ राग द्वेष सुहृद यांचे साहाकारी ॥ १ ॥ इच्छा माता चिंता कांता लोभ पाठीराखा भ्राता ॥ आशा तृष्णा विलासिनी या कुमारी ॥२॥ लक्ष कोटि जन्मवरी न सुटती दुष्ट वैरी ॥ दानवां मानवां खेदकारी ॥३॥ उपाय हा एक यातें साधुसंगें शास्त्रमतें ॥ जाणिजे मी कोण येथें देहधारी ॥४॥ जरी गुरुकृपा होय तरि हे सांपडे सोय ॥ जीव हा रंगुनि जाय ईश्वरीं ॥ ५ ॥

**पद ४१६.** [उत्तम जन्मा येउनि रामा गेलों उगा वाया या चा. ]

कांहीं नरदेहीं या झालें हित जिवाचें रे ॥ नाहीं जाळियलें मी माझें बीज भवाचें रे ॥ध्रु०॥ वायां धरियला कां वाळुवेचा घाणा वो ॥ मथिलें तोय वृथा नवनीत कैंचें जाणा वो ॥१॥ सकळ कळाही अष्टादश चाऱ्ही साही वो ॥ मीपण योगें पाडीती वादप्रवाहीं वो ॥ २ ॥ विरक्त वनवासी तापसी मुनि संन्यासी वो ॥ मीपण-दोषें राग द्वेषें झालें क्लेशी वो ॥ ३ ॥ छळिलें षड्वर्गीं निर्दळिलें मोह-शोकें वो ॥ झाली क्षीण विराली दैवी सं-पत्ति धाकें वो ॥४॥ शोधुनि पाहतां श्रीगुरुवीण नाहीं त्राता वो ॥ अहं-मती नुरवी चरणांबुज त्याचें ध्यातां वो ॥ ५ ॥ मुमुक्षु गाती सत्कीर्ति छंदें छंदें वो ॥ सत्ता फावली रंगली निजानंदें वो ॥ ६ ॥

### पद ४१७. [ हिंदुस्थानी ]

तुझें तूं गमाया धड रे ॥ देख दिवे ते राती किई है गाफिल तर मुंड रे ॥ ध्रु० ॥ नंगा आना नंगा जाना धागा बिनहि रहता रे ॥ गैर हुषार गुन्हेगार मेरा मेरा कहता गंव्हार ॥१ ॥ झुटी माया झुटा भाई बाप पूत सब झुटे रे ॥ जबलग तन धन साबुत है तबलग लगते मीठे रे ॥२॥ छांडीं दिन दुनियां की भंग खाकर हुवा दंग रे ॥ निजानंदमे रंग दिवाने छोडीं मना मनीं संग रे ॥ ३ ॥

### पद ४१८.

स्वहित विचारीं रे कैंचें सुख संसारीं रे ॥ध्रु०॥ क्रियमाण बहु जन्मांतरिंचें झालें संचित भारी ॥ स्थावरांत कीटक पशु योनी कोण तुझ्या परिहारी ॥१॥ देह गेह धन पशु सुत दारा सर्वहि अनर्थकारी ॥ श्रवण नयन रसना परि बधिर अंध मूर्ख अविचारी ॥२॥ शुक सनकादिक नारद कवि हरि अंतरिक्ष निर्धारी ॥ पूर्ण सुखें निजपदीं रंगले झाले जगदुद्धारी ॥ ३ ॥

### पद ४१९.

मानवि जन्मा तो आला विरक्त विषयीं दृढ झाला ॥ साधुसमागम सुखसदनीं रमतां धणी न पुरे ज्याला ॥ध्रु०॥ विवेक जिवलग सांगाती वेद जयाचे गुण गाती ॥ आज्ञाधारक रिपु साही शांती वरिली सुखदाती ॥१॥ इंद्रजाळ जसें लटिकें अथवा स्वप्निंचीं कटकें ॥ देहादि भास असा भावी मृन्मय पात्र जसें फुटकें ॥२॥ नवविध भजनें रत दाहाही जीवन श्रीगुरुचे पायीं ॥ सर्व रंगीं एकपणें रंगुनि क्रीडे निजानद-डोहीं ॥ ३ ॥

### पद ४२०.

शिव भजतां काय धोका कां न कळे लोकां ॥ध्रु०॥ मोह रजनी सर्व त्यजुनी सजनिं विजनीं ऐक्य भजनीं ॥ भक्त विराजित वारुनि शोका ॥१॥ शिव पाहतां पाहतां नुरे शिवपण उरे ॥ सत्समागम शास्त्रसंगम जैं हरे ॥ भ्रम द्वैत संभ्रम भवसागरिं हे तारक नौका ॥ २ ॥ शिव सच्चित्सौख्यसिंधु शिव अनाथबंधु ॥ शेष शिणला वेद श्रमला परि नाकळला ॥ अनिर्वाच्य निजरग भरला ॥ ३ ॥

### पद ४२१.

रामा रे तुझे कृपेविण न कळे ॥ध्रु० ॥ मिथ्या माया ह्मणती लोकीं

परि ते सुटेना कीं ॥ वैराग्य शब्दापोटीं भोगी न सुटे मिठी व्यर्थ करितो चावटी ॥ १ ॥ सांगोपांग करी चर्चा परि अनुभव कैंचा ॥ पाठ ज्ञानाचे शब्द तेणें नव्हेचि बोध कैसा तुटेल भवबंध ॥२॥ अनुभव नाहीं नेटें बोटें ह्मणउनि हें मिथ्या वाटे ॥ निजानंद चरणीं रंग तरीच सर्वही सांग अन्यथा जाणावें सोंग ॥ ३ ॥

## पद ४२२.

रामकृष्णा वासुदेवा अखंड घडो तुझी सेवा ॥ उरलेनि आयुष्यें गा संतसंग मज यावा ॥ध्रु०॥ अष्ट वर्षें शूद्रवत् व्यर्थ आयुष्य गेलें ॥ उपनयन करुनियां द्विजत्व दिधलें ॥ विद्याभ्यास करितां हो विप्र नाम हें आलें ॥ सद्गुरुनें कृपादृष्टीं वासुदेवचि केलें ॥१॥ ज्याच्या वीर्याच्या तीन धातु जनिता बोलिजे पिता ॥ उपनयन करी जो गोपिता दुसरा तत्वता ॥ विद्याभ्यास करविता पिता तिसरा तत्वता ॥ अन्नदाता भयत्राता चवथा पांचवा पिता ॥२॥ ऐसे पांच पिते जगीं होतीं तैसे नाहीं मज झालें ॥ जनिता उपनयन पितयानेंचि केलें ॥ ब्रह्मविद्या देउनियां अन्नें शरीर पोषिलें ॥ भवभयापासुनियां आपणचि सोडविलें ॥ ३ ॥ ऐसा सत्य पिता एक जगीं बापचि झाला गुरू ॥ संसारसागरीं गा उतरिला पैलपारू ॥ निजसुखें रंगुनी आपणचि झाला तारूं ॥ ब्रह्मांडीं कीर्ति ज्याची बाप निजानंद गुरू ॥४॥

## पद ४२३. [ अभग ]

माझें ध्यान निजानंद मन निजानंद ॥ जीवन निजानंद जीवनकळा रे ॥ध्रु०॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान अवघा निजानंद घन ॥ दृश्य द्रष्टा निजानंद तोचि दर्शन ॥१॥ निजानंद तनु मन निजानंद माझें धन ॥ पाहाणें पाहातां जन वन निजानंद ॥२॥ निजानंद कार्यकर्ता कारणहि तोचि आतां ॥ भोग्य भोगणें भोक्ता निजानंद ॥३॥ संग निजानंद निःसंग निजानद ॥ रंग निजानंद रंगातीत ॥ ४ ॥

## पद ४२४.

सिद्ध जग जोगी जागत ॥ डारे विवेक गर्जत ॥ शिंगी वाजे अनुहत ॥ तुं तुं ह्मणउनी सांगत ॥ ध्रु०॥ सिद्ध निजानंदघना ॥ जगव्यापक जगज्जीवना ॥ क्षेत्रपाळा तूं क्षेत्रज्ञा ॥ महिमा अपार कळेना ॥१॥ पुढें पाउलाची देखी ॥ मागें न व्हावें साधकीं ॥ एका भावें श्रवण झांकी ॥ सिद्ध खुणा दाखवी लोकीं ॥२॥ शांती-विभूतीलेपन ॥ बाप वैराग्या भूषण ॥ करी स्व-

धर्मस्थापन ॥ जना दावी तो करुन ॥३॥ वाचे अलक्ष बोलणें ॥ अनात्मा नाहीं ह्मणे ॥ सिद्ध सर्वेही देखणें ॥ मयुरपत्राचिये खुणें ॥४॥ मन न राहे चपल कामीं ॥ तया भुवनतीर्थं नेमीं ॥ भगवें दावी माझा स्वामी ॥ भिक्षा तयाप्रती ने मी ॥ ५ ॥ ऐसा नेणती गोसावी ॥ तया कानीं मुद्रा दावी ॥ आत्मचिंतनासी लावी ॥ एकांत ह्मणे सेवीं ॥६॥ सिद्ध निजानंद-राय ॥ कीर्ती ब्रह्मांडीं न माय ॥ माझें जीवन तुझे पाय ॥ चरणीं रंग-ल्या निर्भय ॥ ७ ॥

## पद ४२५.

मृदंग-टाळ-घोषें टाळी वाजवा रे ॥ जीवींचे जीवन निज रामरंगीं पाल-वा रे ॥ अवघे हातो-पातीं रामासि विनवा रे ॥ माझें बंधन तोडा ह्मणा रा-घवा रे ॥१॥ काम क्रोधें बहुत मज व्यापिलें रे ॥ मदमत्सरें जिव्हार माझें भेदिलें रे ॥ आशा तृष्णा सर्पिणीनें डंखिलें रे ॥ दंभ अहंकारें शरिर खों-चिलें रे ॥२॥ संत भक्त तुमची मी दासी ॥ तुह्मीं अवघे बोलवा रामासी ॥ आतां धीर न धरवे मानसीं ॥ किती अंत पाहासी ह्मणा राघोबासी॥३॥ राम निजानंदघन माय बाप ॥ रामा तोडावे माझे त्रिविध ताप रे ॥ रंगीं रंगुनियां हरीं संताप रे ॥ प्रेम देई आपुलें उमाप रे ॥ ४ ॥

## पद ४२६.

राघव स्वामी आमुचा जीवन जीवाचा ॥ ध्रु०॥ पिळुनि प्रळय-विजा रस काढुनी मूसे ॥ घालुनि श्री तनु वोतिली राघवरूप तैसें ॥१॥ बुद्बुद उठत फुटत जळ निश्चळ भारी ॥ जन हे नासत भासत राघव अ-विकारी ॥२॥ जनीं वनीं जीवनीं पाहतां निजस्वरूपाचि भासे ॥ निजानंदें पाहतां मुळीं रंगाचि नसे ॥ ३ ॥

## पद ४२७. [ अभंग ]

तैसी माझी हे वाचाळी ॥ घाणा इक्षुदंड गाळी ॥ ध्रु०॥ नाहीं स्वसु-खाची आवडी ॥ मिरवी प्रतिष्ठा कावडी ॥१॥ बरवें बोलणें बरवें गाणें ॥ दावी रूप कोडिसवाणें ॥२॥ वस्त्रा पडों नेदी सुरडी ॥ नेत्र फिरवी अंग मुरडी ॥३॥ माझी परिसोनियां युक्ती ॥ करोत भाविक माझी भक्ती॥४॥ देवा तोडुनि हा दुःसंग ॥ निरभिमानें रंगविं रंग ॥ ५ ॥

## पद ४२८.

धावें पावें राघवा दीनबंधू रे ॥ भवभय हरणा करुणासिंधु ॥ ध्रु०।

वियोगें तुझिया आलें जीवपण रे ॥ अविद्या लागली दृढतर जाण रे ॥ विषयीं हा शिणलो सोडवी कोण रे ॥१॥ विषय ध्यास हा न सुटे पाहें रे॥ अति चपळ मन हें स्थीर न राहे रे ॥ पराधीन जाहलों चुकलों सोय रे ॥ २ ॥ परिसुनि पातला निजमूर्ति राम रे ॥ कर ठेउनि मस्तकीं हरिला श्रम रे ॥ चरणीं रंगुनि हरिला भ्रम रे ॥ ३ ॥

## पद ४२९.

सखिये हरिविण न गमे एक क्षण करूं काय वो ॥ आठवतां गुण रूप सगुण मन विरोनि जाय वो ॥ हरिरस सुरस सुधारस अनुपम चित्त न धाय वो॥ शुक सनकादिक बळी भीष्म वाल्मीक तन्मय माय वो ॥१॥ व्यास पराशर नारद तुंबर कीर्ती गाती वो ॥ अंबरीष प्रऱ्हाद बिभिषण मूर्ती ध्याय वो ॥ शेष रमा हनुमंत परिक्षिती मग्न चित्तीं वो ॥ त्या सुखसंगें निजानंदें रंगल्या भक्तजाती वो ॥ २ ॥

## पद ४३०. [ प्रासंगिक, हिंदुस्थानी. ]

बिचित्र गति आजि भईरि माई ॥ध्रु०॥ अलख निरंजन सुलोलागा ॥ देह बिदेह गवाई ॥१॥ देखति हुं तो सब धोका भागा ॥ सहज समाधी मे पाई ॥२॥ संग निःसंग भया एक रंग ॥ निजानंद गीत गाई ॥ ३ ॥

## पद ४३१. [ हिंदुस्थांनी. ]

राम बिना हुं तो बावरीरी ॥ध्रु०॥ ग्यान न जानूं ध्यान न जानूं ॥ नयनसें नयन मिलावरी री ॥१॥ पल पल छिन छिन जुग भयोरी ॥ मनमोहन गुन गावरी री ॥२॥ काह कहूं आप भुलि गई री ॥ वा बिन कछु न सुव्हवरी री ॥३॥सुस्वरूप निजानंद साही॥ दुजा रंग नहीं आवरीरी ॥४॥

## पद ४३२.

दे दे मजला देवा तव पदसेवा हा निजसुखठेवा ॥ ध्रु० ॥ मन अनावर पापी ॥ अति संतापी ॥ भुवनत्रय व्यापी ॥१॥ अति कामी बहु कोपी ॥ स्वदोष लोपी ॥ न कधीं अनुतापी ॥ २ ॥ मनमोहन तूं रामा ॥ अवाप्तकामा ॥ मुनिमन-विश्रामा ॥ निरतीशय निष्कामा ॥ नकळे सीमा ॥ निज रंग सुखधामा ॥ ३ ॥

## पद ४३३. [ चाल—इस तन धनकी ]

रामा रामा ॥ जानकिजीवना ॥ पतितपावना ॥ मानसमोहना ॥ नित्यनूतना ॥१॥ अहल्योद्धारा ॥ परम उदारा ॥ गुणगंभीरा ॥ निर्विकारा

॥२॥ अवाप्तकामा ॥ मंगळधामा ॥ पावन नामा ॥ हर-विश्रामा ॥ ३ ॥ दीनदयाळा ॥ त्रिभुवनपाळा ॥ अगम्यलीळा ॥ रविकुळबाळा ॥ ४ ॥ अनुपम रूपा ॥ सच्चित्स्वरुपा ॥ मंगळ दीपा ॥ निज निष्कंपा ॥ ५ ॥

## पद ४३४. [ चा. सदर ]

महादेवा ॥ ध्रु० ॥ भाळलोचना ॥ वृषभवाहना ॥ अनंगदहना ॥ सामगाना ॥ १ ॥ अपारपारा ॥ विगतविकारा ॥ जगदुद्धारा ॥ विश्वाधारा ॥ २ ॥ विश्वचाळका ॥ भूतपाळका ॥ दुःखनाशका ॥ भक्तपोषका ॥३॥ महारुद्रा ॥ वीरभद्रा ॥ भालचंद्रा ॥ दयासमुद्रा ॥ ४ ॥ नित्य अभंगा ॥ असंग संगा ॥ भवभयभंगा ॥ श्री निजरंगा ॥ ५ ॥

## पद ४३५. [ चा. सदर ]

गोविंदा ॥ध्रु०॥ गोपवेषा ॥ परमपुरुषा ॥ जय विश्वेशा ॥ श्री जगदीशा ॥ १ ॥ गिरिवरधारी ॥ गोपविहारी ॥ मंगळकारी ॥ लीलावतारी ॥ २ ॥ भवभयदहना ॥ सुखसंपन्ना ॥ अंबुजनयना ॥ अनंतशयना ॥३॥ जगद्व्यापका दीनोद्धारका ॥ सौख्यदायका ॥ रमानायका ॥ ४ ॥ अनंग अंगा ॥ अज अव्यंगा ॥ विश्व-तरंगा ॥ चिन्मय रंगा ॥ ५ ॥

## पद ४३६.

पंडित हो येथुनि तुमचें झालें ॥ चित्रगुप्तीं पत्र पाठवुनि दिलें ॥ कानीं सांगों आलें यमें बोलाविलें ॥ काळे होते ते पांढरे झाले ॥ ध्रु० ॥ आतां जड जुड वाटे लावा ॥ दांत कान डोळे पुढें पाठवा ॥ घरीं अडखीळ घालुनि ठेवा ॥ बहुत जड आलें तुमच्या जिवा ॥१॥ आतां सांडा मागील छंद ॥ वाचें स्मरा राम गोविंद ॥ तेणें चुकेल भवबंध ॥ रंगीं रंगेल निजानंद ॥ २ ॥

## पद ४३७.

जीवाचा जीवन आणा साजणी गोविंदराणा ॥ अन्यथा व्याकुळ प्राणप्रयाण वो सत्य जाण वो ॥ १ ॥ शरीरभार हा झाला वैभवाचा वीट आला ॥ करी जो गोपालकाला वेणुनादीं वो ॥ चित्त वेधी वो ॥ २ ॥ लागला तयाचा छंद भेटला आनंदकंद ॥ स्वामी हा निजानंद सर्व रंगीं रंगला ॥ शोक हा भंगला ॥ ३ ॥

## पद ४३८.

भविष्य बोलतों मी अवघा लोक मरेल ॥ सद्गुरुसी शरण जातां जन्ममरण

चुकेल ॥ध्रु०॥ नवद्वार नगरींचा जीवरावं मरेल ॥ त्याचिये संगतीचे लोक बहु नाडतील ॥ उर पोट घेउनियां दुःखें बहु रडतील ॥ दुश्चिन्हें उदेलीं हो ऐका तेंचि सांगिजेल ॥१॥ हात पाय मान कांपे तोचि भूकंप जाण॥ लांब दाढी शुभ्र झाली धूमकेतु हे खूण ॥ दंतपंक्ती पडली हो उल्कापात संपूर्ण ॥ पांढरी झाली शेंडी शेंडेनक्षत्र आपण ॥२॥ दुश्चिन्हें देखुनि ऐसीं संतीं शांती मांडिली ॥ रजतमविकार-काष्टें एके ठायीं मेळविलीं ॥ मन-बुद्धि-कुंडामाजीं ज्ञानाग्निनें जाळिलीं ॥ वरी अज्ञान घृतधारा त्यांत अ-विद्या मोहिली ॥३॥ दुश्चिन्हें देखुनि ऐसीं संतीं मार्ग दाविला ॥ त्याचि मार्गें आम्हीं जातों कोणी याल तरी चला ॥ सत्संग गेलिया मग उपाय बुडाला ॥ निजानंद पायीं रंगों विघ्न कैचें अम्हांला ॥ ४ ॥

## पद ४३९.

बाई ये मना कैसें वो मानलें ॥ तें तूं आम्हां सांगें वो वाहिलें ॥ध्रु०॥ ध्येय ध्यातां नये ध्याना ॥ तें कैसें मानलें मना ॥ अलक्ष तें लक्षांसि कैसें आलें॥ सगुणनिर्गुण कैसें निवडलें ॥१॥ लक्षितां विश्वाच्या ठायीं ॥ स्वयेंचि संचलें पाहीं ॥ सगुणनिर्गुण हें तेथें उरलें नाहीं ॥ मीपण समूळ बुडालें जये ठायीं ॥ २ ॥ बाई ये मना ऐसें वो मानलें ॥ध्रु० ॥ मन तया पाहुं गेलें ॥ मनही तेंचि झालें॥ मनाचें मनपणही मावळलें ॥ कर्पूर अग्नी-संगें तैसें मना झालें ॥ ३ ॥ गुळाचि गोडी जैसी न सांगवे मुकियासी ॥ अंतरींच तृप्त होय जैसें अनुभवें अनुभवी जाणती ते आपैसें ॥ ४ ॥ जें जें दृश्य पाहों जाय ॥ तें तें निजानंद होय ॥ दृश्य दर्शनीं समूळ लया जाय ॥ सहज पूर्ण रंग ब्रह्मांडीं न माय ॥ ५ ॥

## पद ४४०. [ चा. दिंडी ]

एक भावें शरण तया जावें ॥ श्रीसद्गुरुचें वाहन घर व्हावें ॥ ध्रु० ॥ नमूं विनायक निजानंद राजा ॥ जया नायक आंत नाहीं दुजा ॥ तया साष्टांग प्रणिपात माझा ॥ देहीं देहभाव समर्पुनि वोजा ॥ १ ॥ निजानंद शारदा मूळ माता ॥ तये चरणीं ठेविला दृढ माथा ॥ मतिप्रकाश पूर्ण होय ध्यातां ॥ धणी न पुरे गुण गीतीं गातां ॥२॥ परब्रह्म निर्गुण निर्वि-कार ॥ अज अव्यय अपार निराधार ॥ तेंचि सद्गुरुरूप साकार ॥ गुणी गुणातीत निजनिर्विकार ॥ ३ ॥ निराकार गुरुरूपें आकारलें ॥ जैसें सुवर्ण मूर्तिमंत झालें ॥ गाररूपें जळचि संचलें ॥ किंवा तंतु पटत्वासि आलें

॥ ४ ॥ तो नृपती होउनि विश्वपाळु ॥ आत्मबोधें हें सर्व सुखें जाळु ॥ करु कर्में अथवा सर्व गाळू ॥ परी तो निष्ठुर ना कृपाळू ॥ ५ ॥ गृहाश्रमीं अथवा नग्न मौनी ॥ भाग्यवंत दरिद्री दिसो जनीं ॥ परी तो संकल्प शून्य मोक्षदानीं ॥ त्याचा महिमा अपार कोण वानी ॥ ६ ॥ भोग भोगित असतां नव्हे भोगी ॥ सर्व त्यागी दिसतां नव्हे त्यागी ॥ त्याग भोग प्राचीन देहालागीं ॥ महाराज तो पूर्ण ब्रह्मयोगी ॥ ७ ॥ दिसे चालतां सर्वत्र पायीं ॥ भ्रमण चक्रीं माक्षिका अचळ ठायीं ॥ अधिष्ठानीं बैसला ढळत नाहीं ॥ अचळ अढळ नित्य सर्वदांही ॥ ८ ॥ परपीडा देखुनि चळीं कांपे ॥ परोपकारीं परम सौख्यरूपें ॥ निंदा नामें अत्यंत म्हणे पापें ॥ दीनानाथ दीनबंधु मायबापें ॥ ९ ॥ ऐसे गुणी अनंत सद्गुरू ॥ मुखें एका मीं स्तुती काय करूं ॥ सहस्रमुखें स्तवितां नेणे पारू ॥ लीलाविग्रहीं प्रत्यक्ष दिनोद्धारू ॥ १० ॥ सत्य सर्वदा राहिलें वाचें ॥ अभेद अकृत्रिम तो सांचे ॥ नाम न साहे जो कुमार्गाचें ॥ नित्य नाम मुखें गाईन मी त्याचें ॥ ११ ॥ ऐसा अनुभव त्या गुरु म्हणावें ॥ नाहीं तरी रुवरी बिंदुलें द्यावें ॥ घरांकुरा योग्य तो स्वभावें ॥ वेदबाह्य तो तुम्हांसि असो ठावें ॥ १२ ॥ भीड कायसी मतवादियांची ॥ जयां वेद करीत छी छी ॥ ध्रु० ॥ संतसज्जन म्हणती बोधराया ॥ आजि निववीलें पूर्ण सखया ॥ आलिंगीलें सहस्र करुनि बाह्या ॥ निजबोधें निरसिली पूर्ण माया ॥ १३ ॥ आजि आनंदानंद मोठा झाला ॥ आत्माराम प्रत्यया पूर्ण आला ॥ ध्रु० ॥ संतलक्षणें रंगला निजानंद ॥ देहीं बोलतां दिसे द्वैतबाध ॥ सहज पूर्ण परब्रह्म स्वतः सिद्ध ॥ जगदुद्धारी महाराज शुद्ध बुद्ध ॥ १४ ॥

## पद ४४१ [ चाल—सखया रामा विश्रां. ]

काय सांगों संतांची उत्तम कळा ॥ कळातीत अतर्क्य ब्रह्म-गोळा ॥ ध्रु० ॥ झालें सुख तें सांगाया दुजें नाहीं ॥ सुखीं सुख संचलें एक पाहीं ॥ अनुभव ठायीं अनुभवितां न दिसे कांहीं ॥ गेले गेले दृष्टांत दिशा दाही ॥ १ ॥ ज्याच्या पायीं निवालें अंतर माझें ॥ ऐसें बोलें बोलतां मानिती वोजे ॥ दाविति खूणा अद्वैतिं कैचें दूजें ॥ एकमेवा सांगती श्रुति बुझे ॥ २ ॥ बोलीं बोले त्यालागनियाचि दाही ॥ साक्ष येथें अष्टादश चारी साही ॥ निजानंदीं बोलावया रंग नाहीं ॥ बोलणें तें अत्यंत कांहीं बाहीं ॥ ३ ॥

## पद ४४२.

लाज नये म्हणवितां ज्ञानी ॥ ध्रु० ॥ लोभ न टाकी दया टाकी ॥ ज्ञातेपणाचा अभिमान सेखी ॥ १ ॥ मींपण हें सांडिलें नाहीं ॥ तंववरी हा केवीं होय विदेही ॥ २ ॥ वेदां लीन निजानंदीं ॥ रहणीविणें ज्ञान उपाधी ।३।

## पद ४४३.

अघटित घटना पटीं माया मोहनी सर्वांसि रे ॥ सुर नर उरगां भुलवी, वायां धरी कां गर्वासि रे ॥ध्रु० ॥ भिल्लीसाठीं लागे पाठीं देवतो ईशान रे ॥ वृंदेच्या स्मशानभुवनीं लोळे श्री भगवान् रे ॥ १ ॥ श्रीकृष्णें निजस्कंदीं भावें यान वाहीजे ज्याचें रे ॥ वृथाचि शापी अति संतापी विपरीत दुर्वासाचे रे ॥ २॥ नहुष उन्मत्त झाला द्विजवर शापें सुकृतहारी रे॥ ब्रह्मऋषीचे शत सुत कौशिक मत्सरयोगें मारी रे ॥ ३ ॥ ... ... ... (अपूर्ण)

## पद ४४४.

धन्य धन्य आह्मीं जाहलों ॥ स्वामीदर्शनें निवालों ॥ ध्रु० ॥ ज्ञानगंगे नाहलों ॥ बोध-राम पाहुनि निघालों ॥ १ ॥ संतचरणीं लोळलों ॥ प्रेम-धुळीनें घोळलों ॥ २ ॥ आतां संतसंगें राहूं ॥ नाम गुरुरायाचें गाऊं ॥ ३ ॥ रंगीं निजानंद पाहूं ॥ आनंदरूप होउनि राहूं ॥ ४ ॥

## पद ४४५.

आरते आरती उजळुं सद्गुरु निजमूर्ति ॥ निराकार अपार कैसी कीजे निजभक्ति ॥ ध्रु० ॥ एकवीस स्वर्गी मुकुट सप्तपाताळ चरण ॥ पृथ्वी उदर त्याचें कवण करी पूजन ॥ १ ॥ ज्ञानघृतें ब्रह्माग्नी निर्धुम पाजळिला ॥ त्रैलोक्य निरसुनि वोंवाळिकें जो उरला ॥ २ ॥ अविद्या काजळी तुटोनि दश दिशा उजळी ॥ शांती क्षमा दया यांची कुरवंडी केली ॥ ३ ॥ पूज्य पूजन पूजितां जाउनि सद्गुरु पूजिला ॥ मी-तूंपणोंविण निजानंद रंगला ।४।

## पद ४४६.

धांवें पावें निजमूर्ति रामाई कां वो उशीर लाविला ॥ कोठें गुंतलीस वेल्हाळे कैसा विसर पडिला ॥ ध्रु० ॥ अभिमान वैरी हा जाचितो कांहीं केल्या नवजे ॥ तुजवीण कोण सोडवि सांगें तूं महाराजे ॥ १ ॥ काम क्रोध मद मत्सर दंभ अहंकार वैरी ॥ नेउनि घालूं पाहाती या भवसागरीं ॥ २ ॥ आशा ममता कल्पना तृष्णा मगरी जाणा ॥ मुख पसरुनि धांवती तुज नये करुणा ॥ ३ ॥ चिंता हे शफरी अति दीर्घ घेऊं

नेदी उमस ॥ ममता पिसारे मारिति कवण निवारी ईस ॥ ४ ॥ मोह भुजंगें धांउनि गळां घातली मिठी ॥ पुढें कांहीं मज न स्मरे कळ लागली मोठी ॥ ५ ॥ लोभावर्ती पडियलों मार्ग न दिसे कांहीं ॥ सत्वर येउनि काढीं वो वेगीं हात तूं देई ॥६॥ ऐसें करुणेचें उत्तर ऐकुनि निजमूर्ती पावली ॥ माथां कृपाकर ठेवुनि नाभी नाभी बोलली ॥७॥ पावली सद्गुरु माउली घाली ब्रह्मसुकाळीं ॥ ध्रु० ॥ ते वेळें सावध करुनि म्हणे होई सूचित ॥ महा वाक्य कानीं सांगोनि केलें ब्रह्मस्वतंत्र ॥ ८ ॥ मग जेंजें पाहे तें तें स्वरुप दुजें न दिसे कांहीं ॥ मिथ्या प्रपंच मृगजळ निजरामचि पाहीं ॥९॥ सुवर्णी अलंकार वस्तुता मुळीं नाहींच झाला॥ रंगीं निजानंद निश्चय वेदे न बोलोनि केला ॥ १० ॥

## पद ४४७. [ चाल–सखया रामा विश्रामा० ]

नाहीं मागत संपत्ती धनें तूज ॥ एक वेळ भेटि दे रामा मज ॥ध्रु०॥ धांवें पावें राघवा निजमूर्ती ॥ मझें अंतर सांगों मी कवणाप्रती ॥ आतां येऊं कोणासि काकूळती ॥ मायबाप तूं माझा निजमूर्ती ॥ १ ॥ मागें बहुतां भक्तांसी पावलासी ॥ उडी घालोनि सोडविलें गजेंद्रासी ॥ वसनें हरितां रक्षिलें द्रौपदीसी ॥ तैसा मज पावें भेटी दे अनाथासी ॥ २ ॥ अति संकटीं रक्षिलें प्रन्हादास ॥ अंबरिषाचे सोसिले गर्भवास ॥ लाक्षाजोहरीं रक्षिलें पांडवांस ॥ तैसा मज पावें भेटी दे अनाथास ॥ ३ ॥ गर्भी रक्षिला सद्भक्त परिक्षीती ॥ गोकुळ रक्षिलें गोवर्धन घेउनि हातीं ॥ पार्थालागीं लपविला त्वां गभस्ती ॥ तैसा पावें भेटी दे मजप्रती ॥ ४ ॥ भक्तवत्सला ऐसीं हीं तुझीं ब्रीदें ॥ तरी त्वां आतां पावावें निजानंदें ॥ भेटी देउनी आलिंगी पूर्ण बोधें ॥ पदीं रंगवीं मागतों निजानंदें ॥ ५ ॥

## पद ४४८.

दिक्पाळक नभधरणी ॥ जळनिधितरणी॥ समग्र नभभरणी ॥ सत्ता-वरणी करणी ॥ चाळकपाळक हरि सर्वाभरणीं ॥१॥ सच्चिन्मय सुखराशी भेद त्रयासी ॥ विरहित अविनाशी ॥सज्जनजन हृत्कोशीं चिंतिति ज्यासी॥ दिननिशीं मंगळघोषीं ॥ २ ॥ पदशाश्वत जैं व्हावें॥ तरि सद्भावें गुरुपद वळवावें ॥ अहंममत्व त्यजावें विण मींपण(–) निजरंगें रंगावें ॥ ३ ॥

### पद ४४९. [ चाल—सखया रामा विश्रांति ]

आतें आरती उजळूं सद्गुरुपायीं ॥ तनु मन धन वोंवाळुनि सांडिन लवलाहीं ॥ध्रु०॥ गुरुस्नानें चिद्गंगा पावन झाली ॥ सहजासनीं शुद्ध शोभे गुरु माउली ॥ १ ॥ निजांगीं सुवास तोचि वास अर्पिलें ॥ सर्वांगीं सुवर्ण गुरुरूपें शोभलें ॥२॥ काष्ठत्व दाहकत्व जाळुनि शांती विभूति ॥ चर्चूनि सर्वांगीं सहज शोभे निजमूर्ति ॥३॥ द्वैताचि संधि सरली ते संध्या पूर्ण ॥ त्रिकाळ गणना बुडुनि सहज साधलें मौन ॥ ४ ॥ सत्पात्रीं निजजीवनीं जीवन चरण क्षालन ॥ ......... ॥५॥ वो रंग ना रंग तेचि अक्षयीं अक्षता ॥ अनुसंधान सुमनमाळा गळां अखंडिता ॥६॥ ब्रह्माग्नी दशेंद्रियें दशांग जाळुनि पाहीं ॥ दशेंद्रियातीत सुवास ठायिंच्या ठायीं ॥७॥ ऐक्यत्वें एकारती ऐक्यें सहज उजळली ॥ द्वैतपणा बोळवण न करितां झाली ॥८॥ नवविधा नैवेद्य भाव माझा अर्पण ॥ निरांजनीं निरंजन गुरुराज संपूर्ण ॥९॥ निजानंदें पूजाविधि संपूर्ण झाला ॥ सकर्पूर तांबुल मुखीं सुरंग रंगला ॥१०॥ पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर सुवर्ण दक्षिणा ॥ आब्रह्मस्तंभ अवघा सद्गुरुराणा ॥११॥ नामघोषें मंत्रपुष्पें सुमन अर्पिलें ॥ हेतूविरहित लोटांगण चरणीं घातलें ॥१२॥ निजीं निज निजानंद निजरूप पाहीं ॥ शेष घेउनि रंगीं रंग रंगला पायीं ॥१३॥

### पद ४५०. [ कवण तुम्ही कवणाचे या चालीवर ]

भाव लागला निजरामीं ॥ मन हें अखंड नामीं ॥ध्रु० ॥ श्रीराम जय राम जयजय राम हें अक्षर॥ माझें जिव्हेवरी ऐसें लिहिलें निरंतर ॥ जाळींत नाना वृत्ती केला अविद्येसी मार ॥ निजबोधें अंतरीं रिघतां पळे अहंकार ॥ १ ॥ भजनापरतें सार आणिक नाहीं तरिजे ऐसें ॥ म्हणवुनि मन हें भजनीं भावें लावावें सायासें ॥ भवनदि तरावया उपाय यापरता न दिसे ॥ निजानंदीं मन हें धाल्या रंगपणहि नसे ॥ २ ॥

### पद ४५१. [ चाल— अभंग ]

नामापरतें सार नाहीं ॥ भजा राघवाचे पायीं॥ ध्रु० ॥ वेदें बहु केली खटपट ॥ निश्चय केला हा शेवट ॥ १ ॥ अनंत शास्त्रांचा हा अर्थ ॥ हाचि केला निश्चितार्थ ॥२॥ पुराणेंही बहु बोलिलीं ॥ अंतीं हेचि बुद्धी केली ॥३॥ व्यास सनकादिक नारद ॥ बोले परिक्षिती प्रल्हाद ॥ ४ ॥ नामें प्राप्त निजानंद ॥ रंगातीत शुद्धबुद्ध ॥ ५ ॥

पद ४५२. डफगाण

दुर्जन पदोपदीं दुःख दावी ॥ साधु पदोपदीं नीचवी ॥ म्हणवुनि संगती करावी साधुचि पैं ॥ध्रु०॥ सहज गुण चंदना ॥ आणि ते दुर्गंधी हिंगणा ॥ तैसें साधु आणि दुर्जना सहज भाव ॥१॥ जैसा गुळ आणि लसुण ॥ तैसें साधु आणि दुर्जन ॥ स्वभाव तयांचा गुण बोल ठेवूं नये ॥२॥ हिंगें घाणी कशी टाकावी ॥ गुळें गोडी कशी सोडावी ॥ म्हणवुनि स्वभावेंचि पूर्वीं निर्माण झालें ॥३॥ सज्जना हो ह्मणतां दुर्जन ॥ सज्जना होतां नये जाण ॥ दुर्जना हो ह्मणतां सुजन ॥ त्या होतां नये ॥४॥ जैसा वायस आणि कोकिळा ॥ वर्ण एकचि दिसतो काळा ॥ परि त्या बोलतां अंतरकळा निवताती ॥ ५ ॥ किंवा तवा आणि आरसा ॥ वर्ण एकचि परियसा ॥ पाहातां वदनेंदु-प्रकाशा अंतर निवे ॥ ६ ॥ ह्मणवुनि सांडुनि निंदा स्तुती ॥ आदरें किजे सत्संगती ॥ तरीच निजानंदप्राप्ती सर्व रंगीं ॥ ७ ॥

पद ४५३.

श्रीगुरुराज सखा ॥ झाला पावें स्वसुखा ॥ध्रु० ॥ मजला म्यां हारविलें होतें ॥ नेणिव काळ वाखा ॥ १ ॥ आपापणा भेटविलें मातें ॥ होतां ज्ञान उखा ॥ २ ॥ सहज पूर्ण निजरंग रंगला ॥ न वदवे सहस्रमुखा ॥ ३ ॥

पद ४५४.

कारण श्रीगुरुराजकृपा ॥ध्रु० ॥ जन्म जरा मरण हे यांची ॥ हरिली सर्व त्रपा ॥ १ ॥ निजभावें शरणागत त्यातें ॥ घालित मोक्ष प्रपा ॥ २ ॥ निजरंगें रंगवुनि जनिं वनीं ॥ दावी चित्स्वरुपा ॥ ३ ॥

पद ४५५.

प्राणी त्यागुनि स्वात्मसुखा तो ॥ आदरें विषय विष खातो ॥ ध्रु० ॥ ब्रह्मारण्यविलासी भवगजमस्तक मुक्त उपेक्षी ॥ इंद्रियग्रामिचा सिंह ह्मणवुनि शुभाशुभ फळें भक्षी ॥१॥ मुक्तपणें चिद्गगनविहारी टाकुनि सुमन सुगंधी ॥ पंचकोशकमळीं जीव षट्पद बद्ध अविद्याबंदीं ॥ २ ॥ दिव्य सुगंध स्वनाभिसि असतां नकळे जीवकुरंगा ॥ सहज पूर्ण निजरंग उपेक्षुनि भुलला विषयकुरंगा ॥ ३ ॥

पद ४५६. [ उद्धवा शांतवन कर जा या चालीवर ]

ते धन्य जगदुद्धारी विद्वज्जन विजनविहारी ॥ ध्रु० ॥ भक्तांसी

भगवद्भजनें भवसागर मृग-जलवत् रे ॥ चिद्विलास जग नग हेमीं वस्तुत्वें भेदातित रे ॥ अस्तिभाति प्रियरुप आत्मा तो नामरुपा-विरहित रे ॥ होउनियां अनुभव ऐसा हरिभजनीं अत्यद्भुत रे ॥ १ ॥ जाळिलं संचित समुळीं ज्ञानाग्निमाजिं निगूती ॥ क्रियमाण पूर्वप्रवाहें विधि-पूर्वक कर्मे घडती ॥ निर्हेतुक निरहंकारें ब्रह्मार्पण सहजचि होती ॥ प्रारब्ध कलेवर भोगी साक्षी हा ईश्वरमूर्ती ॥ २ ॥ अहि कुंडलवत् तनु पाहतां संतोष विस्मय न वसे ॥ तैसें या विद्वद्वर्या स्वरुपाहुनि आन न भासे ॥ मृत्तिकेवरी कुल्लाळें घट कोठुनि आणविलासे ॥ रंगला या निजरंगीं निरतीशय सदनिं विलासे ॥ ३ ॥

## पद ४५७. [ चाल सदर ]

भगवंत भक्त उभयतां समसाम्य ऐक्यस्वरुपीं ॥ध्रु०॥ निरुपमासि उपमा देणें अघटित हें न घडे कदापी ॥ तन्न तन्न ह्मणवुनि ठेलीं श्रुतिशास्त्रें पूर्ण प्रतापी ॥ [1]अनुभवें अनुभविती त्यां परब्रह्म सर्वंहि व्यापी ॥ सिंधोदक मेघ वदनें वर्षलें सहज स्वभावें ॥ भागिरथी गंगा यमुना पावल्या विविध धामें ॥ स्वस्वरुपीं मिळतां मिळणी ते पुनरपिही मिळतचि जावें ॥ शिव होउनियां शिवभजनीं वर्तती अनुदिन विभवें ॥ १ ॥ लव पळ जळ स्थीर न राहे चालले भजनप्रवाहीं ॥ सत्यंतर पाहतां दृष्टी अणुमात्र दुसरें नाहीं ॥ देवभक्त सिंधू सरिता दो नामीं एकचि पाहीं ॥ दर्शनें स्नानें पानें पावन जन विजन सदांही ॥२॥ जिवजंतू जड मूढ प्राणी वापिका कूप तडागें ॥ देहबुद्धि कोंडुनि ठेली नेणति मीं कवण निजांगें ॥ ह्मणवुनि ते विभक्त झाली या अहं-ममतेच्या योगें ॥ भक्त मुक्त जगदुद्धारी रंगला या निजरंगें ॥ ३ ॥

## पद ४९८. [राग कलंगडा-राम गोसावि कीं झाला या चा. का.रा.कृ.]

जा जा रे सद्गुरुराज भजा रे ॥ सद्भावें करुनि पूजा रे ॥ न धरुनि भाव दुजा रे ॥ उपदेशिल नीज गुजा रे ॥ तें स्वानुभवें उमजा रे ॥ वाच्यांश समुळ वरजा रे ॥ हा विषवत् विषय त्यजा रे ॥ लावुनि भजन ध्वजा रे ॥ध्रु०॥ परब्रह्म मानवलोकीं ॥ हें अवतरलें अवलोकीं ॥ रविबिंब जैसे उदकीं ॥ बिंबलें एक अनेकीं ॥ परि आलिप्त सर्वंहि षोकीं ॥ मळविरहित

---

1. अन्यपाठ-अनुभवी अनुभव त्यां.

दिसतां पंकीं ॥ तैसा गुरु स्वरुपें तो कीं ॥ बोलिले भगवद्वाक्यीं ॥ जाणुनि भजिजे भजकीं ॥१॥ आला अंकुर हा ब्रह्मबिजाला ॥ नामरूपा येणें ज्याला ॥ कारण तें हेंचि अजाला ॥ छेदाया कर्मगजाला ॥ बळ कैंचें जीव अजाला ॥ म्हणवुनि श्रीगुरु हरि झाला ॥ रक्षाया चरणरजाला ॥ श्रीरंगानुज तनुजाला ॥ ॥ २ ॥

## पद ४५९. [ चाल—धरविन चक्र करीं श्री. ]

त्याला भवसिंधु हो बिंदुवत रे ॥ध्रु० ॥ स्वप्नींचा गज लागे पाठीं हें तों न पडे जागृत दृष्टीं ॥ स्वरूपीं निमग्न चित्त रे ॥ १॥ जग नग पाहातां वस्तु सुवर्णीं पाहते पाहणेपणही गिळोनीं ॥ शुद्ध बुद्ध नित्य मुक्त रे ॥२॥ निज रंगें रंगले संत पूर्ण सत्य ज्ञानानंत ॥ विदेहत्वें विचरत रे ॥३॥

## पद ४६०. [चाल—राम गोसावि की]

तो ईश्वरी पुरुष विरळा ॥ ज्याची अगाध हे लीळा ॥ जाणुनि अनित्य संसारा ॥ न घाली उपाधी पसारा ॥ साधन चतुष्टय संपन्न लाभ जोडियला सारा ॥ १ ॥ सच्छास्त्रिंचें प्रमेय मनीं ॥ विचारुनियां अनुदिनीं ॥ अंतर्दृष्टीं डोळस तो परगुण स्वदोषदर्शीनीं ॥ २ ॥ निजात्मलाभापरिस सखा न मानीं शचिपतिच्याहि सुखा ॥ सहज पूर्ण निजानंदीं प्रत्यय रंगला देखा ॥ ३ ॥

## पद ४६१.

होतों कैसा मीं ठकलों आपुल्या निजहिता मुकलों ॥ध्रु०॥ माझ्या स्वरूपाचा अंत पाहातां कुंठित वेदांत ॥ ऐसा व्यापक मी असतां तो मीं ह्मणवीं औट हात ॥ १ ॥ निजानंद-पद अविनाशी पाहाहो त्यजिलें म्यां यासी॥ टाकुनि माणि घे कांचवटी तैसा रमलों विषयांशीं ॥२॥ नवल श्रीगुरुची करणी चिद्रूप प्रकाशला तरणी ॥ द्वैत नासुनियां तम ते भरली निजरंगें भरणी ॥ ३ ॥

## पद ४६२.

आहा रे केवढा हा गोता प्राणी खातसे कळतां ॥ एकामागें एकाच्या कशा पडताती चळथा ॥ ध्रु० ॥ शब्दें वेधुनि मृग धांवे स्पर्शें गज बंधन पावे ॥ रूपें पतंग नाडियला रसना गोवित गळ गोवीं ॥१॥ भ्रमर सुगंध कमळांत आसक्ति धरुनियां तेथ ॥ गुंफुनि राहातां तो हस्ती रात्रीं येउनि भक्षीत ॥२॥ पांचहि विषयें पांचांसी नाश केला जिवितेंसीं ॥ मोहें

पांचाहि ज्यामध्यें त्याची गति होइल कैसी ॥३॥ धरितो शुक नाळिका पायीं मुक्त असतां नव जाय ॥ तैसें मीपण हें गोवी कोशकीटकाच्या न्यायें ॥ ४ ॥ आंवरुनि पांचहि विषयांसीं लाविल सद्गुरुभजनासी ॥ ऐसें करील जरि तरि हा पावे निजसुख रंगासी ॥ ५ ॥

## पद ४६३.

सद्गुरुभजनीं लावा रे ॥ करणें निजसुख सेवा रे ॥ लक्ष चौऱ्याऐशीं योनी उगवा प्रपंच गोवा रे ॥ ध्रु० ॥ शब्दीं गुरुच्या रति ठेवा चरणस्पर्शें तनु रावा ॥ निजरुप पाहुनियां डोळां गुरुच्या तीर्थरसा सेवा ॥१॥ सुगंध गुरुपदकमळीं घ्या रे; ऐशा पांचाचा ॥ झाडा करुनि; विवरा रे; पट येइल त्रिभुवनिंचा ॥२॥ शत्रु मित्र आप-आपणा मन हें मुरडे तरि जाणा ॥ मग निज वस्तुचा दानीं भेटे श्रीरंग गुरुराणा ॥ ३ ॥

## पद ४६४.

सहजाचि निर्भय ते ज्ञानी ॥ध्रु०॥ नामरूप नैश्वर हा प्रत्यय ॥ उरलें तें शाश्वत अज अव्यय ॥१॥ अस्ति भाति प्रिय स्वगत भेद ॥ त्रिपुटिरहित हरि गर्जति वेद ॥ २ ॥ मायिक लहरी ओघ तरंग ॥ उदधी मात्र शाश्वत निजरंग ॥ ३ ॥

## पद ४६५.

हो कां भलतेसे परि तें ॥ लागो भक्तिरसें ॥ध्रु०॥ फळ जळ मूळ हो ॥ उणें केवळ हो किंबहुना एक तुळसीदल हो ॥ १ ॥ यातिहीन पशुपक्षीकुळ हो ॥ कुस्थळ स्थळ परी मन प्रेमळ हो ॥२॥ कारण मुक्तिसि भक्ति प्रधान ॥ निज रंगें होय पूर्ण समाधान ॥ ३ ॥

## पद ४६६.

जग नग हेम हरी ॥ किंवा उदकावरि लहरी ॥ध्रु०॥ नानारूपें नामें विविधें ॥ कारण पाहातां हेमचि नुसतें ॥ १ ॥ नामरुपातित अस्ति भाति प्रिय ॥ निरुपाधिक अज अद्वय अक्रिय ॥२॥ चित्-उदधीचे बुद्बुद जीव ॥ निजरंगें शोभति अतएव ॥ ३ ॥

## पद ४६७.

विचरें स्वानुभवें त्याला मानव न म्हणावें ॥ध्रु०॥ गोडी गुळ आकार गुळाचा ॥ निवडूं जातां कुंठित वाचा ॥१॥ लोह कार्य परिसाच्या संगें॥

झालें पूर्ण सुवर्ण निजांगें ॥ २ ॥ नामरुपाचा संग भंगला ॥ सहज पूर्ण निजरंग रंगला ॥ ३ ॥

**पद ४६८.** [ चा.—लछिमनबालाको नाहि बोला ]

हरि नारायण गा होसी ब्रह्मपरायण गा ॥ध्रु०॥ व्याध अजामिळ वाल्मिक पापी ॥ तरले तरती पाहा अद्यापी ॥ १ ॥ अविश्वास संशय हे दोषी ॥ मारिसि तरि तूं ब्रह्मचि होसी ॥२॥ नामापरतें नाहीं सार ॥ निजरंगें पावसि परपार ॥ ३ ॥

**पद ४६९.**

शरण तूं जाईं रे ॥ त्या श्रीहरिचे पायीं रे ॥ध्रु०॥ सानुकूल हरी असतो जेव्हां ॥ काय उणें तुज होइल तेव्हां ॥१॥ लक्ष्मीकांत अनंत हस्तें ॥ नेईल तैं प्रतिकूल समस्तें ॥२॥ सांडुनि संकल्पाचा संग ॥ सत्वर तूं निजरंगं रंग ॥ ३ ॥

**पद ४७०.**

दृश्य अदृश्य होतां ॥ याची करिसी कां चिंता ॥ध्रु०॥ गोचर नामरुपात्मक स्थिरचर ॥ असत् विकारी जड क्षणभंगुर ॥१॥ चित्सुवर्ण शाश्वत परमेश्वर ॥ भास मात्र जग नग हा नैश्वर ॥२॥ टाकुनि अज अव्यय निजरंग ॥ धांवत उखरीं जेविं कुरंग ॥ ३ ॥

**पद ४७१.** [ चाल—मातः स्वामिणी या ]

खरसम नर तो कीं ॥ मानवलोकीं अवलोकीं ॥ध्रु०॥ पावुनियां उत्तम नरकाया ॥ सेवितसे भवतम-नरका या ॥१॥ अंतःकरणीं विहिताचरणीं ॥ मूर्ख पराङ्मुख हरिगुरुभजनीं ॥२॥ सहज पूर्ण निजरंग उपेक्षी ॥ दृश्य उकरडा फुंकुनि भक्षी ॥ ३ ॥

**पद ४७२.** [ काशीबाआण्णाकृत ]

खरसम नर कीं तो ॥ शोभत वरि परि नरकीं तो ॥ध्रु०॥ भक्ति विरक्ति विवेकाहि नाहीं ॥ अविधि आचरण मानवदेहीं ॥१॥ स्वानंदामृत लोटुनि पायें ॥ सेवित विषवत् विषय उपायें ॥ २ ॥ विषय शिणे परि न शिणे चित्तीं ॥ पश्चात्ताप नसे कल्पांतीं ॥३॥ स्वगुण दोष न विचारी मननीं ॥ तत्पर जो परदोषदर्शनीं ॥४॥ श्रीरंगानुजतनुज तयाला ॥ देखुनियां मनिं विस्मित झाला ॥ ५ ॥

### पद ४७३.

आतां वसुधातळाहि बुडो वरि हें नभमंडळाहि पडो ॥ निश्चय कीं निज-राम भजावा तो सहसा न उडो ॥ध्रु०॥ शेवटली पाळी येणें गोड करूं समुळीं ॥ आन उपाय नसे ये काळीं ध्यावा वनमाळी ॥१॥ असेल प्रार-ब्धीं हें तों न चुके कर्म कधीं ॥ मृगजळास्तव क्लेशी होणें विषमत्वें बुद्धि ॥२॥ जन ह्मणो वेडे परि न पाहें त्यांकडे ॥ साधन तें साधावें जेणें परम पद जोडे ॥३॥ उरलें हें करणें भजनीं लावावीं करणें ॥ लक्ष चौऱ्यायशीं जन्माचें येथें संकट निस्तरणें ॥४॥ निजरंगा बापा मजवरि करिं गा अ-नुकंपा ॥ निश्चयानिश्चय तूं देता पथ दावुनि सोपा ॥ ५ ॥

### पद ४७४.

नवविध भजन घडो ॥ तुझिये स्वरुपीं प्रीति जडो ॥ विषयोन्मुख मन उन्मन होउनि स्वस्वरुपीं मुरडो ॥ तुझिये ॥ध्रु०॥ सत्संगति आवडो पाउला सन्मार्गींच पडो ॥ विश्वपटीं चित्तंतू एकचि दृष्टि अशी उघडो ॥ तुझि० ॥१॥ निजशेजे पहुडो मति हे सुखसिंधूंत बुडो ॥ याविरहित जरि आन मागें न मागो जिव्हा समूळ झडो ॥ तुझि० ॥ २ ॥ पूर्ण रंग आवडो जग दाभास समूळ बुडो ॥हारपलें निजधन तें माझें मजला सांपडो ॥तु०॥३॥-

### पद ४७५. [चाल--केला निश्चय हाचि० ]

साजणी श्रीगुरुराज धणी असतां कळिकाळा न गणीं ॥ काय उणें मज केलें तेणें झालें पट्टराणी ॥ध्रु०॥ जातां एकांता समुळीं हारपलि चिंता समूळीं॥ जिकडे पाहे तिकडे अवघी सत्ता कोंदली ॥१॥ मीच पुढें मागें याहि संकल्पा ने घे ॥ परात्पर अद्वैतीं कैंची दोघे आणि चौघे॥२॥ पूर्ण निजानंदें रंगीं रंगुनि स्वच्छंदें ॥ सहज सुखें विचरों गिरिशिखरीं हो-उनि निर्द्वंद्वें ॥ ३ ॥

### पद ४७६.

अच्युत चिंतन करीं चित्ता वारुनि अहंममता ॥ ज्ञानाग्नीनें दग्ध क-रूनि प्राचीन संचिता ॥ध्रु०॥ व्यात विषयांसी गुंतुनि पडसी भवपाशीं ॥ शरणागत प्रतिपाळ दयानिधि भज रे हृषिकेशी ॥ १ ॥ शुक सनकादिक रे व्याध अजामिळ वाल्मिक रे ॥ याचि उपायें तरले दुस्तर भवसिंधोदक रे ॥२॥ स्वानुभवें देखें मग तुज कायसिं दुःखें ॥ निजरंगें रंगुनियां पूर्ण विचरें सहज सुखें ॥ ३ ॥

**पद ४७७.** [ चाल—सखया रामा विश्रांति ]

ऐसें असतां परि कृतार्थ झालों जाणा ॥ करुणासिंधु चोजवला श्रीगुरु राणा ॥ध्रु०॥ घालित असतां गोंधळ या नामरुपाचा ॥ निशिदिन विषय भोगितां भ्रंश मतीचा ॥ अपूर्ण कामें दुःखित मनकायावाचा ॥ लेश न देखे स्वप्नींही स्वानुभवाचा ॥ १ ॥ अहंममतेच्या संसर्गें मज मी नेणें ॥ नाना योनी भ्रमलों बहु श्रमलों तेणें ॥ त्रिविध तापें जर्जर मी चित्तें प्राणें ॥ अनुभव नसतां हो मिरवे शास्त्रश्रवणें ॥२॥ असेल बहुधा जन्मार्जित संचित भरणी ॥ विहिताचरणीं अर्पिलि भगवच्चरणीं ॥ त्या निज रंगें अनुताप अंतःकरणीं ॥ उदयो झाला हो सत्ता चित्सुख तरणी ॥३॥ तम हरपलें स्वप्रकाश सहज समाधी ॥ सर्वहि झाली श्रीगुरुच्या वचनें साधी ॥ध्रु०॥

**पद ४७८.** [ चाल सदर. ]

या परमार्थें विश्वंभर विश्वीं भरला ॥ पुरोनि उरला ॥ पुरोनि उरला वो निःशब्द शब्दें बोला ॥ध्रु०॥ मृन्मयपात्रीं मृत्तिका तंतू वसनीं ॥ तैसी वस्तु जनीं वनीं या त्रिभुवनीं ॥ तरि या कार्या हे वस्तु कारण-स्थानीं ॥ ऐसें वदती त्यांतें वंदावें बहु दुरुनी ॥ १ ॥ पुरुष विभासे स्थाणुवरि परि पुरुषाचें ॥ कारण वस्तु म्हणणें अल्पमतीचें ॥ पूर्ण न जाणें जें यथार्थ-पण वस्तुचें ॥ तें जाणावें अज्ञान कारण याचें ॥ २ ॥ चित्सुवर्णीं जग नग जड अनृत विकारी ॥ स्वसंकल्पें या नामरुपासि उभारी ॥ जळमय सिंधूवरि जैशा बुद्बुदलहरी ॥ दुजें निवी हा निजरंग विजनविहारी ॥३॥

**पद ४७९.** [ चा. सदर ]

मन हें पापी अद्यापी उपरति धरिना ॥ ब्रह्मानंदें ब्रह्मांडगोळ भरिना ॥ध्रु०॥ चंचळ मोठें कोठेंहि स्थीर न राहें ॥ व्यर्थ दिगंतापरि तीही चिंता वाहे ॥ जन्मोजन्मीं सुखदुःखें अगणित साहे ॥ फळ दुष्कृतिचें भोगिजे तितुकें लाहे ॥१॥ संशयकारी अविचारी सतत विकारी ॥ रत व्यभिचारीं अपहारित जें परनारी ॥ विषयविहारी संकल्प विकल्पें मारी ॥ बंधन मोक्षाचें केवळ हें अधिकारी ॥२॥ शंकर केला किंकर त्या मन अपवित्र ॥ स्मशानभुवनीं लोळविलीं विष्णुगात्रें ॥ कौशिक ब्रह्मा पराशर ऐसीं पात्रें ॥ छळिलीं गिळिलीं निर्दळिलीं ईक्षणमात्रें ॥३॥ कृतार्थ मानी विषयेंद्रिय मिळणी संगें ॥ लाभालाभीं नाचवितें हर्षविषादें ॥ अविश्वासी अवमानित साधुवृंदें ॥ पूर्ण रंगीं रंगेना निजानंदें ॥ ४ ॥

### पद ४८०. [ चा. सदर ]

तरणोपाया भावार्थ हा मूळ पाया ॥ ईक्षणमात्रें दूर करितो सर्व अपाया ॥ध्रु०॥ भाव शब्दें आस्तिकता हाता आली ॥ तेव्हां हृदयीं सद्भक्ति पूर्ण उदेली ॥ नवविध भजनें भगवंतीं शरण रिघाली ॥ निजात्मबोधें समसाम्यें समरस झालीं ॥१॥ निजभक्तीचें दास्य मुक्ती करिती चारी ॥ विरक्ति आंगण झाडी होऊनियां कामारी ॥ ज्ञान उपरमलें पावुनियां परपारीं ॥ अभेद भक्ती हे भावें निरंतरीं ॥२॥ भाव धरी तया ऐसा हरि तारी ॥ भक्तांकारणें झाला दशरूपधारी ॥ दीनबंधू दयासिंधू जगदुद्धारी॥ निजानंद रंगला सचराचरीं ॥ ३ ॥

### पद ४८१. [ चा. सदर ]

ये ये काळों वनमाळी तमाळनीळा ॥ करुणासिंधु दिनबंधु गोकुळपाळा ॥ध्रु०॥ द्रौपदिबाळा कर चरण प्रक्षाळूनी ॥ उभी ठेली सम्मुख वृंदावनीं ॥ अष्टै भावें करुनियां नमनीं ॥ श्रीहरि तें बोभाय याज्ञसेनी ॥१॥ ये मेघःशामा भक्तकामकल्पद्रुमा ॥ अवाप्तकामा विद्वज्जनमनविश्रामा ॥ अगणित महिमा शेषरमा नेणाति सीमा ॥ सुखैकधामा पुरुषोत्तम सद्गुणग्रामा ॥ २॥ मध्यरात्रीं दुर्वासऋषीराय ॥ लक्ष संख्या घेऊनियां द्विजसमुदाय ॥ गेला गेला स्नानासि करूं मी काय ॥ अन्न कैंचें म्यां करणें कवण उपाय ॥३॥ तपोधन ते कोपिष्ट बहू ब्राह्मण ॥ शापुनि भस्म करुनियां घेतिल प्राण ॥ नको पाहूं मांडलें अति निर्वाण ॥ उडी घाली नलगतां अर्ध क्षण ॥४॥ टाकुनि मागें गरुडा आणि मन पवनासी ॥ नकळत सहसा या चतुर्दश भुवनासी ॥ धांवोनि यावें त्वां सत्वर द्वैतवनासी ॥ धांवा करितां जाणवलें जगजीवन सी ॥५॥ ऐसा धांवा ऐकतां कमळाकांतें ॥ भोजनसमयीं लोटिलें पात्र स्वहस्तें ॥ धांवोनि आला सत्वर द्वैतवनातें ॥ द्रौपदिनें कुरवंडी केली जीवितें ॥ ६ ॥ धर्म भीमार्जुन नकुल आणि सहदेव ॥ हरिपदपद्मीं षट्पद ते झाले सर्व ॥ द्रौपदी ह्मणे उदयासि आलें दैव ॥ अनंत पुण्यें जोडला कमलाधव ॥७॥ कमळाकांता अच्युतानंत मुकुंदा ॥ संकट वारीं कैवारिया गोविंदा ॥ मानसमोहना श्रीकृष्णा! आनंदकंदा ॥ पूर्णरंगा निःसंगा निजानंदा ॥८॥

### पद ४८२. [ आत्यास्वामीकृत ]

भावचि कारण रे तरावया ॥ध्रु०॥ तरणोपाय अराधारज रे ॥ मर्दित

सिंह जसा वारण रे ॥१॥ नलगे कांहीं जारण मारण ॥ कर्ता हा भव-शत्रुविदारण ॥२॥ पूर्ण रंग हा जगदुद्धारण ॥ करिल निःसंशय संशय-वारण ॥ ३ ॥

पद ४८३.

सदय हृदय नर तोचि हरी ॥ध्रु०॥ सर्व भूतीं भगवंत सनातन ॥ जाणुनियां सम भाव धरी ॥ १ ॥ प्राणावना सुंदर तनु कैशा ॥ ज्ञान कळा सकळा विवरी ॥२॥ पूर्णानंदपदीं निज रंगें॥ रंगुनियां सम भाव धरी॥३॥

पद ४८४.

येईं येईं वो गुरु माउलिये ॥ ध्रु०॥ प्रेम-पान्हा मज देईं तूं वो ॥ ब्रह्म सनातन गाउलीये ॥१॥ निर्विकल्प-कल्पलते श्रीदेवदत्ते ॥ संसारश्रांता साउलिये ॥२॥ निज रंगें निःसंग अभंगे ॥ धांव पावें माझे आउलिये ॥ ३॥

पद ४८५.

श्रीराम जयराम जय जय राम ॥ ध्रु०॥ त्रयोदश वर्णी मंत्र हा वर्णी ॥ पावे तो शाश्वतपद निजधाम ॥ १ ॥ नारद वाल्मिक जनक शुकादिक ॥ मुनिजनाविश्राम ॥२॥ सच्चिद्घन श्रुतिसार परात्पर ॥ पूर्ण रंग अज अव्यय नाम ॥ ३ ॥

पद ४८६.

कामीं कां मीं प्रीति धरूं ॥ध्रु०॥ दुःखरुप जड दृश्य विकारी ॥ विषवत् विषय कसा स्विकरूं ॥ १ ॥ ब्रह्म सनातन आंगें असतां ॥ जन्मुनि-जन्मुनी व्यर्थ मरूं ॥ २ ॥ सहज पूर्ण अज शाश्वत अव्यय ॥ अद्वय रंग विरंग करूं ॥ ३ ॥

पद ४८७.

हर हर हर महादेव ह्मणा ॥ध्रु०॥ भक्ति विरक्ति प्रबोधेंकरुनी ॥ तत्पर होउनि क्षणक्षणा ॥ १ ॥ सप्रेमें शिव स्मरतां वाचें ॥ कळिकाळाचें भय कोणा ॥ २ ॥ भवगजपंचानन करुणाघन ॥ भयकृद्भयनाशन जाणा ॥ ३॥ जन्ममरणसंसरणनिवारण ॥ नामस्मरण हें कां नेणा ॥ ४ ॥ सहज पूर्ण निज रंग अभंग ॥ नित्य निरामय गुरुराणा ॥ ५ ॥

पद ४८८.

राज नमो गुरुराज नमो ॥ध्रु०॥ तापलों तापें अति अनुतापें ॥ शरण मी तुज भवतापशमो ॥ १ ॥ तुझिये कृपादृष्टि वेष्टीं समेष्टीं ॥ मृगजळवत्

भवसिंधु गमो ॥२॥ सत्य ज्ञानानंत प्रबोधीं ॥ इंद्रियवृंद समूळ रमो ॥३॥ कामादिक दुर्जय षड्वर्गीं ॥ आत्मानात्मविवेक दमो ॥ ४ ॥ सहज पूर्ण निजरंगपदाब्जीं ॥ मानस षट्पद नित्य भ्रमो ॥ ५ ॥

## पद ४८९.

आतुर चतुर पण काय असे ॥ ध्रु० ॥ स्वात्मसुखामृत त्यागुनियां अज्ञ ॥ तृप्त ह्मणे मीं विषयरसें ॥ १ ॥ शाखारुढ होउनि मुळ छेदी ॥ सुज्ञ म्हणावें त्यासि कसें ॥२॥ सहज पूर्ण निजरंग उपेक्षुनि ॥ भ्रमत स्मशानिं जेविं पिसें ॥ ३ ॥

## पद ४९०.

जग मृगनीर राम रवी ॥ ध्रु० ॥ भासे तुंबळ सोज्वळ जळापरी ॥ काय तृषा पुरवी ॥१॥ चित्सूर्यातें नेणुनियां अज्ञ ॥ मृग आपणां फिरवी ॥२॥ सहज पूर्ण निजरंगें रंगुनी ॥ दिनरजनी नुरवी ॥३॥

## पद ४९१.

या संतांचे संगती ॥ लागतां जिव शीव होती ॥ ध्रु० ॥ कामादिक दुर्जय षड्वैरी ॥ आसुरी गुण हे भंगती ॥१॥ नवविध भक्ति विरक्ती प्रबोधें ॥ चुकती नाना दुर्गती ॥२॥ स्वच्छंदें निर्द्वंद्वें साधक ॥ निजानंदें रंगती ॥३॥

## पद ४९२.

या नरदेहीं तरिच बरें ॥ ध्रु० ॥ सत्कर्मे ब्रह्मार्पण घडती निरहंकृति आदरे ॥१॥ संतसमागम शास्त्रसुसंगम वदनीं वचन खरें ॥२॥ सहज पूर्ण निजरंगें रंगुनी विदेहत्वें विचरे ॥३॥

## पद ४९३.

माझा स्वामी सद्गुरु समर्थ मस्तकीं ॥ ध्रु० ॥ अनंत ब्रह्मांडीं एक सत्ता ज्याची ॥ व्यापिलें जग नग मस्तकीं ॥ १ ॥ ज्याच्या कृपाबळें घातला तोडरीं ॥ काळिकाळ नेमस्तकीं ॥२॥ स्वच्छंदें निर्द्वंद्वें पूर्ण निजानंदें ॥ रंगुनी झालों मस्तकीं ॥३॥

## पद ४९४ [ राग पिलू ]

गेला मान सांवरील कोण हरिविणे ॥ ध्रु० ॥ शरण मनोभावें त्यासिच जावें ॥ सार्थक तरिच या जिणें ॥१॥ भक्तांचा पूर्ण काम करितां निजमूर्ति राम ॥ पडों नेदी सर्वथा उणें ॥ २ ॥ पूर्वी रक्षिलें पुढें रक्षाया ॥ भक्त-

जनालागीं अवतार घेणें ॥ २ ॥ कृतनिश्चय हाचि करो निजानंदें रंग भरो ॥ कैंचें मग येणें जाणें ॥ ३ ॥

पद ४९५.

राम सखा करुंया आतां ॥ ध्रु० ॥ नवविध भक्तिविरक्तिप्रबोधें ॥ ध्यान मनीं धरुंया आतां ॥ १ ॥ याविण सर्वही शत्रुसम मज ॥ हें मनिं विवरूंया ॥२॥ निजरंगें निःसंगें मनिंचा ॥ संशय वारुं या ॥३॥

पद ४९६.

तुज उजडेना कां प्राण्या ॥ ध्रु० ॥ कोण मी कैसा ऐसा कांहीं समज पडेना कां ॥१॥ आत्मानात्मविचार विवेकीं चित्त जडेना कां ॥२॥ गुरु-कृपें निजरंगें रंगुनि ऐक्य घडेना कां ॥३॥

पद ४९७.

मूर्ख बहीर्मुख रे झाले ॥ ध्रु० ॥ अंतर कटुतर वरि वरि सुंदर शोभें आलें रे ॥१॥ इंद्रिवारुणी सेवूं जातां वायां गेलें रे ॥२॥ अंतर्बाह्य निज-रंगें रंगुनि स्वहित न केलें रे ॥३॥

पद ४९८.

योगी स्वानंदें उन्मत्त रे ॥ ध्रु० ॥ रामरसें मन होउनि उन्मन ॥ अखंड डुल्लत रे ॥१॥ देहबुद्धि वरिना ही ॥ साधू ब्रह्म सदोदित रे ॥२॥ निजरंगें रंगुनियां पूर्ण ॥ देहीं देहातीत रे ॥ ३ ॥

पद ४९९.

आजि मोठा हो लाभ लाभ लाभला ॥ध्रु०॥ हरिगुरुचरणीं मन जाहलें उन्मन मानवी जन्म हा शोभला ॥१ ॥ दैवी समूह विवेक विचारें दुश्चरणावरी क्षोभला ॥२॥ द्वैतभावना न दिसे निजरंगीं ॥ हा दुर्जन कीं हा भला ॥३॥

पद ५००.

सदां श्रीहरिचें नाम मुखीं गात जा हो ॥ सप्रेमें करुनि टाळि वाहात जा हो ॥ध्रु०॥ वर्णाश्रमविहित कर्म करणें हा परम धर्म ॥ निरहंकृति कंज-नयन ध्यात जा हो ॥ १ ॥ सत्संगें शास्त्रश्रवण श्रवणाचें करुनि मनन ॥ निजध्यासें पूर्णसुखी राहत जा हो ॥२॥ निरतिशय निजानंद हाचि अह-र्निशीं छंद ॥ अंतरंग तोचि जगीं पाहात जा हो ॥ ३ ॥

पद ५०१.

माझ्या संचितें धांव कैशी घेतली ॥ पिशुन बोलती हे श्रीहरिशीं

रातली ॥ ध्रु० ॥ काया वाचा आण मन, हरिचरणीं शरण लौकिकीं मात हे मातली ॥१॥ संसारासी पडल पाणी दुजें नाणी मी साजणी जीवित्वासि तिळांजुळी दीधली ॥२॥ जळो हे लौकिक लाज सिद्धी पावलें काज निजरंगें पूर्ण दशा पातली ॥३॥

## पद ५०२.

मोठे काम क्रोध लोभ तिघे पुंड रे ॥ यांनीं नागविलें साधकां उदंड रे ॥ ध्रु० ॥ ब्रह्मपुरीची वाट चालों नेदिती थोट ॥ हटयेगें नावरती लंड रे ॥१॥ पातेजोनि धरूं मारूं गुरुभजनें वश्य करूं ॥ आतां यांचें चालों नेदों बंड रे ॥२॥ पूर्ण कामीं काम हरूं कल्पनेसी क्रोध करूं ॥ लोभ धरूं स्वहितीं प्रचंड रे ॥३॥ दैवी संपत्तिच्या दळें ज्ञानाग्नी यंत्र बळें ॥ असुरांचें करूं खंड खंड रे ॥४॥ निजानंदें रंगती भेदाभेद भंगती ॥ तरीच पावतील हे दंड रे ॥ ५ ॥

## पद ५०३.

काम क्रोध लोभ तिघे चोर रे ॥ महापातकी घातकी थोर रे॥ध्रु०॥ मोक्ष पंथ हा कदापि चालों नेदिती पापी ॥ निर्दय निर्लज्ज दुराचार रे ॥१॥ योग याग साधनें करितां तपोधनें ॥ नागविती त्यांसी दुर्निवार रे ॥२॥ घालुनियां आशापाश करीति जीवितासि नाश ॥ पावों नेदिति पैलपार रे ॥३॥ उपरतिनें त्रिपारितार्थ करिल श्रीगुरु समर्थ ॥ तरि हा सार संसार रे ॥४॥ पूर्व संग भंगतां निजानंदें रंगतां ॥ सहज पूर्ण नित्य निर्विकार रे ॥ ५ ॥

## पद ५०४.

ती आलि वो कृष्णा माउली ॥ आमुची कामधेनु गाउली ॥ निज विश्रांतीची सावुली ॥ ध्रु०॥ पूर्ण ब्रह्म मूर्ती सांवळी ॥ जिच्या गर्जति श्रुती ब्रिदावळी ॥ जे गोकुळीं गोधनें वळी ॥१॥ सर्व बळियांमाजी जे बळी ॥ जीनें पाताळीं घातला बळी ॥ उभी यमुनेच्या पाबळीं ॥२॥ सदाशिव करी नमो नमो जीला ॥ जीचा गुणगण नव जाय मोजिला ॥ जीनें प्रेमपान्हा पाजीला ॥३॥ जे विद्वज्जनमनरंजनीं ॥ जे दुःखदारिद्र्यभंजनीं ॥ जीचें वास्तव्य निरंजनीं ॥४॥ ऐसें बोलतां याज्ञसेनी ॥ उडी घातली द्वारकेहुनी ॥ निजानंदें रंगली जनीं वनीं ॥ ५ ॥

पद ९०५.

मला गोकुळीं गोपाळ भेटला ॥ सोनियाचा सुदीन वाटला ॥ जनीं वनीं श्रीहरी दाटला ॥ हा दुस्तर भवसिंधु आटला ॥ध्रु०॥ आजि धन्य धन्य धन्य धन्य मी ॥ हरीविण न देख अन्य मी ॥ तेणें जाहलें सर्वमान्य मी ॥पूर्वी आचरलों कोण पुण्य मी ॥१ ॥ हाता आले श्री हरि-पाय हो ॥ जोडला हा तरणोपाय हो ॥ सुख ब्रह्मांडीं न समाय हो ॥ आतां भवभय बापुडें काय हो ॥२॥ आतां कवणाचा नव्हे पांगला ॥ देहबुद्धिचा संग भंगला ॥ लाभला भला हो चांगला ॥ सहजपूर्ण नि-जानंद रंगला ॥ ३ ॥

पद ९०६.

तुझा उद्धार या पदरजें ॥ आतां ऐक्यभावें तूं भजें ॥ध्रु०॥ हा मु-निजनमनविश्राम वो ॥ हा दीनबंधु पूर्णकाम वो ॥ हा सच्चित्सुखैक धाम वो ॥ सूर्यवंशीं निजमूर्ति राम वो ॥१॥ हा दुर्गम निगमागमासि वो ॥ हा दूरि बहु रजतमासि वो ॥ हा न कळेचि शमदमासि वो ॥ पूर्ण कळलें हें गौतमासि वो ॥२॥ हा निर्गुण निःसंग वो ॥ हा निर्वि-चार अज अभंग वो ॥ हा चित्समुद्र जगतरंग वो ॥ हा ब्रह्म सहज पूर्ण रंग वो ॥३॥ आजि धन्य धन्य भाग्य उदय वो ॥ आला दाशरथी सदय-हृदय वो ॥ ध्रु०॥

पद ९०७.

हरि गुरु भजन करूं या हा भवसिंधु तरूं या ॥ हातें टाळी मुखें राम-नाम उच्चारूं या ॥ध्रु०॥ निगमाचार्य संमतें आत्मानात्म—विवेक करूं या ॥ कोहं कथमिदं जातं संशय हा वारूं या ॥१॥ देहादिक भुवनत्रय विषव-त्विषय असें विवरूं या ॥ भक्तिविरक्तिप्रबोधें करुनी षड्वैरी मारूं या॥२॥ देहीं विदेह-स्थितिनें आतां सहज सुखें विचरूं या ॥ सत्संगें निर्द्वंद्वें नि-जानंदें रंग भरूं या ॥ ३ ॥

पद ९०८.

पतित संशयें केला ॥ संशय निरसन होतां कोठें आला ना गेला ॥ ध्रु०॥ सार्वभौम निद्रिस्त मंचकीं स्वप्नीं झाला रंक ॥ प्रबोधसमयीं होता नाहिं सोडिला पर्यंक ॥१॥ अहं देही ह्मणतां जन्म मरण लागलें पाठीं ॥ नाहं देही ह्मणतां सरता झाला तो वैकुंठीं ॥२॥ अज्ञानाच्या

प्रावरणभंगें निजानंदपद भोगी ॥ सहजपूर्ण निजरंगें विचरे चिद्भुवनीं तो योगी ॥ ३ ॥

### पद ५०९.

गुरुतें शरण न जातें अगई तरी कैसें होतें ॥ पावुनि पुनरपि नाना योनी उपजों उपजों मरतें ॥ध्रु०॥ कोठुनि येणें कोठें जाणें आहे कोण न कळतें ॥ देहबुद्धिच्या बंदीं पडतें षड्वैर्‍यां सांपडतें ॥१॥ तत्वमसि हें वाक्य न पडतें श्रवणीं माझ्या निरुतें ॥ ब्रह्मास्मि प्रत्यय जो यातें समुळींहुनि आंचवतें ॥२॥ ब्रह्मार्पण बुद्धी सत्कर्में अनंत जन्मीं मातें ॥ घडलीं तरि निज रंगें रंगुनि ठेलें हें जरि नसतें ॥ ३ ॥

### पद ५१०.

पुंडरीकवरदा बिरुदा जतन करी रे ॥ नाहिं तरि सोडुनि टाकीं भीमातटाकीं झडकरि रे ॥ध्रु०॥ तुझिये भजनीं हा विक्षेप होतो कां मज सांगें॥ योग क्षेम वाहतों मी ह्मणवुनि बोलिलासि जागें ॥ १ ॥ हे आड घालुनि विषय स्थितिशीं ह्मणसी तूं जरि ऐसें ॥ होत विपत्ती परी हे चित्तीं लागो भजनापिसें ॥ २ ॥ अनुस्यूत तव भजन घडो रे न पडो अंतराय ॥ निजरंगा मी ह्मणेन तुजला तरीच विठ्ठलराय ॥ ३ ॥

### पद ५११. [ चाल—कवण तुम्ही कवणाचे ]

पंढरपुरच्या बापा तापा लावि रे कडे ॥ तुजविण दुस्तर हा भवसागर तरणें केविं घडे ॥ ध्रु० ॥ बहुत देखिले बहुत ऐकिले संसारीं नावाडे ॥ ज्यांच्या संगें हें नाव तैसें होउनि प्राणि बुडे ॥ १ ॥ पावविले त्वां पार उदंड वेडे आणि बागडे ॥ श्रम तूं माझे वारीं तुझे गाईन मी पवाडे ॥२॥ सहज पूर्ण निजरंग अभंग श्रीविठ्ठल जरी जोडे ॥ श्रम कां वाहूं मग कां वाहु वहीं आणि बापुडें ॥ ३ ॥

### पद ५१२. [ चा. सदर ]

निधान असतां हातीं आम्ही दैन्य कां भाकूं ॥ ब्रह्म परात्पर इंदिरावर नयनीं अवलोकूं ॥ ध्रु० ॥ निजभक्तांचा लक्ष्मीकांत अनंत निजांगें पक्षी ॥ सबाह्यांतरसाक्षी नाना संकटीं संरक्षी ॥ १ ॥ भक्तकामकल्पद्रुम शरणागत प्रतिपाळक गांठी ॥ भयकृत् भयनाशक तो असतां पाठिसि जगजेठी ॥२॥ निजानंदघन ब्रह्म सनातन अज अव्यय अविनाशी ॥ सहज पूर्ण निजरंग रंगला श्रीहरि गोकुळवासी ॥ ३ ॥

### पद ५१३.

वासरमणि कुळभूषण वारिजनयना श्रीरामा ॥ जनकजापति पतितपावना मुनिजनमनविश्रामा ॥ ध्रु० ॥ दशशत वदनें वदतां दशशत नयनें लक्षूं जातां ॥ तन्न तन्न तुज म्हणती शतपथ अगणित गुण गातां ॥ १ ॥ दशरथनंदन दशमुखमर्दन दशेंद्रियां चाळक तूं ॥ भवभयहरणा अनन्य शरणागत प्रतिपाळक तूं ॥ २ ॥ अवाप्तकामा निजसुखधामा सांब सदाशिव ध्येया ॥ पूर्ण रंग निःसंग निरामय नारदादि मुनि गेया ॥ ३ ॥

### पद ५१४.

तो नारायण नरदेहीं ॥ संशय न दिसे कांहीं ॥ध्रु०॥ वेदविहित सत्कर्माचरणें वर्णाश्रमाविधि पाळी ॥ निःस्पृह निरहंकृतिनें शोभे हरि-गुरु-भजन समेळीं ॥ १ ॥ देहादिक भुवनत्रय अवघा विषय वमनवत् लक्षी ॥ पंक मराळ न भक्षी तैसा काम्य निषेध उपेक्षी ॥ २ ॥ निज रंगें रंगला तेव्हां संग भंगला त्याचा ॥ ब्रह्मपरायण तो नारायण निश्चय हाचि त्रिवाचा ॥ ३ ॥

### पद ५१५.

स्मरतां गुरुचे पाय याची गणना मजला काय ॥ दुस्तरतर भवसागर परि मज भासे मृगजळन्याय ॥ध्रु०॥ बाळा बागुल साचचि वाटे प्रबुद्ध लटिकें भावी ॥ मायामय हा प्रपंच इतरांप्रति भवभय हें लावी ॥ १ ॥ रोधुनि लोचन ऐंद्रियजाळीं विविध पदार्थ प्रकाशीं ॥ साच गमे परि सज्ञानासी नाहीं प्रतिती ऐसी ॥२॥ स्वप्नीं सत्य गमे जगडंबर जागृतिसी तें नाहीं ॥ दृश्य पदार्थ लटिका तैसा निज रंगें पाहातांही ॥ ३ ॥

### पद ५१६.

हें मज कोणें सांगितलें ॥ नकळत कळतां घडलें हो पूर्वी झालें तें झालें ॥ध्रु०॥ क्षणिक सुखाची आशा धरुनी अविनाशा मी उबगों ॥ राज्य त्यजुनि विषयांची भिक्षा दारोदारीं मागों ॥ १ ॥ या नरदेहीं स्वपद पावणें करुनी भजन हरीचें ॥ तें मी सोडूं पतनही जोडूं अंतीं राहुनि कांचे ॥२॥ आतां हाचि पराक्रम करणें वरणें निजरंगातें ॥ .........॥ ३ ॥

### पद ५१७.

सखया स्मरण करीं रे अंतरीं भाव धरीं रे ॥ ध्रु० ॥ विस्मृति जीवपद त्याचे पोटीं अनंत दुःखें कोटी ॥ जन्ममरणसंसरणयातना भोगणें आटा-

आटीं ॥ १ ॥ स्मरणें तो शिव विस्मृति तो जिव कारण भवदुःखाचें ॥ शिवपद चिन्मय नित्य निरामय शाश्वत सहज सुखाचें ॥ २ ॥ नाहं देहो न मे देहो म्हणतां ब्रह्म निजांगें ॥ विसर स्मरणातीत सदोदित सहज पूर्ण निजांगें ॥ ३ ॥

## पद ५१८.

येईं येईं रे श्रीरामा ॥ मुनिजनमनाविश्रामा रे ॥ ध्रु० ॥ अगम्य महिमा निगमागमा पुराण पुरुषोत्तमा ॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायका सच्चित्सुखैक-धामा ॥१॥ शेष रमा विधि वर्णिति परि ते न कळे तव गुणसीमा ॥ अभं-ग रंगा निःसंगा निजमूर्ति निष्कामा ॥ २ ॥

## पद ५१९.

ते व्यभिचारिणि जाणावी ॥ बुद्धि सती गोपाळा सोडुनि देहभावासि खुणावी ॥ध्रु०॥ क्षणक्षणा अवयव अवलोकीं लोकीं मीपण मिरवी ॥ स्व-रूपीं पराङ्मुख विषयांचें सुख वांछित सेवित बरवी ॥१॥ पूर्णकाम निज-राम मनोरथ मनिंचे अवघे पुरवी ॥ गंगा सिंधु उल्लंघुनि वेगीं बिंदुमात्र निर नुरवी ॥२॥ हा निज रंग त्यजुनि कुसंग सदोष गुणाचे नाना ॥ क-रणें त्याहुनि मरणें बरवें न मानी याहि वचना ॥ ३ ॥

## पद ५२०.

यांचा भरंवसा काय ॥ भासे मृगजळन्याय ॥ ध्रु० ॥ येते जाते घेते देते सुकृत दुष्कृत करिते ॥ शाश्वत दिसते परि क्षणभंगुर मार्गें क्षणार्धें धरिते ॥१॥ तापत्रय षड्रिपु त्रिगुणात्मक दुःख मूळ भवरोगी ॥ पंचकोश बंदीं पडले कृतकर्में फळ भोगी ॥ २ ॥ अस्थि मांस मळमूत्रें भरलें सरलें उरलें नकळे ॥ टाकुनि गृह सुत दारा वारा जातो झांकुनि डोळे ॥ ३ ॥ इंद्रजाळ बहु काळ न राहे भासे लव पळ घटिका ॥ दृश्यभास हा नाम-रूपात्मक प्रपंच समुळीं लटिका ॥४॥ अंजुळिंचें जळ क्षीण पळें पळ के-वळ जीवित तैसें ॥ जाणुनियां निजरंगें ज्ञानी रंगले अनायासें ॥ ५ ॥

## पद ५२१.

पावुनियां नरकाया ॥ आम्हीं जाऊं कां नरका या ॥ याचि देहीं याचि डोळां लागावें हरि पायां ॥ध्रु० ॥ साधुसज्जनीं नवविध भजनीं लागुनियां दिनरजनीं ॥ सच्चित्सुखमय होउनि राहूं नित्य निरंजनीं ॥ १ ॥ सत्कर्में ब्रह्मार्पण निरहंकृतिनें सर्व करूनि ॥ निजानंदघन ब्रह्म सनातन होऊं गगन

भरूनि ॥२॥ दुर्लभ हा नरदेह यांतही दुर्लभ सद्गुरु भेटे ॥ सहज पूर्ण निजरंग पदीं मग ब्रह्मसम अन्वय दाटे ॥ ३ ॥

## पद ५२२.

नरमृग पडला रे पडला गुंतुनि मायापाशीं ॥ काळ व्याध वध करितो प्रतिदिनीं लव पळ क्षणक्षणेशीं ॥ ध्रु० ॥ आद्यंतीं न दिसे तें मध्यें भासे मृगजळ जैसें ॥ तैसें देह अशाश्वत असतां माझें म्हणत पिसें ॥१॥ सुगंध-कंद स्वनाभिसीं, हा मतिमंद असोनि न जाणे ॥ हिंडे अष्ट दिशा नर तैसा आत्मतत्व सुख नेणें ॥२॥ जीवन त्यजुनि तरंग इच्छी म्हणुनि कुरंग म्हणावा ॥ पूर्णरंग चित्तंतुविणें हा जगपट केविं विणावा ॥ ३ ॥

## पद ५२३.

सर्व जीवां जीवन मी त्या मज न भजावें कां ॥ भयकृद्भयनाशन मी ऐसें न समजावें कां ॥ ध्रु० ॥ अनंत ब्रह्मांडनायक निजसुखदायक सत्पात्रासि ॥ अनन्य शरणागत प्रतिपाळक चाळक जीवमात्रासी ॥१॥ निगमागम वर्णा-श्रमधर्म सुगम करुनि दाखविती ॥ मत्प्राप्तिस्तव हरिगुरुभजनें परमामृत चाखविती ॥२॥ सहज पूर्ण निज रंग रंगलों अभंग मी चिद्व्योमीं ॥ ओ-तप्रोत हारि भरलों असतां सबाह्यांतर्यामीं ॥ ३ ॥

## पद ५२४. [ काशीराजकृत ]

मन हें चंचल या रितिचें वो ॥ कौतुक याचें या गतिचें वो ॥ ध्रु० ॥ लव पळ एके ठायीं न वसे लंपट विषय-रतीचें वो ॥ त्रिभुवन फिरतें येतें जातें कारण हें दुष्कृतिचें वो ॥ १ ॥ करितें बहु संकल्प विकल्पीं न म्हणे मन मी यतिचें वो ॥ अविधीं वर्ततां दुर्लभ नरदेह जाइल न कळे हातिचें वो ॥२॥ दुष्ट कल्पना करितें नाना वळिलें हें दुष्कृतिचें वो ॥ आत्माना-त्मविवेकीं केलें मातेरें या मतिचें वो ॥३॥ परि गुण उत्तम एक आहे कीं जैसें करणें सतिचें वो ॥ ज्या दिधलीं त्या रत सर्वस्वें वचन नुलंघी पतिचें वो ॥४॥ निजरंगें रंगुनि वैभव सुखसाधनसंपत्तीचें वो ॥ श्रीरंगानुजत-नुजें त्याला दिधलें सार श्रुतिचें वो ॥ ५ ॥

## पद ५२५. [ काशीराजकृत ]

सहपरिवारें येउनि मंडप शोभिवंत करावा ॥ मनबुद्ध्यादिक इंद्रिय-वर्गीं मज न मानुनी परावा ॥ध्रु०॥ आमुचि प्रतिती कन्या हे अनुरागें उ-पवर झाली वो ॥ आत्माराम परात्पर नवरा ब्रह्मार्पण त्या केली वो ॥ १ ॥

मन संकल्पविकल्प त्यजुनी दृढ निश्चय बुद्धीनें वो ॥ दैवी संपात्ती घेउनि यावें सत्वर वेदविधीनें वो ॥२॥ स्मरणीं वाचा गोवा श्रवणीं श्रवण निरंतर ठेवा वो ॥ नयन स्वरूपीं लावा करणें करचरणें हरि सेवा वो ॥ ३ ॥ ऐक्यत्वाचा बोहला पाहावा सोहाळा निज लग्नाचा वो ॥ सहज पूर्ण निजानंद होइल प्रसाद तुमचा वो ॥४॥ विशेष काय ल्याहावें भावें सोयरीक पाहिली वो ॥ श्रीरंगानुजतनुजें ऐशी लग्नपत्रिका लिहिली वो ॥ ५ ॥

## पद ५२६.

हरी मी भक्तिचा भुकेलों रे ॥ केला तैसा झालों रे ॥ध्रु०॥ सुयोधनाच्या उपचाराची न धरुनि आशा पोटीं रे ॥ विदुराच्या त्या पातळ कणिया पूर्णकाम मी चाटी रे ॥ १ ॥ धांवुनि गेलों द्रौपदिच्या एका भाजीपानासाठीं रे ॥ पांडवजनप्रतिपाळक म्हणतां रक्षिलें संकटीं रे ॥२॥ निर्गुण परात्पर ब्रह्मादिकां दुर्लभ भेटी रे ॥ पार्थाचे हय धूतां तो मी चाबुक खोवीं मुकुटीं रे ॥३॥ अनंतकोटी ब्रह्मांडें एका रोमरंध्रा-निकटीं रे ॥ त्या मज एका तुलशीपत्रें सोडविलें शेवटीं रे ॥४॥ पुंडरिकास्तव उभा राहिलों चंद्रभागातटीं रे ॥ निजानंदें रंगलों मी ठेवुनियां कर कटीं रे ॥ ५ ॥

## पद ५२७.

यावें रविवंशाभरणा ॥ हो यावें ॥ध्रु०॥ सत्य ज्ञानानंत अपारा ॥ विगतविकारा ॥ जगदुद्धारा ॥ निगमागमसारा ॥१॥ निर्गुण नित्य निरामयधामा अवाप्तकामा ॥ मंगळनामा ॥ मुनिजनमनविश्रामा ॥ २ ॥ विश्वविलासा ॥ श्रीजगदीशा ॥ पूर्ण परेशा ॥ निजरंगा अविनाशा ॥ ३ ॥

## पद ५२८.

क्षीरनिधिजाकांता ये रे ॥ अच्युतानंता ये रे ॥ ध्रु० ॥ करुणासागर दीनदयाळा ॥गोकुळपाळा ॥ तमालनीळा ॥ भक्तवत्सला निजसुखकल्लोळा ॥१॥ टाकुनिया गरुडा मनपवना ॥ पतितपावना ॥ विश्वजीवना ॥ चित्सुखभुवना हृदयवृंदावना ॥२॥ विद्वज्जन मुनिपंकजभृंगा ॥ नित्य निःसंगा ॥ नीरदरंगा ॥ अभंग अंगा सहज पूर्ण निजरंगा ॥ ३ ॥

## पद ५२९.

तो योगी ॥ विषय विरागी ॥ अंतरीं निःसंगी ॥ शम दम करुणा अंगीं ॥ निजसुख आपुलें भोगी ॥ नित्यानित्य विचार विलोकुनि ॥ दृश्य पदार्थही त्यागी ॥ तो योगी ॥१॥ आघातीं ॥ जो न ढळे कधिं

चित्तीं ॥ नच सोडी हरिभक्ती ॥ लेखी तनु धन माती ॥ अनृत न ये वचनोक्ती ॥ लाभालाभ स्तुति निंदा सम तो केवळ निजमूर्ति ॥ आघातीं ॥२॥ तो पाहें ॥ सर्वहि ब्रह्माचि आहे ॥ निजबोधें डुलताहे ॥ गर्जन तर्जन साहे ॥ देहाभिमान न वाहे ॥ त्रिभुवनिंचा जो अधिपति होउनि अखंड तन्मय राहे ॥ तो पाहें ॥३॥ तो ज्ञानी ॥ सत्ता सुख जो मानी ॥ चिद्रत्नाचीं खाणी ॥ लावुनि ऐक्य निशाणी ॥ वेद जयातें वाणी ॥ रंगातित निजरंगपदीं जो खेळे अचळ विमानीं ॥ तो ज्ञानी ॥ ४ ॥

पद ९३०. [ काशीराजकृत. चाल—सदर ]

श्रीरंगा ॥ मुनिमनपंकजभृंगा ॥ अज अव्यय निःसंगा ॥ शाश्वत पूर्ण अभंगा ॥ परिपूरीत अव्यंगा ॥ चित्सागर नागर गुरुवर तूं कारण विश्वतरंगा ॥ श्रीरंगा ॥१॥ निष्कामा ॥ अपरिमित गुणग्रामा ॥ सज्जनमनविश्रामा ॥ सकळ मंगळधामा ॥ अद्वय अरुप अनामा ॥ सच्चिद्घन श्रुतिसार परात्पर श्रीगुरु आत्मारामा ॥ निष्कामा ॥२॥ अविनाशा ॥ तूं निज निर्विशेषा ॥ देवा पूर्ण परेशा ॥ पुरविं मनींची आशा ॥ देउनि सुख संतोषा ॥ श्रीरंगानुजतनुज शरण तुज तोडीं दुर्भवपाशा ॥ अविनाशा ॥३॥

पद ९३१. [ काशीराजकृत. चाल—तें मन निष्ठुर कां केलें ]

हरि कां मन निष्ठुर केलें ॥ ध्रु० ॥ दीनदयाळ कृपाळ कृपानिधि काय तुझें ब्रिद झालें रे ॥ १ ॥ अंतर्साक्षपणासि तुझ्या तुजपासुनि कोणी नेलें रे ॥ २ ॥ श्रीरंगानुजात्मज करुणा भाकित व्यर्थचि गेलें रे ॥ ३ ॥

पद ९३२ [ का. कृ. ]

दे दे वो राधे पांवा माझा वेगीं ॥ ध्रु० ॥ अनावर गोधनें धांवति विषयरानीं कैसी आवरती मजलागीं ॥ १ ॥ मज माझ्या पाव्यांविण न कंठे अर्ध क्षण वाहतों तुझी आण प्रसंगीं ॥ २ ॥ श्रीरंगानुजात्मासी विदित हा पांवा त्यासी ॥ रंगला सहज पूर्ण रंगीं ॥ ३ ॥

पद ९३३.

याची कैसी खंती वाटेना ॥ हृदयीं असुनि हरि भेटेना ॥ ध्रु० ॥ दिवसें दिवस लोटले ॥ श्रवणें श्रवण काटले ॥ भ्रांती पडदा आझुनि फिटेना ॥ १ ॥ जन्मजन्मांतरीं ॥ अंतरला हरी ॥ विषय सेवितां चित्त विटेना ॥ २ ॥ अनुतापें साधनीं ॥ शुद्ध सत्व होऊनि ॥ निजरंगाचा ठसा उमटेना ॥ ३ ॥

## पद ९३४.

सखा हरि भेटवा हो ॥ ध्रु० ॥ घोर संसारीं अंतरला हरी ॥ मनो दूत तयाप्रति पाठवा हो ॥ १ ॥ लागली तयाचि चाड पुरवा जिविंचें कोड ॥ निजानंद रंगें नभ दाटवा हो ॥ २ ॥

## पद ९३५.

कोणि तरी ह्मणोत कांहीं ॥ कृष्णीं रातलें संशय नाहीं ॥ ध्रु० ॥ वर्णाश्रमावेगळी ॥ यातीकुळाहुनि निराळी ॥ ह्मणती मजला कीं हेचि बोलली ॥ १ ॥ पर-पुरुषीं वेधली ॥ तेणें सुखें बोधली ॥ मी ह्मणतीं पुण्यें फळासि आलीं ॥ २ ॥ अंतःसुखें रातलीं ॥ निजानंदें मातलीं ॥ निरतिशय रंगें वेडी केली ॥ ३ ॥

## पद ९३६.

याचें कोणें काय नेलें ॥ ध्रु० ॥ स्वप्नीं राजा रंकपणें ॥ दरिद्रें पिडिलों ह्मणे ॥ अन्नवस्त्र नाहीं ऐसें झालें ॥ १ ॥ स्वरूपविस्मरणें ॥ नाना-दुःखें भोगणें ॥ नरदेह व्यर्थ वाया गेलें ॥२॥ सहज पूर्ण रंग ॥ निजानंद अभंग ॥ असोनियां ऐसें कैसें झालें ॥ ३ ॥

## पद ९३७.

दिवसाची हे रात्री मनुजा करिसी कां ॥ध्रु०॥ स्वप्रकाशघन संपत्ती दैवी त्यागुनि आसुरी वरिसी कां ॥ १ ॥ टाकुनि सत्पथ ब्रह्मपुरीचा अविहित मार्ग तूं धरिसी कां ॥ २ ॥ सहज पूर्ण निजरंग उपेक्षुनी विष विरंग हा भरिसी कां ॥ ३ ॥

## पद ९३८.

केला निश्चय हाचि मनीं ॥राम जनीं विजनीं ॥ ध्रु० ॥ तंतु पटीं घटीं मातिच तद्वत् ॥ ऐक्य जना करुनी ॥ १ ॥ ओघ तरंग अनेक विभासती ॥ चित्सागरजिवनीं ॥२॥ सहज पूर्ण निजरंग सनातन ॥ श्रीगुरु वरदपणीं ॥३॥

## पद ९३९.

त्वां येउनि सार्थक काय केलें ॥ ध्रु० ॥ नरदेह दुर्लभ पावुनि कांहीं ॥ स्वहित न होतां गेलें ॥ १ ॥ जळमथनीं नवनीत न लाभे ॥ विषय सेवितां तैसें झालें ॥२॥ निजरंगें रंगासि ना तें ॥ जन्मुनि व्यर्थचि मेलें ॥ ३ ॥

## पद ९४०.

भुलों नको जग मृगजळवत् रे ॥ ध्रु० ॥ चित्सूर्यावरि नामरुपात्मक

भास अशाश्वत रे ॥ १ ॥ शाश्वत मानिति ते नर मृगपशु ॥ वनचर निश्चित रे ॥ २ ॥ सहज पूर्ण निजरंगें सेवीं ॥ स्वात्मसुखामृत रे ॥ ३ ॥

## पद ९४१.

माझें मन रंगलें रामीं ॥ ध्रु० ॥ जें जे दिसतें तें तें रामाचि भासे सबाह्य अंतर्यामीं ॥१॥ गोडी साखर ब्रह्म परात्पर नग कैंचा हेमीं ॥२॥ पूर्ण निजानंदें रंगलें सच्चित्सुखधामीं ॥ ३ ॥

## पद ९४२.

मतिमंदा रे काय केला धंदा ॥ ध्रु० ॥ दुर्लभ हे तनु मानवी पावुनि नेणासि आनंदकंदा ॥ १ ॥ मृगजळ शाश्वत मानुनियां मनीं करीसी नाना-छंदा ॥ २ ॥ त्यागुनियां निजरंग सनातन श्रीगुरुचरणारविंदा ॥ ३ ॥

## पद ९४३.

तो घण मणी ना ॥ कळिकाळासि गणीना ॥ ध्रु० ॥ चित्तंतू प्रत्ययां-वरी नामरूप पटवीना ॥ १ ॥ नित्य तृप्त परमामृतें विषय तृषा उपटीना ॥ २ ॥ सहज पूर्ण निजरंगीं ॥ नानारंग आणीना ॥ ३ ॥

## पद ९४४.

मोह मदांध पडे याचें कौतुक तो न घडे ॥ ध्रु० ॥ निजदृष्टीवरी पडळ आलें मग सहजचि चांचपडे ॥ १ ॥ दृश्य पदार्थीं स्वरुप लक्षी पदोंपदीं मुरडे ॥ २ ॥ सर्व रंगीं निजरंग ना पाहे मग रडे वरडे ॥ ३ ॥

## पद ९४५.

मोहमद्यपी यद्यपि बोलतो ॥ तरी विस्मरणें चालणें चालतो ॥ ध्रु० ॥ बोलतो बोल तो मोल पावेचिना ॥ निरखुनि पाहतां दिसे फोल तो ॥१॥ बोलण्याविण जो चालणें चाले ॥ दीनबंधु दयासिंधु खोलतो ॥ २ ॥ बोलणें चालणें पारुषलें तो ॥ सहज पूर्णरंगें निजानंदें डोलतो ॥ ३ ॥

## पद ९४६.

कां रे हरी आठविला नाहीं ॥ ध्रु० ॥ देखत अंध बधिर कानीं ऐकुनि मूढ मनीं ॥ उपरतीचा लेश नसे कांहीं ॥ १ ॥ विषयसुखालागीं कैसें चित्त भोंवे पिसें जैसें ॥ धरुनियां तादात्म्य देहीं ॥ २ ॥ पूर्ण निजानंदें रंग धरीं सांडीं नाना छंद ॥ पडों नको मायाप्रवाहीं ॥ ३ ॥

## पद ९४७.

करुनियां काय वण वण वण वण ॥ ध्रु० ॥ गोड दिसे बहिरंग जनाप्रति ॥

अंतरिं उध्वस भण भण भण भण ॥ १ ॥ तीर्थ तपें बहु केलीं परि ते ॥ जागति षड्रिपु दण दण दण दण ॥ २ ॥ निजरंगें मन शांत नव्हे ॥ करि कामज्वरें तनु फण फण फण फण ॥ ३ ॥

### पद ५४८. [ आ. स्वा. कृ. ]

वद वद वद गे जिव्हे श्री रंग रंग रंग ॥ ध्रु० ॥ मानुनि गोड रसा विषयांच्या होऊं नको तूं दंग दंग दंग ॥ १ ॥ परनिंदा परदोष नरस्तुति सांडुनि यांचा संग संग संग ॥ २ ॥ पूर्णरंग हरी न भजसि जरी तरी करिल तुझें यम भंग भंग भंग ॥ ३ ॥

### पद ५४९.

आतां तरी जागे गुरुपदिं लागें ॥ ध्रु० ॥ लक्षचौऱ्यायशीं सोंगें घेतलीं मागें ॥ नरदेह आहे हिताजोगें ॥ १ ॥ सज्जनसंगें सच्छास्त्रमार्गें ॥ अनुदिन निजहितीं वागें ॥ २ ॥ विवेक वैराग्यें गुरुकृपें योगें ॥ सहज पूर्ण निजानंदीं रंगें ॥ ३ ॥

### पद ५५०.

बाई गे ऐशीं चिन्हें कैं येतिल माझे ठायीं ॥ ध्रु० ॥ देहीं न धरुनि ममता त्यजुनि गृह कांचन कांता ॥ आंगीं बाणेल कैं निस्पृहता ॥ १ ॥ अनित्याचा त्याग दृष्टी नित्य स्वरुपेशीं भेटी ॥ भगवद्भजनीं आवडि मोठी ॥ २ ॥ निर्भय होऊनि नांदें विचरें मीं निजछंदें ॥ रंगीं रंगोनि निजानंदें ॥ ३ ॥

### पद ५५१.

नारायणपरायण झाल्या ॥ या मनोवृत्ती ॥ गंगासागरीं मिळाल्या ॥ ध्रु०॥ मिळोनियां मिळती दिनरजनीं ॥ अनन्य भावें भगवद्भजनीं ॥ चित्सागर

---

१. प्रसिद्ध साधु तुका विप्र [ गांहमतपुरचे कुळकर्णी ] यांस श्री स्वामींचे पदांची अत्यंत गोडी लागून स्वामीचरणीं त्यांची फार निष्ठा बसली, व त्यांनीं तेव्हांपासून दर गुरुवारीं स्वामींचे दर्शनास येण्याचा नियम ठेविला. एके गुरुवारीं मनोहरबावा कीर्तन करीत असतां त्यांणीं या पद्यावर निरूपण चालविलें होतें, त्याचा ठसा यांचे अंतःकरणावर अगदीं हुबेहुब उठून त्यांचा तादात्म्य वृत्ति झाली, व ते तेंच पद्य फिरफिरून म्हणून आनंदभरांत नाचूं उडूं लागले, व या पद्यांतील वर्णनाप्रमाणें चिन्हें माझे अंगीं केव्हां येतील म्हणून श्रींस आळवूं लागले. तुकाविप्र यांनीं उपरांत झाल्यानंतर श्रीवर पद्यरचना केली, तीं पद्यें निगडीमठांत श्रीसन्निध प्रतिवर्षीं उत्सवसमयीं म्हणत असतात.

होउनि ठेल्या ॥ १ ॥ सोहंशब्दें गर्जती घोषें ॥ प्रवाहरूपें अति संतोषें ॥ समसाम्य पूर्ण पावल्या ॥ २ ॥ त्रिविध छेदभेदरहित ॥ काळत्रयीं अबाधित ॥ निजानंदें रंगीं रंगल्या ॥ ३ ॥

## पद ५५२.

कळों आली भाव रे भक्तिपाशीं देव रे ॥न पाहेचि याति कूळ कर्म मूळ भाव रे ॥ ध्रु० ॥ कोण पुण्यश्लोक रे गोकुळिंचे लोक रे ॥ गोपवेषें जयां घरीं ब्रह्मांडनायक रे ॥ १ ॥ दुर्लभ ब्रह्मादिकां त्यासि गोपी बायका ॥ हर्षें नाचविती वाजवुनि करताळिका ॥ २ ॥ प्राणाच्या निरोधनें नव्हे साध्य साधनें ॥ लीलारूपविग्रहीं तो चारिताहे गोधनें ॥ ३ ॥ भाविकांचा बंध रे तोडी जगद्वंद्य रे ॥ यशोदेनें उखळीं तो बांधिला गोविंद रे ॥४ ॥ ज्याचा जैसा हेत रे तया तैसा होत रे ॥ निजानंदें पूर्णरंगीं रंगला अनंत रे ॥ ५ ॥

## पद ५५३.

उद्धवा समज रे माधवा समज रे ॥ नाहीं येणें जाणें निज गुज हें उमज रे ॥ ध्रु० ॥ घटाकाश वाटे रे चाले ऐसें वाटे रे ॥ उपाधिभेदें भासे परि तें बांधवेना मोटे रें ॥ १ ॥ रविबिंब बिंबलें जळीं नाहीं तिंबलें ॥ इक्षुरसीं मधुर ना तें आंबलें ॥२॥ प्रकट ना तें गुप्त रे बंधनातें गुप्त रे ॥ सर्वीं सर्वातीत तैसा मी येथें आलिप्त रे ॥३॥ चळेना ढळेना वांकेना वळेना ॥ मळेना जळेना ब्रह्मादिकां आतळेना ॥४॥ निर्गुण निःसंग रे अक्षयी अभंग रे ॥ निजानंदें शोभतों मी सहज पूर्ण रंग रे ॥ ५ ॥

## पद ५५४.

ऐसा सखा कोण रे हरिल माझा शीण रे ॥ आणुनि भेटवूनी कृष्णा तृष्णा पुरविल जाण रे ॥ध्रु०॥ वाहतें त्याचिच आण रे करीन आधिन त्या त्राण रे ॥ हरिशीं योग करुनीं जाळील संचितक्रियमाण रे ॥१॥ लागुनि संशय बाण रे मांडिलें निर्वाण रे ॥ हरिशीं योग नव्हतां तितुकें साधन अप्रमाण रे ॥२॥ जगनग चित्सुवर्ण रे पाहतां सहज पूर्ण रे ॥ गोकुळिं गोपाळ यापरि दावितो निजखूण रे ॥३॥ छेदभेदेंवीण रे निराकार निर्गुण रे॥ वाजवुनि मोहरी तो मनमोहरीतो यदुभूषण रे ॥४॥ वंदुनि याचे चरण रे होऊनि अनन्य शरण रे ॥ निजरंगें रंगवुनी पुनरपि चुकवीं जन्ममरण रे॥५॥

## पद ५५५.

संसारसागर मोठा दुस्तरतर मज तरवेना ॥ध्रु०॥ देवाधिदेवा रुक्मिणीरमणा ॥ अच्युतानंता धांवें पावें श्रीकृष्णा ॥ तुजवीण कोण शीण सोशी॥ टाकुनि हे आसोशी ॥ तुझिया निज भजनाची ॥१॥ कामक्रोधादिक षड्वैरी ॥ जाचिती अनुदिन तृष्णा कल्पना नानापरी ॥ त्रिविध तापें अति संतप्त ॥ सुखलेश नाहीं प्राप्त देहाभिमानेंकरुनी ॥२॥ आतां सोडवीं दीनबंधू ॥ भक्तकामकल्पद्रुम तूं ॥ भवहरणा करुणासिंधु ॥ सच्चिदानंदकंदा ॥ सहज पूर्ण निजानंदा ॥ निःसंगा श्रीरंगा ॥३॥

## पद ५५६.

घेतलें रे या षड्वर्गीं देहदुर्ग ईक्षणमात्रें ॥ध्रु०॥ शिश्नेंद्रियद्वारीं काम राहे ॥ निर्वाण योद्धा तिळतुल्यहि विहिताविहित न पाहे ॥ न ह्मणे आपपर हें अगुहि प्रमाणें ॥ मारितां कटाक्षबाणें ॥ सर्वांगीं भेदला रे ॥१॥ नेत्रीं राहिला क्रोध सदांहीं ॥ घातकी पाही न विचारी सारासार कदांही ॥ वधिली रेणुका-शांति-विवेकी ॥ दुर्निवार हा तिहीं लोकीं ॥ बुडविले थोर थोर ॥२॥ पाहा हो बैसला दुर्मद माने ॥ वरि ताठा चढला न लवे विधिचेंहि ज्ञान न माने ॥ हृदयीं मत्सरें वस्ती केली ॥ परमार्थीं घाला घाली ॥ परदोषदर्शन रेखे॥३॥ सर्वांगीं दंभ त्वचेवरि भरला ॥ वरी वरी अवलोकीं नेणो दशदिशा भरूनि उरला ॥ अहंकार बैसला याचे ॥ मीपणें गर्वें नाचे ॥ देहाभिमानी मोठा ॥४॥ ऐसीं अवरोधुनी साही अंगें या षड्वैऱ्यांनीं दैवी संपदा हरिली वेगें॥ यांतें निर्दाळिल गुरु निजरंग ॥ तरिच हा सांगोपांग ॥ भयभंग होइल याचा ॥५॥

## पद ५५७.

गोवर्धनधारी आला आला वो दीनबंधू ॥ध्रु०॥ हृदयीं रुक्मिणी चरण धरुनी ॥ संवाहन करितां उठिला पीतांबर सांवरुनी ॥ गरुडा मनपवना टाकुनि मागें ॥ धांवला लागवेगें ॥ भक्तकामकल्पद्रुम तो ॥१॥ गगनीं झळकला पीतांबर सये ॥ स्वप्रकाश घन तो वोळी बोलतां नये नये ॥ तेजोमय मंडित आयुधें चारी ॥ श्रीरंग चतुर्भुज शौरी ॥ मनमोहन मदनजनक तो ॥२॥ श्रवणीं कुंडलें तळपति दोन्ही ॥ हरिवदनसरोजीं भ्रमतां स्थिर झाले रविशशि नयनीं ॥ मिरवे कस्तुरीतिलक ललाटीं ॥ शुकचंचु नाशिक निकटीं ॥ वसविलें सदन वसंतें ॥ ३ ॥ दिव्य शोभला मुकुट

ललामीं॥ फांकली प्रभा पाहतां दशदिशा अंतर्यामीं ॥ देखे अवचीता नवल करी डोळां ॥ सुमती द्रौपदि बाळा ॥ हरिचरणीं सु-मन समर्पी ॥ ४ ॥ मिळणी मिळतां भवसंकट नाशी ॥ हरि करुणार्णव तो झाली मती समरस सरिता जैसी ॥ रंगीं रंगली निजानंदें ॥ क्रीडतां निजसुखछंदें ॥ स्वस्वरुपीं निश्चळ राहे ॥ ५ ॥

## पद ५५८.

तो तूं विसरासि कैसा मजला श्रीरंगा रे ॥ ध्रु० ॥ जेणें त्वां येणें पशु गजेंद्रासाठीं रे ॥ तेथेंहि नक्रासह त्या नेलें वैकुंठीं रे ॥ युद्धीं भारतीं पक्षां घंटेंत संरक्षी ॥ करुणेचा सिंधू रे ॥ १ ॥ धमयागीं मंडुकबाळ सानुलें रे ॥ होता कढईंत उदक उष्ण जाणवलें रे ॥ ह्मणतां तें कृष्ण कृष्ण जळ न करुनियां उष्ण ॥ हरिला प्रबंध रे ॥ २ ॥ दोघं स्त्रीपुरुषें पक्षी कपोत वृक्षीं रे ॥ वरि श्येन फिरतां व्याधबाणीं गुण लक्षी रे ॥ निजबाणें श्येन निमाला ॥ अहिदंशें तोहि मेला ॥ पक्षी वांचविले रे ॥३॥ व्याधें कोंडिला मृग वधुबाळेंसह वनीं रे ॥ स्मरतां तुज तेव्हां पाश जाळितो वन्ही रे ॥ शशकापाठीं श्वानें नेलीं ॥ अवकाळीं वृष्टी केली ॥ अनाथबंधू रे ॥४॥ ऐसा शरणागत प्रतिपाळक तूं निजरंगा रे ॥ सच्चित्सुखसारा निर्विकारा निःसंगा रे ॥ मागें बहु तरले पापी ॥ तरती पाहूं अद्यापी ॥ ज्याच्या नामें रे ॥५॥

## पद ५५९.

इंदिरावर हरी आणा मंदिरा यादवराणा ॥ध्रु० ॥ सुमति राधिका मदगजगमना ॥ सखियांसी बोले विरहें लक्षितसे कैठभदमना ॥ वेगीं घेउनियां नव घननीळा ॥ साजणी गोकुळपाळा ॥ प्राणाच्या जिवलग प्राणा ॥१॥ वैराग्य वसंत माधव मासीं ॥ तापलें तापें असतां सोज्वळ मन चंद्रप्रकाशीं ॥ नाना उपचारें तनु संतप्त ॥ करणार्थी चित्त विरक्त ॥ जाणवा वृत्त सुजाणा ॥२॥ हरीवांचुनि वांचुनि काय काम ॥ श्रम सर्व निरर्थक प्राणेंविण जैसा इंद्रियग्राम ॥ ऐसें बोलतां तव निजशेजे ॥ श्रीरंग सहज विराजे ॥ जो अगम्य निगम पुराणा ॥३॥ स्वस्वरुपीं ऐक्य बोधें बोधली सुमती बाळा ॥ ध्रु० ॥

## पद ५६०.

रातली मती परपुरुषीं ॥ मातली स्वात्म विलासीं ॥ ध्रु० ॥ झाली

निःशंक निर्भय चित्तीं ॥ अच्युतानंतीं रमतां लक्षुनि माति सज्जन संतीं ॥ अनुमोदन देउनि ते उफराटी ॥ धाडिली अनंत कोटी ॥ ब्रह्मांडनायक शेजे ॥ १ ॥ शेजे अनुभविला आत्माराम ॥ अवाप्तकाम करुनि घेतला मुनिविश्राम ॥ समूळीं बुडविले धर्माधर्म ॥ उडविलें स्वरुप नाम ॥ लौकिक लज्जा त्यजुनी ॥२॥ पहिल्या पतिलागीं अनावर झाली ॥ देह अहंकारा न गणी; परपुरुषीं जडोनि ठेली ॥ रंगीं रंगली पूर्ण रंगीं ॥ शोभली नित्य निजांगीं ॥ भोगुनियां स्वात्मसुखातें ॥ ३ ॥

## पद ५६१.

रातला रे हरी अंतर प्रतितीसीं ॥ध्रु०॥ चिदाचिद्ग्रंथी हे हृदयींची सोडुनी ॥ आवरण विक्षेप वास हें फेडुनी ॥१॥ निःसंग शेजे निजा निजवुनी सम्मुख ॥ परापारुषली काय सांगों वैखरीनें सुख ॥२॥ ज्याचें तेचि जाणे ज्याचें तेचि जाणें ॥ अंतरींची खुण अंतरीं बाणें ॥३ ॥ वर्ण व्यक्ति शून्य नामरूपातीत ॥ न बोलवे बोलीं ब्रह्म सदोदित ॥ ४ ॥ निज नंदीं पूर्ण रंगला साजणी ॥ बोलों जातां मौन धरियलें साजणी ॥ ५ ॥

## पद ५६२. [ आत्यास्वामीकृत. ]

मातला रे रामरस हा सेवुनि ॥ध्रु०॥ निजानंदें डुल्लत दृष्टि दुजें नाणी ॥ देहीं देहातीत सदोदित होउनी ॥ १ ॥ अनावर निःसंग निर्लज्ज निर्भय ॥ स्मरण विस्मरण तिळांजुलि देउनी ॥२॥ वर्णाश्रम कर्माकर्म न विचारी धर्माधर्म ॥ पूर्ण रंग रंगला येउनी जाउनी ॥ ४ ॥

## पद ५६३.

आठवा चित्तीं राम निजमूर्ति ॥ चुकती निश्चितीं संसृति आवृत्ति॥ध्रु०॥ सार या साराचें छेदक संसाराचें ॥ पार्वतीवराचें ध्येय ध्यान साचें ॥१ ॥ पूर्व पुण्यें होती सफल या प्रतापें ॥ नासती अनुतापें स्थूल सूक्ष्म पापें॥२॥ अधिष्ठात्रि देव फलद होती सर्व ॥ पालटती स्वभाव इंद्रियांचे पूर्व ॥ ३ ॥ वैराग्येंशीं ज्ञान होय तें विज्ञान ॥ क्षीण होय अज्ञान बोलती सज्ञान ॥४॥ मी माझें हा संग भंगुनि निःसंग ॥ निजानंदें रंग रंगला अभंग ॥५॥

## पद ५६४.

ऐसें काय जिणें हरिविणें वो ॥ उदरभरण करित नाहीं काय शूनें वो ॥ध्रु०॥ मन मुरडेना संतसंगतीं जडेना ॥ श्रवण घडेना देहबुद्धि बुडेना ॥१॥

संदेह जळेना वृत्ति गळेना ॥ सारासार कळेना समाधान मिळेना ॥ २ ॥ प्रवृत्ति अंगना तिळतुल्य खगेना ॥ संग भंगेना निजानंद रंगेना ॥ ३ ॥

पद ५६५. [ चाल—अभंग ]

मी कोण हें काय कर्ता याचा कोण ॥ आहे उपादान काय याचें ॥ध्रु०॥ या नांव विचार विचार विचार ॥ ब्रह्म साक्षात्कार होय जेणें ॥१॥ मी आत्माराम शुद्ध बुद्ध मुक्त ॥ सर्वीं सर्वातीत पूर्ण ब्रह्म ॥२॥ हें काय विवर्त रज्जु-सर्प-न्याय ॥ बागुलाचें भय बाळकासी ॥३॥ कर्ता हा संकल्प करितसे घडमोडी ॥ ब्रह्मांड उतरडी उतरी रची ॥ ४ ॥ जगदाभास मिथ्या माया आवरण ॥ अज्ञान कारण मूळ याचें ॥५॥ ब्रह्म सहज पूर्ण कैंचें छेद भेद ॥ अवघा निजानंद रंगलासे ॥ ६ ॥

पद ५६६. [चाल—पार्वतीवर मीं नमिला शिवशंकर.]

आपुल्या नामासाठीं नामांकित धांवुनि येती ॥ध्रु०॥ भक्ता प्रल्हादाकारणें ॥ स्तंभीं प्रकटुनि संरक्षणें ॥ नाहीं पडों दिधलें उणें ॥ नाम स्मरतां संकटीं ॥१॥ पशू गजेंद्रा भवजळीं ॥ नांव स्मरतां तये काळीं ॥ धांवुनि येउनि त्वां वनमाळी ॥ सरता केला वैकुंठीं ॥२॥ गणिका कुट्टिनी पापराशी ॥ अजामिळ तो महा दोषी ॥ कैवर्तक तो केला ऋषी ॥ नामें स्मरतां उफराटीं ॥३॥ श्री हरी भक्तकामकल्पद्रुम ॥ मुनिजनमनविश्रामधाम ॥ शरणागत प्रतिपाळक नाम ॥ श्रुति गर्जती बोभाटीं ॥ ४ ॥ नाम स्मरतां ते द्रौपदी ॥ संरक्षिली पदोपदीं ॥ सहज पूर्ण निजानंदीं ॥ कृष्णरंगीं रंगली ॥ ५ ॥

पद ५६७. [ चा. सदर ]

तुझीं बिरुदें त्वां जतन करावीं आतां ॥ ध्रु० ॥ निगमागमें वाखाणिलीं ॥ त्यांत एक दोन हरविलीं ॥ उरलीं जतन करावीं आपुलीं ॥ ज्याचीं त्यानें विवेकें ॥१॥ आम्हीं आपलीं आपण यत्नें ॥ संरक्षिलीं जैसीं रत्नें ॥ हृदयीं धरूनी करितों जतनें ॥ नानापरी दिनरजनीं ॥ २ ॥ पतीतपावन करणें एक ॥ दीनबंधुपण अमोलीक ॥ दोन्ही गमाविलीं लौकिक ॥ होवू पाहातो तुझा ॥३॥ पतीतपण हें आम्हीं चित्तीं ॥ धरिलें न सोडूं कल्पांतीं ॥ पावनपण हें तुझें अंतीं ॥ दिसेनासें पैं झालें ॥४॥ काया वाचा मनें दीन ॥ आम्हीं सर्वस्वें संपन्न ॥ तूं दीनबंधु म्हणतां मौन ॥ धरूं नको निजरंगा ॥५॥

पद ५६८. [ चा. सदर. ]

ज्ञानी परमहंस तो जाणावा ॥ध्रु०॥ मुनिजनमानस विजनविहारी ॥ मुक्त मुक्ताफळ आहारी ॥ नित्यानित्य विचार करी ॥ क्षीरनीर विभागी ॥१॥ स्वीकारुनी सारभाग ॥ करितो अनित्याचा त्याग ॥ ऋद्धि सिद्धि स्वर्गभोग ॥ गौण मानुनी राहे ॥२॥ सहज पूर्ण निजानंद ॥ रंगीं रंगला स्वच्छंद ॥ निरतिशय सुख निर्द्वंद्व ॥ सच्चिद्धनीं विराजतो ॥ ३ ॥

पद ५६९. [ चा. सदर. ]

भगवंत निजभक्तांचीं संकटें दूर करितो ॥ ध्रु० ॥ कांता कांचन पुत्र धन ॥ भाग्य वैभवसंपन्न ॥ होतां करीतिल आनोआन ॥ म्हणऊनि धन कांचन हरितो ॥१॥ मोहमदें मदोन्मत्त ॥ कदां होऊं नेदी चित्त ॥ त्याचें करणें तें स्वहित ॥ म्हणवुनि पाश वारितो ॥ २ ॥ सर्वसंग परित्यागी ॥ निरपेक्ष जे वीतरागी ॥ निजानंदें सर्वसंगीं ॥ त्यांना सत्वर उद्धारितो ॥३॥

पद ५७०. [ चा. सदर. ]

उच्चारीं वाचे श्रीराम जयराम जय जय राम ॥ध्रु०॥ मंत्र त्रयोदशाक्षरी ॥ जपतां निरंतर वैखरी ॥ रामरूप चराचरीं ॥ सबाह्य अंतरीं दाटे ॥१॥ उफराटिया नामासाठीं ॥ वाल्मिक तरला उठाउठीं ॥ वदला रामायण शतकोटी ॥ भविष्य अवतारापूर्वी ॥ २ ॥ भवभय बापुडें तें काय ॥ जैसा मिथ्या मृगजळ-न्याय ॥ रामनामस्मरणें होय ॥ निर्विष सांब सदाशिव तो ॥ ३ ॥ नारदादिक महामुनी ॥ स्मरणें पावन करिती अवनी ॥ स्वयें विचरती चिद्धनीं ॥ नीजानंदें निर्द्वंद्वें ॥ ४ ॥ सहजीं सहज पूर्ण रंग ॥ तें हें नामस्मरण निःसंग ॥ येणें तरले अभंग ॥ सर्व रंगीं वर्तता ॥ ५ ॥

पद ५७१. [ चा. सदर. ]

नरदेहा येउनी काय रे हित केलें ॥ध्रु०॥ अगणित पुण्यें तनु मानसी ॥ प्राप्त झाली असतां कैसी ॥ ते त्वां समर्पिली विषयांसीं ॥ जैसी दासी आंदणी ॥१॥ आहार निद्रा भय मैथुन ॥ जीवमात्रासी हें ध्यान ॥ येथें पूर्ण ब्रह्मज्ञान ॥ मानवदेहींची व्हावें ॥२॥ पुत्र कलत्र गोत्र मित्र ॥ सर्वै संपत्ति चित्रविचित्र ॥ नाशिवंत इहामुत्र ॥ केवळ पात्र दुःखाचें ॥३॥ साधनसंपन्न त्वां व्हावें ॥ नवविध भजनें अनन्य भावें ॥ हरिगुरुचरणा शरण रिघावें ॥ तरणोपायाकारणें ॥ ४ ॥ सांडुनि देहबुद्धिचा संग ॥ पूर्ण निजानंदें रंग ॥ तरीच होसील अभंग ॥ ब्रह्मरूप सर्वदा ॥ ५ ॥

पद ५७२. [ चा. सदर. ]

अनन्यभावें कां न भजती प्राणी मजला ॥ध्रु०॥ विद्या वयसा कीं धन कांता ॥ पुत्रापत्यें माता पिता ॥ कोण आहे संरक्षिता ॥ या भवदुःखापासूनी ॥१॥ पंचभूतात्मक हें स्थूळ ॥ केवळ सर्व चोरांचा गूळ ॥ क्षणभंगुर हा दुःखमूळ ॥ मृगजळवत् जड विकारी ॥ २ ॥ कवण्या गुणें मंदमती ॥ विषवत् विषयांतें सेविती ॥ आयुष्य जातें हातोहातीं ॥ तोंडीं माती घालुनी ॥३॥ साधनयुक्त अंतःकरणें ॥ विहित सत्कर्में आचरणें ॥ नवविध भजनीं आत्मस्मरणें ॥ जन्ममरणें नासती ॥४॥ श्रीसद्गुरुच्या पदारविंदीं ॥ राहुनि सच्चित्सुखमकरंदीं ॥ पूर्ण रंगें निजानंदीं ॥ विदेहत्वें विचरावें ॥५॥

पद ५७३. [ काशीराजकृत. चाल— सदर. ]

दीनबंधू भक्तांचा साहाकारी ॥ ध्रु० ॥ परात्पर तरवर परीपूर्ण ॥ जगनगकार्या चित्सूवर्ण ॥ ऐसा निर्गुण परि मी सगुण ॥ झालों भक्तांकारणें ॥१॥ एका अंबरीषाकारणें ॥ दशविध रूपें म्यां अवतरणें ॥ माझ्या निजभक्तांचें उणें ॥ पडों नेदी मी कांहीं ॥२॥ कष्टी प्रन्हादासी दृष्टीं ॥ देखुनि अवतरलों मी काष्टीं ॥ करुनि परमामृतवृष्टी ॥ सृष्टी भरली स्वानंदें ॥३॥ पशू गजेंद्रा जळचरें ॥ संकट करितां पूर्ववैरें ॥ तो म्यां सत्वर कमळावरें ॥ धांवुनि येउनि सोडविला ॥ ४ ॥ करूनि दुर्योधनें गर्व ॥ द्रौपदि गांजितां अपूर्व ॥ पर्वत झालों तेव्हां सर्व ॥ सुरंग रंग वस्त्रांचे ॥५॥ ऐशा भक्तांतें उद्धरिलें ॥॥ त्याचें परिमित कवणें धरिलें ॥ त्यांनीं दुर्जय मन मोहरिलें ॥ संकट हरिलें म्यां त्यांचें ॥६॥ सहजीं सहज पूर्ण रंग ॥ श्रीरंगानुजात्मज अभंग ॥ असोनि निजभक्तांचा संग ॥ मजहुनि मजला आवडतो ॥ ७ ॥

पद ५७४. [ चा. सदर. ]

राजा महाराज तो राजयोगी ॥ध्रु०॥ नित्य पूर्ण पदावरी ॥ तन्मय छत्र शोभे शिरीं ॥ दैवी संपत्ति सेना समरीं ॥ भेद शत्रु निर्दळिला ॥१॥ बोध अनुभव हस्ति मस्त ॥ सेना शोभविती समस्त ॥ विवेक मंत्री तो नेमस्त ॥ सारासार विभागी ॥२॥ वीतराग तो सेनापती ॥ भाव सेना-सर निश्चिती ॥ अक्रोधता निर्मळ शांती ॥ दुंदुभी गर्जे महाद्वारीं ॥३॥ चारी साहा अठरा भाट ॥ ब्रीदं गर्जती अचाट ॥ नवविध नाचणीचे थाट ॥ निजसुखछंदें नाचती ॥४॥ निजभांडारीं सुवर्ण ॥ भरलें चिद्रत्नें परिपूर्ण ॥ अ-

नादि अव्यय नाणें जीर्ण ॥ मूर्तिमंत अक्षयी ॥५॥ ज्याचें ठेवणें अमूप ॥ समसाम्यें स्वस्वरूप ॥ जेथें पाजळला दीप ॥ अलक्ष लक्षें सर्वदां ॥ ६ ॥ विदेहत्वें सुखासनीं ॥ विद्वद्वर्य तो चिद्भुवनीं ॥ विचरे निश्चळ अधिष्ठानीं ॥ सहज पूर्ण निजरंगें ॥ ७ ॥

## पद ५७५. [ चा. सदर. ]

माझा सखा सोयरा श्रीहरी ॥ ध्रु० ॥ त्यावेगळा नाहीं थार ॥ निराधारिया आधार ॥ पावविला पैलपार ॥ भवसिंधूचा तेणें ॥ १ ॥ त्याच्या नामें काळ बळी ॥ आम्हिं घातला पायातळीं ॥ नादों निर्भय जळीं स्थळीं ॥ काष्ठी पाषाणीं आतां ॥२॥ म्हणे करीन सांगाल तें ॥ देईन जें जें मागाल तें ॥ परंतु तुम्हीं त्यागाल तें ॥ नाशिवंत म्हणवूनी ॥ ३ ॥ काय उणें केलें तेणें ॥ दिधलें अक्षयी निज नाणें ॥ पारुषलें येणें जाणें ॥ लक्ष चौऱ्यायशी योनी ॥ ४ ॥ गणिका वाल्मिक महादोषी ॥ ज्याच्या नामें झाले ऋषी ॥ ऐसा सोयरा मी त्यांसी ॥ कैसा विसंबों आतां ॥ ५ ॥ ज्याची चरणसेवा रमा ॥ करी भाग्याची हे सीमा ॥ नेणें ब्रह्मा महिमा उपमा ॥ दुजी नाहीं द्यावया ॥६॥ आम्हां ऐसा सुखी कोणी ॥ नाहीं न दिसे त्रिभुवनीं ॥ ज्याच्या धर्मे हे दिनरजनी ॥ काळ वेळ नाठवे ॥ ७ ॥ जिवलग सोयरा निजाचा ॥ अनन्य शरणागत मी त्याचा ॥ झालों काया मनें वाचा ॥ निजानंदें रंगोनी ॥ ८ ॥

## पद ५७६. [चा. सदर. ज्ञानदेवावर ]

ॐ नमो जय जय जी सद्गुरु ज्ञानदेवा ॥ध्रु०॥ कलीमाजीं विषयी जन॥ बहुत जाहले अज्ञान ॥ यास्तव मूर्तिमंत ज्ञान ॥ देवरूपें अवतरसी ॥ १॥ ज्ञानदेव हीं अक्षरें ॥ अक्षरातीत परें ॥ स्मरणें तरती नर पामरें ॥ दुस्तरतर हा भवसिंधू ॥ १ ॥ कृष्णाद्रीहुनि चिद्गंगा ॥ गीता आली हे कलियुगा ॥ पावन करावया जगा ॥ श्रवणें पठणें मुमुक्षां ॥३॥ देशभाषा प्राकृत वाणी॥ टीका ज्ञानेश्वरी करुनी ॥ प्रबोधले भाविक ज्ञानी ॥ झाले अर्थावबोधें ॥४॥ जैसी हिऱ्याची हिरकणी ॥ दृष्टीं न पडे दुजेपणी ॥ गीता ज्ञानेश्वरी कोणी ॥ भिन्न न म्हणावीं तैसी ॥५॥ अगाध माहिमा वर्णू कैसा ॥ वेद बोले पशू म्हैसा ॥ गेले पूर्वज आणिले सहसा ॥ श्राद्धीं ब्राह्मणाचे ॥६॥ ऐसा माहाराज योगी ॥ ज्ञानदेव तूं कलयुगीं ॥ पूर्ण निजानंद रंगीं ॥ अभंग रंगें रंगसी ॥ ७ ॥

### पद ५७७.

जाणावे संत केवळ ब्रह्मसूर्ति ॥ संशय न धरावा चित्तीं ॥ ब्रह्मविद ते ब्रह्मचि होती ॥ ऐसें श्रुती बोलती ॥ ध्रु० ब्रह्मनिर्गुण निर्वीकार ॥ लीला-विग्रही साचार ॥ जैसें गोठुनियां नीर ॥ गाररुपें संचलें ॥ १ ॥ सोनें सोनेंपणा उणें ॥ नाहीं झालें होतां उणें ॥ किंवा पट तो तंतूविणें ॥ श्रवणें कोणी ऐकिला ॥२॥ नामरूपाचा गोंधळ ॥ अवघा कल्पनेचा खेळ ॥ उदकीं तरंग कल्लोळ ॥ वाच्यारंभण मात्र तें ॥३॥ नामरूपा बोळवण ॥ आत्मप्रत्ययें आपण ॥ निजानंदीं जे संलग्न ॥ सहज पूर्ण ब्रह्म ते ॥४॥ जैसें सैंधव सिंधूसंगे ॥ तैसे रंगले निजरंगें ॥ अनुभव विद्वज्जन प्रसंगें ॥ निजप्रत्ययें जाणती ॥ ५ ॥

### पद ५७८. [ चाल—भुपाळी ]

ऐसी रंगमूर्ति म्यां देखिली ॥ ध्रु० ॥ हरीचीं चरणतळें गोमटीं ॥ सुरंग रंग दाही बोटीं ॥ दोही भागीं वर्तुळ घोटीं ॥ निळीमा शोभे साजिरी ॥१॥ पोठरीया जानु जघनी ॥ मकरस्तंभ उपमा सानी ॥ पीतांबरें सौदामिनी ॥ मंद जाहल्या चिद्व्योमी ॥२॥ कटीं मेखळा कटिसूत्र ॥ क्षुद्र घंटिकांचें यत्र ॥ नेती शब्दें उठती मंत्र ॥ निगमोच्चारें सर्वदा ॥३॥ नाभीं जन्मे चतुरानन ॥ उदरीं त्रिवळी समसमान ॥ हृदयीं श्रीवत्सलांछन ॥ महिमा मोठी न वर्णवे ॥४॥ कठीं श्रीतुलशी वनमाळा ॥ पदकें एकावळीं गळां ॥ कौस्तुभतेजं नभमंडळा ॥ अगणित शोभा पातली ॥५॥ बाहूमंडित वीरकंकणें ॥ शंखचक्रांकित भूषणें ॥ अनुपम मुद्रिकांचें लेणें ॥ दशांगुलीं विलसतसे ॥ ६ ॥ झळके तेजस्वी हनुवटी ॥ प्रवाळ-शोभा दोहीं ओठीं ॥ दशनीं दीप्ती झळके मोठी ॥ सस्मित वदनीं बोलतां ॥७॥ नासिक सुरेख अति सुंदर ॥ विशाळ नेत्र कमळाकार ॥ व्यंकट भ्रकुटींचा आकार ॥ केशर भाळीं रेखिलें ॥८॥ श्रवणीं कुंडलांचा ढाळ ॥ दोहीं गल्लकीं झळाळ ॥ कोटी सूर्यांचा उजाळ ॥ तमाळनीळ निजांगीं ॥९॥ तीर्थ व्रतें जप तप ध्यानें ॥ आणि हठयोग धूम्रपानें ॥ नलभे फळ तें भगवद्ध्यानें ॥ प्राप्त होय निश्चयें ॥१०॥ ध्यानयोगें भवभय जाय ॥ कृष्णस्मरणें परमोत्साह ॥ निजानंद पूर्ण होय ॥ सर्व रंगीं समसाम्यें ॥११॥

### पद ५७९. [ चाल—सदर ]

ऐसी तुझी कीर्ति म्यां ऐकिली ॥ ध्रु० ॥ स्मरतां नाम तुझें उफराटें ॥

केवळ वाल्मिक तें चोरटें ॥ पावन केलें कौतुक मोठें ॥ भवसंकट वारुनी ॥१ ॥ गणिका पक्षीं याच्या मिषें ॥ अजामिळ तो पुत्रोद्देशें ॥ नाम घेतां त्वां जगदिशें ॥ पावन केलें दोघांसी ॥२॥पशू गजेंद्राकारणें ॥ उडि घालुनि नारायणें ॥ वनचर जळचरही उद्धरणें ॥ संदर्शनें दोघांसी ॥३॥ दैत्यें गांजितां प्रल्हाद ॥ करुनि असूरांचा उच्छेद ॥ भक्तवत्सल हें ब्रीद ॥ साच केलें आपुलें ॥ ४ ॥ नाना प्रसंगीं द्रौपदी ॥ संरक्षिली पदोपदीं ॥ पांडवांचें न्यून कधीं ॥ पडों दिलें त्वां नाहीं ॥५॥ युद्धिं पक्षिणीचिं पिलें ॥ पडतां तुजला बोभायिलें ॥ तेव्हां गजघंटे खालें ॥ त्वां वांचविलें गोविंदा ॥६॥भक्ता पुंडरिकासाठीं ॥ उभें राहुनि भीमातटीं॥ समपद समकर ठेवुनि कटीं ॥ वाळुवंटीं तिष्ठसी ॥ ७ ॥ हिंसक व्याध अगाध जीवांतें ॥ विंधुनि बाणें भक्षी त्यांतें ॥ उद्धरिलें त्वां कमळाकांतें ॥ हें आमुतें जाणवलें ॥८॥ दुर्बळ सुदामा ब्राह्मण ॥ तीन मुष्टी पोहे कण ॥ भक्षुनि संतोषें आपण ॥ सुवर्णनगरी वोपिली ॥९॥ अगणित निजभक्त उद्धरिले ॥ त्याचें परिमित कवणें धरिलें ॥ माझेविषयीं काय झालें ॥ उपेक्षिलें कां देवा ॥१०॥ किंवा कोठें गुंतलासी ॥ किंवा आहेसि दूरदेशीं ॥ किंवा भय वाटे मानसीं ॥ दुर्धर मार्ग न चालवे ॥ ११ ॥ पतीतपावन दीनबंधु ॥ अनाथनाथ करुणासिंधु ॥ ऐसा वर्णितां अगाधु ॥ महिमा बोलीं न बोलवे ॥ १२ ॥ निजानंदें वेदश्रुती ॥ गाती पुराणें गर्जती ॥ नेती नेती शब्दें ह्मणती ॥ सहज पूर्ण निजरंगा ॥ १३ ॥

## पद ५८०. [ चाल—सदर ]

जिवलग बंधु निजभक्त भगवंताचे ॥ध्रु०॥ येर येरां परस्परें ॥ भावें भजती परमादरें ॥ नाहीं त्रिभुवनीं दूसरें ॥ ऐसे सोयरे कोण्ही ॥१॥ एकमेकां गौरविती ॥ तेणें वाढे परम प्रीती ॥ जीव प्राण घेती देती ॥ अंतीं एक एकाचे ॥ २ ॥ मोक्ष लक्ष्मी देउनि भक्त ॥ देवें केले जीवन्मुक्त ॥ भक्त जीवपणीं विरक्त ॥ अनन्य शरणागत झाले ॥ ३ ॥ देव निजांगें निर्गुण ॥ भक्तांकारणें सगुण ॥ होउनि कानीं सांगे खुण ॥ मी काढितों उच्छिष्टें ॥ ४ ॥ त्याचा अनुभव म्हणाल कैसा ॥ तरि तो ज्याचा त्यासचि पुसा ॥ निजानंद रंगों सहसा ॥ नाहीं भेदभावना ॥ ६ ॥

## पद ५८१.

संत दयाळु मोठे गे बाई ॥ध्रु॥॥ परब्रह्म मूर्तिमंत ॥ लीलाविग्रही संत॥

उद्धरिती जीव जंत गे ॥ १ ॥ पाहूनियां कृपादृष्टीं ॥ करिती परमामृतें वृष्टी ॥ निजानंदें भरिती सृष्टी गे ॥ २ ॥ तत्वमसीवाक्येंकरुनी ॥ जन्मांतरिंचां दुःखें हरुनी ॥ देती हातीं रघुवीर धरुनी गे ॥३॥ सर्वांभूतीं भूतदया ॥ सारखीच रंका राया ॥ द्वैतबाद्धि गेली विलया गे ॥ ४॥ सर्व संगीं ते निःसंग ॥ सहजीं सहज पूर्ण रंग ॥ निजानंद अभंग गे ॥ ५ ॥

## पद ५८२.

श्रीहरिचरणीं अनन्य ते धन्य रे ॥धु०॥ अनन्य ते धन्य ॥ ब्रह्मादिकांसी मान्य ॥ पाप पुण्य केलें शून्य रे ॥१॥ देहबुद्धीं नव्हाति विभक्त ॥ ऐक्यरूपें होती भक्त ॥ चर्मदेहीं जीवन्मुक्त रे ॥ २ ॥ अभेद भक्तिबोधें ॥ सिद्धांत शास्त्रशोधें ॥ रंगले निजानंदें रे ॥ ३ ॥

## पद ५८३.

सद्गुरुच्या उपकारा माय ॥ उतराई मी होऊं काय ॥ हृदयीं धरुनि त्याचे पाय ॥ राहों सर्वदां ॥ १ ॥ मज म्यां हरविलें होतें ॥ नव्हतें दिगंताहीपरतें ॥ सांपडलें सद्गुरुच्या हातें ॥ माझें मजपाशीं ॥ २ ॥ परि तें मजला काय होय ॥ ऐसें झालें होतें माय ॥ देहबुद्धिनें अवघें जाय ॥ केलें तें वायां ॥३॥ अवलोकितां कृपादृष्टीं ॥ झाली परमामृतवृष्टीं ॥ निजानंदें भरली सृष्टी ॥ समसाम्यें तेव्हां ॥४॥ अनन्य व्यतिरेकेंवीण ॥ छेदभेद रहीत पूर्ण ॥ जेथें नाहीं गुणागुण ॥ तें माझें मजपाशीं ॥५॥अज्ञानाचा आवरणभंग ॥ होतां सहज पूर्ण रंग ॥ रंगीं रंगुनियां निःसंग ॥ होउनियां ठेला ॥६॥

## पद ५८४.

रामरूपीं जडली प्रीति ॥ राम-मय झाली वृत्ति ॥ अंतर्बाह्य सर्वांभूतिं ॥ रामचि भासे ॥ १ ॥ अशनीं शयनीं भोजनीं पानीं ॥ गमनागमनीं जनीं वनीं ॥ रामरूप नयनीं मनीं ॥ रामचि भासे ॥ २ ॥ जें जें दृश्य पाहों जाय ॥ तें तें रामरूप होय ॥ पाहातें पाहणें तेंही माय ॥ रामचि भासे ॥३॥ मागें पुढें तळीं वरी ॥ रामरूप चराचरीं ॥ सबाह्याभ्यंतरीं ॥ रामचि भासे ॥४॥ दिगंताही परता राम ॥ भासे अवघा पूर्णकाम ॥ मुनिजनमनविश्रामधाम ॥ रामचि भासे ॥ ५ ॥ पाहातां राम निजमूर्ति ॥ रंगीं रंगली स्फूर्ति ॥ नेति नेति शब्दें गाती ॥ वेदश्रुति सर्वदां ॥६॥

## पद ९८५.

मी देह ह्मणवी जो त्यासी ॥ आत्महत्या पापरासी ॥ पदोपदीं निश्चयेंशीं ॥ घडती सर्वदां ॥ १ ॥ अंतर्बाह्य सर्वव्यापी ॥ देहबुद्धिनें त्यासी लोपी ॥ आत्मघातकी तो पापी ॥ अवलोकूं नये ॥ २ ॥ स्वस्वरूपविस्मरणें ॥ अज अव्यया जन्ममरणें ॥ ऐसा हा दुस्तर निस्तरणें ॥ भवसिंधू कैसा ॥३॥ नाहं देही न मे देहो ॥ पूर्ण ब्रह्म तें मी पाहाहो ॥ ऐसा हा अनुभवीं राहो ॥ अनुभव सर्वदां ॥४॥ ब्रह्माहमस्मि-बोधें ॥ रंगलीया निजानंदें ॥ स्वप्नींचीं जैसीं द्वंद्वें ॥ प्रबोधीं मिथ्या ॥ ५ ॥

## पद ९८६.

विश्वपटीं तंतू राम ॥ वेष्टी-समेष्टी राम ॥ व्याप्य व्यापक श्रीराम ॥ स्थूळ सूक्ष्मीं राम ॥ १ ॥ पिंडीं ब्रह्मांडीं राम ॥ पंचभूतीं अवघा राम ॥ जनीं विजनीं श्रीराम ॥ देह विदेह राम ॥२॥ प्रकृति पुरुष दोन्ही राम ॥ सगुण निर्गुण राम ॥ गुणी गुणातीत श्रीराम ॥ अंतर्बाह्य राम ॥३॥ नाना अळंकारीं हेम ॥ तैसा विश्वीं हा श्रीराम ॥ छेद भेद विरहित राम ॥ आदीं अंतीं रामे ॥४॥ सहजीं सहज पूर्णकाम ॥ मुनिजन-विश्रामधाम ॥ रंगातीत निजमूर्ति राम ॥ सर्वहि राम ॥ ५ ॥

## पद ९८७.

सद्गुरु सद्वैद्यराज ॥ पद्महस्ती तेजःपुंज ॥ तत्वमसी सांगे निज गुज ॥ बीजमंत्र कानीं ॥ १ ॥ देउनि विचार ढाळ ॥ वारिला अनित्य मळ ॥ जाहलें अंतर निर्मळ ॥ शुद्ध सत्वात्मक ॥२॥ पूर्ण मात्रा तयावरी ॥ हृदयीं भेदली बरी ॥ स्वधर्म अनुपानें साजिरीं ॥ रूपासी आली ॥३॥ भजनपथ्य नवविध ॥ साधुसमागमें शुद्ध ॥ चालवावें तरीच औषध ॥ करील रूप ॥४॥ निर्वातीं एकांतवास ॥ लौकिकीं असावा त्रास ॥ सद्गुरुच्या भजनीं विश्वास ॥ दृढ निश्चयेंशीं ॥ ५ ॥ भवरोग मग त्रिभुवनीं ॥ न दिसे कल्पांतीं स्वप्नीं ॥ सहज पूर्ण रंग जनिं वनीं ॥ निजानंद होय ॥६॥

## पद ९८८.

कृष्णा रामा गोविंदा नारायणा हरी ॥ अच्युतानंत केशव माधव मुकुंदा मुरारी ॥ध्रु०॥ ऐसीं सहस्र नामें वाचे दीर्घस्वरें उच्चारी॥ तरोनि तारक झाला कोटि कुळांतें उद्धरी ॥१॥ नामें तरले अगणित महा पापी दुराचा-

री ॥ जळचर वनचर खेचर भूचर चराचर नर नारी ॥२॥ नामस्मरणें रंगला तो कळिकाळा आकळी ॥ मुखें रामनाम हातें वाजवावी टाळी ॥३॥

पद ५८९.

श्रीहरी सच्चिदानंदा येरे गोविंदा मुकुंदा ॥ सांडुनि सर्वही मायिक धंदा वंदीन पादारविंदा ॥ ॥धु०॥ नाना साधन करिती त्यांसी सहसा न कळसी हृषिकेशी ॥ दुर्लभ ब्रह्मादिक देवांसी तो तूं गोकुळवासी ॥१॥ संसारार्णव दुस्तर पाहीं तारवेना बाहीं बुडतों डोहीं ॥ धांवुनि येउनि तूं लवलाहीं ॥ लावीं भजनप्रवाहीं ॥२॥ निर्गुणा तूं नित्य निःसंगा मुनिमानसभृंगा अभगा ॥ चित्-उदधी तूं विश्वतरंगा ॥ सहज पूर्ण निजरंगा ॥३॥

पद ५९०.

समपद सुंदर रे इटेवरी ॥ धु० ॥ चंद्रभागातीरीं हस्त कटावरी मदनमनोहर रे ॥१॥ पुंडरीक-वरद भक्तवत्सल ब्रीद गर्जती सुरवरें ॥२॥ त्रिभुवननायक निजसुखदायक रखुमादेवीवर रे ॥३॥ सनक सनंदन ध्याती गाती नारद तुंबर रे ॥४॥ सहज पूर्ण रंग निजानंद अभंग ब्रह्म परात्पर रे ॥५॥

पद ५९१.

हरिविण क्षण तो शणि मना रे ॥धु०॥ हरिरस सुरस सुधारस सांडुनि ॥ सेविसि कां विष वनना रे ॥१॥ सकळ कळा विकळा हरिविरहित ॥ करिसी कां नाना कामना रे ॥२॥ पूर्ण रंग हरि न भजलि तरि तूं ॥ होसी पात्र गमनागमना रे ॥ ३ ॥

पद ५९२.

जाऊं पाहूं भीमातीरविहारी ॥ धु० ॥ मदनमनोहर समपद सुंदर ॥ शंखचक्रपीतांबरधारी ॥ १ ॥ त्रिभुवननायक निजसुखदायक ॥ दीनानाथ स्वभक्तकैवारी ॥ २॥ सहज पूर्णरंग निजानंद अभंग ॥ केवळ भूवैकुंठ पैं पंढरी ॥३॥

पद ५९३. [ काशीराजकृत ]

श्रीरंग रंगा ये रे ये रे ॥ धु० ॥ आवरणभंग करुनियां माझ्या प्रत्यया तूं ये रे ॥ निर्विकार अज शाश्वत सुखमय निजात्मदर्शन दे रे ॥१॥ निजानंद घन ब्रह्म सनातन अधिष्ठाना ने रे ॥ भेदाभेदविवर्जित स्वरुपीं कवळुनि समुळीं घे रे ॥२॥ निजरंगें रंगवुनी माझें मीपण तूंचि हो रे ॥ श्रीरंगानुजतनुज लवणकण चित्-उदधी पावो रे ॥३॥

### पद ५९४.

विरळा या मानवलोकीं भक्तराज तो रे ॥ स्वानंदसदनीं सद्गुरु भजनें राजतो रे ॥ निष्काम योगयुक्त ॥ निरहंकृति जीवन्मुक्त ॥ सहजीं सहज तो रे ॥ ध्रु० ॥ परमामृत सिंधुतनया गुरुभक्ति इंदिरा रे ॥ दैवी गुण घेवुनि आली हृदयमंदिरा रे ॥ परब्रह्मपरायण ॥ नररूपें नारायण ॥ नव्हे मनुज तो रे ॥ १ ॥ गंगा मिळोनी मिळणी नुबगे सागरा रे ॥ शिव होउनि शिव भजती जैशा जळगारा रे ॥ अद्वैतबोधें मन जाहलें चैतन्यघन ॥ तरुचें बीज तो रे ॥२॥ निजरंगें रंगुनि सर्व संगीं अलिप्त रे ॥ प्रकट ना गुप्त आत्मलाभें संतृप्त रे ॥ कर्पूर दीप दोन्हीं नुरवुनि चिद्भुवनीं ॥ निजीं निजतो रे ॥३॥

### पद ५९५.

सच्चिदानंदकंदस्वरुपा श्रीरंगा रे ॥ निर्गुण निर्विकारा मुनिमानसभृंगा रे ॥ अव्यय परात्परा ॥ परिपूर्ण विश्वाधारा ॥ नित्य निःसंगा रे ॥ ध्रु० ॥ कार्यकारणातीता ॥ व्याप्य व्यापका रे सत्य ज्ञानानंता ॥ निज निष्कळंका रे ॥ निर्लेपा श्रुतिसारा ॥ निष्कंपा निराकारा ॥ दीनोद्धारका रे ॥ १ ॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायका रे ॥ श्रीगुरुवर्या निजसौख्यदायका रे ॥ निजानंदरंगा ॥ अक्षयीं अभंगा ॥ अनेकीं एका रे ॥२॥

### पद ५९६.

भूवैकुंठ पंढरी पांडुरंग भीमातिरीं ॥ पुंडरीकें इटेवरी उभा केला समपदीं ॥ ध्रु० ॥ मृत्युलोकीं कलियुगीं कामातुर प्राणी भोगी ॥ ऐसे जीव पांडुरंगीं दर्शनें पावती मोक्ष ॥ १ ॥ साधु संत महामुनी विषयीं विरक्त ज्ञानी ॥ ब्रह्मानंदें संकीर्तनीं गर्जती विठ्ठलनामें ॥ २ ॥ आषाढी कार्तिकी दोन्ही यात्रा भरती विद्वज्जनीं ॥ मृदंगटाळांच्या ध्वनी गर्जताती ठायीं ठायीं ॥३॥ वाळुवंटीं महाद्वारीं हरिदास मंजुस्वरीं ॥ गंधर्व गायनें बरीं नानापरी करिताती ॥४॥ परब्रह्म स्वयंज्योति सिंहासनीं भक्तपती ॥ श्रीविठ्ठल निजमूर्ति पूर्णरंगीं रंगलासे ॥५॥

### पद ५९७.

या रे गडियांनो सोडुनि ममता धरूं हरिशीं समता ॥ भ्रमलों वावुगेंचि भ्रमतां भ्रमतां देहबुद्धीं रमतां ॥ध्रु० ॥ हो जें झालें तें झालें मागें भोगिलें भोगें ॥ लक्ष चौऱ्याशीं संसृतियोगें घेतलीं सोंगें ॥१॥ आतां तुह्मी आह्मी

एक करूंया चित्तीं विवरूंया ॥ भावें श्रीगुरुचे पाय धरुंया भवसिंधु तरुंया ॥२॥ मिथ्या मोहपाशीं गुंतुनि ठेलों होतों वायां गेलों ॥ कांहीं सत्संगें सावध केलों तरी सन्मुख झालों ॥३॥ नेणों जन्मार्जित बरवें होतें तरि आमुच्या चित्तें ॥ ऐसा कृतनिश्चय केला येथें पाहूं श्री गुरुतें ॥४॥ सहज निजरंगें रंगुनि राहूं अवघा हरि पाहूं ॥ पाहातें पाहाणेंहि दोन्ही वाहूं आपण आपणा लाहूं ॥५॥

## पद ५९८.

बोलणें फोल झालें डोलणें वायां गेलें ॥ ध्रु० ॥ श्रवणीं दावी अष्टहि भावें ॥ ह्मणे मृगजळवत् हें वाव ॥ कवडी वेंचितां हा जीव ॥ तळमळ करि स्वधर्मी ॥१॥ चित्तीं विषयांचा अभिलाष ॥ नाहीं विश्रांतिचा लेश ॥ मुखें ह्मणे निर्विशेष ॥ परब्रह्म संचलें ॥२॥ परोपदेशीं पूर्ण ज्ञानी ॥ मोह ममता मत्सर मनीं ॥ नागसरें जैसा फणी ॥ डोले परी विष वदनीं ॥३॥ शब्दें ब्रह्म कोण झालें ॥ अन्न ह्मणतां कोण धालें ॥ शिकविलें तैसें बोले ॥ शुकपक्षी जैसा ॥४॥ शिकला विद्या कळा छंद ॥ नाहीं अंतरीं निर्द्वंद्व ॥ सहज पूर्ण निजानंद ॥ सर्व रंगीं न पाहे ॥५॥

## पद ५९९.

कर्म बळिवान्मुनयो वदंति ॥ ध्रु० ॥ राम सीता लक्ष्मण ॥ पाहातां केवळ ब्रह्म पूर्ण ॥ तेही वनवासीं सुवर्ण ॥ मृगें मोहिले कैसें ॥ १ ॥ ऋषी छळितां यादवगणीं ॥ भालुकातीर्थी पडले रणीं ॥ कृष्ण नाटकी विंदाणीं ॥ व्याधें बाणीं विंधिला ॥२॥ धर्म अर्जुन पंडूपुत्र ॥ श्रीकृष्णाचे परम मित्र ॥ त्यांनीं वनवासीं विचित्र ॥ नाना कष्ट भोगिले ॥३॥ हरिश्चंद्र तारा राणी ॥ डोंबाघरीं वाहे पाणी ॥ नळा दमयंतीची काहाणी ॥ जे पुराणीं गर्जती ॥४॥ ब्रह्म निर्विकार निर्गुण ॥ तेथें होतां अहं स्फुरण ॥ पडिलें मायेचें आवरण ॥ जीवदशा पातली ॥५॥ कर्मणो गहना गती ॥ स्वमुखें बोले हें श्रीपती ॥ कर्ममोचनाची युक्ती ॥ ते अनुभवी जाणती ॥६॥ कर्म तेंचि पूर्ण ब्रह्म ॥ सद्गुरुकृपेचें हें वर्म ॥ निजानंदीं धर्माधर्म ॥ नाहीं तरंग जळन्यायें ॥७॥

## पद ६००. [ आ. स्वा. कृ.

तुझीं नामें पतितांसीं पावन करिति ॥ ध्रु० ॥ श्रीहरि श्रीधर मधुसूदना ॥ हृषिकेशा जनार्दना ॥ नरहरी उपेंद्रा वामना ॥ आनंदघना निज-

मूर्ति ॥१॥ अच्युतानंत पुरुषोत्तमा ॥ पंकजनाभा त्रिविक्रमा ॥ अधोक्षजा मेघःशामा ॥ अवाप्तकामा गोपाळा ॥२॥ प्रद्युम्ना श्रीवासुदेवा ॥ संकर्षणा रमाधवा ॥ विष्णु अनिरुद्धा केशवा ॥ करुणार्णवा गोविंदा ॥३॥ कृष्णा रामा नारायणा ॥ दामोदरा दीनोद्धरणा ॥ पूर्णरंगा भवभयहरणा ॥ रुक्मिणीरमणा विठोबा ॥४॥

## पद ६०१. आ क्र.

निजमूर्ति तुझीं विमळ नामें भक्तजन प्रेमें वदत वदनीं ॥ सर्व कर्मे हरिनाम मंत्रें बरीं शोभती निजसुखें ब्रह्मसदनीं ॥ ध्रु० ॥ अच्युता श्रीधरा कृष्ण दामोदरा माधवा वामना मधुसूदना ॥ हाचि जिव्हे करूं जप जिवा उद्धरुं भक्तिभावें वरूं संकर्षणा ॥ १ ॥ अनिरुद्ध हृषिकेश उपेंद्र प्रद्युम्न पद्मनाभा विष्णु पुरुषोत्तमा ॥ गोविंद वैखरी गर्जतां नरहरी पळत दुरितें दुरी त्रिविक्रमा ॥२॥ लक्ष्मीनारायणा अधोक्षजा वामना वासुदेवा जनार्दना केशवा ॥ पूर्णरंगा तुझें नाम राहो मुखीं हेंचि देई मला स्मरणसेवा ॥३॥

## पद ६०२.

दावीं वो पाउलें राम निजमूर्ति ॥ न वदवे मम मुखें विमळ कीर्ति ॥ध्रु०॥ पावलों बहुतरें जन्मजन्मांतरें बुडविलें भवपुरें या आवर्ती ॥१॥ दृष्टि पडली उपादान नेणोनियां नामरुपीं मृषामयविवर्ति ॥२॥ अहं मम भंगवीं निजसुखें रंगवीं देउनी सच्चिदानंदस्फूर्ति ॥३॥

## पद ६०३.

अहं देही अनुभव तो आत्मघातकी ॥ विचारितां पदोपदीं महा पातकी ॥ १ ॥ अहं ब्रह्म अनुभव तो ब्रह्मरूप रे ॥ ज्ञानाग्नि दग्ध करी सर्व पाप रे ॥ २ ॥ दीपसंगें कर्पूराची काजळी नुरे ॥ अहंब्रह्मस्फुरण तेंही सर्वथा विरे ॥३॥ सहजीं सहज पूर्ण निजानंद रंगला ॥ हेत मात दृष्टांतर्भाव भंगला ॥ ४ ॥

## पद ६०४.

सदय हृदय ते नरहरीदास ॥ जे सर्वदां विषयीं उदास ॥ध्रु०॥ जाणुनियां एकमेव सर्वभूतीं भगवद्भाव ॥ द्वैतबुद्धीं न धरिती मोहमदास ॥१॥ त्रिभुवनीं पाहतां पाहीं बैसावया ठाव नाहीं ॥ सत्संगतीं सुख मोठें वाटे अभेदास ॥२॥ रंगुनियां सहज रंगीं निःसंग जे सर्व संगीं ॥ पावले जे पूर्ण निजानंदपदास ॥ ३ ॥

### पद ६०५.

हा मज दृढ भरंवसा निगमाचार्यवचनेंकरुनी ॥ वोंगळूनि जाईन मी त्याच्या एका नामावरुनी ॥ ध्रु० ॥ भक्तवत्सल भक्ताधीन दीनानाथ दीनबंधू ॥ भयकृद्भयनाशक पतितपावन करुणासिंधू ॥ १ ॥ दुस्तर भवसागर जेणें मृगजळवत् मज केला ॥ स्मरणें संकट हरितो हरि तो भक्तीचा भुकेला ॥२॥ कृष्ण विष्णु गोविंद हरि नारायण स्मरतां नामें ॥ निजरंग रंगविला माझा अवाप्तकामें रामें ॥ ३ ॥

### पद ६०६.

हें एकांतींचें गुज सद्गुरुकृपें कळलें वर्म ॥ अन्य साधनें न पडे ठायीं नेणें त्याचें कर्म ॥ध्रु०॥ चोज एक वितलें सखिये तें मी सांगों काई ॥ सादर परिसें श्रवणीं वनांत सिंह चारित गाई ॥ पुत्र जन्मला आधीं मग जन्मली त्याची आई ॥ अनन्य भावें लागे जेथें शिष्य गुरुचे पायीं ॥ १ ॥ आधीं पान पाठीं मूळ या वृक्षाचें झालें ॥ प्रथमचि फळ मग त्याहुनि त्याचे मागुनि पुष्प निघालें ॥ गजासि मारित मार्जार पांगुळ गिरिशिखरावरि गेलें ॥ वनांत मीन व्याला त्याला पाहावया जन आले ॥ २ ॥ पायाळ पाताळिंचें देखे जरि तो अंजन ल्याला ॥ निधान येतां हाता स्वयें निधान होउनि ठेला ॥ समरंगणिं तो शूर युद्ध करितां मरोनि ज्याला ॥ निजरंगें रंगुनि सुज्ञावें शरण रिघावें त्याला ॥ ३ ॥

### पद ६०७.

पतीतपावना ॥ध्रु०॥ पतीतपावन नाम तुझें ऐकुनियां मी श्रवणीं ॥ शरण आलों श्रीरंगा आतां तारीं तूं निर्वाणीं ॥ भक्तकामकल्पद्रुम तुजला म्हणती वेदपुराणीं ॥ तरि तू साच करुनियां दावीं पाहू येच क्षणीं ॥ १ ॥ सर्वांशीं अपराधी मी अन्यायी महा दोषी ॥ कामी क्रोधी लोभी रागद्वेषी अविश्वासी ॥ दांभिक मिथ्यावादी निंदक संकल्पाची राशी ॥ ऐसी हे सामग्री करुनि आलों पायांपाशीं ॥२॥ दुष्ट दुराचारी दुर्जन चंचळ मळीन भारी ॥ संशयाची खाणी भेदवादी मी अविचारी ॥ परदोषदर्शनीं अखंड चित्त विषयविहारी ॥ कुटीळ कपटी तस्कर ऐसा आहें सर्वांपरी ॥ ३ ॥ व्याध अजामिळ गणिका वाल्मिक उद्धरिले त्वां मागें ॥ त्याहुनि काय उणा मी तुजला नकळे कां हें सांगें ॥ पतीतपावन ब्रीदें साच करिसी

---

१. पाठभेद—शरणागत प्रतिपालक पतीतपावन करुणासिंधू ।

तूं निजांगें ॥ म्हणवुनि शरण आलों वेगीं तारावें श्रीरंगें ॥४॥ सहज पूर्ण निज रंगा तूं निःसंगा निर्विकारा ॥ दीनबंधू दयासिंधू देवा श्रुतिसारा ॥ भवगजपंचानना पूर्णकामा विजनविहारा ॥ तारीं भवसागरीं करुणाकरा परात्परा ॥ ५ ॥

## पद ६०८.

माते तूं जरि मजवरी उदास तरि म्यां कवणावरी रुसावें ॥ आर्त माझे मनिंचें मग वो कवणें हें पुरवावें ॥ध्रु०॥ चकोरासी तृप्ती एका चंद्रामृतपानें ॥ चातकासी तृप्ति एका मेघाच्या जीवनें ॥ दाध मधु पय घृत मानुनि तृणवत् उदकीं वास मीनें ॥ करणें हा कृतनिश्चय इतुका जाणें पूर्ण मनें ॥१॥ मंगळसूत्रेंविण वधु नाना अळंकार ल्याली ॥ तितुके सर्व निरर्थक तैसी गति हे मजला झाली ॥ पतिव्रता पतिशेज उपेक्षुनि परपुरुषाशीं रतली ॥ तरि ते व्यभिचारिण जाणावी तैसी गति मज गमली ॥२॥ आतां मज उद्धरिं सत्वर जननी कृपांगें ॥ भक्तवत्सले दीनदयाळे येउनियां तूं वेगें ॥ वोसंगा घेउनि स्तन देई मजला तूं निजांगें ॥ अक्षय निजसुख देउनि जिववीं निववां पूर्ण रंगें ॥ ३ ॥

## पद ६०९.

गुरुभजनीं उन्मन मन दिन रजनीं ॥ध्रु०॥ गुरुदास्यें गुरुदास गुरुरूप ॥ सजनीं हो कां विजनीं ॥ १ ॥ वोळंगताती चतुर्विध मुक्ती ॥ भावें श्रीगुरुपुजनीं ॥२॥ निजरंगें गुरुभक्त रंगले ॥ भेदाभेद-वना त्यजुनी ॥३॥

## पद ६१०.

धन्य धन्य ते शिवभक्त ॥ जगदुद्धारी जीवन्मुक्त ॥ ध्रु० ॥ शिव पुजुनि शिव झाले ॥ शिवभजनें नित्य निमाले ॥ १ ॥ शिवसागर भक्त गंगा ॥ ऐक्य सहजें शिवलिंगा ॥ २ ॥ शिवभक्त निजानंदें ॥ रगीं रंगले स्वच्छंदें ॥३॥

## पद ६११.

मला काय उणें वो ॥ कोठें न माय मी माझ्या पूर्णपणें वो ॥ ध्रु०॥ जिकडे तिकडे वो मूर्तिमंत रोकडें हो ॥ ठाव नाहीं रिता कोठें मागें पुढें वो ॥१॥ जळीं स्थळीं वो मीचि भूमंडळीं वो ॥ एक सत्ता आली हातां निजमूठीं वो ॥२॥ क्षयाक्षयातीत वो सत्य सदोदीत वो ॥ स्वसंवेद्य ठेवा माझा अपरंमित वो ॥३॥ सर्वरहीत वो सर्वसहित वो ॥ अन्वयव्यतिरेके-

विण वेदविहित वो ॥४॥ निजानंदकंद वो नित्य निर्द्वंद्व वो ॥ सर्व रंगीं रंगुनियां स्वच्छंदें वो ॥ ५ ॥

पद ६१२. [ काशीराजकृत ]

ऐसें कैसें हें बाळ ॥ असोंदे यशोदे तुझें बोलणें मायाजाळ ॥ ध्रु० ॥ कडे घेतां हृदयीं जडतो हृदयाच्या ग्रंथी सोडीतो ॥ धरुनी हातीं माझे कुच कंदुक म्हणतो टवाळ ॥ १ ॥ येउनि निजभुवनास केला गोरसाचा नाश ॥ धरूं जातां ब्रह्मादिकां सांपडेना चक्रचाळ ॥ २ ॥ अबळा बाळा सुंदरी भोगुनी बाळब्रह्मचारी ॥ बोलों जातां वैखरी लज्जाही न धरी कुटा-ळ ॥३॥ आतां आम्ही परनारी संसारी लोकाचारी ॥ बोलों जातां घरा-घरीं म्हणती झाल्या तोंडाळ ॥४॥ श्रीरंगानुज-आत्मजानें मनिंचे मनीं रा-हावें मौनें ॥ सहज पूर्ण निजानंदें रंगुनियां सर्वकाळ ॥ ५ ॥

पद ६१३. [ काशीराजकृत ]

माझा बाळ त्यावरि आला लटिका आळ वो ॥ दिनकर किरणावरी भासतें जैसें मृगजळ वो ॥ ध्रु० ॥ अगाई कृष्णाचे अंगीं कर्में लाविती ॥ कांहीं नसतां जैसी निळीमा नभीं भाविती ॥ १ ॥ उडी घालिति स्वानंदें गोपी पातल्या ॥ जन हे त्रिगुणात्मक बोलते कृष्णीं रातल्या ॥२॥ नाहीं भोगणें त्यागणें धर्माधर्म वो ॥ नाना प्रकारें बोलती त्याचें वर्म वो ॥ २ ॥ जैसी भावना तैसीं फळें पावती वो ॥ लोहचुंबक-न्यायें चित्सत्तेवरी धांव-ती वो ॥४॥ लीलाचरित्र जगदुद्धारास्तव हें केलें वो ॥ श्रीरंगानुजतनुजा सकळही विदित झालें वो ॥५॥

पद ६१४. [ चाल—सदर ]

ये आई राधा मजवरी बालंट घेते पाहा गे ॥ ध्रु० ॥ जाणणें नेणणें कांहीं दोन्हीं माझे ठायीं नाहीं ॥ मी अलांछन निष्कळंक पाहीं गे ॥१॥ अवस्थातीत मी बाळ पूर्णदशा सर्वकाळ ॥ आला तुजवरी म्हणती आळ गे ॥२॥ भोक्ता होउनि भोग भोगीं ॥ त्यागी होउनि विषय त्यागी ॥ दोन्हीं नाहीं माझ्या अंगीं गे ॥३॥ ज्या ज्या जैशा भावें भजती त्यां त्यां तैसी फळप्राप्ती ॥ सर्वांतरसाक्षी मी निजमूर्ति गे ॥ ४ ॥ रज्जुवरि सर्पाचें भान म्हणती विवर्त उपादान ॥ परि तो झाला नाहीं आन गे ॥ ५ ॥ सहज पूर्ण निजरंग अद्वय अक्रिय अभंग ॥ नसतें मजवरी घेती आंग गे ॥६॥ असतांही वर्णाश्रमधर्मीं नातळे या गुणग्रामीं ॥ श्रीरंगानुजात्मज स्वामी गे ॥७॥

पद ६१५. [ चा. सदर ]

वेडें कां झालें मन न पाहेचि परतोन ॥ स्वस्वरुपीं अजुनि ह्मणुनी सांगणें यासी ॥ ध्रु० ॥ धरुनी देहाभिमान करितें विषयांचें ध्यान ॥ क्लेशी होतें म्हणउनि सांगणें यासी ॥१॥ दुःखरूप मृषामय देहादि भुवनत्रय ॥ हा दुर्विषय म्हणुनी सांगणें यासी ॥ २ ॥ यासि हाचि तरणोपाय धरावे श्रीगुरुपाय ॥ निजानंद होय म्हणुनी सांगणें यासी ॥ ३ ॥ पूर्णरंगें रंगुनी सावध व्हावें मनीं ॥ श्रीरंगानुजतनुजें म्हणुनी सांगणें यासी ॥४॥

पद ६१६.

सावध होईं वेगीं तूं मना ॥ सांडीं दुःखरूप कामना ॥ ध्रु० ॥ मनुजा मी माझें मानितोसी साच रे ॥ परि हें मृगजळ आहाच रे ॥ गुंतुनीयां विषयभोगीं रातला करिती यमदूत त्या जाच रे ॥ १ ॥ पाहतां सर्वही संसार हा क्षणिक रे ॥ वायां वाढविसी शोक रे ॥ अंतीं तुझीं तुज होती पारखीं सेखीं भोगविती नरक रे ॥ २ ॥ उज्ञनि सांडीं मायामोहसंग ॥ सेवीं स्वसुख अभंग रे ॥ मिथ्या स्वप्नवत् सर्व मानुनि पूर्ण निजानंदें रंग रे ॥ ३ ॥

पद ६१७.

अंतरीं ध्यावा श्रीहरि सप्रेमें गावा ॥ ध्रु० ॥ दोषदहन करी नाम जपावें तो हरि नयनीं पाहावा ॥१॥ नवविध भजन निरंतर तत्पर प्राणप्रिय हरि व्हावा ॥२॥ श्रवण मनन निजध्यास विचारें गुरुमुखें उमजावा ॥३॥ दैवी संपाति यजुनि प्रयत्नें ॥ आसुरी समूह त्यजावा ॥४॥ सत्संगें निजरंगप्रभावें ॥ दूरि करुनि देहभावा ॥५॥

पद ६१८.

संकट वारिल हा श्रीहरी ॥ ध्रु० ॥ संकट वारिल षड्रिपु मारील ॥ भवनिधि तारील हा ॥१॥ पतित मी परि पावन श्रीहरि ॥ पूर्ण स्विकारील हा ॥२॥ निजराज्यपदीं मज बैसवुनि वरि ॥ छत्र उभारील हा ॥३॥ हा निजरंग निःसंग निरामय ॥ चिद्रस चारील हा ॥४॥

पद ६१९

माझा कैवारी हरि तं ॥ ध्रु० ॥ भक्तकामकल्पद्रुम ऐसें गर्जति अटरा चारी ॥ अष्टदिशा तुजविण मज उद्गस कोण संकटीं तारी ॥ १ ॥ जीवन जळ सकळांचे परि तो मीन जसा अधिकारी ॥ दधि मधु पय घृत मानुनी

तृणवत् उदकीं होय विहारी ॥ २ ॥ तापत्रयसंतापें तापें छळिलों या संसारीं ॥ हृदयीं रंग पूर्ण निजानंदें तूं झडकरी ॥३॥

### पद ६२०. [ काशीबाअण्णा कृत. ]

शिव शिव शिव शिव आतां मी ऐसें न करीं न करीं ॥ ध्रु० ॥ पुनरपि जन्म जरा मरणें ॥ पुनरपि जननीजठरां भरणें ॥ पुनरपि नानारूपें धरणें ॥ करणें दुष्कर्माचारी ॥१॥ अंतर्बाह्य एक रूप ॥ तेंही नाहीं अल्पस्वल्प ॥ अवघा संकल्प विकल्प ॥ मिथ्या वाद चावुटी ॥२॥ नाहीं विरक्तीचा लेश ॥ मिथ्या मिरवी बाह्य वेष ॥ विषय भोगितां संतोष ॥ राग द्वेष अंतरीं॥ ३ ॥ टाकुनि स्वात्मसुखामृतसिंधू ॥ सेवी विषयाचा विषबिंदु ॥ आत्मघातकी मतिमंदु ॥ जड मूढ प्राणी संसारी ॥४॥ याचें गुणदोषदर्शन ॥ होतां पश्चात्ताप जाण ॥ श्रीरंगानुजात्मज पूर्ण ॥ निजानंदें रंगला ॥५॥

### पद ६२१.

लाहें लाहें हरिनाम गा ॥ सांडुनि विषय काम गा ॥ ध्रु०॥ नामरुपातीत ब्रह्म सदोदित केवळ निजसुखधाम गा ॥१॥ नित्य निरंजन सज्जनरंजन मुनिजनमनविश्राम गा ॥ २ ॥ नाममंत्र स्वतंत्र षडक्षरी निजमूर्ति राम गा ॥ ३ ॥

### पद ६२२.

ऐसा गुरुभक्त जीवन्मुक्त क्वचित् लोकीं ॥ निगम स्तवितां कीर्ति आनंद मूर्तिमंत तो कीं ॥ध्रु०॥ तनु मन धन प्राण करुनि अर्पण गुरुचरणीं ॥ भजन भाग्य भोगी हृदय नित्य गुरुस्मरणीं ॥ १ ॥ विश्वनगीं देखे चित्सुवर्ण गुरु स्वामी ॥ आदि अंत ओतप्रोत सबाह्यांतर्यामीं ॥ २ ॥ अगणित गुण पूर्ण वर्णूं काय सविस्तर ते ॥ सद्गुरुभजनयोगें ज्यांच्या डोलति प्रस्तर ते ॥३॥ गुरुभक्तिचे घरीं मुक्ति वोळंगती दासी ॥ हा दृढ विश्वास तया वोळंगती काशी ॥४॥ दीपें दीप लागति तेथें ज्येष्ठ कनिष्ठ नाहीं ॥ गुरुपदीं रंगले जे गुरुरूप तेही ॥ ५ ॥

### पद ६२३.

कां रे नोळखसी नोळखसी ॥ तुझें तुजपाशीं ॥ध्रु ॥ मृग नाभीं कस्तुरी असुनी हिंडे वनांतरीं ॥ १ ॥ स्वप्नीं राजा रंक झाला न सोडितां पर्यंक ॥२॥ होतां आवरणभंग सहजीं सहज पूर्ण निजरंग ॥ ३ ॥

पद ६२४. [ आ. स्वा. कृत. चाल—संतपदांची जोड दे हरी. ]

दीनांचा साहाकारी ॥ हरी हा ॥ ध्रु० ॥ श्रुतिस्मृतिकारक पतितोद्धारक गर्जति अठरा चारी ॥ १ ॥ जाणिव नासुनि जाणे जो निश्चित पावे तो परपारीं ॥ २ ॥ पूर्ण रंग परि भक्तजनास्तव लीलाविग्रहधारी ॥ ३ ॥

पद ६२५.

पुंडरिका वर कांहीं माग रे ॥ अपेक्षित जें मनिंचें आपुल्या तें तूं मजला सांग रे ॥ध्रु०॥ देईन पृथ्वीतळिंचें वैभव स्वर्गादिकही भोग रे ॥ भोगीं यावच्चंद्रदिवाकर देतों मी श्रीरंग रे ॥ १ ॥ टाकुनि आलों गोकुळ गोवळ वृंदावन यमुनाहि रे ॥ अभिष्ट पुरविन काय उणें मज मागें तूं लवलाहिं रे ॥२॥ घेई मुक्ति चारी या कामारी करुनि ठेवीं रे ॥ निरतिशय परमामृत शाश्वत निजसुख रंगें सेवीं रे ॥ ३ ॥

पद ६२६.

विठोबा मागेन हा वर देई रे ॥ आणिक न मागे कांहीं रे ॥ध्रु०॥ तृणवत् त्रिभुवनिंचेंही वैभव नलगे मुक्ति आम्हांसी रे ॥ भजन भाग्य हें सगुणीं जोडे मोक्ष उभा त्यापाशीं रे ॥१॥ सुकृतहीनें अति दीनें जीं अज्ञानें केवळ मूढें रे ॥ दर्शनमात्रें मोक्ष तयांसी द्यावा गरुडारूढें रे ॥ २ ॥ भूवैकुंठ करावें येथें दीनानाथें आतां रे ॥ सहज पूर्ण निजरंगा तूं निःसंगा रुक्मिणिकांता रे ॥ ३ ॥

पद ६२७.

गुरु निर्मळा गुरु निष्कळा सकळ कळातीत तुझी आकळ लीला रे ॥ध्रु०॥ परब्रह्म पुतळा येउनियां भूतळा प्रबोधुनि खळा नेसी निज मूळा रे ॥१॥ अमळ चरण कमळदळामाजि अमृत भ्रमरकुळा सेवितां होय सुखसोहळा रे ॥२॥ रत्नावरि कीळा कर्पूर परिमळा ॥ निज रंगें रंग जैसी गोडि गुळा रे ॥ ३ ॥

पद ६२८.

हा विसरों कसा हृषिकेशी ॥ व्याप्य व्यापक हृदय निवासी ॥ध्रु०॥ मन बुद्धि चित्त अहंता ॥ यांचा द्योतक सर्व नियंता ॥ १ ॥ स्मरण विस्मरण दोहिंचा साक्षी ॥ यासि विसरोनि कोण उपेक्षी ॥ २ ॥ सहज पूर्ण अभंग रंग ॥ निजानंद नित्य निःसंग ॥ ३ ॥

## पद ६२९.

कोण्ही वंदुं कोण्ही निंदुं ॥ भावें भजावा गोविंदु ॥ध्रु०॥ नंदानंदन मुकुंदु ॥ मना लागो त्याचा छंदु ॥१॥ निर्विकल्पतरुचा कंदु ॥ यासी नेणति ते बुद्धिमंदु ॥ २ ॥ सत्य शाश्वत नित्य निर्द्वंद्वु ॥ रंगीं रंगला निजानंदु ॥ ३ ॥

## पद ६३०.

निजानंदें विचरों स्वच्छंदें निर्द्वंद्वें ॥ध्रु० ॥ ब्रह्मपुरींचे ब्राह्मण आह्मी ब्रह्मरूप वर्णाश्रमधर्मी ॥ नित्य मुक्त या कर्माकर्मी नातळतों षडूर्मी ॥ १ ॥ अवाप्तकामीं निजसुखधामीं निजभजनाची भिक्षा मागों ॥ संचित सरलें ह्मणवुनि आलों संतांपाशीं सांगों ॥२॥ सदां शुचिष्मंत संत स्वस्वरूपीं शुद्ध बुद्ध ॥ सहज पूर्ण निजरंग रंगला जनिं वनीं प्रसिद्ध ॥ ३ ॥

## पद ६३१.

गोकुळ हें आमुचें गोपाळें रक्षिलें ॥ ध्रु० ॥ भयकुद्भयनाशक दावाग्नीप्राशनकर्ता ॥ अभक्त निंदक दुर्जय दानवकुळ-संहर्ता ॥ कैठभारि हा गोवर्धनगिरिधर्ता ॥ ब्रह्मादिकही नेणति याची वार्ता ॥ १ ॥ गोवळवत्सें त्या विरंचीनें नेलीं ॥ तेव्हां त्यांसारिखीं नूतन केलीं ॥ ऐक्यभावें समसाम्यें समरस झालीं ॥ नकळे कवणाचीं हीं आलीं गेलीं ॥२॥ परात्परतरवर निर्गुण निर्विकारी ॥ उतरी नरनारी परपारीं पूतनारी ॥ यमुनातीरविहारी गोवळवत्सें चारी ॥ वाजवुनि मोहरी मन मोहरी हा मुरारी ॥३॥ नंदनंदन कंसनिकंदन हा हृषिकेशी ॥ पूर्ण ब्रह्म अवतरला यादववंशी ॥ हा निजभक्तकामकल्पद्रुम चिद्विलासी ॥ निजानंद रंगला हृदयनिवासी ॥४॥

## पद ६३२.

तड तड तड तोडुनि टाकीं ॥ तड तड तड तोडुनि टाकीं ॥ ध्रु० ॥ माया-मैंदिणीचा गळफांस न तुटे ब्रह्मादिकीं ॥ १ ॥ आशापाशीं गुंतलेंसी व्यसनीं पडली नाकीं ॥२॥ निजरंगें रंगें तूं सावध होईं नेत्र न झांकीं ॥३॥

## पद ६३३.

अउळे माझे कृष्णाबाई तूं येईं गे ॥ ध्रु० ॥ पूर्ण ब्रह्म परात्परे निर्विकारे निराकारे ॥ अजरे अमरे निगमागमसारे ॥१॥ कमळलोचने कमळाकरे जगदुद्धारे विश्वंभरे ॥ दामोदरे गुणगंभीरे गे ॥२॥ सुंदरे श्रीधरे ॥ निर्विचारे सर्वाधारे ॥ सुरवरवरदे इंदिरावरे गे ॥३॥ नंदकुमारे कुंजविहारे परम

उदारे मनोहरे ॥ सुकुमारे पूर्णावतारे गे ॥ ४ ॥ निर्गुण निःसंगे सहज पूर्ण अभंगें ॥ निजानंद शाश्वत रंगे गे ॥ ५ ॥

## पद ६३४. [ आत्यारामीकृत ]

कामाचे मजूर आपपर जाणे काय रे ॥ध्रु०॥ किती माथां घेईल वोझें किती ह्मणेल माझें माझें ॥ विषयविलासी झाले कैंचा बाप कैंची माय रे ॥१॥ कामीं नाहीं उसंत रे क्षणभरी नव्हे संत रे ॥ हरिगुरुभजनेंविण निरर्थक दुर्लभ नरतनु जाय रे ॥ २ ॥ पश्चात्ताप कांहीं रे स्वप्नीं तिळभरि नाहीं रे ॥ पूर्ण रंगें रंगावें हा नेणे अभिप्राय रे ॥ ३ ॥

## पद ६३५.

श्रीगुरु स्वामी सर्वस्वेंशीं अपराधी मी ॥ध्रु०॥ तुजशीं विमुख होउनियां सुख विषयांचिया गुणग्रामीं ॥ सेवुनि आपला आपण वैरी झालों गुंतुनि कामीं ॥१॥ दुःखमूळ आघती तें सुख सेवुनि म्हणवी पराक्रमी ॥ विषवत् विषय पीयूषवत् मानुनी इच्छित फळ परिणामीं ॥२॥ शरण आल्या लोहस्पर्शमणी तें शोभे हेम ललामीं ॥ निजरंगें रंगावें तैसें सबाह्य-अंतर्यामीं ॥३॥

## पद ६३६.

करील तें काय नव्हे राघव ॥ ध्रु० ॥ जेणें पाण्याचे पुतळे करुनी ऐकवितो दाखवितो रे ॥ तोचि कर्ता तोचि अकर्ता मूढ मीपण धरितो ॥१॥ एका जीववी दुग्धें एका स्मरणें एका दृष्टीं रे ॥ एका पाषाणीं पुरवी साखर एका जीववी वृष्टीं ॥ २ ॥ वातांबु पर्णाशिनें ॥ एका अन्नें मुक्ता फळीं एका हरलें खदिरांगारें रे ॥ निजानंदें एक रंगुनि ठेले केलीं तृणचरें रे ॥ ३ ॥

## पद ६३७.

भगवत्स्मरण करा जी भजनीं भाव धरा जी ॥ ध्रु० ॥ दुर्लभ नरतनुचें आयुष्य पळ पळ निष्फळ जातें ॥ हरिस्मरणेंविण सर्व निरर्थक केलें तितुकें होतें ॥१॥ धन सुत दार परिग्रह हे तों नयेति कामा कोणी ॥ देखत अंध ऐकत बधिर होउनि कां जी श्रवणीं ॥२॥ विद्या कळा विक्रम वैभव नामरुप इहलोकीं ॥ क्षणभंगुर जड दृश्य विकारी जड मूढ जन न विलोकी ॥३॥ विस्मरणें संसरणें जन्म मरणें भोगिती प्राणी ॥ स्मरणें भवनिधी तरणें वरणें चिन्मयपद निर्वाणीं ॥४॥ सहज पूर्ण निजरंग रंगतो संग भगवत्स्मरणें ॥ प्रार्थितसों ह्मणवुनियां काया वाचा अंतःकरणें ॥५॥

### पद ६३८.

सावधान रे ॥ ध्रु० ॥ वाक्य सुधारस पान हें मना दुर्घट हा संसार ॥ हरि स्मर ॥ दुस्तर या रे भवाब्धिचा केवीं पावसी तूं पर पार ॥ इह पर-त्रींचे साजणें क्षणभंगुर दुःख अपार विषकंदां परि गोड हा वर्म जाणे वीर झुंझार ॥ हरी स्मर ॥१॥ इंद्रिय वर्ग संसर्ग रे यांचा संग सुखावह काय ॥ अंजुळिंचें जळ यापरि अति चंचळ आयुष्य जाय ॥ स्वार्थकर देह संबंधि-यांचा लोभ तो परम अपाय ॥ दीनबंधु गुरुराय रे धरि धरि पाय हा सार उपाय ॥२॥सर्वज्ञ दयासिंधू हा याचा सांप्रदाय शुद्ध ज्ञान ॥ साधनयुद्ध स्वभक्ती रे उपदेशुनि निरसी अज्ञान सत्यज्ञानानंत अक्षयी तुज होईल पूर्ण विज्ञान ॥ रंगें रंगें यांचे चरणी निजानंद हा करुणा निधान ॥ ३ ॥

### पद ६३९. ( दत्तपंचक. )

चित्सूर्योदय जाहला भवनिशी नासूनियां द्वैत हो ॥ लीलाविग्रह पूर्ण ब्रह्म परमात्मा श्रीगुरूदत्तहो ॥ गेले कल्प असंख्य होउनि तिन्हीं नेणेचि माया मया ॥ साष्टांगें प्रणिपात हा करित मी त्या देव दत्तात्रया ॥१॥ ब्रह्माविष्णुसदाशिवात्मक त्रिधा ऐक्यासि आला असे ॥ नोहे गोचर दृश्य दृष्टिसि कदां जो ज्ञान लक्षी दिसे ॥ तो हा चिद्रुप संचला गुरुरुपें दीना-सि तारावया ॥ साष्टांगें प्रणिपात हा करित मी त्या देव दत्तात्रया ॥२॥ झाला सद्गुरु देव दत्त ह्मणती सद्भक्त ज्ञानी मनीं ॥ साधु संत उपासिती दिननिशीं सच्छिष्य भावें मनीं ॥ होतां दर्शन पाप ताप निरशी सायुज्य देऊनियां ॥ साष्टांगें प्रणिपात हा करित मी त्या देव दत्तात्रया ॥ ३ ॥ भिक्षेचें स्थळ योजिलें करविरीं निद्रेसि मातापुरी ॥ स्नानालागिं करी त्वरा शिवपुरीं भागीरथीचे तिरीं ॥ ऐसा हा अवतार तारक भवाब्धीमाजि तारा-वया ॥ साष्टांगें प्रणिपात हा करित मी त्या देव दत्तात्रया ॥ ४ ॥ ज्याचें ध्यान मनीं प्रबोधसमयीं सूर्योदयीं ज्या घडे ॥ भावें नाम पठे निरंतर मुखें तो मुक्ति माथां चढे ॥ पूर्णानंदपदीं रमे निजसुखें व्यापोनि लोकत्रया ॥ साष्टांगें प्रणिपात हा करित मी त्या देव दत्तात्रया ॥ ५ ॥

### पद ६४०. [ राग भूप ]

दयासिंधु हरी दीनबंधु रामा पूर्णकामा ॥ ध्रु० ॥ हरुनि जन्ममरण-त्रपा ॥ करुनि मजवरी कृपा ॥ दुर्धर षड्रिपुसमूह पाववी विरामा पूर्ण कामा ॥२॥ पतितपावना ॥ मानुनी भग्वसा मना ॥ चरणरजें उद्धरिली

गौतममुनिरामा पूर्णकामा ॥ २ ॥ सहज पूर्णानंदा ॥ निजरंगा निर्द्वंद्वा ॥ स्थापिसि निजपदीं सुभाव बिभिषणाभिरामा पूर्णकामा ॥ ३ ॥

पद ६४१. [ चाल—बोलणें फोल झालें डोलण. ]

धन्य धन्य धन्य धन्य ते ज्ञानी रे ॥ ध्रु० ॥ परब्रह्म अनुभविलें ज्यांसीं ॥ परब्रह्म तें निश्चयेंसीं ॥ कळलें हें मानसीं ॥ तेंही ब्रह्मरूप ॥ १ ॥ येविषयीं संशय तें पाप ॥ हो कां तो ब्रह्मयाचा बाप ॥ याकरितां या अर्थाचा लोप ॥ वाचा-ळपणें ॥ २ ॥ ब्रह्मविद् ते ब्रह्मरूप ॥ ऐसा हा श्रुतिवाक्यदीप ॥ त्रिभुवनीं अमूप ॥ संशयतमनाशक साक्षी ॥ ३ ॥ नलगें याती कूळ कर्म ॥ नलगे वर्णाश्रमधर्म ॥ येथें एकचि आहे वर्म ॥ तें पडावें ठायीं ॥ ४ ॥ ज्याचिये अनुभवदृष्टीं ॥ कैंची माया कैंची सृष्टी ॥ वेटि समेष्टि हे गोष्टी ॥ बोलोंचि नये ॥ ५ ॥ कल्पांतीं जळ केवळ तुंबळ ॥ तयामाजीं हे कल्लोळ ॥ ब्रह्मादिक अवतार सकळ ॥ बुद्बुद तरंग ॥ ६ ॥ अनंत ब्रह्मांडें पंक्ती ॥ परब्रह्मीं होती जाती ॥ जैशा हेमीं नाना व्यक्ती ॥ अलंकारांच्या ॥ ७ ॥ परि भिन्न भेदाचा लेश ॥ ठावा नाहीं ज्याचा त्यास ॥ सार्वप्रातर्विबिं-बास ॥ शिवला नाहीं ॥ ८ ॥ ऐशिया अनुभवीं संत आत्मलाभें नित्य तृप्त ॥ प्रकट गुप्त असंख्यात ॥ लीलाविग्रही ॥ ९ ॥ हरि होउनियां हरिनामें ॥ गर्जति नाचती प्रेमें ॥ हरिभजनसंभ्रमें ॥ न समावती कोठें ॥ १० ॥ दर्शनें संसारसार ॥ दीक्षाग्रहणीं जगदुद्धार ॥ दुस्तरतर मायेचा पार ॥ पावती प्राणी ॥ ११ ॥ सहजा सहज पूर्ण रंग ॥ निजानंद निसंग ॥ अनिर्वाच्य अभंग ॥ विद्वद्वर्य ते ॥ १२ ॥

पद ६४२. [ राग कल्याण. ]

ध्यावा देव गजानन रे ॥ ध्रु० ॥ सिद्धिविनायक निजसुखदायक ॥ त्रिभु-वननायक पतितपावन रे ॥ १ ॥ मंगळकारक निजजनतारक ॥ स्मरणें दहन करी भवकानन रे ॥ २ ॥ नित्य निरंजन सज्जनरंजन ॥ सहज पूर्ण निजरंग सनातन रे ॥ ४ ॥

पद[१] ६४३.

माझी रंगमूर्ती मज कोणि दावा हो ॥ माउली कृपाळू मनीं भावा हो

---

१. हें पद्य रंगनाथस्वामींचे कनिष्ठ बंधु विठ्ठलरावआत्या यांचे आहे. यांत त्यांनीं आपलें बंधुप्रेम व त्यांचे ठिकाणीं असणारी निस्सीम भक्ति व्यक्त केली आहे. प्रयाणकाल झाल्यानंतर तिसरे दिवशीं हें पद्य म्हणून विठ्ठलराव यांणीं रंगनाथांची चिंता आपले नेत्रापुढें भिजविली

॥ ध्रु०॥ वत्सासी जैसी गाय ॥ बाळकासी तैसी माय॥ हरिणी पाडसा ऐशा भावें हो ॥ माझी० ॥१॥ बापही माय ॥ बंधु सखा होय ॥ त्याविण मज कोण आहे हो ॥ माझी० ॥२॥ सहज पूर्ण निजरंगा स्वामी ॥ पाळितसे लडि भाविकांची हो ॥ माझी० ॥ ३ ॥

## पद ६४४.

भक्तपराधिन मी निरंतर ॥ध्रु०॥ कोणासहि हें वर्म कळेना ॥ काय कथूं अधर्मीं ॥ निरंतर० ॥ १ ॥ नानारूपें त्याजमुळें ते ॥ बुडती शुद्ध तर्मीं ॥ निरंतर० ॥ २ ॥ जरि पापी मद्भक्तिपरायण ॥ त्यासहि प्राणद मी ॥ निरंतर० ॥ ३ ॥ सहज पूर्ण निजरंगीं रंगले ॥ निजदासां नत मी ॥ नि० ॥ ४ ॥

## पद ६४५.

निरवधि आवडती ते मज निरवधि आवडती ॥ भक्त महा सुकृती ॥ ध्रु० ॥ दोंवरी दोन भुजा घेउनियां आलों या काजा ॥ कीं कवळावें अंग जयाचें हृदयीं चौहातीं ॥ ते मज० ॥ १ ॥ ज्यांच्या पादरजें मद्गत ब्रह्मांडें विरजे ॥ धांवें यास्तव मागें मागें सत्वर पादगतीं ॥ ते मज० ॥२॥ सहज निजानंदें रंगें रंगुनियां छंदें ॥ पूर्णानंदें समाधी ज्याची हृदयीं सांठविती ॥ ते मज० ॥ ३ ॥

## पद ६४६. [ राग काफी. ]

मनीं भरला रंग झाला विठ्ठलसंग रे ॥ ध्रु० ॥ एकचि तंतू सोहं स्मरणाचा वाजतो जैसा चंग रे ॥ मनीं० ॥ १ ॥ चिन्मयमूर्ति परात्पर आहे पाहुनि झालों मनीं दंग रे ॥ मनीं० ॥ २ ॥ रंगातीत निजरंगीं रंगला जाहालासे भवभयभंग रे ॥ मनीं०॥ ३ ॥

## पद ६४७.

अवघा तूंचि हरी तूंचि हरी ॥ तूं जीवन मी लहरी ॥ ध्रु० ॥ जननी जनक तूं बंधू ॥ सखा जिवलग करुणासिंधू ॥१॥ सद्विद्या निजधन तूं ॥ देउनि तोडिसि भवबंधन तूं ॥२॥ निजरंगा तूं पाहीं ॥ अवघा तूंचि तूं मी नाहीं ॥ ३ ॥

## पद ६४८.

मुळींच ते नाहीं ते नाहीं ॥ अनादि सिद्ध मी पाहीं ॥ ध्रु० ॥ माया साच असावि ॥ तरि म्यां विवेकें उगवावी ॥ १ ॥ भवरोगीच असावें ॥

तरि म्यां रामरसायन घ्यावें ॥२॥ निजरंगीं रंगेला ॥ आपुले उगमीं संगम झाला ॥ ३ ॥

### पद ६४९.

गुरुपदीं जडलों मी जडलों मी ॥ द्वैतभया सुटलों मी ॥ ध्रु० ॥ जें जें भासे दृष्टी ॥ तें तें ब्रह्मचि वेष्टि समेष्टी ॥१॥ व्यतिरेकान्वय दोनी ॥ मजमीवांचुनि नाहीं कोणी ॥२ ॥ गुरुमय झालों आतां ॥ अभंग रंगा मिनलों स्मरतां ॥ ३ ॥

### पद ६५०. [ चाल—बोलणें फोल झालें. ]

एक मीच प्रियकर ज्याला ॥ माझें हो आयुष्य त्याला ॥ ध्रु० ॥ कृष्ण म्हणे अर्जूनातें ॥ माझें मद्भक्तांसीं नातें ॥ जैसा मत्स्य जळीं जिवनातें ॥ जीवें भावें न विसंबे ॥१॥ मजवेगळें आन कांहीं ॥ त्रिभुवनीं जयासि उरलें नाहीं ॥ त्याविण मज लवपळ पाहीं ॥ उदास हीं ब्रह्मांडें ॥२॥ इंद्रपदींचे उपभोग ॥ त्याचे दृष्टीतें क्षयरोग॥ माझे स्वरुपीं अखंड योग ॥ वियोग नाहीं मज त्यासी ॥२॥ ऋद्धि सिद्धी मुक्ती चारी ॥ द्वारीं वोळंगति कामारी ॥ देखुनि वांतीचियेपरी ॥ अखंडतर हरि गुरुभजनीं ॥ ४ ॥ काया वाचा मनें चित्तें ॥ अनन्य भावें भजती मातें ॥ त्यांचे सर्वहि मीं अच्युतें ॥ योगक्षेम वाहावे ॥ ५ ॥ विश्वात्म्याचे आत्मे झाले ॥ पूर्ण निजानंदिं रंगले ॥ त्यांसि म्हणती मेले गेले ॥ ते भ्रांतिचे शिरोमणी ॥६॥

### पद ६५१.

घरा नका जाऊं त्याचें तोंड नका पाहूं ॥ भेटी झाल्या सचैल स्नानावीण नका राहूं ॥ध्रु०॥ वेदबाह्य क्रियानष्ट परपीडक आंगें ॥ निर्दय निष्ठुर काळ क्रमी असत्संगें ॥ १ ॥ भक्ति ज्ञान विरक्तिचा लेश नसे कांहीं संशय सर्वदांही ॥ मी कोण हें समजेना ह्मणत अहं देहीं ॥२॥ निजानंदीं चित्त न रंगे ज्याचें तोंड पाहूं नका त्याचें ॥ सिद्धांत वर्णीयासि भय काय त्याच्या बाचें ॥ ३ ॥

### पद ६५२.

संसारीं काय सार असे गुरुतें पुसें ॥ ध्रु० ॥ धन सुत दार परिग्रह वैभव हे नव्हती सुखकारक रे ॥ जनन मरण अघहरण चरण ते सेवीं भवनिधितारक रे ॥१॥ सारासार विबोधुनि तुजला करितिल संशयविरहित रे ॥ ब्रह्म परात्पर मी विश्वंभर प्रत्यय येईल निश्चित रे ॥२॥ तेव्हां तूं

निजसौख्यविनोदें स्वच्छंदें क्रीडसि नाना रे ॥ पूर्ण रंग संसार हरिरुप होईल सदृढ भावना रे ॥ ३ ॥

पद ६५३. [ चाल—राम राम राम गा. ]

या देहाचें पडण काय मिरविसील रे ॥ नांद्याचा बैल तसें फिरविसील रे ॥धृ०॥ अस्थि नाडी मेद मांसें भरलें मळमूत्रें रसें ॥ काळाचे हातिंचें कैसें उरविसील रे ॥१॥ विषयांचें धरुनि ध्यान घालुनि स्वहितासि खान ॥ हातींचें निधान तूं हरविसील रे ॥ २ ॥ जन्म मरण गर्भवास सोसवेना आला त्रास ॥ पुरे माझी पाठि किती पुरविसील रे ॥ ३ ॥ अहंतेनें करूनि उभे काम क्रोध लोभें ॥ कर्में किती शुभाशुभें करविसील रे ॥ ४ ॥ निजानंदें पूर्ण रंगें न रंगोनि देह संगें ॥ लक्ष चौऱ्यायशीं सोंगें धरविसील रे ॥५॥

पद ६५४.

पीतांबरधारी कोण गे हा ॥ धृ० ॥ कोटी कंदर्पगाभा सांवळी अंगप्रभा ॥ देहुडा पाउलीं कां उभा ॥१॥ ब्रह्मादिक सुरवर नेणति याचा पार॥ वेद शास्त्रां अगोचर ॥ २ ॥ सहज पूर्ण अभंग निजानंदें रंग ॥ सर्व संगा निःसंग ॥३॥

पद ६५५.

तब मैं सद्गुरुनाथ कहूं ॥ धृ० ॥ कामादिक षड्वैरी मर्दुनी ॥ साधनीं मन हें लावूं ॥ १ ॥ सारासार विचार विलोकुनी ॥ दृश्य पदार्थहि त्यागूं ॥ २ ॥ तंतुपटीं मृद्धटवत् अवघें॥ विश्वीं चिन्मय पाहूं ॥३॥ सहज पूर्ण निजरंगीं रंगुनी ॥ जलतरंगवत् राहूं ॥ ५ ॥

पद ६५६. [ चाल—धातुमूर्ति लक्ष प्रतिमा. ]

तीर्थविधी सहजीं सहज हो ॥ धृ० ॥ सद्गुरुकृपें नित्य पुण्यपावन चिद्गंगेचें घडलें स्नान ॥ अहंममता दोष स्वप्नाहीं नाढळे मन हें झालें उन्मन॥ नाहं देही न मे देहो या प्रत्ययें प्रायश्चित्त परिपूर्ण ॥ संकल्पकेश वाढले त्यांचें मुंडन तेंचि वपन ॥१॥ विष्णुपदीं काया पिंडप्रदान ब्रह्मीं ब्रह्मयज्ञ केला ॥ असंभावना विपरीत भावना तिळांजुळी दिधल्या त्याला ॥ ब्रह्माहमस्मि या मंत्रेंकरुनी हा हेतू सिद्धीसि गेला ॥ विध्युक्त सुस्नात पुण्यपापातीत निष्कलंकतेसि आला ॥२॥ अनुभवी अनुभवें अनुभव जाणती इतरांसि कानडें भासे ॥ जो नर येथेंचि गौरव नेणें तो यासि पाहोनि हांसे ॥ चंद्रामृतें तृप्त

चकोरें होती काकपक्षी तो त्रासे ॥ निजरंगें रंगले त्यांचेनि दर्शनें त्रिविध ताप पाप नासे ॥ ३ ॥

पद ६५७. [ काशीराजकृत. ]

नर नारायण ते देही ॥ध्रु०॥ वर्णाश्रम विधियुक्त आचरती ॥ सत्कर्मे ब्रह्मार्पण करिती ॥ देहीं देहात्मसंबंध न धरिती ॥ हरिभजनें भुवनत्रय भरिती ॥१॥ जाणति विषवत् विषयपसारा ॥ नित्य निवडिती सारासारा ॥ साच न मानिति विवर्त सारा ॥ मुळिंहुनि आंचवले संसारा ॥२॥ षड्रिपु आसुरी दुर्जन गंजन ॥ दीनदयानिधि भवभयभंजन ॥ निजानंदघन सज्जनरंजन ॥ सत्य सनातन नित्य निरंजन ॥ ३॥ भेदाभेदविवर्जित झाले ॥ परमामृत रसपानें धाले ॥ भासत परि ते जीतचि मेले ॥ जे कोठें आले ना गेले ॥४॥ पूर्ण सबाह्य अंतर्यामीं ॥ ब्रह्म सनातन निजसुखधामीं ॥ निर्गुण निःसग या गुणग्रामीं ॥ श्रीरंगानुज-आत्मज स्वामी ॥ ५ ॥

पद ६५८.

अच्युतानंता अद्वया श्रीरंगा ॥ध्रु०॥ दीनानाथ दीनबंधु सुखघनकरुणासिंधु निर्गुणा निःसंगा ॥१॥ भक्तकामकल्पतरू पूर्णब्रह्म सद्गुरू अव्यय अभंगा ॥२॥ सहज पूर्ण निजानंद निर्मळ तूं निर्द्वंद्व मुनिजनहृद्पद्मभृंगा ॥३॥

पद ६५९.

हरिपायीं भाव धरावा ॥ ध्रु० ॥ नवविध भक्तीयोगें ॥ विषय विषवत् त्यागें ॥ भवनिधि कां न तरावा ॥१॥ नाहं कर्ता याहि वर्मे ॥ ब्रह्मार्पण सत्कर्मे ॥ करुनी घडली हाही हेत हरावा ॥२॥ सहज पूर्ण निजानंद ॥ लागोनि तयाचा छंद ॥ निजरंग कां न वरावा ॥ ३ ॥

पद ६६०.

जग नग जनक कनक स्वामी तूं ॥ध्रु०॥ तूं अज अव्यय हाचि सुनिश्चय ॥ नानारूपीं नामीं तूं ॥१॥ व्याप्य व्यापक अनेकीं एक सबाह्य अंतर्यामीं तूं ॥२॥ पूर्ण रंग निःसंग अभंग ॥ मुळींच नाहीं जेथें मी तूं॥३॥

पद ६६१. [ यादवरावअप्पाचे चि. आनंदरावकृत. ]

वृंदावना आला तो रंगनाथ ॥ त्यासि पाहतां पुरले मनोरथ ॥ध्रु० ॥ निजानंदसदना कृष्ण आला हो ॥ यशोदेसी आनंद झाला हो ॥ बाळपणीं पूतनावध केला हो ॥ आत्माराम गोकुळा प्रकट झा"ा हो ॥१॥ ज्याच्या रूपा प्रतिमा सांपडेना हो ॥ ज्याचे गुण शेषासि वर्णवेना हो ॥ दाता ऐसा

स्वराज्[redacted]लें दान हो ॥ ज्याचें नाम विख्यात त्रिभुवनीं हो ॥ २ ॥ ज्याची करणी न कळे पूर्ण देवा हो ॥ पांडवांसि रक्षिलें करितां धांवा हो ॥ योगी ध्यानीं करिती ज्याची सेवा हो ॥ त्याचें ध्यान लागलें सदाशिवा हो ॥ ३ ॥ संतांमाजीं श्रीद्वारकेचा राजा हो ॥ ब्रह्मादिक इच्छिती चरणरजा हो ॥ संकट पडतां पावतो भक्तकाजा हो ॥ दीनवत्सल कृपाळू महाराजा हो ॥ ४ ॥ निर्गुण पुर द्वारका सुखपट्टणीं हो ॥ कृष्णातीरीं राहिले चक्रपाणी हो ॥ शरणागत दयाळू मोक्षदानी हो ॥ श्रीरंगाच्या आनंद लोळे चरणीं हो ॥ ५ ॥

## पद. ६६२.

श्रीगुरुचरणस्मरणीं अंतःकरणीं सुख झालें ॥ परा पारुषली तें मज न बोलवे बोलें ॥ध्रु०॥ मुके साखर सेउनि गोडी सांगों जातां वाचे ॥ निःशब्द शब्दें गर्जे कांहीं हांसे कांहीं नाचे ॥१॥ अंतरिंचें सुख अंतर्मुख ते जाणति चिन्हांवरुनी ॥ तर्कें वाटे तार्किक बोलती परोक्षज्ञानें ज्ञानी ॥२॥ जेणें श्वानें तस्कर देखिला तें भके ॥ ऐकोनि अवघीं तैशींच भुंकती त्या कोणिही नोळखे ॥३॥ जाणिव नेणिव सरली केवळ जाणणें मात्रचि उरलें ॥ उरलें पुरलें हेंही जेथें म्हणते म्हणणें सरलें ॥४॥ तन्न तन्न हा शब्द निमाला सहज पूर्ण निजरंगीं ॥ कल्पांतीं जळ नभमय झालें प्रमाणरहित तरंगीं ॥ ५ ॥

## पद ६६३. [ डफगाणें. ]

अपार पूर्वपुण्येंकरुनी प्राप्त झाली मानवयोनी ॥ त्याहिमध्यें ब्राह्मण ज्ञानी पुरुषोत्तम तो ॥१॥ तरीच जन्माचें सार्थक म्हणोनि घ्यावें पुण्यश्लोक ॥ व्हावें तरोनियां तारक त्या दीक्षाग्रहणें ॥२॥ शतपथ मर्यादा संरक्षी कर्म ब्रह्मरूपें लक्षी ॥ वर्णाश्रम विधि पाळुनि साक्षी ॥ विदेहत्वेंसी ॥३॥ निष्कामता निरहंकृती ब्रह्मार्पण तें सहजस्थिती ॥ स्वस्वरूपीं मनोवृत्ति कुंठित नाहल्या ॥४॥ दैवी संपत्तिचीं लक्षणें सेवे तिष्ठति सेवकपणें ॥ वाचा रंगली हरिस्मरणें सर्वही काळ ॥ ५ ॥ भगवद्भक्त विरक्त ज्ञानी साधनयुक्त नवविध भजनीं ॥ अष्टहि भावें जो दिनरजनीं तन्मय झाला ॥ ६ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण जिणें मृगजळवत् हे जाण ॥ केलीं शाहिर तो डफगाण या त्रिभुवनीं ॥७॥ भेदवादी वादक जिंकी ऐसा विरळा कैंचा लोकीं ॥ बिरुदें सोडवुनि अवलोकी जो समभावें ॥ ८ ॥ जैसी दुग्धपटाची घडी न ये

उकलितां तांतडी ॥ डफगाण तो आमुचा गडी जीव जीवाचा ॥९॥ सर्वहि संगीं जो निःसंगीं तो नर नारायण कलयुगीं ॥ निजानंदें पूर्ण रंगीं रंगोनि ठेला ॥ १० ॥

### पद ६६४. [ वासुदेव ]

तो मी रामकृष्ण व सुदेव ॥ जो जिवाचाहि निज जिव ॥ जयाचेनि भासे जग सर्व ॥ जो सावयव ना निरवयव ॥ ध्रु० ॥ ज्याचें श्रवण जाणे कोण किती ॥ ज्याच्या डोळ्यांसि नाहीं मिती ॥ चरण कर शीर अपार मिती ॥ अंत नाहीं अनंत मूर्ति गा ॥१॥ जेथें वेदश्रुति परतल्या ॥ चारी वाचा जेथें खुंटल्या ॥ सकळ क्रिया जेथें उडाल्या ॥ चारि मुक्ति जेथें बुडाल्या ॥२॥ जें साकार ना निराकार ॥ जें जवळी नव्हे जें दूर ॥ जें अंतरीं ना बाहेर ॥ ज्याचा एकाहि नव्हे निर्धार ॥ ३ ॥ जें आहे म्हणतां घेतां न ये ॥ नाहीं म्हणुनि टाकिला नव जाय ॥ आहे नाहीं म्हणणें न साहे ॥ सकळ चातुर्य जेथें राहे गा ॥४॥ जेथें नाहीं भेदाभेद ॥ जेथें नाहीं मुक्त ना बद्ध ॥ जेथें आनंद ना दुःखबाध ॥ रंगातीत अद्वय निजानंद गा ॥५॥

### पद ६६५. [ वासुदेव. ]

गोविंदा रामा हो गोपाळा रामा जी ॥ध्रु०॥ श्रीहरि वासुदेवें नरवेश साधिला जी ॥ निःसंग अंग रंगें निजरंग माजला जी ॥ हरि राम कृष्ण शब्दें करटाळि वाजवा जी ॥१॥ शिखिपिच्छ मुकुटातें शिरीं भाव दाविला जी ॥ निज निढळीं केशराचा अजि तिलक लाविला जी ॥ तुळसीमंजरीचा माथां तुरा खोंविला जी ॥ श्रवणिं कुंडलें हो मणिभार शोभला जी ॥२॥ अ जि बाहु भूषणेंसि अजि दिव्य शोभती मा ॥ मुरलि वाजवितो अजि मधुर गोपती मा ॥ जन्म हे मृत्यु तेव्हां थरथरां कांपति मा ॥ ॥ ३ ॥ तव नाम नारदाले हें दान पावलें जी ॥ मुनि त्वरित वाल्मिकाले हें दान पावलें जी ॥ सोरटी सोमनाथा हें दान पावलें जी ॥ ४ ॥ परळि वैजनाथा अजि दान पावलें जी ॥ माय देवी मंगलेबा हें दान पावलें जी ॥ पंढरी विठ्ठलाले हें दान पावलें जी ॥ गोविंदा० ॥ ५ ॥

### आरती गणपतीची.

जयदेव जयदेव जय एकदंता ॥ आरती ओवाळूं सद्भावें आतां ॥ध्रु०॥ सिद्धिविनायक निजसुखदायक विघ्नेशा ॥ सुरवरवरदा परात्पर तरवर पुरुषा ॥ संदुरचर्चित लंबोदर सुंदर वेषा ॥ महिमा न कळे शेषा अगम्य जगदीशा

॥१॥ श्रीमन्मंगलमूर्ति देवा गजवदना ॥ गणपति मति मजला दे सद्विद्या-सदना ॥ शरणागत प्रतिपाळक चाळक जगजिवना ॥ निजरंगा निःसंगा करुणानिधाना ॥ २ ॥

## आरती चंद्राची.

जयदेव जयदेव जय चिन्मय चंद्रा ॥ निजतेजें वोवाळूं सच्चित्सुखभद्रा ॥ध्रु०॥ उदयास्तुविणें शोभसि अखंड चिद्गगनीं ॥ भक्तचकोरां जिवविशि परमामृतपानीं ॥ अक्षय निजनिष्कलंक निरसुनि तमरजनीं ॥ तापत्रय दुर करिसी लावुनि निजभजनीं ॥१॥ तव करुणारसपियुषें जन वन वनस्पती॥ स्थिरचर सफलित पल्लवपुष्पेंसह होती ॥ शुकादि पक्ष फळें ते सेवुनियां निवती ॥ पूर्णापूर्ण कळातित तेजोमयमूर्ति ॥२॥ निज बिज धान्यें विरुढत तव करुणापियुषें ॥ सेवुनि मुनिजन वर्तति नर्तति संतोषें ॥ आर्ते आरति उजळुनि निजतेजप्रकाशें ॥ रंगीं रंगुनि गर्जति निगमागम घोषें ॥३॥

## आरती पंचायतनाची.

जयदेव जयदेव जय पंचायतना ॥ हरि हर भगवती गणपति चिन्मणि चिद्रत्ना ॥ध्रु०॥ क्षिरनिधिजापति शेषशयना गोविंदा ॥ नित्य निरामय सच्चित्सुखरूप निर्द्वंद्वा ॥ बाळ मुकुंदा परमानंदा सुखकंदा ॥ अर्ते आरति तुझिया चरणारविंदा ॥१॥ कर्पूरगौरा गिरिजारमणा महादेवा ॥ हर मृड शिव शंकर स्वामी नीलग्रीवा ॥ वेदश्रुति वदती तुज एकमेवा ॥ अर्ते आरति करिता घडली तव सेवा ॥२॥ चिच्छक्ती चिन्मात्रें तूं मूळ माते॥ अनघ निजसुखसरिते स्वानंदभरिते ॥ करविरपुरवासिनि तूं कुळदेवते ॥ अर्ते आरति केली तुजला चित्सत्ते ॥ ३ ॥ मंगळमूर्ति गजानन प्रारंभीं स्तवितां ॥ सकलहि विघ्नें नासुनि हरिली तनु ममता ॥ म्हणवुनि भावें नमिलें तुज एकदंता ॥ आरति करितां झाली समसाम्यें समता ॥४॥ विश्वप्रकाशक अंबरमाणि निजतेजाचा ॥ चिद्गगनीं तो उदयो होतां तम कैंचा ॥ परा पारुषली कुंठित हे वाचा ॥ अभंग निज रंगें हा रंगविला साचा ॥ ५ ॥

## आरती दत्ताची.

जयदेव जयदेव जयजी अवधूता ॥ अर्ते आरति करूं स्वामी श्रीदत्ता ॥ध्रु०॥ जगव्यापक जगजीवन योगी अवधूता ॥ हरि हर ब्रह्मा देव त्रिरूप अमूर्ता ॥ दश इंद्रियातीत दिगंबर दत्ता ॥ सच्चित्सुखमयस्वरुपा अनुपा अव्यक्ता ॥ १ ॥ सिद्ध साधक योगी मरतकमाणि सकळां ॥ ईक्षणमात्रें

जड जीव तारिसि तूं हेळा ॥ नट नाट्यें योगरूपें छेदक भवमूळा ॥ दीन दयाकर गुरुवर अवधूत अवलीळा ॥२॥ निज सुखदायक देशिक नायक निजमूर्ति ॥ संसृतिखंडण योगी मंडणविश्रांती ॥ रंगीं रंगुनि अनन्य भावें जे भजती ॥ अभिवंदुनि मग त्यांतें वोळंगति मुक्ती ॥ ३ ॥

## आरती हनुमंताची.

जयदेव जयदेव जय अंजनितनया ॥ आरति वोवाळूं तुज करुणानिलया ॥ ध्रु०॥ अभिनव प्रतापमहिमा न बोलवे वाणी ॥ फळ म्हणवुनियां धरिला बाळपणीं तरणी ॥ अहिरावण महिरावण मारुनियां दोनी ॥ आणिला रघुविर केली अघटित हे करणी ॥ १ ॥ शत योजन एका उड्डाणें उदधी ॥ लंघुनि क्रौंचा वधिलें अगणित बळबुद्धी ॥ लंकाप्रवेश करुनी दशमुख अतिक्रोधी ॥ राक्षस गांजूनि केली त्वां सीताशुद्धी ॥२॥ अशोकवन विध्वंसुनि वनचर निर्दळिले ॥ लंका जाळुनि पुच्छें रजनीचर छळिले ॥ श्रीरामासह सैन्य कपिगण तोषविले ॥ म्हणती भीम पराक्रम हनुमंतें केले ॥३॥ रामानुजसह सेने शक्ती लागतां ॥ द्रोणागिरि आणिला तो रवि-उदय नव्हतां ॥ अमृतसंजीवनी देउनियां त्वरितां ॥ संतोषविले दशरथ-सुत महिजा-कांता ॥४॥ महारुद्रा हनुमंता देवा बलभीमा ॥ प्रियकर दास्यत्वें तूं होसी श्रीरामा ॥ शिव शंकर अवतारी निस्सीम सीमा ॥ निःसंगा निजरंगा मुनिमनविश्रामा ॥ ५ ॥

## आरती.

अतें आरति झाली गुरुरायाची हो ॥ दुस्तर संसारसागर उतरायाची हो ॥ध्रु०॥ धन्य दिवस सोनियाचा उगवला हो ॥ अनंता जन्माचा गोवा उगवला हो ॥१॥ अनन्य भावें बळकट धरिली कांस याची हो ॥ आतां आम्हांसी चिंता कासयाचि हो ॥२॥ सहज पूर्ण निजानंद रंगला हो ॥ देहबुद्धिचा द्वैतसंग भंगला हो ॥ ३ ॥

## शेजारती.

आतां स्वामी सुखें निद्रा करा श्रीरंगा ॥ निर्विकारा निराधारा निर्गुण निःसंगा ॥ध्रु०॥ सहज समाधी शेजे आतां पहुडावें स्वामी ॥ सच्चित्सुखैकधामीं व्यापक सर्वांतर्यामीं ॥१॥ सुमनाच्या अरुवारीं निजी निज गुरुराया ॥ अवस्थातीत साक्षित्वें नेई देहबुद्धि विलया ॥ २ ॥ निःशब्द शब्दें गौणीजणी झाल्या निनांत ॥ एकपणाचा अंत कैचें अद्वैतीं द्वैत ॥ ३ ॥ मी

नाहीं तेथें तूं कैचा ह्मणावया ठाव ॥ ओतप्रोत अवघा तुझा तूं श्रीगुरुराव ॥४॥ निजानंदघन ब्रह्म सनातन अद्वय अभंग ॥ परात्परतर करुणाकर तूं परिपूर्ण रंग ॥ ५ ॥

## शेजार्ती

निज रे निज निजानंदरंगा ॥ निर्गुण निःसंगा गुरुराया तूं ॥ ध्रु० ॥ अवस्थातीत तोचि मंचक वोजे ॥ निजमंदिरीं सुखस्वरूप शेजे ॥१॥ चौथी-चें बोलणें सरलें जेथें ॥ सहज समाधी समसाम्यें तेथें ॥२॥ निरसुनियां द्वैताद्वैत झालें ॥ हेंही बोलावया बोलणें ठेलें ॥३॥ स्वस्वरुपीं जागा निजीं निजेला ॥ निःशब्दीं हा शब्द निमाला ॥४॥ रंगीं रंगला निजानंदघन ॥ योगीजनमनमोहन गुरुवर्या ॥ ५ ॥

## शेजार्ती. [ यादवरावअप्पा यांचे पुत्र आनंदराजकृत. ]

यावें विश्रांती यादवराया माहेरा ॥ श्रीरंगा विठला यावें गा मंदिरा ॥ध्रु०॥ नमो ईश दत्ता सदानंदा श्रीरामा ॥ अमलानंदा गंभिर ब्रह्मा सहज विश्रामा ॥ १ ॥ पूर्णानंदा निजमूर्ती सद्गुरु सुखदाता ॥ एकादश अवतार श्रीरंगा तूं समर्था ॥२॥ आनंद हे गुरुपरंपरा विख्यात ॥ आनंद श्रीरंग-चरणीं भाट गर्जत ॥ ३ ॥

## भूपाळी.

राम कृष्ण विष्णु गोविंद ॥ नरहरि नारायण मुकुंद ॥ मना लागो हाचि छंद परमानद पावसी ॥१॥ माधव मधुसूदन पुरुषोत्तम ॥ अच्युतानंत त्रिवि-क्रम ॥ श्रीधर वामन मेघःशाम पूर्णकाम वद वाचें ॥२॥ केशव जनार्दन सं-कर्षण ॥ दामोदर तो रमारमण ॥ वाचे वासुदेव स्मरण ॥ जन्ममरण त्या नाहीं ॥३॥ प्रद्युम्न श्रीरंग गोपाळ ॥ विश्वीं विश्वंभर घननीळ ॥ नंदनंदन देवकी-बाळ ॥ दीनदयाळ स्मरावा ॥४॥ पद्मनाभ अधोक्षज ॥ हृषीकेश गरुडध्वज ॥ श्रीहरिनामें सहजीं सहज ॥ निजानंदें रंगसी ॥ ५ ॥

## भुपाळी. [ काशीराजकृत. ]

उठि उठि बा पुरुषोत्तमा ॥ भक्तकाजकल्पद्रुमा ॥ आत्मारामा निज-सुखधामा ॥ मेघःशामा श्रीकृष्णा ॥१॥ भक्तमंडळी महाद्वारीं ॥ उभी ति-ष्ठती श्रीहरी ॥ जोडोनियां उभय करीं ॥ तुज श्रीहरी पहावया ॥ २ ॥ सुरवर सनकादिक नारद ॥ विदुर उद्धव ध्रुव प्रल्हाद ॥ शुक भीष्म रुक्मां-गद ॥ हनुमंत बळिराय ॥ ३ ॥ रिक्त पाणी न पश्यंती ॥ घेउनि आलें स्व-

संपत्ती ॥ आतां सांगत सांगिजेती ॥ नाचत गर्जत हरिनामें ॥ ४ ॥ झाला प्रातःकाळ परीपूर्ण ॥ करी पंचांगश्रवण ॥ महा मुद्गलभट ब्राह्मण ॥ आशिर्वाद घे त्याचा ॥ ५ ॥ तुझा नामदेव शिंपी ॥ घेउनि आला आंगडें टोपी ॥ आतां नको जाऊं झोंपीं ॥ दर्शन देईं निज भक्तां ॥६॥ घेउनि नाना अलंकार ॥ आला नरहरी सोनार ॥ आला रोहिदास चांभार ॥ जोडा घेउनी तुजलागीं ॥ ७ ॥ मिराबाई तुजसाठीं ॥ दुर्धे तुपें भरोनि वाटी ॥ तुझ्या लावावया ओठीं ॥ लक्ष लावुनी बैसली ॥८॥ कान्होपात्रा नृत्य करी ॥ टाळ मृदंग साक्षात्कारी ॥ सेना न्हावी दर्पण करीं ॥ घेउनि उभा राहिला ॥९॥ गुळ खोबरें भरोनि गोणी ॥ घेऊन आला तुका वाणी ॥ त्याच्या वह्या कोरड्या पाणी ॥ लागो दिलें नाहीं त्वां ॥ १० ॥ गरुडापारीं हरिरंगणी ॥ टाळमृदंगाची ध्वनी ॥ रागोद्धार हरिकीर्तनीं ॥ करी कान्हया हरिदास ॥११॥ हरिभजनाविण वायां गेलें ॥ ते नरदेहीं बैल झाले ॥गोऱ्या कुंभारें आणिले ॥ खेळावया तुजलागीं ॥१२॥ निजानंदें रंग पूर्ण ॥ सर्वांहि कर्म कृष्णार्पण ॥ श्रीरंगानुजतनुज शरण ॥ चरण संवाहन करीतसे ॥ १३ ॥

## अर्जदास्त.

स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके १६०५ आषाढ वद्य ५ गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस अयोध्याधीश श्री राजा राम छत्रपती अनंत ब्रह्मांडनायक यांनीं आज्ञापत्र राजश्री जिवाजीपंत डेकदार मौजे देहगांव......मामले पंचा......यांसी आज्ञापत्र ऐसीजे तुम्ही.....न पाठविली तेथें...मनाजी ......कामक्रोधादिक आसुरी सेना पुंड पाळेगार मेळवून गांव मारतो, वसाहत होऊं देत नाहीं ॥ ब्रह्मपुरीचा मार्ग चालों देत नाहीं त्यामुळें मुलूख वैरावा पडला, गांवची खराबी जाहली ॥ बि. तपसील ॥ रसनापुरकरांची कुळवाडी बसली ॥ कानगांवकर ऐकेनासा जाहला, नाकलगांव ओस पडला, डोळसगांवकर आपपर विचारीनासा झाला ॥ लिंगापुरकर स्थानभ्रष्ट जाहला, गांडापुरकर धीर धरीत नाहीं, ऐसा कित्येक गांवचा गांव बदलला, तमाम साहेब कामाची खराबी होत चालली । तेव्हां महाराज इतराजी होऊन तलब पाठवून नेऊन लक्ष चौऱ्यायशी बंदींत घालतील तरी-माझा इलाज काय ॥ म्हणोन अर्जदास्त पाठविली ॥ त्यावरून तुम्हांवर साहेब मेहरवान होऊन मनाजी वेगमुख वगैरे यांस तंबी पोंचा-

बयास सरनोमत आत्मानात्मविवेक पंत प्रधान व स्वानुभव सेनापती व प्रबोध सर लष्कर यांसमागमें वितरागवीर दैवी संपदा देऊन ताबडतोबीनें रवाना केली आहेत हे मौजे मजकुरीं पावतांच अवघे पुंड पाळेगार मारले जातील ॥ जेरजबरदस्त करून यांस सन्मार्गी लावतील, वर्णाश्रमविधिनें साधन चतुष्टयसंपन्न होऊन सत्समागमीं लागोन तापत्रयीं तापोन नवविध भजनीं लागोन मुमुक्षु-दशेस येऊन तुह्मांस अनन्य शरण होऊन वश्य होतील तेणें रयत आबादान होईल. मनाजीपंत वगैरे आसुरी पाळेगार साम्यतेस येतील तेव्हां साहेबकाम सुरळीत चालोन ब्रह्मपुरीचा मार्ग चालों लागेल. तरी तुम्ही आपली खातरजमा राखोन साहेब कामास रुजू राहणें ह्मणजे केली सेवा मजुरा असे हुजूर आलिया बंध मोक्षातीत शाश्वत पद इनाम दिलें जाईल ॥ सहज पूर्ण निजानंद रंगोन साहेब कामास तत्पर असणें ॥ जाणिजे लेखनालंकार ॥ १ ॥

---

श्री रंगनाथस्वामीकृत

# स्फुट श्लोक, पंचकें व अष्टकें.

---

अष्टक [ वसंततिलका वृत्त. गण त, भ, ज, ज, ग. ]

जाणोनि तत्व मग जाणिव भावना ही ॥ स्वानंदतृप्त सकलाशषमुक्त पाही ॥ राहो अथवा तनु पडो समता मनाला ॥ अद्वैतबोधपदनिश्चय पूर्ण झाला ॥ १ ॥ ज्ञानानलें विविध संचित दग्ध झालें ॥ वंध्याविलासवत्स-क्रियमाण केलें ॥ प्रारब्धशेष उरलें जननिश्चयाला ॥ अद्वैत० ॥२॥ कोणी उदास वनवासविहार खेळे ॥ कोणी स्वकर्मरत आश्रमधर्ममेळे ॥ स्वच्छंदता रमत एक विकल्प गेला ॥ अद्वैत० ॥ ३ ॥ रक्षूं प्रजा मदगजारुढ रामभद्री ॥ भिक्षू उदासीन अकिंचन हो दरिद्री ॥ संकल्पशून्य मन आग्रहभाव ठेला ॥ अद्वैत० ॥ ४ ॥ स्वप्नेंद्रजालवत् मायिक सर्व आहे ॥ यालागिं निश्चळ मनें भय कोण वाहे ॥ स्वप्रत्ययें विविध-भाव अभाव ठेला ॥ अद्वैत० ॥ ५ ॥ सिंधूसि सिंधुसम भास्कर भास्करातें ॥ याहूनि चोज उपमा न दिसे तयातें ॥ वर्णील कोण गुणवर्जित निर्गुणाला ॥ अद्वैत० ॥६॥ जीवेश्वरा आणि जगाप्रति एक काळें ॥ निर्धारिलें घट मठीं नभ जेंवि

खेळे ॥ वेदांत संत निज संमत याचि बोला ॥ अद्वैत० ॥ ७ ॥ तो चिद्विलास मुनिमानसहंस जाणा ॥ विश्वीं वसे परि निरंकुश गम्य कोणा ॥ रंगूनि निश्चय निजानुभवीं विराला ॥ अद्वैत० ॥ ८ ॥

२ अष्टक. [ वृत्त भुजंगप्रयात. गण य, य, य, य. ]

वदे नाम वाचें तुझें नित्य काळें ॥ परी व्यापिलें नावरे मोहजाळें ॥ बळें काग हा शार्दुलातें विदारी ॥ तदन्याय झाला त्वरें ये मुरारी ॥ १ ॥ जगीं बोलती ये युगीं नाम तारी ॥ न ये प्रत्यया चित्त माझें विकारी ॥ सिंहाचें शिशू गांजिलें नागभारीं ॥ तदन्याय० ॥ २ ॥ दिनानाथ माता पिता साधकाचा ॥ तरी व्यर्थ कां क्षीण आह्मां भवाचा ॥ रवी लोपला जेविं खद्योतभारीं ॥ तदन्याय० ॥३॥ तुझा दास मी आस सोडूनि झालों॥ परी या मनें गांजिलें काय बोलों ॥ सुधा सेवितां मृत्यु आला शरीरीं ॥ तदन्याय० ॥ ४ ॥ विधाता वदे ते गिरा साच नाहीं ॥ वनीं मार्जरें मारिला व्याघ्र पाहीं ॥ दिपें नांदिजे जेविका अंधकारीं ॥ तदन्याय० ॥ ५ ॥ जळीं अग्नि राहे दिपा वात साहे ॥ मही शेष सांडी त्वरें जात आहे ॥ बळें डंखिलें त्या खगेंद्रा विखारीं ॥ तदन्याय० ॥ ६ ॥ शितें पीडिला सत्य मार्तंड देहीं ॥ अगस्ती बुडे थिल्लरामाजि पाही ॥ पळे बागुलाच्या भयें दंडधारी ॥ तदन्याय० ॥ ७ ॥ मृषावारि देखूनि वंध्या कुमारा ॥ तृषा लागली जाण पां त्यासि सैरा ॥ असो बोल याचें नसे काज कांहीं ॥ निजानंद रामा त्वरें तारि पाहीं ॥ ८ ॥

३ अष्टक. [ भुजंगप्रयात. गण य, य, य, य. ]

अहं प्रत्ययें दूरि चिद्रूप केलें ॥ प्रपंचानुरागें समाधान नेलें ॥ दिसे भाव हा भेदडोहीं बुडाला ॥ दयाळा हरी मी करूं काय याला ॥ १ ॥ फदां चित्त तें वित्त आशा न सोडी ॥ सदां लागली योषितासंगगोडी ॥ न वाटेचि हे खंति कांहीं मनाला ॥ दयाळा० ॥ २ ॥ फिरे व्यर्थ दाही दिशा वारितां ही ॥ नसे सर्वभूतीं दया सर्वदांही ॥ असे दुष्ट हा भोग माझा उदेला ॥ दयाळा० ॥ ३ ॥ सदां द्वेष वाहे जनीं द्वैत पाहे ॥ कुसंगींच राहे धरी योग्यता हे ॥ मनें जाणतां जाणतां घात केला ॥ दयाळा० ॥ ४ ॥ अविज्ञान कीं तूं सखा चक्रपाणी ॥ न जाणसी कां होतसे थोर हाणी ॥ त्वरें धांव पावें भवें जाच केला ॥ दयाळा० ॥ ५ ॥ असे पूर्वजन्मीं कुडें कर्म केलें ॥ तयाकारणें चित्त भोगां भुकेलें ॥ अहा मानवीं

जन्म हा व्यर्थ गेला ॥ दयाळा० ॥ ६ ॥ पडे संतसंगीं जडे अंतरंगीं ॥ घडे ना असें चित्त खेळे अनंगीं ॥ कुतर्कीच भावार्थ सर्व बुडाला ॥ दयाळा० ॥ ७ ॥ निजानंद तो कोण आधीं कळेना ॥ अहंभाव यालागिं माझा गळेना ॥ तुझा दास मी व्यर्थ हा आळ आला ॥ दयाळा० ॥८॥

४ अष्टक. [ मालिनी. गण न, न, म, य, य. ]

प्रळयरूप अघातीं चित्त निश्चीत राहे ॥ न चळत निजबोधें जें सुखें द्वंद्व साहे ॥ बहुवस सुख होतां भंग बोधासि नाहीं ॥ तुज गुरु निजराजा मागणें हेंचि पाहीं ॥ १ ॥ विविध जन न भासे भेद नासूनि नेला ॥ निजरुप जगदात्मा नित्य होऊनि ठेला ॥ रज तम गुण गेले बाणली शांति देहीं ॥ तुज० ॥ २ ॥ गमन चरणचालीं चालतां तूंचि होसी ॥ श्रवण करुनि बिंबे शब्दही सर्व देशीं ॥ स्वजन विजन कांहीं चक्षुतें भेद नाहीं ॥ तुज० ॥३ ॥ दवडुनि दुरि आशा तोडिलें संगदोषां ॥ शम विशम न मानी आणिली बुद्धि येशा ॥मन समुळ विरालें सच्चिदानंदडोहीं ॥ तुज०॥ ॥ ४ ॥ परधन विषवल्ली चित्त मानी विरागें ॥ अणुभरि न शिणे हा वैभवाचेनि त्यागें ॥ नवविध भजनाची मानिती प्रीति दाही ॥ तुज० ॥५॥ समुळ मुळ जगाचें मानलें मीच साचें ॥ अतिशय मन मानी आदरी वेद वाचें ॥ जन वन सम मानी सर्वदां भेद नाहीं ॥ तुज० ॥ ६ ॥ तव पदिं मन माझें चिंतितां नित्य रंगे ॥ तव गुण वदतांही शोक संताप भंगे ॥ अतिशय विषयांची आस चित्तासि नाहीं ॥ तुज० ॥ ७ ॥ निगमवचन पाळी चित्त आनित्य गाळी ॥ अनुदिन तनु रंगीं रंगली सर्व काळीं ॥ क्षणभरि न विसंबे साधुसंगासि पाहीं ॥ तुज० ॥ ८ ॥

५ अष्टक. [ भुजंगप्रयात. गण य, य, य, य. ]

मुखें बोलती सत्य सिद्धांत गोष्टी ॥ चढे वोहटे शोक संताप पोटीं ॥ अघातीं जयाचें समाधान वेंचे ॥ वृथा बोल ते फोल जाणा तयाचे ॥ १ ॥ दिठीं देखतां योषिता काम नाडी ॥ नसे शांति देहीं सदां क्रोध ताडी ॥ मदें व्यापिलें चित्त जाणा जयाचें ॥ वृथा० ॥ २ ॥ शुकाचे परी बोलणें सर्व जाणें ॥ जनातें ठकायासि दावी प्रमाणें ॥ मना आवडे आदरीं तेंचि साचें ॥ वृथा० ॥ ३ ॥ वदे भाग्य वैराग्य याहूनि नाहीं ॥ निरापेक्षता नातळे चित्त कांहीं ॥ अति श्लाघ्य मानी शरीरेंद्रियांचें ॥ वृथा० ॥ ४ ॥ मुखें बोल बोलोनि दावी प्रतापें ॥ शरीरासि आघात येतांचि कांपे ॥

मनीं दोष वाहे सदां सज्जनांचे ॥ वृथा० ॥५॥ समर्थासनीं बैसतां सौख्य वाटे ॥ नसे मान तेथें अती दुःख दाटे ॥ वसे सर्वदा पैं अहंकार वाचें ॥ वृथा० ॥ ६ ॥ उदासीन नाहीं सदां दैन्यवाणा ॥ कदां बोलतो ना वदे सत्य जाणा ॥ सुखार्थेनि संतोष मानूनि नाचे ॥ वृथा० ॥७॥ नसे बाणली इंद्रियांलागिं शांती ॥ नसे या मनें सांडिली दृश्य भ्रांती ॥ तदानंतरे सौख्य मानी जिवाचें ॥ वृथा० ॥ ८ ॥ स्वदोषांसि पाहूनियां पैं न लाजे ॥ स्वकर्मीं सदां मंद वांयाचि साजे ॥ स्मरेना निजानंद रामासि वाचे ॥ वृथा० ॥ ९ ॥

## ६ अष्टक. [ द्रुतविलंबित. गण न, भ, भ, र. ]

भजनविहिन या जगदोदरीं ॥ मजहुनी दुसरा न दिसे हरी ॥ अणुपरी समता न दिसे मना ॥ वद कसें करणें रघुनंदना ॥ १ ॥ दम कसा सहसा न दिसे पहा ॥ दश दिशा करणें फिरती दहा ॥ मदवशें न दिसे परवेदना ॥ वद० ॥ २ ॥ तुज पराङ्मुख होउनि सर्वदां ॥ अतिशयें विषयीं विचरे सदां ॥ सुख गमे पहातां वनिता धना ॥ वद० ॥ ३ ॥ तनु पडेल चिरंतन हे नुरे ॥ हित घडेल कदां मज न स्मरे ॥ त्वरित सोडवणें जरि येसि ना ॥ वद० ॥ ४ ॥ न भजतां तुज मी बहु मातलों ॥ रतिरसें विषयांसिच मातलों ॥ विकृतिही अशुनी परि येईना ॥ वद० ॥५॥ न जळती जंव हे मम दोष रे ॥ न चुकती तंव ते यमपाश रे ॥ गति मला न दिसे करुणाघना ॥ वद० ॥ ६ ॥ सुखघना जिवना निजमूर्ति रे ॥ न वदवे निगमा तव कीर्ति रे ॥ स्वपदिं रंगवुनी सुख देसि ना ॥ वद कसें करणें रघुनंदना ॥ ७ ॥

## ७ पंचक. [ इंद्रवज्रा. गण त, त, ज, ग, ग. ]

निवृत्तियोगें जड वृत्ति झाली ॥ सौख्यार्णवीं हे स्मृति ते बुडाली ॥ मी कोण हे विस्मृति जाण देहीं ॥ सत्कर्म राहे तरि दोष नाहीं ॥ १ ॥ पक्कीं फळें पादप तो धरीना ॥ कीं वाळ सर्पादिक आवरीना ॥ ऐशी दशा वर्तत जाण देहीं ॥ सत्कर्म० ॥ २ ॥ तापत्रयें कुंठित देह झाला ॥ किंवा समाधि स्वसुखेंचि ठेला ॥ वार्धक्यकाळीं विगतेंद्रियें हीं ॥ सत्कर्म० ॥३॥ प्रारब्धयोगें सुनिपात झाला ॥ बुद्धीसही विभ्रम पूर्ण ठेला ॥ प्रेमें हरीच्या गत कीर्तनीं हीं ॥ सत्कर्म० ॥ ४ ॥ सिद्धांत आचार्यमुखें कळेना ॥ निष्कर्म-दीक्षा तव आकळेना ॥ सच्चित्सुखें रंगुनियां विदेही ॥ सत्कर्म० ॥५॥

८ सप्तक. [ इंद्रवज्रा. गण त, त, ज, ग, ग. ]

अक्रोधता चित्त कदां वरीना ॥ नैरास्यताही सहसा धरीना ॥ स्वैरा वर्शे इंद्रियगोल पाहे ॥ सत्कर्म सांडी तरि मंडिमा हे ॥ १ ॥ नाहीं क्षमा ज्या हृदयीं समूळीं ॥ जो निर्दयें वर्तत सर्वकाळीं ॥ स्वप्नीं न देखे परि शांतता हे ॥ सत्कर्म० ॥ २ ॥ लोकीं करी द्रोह अमित्रभावें ॥ लोभी सदां सौख्य कदां न पावे ॥ दातृत्व स्वप्नीं सहसा न साहे ॥ सत्कर्म० ॥ ३ ॥ संतप्त शोकें भयभीत देहीं ॥ विश्रांतिचा लेश कदापि नाहीं ॥ शिष्टादिकांच्या वचनीं न राहे ॥ सत्कर्म० ॥ ४ ॥ सांडूनि कर्मे तनु केविं वर्ते ॥ ऐशा विवेकीं मन न प्रवर्ते ॥ वांयाचि माया-सरिता प्रवाहें ॥ सत्कर्म० ॥ ५ ॥ कर्ता क्रिया कर्म नसेचि ठायीं ॥ हा बोध स्वप्नीं परि ज्यांसि नाहीं ॥ निष्कामता व्यर्थचि मानिताहे ॥ सत्कर्म० ॥ ६ ॥ जेव्हां निजानंद सुखावबोधीं ॥ संलग्नभेदेविण जैं अभेदीं ॥ सत्संग रंगें सुख हें न पाहे ॥ सत्कर्म० ॥ ७ ॥

९ पंचक. [ इंद्रवज्रा. गण त, त, ज, ग, ग. ]

कल्पांत तों देह चिरायु झाले ॥ मानी जसे वास्तिसि आजि आले ॥ बोधें सदां निश्चळ वर्ततांही ॥ वर्तोनि देहीं परि तो विदेही ॥ १ ॥ जाया पशू पुत्र वसोनि गेहीं ॥ लाभा अलाभीं समचित्त पाहीं ॥ देहात्मता कश्मल लेश नाहीं ॥ वर्तोनि० ॥ २ ॥ आलें विभागासि तयासि पाळी ॥ विनाशकाळीं न मरी कपाळीं ॥ जाळी क्रिया ज्ञान-हुताश दाहीं ॥ वर्तो० ॥ ३ ॥ देहाकडे प्राचिन भोग लावी ॥ ब्रह्मांड-भांडोदर दृश्य भावी ॥ खेळे जसें वारिजपत्र डोहीं ॥ वर्तोनि० ॥ ४ ॥ लोकीं दिसे वर्तत देह-कामीं ॥ निरंकुशा त्याप्रति कोण नेमी ॥ तो रंग निःसंग न बोलतांही ॥ वर्तोनि० ॥ ५ ॥

१० पंचक. [ द्रुतविलंबित. गण न, भ, भ, र. ]

जन समानचि भासति संत हो ॥ नसति मानव तेचि अनंत हो ॥ व-
न चरें तुलती सम केसरी ॥ तरिच साधुजना सरिसी परी ॥ १ ॥ जन
मनीं ममता दृढ भाविती ॥ घन जनार्दन सज्जन दाविती ॥ उलुक वायस
हंस घडे सरी ॥ तरिच० ॥ २ ॥ जन विमोहित जात अधोगती ॥ वि-
[illegible]त वेद महंत विराजती ॥ उडुगणें सम साम्य दिवाकरीं ॥ तरिच० ॥ ३ ॥
[illegible] जनत[illegible]
जन पत्राथलया श्रम मानता ॥ [illegible]

सम कल्पतरू जरी ॥ तरिच० ॥ ४ ॥ जलनिधीसम थिल्लर जैं घडे ॥ मशक तो खगपा सम जैं उडे ॥ अखिल रंग तुळे विषयीं जरी ॥ तरि०॥५॥

११ पंचक. [ द्रुतविलंबित. गण सदर. ]

जरि बुडे जगतितळ हें स्वयें ॥ परि कदां न ढळे निज निश्चयें ॥ मृगजळीं बुडणें न घडे कदां ॥ म्हणवुनि मुनि निश्चळ सर्वदां ॥ १ ॥ मुकुट कुंडल नूपुर कंकणें ॥ न घडतां घडतो बहुता गुणें ॥ सम तुके कनके तुकिजे सदां ॥ म्हणवुनि० ॥२॥ लहरि वोघ तरंग दिठीं दिसे ॥ सलिल तें लयपणें दुसरें नसे ॥ रमत सौख्यरुपेंविण आपदा ॥ ह्मणवुनि० ॥३॥ पट दिसे विविधाकृति कूसरि ॥ अखिल तंतु जया निज अंतरीं ॥ तदनुसार दुजें न घडे कदां ॥ ह्मणवुनि० ॥ ४ ॥ गमतसे विषयीं दृढ रंगला ॥ श्रम नसे सहसा भ्रमभंगला ॥ परम डोळस वश्य नसे कदां ॥म्हणवु०॥५॥

१२ पंचक. [ इंद्रवज्रा गण त, त, ज, ग, ग. ]

तीर्थाटणींही मन हें भरेना ॥ निवृत्तिशास्त्रीं परि वावरेना ॥ ध्यानीं स्थिरेना जरि लावियेलें ॥ त्वां सद्गुरू लाघव थोर केलें ॥ १ ॥ व्रतें वरीना जप तो करीना ॥ तपादि निश्चिनचि आदरीना ॥ यज्ञक्रियेचें व्रत शून्य झालें ॥ त्वां सद्गुरू० ॥ २ ॥ वर्णाश्रमाचा अभिमान गेला ॥ दिग्मंडळाबाहिर शोक ठेला ॥ ब्रह्मार्पणीं कर्म सुखें निजेलें ॥ त्वां सद्गुरू०॥३॥ द्रष्टा तया दर्शन रूप नामें ॥ झालीं स्वरूपीं सहजीं अनामें ॥ तें बोलतां कीर नयेचि बोलें ॥ त्वां सद्गुरू० ॥ ४ ॥ मिथ्या प्रतीती जगतीतळाची ॥ चित्सौख्यरंगें गति निष्फळाची ॥ संदेह-कारागृह दुःख नेलें ॥ त्वां० ॥५॥

१३ पंचक. [ इंद्रवज्रा, गण त, त, ज, ग, ग. ]

कोणी फिरे मंडळ या धरेचें ॥ वास्तव्य एका गिरिकंदरींचें ॥ वातांबुपर्णाशन एक पाहीं ॥ विश्रांतिचें मंदिर तेथ नाहीं ॥१॥ कोणी मनें शक्तिरुपा आराधी ॥ अष्टांगयोगाप्रति एक साधी ॥ कीं नग्न मौनी रत एक देहीं ॥ विश्रांति० ॥ २ ॥ एकांत एकाप्रति हा आनंद ॥ एका बहूभाषण हाचि छंद ॥ दारा धनीं एक विरक्त देहीं ॥ विश्रांति० ॥३॥ वेदार्थिच्या उत्तर सारभागा ॥ जो सद्गुरुच्या वचनें विभागा ॥ पावेचिना जें निजगूज कांहीं ॥ विश्रांतिचें० ॥४॥ रंगीं निजानंदाचे रंगलाहे ॥ आहे निजीं रंग कदां न साहे ॥ जैं ना कळे हें तरि भार वाही ॥ विश्रांतिचें मंदिर तेथ नाहीं ॥ ५ ॥

१४ पंचक, [ भुजंगप्रयात, गण य, य, य, य. ]

( रंगनाथस्वामींचें आपल्या वडिलांविषयीं बोलणें आहे. )

सखा सद्गुरू बाप माझा निजाचा ॥ गिरा केवि वर्णू शके पार याचा ॥ सुखा पात्र केलें विना क्लेश येणें ॥ दुजा देव नेणें दुजा देव नेणें ॥ १ ॥ दिसे ते नसें देखणें मात्र साचे ॥ कला दीधली थोर कौशल्य याचें ॥ कृपाळूपणें सोडवीलें उपेणें ॥ दुजा देव ० ॥ २ ॥ स्वसाम्राज्य देऊनियां भ्रांति नेली ॥ पदीं आपुले थोर विश्रांति केली ॥ वदों काय याचें अनिर्वाच्य देणें ॥ दुजा० ॥ ३ ॥ स्वसंवेद्य अच्छेद्य तें रूप माझें ॥ करी दूरी देहीं असंबद्ध ओझें ॥ करी शांतिचें सांग सर्वांग लेणें ॥ दुजा० ॥ ४ ॥ अकर्तात्मबोधें लिळा खेळ दावी ॥ पदीं रंगतीं त्या निजानंद दावी ॥ द्विधा बोलणें बोलिजे येथ कोणें ॥ दुज ० ॥ ५ ॥

१५ पंचक, [ वसंततिलका, गण त, भ, ज, ज, ग. ]

स्वप्नीं यतीसि धन पुत्र कलत्र बंधू ॥ साम्राज्य भोग सकळै विषयीं समंधू ॥ तें जागृतीं विफल होउनि जाय जैसें ॥ झाल्या प्रबोध मग भासत विश्व तैसें ॥ १ ॥ पृथ्वी हुताश जळ मारुत मेघ मेरु ॥ धेनू मृगें नकुळ सर्प खगें खगेंद्रू ॥ चित्रीं विचित्र परि कल्पित भिंति लेशें ॥ झाल्या० ॥ २ ॥ किंवा विशाळ अति दर्पणिचा उभारा ॥ सामावलें गगनमंडळ चंद्र तारा ॥ त्या सोज्वळावरि विलास अनेक भासे ॥ झाल्या० ॥ ३ ॥ वाद्यें तुरंग रथ कुंजर वीर सेना ॥ ग्रामें गृहें विविध वृक्ष पदार्थ नाना ॥ गंधर्वपूर विलसे परि व्यर्थ जैसें ॥ झाल्या० ॥ ४ ॥ वोडंवरीं नसत तेंचि करूनि दावी ॥ सज्ञान सावध असावधतेसि गोंवी ॥ निःसंग रंग सहजें वसिजे आकाशें ॥ झाल्या प्रबोध मग० ॥ ५ ॥

१६ पंचक, [ इन्द्रवज्रा, गण त, त, ज, ग, ग. ]

सत्संगतीं मानस हें न रंगे ॥ भोगीं विटेना बहुसाल रंगें ॥ देहात्मबुद्धी सहसा ढळेना ॥ रामा कसें तारिसि हें कळेना ॥ १ ॥ नेणें कसें साधन तें करावें ॥ नेणें कसें मानस आवरावें ॥ खेळे प्रपंचीं सहसा वळेना ॥ रामा कसें तारिसि हें कळेना ॥ २ ॥ आशा बहू हे ममता सुटेना ॥ कामीं मना लालसता तुटेना ॥ लोभीं सदां दंभ कदां गळेना ॥ रामा० ॥ ३ ॥ नाहीं क्षमा शांति दया तितीक्षा ॥ नाहीं तुझी आवडि दास्य दीक्षा ॥ दंडील तो अंतक हें टळेना ॥ रामा० ॥ ४ ॥ वाचें अगें बोलत गोष्ट नाहीं ॥ तों अं-

तरीं शाश्वत रंग नाहीं ॥ येणें कदां संचित तों जळेना ॥ रामा कसें तारिसि हें कळेना ॥ ५ ॥

१७ पंचक, [ भुजंगप्रयात, गण य, य, य, य. ]

असी वैभवें वर्ततांही न तोषे ॥ तया नाश होतां कदापी न रोषे ॥ न मानूनि दोन्ही स्वलीलें निवाला ॥ असा मुक्त तो नित्य वंदू तयाला ॥ १ ॥ वरू हे रिपू मंदिरीं बंदिशाळे ॥ पडे ते जरी जाण प्राचीन मेळें ॥ नसे बुद्धि वैषम्य कांहीं जयाला ॥ असा० ॥ २ ॥ तनू तापली क्लेश रोगादि तापें ॥ ह्मणे पूर्व प्राचीन भोगानुरूपें ॥ न वाहेचि शोका सुखाब्धींत ठेला ॥ असा० ॥३॥ करी सांग कर्में अकर्तात्मबोधें ॥ वसे निर्भयें पूर्वकर्माविरोधें॥ विवेकेंचि सारांश मार्गें निवाला ॥ असा मुक्त० ॥४॥ निजानंद रंगेंचि रंगूनि पाहीं ॥ घटीं बिंब आलिप्त तो तेंवि देहीं ॥ विवेकीं महाराज निर्मुक्त झाला ॥ असा मुक्त० ॥ ५ ॥

१८ पंचक. [ द्रुतविलंबित, गण न, भ, भ, र. ]

लवण सिंधुजळीं मिळणीं मिळे ॥ परि दुजेंपण निश्चित नाढळे ॥ गति तसी समता मति भंगली ॥ परि गुरुचरणीं रति रंगली ॥१॥ बहुत चित्रविचित्रहि बोलणीं ॥ विविध अर्थ नसे जन ईक्षणीं ॥ गति तसी समता मति भंगली ॥ परि गुरू० ॥ २ ॥ नद तडाग सरोवर थिल्लरीं ॥ दिनकर एक दुजी न दिसे परी ॥ गति तसी समता मति भंगली ॥ परि गुरू० ॥३॥ घटमठीं भरलें भुवनत्रयीं ॥ नभ विकार विवर्जित अक्षयीं ॥ गति तसी समता मति भंगली ॥ परि गुरू० ॥ ४ ॥

१९ पंचक, [ भुजंगप्रयात गण य, य, य, य. ]

आसक्ती नको पुत्रदारादिकांची ॥ आसक्ती नको इंदिरामंदिरांची ॥ आसक्ती नको सांडीं देहादि लोभा ॥ मरीची जळाची दिसे रम्य शोभा ॥१॥ विषें रांधिलीं तीं जशीं उत्तमान्नें ॥ न ये सेविता जेंवि पैं तीं अमान्यें ॥ तयाचेपरी मानिसी काय लाभा ॥ मरीची० ॥२॥ अशी जाणतां लक्षिसी कां परीक्षा ॥ करी जाण सर्वात्मभावें उपेक्षा ॥ वृथा देह गेला भजे पद्मनाभा ॥ मरीची० ॥३॥ मदें भूललासी वृथा केंवि सांगे ॥ वदे अट्टहासें गुरुनाम वेगें ॥ धरी लीनता सांडें रे काम क्षोभा ॥ मरीची० ॥४॥ नसे सौख्य कांहीं कदां कामसंगें ॥ निजानंद पायीं सदाकाळ रंगे ॥ धरीं पूर्ण वैराग्य सांडूनि दंभा ॥ मरीची जळा० ॥ ५ ॥

## २० पंचक, [ इंद्रवज्रा गण त, त, ज, ग, ग. ]

मोहांधकारीं विधिहीन कोपी ॥ कां लोळसी रे अति दीनरूपी ॥ ना होति कोणीं तुज सौख्यकारी ॥ विश्वंभरावांचुनि कोण तारी ॥ १ ॥ वांचूनियां मोक्षविलासविद्या ॥ जे साधिती ते सकळै अविद्या ॥ तें जाणणें मानवदेहधारी ॥ विश्वंभरावांचुनि० ॥२॥ दारा प्रजा मित्र सकामवर्ते ॥ कोणी हितालागुनि न प्रवर्ते ॥ कां झांकिती लोचन दुर्निवारीं ॥ विश्वं० ॥३॥ दिग्मंडळीं चाळक विश्वकारी ॥ पाळी सृजी आणि निदानकर्ता ॥ त्या नेणतां काल विशाळ मारी ॥ विश्वंभरा० ॥ ४॥ संकल्पसंगाप्रति ज्ञानचक्षीं॥ लक्षूनियां रंग निजात्मपक्षीं ॥ सारांश सार्वी न पडे विकारीं ॥ विश्वंभरा० ॥ ५ ॥

## २१ पंचक, [ भुजंगप्रयात गण य, य, य, य. ]

करी एक विज्ञप्ति चित्ता सुपात्रा ॥ वृथा हिंडसी या किती जन्मयात्रा ॥ त्यजीं सर्व चांचल्य निश्चीत राहीं ॥ निजानंदनामें निजानंद पाहीं ॥१॥ तुझे संगतीं मी किती क्लेश साहों ॥ वृथा भोग भोगूनियां नित्य राहों ॥ अरे या जगीं सौख्य तों आन नाहीं ॥ निजानंद० ॥२॥ बहू इंद्रियें शीगलीं दुष्ट कर्में ॥ घडे ताप तापत्रयाचेनि धर्में ॥ विसावों सुखें इच्छिसी जाग देहीं ॥ निजानंद० ॥३॥ बरें मूळ चक्षी अभेदीं निरीक्षीं ॥ तुझ्या सर्व कर्मीं असे कोण साक्षी ॥ सुखानंद तूं रे न वाहे प्रवाहीं ॥ निजानंद० ॥४॥ अवस्थात्रयीं जो वसे सूत्रधारी ॥ जगीं रंग जो शोभला निर्विकारी ॥ नये बोलणें बोलतां मात्र कांहीं ॥ निजानंद० ॥ ५ ॥

## २२ पंचक, [ द्रुतविलंबित गण न, भ, भ, र. ]

जगतिनाथ जगीं कवणें रिती ॥ वसत हें जन निश्चित नेणती ॥ धरुनि मीपण वर्तति पामरें ॥ गमत कोण कळे न कळे पुरे ॥१॥ श्रवण ऐकति नेत्र विलोकिती ॥ निवडिते रसना रसव्युत्पत्ती ॥ धरिति हाचि सुनिश्चय आदरें ॥ गमत कोण० ॥२॥ शरिर यौवन संपत्ती सोयरे ॥ स्वकिय देश विदेश वनांतरें ॥ निगम शास्त्र पुराण चराचरें ॥ गमत० ॥३॥ न वळणें कळणें विविधा खुणा ॥ वळखणें दृढ सांडुनि मीपणा ॥ त्यजुनि हे भजती कुमतांतरें ॥ गमत० ॥४॥ हरिहरादिक या सुखसंगती ॥ जळ जळीं गत तद्वत रंगती ॥ भ्रमभरें भ्रमती नर वानरें ॥ गमत० ॥ ५ ॥

२३ पंचक, [ भुजंगप्रयात गण य, य, य, य. ]

कुसंगें बहू क्षीण चित्तासि झाला ॥ कुमार्गांतरें त्रास हा थोर आला ॥ कुमार्गी सदाचार लोटूनि देती ॥ कुतर्कें अतर्क्यीं मृषा लाविताती ॥१॥ कुयोगी कुबुद्धी कुशास्त्राधिकारी ॥ बळें नाथिलें स्थापिती ते विकारी ॥ पुढें भाविकें भावनेतेंचि जाती ॥ कुतर्कें० ॥ २ ॥ वदे एक चक्षूसि लक्षूनि पाहा ॥ वदे एक तो नाद ब्रह्मींच राहा ॥ वदे एक तो मोक्ष पैं देहपातीं ॥ कुतर्कें० ॥३॥ वदे एक तो बुद्धि बोधस्वरूपीं ॥ दुजा मोक्ष कैंचा जिवातें निरूपी ॥ नसे निश्चयो एकही आदि अतीं ॥ कुतर्कें० ॥४॥ समस्तांसि जो बुद्धिदाता अभेदें ॥ नुरे भीपणें सच्चिदानंदबोधें ॥ न रंगोनियां या सुखें मूर्ख जाती ॥ कुतर्कें अतर्कीं मृषा लाविताती ॥५॥

२४ पंचक, [ भुजंगप्रयात गण य, य, य, य. ]

परं ज्योति जे सर्व ज्योतीसि पाहे ॥ जया पाहतां पाहणेंही न साहे ॥ बहिर्मूख ते लक्षिती चर्मचक्षीं ॥ नये प्रत्यया लक्षितें कोण लक्षी ॥ १ ॥ अलक्ष्यासि लक्षी दुजा कोण ऐसा ॥ धरी प्रत्ययो अंतरीं पूर्ण कैसा ॥ स्वसंवेद्य पाहा स्वयें सर्वसाक्षी ॥ नये० ॥२॥ मना प्रत्ययातें नसे रीघ जेथें ॥ प्रवेशे कसें चक्षुरादीक तेथें ॥ विनाशोनि द्रष्ट्यासि दृष्टत्व भक्षी ॥ नये० ॥३ ॥ जया पाहतां हेतु गेला अभावा ॥ असा हा नसे सत्य सिद्धांत ठावा ॥ मृगाचेपरी तोय जैसें निरीक्षी ॥ नये० ॥ ४ ॥ दयाळू दिनाचा बहु देवराणा ॥ कुमार्गें उपेक्षी तयालागिं जाणा ॥ न रंगे कदांही भरे हीनपक्षीं ॥ नये प्रत्यया लक्षि तें कोण लक्षी ॥ ५ ॥

२५ पंचक, [ इंद्रवज्रा, गण त, त, ज, त, ग. ]

मी कोण झालें जग कासयाचें ॥ याचें असे कारण काय साचें ॥ विचार साचार असा न केला ॥ तो इंद्रियार्थी जन हा भुकेला ॥ १ ॥ शास्त्रार्थ आचार्य स्वमत प्रमाणें ॥ त्रि प्रत्ययें युक्त वरीं प्रमाणें ॥ विचार साचार असा न केला ॥ तो इंद्रि० ॥२॥ मृगांबु जें केवळ विश्व आहे ॥ पूर्वीं नसे शेवटिंही न राहे ॥ विचार साचार असा न केला ॥ तो इंद्रि० ॥ ३ ॥ विवेक हा दीपक न प्रकाशे ॥ निःशेष माया तम तो न नाशे ॥ विचार साचार असा न केला ॥ तो इंद्रि० ॥४॥ आराधिल्या सद्गुरु अंतरंगें ॥ सवासना मानस तेंच भंगे ॥ तत्त्वज्ञ तो होउनि अद्वयांगें ॥ डोले निजानंद सुखैक रंगें ॥ ५ ॥

२६ पंचक, [ भुजंगप्रयात गण य, य, य, य. ]

चतुष्पाद पक्षी कृमीच्या समाजीं ॥ जळीं स्थावरीं जन्म दुष्कर्म योजी॥ कचित्कर्म तें मानवी देह झालें ॥ नुपेक्षी हरी उद्धरीं हेंचि बोलें ॥ १ ॥ नसे भक्ति वैराग्य सद्भावना ही ॥ विवेकासि तो सर्वथा ठाव नाहीं ॥ असत्संगयोगेंचि आयुष्य गेलें ॥ नुपेक्षी हरी० ॥२॥ विधीतें न पाळी असंभाव्य चाळी ॥ फिरे व्यर्थ दिग्मंडळीं सर्व काळीं ॥ रजें व्यापिलें चित्त भोगा भुकेलें ॥ नुपेक्षी हरी उद्धरी० ॥ ३ ॥ स्ववर्णाश्रमाच्या उदासीन कर्मीं ॥ प्रवर्तेचि ना चित्त हें मोक्षधर्मीं ॥ कुडें जन्मजन्मांतरीं वृत्त झालें॥ नुपे० ॥४॥ बहु तारिले पापरूपी पुराणों ॥ तुझी कीर्ति गाती वदों काय वाणी ॥ पदीं रंगवी भाग्य माझें उदेलें ॥ नुपेक्षी हरी उद्धरां हेंचि बोलें॥५॥

२७ पंचक, [ भुजंगप्रयात गण य, य, य, य. ]

भजावें जना त्याविना थोर नाहीं ॥ धरा शोधितां देखिलें एक पाहीं॥ पदश्रेष्ठ आचार्य ठायींच साजे ॥ दुजा देव पैं मानिता चित्त लाजे ॥ १ ॥ वृथा शीणती सत्य शक्रादिकेंही ॥ नसे लेश विश्रांतिचा मात्र कांहीं ॥ पदश्रेष्ठ आचार्य ठायींच साजे ॥ दुजा देव० ॥२॥ सुरश्रेष्ठ धाता परी मूढ कैसा ॥ करी सृष्टितें जाण कुलाल जैसा ॥ पदश्रेष्ठ आचार्य ठायींच साजे॥ दुजा० ॥३॥ जगद्वंद्य वैकुंठकैलासवासी ॥ सदां सद्गुरुपादपद्मीं विलासी॥ पदश्रेष्ठ आचार्य ठायींच साजे ॥ दुजा० ॥ ४ ॥

२८ चतुष्टय, [ इंद्रवज्रा गण त, त, ज, ग, ग. ]

वीसावलें मानस रामरंगा ॥ कीं गुंतलें चचळ कामसंगीं ॥ दुःसंगसंगें न पडे प्रवाहीं ॥ स्वप्रत्ययें अंतर शोध पाहीं ॥१॥ द्वंद्वीं असे सावध चित्त कैसें ॥ दारादियोगें विचरे विशेषें ॥ सद्यःप्रकोपी अनुराग नाहीं ॥ स्वप्रत्ययें० ॥ २ ॥ वित्तेषणा लालस देहभोगीं ॥ निर्लोभ निर्मत्सर देह त्यागी ॥ कीं पापकर्मीं मन सर्वदांही ॥ स्वप्रत्ययें० ॥ ३ ॥ स्वधर्मकर्मीं मन न प्रवर्ते ॥ कीं भक्तिमार्गीं अनुकूल वर्ते ॥ किंवा विचारां अनुरक्त कांहीं॥ स्वप्रत्ययें० ॥ ४ ॥

२९ चतुष्टय, [ इंद्रवज्रा गण सदर. ]

ज्ञानाभिमानें विदुषा न मानी॥ जो नायके राघवकीर्ति कानीं ॥ निंदा मुखीं चंचळ चित्त पाहीं ॥ त्यातें मना सांडुनि दूर जाई ॥ १ ॥ अभक्ष भक्षी गुण दोष लक्षी ॥ नसे दया काम मनीं अपेक्षी ॥ मनोरथीं वादक

जो प्रवाहीं ॥ त्यातें मना सा० ॥ २ ॥ अत्यंत कोपी निजदोष लोपी ॥ जो दुष्कर्मे अनळा निरूपी ॥ भोगीं सदां लालस सर्वदांही ॥ त्यातें मना० ॥३॥ वाचा बळें भाविक लोक गोवी ॥ वेदार्थ नेणें लय लक्ष लावी ॥ नेणें निजानंद ह्मणे विदेही ॥ त्यातें मना सांडुनि दूर जाई ॥४॥

३० पंचक, [ मालिनी गण न, न, म, य, य. ]

पृथक पृथक आतां क्लेश कोणें करावें ॥ यम नियम बळें हो योग कासे धरावे ॥ विवरुनि सविवेकें दाखवूं तत्त्वसारा ॥ मृगजळ जग भासे जें कळे तें स्विकारा ॥१॥ शिणवुनि तनु कष्टां मारुता कां दमावें ॥ फिरत सकळ पृथ्वी विभ्रमें कां रमावें ॥ रज तम अविचारें आचरा कां अघोरा ॥ मृगजळ० ॥२॥ अविहित न तपावें कां कुमंत्रा जपावें ॥ न कळत अविधीच्या कर्दमीं कां रुपावें ॥ कुटिल कुजनसंगा दुष्टभागा निवारा ॥ मृगजळ० ॥३॥ निगमवचन कानीं सद्गुरू सौख्यदानीं ॥ वदत निजश्रुतीचें तत्त्व साधा निदानीं ॥ तदुपरि विवरा हो त्या सुखें निर्विकारा ॥ मृगजळ० ॥ ४ ॥ निजसुखजळवीचा मातला रंग रंगीं ॥ निरवधि अणुकैचो हो निजानंद-संगीं ॥ शिर उभवताच्या कोण जाजेल पारा ॥ मृगजळ जग भासे० ॥ ५ ॥

३१ पंचक, [ पृथ्वी, गण ज, स, ज, स, य, ल, ग. ]

असेल जरि पूजिला विपुल हस्तकें श्रीहरी ॥ नसेल जरि योजिले विषम भाव सर्वांतरीं ॥ करूनि विहितें बरीं समुळ अर्पिलीं ईश्वरीं ॥ तरीच गुरुकेसरी भवगजासि नाहीं करी ॥ १ ॥ महेश महदादिकीं वसत एक भेदेविना ॥ अशीच जरि भावना सतत वर्तली जें मना ॥ दया सकल भूतकीं विशद जन्मजन्मांतरीं ॥ तरीच गुरु० ॥२॥ अनर्थपद वागवी स्मरण सर्वदां जागवो ॥ विशाद मद मोह हा समुळ चित्तिचा त्यागवी ॥ सदां विदुषसंगतीं निज हिताप्रती जें धरी ॥ तरीच गुरु० ॥३॥ जगासि जनका असे विमल लक्षणीं लक्षिलें ॥ सकांक्षवत सक्रिये परम आदरें रक्षिलें ॥ निशापति दशा वसे विगत संशयो अंतरीं ॥ तरीच गुरु० ॥ ४ ॥ आनंदगिरिशिखरीं मन मयूर नाचे सदां ॥ दिवा निशिहि नाठवे अणिक संपदा आपदा ॥ निजानुभव रंगला विशद बोध अर्कांपरी ॥ तरीच० ॥५॥

३२ पंचक, [ तोटकवृत्त गण स, स, स, स. ]

वितरागबळें जड बुद्धि वळे ॥ रति मोह टळे ममता वितुळे ॥ अभि-

मान गळे भवपाश जळे ॥ गुरुराजदयें जड वर्म कळे ॥ १ ॥ परमार्थहि सार्थक तेंच घडे ॥ भ्रम मत्सर शोक कदां न घडे ॥ गुणदोष विकार समूळ टळे ॥ गुरुराजद्यें० ॥२॥ निजरूप अरूप अरूप वसे ॥ मजवीण दुजें सहसा न दिसे ॥ मग भासत तेचि प्रतीति बळें ॥ गुरुराज० ॥३॥ सुविवेक धरीं सहवास करीं ॥ निज शांति सुवृत्ति सुखेंचि वरी ॥ मग धैर्य वसे सहसा न ढळे ॥ गुरुराज० ॥ ४ ॥ अविनाश अभंग असंग सदां ॥ न वसे न दिसे मज रंग कदां ॥ घन चित्स्वरूपीं मन हेतु टळे ॥ गुरुराज० ॥५॥

३२ [ नवविध भक्तिरत्नमाला. द्रुतविलंबित गण न, भ, भ, र. ]

श्रवगभ कि परिक्षिति राजया ॥ शुकमुखें बरवी घडली जया ॥ परम मोक्ष तथाप्रति लाभला॥ वदति वेद तयासि भला भला ॥१॥ सतत कीर्तन तें शुक नारदा ॥ विषम भाव मनीं न वसे कदां ॥ विगत मोह परिग्रह आश हो ॥ विहरतो स्वमुखें गत पाश हो ॥२॥ निशिदिनीं स्मरणीं प्रहराद तो ॥ स्थिरचरीं हरि एक अभेद तो ॥ हरि दयाळ तया जननीपरी ॥ चिरुनि काष्ठ विशिष्ठ तनू धरी ॥ ३ ॥ चरणसेवन तें करितां रमा ॥ परम सौख्य मनीं नमनीं श्रमा ॥ अनुदिनीं अधिकाधिक आवडी ॥ हरि वियोग न साहत ते घडी ॥ ४॥

३२ वसंततिलका.

काया मनें करुनियां पृथुराज भावें ॥ राज्योपचार हरि-अर्चन तें करावें ॥ त्यावीण आणिक निकें न गमे तयाला ॥ तो माधवें निजपदाप्रति शीघ्र नेला ॥ ५ ॥ ध्यानीं मनीं सतत अक्रुर भक्तराणा ॥ सर्वत्र वंदित असे पुरुषा पुराणा ॥ देखूनि तें विमल वंदन-भक्ति देवें ॥ देऊनियां स्वपद उद्धरिलें सदैवें ॥६॥ कायासहीत भुवनत्रय तुच्छ ऐसें ॥ मानूनि दास्य निरहंकृति आत्मतोषें ॥ केलें समीरकुमरें गजरें अपारें ॥ त्या दीधलें रघुवरें निज रूप सारें ॥ ७ ॥ केयूरकुंडलमणी कनकीं विभासे ॥ कल्लोळ बुद्बुद-तरंगहि नीर जसे ॥ नानारूपें पट दिसे परि तंतु साचे ॥ सख्यत्व तद्वत जनार्दन अर्जुनाचें ॥ ८ ॥ स्वदेहाच्या साह्याप्रति कनक कांता धन शिशू ॥ सुवस्त्रें वैडूर्यें विविध उपभोगादिक पशू ॥ बळीनें त्या देहा-सह विभव अर्पूनि हरिला ॥ बळें बांधी जैसा चपळ पळतां चोर धरिला ॥ ९ ॥ नवविध भजनाची साजिरी रत्नमाला ॥ स्वकिय करुनि

कंठीं घालिती जे स्वलीला ॥ निरतिशय सुखाच्या पूर्ण कल्याणधामीं ॥ सहज निजरूपें हो रंगले जे आरामीं ॥ १० ॥

३४ स्फुटश्लोक, [ शिखरिणी ]

असंख्याता वृत्ती विचरत पदार्थीं बहु परी ॥ असें चित्स्फुर्ती तें विरहित नसे मात दुसरी ॥ घटाकारें पृथ्वी कनक कटकीं तोय लहरी ॥ कृपें तैसी सत्ता विलसत विना भेद कुसरी ॥१॥ घटा लक्षूं जातां घटपण तयामाजिं न वसे ॥ अलंकारीं सोनें जग नग तसा हेमचि दिसे ॥ तसा आत्मा देहीं अनुभवि सदां जे मिरवती ॥ प्रपंचीं ते योगी विधि हर तयालागिं नमिती ॥ २ ॥ जळा क्षाळी जाळी अनल पवनालागिं उडवी ॥ मना बुद्धी गाळी अखिल सदनीं व्योम दडवी ॥ विदेहत्वें चाळी विविध समुळीं भेद बुडवी ॥ निजानंदें पाळी अघटित जनीं तोचि घडवी ॥३॥

३५ श्लोकपंचक, [शार्दूलविक्रीडित वृत्त, गण म, स, ज, स, त, त, ग.]

सत्कर्म न करी हरीसि न धरी जो अंतरीं सर्वदां ॥ सारासार विवेक शून्य करुनी सेवीतसे दुर्मदा ॥ संसारीं रत होउनी विचरतो आली जरी हे जरा ॥ तो जाणा नर बैल मानवरुपें होडा दुपायीं खरा ॥१॥ ये लोकीं नरदेह दुर्लभ असा पावोनियां मूढ रे ॥ सत्संगीं न वसे आसक्त विषयीं दुर्वासना दृढ रे ॥ कांता कांचन पुत्र मित्र सुहृदें त्यांकारणें घाबरा ॥ तो जाणा नर० ॥ २ ॥ वेदांच्या वचनीं पुराणश्रवणीं सद्भक्ति नाहीं मनीं ॥ स्वप्नींहिं नमनीं कुतर्क धरुनी निंदा करी सज्जनीं ॥ ऐसा पामर भूलला निशिदिनीं जो गुंतला दुर्भरा ॥ तो जाणा नर० ॥३॥ दुःखें दुर्जय भोगिलीं बहु परी जी जन्मजन्मांतरीं ॥ नाना दुर्घट यातना यमपुरीं ज्या सोशिल्या अंतरीं ॥ त्यांची लाज नसे निरंतर असे उन्मत्त प्राणी बरा ॥ तो जाणा नर० ॥४॥ जो कृष्णार्पण सत्क्रिया न करितां कर्मीं अहंता धरी ॥ भोगी दुष्कृतिचीं फळें मग रडे घेवोनि वोझें शिरीं ॥ रंगेना निजरंग पूर्ण हृदयीं जो न स्मरे ईश्वरा ॥ तो जाणा नर० ॥ ५ ॥

३६ श्लोकपंचक, [ वसंततिलका. ]

झाली प्रभात उठ सत्वर साधका रे ॥ देतील हे न कळतां रिपु साधका रे ॥ याकारणें जप निरंतर वैखरी रे ॥ हा मंत्र राम निजमूर्ति षडक्षरी रे ॥१॥ संसार दुस्तर समुद्र तरावयासी ॥ तूं बुद्धिमंद नर भाव धरावयासी ॥ प्रातःस्मरामि तरि लौकरि तूं करी रे ॥ हा मंत्र राम० ॥२॥

बुद्ध्यादिकें सकळ इंद्रियवृंद पाही ॥ झाला असे विषय सन्मुख सर्वदाही ॥ त्यांलागुनी शमदमें नियमें धरीं रे ॥ हा मंत्र राम० ॥३॥ पावोनि दुर्लभ अशी तनु मानवी रे ॥ झाली असे तुज कशी दिवसा निशी रे ॥ आत्मप्रकाश करुनी जिव उद्धरीं रे ॥ हा मंत्र राम० ॥ ४ ॥ आतां तरी त्वरित सावध या प्रसंगें ॥ होऊनि तूं सहज पूर्णपदींच रंगें ॥ सायुज्य मोक्षपदवी स्मरणें वरी रे ॥ हा मंत्र राम० ॥ ५ ॥

## ३७ पंचक, [ वसंततिलका छंद. ]

अद्यापि तें विष शिवें धरिलें स्वकंठीं ॥ कूर्में महीसि धरिलें अझुनी स्वपृष्ठीं ॥ अंभोनिधींत वडवानळ आदि अंतीं ॥ अंगीकृतः सुकृतिनः परिपालयंती ॥१॥ भासे सदैव शशि वक्र सदां कलंकी ॥ हा दोष तों प्रकट सत्य असे त्रिलोकीं ॥ माळीं शिवें धरुनि वाढविली महंती ॥ अंगीकृतः सुकृतिनः० ॥ २ ॥ भावें अनन्य शरणागत सद्गुरूसी ॥ आले पतीत जन केवळ हीन दोषी ॥ केले महा परम पावन साधु संतीं ॥ अंगीकृतः सु० ॥३॥ मी एक त्याहुनि विशेष अशेष पापी ॥ जाणोनिही न परतें स्वहितीं कदापी ॥ आलों तुला शरण सोडुनि सर्व गुंतीं ॥ अंगीकृतः ध० ॥ ४ ॥ सच्चित्सुखैक-घन तूं निजमूर्ति रामा ॥ निःसंग रंग पुरुषोत्तम पूर्णकामा ॥ देई असां मज तुझी अविनाश शांति ॥ अंगीकृत० ॥ ५ ॥

## ३८ पंचक, [ सज्जनपर, शार्दूलविक्रीडित छंद. ]

वाचा सत्य दया मनीं तरि तया ज्ञानी म्हणों कां नये ॥ भगवद्भक्त विरक्त आत्मविषयीं सद्बुद्धिचा निश्चयें ॥ दैवी संपत्तिनें सुशोभित सदां संतोष हा अंतरीं ॥ स्वप्नामाजिं मुखावलोकन तरी त्याचें घडो श्रीहरी ॥१॥ निष्कामें निरहंकृती विहित तें सत्कर्म अत्यादरें ॥ सांगोपांग करी परंतु न ह्मणे मी एक कर्ता खरें ॥ पूर्णानंदपदीं सदैव विलसे कामादिकां संहरी ॥ स्वप्नामाजिं० ॥ २ ॥ सत्कर्माचरणीं समस्त करणें ज्याची सदां वर्तती ॥ हर्षामर्ष अपूर्ण पूर्ण घडतां नोहे कदां निश्चिती ॥ गोविंदाच्युत हीं सहस्र लिहिलीं नामेंच जिव्हेवरी ॥ स्वप्ना० ॥३॥ दाता धीर उदार शांत स्वरूपीं मानापमानीं कदां ॥ नोहे चंचळ चित्तवृत्ति स्वसुखीं भोगी महत्संपदा ॥ चित्तंतू घन ओतप्रोत भरला जो या स्वरूपांबरीं ॥ स्व० ॥ ४ ॥ ऐसा सज्जन लक्षणोक्त पहातां हे दृष्टि दृश्याकडे ॥ देखेना सहसा निजा-

त्मस्वरूपीं स्वानंदबोधें जडे ॥ ब्रह्मस्तंभ पिपीलिका स्थिरचरं जो पूर्ण रंगें भरी ॥ स्वप्नामाजिं० ॥ ५ ॥

३९ पंचक, [ मालिनीवृत्त. ]

सकलहि वश झाल्या या कला आणि विद्या ॥ परम चतुर झाला शीकला गद्यपद्या ॥ सदय हृदय नाहीं कोण मी हें कळेना ॥ तरि मग तितुकेंही ज्ञान तें कां जळेना ॥१॥ अपर धनद झाला पाहतां या भुलोकीं ॥ धन कनक ललामें ते न भोगी न शेखी ॥ द्विज विबुध न मित्रां दान यज्ञीं मिळेना ॥ तरि मग तितुकेंही द्रव्य तें कां जळेना ॥ २ ॥ द्वितिय सुरगुरू-जो शब्द-ज्ञानार्थ-बोधी ॥ दृढ पर उपदेशी सर्वही ग्रंथ शोधी ॥ रत अविहितकर्मीं चित्तवृत्ती गळेना ॥ तरि मग तितुकेंही बोलणें कां जळेना ॥३॥ अगणित घडलीं हीं सांग विध्युक्त कर्में ॥ शत मख जरि झाले मोहिले ते स-कामें ॥ परि हरिपदप्राप्तीलागिं जें आढळेना ॥ तरि मग तितुकेंही कर्म तें कां जळेना ॥ ४ ॥ गृह सुत धन दारा देह द्वारां अमूपें ॥ विषयपर सुखें जीं नश्वरें दुःखरूपें ॥ निजसुख निजरंगें जोंवरी आकळेना ॥ तरि मग तितुकेंही सौख्य तें कां जळेना ॥ ५ ॥

४० पंचक, [ इंद्रवज्रावृत्त. ]

वंध्यासुतें शुक्तिक रौप्यपात्रीं ॥ मृगांबुचे मीन भरोनि रात्रीं ॥ दातृत्व गंधर्वपतीस केलें ॥ हें सर्वही पर्व तसें उदेलें ॥१॥ सेवूनियां हो घृत कांसवीचें ॥ पराभवी तेज दिवीं रवीचें ॥ खपुष्प सप्तस्वर गायनाचे ॥ हे सर्वही पर्व तसेंचि साचे ॥२॥ लेवूनियां रज्जु भुजंगमाळा ॥ खेळे कळे बागुल इंद्रजाला ॥ छाया नुठे चित्र हुताशतेजें ॥ हें सर्वही पर्व तसें विराजें ॥३॥ भीष्मात्मजेसी वर वायुपुत्र ॥ क्लैबात्मजें जाणुनि ब्रह्मसूत्र ॥ लग्नासि नेलें धन दर्पणींचें ॥ हें सर्वही पर्व तसेंचि साचे ॥ ४ ॥ ते आमुचीं सोंगई हो म्हणोनी ॥ आले अजन्में परिसोनि कानीं ॥ मारूं अले घेउनि अश्वशृंगा ॥ आकाशिंच्या लावुनि नीळरंगा ॥ ५ ॥

४१ पंचक, [ शार्दूलविक्रीडित. ]

एकांतीं अनुकूल इंदुवदनी जे दिव्य सौदामिनी ॥ झाल्या, त जननीसमान नयनीं पाहूनि मानी मनीं ॥ किंवा पूर्ण सुवर्णकुंभ पडतां दृष्टी न देखे कहीं ॥ या चिन्हीं परिपूर्ण तो नरहरी झाला लिलाविग्रही ॥१॥ निंदा स्तोत्र जनीं वनीं अनुदिनीं मानापमानीं कदां ॥ हर्षामर्ष नसे आनंदघन तो

चित्तीं सदां सर्वदां ॥ पाहे चिद्भुवनीं जनार्दन जनीं जो व्यापिला सर्वही॥ या चिन्हीं परिपूर्ण तो नरहरी झाला लिलाविग्रही ॥२॥ काया वाङ्मनसा अला शरण जो सर्वत्रही अर्पुनी ॥ एके गर्जनतर्जनादि करुनी धाडी अपायीं वनीं ॥ हे दोघे सम भासती निजरुपीं निर्वैर सर्वें मही ॥ या चिन्हीं० ॥३॥ कर्मीं ब्रह्म प्रतीति सांग करितां विध्युक्त वर्णाश्रमीं ॥ निष्कर्मैं निरहंकृती स्थिरचरीं भगवत्कृपें जो नमी ॥ आत्मत्वीं जग देखणें नग जसा हेमीं नसे अल्पही ॥ या चिन्हीं० ॥ ४ ॥ स्वानंदामृत सेवुनी अमर जो देहीं विदेहीपणें ॥ दीनोद्धारक नित्य तृप्त हृदयीं संपन्न दैवी गुणें ॥ शोभे हा निजरंग निर्गुण निराकारीं सुखासंग्रहीं ॥ या० ॥५॥

४२ [ उद्गारलहरी, अनेक वृत्तात्मक श्लोक. ]

तंतू तंतुपणें न जाणत पटा नामा रुपा नातळे ॥ माती नेणत त्या घटासि सहसा मातीस माती मिळे ॥ किंवा हेम नगासि जाणत नसे कल्पांत झाला तरी ॥ ब्रह्मीं विश्व तसें नसोनि विलसें प्रत्यक्ष भासें जरी ॥१॥ भासे सर्प विवर्त रज्जुवरि तो रज्जूसि ठावा नसे ॥ स्थाणू स्थाणुपणें न जाणत नरा स्थाणूच तो कीं असे ॥ नेणे शुक्तिरुपें स्वयंभस्वरुपें ते शुक्तिका यापरी ॥ ब्रह्मीं विश्व मृगांबु जेविं विलसे या सूर्यरश्मीवरी ॥ २ ॥ काष्ठें जेंगट ताडितां रव करी गर्जोनि उच्च स्वरें ॥ तैसे अल्पमती अहंकृति गुणें देताति प्रत्युत्तरें ॥ भगवद्भक्त परापराध साहती सर्वात्मभावें सदां ॥ नोहे शब्द विखंड खंड करितां त्या हेमपात्रीं कदां ॥३॥ एकीं एक असोनि मूख अपुलें भासे दुजें दर्पणीं ॥ वाटे सर्वहि पीतवर्ण नयनीं ज्याच्या असे कामिणी ॥ अद्वैतीं जग द्वैत हें दिसतसे संकल्पयोगें जनां ॥ तात्पर्यार्थ असाच कीं गमतसे ज्याची जशी भावना ॥४॥ झाला सिद्ध स्वयंभ दर्पण तवा एकाच लोहांतरीं ॥ विद्वद्दर्पण स्वप्रकाश-घन तो सम्मूख घेतां करीं ॥ अज्ञानी नर तो तवा मलिन या संतप्त तापत्रयें ॥ श्रोत्रीं स्वानुभवी गुरू जरि मिळे तैं शुद्ध तोही स्वयें ॥ ५ ॥

जरि पर पुरुषातें भोगणें स्वस्थ चित्तें ॥ तरि करिं शिर घ्यावें छेदुनीयां स्वहस्तें ॥ विश्वत् विषयातें मानुनी साधुसंगें ॥ हरिसि शरण जावें बुद्धिनें सानुरागें ॥ ६ ॥

धेनूचें मन वत्स टाकुनि वना तें जाईना हो कदां ॥ ते सेवी तृण जीवना परि मनामध्यें वसें सर्वदां ॥ तेसें चित्स्वरुपीं निमग्न मन हें

होऊनियां तो मुनी ॥ लीलाविग्रहि दीनबंधु जगदुद्धारी दिसे या जनीं ॥ ७ ॥ देशांतरा कृगज ठेवुनि जाय ठेवणीं ॥ जैसा मनांत धन आठवितो क्षणोंक्षणीं ॥ ज्ञानें प्रपंच करिताति असेंच भासतें ॥ सच्चित्सुखीं सतत मानस तें विलासतें ॥ ८ ॥ उडे वावडी वातवेगें आकाशीं ॥ असें सूत्र हातींच तें निश्चयेंसीं ॥ तसें वर्ततां देह प्रारब्धयोगें ॥ मुनींचीं मनें रंगलीं पूर्ण रंगें ॥९॥ जैशी शील पतिव्रता अवयवां झांकूनि वर्ते जनां ॥ किंवा सांपडल्या दरिद्र अवघें द्रव्याढ्य जो तो वनीं ॥ तैसे सज्जन आपुल्या गुणगणां जाणोनि आच्छादितो ॥ देहीं बाळ पिशाच्च उन्नत दशा दावोनिया वर्तती ॥१०॥ पुष्पांची वनवाटिका जगरुपें शोभे विचित्राकृती ॥ नानारंग सुरंग जीवकुसुमें देती अनेकद्युती ॥ त्याहीमाजिं सुसेव्य दिव्य सुमनें मानें सुगंधें भलीं ॥ झालीं धन्य स्विकारिलीं गुरुवरें तीं चित्पदीं शोभलीं ॥ ११ ॥ पुण्याचें फळ सौख्य शाश्वत मना व्हावें असें आवडे ॥ पापाचें फळ दुःख लेश कवणा स्वप्नांतरीं नावडे ॥ यत्नें दुष्कृत आचरोनि सुख हें कां इच्छिती पामरें ॥ पुण्याचा लवलेशहि न घडतां हें दुःख वाटे पुरे ॥ १२ ॥

अहं देही ऐशा अनृत वचनें दोष घडती ॥ महत्पापें येणें अधम नरकीं जीव बुडती ॥ अहं ब्रह्मास्मी हें वचन वदतां सत्य वचनीं ॥ महत्पुण्यें येणें सुजन रमती सौख्यसदनीं ॥१३॥

आत्मस्वरूप हृदयीं सम साम्य आहे ॥ अज्ञानही सतत जेथ समग्र राहे ॥ जेथें निबीड तम तेथ रविप्रकाश ॥ आश्चर्य हें गमतसे मजला विशेष ॥ १४ ॥

काष्ठीं अग्नि असोनि गुप्त न दिसे कोणासि कामा नये ॥ केल्या मंथन यज्ञ होमहवनें सर्वांसि कार्यासि ये ॥ तैसा हा हृदयस्थ राम नकळे देहात्मबुद्धी जना ॥ सारासार विवेक पूर्ण करितां ये प्रत्यया सज्जना ॥ १५ ॥ गोहत्त्या शत एक विप्रवध तैं ऐसें श्रुती बोलती ॥ ब्रह्मत्या शत एक स्त्रीवध घडे तेव्हां करी त्यांप्रती ॥ स्त्रीहत्या शत बाळवध तैं हें निश्चयें जाणिजे ॥ बाळेंही शत एक त्यासम मृषा वाक्यें मुखें बोलिजे ॥१६॥ शब्दें मृत्यु मृगा गजासि स्परशें रूपें पतंगा घडे मीना मृत्यु रसें सुगंध कमळीं घेतां अली सांपडे ॥ एकेकाविषयीं स्पृहा धरुनियां हे पांचही नाडती ॥ जो या सेवित नित्य पंच विषयां

त्याची कसी हो गती ॥ १७ ॥ माया मोह नदींत विश्व पुलिनीं मिश्रीत चित्शर्करा ॥ दोहींतें निवडील तो चतुर हा इत्यर्थ झाला खरा ॥ तेथें देह-भिमान मत्त गज हा कांहींच कामा नये ॥ मुंगीतें निरहंकृती निवडुनी घेईल हा निश्चयें ॥ १८ ॥ घंटेमाजिं निनाद गंध सुमनीं माधुर्यता शर्करीं ॥ नेत्रा आंतिल बाहुली न निवडे ते शुभ्रता कर्पुरीं ॥ किंवा वायु नभीं सतेजपण हें मुक्ताफळीं निश्चयें ॥ विश्वीं राम तसा नये निवडितां तो जाणिजे प्रत्ययें ॥ १९ ॥

विष्णूजामात तीर्थे सकळहि उदरीं दिव्य रत्नावसौटा ॥ लक्ष्मी कन्या जयाची त्रिभुवन वदनीं कीर्तिचा घोष मोठा ॥ तेथें जातां तृषार्ती चुळभरि जळही प्राप्त कोणासिं नाहीं ॥ तैसा तो शब्द ज्ञानीं निजसुख न दिसे लेशही तेथ कांहीं ॥२०॥ भासे प्रत्यक्ष मिथ्या जग मृगजळ हें आदि अंतीं नसोनी ॥ यातें जो सत्य मानी नर मृगपशु तो मानवीही असोनी ॥ राहू दृष्टी दिसेना रवि-शशि-ग्रहणीं तो कळे जेविं तैसा ॥ आत्मा सर्वत्र व्यापी नकळत अवळां तो अहे नाहिं ऐसा ॥ २१ ॥

भोंने वक्र कुलालचक्र वरि त्या माजी बसे येउनी ॥ ते तेथूनि न हालतां दिसतसे भोंने असी लोचनीं ॥ प्रारब्धास्तव वर्तणें जनिं वनीं देशीं दिसे व्यापरीं ॥ विद्वद्वर्य सदां सुनिश्चळ निजानंदें स्वरूपांतरीं ॥ २२ ॥ मिष्टान्नांत विषप्रयोग जहाल्या ज्या नेणवे निश्चयें ॥ तेव्हां त्या क्षुधितास काय कळतें सेवील निःसंशयें ॥ संज्ञा होत तरीच ठाव अवघा टाकोनियां तो पळे ॥ तैसें या विषयांसि जाणुनि पुन्हा ज्ञानी तयां ना-तळे ॥२३॥ ज्ञानी पंडित वेदपाठक मुनी याज्ञीक हो ज्योतिषी॥ संन्यासी वनि वानप्रस्थ अथवा शास्त्रज्ञ किंवा ऋषी ॥ योगी साधक ब्रह्मचर्य अगमीं मौनी समस्तांप्रती ॥ होतां संग अनर्थ मूळ वनिता सिद्धांत बोले श्रुती ॥२४॥ पक्वान्नीं मृत मक्षिका पडलिया तें अन्न भक्षी तया ॥ होती क्लेश विशेष वांतिसमयीं संत्रास कर्त्री क्रिया ॥ स्वानंदामृत-भोजनीं जरि पडे हे कल्पना-मक्षिका ॥ तेव्हां तो परमार्थ व्यर्थ ह्मणतां संदेह मानूं नका ॥ २५ ॥ स्वस्थानीं सहजें अहंकृतिबिजें ज्ञानाग्निनें भर्जिलीं ॥ होतीं प्रस्तुत तीं निवारणसुधें जन्मांतरा वंचिलीं ॥ पेरायासि अयोग्य तें कृषिबलें जाणोनियां वर्जिलीं ॥ ब्रह्मीभूत तरोनि तारक जनां होऊनियां संचिलीं ॥२६॥ दावी दर्पण ज्यासि नापित तया भासे स्वरूप स्वयें ॥ याला केव-

ळ तो तवा मलिन या पृथ्वीकडे निश्चयें ॥ सांगे सर्व परोक्ष उत्तम कथा बोधोनि श्रोतेजना ॥ अंगें आपण बोधरूप नव्हतां विश्रांति कैंची मना ॥२७॥ मोजी माप अमूप धान्य परि तें अंतीं रिकामें पडे ॥ वक्ता काय तसा प्रसंग पडतां कामादिकां सांपडे ॥ गोणी पूर्ण भरे सर्वेचि रिचवे तेही पडे हो रिती ॥ श्रोत्यांच्या सहसा क्षणीक श्रवणीं तैशा वसा त्या स्थिती ॥ २८॥ स्वातीचा घन शुक्तिकेंत पडतां होताति मुक्ताफळें ॥ झालें वीष विशेष व्याल वदनीं तें काय केलें जळें ॥ सर्व ब्रह्म ह्मणोनि बोध करितां सच्छिष्य संबोधला ॥ दुष्कर्मी नर वर्णसंकर करी शिस्नोदरीं वेधला ॥ २९॥

शोभे वैराग्य भाग्यें उपरम समता भक्तिची प्रीति लागे ॥ सत्कर्मींही न भागे अबल जन तयां योग्य सन्मार्ग सांगे ॥ षड्वैरी दूरि मार्गे करुनि सदय जो ज्ञानि सच्छास्त्रयोगें ॥ झाला, चित्सौख्य रंगें त्रिभुवनविजयी ब्रह्मविद्वर्य अंगें ॥ ३० ॥

न होती हे कांहीं गुणमयी तयीं ब्रह्मचि असे ॥ तयापासूनीही जग ह्मणति वेदागम असे ॥॥ सुवर्णापासूनी उपजत तदैक्यें नग वसे ॥ पहातां ये रीती अवसरचि भेदा न गवसे ॥ ३१ ॥

उपादान मातीच जैसी घटातें ॥ उपादान तंतुत्व जैसें पटातें ॥ विना ब्रह्म येना जग प्रत्ययातें ॥ उपादान तें नेमिलें सत्य यातें ॥ ३२ ॥

नगीं दृष्टी मुष्टी कनक नुसतें सांपडतसे ॥ उपादानत्वें तें म्हणवुनिच ठायीं पडतसे ॥ असें सर्वावृत्ती चिदुदधि जगत्स्थान गवसे ॥ म्हणूनी ब्रह्मीं हें जग म्हणति वेदाऽगम असे ॥ ३३ ॥

स्नानें पानें दोष गंगा निवारी ॥ कीर्णिद्वारें इंदु संताप हारी ॥ नाशी दैन्या कल्पितां कल्पलता ॥ सत्संगें या नाश पावे समस्तां ॥ ३४ ॥

गिरिवर सह मेरू कज्जलें सिंधुपात्रीं ॥ सुरवर तरूशाखा लेखुनी भूमिपत्रीं ॥ सतत लिहित आंगें शारदा आदि माया ॥ तरि तव गुणसीमा नेणवे रामराया ॥ ३५ ॥

विमळ वाढविसी जरि सत्वरे ॥ तरिच पावसि पूर्ण महत्व रे ॥ गुरुपदांबुज सत्वर सांपडे ॥ परम तत्व निजांगिंच सांपडे ॥ ३६ ॥ दुर्योधनादि शिशुपालहि पापकारी ॥ वैरें करूनि जगदीश तयांसि तारी ॥ देऊनियां स्वपद मुक्तिपदासि नेलें ॥ वैचित्र्य काय परि पावन भक्त केले ॥३७॥

पिता राम माता विदेहात्मजा हो ॥ सखे बंधु माझे हरीभक्त पैं हो ॥ करी कर्म वेदोक्त तो मित्र जाणा ॥ तयाच्या बळें घाव घाली निशाणा ॥ ३८ ॥

दासीस पुत्र दिधला जगदेक-पाळें ॥ श्रीपाद सेवन तया घडलें कपाळें ॥ त्या वैभवेंकरुनि नारद वंद्य झाला ॥ आत्माचि अद्वितीय तो गमला अजाला ॥ ३९ ॥

केलीं तीर्थें न पूर्वीं द्विजहि न पुजिले होमिलें द्रव्य नाहीं ॥ ध्यानें विध्युक्त पूजा निशि-दिनिं भजनीं नार्चिला देव तोही ॥ दानें गो भूमिरत्नें फळ-जळ-वसनें नार्पिलीं याचकांही ॥ ते दुःखी नित्य देहीं न चुकत पडती जन्मधाराप्रवाहीं ॥ ४० ॥

जनीं काननीं सागरीं पर्वताग्रीं ॥ अमित्रीं सुमित्रीं त्रिलोकीं समग्रीं ॥ अवस्थात्रयीं वर्ततांही त्रितापीं ॥ नुपेक्षी कदां पूर्व पुण्यप्रतापी ॥ ४१ ॥

विद्याबळें विनयही अति मान्य लोकां ॥ ते बाह्य भूषण असे बरवें विलोका ॥ नाराधिला जरि हरी दृढ अंतरीं हो ॥ शृंगारिली मृततनू परि ते खरी हो ॥ ४२ ॥

या लोकिंचें जीवित साच नाहीं ॥ कां पापकर्मीं पडिजे प्रवाहीं ॥ क्षणार्ध सौख्यासरिसेंच मागें ॥ अकल्प दुःखावह भोग लागे ॥ ४३ ॥ मी देह माझीं धन पुत्र जाया ॥ हे वारि ओझें स्वपदासि जाया ॥ उपाय सेवा गुरुराजयाची ॥ तारी भवाब्धींत दया जयाची ॥ ४४ ॥

परिस विनवणी हे सद्गुरु देवराया ॥ जळति सकळ कर्मे आदरीं त्या उपाया ॥ पुढति जनन मृत्यु सर्वथाही न लागो ॥ मन तव पदपद्मीं मी-पणेंवीण जागो ॥ ४५ ॥

अष्टौपाळ किरीटि नित्य भिडतां ज्याचे पदीं दाटणी ॥ ब्रह्मा शंकर ध्यात नारद सदां शेष स्तवी आननीं ॥ योगीही सनकादि वंदिति शिरीं व्यासादि जे का मुनी ॥ तो हा भक्तपदें हरी निजकरें क्षाळी शिरीं वंदुनी ॥ ४६ ॥ निर्धारें रमतां मनादि करणां जो नाकळे तत्वता ॥ झाला तोचि सगुणरूप जन हे लावावया सत्पथा ॥ नंदाचे घरिचीं वळीत हरि हा वृंदावनीं गोधनें ॥ दंभा दूरि असे कदां न गवसे तीर्थें तपें साधनें ॥ ४७ ॥ सारासार विचार, नैश्वर असे तें, वारि सर्वोपरी ॥ चित्तातें शमवूनि नित्य विवरी श्रीसद्गुरूच्या घरीं ॥ तेव्हां दुःख-

निवृत्ति सौख्य भरिते अब्रह्मतेच्या शिरीं ॥ भावाभावविना निरंकुशपदीं साम्राज्य ऐसें करी ॥ ४८ ॥ कांता कांचन पुत्र मित्र दुहिता जामात भ्राता पिता ॥ बंधू इतर पीशुनें बहुजणें संख्या नसे मोजितां ॥ देहांतीं सकळीक मायिक नरा सांडूनि येती घरा ॥ अंतीं सोडविता नसे रघुवि-रावांचूनियां दूसरा ॥ ४९ ॥ मिथ्या वाद घडे विवेक न घडे आंगीं अ-हंता जडे ॥ दोषी दृष्टिपुढें समत्व न घडे वैराग्य तेंही बुडे ॥ शांती सौख्य क्षमा दया उपरती सद्भाव तोही उडे ॥ ऐसा योग समस्त येउनि घडे सत्संगही नातुडे ॥ ५० ॥

सुखोर्मींच्या मेळें नुगळति जळें नेत्रकमळें ॥ गळा बाष्पें दाटे पुलक उठती सात्विक बळें ॥ चळे कांपे देहीं नुपजती मनीं मोहपटळें ॥ गळे संसाराच्या स्मरति हरिचीं पादयुगुळें ॥ ५१ ॥

काया काय खरी मृगांबुलहरी हे स्वप्निंची सुंदरी ॥ आस्था कोण धरी खरीच दिसते हे जेविं वोडंबरीं ॥ पाहे भर्तृहरी त्यजूनि अवघे रिक्त चित्तांतरीं ॥ तूंही याचपरी करूनि भज रे कोदंड ज्याचे करीं ॥ ५२ ॥ कैंचा मोक्ष अमोक्ष सर्व लटिका कैंचा मुळीं बंध हा ॥ कैंचा रे जगडंब कोठूनि असे निर्माण नाहींच हा ॥ स्वप्नांचा उगमार्थ काय वदसी मूढाप्रती भास हा ॥ निद्रा कारण जागृतीं न पहातां मानी नीं व्यर्थ हा ॥ ५३ ॥

अहंकारा एकया धरुनि तुज तूं देह म्हणसी ॥ स्वरूपेंसी कैसी सदृढ लटिकी भ्रांति धरिसी ॥ जगद्व्यापी कृष्ण स्मरण करिं पां तूं कवण रे ॥ वृथा मोहें नोहे भ्रमित निजरूपा न विसरें ॥ ५४ ॥ नभा अंभा तेजा क्षिति मरुत व्यापी निबिड जो ॥ स्वयें चाळी पाळी अखिल त्रिगुणातीत पर जो ॥ सरेना विस्तारें अज अगुप जो त्या न विसरें ॥ स्मरें सोहं तो मी शबल तनु हेमीं न ह्मण रे ॥ ५५ ॥ स्वरूपा निर्लेपा सहज निज कां बा विसरसी ॥ अनित्या नियाचा सदृढ अभिमानी ह्मणविसी ॥ अहा ऐसा कैसा नवल लटिका मोह पडला ॥ असा देहीं मी हा ह्मणसि न दिसे लाज तुजला ॥ ५६ ॥ अनंता नामाचा रघुविर जनांमाजि वसतो ॥ विवेकी लोकांला प्रकटचि मनामाजिं दिसतो ॥ तनू पूरीं वर्ते पुरुषचि तया मार्गि ह्मणती ॥ तया लक्षी जो तो तद्रुपचि पहा व्यर्थ शिणती ॥ ५७ ॥ शिणावें काशाला जगदीश तरी बाह्यभितरीं ॥ तिहीं लोकांमध्यें सकळि-

क जिवां पालन करी ॥ कळेना लक्षेना जंववरि नसे ज्ञान पुरतें ॥ असारा त्यागावें तदुपरि पुढें काय उरतें ॥ ६० ॥

सायुज्यतेप्रति तनूसमवेत जो या ॥ हें कायसें जड असे मजला त्यजाया ॥ नाहीं जडीं विषमता निज चिद्रसाची ॥ पाणीच तें कठिण गार जसी न साची ॥ ६१ ॥

विषय इंद्रिय बुद्बुद-तोय मी ॥ ह्मणुनि जो स्वसुखीं स्थिर तो यमीं ॥ न सलिलीं सलिलाकृति कामना ॥ इतर संयम त्या वरि काम ना ॥६२॥

प्रियें कदां दुःखकरें न होतीं ॥ प्रियें मना व्याकुळता न देतीं ॥ प्रियें बहू साम्य तयासि नाहीं ॥ तो प्रिय सर्वोत्तम एक पाहीं ॥ ६३ ॥

भासे मिथ्यांबु जैसें दिनकर किरणीं लक्षितां साच नाहीं ॥ चित्र भिंतीविनाहीं अणुहि परि नसें अन्यथा जाण कांहीं ॥ तैसा लोकत्रयींही रघुविर भरला साक्षि या चारि साही ॥ पाहा प्रत्यक्ष येथें हरिविण दुसरें वागवी कोण दाही ॥ ६४ ॥

गोपाळीं मन रातलें मग तयां अप्रीति कामीं सदां ॥ सौख्यें गोवळसंगतीं विचरतां विक्षेप नाहीं कदां ॥ मोक्षाची परि चाड सोडुनि निरापेक्षें सवें रातलें ॥ स्वानंदीं रत सर्वदां अतिशयें नामामृतें मातलें ॥ ६५ ॥

फलत्यागें वर्णाश्रम उचित कर्मे दृढ करीं ॥ निषेधें पैं काम्यें प्रतिकुल तुतें, चाड न धरीं ॥ अशा, स्त्रीची चर्या करुनि परधर्मीं विचरसी ॥ बलात्कारें कैसा प्रकट दिवसा रात्र करिसी ॥ ६६ ॥

सर्वीं सर्वत्र वस्तू सम विषम नसें जंगमीं स्थावरीं हो ॥ तेथें हे रंग नाना विलसति असतां ऐक्यता अंतरीं हो ॥ याचा सिद्धांत ऐसा शुभ अशुभ क्रिये सारिख्या वर्णव्यक्ती ॥ झाल्या कर्मानुसारें विविध प्रकृति या गुणभेदें प्रयुक्ती ॥ ६७ ॥

अनुभव नसतां हो शब्दब्रह्मेंकरूनी ॥ निरतिशय सुखातें पावलें कोण ज्ञानी ॥ सफलित तरु जैसा बिंबला पूर्ण डोहीं ॥ मधुर सफळ स्वादा पावला कोण पाहीं ॥ ६८ ॥

स्वपति सन्निध वर्तत सुंदरी ॥ परि पती वचनें न धरी शिरीं ॥ तदुपरी निगमागम जाण तो ॥ परि हरी भजनेंविण शीण तो ॥६९॥

जंववरि मन रामीं रातलें पूर्ण पाहीं ॥ तंववरि प्रणवांगें साधनें व्यर्थ

थाहीं ॥ ह्मणवुनि सकलांगें राघवातें भजावें ॥ हृदयकमळकोशीं रामरूपा भरावें ॥ ७० ॥

विशाळा त्या माळा दृढ नरकपालादिक गळां ॥ कशा अग्निज्वाळा विषम निढळीं शांति बहळा ॥ निजांगीं वेल्हाळा हिम अचळ बाळा निजकळा ॥ असा शंभू भोळा हृदयकमळामाजिं कवळा ॥ ७१ ॥

माथा जान्हवि दिव्य लाघवि काळा भाळीं शशीची कळा ॥ कर्णीं कुंडल मुंडमाळ हृदयीं कंठीं विषें सोज्वळा ॥ भस्माचा उधळा गजाजिन गळां वामें असे आबला ॥ आंगीं भूषित दीर्घ व्याळ दिसती जे वर्षती गारळा ॥७२॥

कमल समल पंकावांचुनी उद्भवेना ॥ हिमकरहि कलंकी दोष त्याचा ढळेना ॥ मुकुल निकर बिंबीं अंधकारीं दिसेना ॥ अतुल मुख हरीचें तूलना हे घटेना ॥ ७३ ॥

तुझ्या रंगणीं शांति विश्रांति पावे ॥ तुझ्या पादपद्मीं क्षमाही विसावे ॥ सुखावे निजांगीं हे दयाहीफलासी ॥ निजानंद तूं सद्गुरू चिद्विलासी ॥७४॥ तुझ्या कामनें काम निष्काम वागे ॥ मनोमंदिरीं सत्य निर्वाण जागे ॥ कृपावैभवें भक्त कैवल्यवासी ॥ निजानंद तूं सद्गुरू चिद्विलासी ॥७५॥ पदीं रंगलों चित्पदीं मी निवालों ॥ नदी सागरीं यापरी पूर्ण झालों ॥ अजत्वा प्रबोधूनियां द्वैत नेसी ॥ निजानंद तूं सद्गुरू चिद्विलासी ॥ ७६ ॥

## स्फुटश्लोक.

उदासीन चित्तीं असोनी स्वदेहीं ॥ प्रपंचीं तया नाठवे द्वैत कांहीं ॥ विचारी विवेकें निवारी भवातें ॥ जिवन्मुक्त साधू ह्मणावें तयातें ॥ ४ ॥ जनाचार चाले विधीयुक्त बोले ॥ सदां सर्वदां सर्वसाक्षी निवाले ॥ न बाधे कदां कल्पना काम जेथें ॥ जिवन्मुक्त साधू म्हणावें तयातें ॥ ५ ॥ भजे मत्त मतांत्तरीं एक पाहे ॥ नव्हे खंड आखंडता दृढता हे ॥ न मोडे तदाकार वृत्ती मनातें ॥ जिवन्मुक्त० ॥ ६ ॥

ने घे वैभव दुःखदायक नको बोलावया व्युत्पती ॥ ने घे पंडित मार्ग गायनकळा तेही नको श्रीपती ॥ नाहो मारुत धारणा श्रम बहू सिद्धी न मागे तुतें ॥ ज्या सौख्यें मुनि बोधले विचरती ते दे दयाळा मतें ॥ ७ ॥ ने घे मायिक साधनें मजप्रती सीतापती वस्तुता ॥ ने घे बाधक साधकांप्रति सदां मोहीत हे मान्यता ॥ ने घे इंद्रपदा विरोधाचि सदां सर्वापरी हीन तें ॥ ज्या सौख्यें मुनि० ॥ ८ ॥ नाना साधन

बाह्य वेश न करा सारांश शोधा पुरा ॥ देहादीक चराचरास विसरा सच्चित्स्वरूपीं भरा ॥ हा जाणूनि मृषा प्रपंच विसरा सारूनि काष्ठा परा ॥ माथां ठेवुनि पाणि पावन करीं त्याचीं पदाब्जें धरा ॥ ९ ॥

शोधूनि सारांश असार सारा ॥ सारा न लक्षी तरि तो विषारा ॥ पारा न जाणे श्रुति तर्कधारा ॥ तें जाणणें तूं निज निर्विकारा ॥ १० ॥

गुणानिर्गुणातीत जो नांदताहे ॥ गुणानिर्गुणातीत होऊनि राहे ॥ सदां पूर्ण जें पूर्ण जो पूर्ण पाहे ॥ तया वर्णितां शब्द निशेष पाहे ॥ ११ ॥ रवी दाखवी तें कवी पूर्ण जाणे ॥ कवी दाखवी तें रवी तो न जाणे ॥ कवी तोचि रे जो रवीतें प्रकाशी ॥ रवी लोपला पूर्ण ज्याचे प्रकाशीं ॥ १२ ॥

भार्या पाही उपेक्षी तुजजवळि नसें काम तैं तुच्छ लक्षी ॥ गेली लक्ष्मी परिक्षीं तदुपरि सहसा बंधु गेहीं न रक्षी ॥ ऐसे जे पूर्वपक्षी कळत निदसुरें जे तयां काळ भक्षी ॥ तैसा माझा नुपेक्षी दशरथकुळ चिद्भानु जो सर्वसाक्षी ॥ १३ ॥

परहित निवटाया वेश केला नटाया ॥ करिसि किति धिटाया देह आला विटाया ॥ स्वहित करि सुटाया काळ आला कुटाया ॥ भज सुरमुकुटा या कर्मबंधा सुटाया ॥ १४ ॥

दे देवा क्षीर मातें म्हणवुनि निरुतें बोलिलें वाक्य बाळें ॥ दीनानाथें दयाळें क्षिरनिधि दिधला त्यासि त्रैलोक्यपाळें ॥ ऐशा सांडूनि लोकांप्रति मुखकमळें मागसी पोटजाळें ॥ नाहीं अद्यापि तृप्ती मर मर मनुजा छीः तुझें तोंड काळें ॥ १५ ॥

जन्मोनियां जन्मकथा न जाणे ॥ जन्मोनिया जन्मविनाश नेणें ॥ जन्मोनियां सार्थक जन्म त्याचा ॥ जन्मोनि झाला निजरूप साचा ॥ १६ ॥ स्वसंकल्पयोगें अहं देह मानी ॥ नसे कल्पना तैं शिवत्वा न मानी ॥ असे स्वर्ग नर्कासि तो पात्र झाला ॥ स्वसंवेद्य शस्त्रें करीं छेद याला ॥ १७ ॥

अहो बोलिजे बोल त्याहूनि पांहो ॥ निराळेंचि तें कासया बोलताहो ॥ आतां स्तुति सांडा उगे मौन राहा ॥ आह्मी मौन आहों त्यजा भावही हा ॥ १८ ॥ जया मौन ना बोलणें हीं असेना असें एक आहे ह्मणाया दिसेना ॥ मनें कल्पिजे त्यासिही जाणताहे ॥ ह्मणे जाण तें त्यासि आसोनि राहे ॥ १९ ॥

तंववरि भव जाची बुद्धि जें भेददाची ॥ विविध मति दिराली तें गमे शुक्ति कांची ॥ सहज विचरतांही सा निजानंद डोहीं ॥ विदित विशद संतां जाणणें तेंचि पाहीं ॥ २० ॥

जो रंगीं निजरंग रंगुनि महा रंगातितें शोभला ॥ ओसंगीं विलसोनि संगरहितद्वंद्वीं असें बैसला ॥ जो विश्वीं वसतो अतेंद्रियपणें सर्वेंद्रियें चेतला ॥ तो हा पूर्णरंगों धरूनि सगुणी रंगेंविना रंगला ॥ २१ ॥

## ४४. [ विषयपंचक. ]

दृष्टी दीप पतंग लक्षुनि उडी घालूनियां तो जळे ॥ ऐसें दुर्घट दुःखरूप विषयां अज्ञादिकां नाकळे ॥ या एका विषयें तयांसि व्यसनीं पाडूनि केलें अंत ॥ जे या सेविति नित्य पंच विषयां होइल त्यांचें कसें ॥ १ ॥ नादीं लुब्धक वेणु लाउनि मृगां घटारवें पारधी ॥ मारी बाण अचूक ठाण धरुनी तत्काल शस्त्रें वधी ॥ या एका विषयें० ॥ जे या सेविति नित्य पंच विषयां० ॥२॥ झाला मत्त करी करीण दुसरी स्पर्शें तिच्या तो वनीं ॥ पावे बंधन दासयुक्त असतां घेऊनि यती जनीं ॥ या एका विषयें० ॥ जे या सेविति० ॥३॥ स्वेच्छा मत्स्य जळीं क्रिडे परि गळीं लागोनियां सांपडे ॥ तो येऊनि कडे पडे मग उडे प्राणांत जेव्हां घडे ॥ या एका० ॥ जे या सेविति० ॥४॥ पद्मीं षट्पद गुंतले परिमळासाठीं तडागोदरीं ॥ तेथें वारण भक्षिताति कमळें संहारले यापरी ॥ या एका० ॥ जे या सेविति० ॥ ५ ॥

## ४५. [ पंचक. ]

श्रीकृष्ण विष्णु पुरुषोत्तम रामचंद्रा ॥ गोविंद माधव मुकुंद दया-समुद्रा ॥ गोपाळ केशव जनार्दन कैटभारी ॥ दामोदराच्युत त्रिविक्रम हे मुरारी ॥ १ ॥ नारायणा नरहरी गरुडध्वजा रे ॥ संकर्षणा कमठरूप अधोक्षजा रे ॥ शोरी उपेंद्र मधुसूदन वामना रे ॥ तूं नंदनंदन परात्पर चिद्घना रे ॥ २ ॥ गोवर्धनोद्धरण गोवळ पूतनारी ॥ लक्ष्मीनिवास जगजीवन सौख्यकारी ॥ श्रीवत्सलांछन सुदर्शन चक्रधर्ता ॥ कालीयमर्दन-चतुर्भुज विश्वकर्ता ॥ वैकुंठनायक गुणातित यादवेंद्रा ॥ श्री रंग विठ्ठल अनावृत पूर्ण भद्रा ॥ तूं पद्मनाभ हृषिकेश अनंतशायी ॥ हे वासुदेव अज अव्यय सौख्यदायी ॥ ४ ॥ प्रद्युम्न श्रीधर हरी अनिरुद्ध प्रेमें ॥ ऐसीं अनंत सुखदायक दिव्य नामें ॥ वाचें सदैव स्मरतां जडजीव अंगें ॥ मायार्णवीं तरति रंगानि पूर्ण रंगें ॥ ५ ॥

# दुर्बोध शब्दार्थ कोश.

### अ.

अउलें—प्रेमानें बोलावणें
अंकिला—आटोक्यांत-आज्ञेंत ठेवला
अकिंचन—दरिद्री
अखिल—संपूर्ण
अगाध—अवर्णनीय, गहन
अगोचर—इंद्रियांनीं जाणण्यास अशक्य
अग्निअर्चन—पूजा, श्रौतस्मार्त कर्म
अर्चन—पूजा
अचेतन—जड
अज—जन्मरहित, परमेश्वर, ब्रह्मदेव
अडळ—साह्य, मदत
अंतराय—विघ्न
अंतवंत—नाशवंत
अतीत-गत, पलीकडचें, अमर्याद
अद्वितीय-अनुपम
अधिष्ठान-स्थान, आश्रय
अध्यात्म—शरीर, इंद्रियें आणि प्राण यांपासून होणारें दुःख, शरीरस्थित त्वंपदवाच्य आत्मा
अनघ—निष्पाप
अनन्य—एकनिष्ट, भक्त
अनपायि—अविनाशी, अव्यय
अनर्घ्य—अमोलिक
अनंत—देश, काल, वस्तु परिच्छेदरहित
अनवरत—निरंतर राहणारें
अन्वय संबंध
अन्वयव्यतिरेक—संयोग आणि वियोग, संबंध आणि संबंधाभाव
अनादि—प्राचीन, उत्पत्तिरहित
अनामय—निरोगी
अनारिसें—वेगळें, भिन्न
अनावर-निवारण्यास अशक्य
अनिर्देश्य-नेमकेंच ह्मणून दर्शविण्यास अशक्य
अनिल—वायु
अनिर्वचनीय—निश्चय करण्यास अशक्य
अनुकंपा—दया, प्रेम
अनुग्रह—प्रसाद, उपदेश, कृपा
अनुवादणें—स्पष्ट बोध होण्याकरितां फिरून शब्दोच्चारण करणें.
अनुद्वेग—निष्काळजी
अनुसंधान—लक्ष्य
अनुस्युत-व्याप्त, अखंड टिकणारें
अपरमित—अमर्याद
अपरोक्ष—समक्ष, प्रत्यक्ष
अपैसे—आपल्या आपण

अप्रमेय—निश्चय करण्यास अशक्य
अब्रह्मस्तंभपिपीलिका—यावच्चराचर
अभिनव—अपूर्व, चमत्कारिक
अमूप—अगणित; पुष्कळ
अमूर्त—निराकार ब्रह्म
अवतरण—अवतार
अव्यय—नाशरहित
अरुतें—अलीकडचें
अरुवार—सुंदर; कोमल
अर्णव—समुद्र
अर्ती—अपेक्षा
अर्धोदय—॥अमार्के श्रवणे पाते संगमे पौष माघयोः ॥ अमावास्या; रविवार; श्रवण नक्षत्र; व्यतिपात वै पौष व माघ यांची संधी असेल तेव्हां अर्धोदय येतें व यांत कांहींन्यून असेल तर महोदय पर्वणी येते.
अलख—अलक्ष्य
अलगट—वेगळा
अवकळा—फजीती; स्वरूपनाश
अवधारणें—ऐकणें
अवलीळा—सहज
अवस्थात्रय—जागृति, स्वप्न, सुषुप्ति किंवा बाल्य,-तारुण्य आणि वृद्धत्व
अवाप्तकाम—पूर्णकाम
अविद्या—अज्ञान; माया
अव्यक्त—अदृश्य; माया; सूक्ष्म
अशेष—संपूर्ण
अष्टभाव—आठ सात्विक भाव
अष्टांगयोग—यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, आणि समाधि या अंगानीं युक्त योग
असिपद—तूं आहेस हें पद
अस्ति भाति प्रियरुप आत्मा—अस्ति· आहे, भाति-शोभतो, प्रिय-आवडता रूप-स्वरूप असा आत्मा
अहंबुद्धि—मीपणा
अहळणें—ताप होणें
अहाळी बहळी—फार; अतिशय
अहिकुंडलवत तनु पहाता—सर्प व सर्पाचें वेटोळें हीं जशीं भिन्न नाहींत त्याचप्रमाणें स्वरूपाहून शरीर भिन्न नाहीं
अहेव—सुवासिनी
अहेवदोर—मंगलसूत्र
अळुमाळ—थोडें; किंचित्
अक्षर—स्थिर; ब्रह्म

**आ.**

आकर—खाण
आकर्णनयन—मोठ्या डोळ्याचा; भव्य नेत्र
आकार—दृश्य वस्तु; जग
आगम—शास्त्र
आगळा—अधिक
आगी—अग्नि
आघवें—सर्व; अवघें
आघातीं—कठिण प्रसंगीं

आटाआटी—श्रम
आतळणें—स्पर्श करणें
आतुडणें—सांपडणें, प्राप्त होणें
आतुर—फार उत्सुक; मरणोन्मुख
आत्मचर्चा—ब्रह्मविचार
आत्मनिवेदन—नवविध भक्तींतील शेवटची भक्ति
आत्मज्ञानी—ब्रह्म जाणणारा
आत्मानात्मविवेक—आत्मा व देहसंबंधीं विचार
आदिपुरुष—भगवंत
आदिबीज—ॐकार
आदिशक्ति—मूळ माया
आधणीं—उकाड्यांत
आधी—मानसिक व्यथा
आध्यात्मिक—शरीरसंबंधीं रोग किंवा दुःख
आन—निराळा; भिन्न
आंदण—बक्षीस देणें
आन्दु—साखळ्या
आंबलें—भोपळा
आमोद—हर्ष, आनंद
आम्नाय—वेद
आर्त—पीडित, इच्छा, दुःख
आर्तें—आवडीनें
आथिला—असलेला
आरुत—छांदिष्ट; असंबद्ध
आवरणभंग—मायेचा नाश
आवर्त—पाण्यांतील भोंवरा
आश्रम -घर [ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास] असे चार प्रकारचे आश्रम आहेत
आस—आशा
आसुरी तामसी प्रकृति
आस्पद—स्थान

## इ.

इतुलें—येवढें
इंदीवर—काळें कमळ
इंद्रजालवत् -मायामय, खोटा
इंद्रायण कडू वृंदावन
इंद्रियार्थ—विषयार्थ
इंधन—सर्पण; लांकुड
इषणा—इच्छा
इलाही—परमेश्वर
इहामुत्र—इहपरत्र; हा व परलोक
इक्षुदंड—ऊंस
ईक्षणमात्रें—पाहिल्याबरोबर

## उ.

उखर—माळ जमीन
उगला—निरिच्छ
उचंबळणें-हर्ष पावणें
उच्छेद नाश
उत्तीर्ण—उतराई झालेला
उत्साह—हर्ष
उदासीन—निरपेक्ष
उदेणें—उदय पावणें
उद्वस—ओस; शून्य
उन्मन—विरक्त

उन्मनी—मनाचा लय होतो अशी ध्वी अवस्था
उपचार—उपाय, आदर
उपरति—विषयनिवृत्ति, वैराग्य
उपरम—शांति, विराम
उपसाहणें—क्षमा करणें
उपादान—मूळ कारण
उपाधि—जग, संसार, संसर्ग
उबग—उपेक्षा; कंटाळा
उमस—विसांवा; विश्रांति
ऊर्णनाभी—कोळी, कोष्टी
ऊर्ध्वपंथ—मोक्षमार्ग
ऊर्मी—लाटा, तरंग

**ए.**

एकदेशी—अल्पव्यापी
एकनिष्ठ—ईश्वरपरायण
एकबेक—समविषम
एक मठीं तम दीपक राहे—एकंच ठिकाणीं अंधार आणि दीपक ह्मणजे दिवा किंवा उजेड रहातो, अशक्य
एकमेव—एकच
एक सत्ता—सर्वत्र व्यापीब्रह्मसत्ता
एकावळी—माला
एकवीस स्वर्ग—ज्योति, शीत, विमल, अभियागता, प्रकाश, विख्यात, सदोदित, रम्य, सहज, सिद्ध, आनंद, दिव्य, एकांत, अमळ, तृप्ति, निर्भळ, प्रेम, निज, लय, अंति, शिव

ऐहिक—इहलोकसंबंधीं

**ओ; औ.**

ओघ—प्रवाह
ओगरणें—वाढणें
ओगरू—वाढणारा
ओतप्रोत—सर्वव्यापक
औट—साडेतीन
औट मात्रा—अकार; उकार; मकार; आणि अर्ध मात्रा ॐकार

**क.**

कटक—सैन्य
कडोविकडी—नानाप्रकारें
कणवा—दया
कर्तृत्वबीज—करण्याचा हेतु
कंदर—गुहा
कपोल—गाल
कंबुकंठ—शंखासारखा गळा
करण समुच्चय—इंद्रियवृंद
कर्णधार—नावाडी
कर्मकिंकर—कर्मदास
करतालिका—करवार
करहाटक—कऱ्हाड क्षेत्र
कलमल—मूर्च्छा, मोह
कल्मष—दोष, पाप
कवळ—ग्रास, कावीळ
कषाय—काढा, अर्क, सार
कार्हि—कधीं
कळि—कलह; कलियुग
कलेवर—शरीर; मृत देह
कांचवटी—कांचेचा खडा

कांजी–पेज
कानडें–कठीण, दुर्बोध
कामारी–चाकर; सेवक
कामुक–विषयाधीन
काम्य–सकाम कर्म; विहित परंतु फलाशा युक्त कर्म
काम्यनिषेधही–कर्तव्याकर्तव्य
कांसवीचें तूप–असंभाव्य; मिथ्या
काहाळा–झांज
कांहींबाही–कांहींतरी
कीटक–किडा
कुकुमती–कोयना नदी
कुंप–कुंपण
कुरवंडी–ओवाळणी
कुहर–गुहा, बीळ
कूजती–शब्द करितात
केऊते–कोठें; कोठून
केयूर–बाहुभूषण
केंवि–कसें
केसरी–सिंह
कैपक्ष–कैवार
कैवर्तक–कोळी
कैवाड–कैवार, अभिमान
कोड–कौतुक
कोडिसवाणें कौतुकानें

**ख.**

खपुष्प–आकाशपुष्प; खोटें
खाणोरी–खादाड; गोडघाशा
खोळ–आच्छादन; पिशवी

**ग.**

गदारोळें–दुःखानें ओरडणें
गंधर्वनगर–आकाशांत कांहीं भास होतो तो; मिथ्याभास
गरिमा–मोठेपणा
गवार–मूर्ख
गुल्फ–पायाचा घोटा
गोचर–प्रकट; प्रत्यक्ष
गोमटें–चांगलें; सुरेख

**घ.**

घट–लिंगदेह
घंटिका–कंठमणि
घटियंत्र–रहाट
घण–मोठा हातोडा
घन–मेघ, दाट
घबाड-मोठा मुहूर्त
घोळ–घोंटाळा
घुमरी–गुराख्यांचा विशेष रीतीनें ओरडण्याचा खेळ

**च.**

चंद्रामृत–सतरावी कळा
चराचर–स्थावर आणि जंगम
चवऱ्यायशी लक्ष योनी–२० लक्ष वृक्ष योनी, ११ लक्ष कीटक, ३० लक्ष पशु, ९ लक्ष जलचर, १० लक्ष पक्षी, ४ लक्ष मनुष्ययोनी
चाड–इच्छा; आवड
चारी खाणी–चारज, अंडज, स्वेदज व उद्भिज

चारी पुरुषार्थ—धर्म, अर्थ, काम व मोक्ष
चारी मुक्ती—स्वरूपता, सलोकता, समीपता व सायुज्यता
चारी वाचा—परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी
चाळा—छंद
चित्रतरु—चित्रांतील वृक्ष
चित्तचतुष्टय—मन, बुद्धि, चित्त व अहंकार
चिद्-चिद्ग्रंथी—ज्ञान व अज्ञान यांची गांठ
चिद्रत्न—ज्ञानरत्न
चिद्रूप—ज्ञानस्वरूप
चिद्वृत्ति—ज्ञानवृत्ति
चिन्मय—ज्ञानमय
चैतन्य—जीव, आत्मा, ज्ञानकळा
चोज—आवड, नवल
चोहटा—चौक, चतुर्वाटा
चौदाविद्या—चार वेद, सहा अंगें, पूर्वमिमांसा, उत्तर मिमांसा, न्यायशास्त्र व धर्मशास्त्र

छ.

छाउ—आश्रय
छांडी—सोडी

ज.

जगजेठी—परमेश्वर
जगढाल—ध्वज, झेंडा
जघन—पोटरी
जगत्रय—स्वर्ग, मृत्यु, पाताल
जखडी—बांधणें
जनपदत्याग—मनुष्यवस्तीचा त्याग करणें
जनिली—जन्मली, उत्पन्न केली
जीवदशा—जीवाची स्थिति
जेंगट—वाद्यविशेष, घोटाळा, त्रास

झ.

झडकें—झपाट्यानें
झेंडू—सर्पदंशानें होणारा विकार झाड

ठ.

ठाण—स्वरूप
ठाणमाण—शरीराचा बांधा

ड.

डांगोरा—दौंडी
डुंडुळ—घुबड
डोल्हारा—देव्हारा

त.

तन्मय-एकरूपता
तर्जन गर्जन—त्रास देणें, गर्जना करणें
तमालनील—तमालवृक्षाप्रमाणें नीलवर्ण
तरणी—सूर्य
तार्किक ज्ञान—तर्कशास्त्राचे साह्यानें झालेलें ज्ञान
तांडव—नृत्य
तापत्रय—आधिभौतिक; आध्यात्मिक व आधिदैविक
तुकणें—वजन करणें
तेउती—तेथें
तेंवी—तसा

तृपा—लज्जा; मर्यादितपणा
त्रिकुट—श्रीहाट, गोल्हाटें व ललाट
त्रिगुण—सत्व, रज आणि तम
त्रिदोष—कफ, वात आणि पित्त
त्रिपुटी—कर्ता, क्रिया व कर्म
त्रिमातृका—अकार, उकार व मकार
त्रिविध तप— कायिक, वाचिक व मानसिक
त्रिशुद्धि—त्रिवार खरें
त्वंपद—तूं जीव हा शब्द
त्रिपुंड्र—स्मार्त भस्माच्या व वैष्णव गोपीचंदनाच्या कपाळावर लावितात त्या तीन रेघा

थ.

थडीये—किनाऱ्याला
थरकत—कांपत
थिल्लर—डबकें
थोकडें—थोडेसें
थोट—लबाड; झाडाचें खोड

द.

दंडप्राय--दंडासारखा
दम—बाह्येंद्रिय दमन
दर्दुर--बेडूक
दर्प—गर्व
दर्वी--पळी
दशन--दांत
दळ—सैन्य
दातार--धनी, स्वामी
दाथर—उकाडा
द्रापयिता--द्रेवविणारा
दिठी--दृष्टी
दिवाकरनंदनभृत्य--यमदूत
दिवाणांत--सरकारांत
दिवि—स्वर्ग, भुवि-मृत्युलोक
दिव्य--शपथ
दिव्य दामोदरें--मोठमोठया माड्या
दृष्टादृष्ट--इह व परलोकींचें
देशिकराणा--गुरुराज
देहभावना--अहंकार
देहसंस्मृति--देहाचें स्मरण
देहुडा--चवडा
दैवी--सात्विक प्रकृति
द्युति—तेज
द्वैत--भेदबुद्धि

ध,

धणी--तृप्ति
धांगडी—शिरजोर
धुर--अग्रभाग; श्रेष्ठ
धृति—धैर्य
ध्यानप्रोत--ध्यानेकरून जोडलेला

न.

नगतनयात्मज--गणपती
नवद्वार—२ कान २ डोळे २ नाकपुड्या १ मुख १ गुद १ उपस्थ; एकूण ९
नवरस—शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र व शांत
नवलाव—आश्चर्य

नवविधा भक्ति--श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन दास्य, सख्य व आत्मनिवेदन
ना--नाहीं
नागर--सुंदर; शहाणा
नातळणें--न शिवणें
नांद्याचा बैल--घाण्याचा बैल
नावेक--एक क्षण
निकें--चांगलें, खरें
निगुती--निभ्रांत, यथार्थ
नित्यानित्य--शाश्वत व अशाश्वत
निदसुरें--झोपेंतले; अज्ञानांतले
निदान--शेवट
निधान--ठेवा
नियंता--नियमन करणारा
नियम--मनोजय
निरंजन--मायारहित; एकांत
निरतिशय--अतीशय
निरय--नरक
निरवधि--निस्सीम, अत्यंत
निरवणें--सोंपवणें
निरहंकृति--अभिमानरहित
निरालंब--निराश्रय; शून्य
निरुतें--खरें
निर्विकल्प--ब्रह्म; कल्पनारहित
निलय--स्थान
निवृत्ति--विषयांपासून अंतःकरण फिरणें; अंतर्मुखवृत्ति; मोक्ष
निशाण--जयोत्पादक चिन्ह
निःशेष--संपूर्ण
निष्टंक--अव्याहत; समग्र
निष्टंकणें--निश्चय करणें
नीरदरंग--मेघवर्ण
नेणिव--अज्ञान
नैराश्य--वैराग्य

## प.

पंक--चिखल
पंचकोश--अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोश
पंचप्राण--प्राण, अपान समान, उदान आणि व्यान
पंचविषय--शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध
पंचवीस (तत्वें)--पंचमहाभूतें, पंचविषय, दशेंद्रियें, मन, अहंकार, महत्तत्व, माया आणि ईश्वर
पडण--विश्रांतिस्थान, भूषण
पडदासी--दासीची दासी
पडळ--पडदा; अज्ञान
पडिपाड--बरोबरी
पढियंता--आवडता
पतंग--सूर्य
पदपदार्थ--प्रत्येक पदाचा अर्थ
परत्या--माघाऱ्या
परत्र--परलोकसंबंधी
परंपरा--मालिका
परपारी--पलीकडचा कांठ
परमार्थ--ब्रह्मज्ञान, वेदांत
परवडी--रीति, प्रकार
परावृत्तियोगें--उलट फिरण्याचे योगानें

परिकर-सुंदर
परिग्रह-संग्रह, संग, आसक्ति
परिव्राज-संन्यास
पल्लव पदर
पहुडणें-निजणें
पांचवणें-हृष्ट होणें
पाटण-शहर
पाटाव-वस्त्र
पाड-योग्यता; सादृश्य.
पांडेवार-महार; वेसकर
पातेजोनी-विश्वास ठेवून
पारुषणें-बंद-नष्ट होणें
पालख-पाळणा
पाषांड-पाखंड
पासाव-पासून
पिंड-देह
पिशुन-दुष्ट
पुराणपुरुष-ईश्वर
पुरुषार्थ-धर्म; अर्थ; काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ
पुर्यष्टक-अष्टपुरी ह्मणजे देहपुरी
पूत-पवित्र
पूय-पू; नरक
प्रकृति-माया; स्वभाव
प्रणव-ॐकार, प्राणायाम; तुर्या
प्रतिष्ठान-पैठण क्षेत्र
प्रतीति-प्रत्यय
प्रत्याहार-इंद्रियांची अंतर्मुखता
प्रपा-पानपोई
प्रबोधणें-विकास पावणें; जागृत होणें
प्रमेय-सिद्धांत; तात्पर्य
प्ररोह-अंकुर; उत्पत्ति
प्रवृत्ति-बहिर्मुखवृत्ति; संसार
प्रज्ञा-बुद्धि
प्राणायाम-वायूचा अवरोध
प्राज्ञ-ज्ञाता

## फ.

फणि-सर्प
फोल-व्यर्थ, खोटें

## ब.

बाडिवार-थोरवी
बरवंट-चांगलें
बलाय-संकट
बहिर्मुख-ऐहिकांत गुंतलेला
बहु मानें-फार आवडतो
बाह्यवटें-बाह्यात्कारी
बिंदुलें-शून्य
बिरुद-बाणा; प्रतिज्ञा
बुझावणें-जाणणें; समजावणें
बोभाइणें-हांकमारणें
बोहरी-अग्नि; भस्म
बोळविणें-निरोप देणें
ब्रह्मसाम्राज्य-ब्रह्माची सर्वत्र व्यापक शक्ति

## भ.

भंग-भांग
भयकृद्भयनाशन-भय उत्पन्न करणार। व नाहींसें करणारा
भव-संसार
भाज-स्त्री

भ्याड–भित्रा
भावाभाव–खरें, खोटें; चैतन्य आणि जड
भाळ–मस्तक
भूतीं–प्राणिमात्रांचे ठिकाणीं
भूतें–पृथ्वी; आप; तेज; वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें होत
भूमिका–अवस्था जमीन
भेरी–नौबत

म.

मख–यज्ञ
मंडण–भूषण
मतवाली–हुशार
मदगजगमना–मस्तहत्तीप्रमाणें जिचें चालणें आहे अशी
मराळ–हंस
मरुद्गण–देवविशेष
महानुभाव–महा पराक्रमी
महावाक्य–ज्या वाक्यांत महा तत्वांचें प्रतिपादन आहे असें वाक्य. जसें; 'ब्रह्मेदं सर्वं'
मातापुर–तुळजापुर क्षेत्र
मांदुस–पेटी
मायिक–मिथ्या
माहेर–उत्पत्तिस्थान
मींठें–गोड
मुद्रा–मौनव्रत, आकार, चिन्ह
मोक्षदानी–नारायण
मौनी–मौन धारण करणारा

य.

यम–इंद्रिय नियमन
याग–यज्ञ
यान–रथ
येरयेरां–परस्परांला
येरु–तो
योग–अप्राप्त वस्तूची प्राप्ति, समाधिस्थितीनें साध्य करून घेणें
योगक्षेम–चरितार्थ
योनि–जाति, उत्पत्तिस्थान

र.

रंक–गरीब
रजत शुक्तिकाभास–मिथ्या भ्रम, शिंपेवर रुप्याचा भास
रज्जु–दोरी
रति–आवड, प्रीति
रंभास्तंभ–कर्दलीस्तंभ
रसना–जिव्हा
राजयोग–जनास्थितींत असून मन ब्रह्मीं ठेवणें
रातली–रममाण झाली
रातोत्पल–कमल
राहाटी–वागणूक
राहाट माळेपरी–रहाटगाड्याचे माळेप्रमाणें
रुढवी–प्रसिद्ध करी

ल.

लघिमा–लहानपणा
लंडी–दांडगा, अविचारी
ललाम–सुंदर

लवडसवडी—लगबगीनें
लाघव—कौतुक, खेळ
लाहो—छंद
लाक्षाजोहरीं—लाक्षागृहांत
लिंगदेह—वासनात्मक शरीर
लिंगभंग—सूक्ष्म देहाचा नाश
लिंगभेद वैषम्य
लिंपे—विलेपन केलेला
लीलाविग्रही—लीलेनें अवतार धारण करणारा
लुंचित—जैन संन्यासी
लोष्ट—मातीचें ढेंकूळ
लोहकार्य—लोखंडाचे पदार्थ

**व.**

वंचणें—प्रतारणा करणें
वटग्राम—वडगांव क्षेत्र
वर्णाश्रमविहित—वर्ण व आश्रम-योग्य आचरण
वमन—वांती
वसौटा—आश्रय, संग्रह
वागुर—जाळें
वाचारंभण—निरर्थक बडबड
वाड—मोठें थोर
वारण—हत्ती
वारिजनाभ—पद्मनाभ
विकल्प—भेद
विग्रह—देह
विचक्षण—शहाणा, ज्ञाता
विजन—एकांत, अरण्य
विंदाण—कौशल्य, विज्ञान
विभांडणें—मोडणें
विराग—वैराग्य
विवरणें—निर्णय करणें
विवर्त उपादान—घोटाळ्यास कारण
विषयपंचक—शब्द, स्पर्श, रस, रूप आणि गंध
विसंचणें—बिघडणें
विहित—योग्य, कर्तव्य
विज्ञान—प्रपंचज्ञान, अनुभव
वीतराग—वैराग्यशील, विरक्त
वैरी—खर्च करी, शत्रू
वोगरणें—अर्पण करणें, वाढणें
वोघ—प्रवाह
वोडंबर—दंभ, ढोंग
वोढण—ढाल
वोप—शोभा
वोल—तारण
वोसंगा—मांडीवर
व्यजन—पंखा
व्यष्टीसमष्टी—व्यष्टी—पृथक, समष्टी—समुदाय
व्यतिरेक—वियोग, संबंधाभाव
व्यामोह—भ्रांति
व्याळ-सर्प
व्योम—आकाश

**श.**

शक्ति—पार्वती, कुंडलिनी
शफरी—मच्छिणी
शम—मनोजय, शांति
शार्दुल-वाघ

शाब्दिकज्ञान—पोकळ ज्ञान
शिराणी—इच्छा, महत्व
शिबिर—डेरा
शुक्ति—शिंपला
शुद्ध सत्वपद—ब्रह्मस्थान
शुचिष्मंत—शुद्ध
शेंस्री—शेंपटी
श्रेणी—पंक्ति
श्रोणी—वैदिक
श्लाघ्य—प्रशंसनीय
श्वपच—चांडाल

ष.

षट्कर्मे—यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह
षट्पद—भ्रमर
षड्गुण—यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य
षड्दर्शनें—सौर, शाक्त, गाणपत्य, वैष्णव व शैव
षड्रस—कटू, कषाय, तीक्ष्ण, लवण, मधुर व आम्ल
षडक्षरी—सहा अक्षरांचा मंत्र
षड्शास्त्रें—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा व वेदांत

स.

संकल्प—कल्पना
सकळै—सर्व
सखोल—गहन
संघ—समुदाय
सत्रावी—जीवन कळा
सप्तधातु—अस्थि, नाडी, मज्जा, मांस, त्वचा, रक्त, आणि नख व केश मिळून सप्तधातु
सनातन—शाश्वत
सत्तासुख—ब्रह्मसुख
संबोखणें—तृप्त करणें, हांक मारणें
संभार—समुदाय
समभाग—सारखे विभाग
समरस—एकरस, ब्रह्मानंदरूप, परिपूर्ण
समवाय—समुदाय
सम्यक—चांगला
समाधी—ध्यानाची पक्कदशा
संमुख—समोर
संयम—इंद्रियनिग्रह
संयोगवियोग—लाभ अलाभ
सरी—बरोबरी
संवगडा—मित्र
सर्वनियंता—सर्वज्ञ भगवान
सर्वान्वयी—सर्वसंबंधीं
संवाहन—सेवा करणें
सर्वी—सर्वत्रांनीं
संविति—ज्ञान, जागृति
संसरण—जन्ममरणप्रवाह
संसरणें—सरसावणें
सहजस्थिति—ब्रह्मस्थिति
सहस्रदळ—ब्रह्मरंध्र
संज्ञा—नांव
सा—सहा
सांकडें—संकट

सांगोपांग—यथास्थित, अंग व उपांगासहित, सर्वांशीं

सात्विक—सत्वशील, [अष्ट सात्विक भाव-स्वेद, स्तंभ, रोमांच, स्वरभंग, वेपथु (कंप), वैवर्ण्य, अश्रु, प्रलय]

स्थाणु—खांब

साधनचतुष्टय—नित्यानित्यवस्तु विवेक, इहामुत्रफलभोगविराग, श्रद्धा, तितिक्षा

सानुरागें—प्रीतियुक्त अंतःकरणानें

सानुलें—लहानसें

सांप्रदाय—गुरुपरंपरागत आचार, किंवा उपदेश

सांवरील—आंवरील, कैवार घेईल

सायोज्य संपदा—तद्रुपता मुक्ति

साक्षात्कार—स्वानुभव

सुणे—कुत्रे, निरर्थक

सुश्लोक—कीर्तिमान

सुहृद—मित्र,

सूकर—डुक्कर, करण्यास सुलभ

सेखी—शेवटीं

सैंघ—सर्व, फार, केवळ

सैरणी—स्वतंत्रतेनें हिंडणें-वागणें

सोनेसळा—पीतांबर

सोपान—जिना, मार्ग

सौदामिनी—वीज

सौरस—प्रसाद, गोडी

स्थूल सूक्ष्म—स्थूल-पंचभूतात्मक शरीर, सूक्ष्म-वासनात्मक लिंगश-

स्थूलदेह—अस्थिमांसाचा देह

स्वरुपोन्मुख—स्वरूपाचे समोर

स्फुल्लिंग बाळ—लहानशी ठिणगी.

स्वानंदघन—ब्रह्मानंदानें परिपूर्ण

स्फुंद—अभिमान

स्मृति—धर्मशास्त्र, स्मरणशाक्ति

## ह.

हमी—जामीन

हरळा—गारगोटी

हृदयडांक—गोंधळांतील डाक

हमामा—खेळ विशेष

हर्षामर्ष—आनंद व क्रोध

हातमात—हात टेंकणें

हातवटी—युक्ति, कौशल्य

हिंगणा—हिंगणबेट [वृक्षविशेष]

हुंबणें—इवळणें

हुंबरी—खेळविशेष

## क्ष.

क्षयातीत—नाशरहित

क्षर—नाशिवंत

क्षिरनिधिजाकांता—लक्ष्मीचा पति श्रीविष्णू

क्षुद्रघंटिका—लहान घां…

क्षेत्र—शेत, तीर्थ, देह

क्षेत्रसंन्यास—क्षेत्रांतून बाहेर जाणें नाहीं असा नियम करून जो संन्यास घेतात तो.

क्षोणि—पृथ्वी

क्षोभणें—रागावणें

## ज्ञ.

ज्ञप्ति—ज्ञान

ज्ञानघन—पूर्ण ज्ञानी, ज्ञानपरिपूर्ण

ज्ञानानल—ज्ञानाग्नी

ज्ञेय—जाणण्यास योग्य विषय.

# या ग्रंथातील पदांची सूचि.


| मूळ चरण. | पदांक. |
| --- | --- |
| **अ.** | |
| अउले माझे कृष्णाबाई | ६२२ |
| अखंड टोणपा यापरि | १६५ |
| अघटित घटना या पटीं | ४४२ |
| अच्युत चिंतन करि चित्ता | ४७६ |
| अच्युत तरु गुरुवर यातें | १९६ |
| अच्युतानंता अक्षया श्रीरंगा | ६९८ |
| अझुनी जागी न होसी | ५० |
| अंतर तुजसीं म्हणवुनि | ३७३ |
| अंतरींचें पुरविल अर्त | २२९ |
| अंतरीं ध्यावा श्रीहरी | ६१७ |
| अद्यापी त्रास मनीं येईना | २०३ |
| अनन्य भावें कां न भजती | ५७२ |
| अनुभवसुख सांगातिणी | ५९ |
| अपार पूर्व पुण्येंकरुनी | ६६३ |
| अरे तूं तोंचि आहेसी स्वयें | २४६ |
| अवघा तूंचि हरी | ६४७ |
| अवघें सुख पाही | २९३ |
| असत्यादि वशें कां सखियें | २९५ |
| अहं देहीं अनुभवितो | ६०३ |
| अक्षयीं ब्रह्मानंद पूर्ण | १९७ |
| **आ.** | |
| आजी मोठा हो लाभ लाभला | ४९९ |
| आठवा चित्तीं राम निजमूर्ती | ५६३ |
| आणा मंदिरा इंदिरावरा | ३६१ |
| आणुनि दावा वो शेषशायी | ११४ |
| आतां काय उपाय करूं | ३५ |
| आतां चोज सांगूं मी काय | ३०६ |
| आतां तरी जागे गुरुपर्वी | ५४९ |
| आतां रामपायीं मना लागें | ७० |
| आतां वसुधातळहीं बुडो | ४७३ |
| आतुर चतुरपण काय असे | ४८९ |
| आपुला आपण तो वैरी | १७१ |
| आपुला आपण सखा तो | १७० |
| आपुल्या नामासाठीं नामांकित | ५६६ |
| आपुलीच क्रिया आपणा तारक | २८२ |
| आपुलीच क्रिया आपणा | १४८ |
| आलेल्यानों संसारा | १३९ |
| आह्मां दुर्बळांच्या डोळा | ३९४ |
| आम्ही जन्म अनंताच्या | ९६ |
| आम्ही दासींच्या पडदासी | २०७ |
| आम्ही धन्य धन्य धन्य | २३९ |
| आम्ही नायकों या कर्णी | ७९ |
| आम्ही सद्गुरुकृपें सुखरूप | १५१ |
| आम्ही हरिदासांच्या दासी | १२९ |
| आमुची चिंता भगवंता | १०२ |

आमुच्या वाडिलांची ठेवणी १९९
आत्मया रामा येरे येरे १८७
आत्मज्ञानें विना मोक्ष कैचा १९९
आमुचे वंशीं कैंचा राम ३९३
आरतें आरती उजळूं सद्गुरु ४४५
आरतें आरती उजळूं सद्गुरुपायीं ४४९
आला क्षीरसागरवासी ७७
आले रे आले महावीर संत ४८
आहा रे केवढा हा गोता ४६२
ॐ
ॐ नमः शिवाय सकलही मंत्राचा १३
ॐ नमो जय जय जी सद्गुरु ५७६
ॐ नमो जी शांता सद्गुरू ७
इ.
इतुकें देई देवा तुझी आवडी ३९८
ईंदरावर हरि आणा मंदिरा ५५९
उ.
उच्चारी वाचे श्रीराम ५७०
उद्धवा समज रे माधवा ५५३
उमगला मजला हरी भक्ता २००
ए.
एकनिष्ठ सद्भाविक विश्वासु ११०
एकभावें शरण तया जावें ४४०
एक मीच प्रियकर ज्याला ६५०
एक राम त्यासी काम येर २३९
ऐ.
ऐसा गुरुभक्त जिवन्मुक्त ६६२
ऐसा दृढ निश्चय हा केला १२८
ऐसा परमार्थ काय कोण पुसे १४७
ऐसा शंभू देखिला आजी ८९
ऐसा सखा कोण रे ५५४
ऐसा सासुरवास वेऊं नेदी २७
ऐसा हा अगणित महिमा १०५
ऐसी कैसी चाल तुमचे घरींची १५०
ऐसी तुझी कीर्ति म्यां ऐकिली ५७९
ऐसी मी जोगीण जाहलें ३४८
ऐसी रंगमूर्ती म्यां देखिली ५०८
ऐसी हें हरीची लीला ३१
ऐसेंअसतां परि कृतार्थ ४७७
ऐसे अवतार दशविध हे ५४
ऐसें काय जिणें हरिविणें ५६४
ऐसें कैसें हें बाळ असों दे ६१२
ऐसे यमधर्मापाशीं यमदूत १४२
औ.
औट हात ह्मणवितसे ३०९
क.
करविरपुरवासिनी येवो ८१
करविरपुरवासिनी वेदा नें ८२
करिसी कां चिंता ९५
करि दया मजवरि श्रीगुरु २६५
करिल तें काय नव्हे राघव ६३६
करुणा आली रे आली १०८
करुनियां काय वणवण ५४७
कर्म किंकरुं योगीया ३५९
कर्मबाळिवान्मुनयो वदंती ५९९
कृष्णा धांवे पावे ३४
कृष्णाबाई वो बाई २९४
कृष्णा रामा गोविंदा ५८८
कळो आली माव रे भाक्ति ५५२

का भार वाहूं उगा २८३
काम क्रोध लोभ तिघे चोर ५०३
कामाचे मजूर आह्मी ६३४
का मीं कामीं प्रीती धरूं ४८६
काय त्याचें जाहलें ७२
काय सांगू सये माझ्या १४९
काय सांगूं संतांची ४४१
काय करावें हें रुपाचें ३४१
कार्यसिद्धी झाली परी ४३
कायापुर पाटणीं राजा मन. ५३
कारण श्रीगुरुराज कृपा ४५४
का रे नोळखसी ६२३
का रें सांवघपणें वर्तणूक १३७
का रे हरि आठविला नाहीं ५४६
कांहीं नरदेहीं या झालें ४१६
कांहीं बोल रे बोल कान्हां ३९०
कांहीं भय नाहीं स्वस्वरूप १६१
कांहीं सर्वकाळ पर्वकाळ येत १७९
कां हें भुलली वेडदुली १३३
केला निश्चय हाचि मनीं ५३८
केवळ नरहरी तो २२३
कैसा बाजार केला वो ४०
कैसा मीपणें भुललासी ३३५
कैसा स्वयंपाक केला ३४६
कैसी घेतलीसे पाठी ३०५
कोणी तरी ह्मणोत कांहीं ५३५
कोणी वंदू कोणी निंदू ६२९

## ख.

खरसम नर तो कीं ४७२
खरसम नर तो कीं मानव ४७१
खेळे गोकुळीं मोकळी २९१

## ग.

गडी आमुचा रे ४००
गुरु गारुडिया रे २७७
गुरु ते शरण न जाते ५०९
गुरु देव दत्ता अनंत २२०
गुरु देवदेवा करुणासागरा २८४
गुरु निर्मळा गुरु निष्कळा ६२७
गुरुपदीं जडलों मी ६४९
गुरुभजनीं उन्मन मन ६०९
गुरु हे दोनिच वर्ण पूर्ण ३
गेला मान सावरील कोण ४९४
गोकुळ हें आमुचें गोपाळें ६३१
गोवर्धनधारी आला ५५७
गोविंदाची गोड कथा फार १८०
गोविंदा गोपवेषा ४३६
गोविंदा रामा हो ६६५

## घ.

घडी घडी जीवितें सरतें रे ३२९
घरा नका जाऊं त्याचें तोंड ६५१
घेतलें रे या षड्वर्गीं ५५६

## च.

चावट वटवट कां करिते १३१
चिदुदधीं निजरंग २५२
चिद्भुवनीं योगिराज तो २६२
चित्सूर्योदय जाहला ६३०

## ज.

जखाडि घाली निकी ३४५
जगनग कनक स्वामी तो ६६०

जग नग हेम हरी किंवा १६६
जगदोरी हो साधू २७२
जगीं साधु विरळा २९७
जग मृग नीर राम रवी ४९०
जनीं जनार्दन पहा २२८
जनीं जनार्दन तो १९०
जगन्माता तुझी कांता १४४
जरी त्या विसरे ३२२
जळो जिणें हरिविणें २६६
जळो त्याचें शहाणपण २१४
जळो तें ज्ञान अज्ञान खरें ६१
जयजयो बा सद्गुरुराया ९९
जाउद्या परते भोगुद्या २३०
जाउ पाहूं भीमातीरविहारी ९९२
जागे जागे रे प्राणिया ३७०
जा जा रे सद्गुरुराज भजा ४९८
जा जा रे भ्रांत हो प्रांत ७६
जाणती गुरुपदिंचें ३११
जाणावे संत केवळ ब्रह्म ९७७
जानकीजीवना रामा ३०
जिवलग बंधू तो १५९
जिवलग बंधू निजभक्त ९८०
जिव्हे स्मर गे हरिहर २२
जीवा स्मरण करसीना ४०८
जीवाचा जीवन आणा ४३७
जीवींच्या जीवना माझिया २८७
जैसें बोले तैसें चाले १३९

झ.

झालें धन्य मी आजि ९३

ड.

डोळा उघडेना २२६

त.

तड तड तड तोडुनि टाकी ६३२
तब मै सद्गुरुनाथ कहूं ९५९
तरणोपाया भावार्थ हा ४८०
तरी मग गडबड कां २१९
तरोनियां तारक तोची ३१३
तरी तृप्ती न बाणे सहसा २१७
तंव आकाशीं गर्जती भेरी ४१३
तारी गुरुविना कोण ४०९
तारी श्रीराम सोयरा २६४
ती आली वो कृष्णा ५०४
तीर्थविधी सहजीं सहज ६९६
तुज उजडेना कां प्राण्या ४९६
तुझीं बीदें त्वां जतन ५६७
तुजहुनी तुझ्या नामाचा ११०
तुज म्य। नामरूपा आणिलें १८३
तुजविण राघवा ३३६
तुझेंचि सुख तूं पाहीरे ३७३
तुझें तूं गमाया धड रे ४१७
तुझा उद्धार या पदरजें ५०६
तुझीं नामें पतितासी ६००
तूं पाहे रे हाचि उपाय २८९
तुला अझुनि तरी विकृति १६७
तूं हरि नारायण स्मर १२४
ते धन्य जगदुद्धारी ४५६
ते व्याभिचारिण जाणावी ५१९
तेचि महा पुरुष हर्षयुक्त १२०
ते मज दिधलें सभाग्य ३१४

तेरे तेरे तेरे ३९२
तोचि संत सज्जन गुरु १७२
तेव्हां गुज कळलें २२७
तैसी माझी हे वाचाळी ४२७
तो ईश्वरी पुरुष विरळा ४६०
तो घण मणी ना ९४३
तो गोविंदु दयासिंधु १५
तो तूं विसरसी कैसा ५५८
तो निज कळेना दुरित ३३२
तो नर पशु जाणा ३३४
तो नारायण नरदेहीं ५१४
तो नर हरि तनु अवलोकी १०९
तो मज बहु माने १००
तो मज मानेना ९९
तो योगी विषय विरागी ९२९
तो मी रामकृष्ण वासुदेव ९६९
तो विरळा या मानव १३४
तो हरि आणा वो ८०
तो योगीराज सहजें २८८
तो मज आवडतो ३६
तो राम झुलतो ३९०
त्राहि त्राहि रामा मुनि ३६६
त्रिगुणात्मक जन रे त्याले ७३
त्याची तनु काशी ७३
त्याला भवसिंधु हो बिंदु ४५८
त्याला मानवलोकीं ५२
त्यासी भावागे सावळा २८३
त्यासी जाणे तोही तोची १९४
त्वां येउनि सार्थक काय ५२९

द.

दयासिंधु हरि दीनबंधू १७७
दयासिंधु हरि दीनबंधु रामा ६४०
दत्तात्रय दत्तात्रय ऐसे १०
दावी वो पाउलें राम ६०२
दिक्पाळक नभधरणी ४४८
दीनानाथा कृष्णराया २४२
दीनांचा साहाकारी ६२४
दीनानाथा श्रीरंगा ये रे १३५
दिवसाची हे रात्रि मनुजा ५१७
दीनबंधु भक्तांचा सहाकारी ५७३
दुर्जय भव हा चुकवा रे २३०
दुःखरूप संसृति अबलां १३६
दुर्लभतर हो दर्शन या ३७१
दुःख शोकही सरला १८४
दुर्जन पदोपदीं दुःख ४५२
दुर्लभतर नरदेह पावुनि २२१
देउनीयां चित्त आदरीजे २४०
देई इतुलें अंतरिंचें गुज ४११
दे देवो राधे पावा माझा ५३२
देवाची वेडी स्मरण १३२
देशिकराजदयानिधि ११
देशिकराणा आणा हो ४९
देवाधिदेवा भजन मी ४०९
देवा गुज उमजेचिना ४१०
देहीं मीं माझे वैरीयातें ४१५
दे दे मजला देवा तंव पद ९३२
देहीं विदेहत्वं विचरतो १६३
देवचि मानव तो २७१
दैवत श्रीगुरुराज २९०

| | |
|---|---|
| दैवें आलों तुझिया पोटा | ३९५ |
| दो दिवसाचा संसार | २४० |
| दृश्य अदृश्य होता | ४७० |
| **ध,** | |
| धरावा भाव श्रीरामीं | ३३३ |
| धन्य धन्य धन्य आम्ही | ३३ |
| धन्य ते कीर्तन करिता | २६ |
| धन्य धन्य आम्ही जाहलों | ४४४ |
| धन्य धन्य ते शिवभक्त | ६१० |
| धन्य धन्य धन्य ते ज्ञानी | ६४१ |
| धावे पावे कर्णधारा रे | ४७ |
| धांवे पावे राघवा दीन | ४२८ |
| धांवे पावे निजमूर्ती | ४४६ |
| धिग धिग बंधू तो | १६० |
| धिग धिग विरस जिणें | २६८ |
| ध्याबा देव गजानन रे | ६४२ |
| **न.** | |
| न पडेचि अझुनि ठावे | ३७९ |
| न मन सर्वगतास्वामी | ३०४ |
| नर मृग पडला रे पडला | ६२२ |
| नरदेहासी येउनी काय | ५७१ |
| नर नारायण तें देहीं | ६९७ |
| नवविधा भक्ती करुनी | १०२ |
| नवविध भजन घडो | ४७४ |
| नारायण तूं गा होसी | १२९ |
| नारायण करुणासिंधू | १८२ |
| नाहीं मागत संपत्ति धनें | ४४७ |
| नामापरतें सार नाहीं | ४५१ |
| नारायण परायण झाल्या | ६९१ |
| नाहीं नाहीं सद्विवेक | २१४ |
| निजानंद महाराज | ४ |
| निज मूळा जावें गे होंचे | ३४४ |
| निजरामा ये रे | ३११ |
| निज भक्तांलागीं देखा | २३७ |
| निजमूर्ति रामा ये रे | २८९ |
| निजमूर्ति विमल | ६०१ |
| निजानंदें विचरो | ६३० |
| निरवधि आवडती | ६४५ |
| निधान असतां हातीं | ५१२ |
| निरालंब गांवीं एक | ३७४ |
| निर्लज्जा साधिलें काज | ३१७ |
| निजहिता मी चोर | ३९१ |
| नंद यशोदेचा बाळक | ४१४ |
| **प.** | |
| पतितपावन नाम तुझें | ६०७ |
| पतित संशयें केला | ५०८ |
| पती कळला नाहीं जीव | ३७१ |
| पडो त्याच्या पायां | ३४७ |
| परम पुरुषार्थी महाराज | १८१ |
| पहा पहा श्री राम नयनीं | ४१२ |
| पंडित हो येथुनि तुमचें | ४३६ |
| पंढरपुरच्या बापा | ६११ |
| पारिसा रे संसार सार | २८१ |
| पाउनियां नरका या | ६२१ |
| पाहावे एक चांचपुनी | २३९ |
| पांडुरंगें तूं ये गे | २४५ |
| पाहा वय व्यर्थीचि गेलें | ६४ |
| पावला सद्गुरुराज | १३८ |
| पाहतां समरीं शूर | १९७ |
| पाहूं चला पंढरपुर | ६८ |

पाहतां काय खरें १९८
पिटोनि डांगोरा बोले २९
पिंड ब्रह्मांड रचियेलें १७३
पितांबरधारी कोण ६९४
पुंडरीके ऐसा कैसा २४१
पुनरपि जन्मा यईन १५८
पुराणपुरुषा जग १७
पुंडलिका वर कांहीं १२५
पुंडलिकवरदा बिरुदा ५१०
पूर्वी गणाधीशा १
पूर्ण ब्रह्म तूं इंदिरा १६
पूर्ण ब्रह्म निर्गुण निराकार १८
प्रथम मस्तकीं मोरया १०६
प्रपंच परमार्थी १९३
प्रातःस्नान प्रातःकाळीं ६२
प्राणी भुलला रे २५८
प्राणी त्यागुनि स्वात्मसुखा ४५९

फ.

फट फट तूं चुकलासी लंडी २१
फुकट फाकट ब्रह्मज्ञान १९२

ब.

बाई माझें दैवत श्रीगुरू १२७
बाई ये मना कैसें हो मानल ४३९
बाईगे ऐसीं चिन्हें कै. ६५०
बाप कृपाळू निज राम ३२३
बिचित्र गति आजि भई ४३०
बुडालों ब्रह्मानद जळीं ६९
बोलणें फोल झालें डोलण ६९८
बोले विवेक निज गुज ३३९
बोली फळते काय खोली ३०७
बोले शरयूतीर निवासा २४३
बोले वेगीं दीनदयाळा १४६
बंध मोक्षाची १११
ब्रह्मीं चिदवृत्ति जडली २९५
ब्राह्मणें अंत्यज मंदिरीं ९६

भ.

भगवत्स्मरण कराजी ६३७
भगवत्कृपेचा बडिवार १९
भगवद्भक्त भजन ९२
भगवद्भक्त ययापरी २७०
भगवत निज भक्ताची ६६१
भगवंत भक्त उभयता ४९७
भज भज श्रीहरी तो २७३
भज रे हरी सर्व हें २७९
भक्त देवासी भजतां ११९
भक्ताचा विश्राम रे ३०१
भक्ति तैं विरक्ती रे ४०७
भयकृद्भयनाशन १६८
भय मीपण संगें जडलें ६३
भक्त पराधिन मी ६४४
भली भली वोगरती २३१
भावाचि कारण रे ४८२
भाव लागला निजराभीं ४९०
भीमातीरविहारी हा ९७
भुललें मंदमती वर्णी ३३१
भलो नको जग मृगजल ९४१
भूवैकुंठ पंढरी ९१६
भोळी बापुडी मी २९३
भ्रमभरें भललासी वायां ३६४
भ्रमरा भुलसी कां कंटक १९६

भ्रमरा भ्रमासि का विषय १९४

म.

मज हें योग्य नव्हे पाहतां ९०
मतीमंदा रे काय केला धंदा ५४२
मन उन्मन तुझिये पायीं १६४
मन पाहिलें विषयीं २०१
मन भुलेनि भरलें रानीं ३७८
मन हें कारण बंधन १११
मन हें पापी अद्यापि ४७९
मन हें चंचल या रितीचें ५२४
मना निजहित काय रे २४४
मना ऐसा महाराज २४०
मना सावध रे सखया २६०
मना नाचविसी काय ३१८
मना हरी हरी बोल ३८०
मनीं भरला रंग झाला ६४६
मनुजा जाग रे स्वरूपीं ३०२
मनुजा सावध सावध रे ३०३
मला गोकुळीं गोपाळ ५०९
मला काय उणें वो कोठें ६११
महादेवा भाळलोचना ४३४
मृत्तिकेचा घट पाही ३५१
मृदंग टाळघोषें टाळी ४२५
ह्मणवुनि सावध रे ३२६
माझा राम पूर्ण काम ८३
माझा स्वामी सद्गुरु समर्थ ४९३
माझा सखा सोयरा श्री ५७५
माझा बाळ त्यावरि आला ६१३
माझा कैवारी हरी तूं ६१९
माझे कुळींचा स्वतंत्र २३
माझें कोपट काय ४२
माझी बलाय न करी १२३
माझीये कपाळें केलें २३४
माझें प्राचीन तोडी ११९
माझें मानस मोहिलें ३६०
माझें जीवींचें जीवन राम ३७२
माझें ध्यान निजानंद मन ४२३
माझ्या संचितें धांव कैसी ५०१
माझें मन रंगलें रामीं ५४१
माझी रंगमूर्ति मज कोणी ५४३
मातला रे रामरस हा सेवुनी ५६२
मातें तूं जरी मजवरी ६०८
मानवि जन्मा तो आला ४१९
मानसपूजन याची रितीं १४९
माहेरींचें सुख काय २८
मी आत्माराम पूर्ण ब्रह्म २०९
मी काय बोलों बोली १७१
मी तो सहज रिकामा २५७
मी माझें विसरें सहजें २७९
मीकोण ऐसें पाहे ३६९
मीवासुदेव येथें आलों ४०४
मी कोण हें काय कर्ता ५६९
मी देह ह्मणवी जो त्यासी ५८९
मिथ्या नाम रूप रे १७४
मुख पाहूं नये त्या शवाचें २०२
मुरली मनोहर खेळे ३८९
मूर्ख बहिर्मुख रे झाले ४९७
मुळींच तें नाहीं अनादि ६४८
मेघश्याम हें नाम १२
मोठे काम क्रोध लोभ ५०२

मोह मदांध पडे याचे ५४४
मोह मद्यपी यद्यपि बोलतो ५४५
ह्मणउनि उमज पडेना २९

य.

याचि पथें जासां भय ३१२
याचा भरंवसा काय ५३०
याची कैसी खंती वाटेना ६३३
याचें कोणें काय नेलें ५३६
यांत कोणाचें काय बा १८८
या देहाचें पडणकाय ६५३
या नरदेहीं तरिच बरें ४१२
यारे गडियानो सोडुंनि ५९७
यावें रविवंशा भरणा ५२७
या परमार्थे विश्वंभर ४७८
या संतांचे संगती लागतां ४९१
या लक्षणें जो युक्त तो भक्त २०
यापरि इहपरलोकीं २१८
या सज्जन जाणती गोष्टी ३७५
येकनाथ हें नाम ९
येई येई वो माउली निज ३२५
येई वो श्रीरंगें माझे ३२४
येई इथें बा प्राणसखया ३६७
येई येई वो गुरुमाउली ४८४
येई येई रे श्रीरामा ५१८
ये आई राधा मजवरी ६१४
ये ये काळीं वनमाळी ४८१
ये रे आत्मया रामा २११
ये रंगा यावें दीनदयाळा ४०६
येसी केधवां मानस ३९५
योगी दर्शन दुर्लभ रे ३७
योगी स्वानंदें उन्मत्त रे ४९८

र.

रघुवीरा या देवराया ३७७
रम रे रामपदीं मानस २७४
रविकुलदीपक दशरथ ३२७
रविकुळ भूपा रे तूं २३६
राघवा रे धांवे पावें २६२
राजस रामाबाई शिनादि ३९६
राघव स्वामी आमुचा ४२६
राज नमो गुरुराज नमो ४८८
राजा महाराज तो राजयोगी ५७४
रातली मती परपुरुषीं ५६०
रातला रे हरी अंतर ५६१
रामराया रे छेदी दुस्तर ३८८
राम कृष्णा वासुदेवा ४२२
राम बिना हुं तो बावरी ४३१
रामरूपीं जडली प्रीती ५८४
रामसखा करुं या आतां ४९५
राम निजमूर्ति ह्याचि पै ३४३
राम रंगें रंगली ये बाई ३१६
राम नामामृत पान २०४
राम कृष्ण विष्णु नामें ३२
रामदास चतुरक्षरी मंत्र ८
राम निजमूर्ती षडक्षरी २
रामीं आराम जया ८७
राया हरीची माया २१६
रामीं रंगली वृत्ती कामीं २३२
रामा सोडवी रे सखया २५९
राहे रे राहे भुललासी मनी ३१९
रामीं रंगले डोलती मुनी ३५८

रामा रामा मेघश्यामा ३६३
रामा रे तुझिये कृपें ४२१
रामा रामा जानकी जी ४३३
रुक्मिणिरमण हरी १७८
रंग रंग ह्मणतां दोन्हिच ९
रंगीं रंगावें वेधकें ३४९

ल.

लागुनि शिवभजनीं १४३
लाज नये ह्मणविता ज्ञानी ४४२
लाहे लाहे हरिनाम गा ६२१
लाहो घ्या हरिभजनाचा १०९
लौकिकाचें काज नाहीं ३४२

व.

वटवट बहु करिसी किती ८४
वद वद वद गे जिव्हे ९४८
वर्म कळेना देहबुद्धि १२१
वय वायां गेलें २१०
वाघानें अखंड घरीं ४०३
वाटे चोज तुज मज ३२०
विचरें स्वानुभवें त्याला ४६७
विचित्र गति आजि भई रे ४३०
विठ्ठल विठ्ठल ऐसें बोलों ६
विवेक पूर्ण प्रबोधी ३९
विवेक उद्धव मथुरेहुनी ९७
विठ्ठलराया पंचाक्षरी या ५८
विष्णु सदाशिव श्रीधर, १०१
विनायकावांचुनि देव २४९
विरळा सज्जन तो २९४
वासरमणि कुळभूषण ५१३
विश्वातीं तनु राम ९८६
विरळा या मानवलोकीं ९९४
विठोबा मागेन हा वर देई ६२६
विपरित चरित गुरु ३२८
विचित्र झाले बोल ३५६
विचित्र लाघव ३१०
वेडें कां झालें मन ६१९
वेधक रामाबाई ३९७
बोलला मजवरी निजमूर्ती १९३
व्याप्य व्यापक सर्वांभूतीं १२६
व्हावें पायाळा अंजन २०८
वृंदावना आला तो रंगनाथ ६६१

श.

शरण रिघा गुरुवर्या ९१
शरण त्या गोपाळा जावें २६९
शरण तूं जाई रे त्या श्रीहरी ४६९
शास्त्र व्युत्पत्तीचा भाव ३९३
शिव भजतां काय धोका ४२०
शिव शिव आतां मी ६२०
शिवेति मंगलनाम १४
शेजे कै निज येइल गे २७८
श्रवण हो हरिगुण श्रवणीं १७५
श्रीगुरुगारुडिया तूं येई ४४
श्रीगुरुचरणस्मरणीं ६६२
श्रीगुरुराजसखा ४९३
श्रीगुरुस्वामी सर्वस्वेसी ६३९
श्रीगुरुराज दयेनें अद्भुत १०७
श्रीगुरुरायें सांगों मी काय ३९७
श्रीगुरुवर्या रे निज चित्सूर्या २३९
श्रीरघुवीरा धीरा यावें ४०२

| | |
|---|---|
| श्रीराम अवघा तूंचि | २८६ |
| श्रीराम जय राम जय | ४८५ |
| श्रीराम राम वदाहो | ३६२ |
| श्रीहरी चरणसरोजीं | ११३ |
| श्रीहरीचरणीं अनन्य ते | ५८२ |
| श्रीहरीसम ऐसी माउली | ११७ |
| श्रीहरीसच्चिदानंदा | ५८९ |
| श्रीरंगा मुनिमनपंकज | ५३० |
| श्रीरंगा रंगा ये रे | ५९३ |
| **स.** | |
| सखया यादवराया | ३६८ |
| सखया रे काय झालें | २८० |
| सखयां स्मरण करीं रे | ५१७ |
| सखा हरी भेटवाहो | ५३४ |
| सखे या हरिवीण न गमे | ४२९ |
| सच्चिदानंदकंदस्वरूपा | ५९५ |
| सजणा अंतर निववी | ३२१ |
| संकट वारिल हा श्रीहरी | ६१८ |
| संत दयाळू मोठे गे बाई | ५८१ |
| संत नाममाळा शोभे कंठीं | २०६ |
| संत व्हावें तेव्हां कळतील | २०५ |
| संसारीं काय सार असे | ६५२ |
| सदय हृदय ते नरहरी | ६०४ |
| सदय हृदय नर तोची | ४८३ |
| सदा श्रीहरीचें नाम मुखीं | ५०० |
| सद्गुरुकृपें कल्याण | २९१ |
| सद्गुरुच्या उपकारा माय | ५८३ |
| सद्गुरुभजनीं लावा रे | ४६३ |
| सद्गुरु सद्वैद्यराज | ५८७ |
| सद्गुरु सद्वैद्याची घे | ४३ |
| सद्रूप तूंचि चिद्रूप तूंचि | २५६ |
| सन्मार्गे चालतील | १८० |
| सबाह्यांतरीं रामीं रामदास | २१३ |
| समपद सुंदर रे | ५९० |
| सये कै मनोरथ जगन्नाथ | २९६ |
| सये पुंडरीक वरद हा | ११५ |
| सये हरी लाघवी तो | ३८१ |
| सर परता गोपाळा | ७५ |
| सर सर परती तोंडाळे | १८४ |
| सर्व जीवा जीवन मी | ५२३ |
| सर्वा गोष्टींचें सार | १६६ |
| सहजची निर्भय ते ज्ञानी | ४६४ |
| सह परिवारें येउनी | ६२५ |
| साजणी गे लिहिलें भाळीं | २६१ |
| साजणी बाई तें सुख | ३८७ |
| साजणी माझ्या रामा | ३८६ |
| साजणी श्रीगुरुराज धनी | ४७५ |
| सादर परिसा माय वो | ३०८ |
| साधुसंत हे महामैंद | १८६ |
| साधुसंगें विचारी | ३७७ |
| साधुसमागम दे मज | ११२ |
| सावधान रे | ६३८ |
| सावध होईं वेगीं तूं मना | ६१६ |
| सिद्ध जगजोगी जागत | ४२४ |
| सिद्ध स्वानंद कीर्तनीं | २९० |
| सेवूं राम रसायन या | ६७ |
| स्नानें पानें दोष जाय | ३५२ |
| स्मरतां गुरुचे पाय | ५१५ |
| स्मरतां नित्य हरी | १४० |
| स्मर रे रघुवीर हें मानस | २७६ |

स्मर हरी कालिकल्मष २५७
स्वरूपीं संत झाले वो ४१
स्वहित विचारी रे ४१८

ह.

हर हर प्रभु महादेव ६०
हर हर सांब सदाशिव ९४
हर हर हर महादेव ४८७
हरी करुणाकर निलया ६६
हरी कां मन निष्ठुर केलें ५३१
हरी गुरुचरणस्मरणीं ३८
हरी गुरुभजन करा १९२
हरी गुरुभजन करूं या ५०७
हरीचरणीं रम रम २३८
हरीची मी दासी अंकिली ३३८
हरी जन हरि सम रे १९५
हरीजन हरिसम रे ३००
हरी तंतु जगदंबरीं २९८
हरी तुझें पतिलपावन ९१
हरीनाम सुधारस पान १७६
हरी नामामृत पान करीती २२२
हरि नारायण गा होसी ४६८
हरी नारायण नाम वदा जी २१२
हरी नारायण बोल २२५
हरीपायीं भाव धरावा ६५९
हरी भक्त संरक्षी त्याचा १५१
हरी मी भक्तिचा भुकेला ५२६
हरी ह्मणे ब्राह्मण माझे ८५
हरी रंगें रंगलें त्याला ८८
हरिविण कोण करिल ४०१
हरिविण क्षण तो शीण ५९१
हरिस न भजतां कां ११८
हरि हरि भजन करी १२२
हरि हरि भवकरीस नाम ११९
हा मज दृढ भरंवसा ६०५
हा विसरों कसा हृषीकेशी ६२८
हुं तो वारी वारी ३८२
हें एकांतिचें गुज मज ६०६
हें तो खोटें रे खोटें २४
हें मज कोणे सांगितलें ४९
हो कां उत्तम ते उत्तम ७४
हो कां भलतेसें परि तें ४६५
हो जें झाल तें झालें ९८
हो तो कैसा मी ठकलों ४६१
होय ऋणी जगदीश २४८

क्ष,

क्षणभंगुर पाही हो ३८९
क्षिरनिधिजाकांता ये रे ५२८
क्षिरनिधिजाकांता सत्वर २१९

ज्ञ.

ज्ञानदेव ज्ञानदेव ह्मणतां २२४
ज्ञानघनें ज्ञानी सुखनय १८५
ज्ञानी क्वचित क्वचित ८६
ज्ञानी परमहंस तो जाणावा ५६८

REFBK 0000097

REFBK-0000097